कैलासवासी

विष्णुशास्त्री चिपळुणकर

यांचें चरित्र.

——"*Paint me as I am*" *said Oliver Cromwell while sitting to young Lely,* "*if you leave out the scars & wrinkles, I will not pay you a shilling.*"

Macaulay's Essay on Warren Hastings.

पुणें

सन १९२१

किंमत { कापडाच्या बाइंडिंगसह
कागदाच्या

श्री. रा. प्र. कानिटकर
यांजकडून भेट.
१९८३.

कै० विष्णुशास्त्री चिपळुणकर

यांचें चरित्र

कै० लक्ष्मण कृष्ण चिपळुणकर बी. ए.

यांनीं लिहिलें.

—"*Paint me as I am*" *said Oliver Crŏmwell while sitting to young Lely.* "*if you leave out the scars & wrinkles. I will not pay you a shilling.*"

Macaulay's Essay on Warren Hastings.

मुद्रक व प्रकाशक

शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस पुणें, सदाशिव पेठ १०२६.

आवृत्ति दुसरी

सन १९२१

किंमत { कापडाच्या बाईंडिंगसह
कागदाच्या

हें पुस्तक

कै० विष्णुशास्त्री यांनीं सुरू
केलेले उद्योग—

न्यू इंग्लिश स्कूल,

केसरी, मराटा, चित्रशाळा
व
किताबखाना—

हे ज्या सद्गृहस्थांनीं त्यांच्या मागें चांगल्या रीतीनें चालविले आहेत त्यांस
व
" सद्वर्तनप्रवर्तक मंडळी, पुणें; "

जिनें हें पुस्तक लिहिण्यास ग्रंथकर्त्यास अमोलिक संधि आणून दिली, तीस,

पूर्ण आदरानें अर्पण केलें असे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

विष्णुशास्त्री वारून आज बारा वर्षे झालीं. इतक्या अवकाशांत त्यांचीं लहान मोठीं अशीं तीन चरित्रें आमच्या पाहण्यांत आलीं; एक निबंधचंद्रिका मासिकपुस्तकांतील, दुसरें बालबोधांतील व तिसरें रा. बेलसरे यांनीं स्वतंत्र असें केलेलें पुस्तक हें होय. पहिले दोन लेख हे त्या त्या मासिक पुस्तकांतूनच आले असून ते पुस्तकरूपानें निराळे असे प्रसिद्ध न झाल्याकारणानें ते आतां फारसे लोकांपुढें नाहींत. तिसरें चरित्र हें वरील दोन्ही लेखांपेक्षां अधिक विस्तृत असून त्यांतील विवेचन-हि अधिक यथास्थित आहे. रा. बेलसरे यांनीं विष्णुशास्त्री यांस जरी स्वतः पाहिलें नव्हतें तरी त्यांचे ग्रंथ वाचून त्यांच्या ठिकाणीं त्यांस विलक्षण पूज्यभाव उत्पन्न झाला व विष्णुशास्त्री यांच्याविषयीं माहिती मिळवून त्यांचें चरित्र लिहावें अशी त्यास इच्छा उत्पन्न झाली; परंतु त्यांस यथास्थित माहिती न मिळाल्यामुळें त्यांस आपल्या पुस्तकास 'विष्णुशास्त्री यांच्या चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप' म्हणूनच नांव द्यावें लागलें.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचें चरित्र ज्यांत त्यांचें जीवनवृत्त सविस्तर व विश्वसनीय असें दिलें आहे, ज्यांत त्यांच्या ग्रथांचें पूर्ण परीक्षण केलें आहे व ज्यांत त्यांच्या हातून महाराष्ट्र भाषेची व एकंदर महाराष्ट्रीय लोकांची कोणकोणती सेवा घडून आली वगैरे गोष्टींचें निरूपण केलें आहे, असें पूर्ण छापून प्रसिद्ध न झाल्यामुळें विष्णुशास्त्री यांस पुष्कळ चहाणाऱ्या लोकांस अशा पुस्तकाची बरीच उणीव वाटत होती. शेवटीं शास्त्रीबोवांच्या मरणदिवसाच्या स्मरणार्थ जो मेळा दरवर्षीं पुण्यास भरत असतो त्यांत १८९१ सालीं मार्च महिन्यांत वरील चरित्राची गोष्ट निघून ही उणीव अवश्य दूर झाली पाहिजे अशाविषयीं चर्चा चालली असतां पैशाशिवाय हें काम होणार नाहीं अशावर ही गोष्ट येऊन ठेपली. त्या

वेळीं विष्णुशास्त्री यांचे स्नेही रा. वासुदेवराव जोशी हे हजर होते. त्यांनीं लागलेंच अशा कामाकरितां दोनशें रुपये बक्षीस देण्याचें कबूल केलें. त्यावरून शास्त्रीबोवांच्या स्मारक फंड कमेटीनें वरील चरित्राबद्दल वर्तमानपत्रांत जाहिरात देऊन त्यांजकडे १८९२ एप्रिलअखेर पुस्तकें पाठविण्यास कळविलें. ही जाहिरात प्रसिद्ध होतांच कित्येक होतकरू ग्रंथकार तें काम करण्यास सरसावून त्यांपैकीं दोघांतिघांनीं आम्हांस विष्णुशास्त्री यांची माहिती देण्याबद्दल पत्रें पाठविलीं; परंतु चरित्र जें लिहिणें तें चरित्रनायकाबद्दल पत्रांनीं माहिती लिहून आणून किंवा ती तोंडानें ऐकून लिहितां येणार नाहीं; चरित्र लिहिणारांचा चरित्रनायकाशीं स्वतः पुष्कळ दिवस परिचय असला पाहिजे. त्याजविषयींची सर्व हकीगत त्यानें स्वतः डोळ्यांनीं पाहिली असली पाहिजे, त्याचा स्वभाव, त्याची चालचलणूक, त्याचे लोकोत्तर गुण, त्याचे ठळक ठळक अवगुण, त्याच्या अभिरुचि, वगैरे सर्व लहान मोठ्या गोष्टी चरित्रकारानें स्वतः पाहिल्या असल्याशिवाय व त्याच्या एकंदर कृतीबद्दल त्याच्या ठिकाणीं योग्य पूज्यभाव असल्याशिवाय त्यास तें चरित्र चांगलें लिहितां येणार नाहीं; असा आमचा समज असल्याकारणानें त्या वेळीं वरील गृहस्थांस आम्हांस येवढा मोठा मजकूर पत्रोपत्रीं लिहून कळवितां येणार नाहीं म्हणून कळवावें लागलें. यापूर्वी रा. बेलसरे यांनींहि आपल्या पुस्तकांत कांहीं शोध घालतां येतील तर घाला म्हणून आमच्याकडे त्यांनीं आपल्या पुस्तकांचीं पहिलीं कांहीं प्रुफें पाठविलीं होतीं; परंतु प्रुफांत फेरबदल किंवा शोध असे फारच थोडके करितां येण्यासारखे असल्यामुळें कांहीं प्रुफांनंतर तें काम तसेंच राहिलें.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचीं प्रसिद्ध झालेलीं चरित्रें अपूर्ण व कित्येक ठिकाणीं चुकलेलीं पाहून आम्हांस बरें वाटत नव्हतें; परंतु यापूर्वी आपण मराठींत कधीं कांहीं लिहिलें नसल्यामुळें व येवढें काम आपल्या हातून झेपणार नाहीं असें वाटत असल्यामुळें कित्येक दिवस आम्ही तसेंच स्वस्थ राहिलों. परंतु पुढें कांहीं महिन्यांनीं आमचे पूर्वीचे शिष्य रा. चिंतामण हरि लेले यांनीं विष्णुशास्त्री यांच्या चरित्राबद्दलची जाहिरात वर्तमानपत्रांतून वाचून

त्यांनीं तें लिहिण्याचें मनांत आणिलें; व त्याची सामुग्री आम्हांपासून मिळेल म्हणून ते आम्हांकडे आले. तें एक दोनशें मुद्दाम इतक्या लांब आल्याकारणानें त्यांची भीड आम्हांस तोडवना. तथापि माहिती सांगून ती आपल्या मनाप्रमाणें त्यांस वठवितां येणार नाहीं असें वाटून, व रा. लेले यांस विचारतां ५० पानें मजकूर हवा आहे असें कळल्यावरून तो मजकूर सांगण्यापेक्षां आम्हीं तो लिहूनच देतों व मग त्यांत तुम्हीं कमीजास्त काय करायाचें तें करून पुस्तक लिहावें, असें त्यांस आम्हीं सांगितलें. या वेळीं जानेवारी महिना सुरू झाला असून पुस्तकाची मुदत फक्त चारच महिने राहिली होती. तथापि पन्नास पानें येवढ्या वेळांत सहज लिहून होतील म्हणून आम्हीं प्रस्तुतचें चरित्र लिहिण्यास हातीं घेतलें, परंतु हळुहळू मजकूर जसजसा अधिकाधिक सुचत चालला व पूर्वीं ऐकलेल्या आख्यायिका एकामागून एक आठवूं लागल्या; तसतसा मूळ पन्नास पानांचा बेत प्रथम दीडशें, व नंतर साडेतीनशें पानांवरहि जत चालला; आणि पुस्तक जसजसें चांगलें वठत चाललें असें आमचे दृष्टीस पडूं लागलें तसतसें आमच्या मनांत असें येत चाललें कीं, पुस्तक रचण्याबद्दल जाहिरात असल्यामुळें वरींच पुस्तकें लिहिलीं जाऊन त्यांतून एखादें कमेटीकडून पसंत होऊन तें प्रसिद्ध केलें जाईल; परंतु त्यांतहि पुष्कळ चुकीची माहिती, अपुरें विवेचन वगैरे येऊन शेवटीं विष्णुशास्त्री यांचें चरित्र यथास्थित असें निघणार नाहीं; तेव्हां होईल तितकें करून राहिलेल्या अवकाशांत आपलें पुस्तकहि संपूर्ण करण्याचा आम्हीं विचार केला. पुढें तें सर्व तयार झाल्यावर आम्हीं तें आपल्या दोन तीन मित्रांस दाखविलें; तेव्हां त्यांनीं तें आपले अल्पवयी शिष्याच्या नांवावर प्रसिद्ध न करतां तें स्वतःच्याच नांवानें प्रसिद्ध करण्यास सुचविलें. याचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं, तसें केल्यावांचून या चरित्रांतील माहिती विशेष विश्वसनीय आहे असें वाचकांस सहसा वाटणार नाहीं. आमच्या मित्रांचें हें म्हणणें आम्हांसहि सयुक्तिक दिसलें व हें पुस्तक मुदतींत तयार झालें होतेंच, तेव्हां जाहिरात दिल्याप्रमाणें दुसरीं पुस्तकें आलीं होतीं त्यांत हेंहि आम्हीं परीक्षणास पाठवून दिलें. मात्र पूर्वींपासून

हें काम बक्षिसाच्या इच्छेनें केलें नसल्यामुळें आपल्या पुस्तकास बक्षीस मिळाल्यास त्यांतील कांहीं रक्कम रा. लेले यांस देऊन बाकी राहिलेले पैसे पुस्तक छापतांना त्याचे खर्चांतून वजा घालून तेवढ्यानें पुस्तक जितकें स्वस्त होईल तितकें करावें असा आम्हीं आपल्या मनांत संकल्प केला. पुढें बक्षीस मिळाल्यावर रा. वासुदेवराव जोशी यांस तो संकल्प कळविल्यावरून त्याप्रमाणें रकमेची व्यवस्था करण्याचें त्यांनीं कबूल केलें. येणेंप्रमाणें यापूर्वी मनांत मुळींच कल्पनाहि नसतां अगदीं सहज रीतीनें या पुस्तकाच्या रचनेचा योग कसा आला याची हकीकत आहे.

हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं रा. रा. गणेश अनंत वैद्य; श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, मल्हार खंडेराव चिटणीस, रामचंद्र सदाशिव लेले, गंगाधर सखाराम वाटे व वासुदेव गणेश जोशी यांपैकीं कित्येकांनीं उत्तेजन देऊन व कित्येकांनीं पुस्तक तपासून जें सहाय केलें त्याबद्दल त्या सर्वांचा ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

ग्रंथकर्ता.

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

प्रस्तुत ग्रंथाची पहिली आवृत्ति इ. स. १८९४ मध्यें काढिली होती. त्यावर दुसऱ्या आवृत्तीचा हा योगायोग सरासरी २६ वर्षांनीं येत आहे. पहिल्या आवृत्तींत नजरचुकीनें राहिलेले छपाईचे दोष काढून टाकण्यापलीकडे या आवृत्तींत विशेष कांहींच केलेलें नाहीं.

प्रकाशक.

अनुक्रमणिका.

रा.द्र. कानिटकर

विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचें चरित्र.

भाग १ ला.

बालपण.

आलक्ष्यदंतमुकुलाननिमित्तहासैरव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन् ।
अंकाश्रयप्रणयिनस्तनयान्वहंतो धन्यास्तदंगरजसा मलिनीभवंति ॥

शाकुंतल.

आमच्या या महाराष्ट्र देशांत इंग्रजी विद्येचा प्रसार होऊं लागल्यापासून जे पुष्कळ विद्वान पुरुष होऊन गेले त्यांमध्यें विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या पेक्षां चरित्र लिहिण्यास अधिक योग्य असा पुरुष क्वचित्च निपजला असेल. जेथें जेथें म्हणून मराठी भाषा बोलतात, तेथें तेथें या थोर पुरुषाचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य सांपडणें कठिण. यांच्या हातून अल्पवयांतच जीं अनेक महत्त्वाचीं कृत्यें घडून आलीं, तशीं गेल्या पन्नास साठ वर्षांत कोणाच्याहि हातून घडून आलीं नसतील. सुमारें दहा बारा वर्षांतच यांनीं आपल्या अलौकिक ग्रंथरचनेनें महाराष्ट्र भाषेस अगदीं वेगळें स्वरूप दिलें; लोकमताचा प्रवाह जो आपल्या देशाच्या खऱ्या हिताविरुद्ध जबरदस्त असा वहात चालला होता त्यास अगदीं उलटी दिशा दिली; आपल्या देशबांधवांमध्यें स्वदेशाविषयीं, स्वभाषाविषयीं, स्वजातीविषयीं अभिमान जागृत केला; व नवीन छापखाने, नवीन किताबखाने हातीं घेऊन सरकारच्या नोकरीवरच भिस्त न ठेवितां खाजगी उद्योगानें आपल्या विद्वान लोकांस स्वतंत्रपणानें व अब्रूनें कसें राहतां येईल, हें प्रत्यक्ष स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें.

विष्णुशास्त्री यांच्या हातून हीं वर सांगितलेलीं कृत्यें घडून येण्यास त्यांच्या आंगचे सद्‌गुण व दुर्गुण हे दोन्हीहि कारणीभूत झाले, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या आंगचे मोठे गुण म्हटले म्हणजे बुद्धिप्रागल्भ्य, सतत उद्योगाविषयीं हौस, अलौकिक धैर्य, सद्वर्तनप्रीति, साधा व गरीब स्वभाव व देशाविषयीं खरा व पूर्ण अभिमान हे होत. या सद्‌गुणांतच मिसळून व बहुतेक त्यांच्याशीं एकवट होऊन राहिलेले असे कांहीं दोष— स्वतःच्या योग्यतेविषयीं व स्वतःच्या ग्रंथांविषयीं असावा त्यापेक्षां जास्त अभिमान, हेकेखोरपणा, व्यावहारिक शहाणपणाची एक प्रकारची कमतरता, दुसऱ्याच्या दोषाकडे बारीक व कडक नजर हे—विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं होते. या दोन्ही गुणावगुणांचा मिलाफ चरित्रनायकाच्या ठिकाणीं नसून फक्त सद्‌गुणच असते, तर त्यांच्या हातून जी महत् देश-सेवा आजला झाली आहे ती होण्याचा संभव नसून, त्यांचे हातून माजी बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर किंवा कृष्णशास्त्री चिपळुणकर यांच्या सारखी ग्रंथरचनेनेंच केवळ एका तऱ्हेची देशसेवा झाली असती. परंतु वरील दोन्ही विद्वान गृहस्थांच्या कर्तबगारीपेक्षां पुष्कळच अधिक योग्यतेची जी—कीं नवीन खाजगी शाळा घालून कमी खर्चानें व सरकारी शाळां-पेक्षां निराळ्या तऱ्हेनें इंग्रजी विद्येचा प्रसार करणें, होतकरू विद्वान मंडळींमध्यें प्राचीन विद्या, प्राचीन कला, प्राचीन आचारविचार यांविषयीं प्रीति उत्पन्न करून त्यांस त्यांचें पुनरुज्जीवन करण्याच्या यत्नास लावणें, व सरकारचे केवळ मिंधे होऊन न बसतां स्वतंत्र धंदे काढून त्यांवर अन्नानें चरितार्थ कसा चालवितां येईल इत्यादि फार महत्त्वाच्या गोष्टी त्यांस शिकविणें—ही कर्तबगारी विष्णुशास्त्री यांच्या हातून घडून येण्यास त्यांच्या आंगच्या गुणांप्रमाणें दोषहि कारणीभूत झाले. हा प्रकार कसा घडला हें पुढील चरित्रावरून दिसून येईल.

आमच्या चरित्रनायकाच्या गुणावगुणांविषयीं वरील प्रस्तावना पाहून आमचे कित्येक वाचक, ज्यांच्या पाहण्यांत इंग्रजींतील बासवेलकृत जॉनसनच्या चरित्रासारखी अप्रतिम चरित्रें आलीं नसतील, त्यांस प्रथमतः सखेद विस्मय वाटण्याचा संभव आहे. कारण आमच्या भाषेंत जीं थोडीं

चरित्रें लिहिलेलीं आढळतात, त्यांत चरित्रनायकाच्या कांहीं ठोकळ सद्गुणांशिवाय बहुधा दुसरें कांहीं सांपडावयाचें नाहीं. त्याच्या अंगचे कमी योग्यतेचे गुण व प्रायः सर्वच दुर्गुण यांचा पूर्ण अभाव असावयाचा यामुळें मूळ चरित्रनायकाचें खरें स्वरूप वाचकांचें ध्यानांत येत नाहीं. ज्याप्रमाणें थोरले बाजीरावसाहेब पेशवे वगैरे ऐतिहासिक पुरुषांच्या जुन्या तऱ्हेच्या नुसत्या रूपरेषेनें (औटलाइनीनें) एकचष्मी काढलेल्या तजबिरीं- वरून मूळ पुरुषांचें स्वरूप चांगलें ध्यानांत येत नाहीं; त्याचप्रमाणें हल्लीं आपल्या भाषेंतील बापु गोखले, परशुराम भाऊ पटवर्धन वगैरे पुरुषांच्या चरित्रांवरून त्यांचें खरें स्वरूप ध्यानांत येत नाहीं. इंग्रजींतील बासवेलकृत चरित्र हें फोटोग्राफप्रमाणें मूळ स्वरूपाला धरून आहे. त्यांत चरित्र- नायकाच्या सर्व लहान मोठ्या गुणावगुणांचें उत्कृष्ट व खरें वर्णन आहे. शिवाय, फोटोग्राफमध्यें जसें निरनिराळ्या ठिकाणीं प्रकाश व छाया हीं कमीजास्त प्रमाणानें वठलीं असल्यामुळें फोटोग्राफांतील चेहऱ्याचा उठाव व खोलपणा स्पष्ट दिसून येऊन मूळ पुरुषाची ओळख सहज पटते व तो आपणापुढें जणूं काय प्रत्यक्ष उभा आहे असा भास होतो,त्याचप्रमाणें उत्कृष्ट चरित्रकाराच्या वर्णनानें चरित्रनायकाची मूर्ति वाचकांच्या डोळ्यांपुढें उभी राहून तीच प्रत्यक्ष बोलते चालते आहे कीं काय असें त्यांस वाटूं लागतें ! ही मूर्ति अर्थातच सुस्वरूप असावी अशी मर्मज्ञ वाचकांची अपेक्षा नसते; मात्र ती फोटोग्राफच्या तसबिरीप्रमाणें खरी असली पाहिजे; आणि ही मूर्ति चरित्रनायकाच्या खऱ्या स्वरूपाशीं जितक्या मानानें कमीजास्त जुळेल तितक्या मानानें चरित्राची योग्यता कमीजास्त लागते. हे वरील इंग्रजी चरित्रकारांचे सिद्धांत, ज्यांचा आरंभींच्या मुखपृष्ठावरील उत्कृष्ट वचनांत निर्देश केला आहे, ते पूर्णपणें ध्यानांत ठेऊन व आमचे मर्मज्ञ वाचकहि त्याचप्रमाणें आमच्या कर्तबगारीची किंमत करतील अशी पूर्ण खात्री बाळगून, आमचे चरित्रनायक जे विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या चरित्रास आरंभ करितों.

चिपळुणकर हे मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील पावस गांवचे राहणारे. येथून विष्णुशास्त्री यांचा सहावा किंवा सातवा पूर्वज सुमारें सतराव्या

शतकाच्या आरंभींच निघून त्र्यंबकेश्वरीं येऊन राहिला. यानंतर त्र्यंबकेश्वराजवळ श्रीहर्ष म्हणून जो किल्ला आहे तेथील फडणविशी विष्णुशास्त्री यांचे पणजे महादाजीपंत यांनीं पेशवाईत संपादन केली. ती पुढें त्यांचे पुत्र त्र्यंबकपंत व कृष्णाजीपंत यांजकडे चालू राहिली. या वेळीं चिपळुणकर हे त्र्यंबकेश्वरीं नाईक या नांवानें प्रसिद्ध होते. पुढें इ. स. १८०२ या सालीं जेव्हां दक्षिणेंत होळकरी दंगा झाला तेव्हां त्र्यंबकपंत यांचे चिरंजीव हरिपंत यांची फडणविशी वगैरे सर्व जाऊन ते पुण्यास अगदीं निराधार होऊन पळून आले. तेथें ते धाकटे बाजीरावसाहेब पेशवे यांचे बंधु चिमणाजी आप्पा यांच्या पदरीं शागीर्द म्हणून राहिले. यानंतर प्रभु बाजी यांची सन १८१८ या वर्षी पुण्यातील कारकीर्द संपून ते चिमणाजी आप्पासह ब्रह्मवर्तास निघून गेल्यावर हरीपंतांनीं पुण्यांतच राहून व तेथें एक अफूचें लहानसें दुकान घालून त्यावर त्यांनीं पुष्कळ वर्षें गरीबींत काढिलीं. त्यांस १८२४ सालीं पंडितरत्न कृष्णशास्त्री चिपळुणकर हे झाले. कृष्णशास्त्री हे लहानपणापासून फार हुशार व बुद्धिमान् अस असून त्यांनीं कांहीं वेळ प्रथम वेदपठण करून नंतर पुणें पाठशाळेंत प्रसिद्ध विद्वान मोरशास्त्री साठे यांच्या हाताखालीं अनेक शास्त्रांचा अभ्यास केला. या वेळीं कृष्णशास्त्री यांची बरोबरी करणारा पाठशाळेंत दुसरा विद्यार्थी नव्हता. मोरशास्त्री यांनीं एके प्रसंगीं आपल्या शिष्याचें बुद्धिप्रागल्भ्य पाहून त्यास प्रेमानें व निर्मत्सर भावानें **बृहस्पति** असें प्रतिष्ठादायक नांव दिलें. येणेंप्रमाणें वेदांचें व शास्त्रांचें अध्ययन कृष्णशास्त्री यांचें संपूर्ण झालें; परंतु येवढ्यानेंच त्यांचा विद्याभ्यास संपावयाचा नव्हता !

सन १८४८ च्या सुमारास पुणें येथील विश्रामबागेच्या वाड्यांत संस्कृत पाठशाळा चालू असतांच सरकारनें इंग्रजी विद्येचा प्रसार करण्याकरितां एक नवीन इंग्रजी शाळा पुण्यांतच बुधवारच्या वाड्यांत सुरू केली, व तेथें कांहीं विद्यार्थी इंग्रजी शिकूंहि लागले. पुढें लवकरच संस्कृत पाठशाळेंतहि इंग्रजी शिकण्याचा एक वर्ग मेजर क्यांडी यांनीं चालू केला. या वेळीं इंग्रजी शिकण्याबद्दल पुण्यांतील लोकांमध्यें साधारणपणें पुष्कळ वाईट ग्रह होता; तथापि जे चाणक्ष लोक होते त्यांच्या

लवकरच ध्यानांत आलें कीं, दिवसानुदिवस शास्त्राध्ययनाची योग्यता कमी कमी होत जांऊन इंग्रजी विद्येची प्रतिष्ठा अधिकाधिक खचित होणार. अशांपैकीं मोरशास्त्री साठे हे होते. त्यांनीं स्वतः उतारवय झालें असतांहि इंग्रजी विद्येचा अभ्यास सुरू केला, आणि आपले प्रिय शिष्य जे कृष्णशास्त्री यांस सांगितलें कीं, "याउपर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा राहणार नाहीं. तूं शहाणा असलास तर इंग्रजी शीक."

गुरूंनीं याप्रमाणें उपदेश केल्यावरून कृष्णशास्त्री यांनीं कमी कुवत होऊं न देतां इंग्रजी विद्येचा अभ्यास करण्यास आपल्या वयाच्या २५ व्या वर्षीं आरंभ केला. शास्त्रीबुवांची बुद्धि अलौकिक व त्यांचा उद्योगहि तसाच असल्यामुळें त्यांनीं लवकरच इंग्रजी भाषेंतहि चांगली प्रवीणता संपादन केली. यापुढें विश्रामबागेच्या वाड्यांतील संस्कृत पाठशाळा मोडून जाऊन तिच्या जागीं पूना कॉलेज स्थापन झाल्यावर त्यांत एकामागून एक जे प्रोफेसर येत गेले त्यांची व विशेषतः प्रोफेसर ग्रीन साहेबांची मर्जी शास्त्रीबोवांवर चांगली बसली.

ग्रीन साहेब हे इतिहास व अर्थशास्त्र या दोन विषयांत मोठे निष्णात असत. ते इतके जबर वाचणारे असत कीं, विद्यार्थ्यांस ह्यूमच्या इतिहासांतील किंवा मिल्लच्या अर्थशास्त्रांतील दहा पंधरा पानें दररोज वाचून तयार करून आणण्यास सांगणें हें त्यांस अगदीं कांहीं वाटत नसे. त्यांचा नेहमींचा क्रम म्हटला म्हणजे हातांत जितकीं तीस चाळीस पानें एकदम येतील तितकीं दररोज विद्यार्थ्यांस वाचावयास नेमून द्यावयाचीं. या जबर वाचनाला कृष्णशास्त्री यांच्या शिवाय दुसरा कोणी विद्यार्थी टिकला नाहीं असें सांगतात.

येणेंप्रमाणें कृष्णास्त्री यांनीं प्रथम वेदपठण, नंतर शास्त्राध्ययन व शेवटी इंग्रजी विद्येचा अभ्यास हीं केल्यानें त्यांच्या बुद्धीस उत्कृष्ट संस्कार झाले. यामुळें जुन्या पंडितांत व नवीन विद्वानांत अशा दोहों मंडळींत त्यांची मोठी चहा झाली, व ती पुढें आमरणान्त तशीच कायम राहिली. त्यांच्या हातून नुसतें शास्त्राध्ययनच झालें असतें तर अर्थातच जुन्या पंडितांप्रमाणें

नुसत्या विद्वत्तेबद्दलच त्यांची आजन्म ख्याति झाली असती; परंतु तसें झालें असतें तर ग्रंथरचनेच्या द्वारें त्यांच्या हातून यापुढें जी मराठी भाषेची उत्कृष्ट सेवा घडून आली ती होण्याचा संभव मुळींच नव्हता. त्याचप्रमाणें त्यांनीं नुसता इंग्रजी विद्येचाच अभ्यास केला असता तर त्यांस मराठी भाषा शुद्ध, सोपी व प्रौढ अशी लिहिण्याची जशी हातोटी साधली तशी साधली नसती. परंतु शास्त्रीबोवांचा दोन्ही विद्यांशीं उत्तम परिचय झाल्यामुळें त्यांस अर्थात् यापुढें लवकरच मराठी भाषेंत उत्कृष्ट ग्रंथरचना करण्याची चांगली योग्यता आली.

कृष्णशास्त्री यांस ट्रान्सलेटर एक्झिबिशनरची जागा १८५२ सालीं मिळाली; व नंतर लवकरच ते पूना कॉलेजमध्यें मराठीचे असिस्टंट प्रोफेसर झाले. या कामावर शास्त्रीबोवा असतां त्यांची विद्यार्थ्यांमध्यें चांगली चहा असे; परंतु या सुमारास मिशनरी लोकांचें महात्म्य पुण्यामध्यें बरेंच झालें होतें, आणि पुष्कळ तरुण व होतकरू विद्यार्थ्यांवर प्रसिद्ध मिशनरी रेव्हरेंड मरी मिचल यांच्या व्याख्यानाचें वजन पडून त्यांची आपल्या धर्मावरून श्रद्धा बरीच उडून जाऊन ते ख्रिस्ती होण्याचा संभव दिसूं लागला होता. हा अनर्थ टाळण्याकरितां त्या वेळच्या कित्येक नवीन विद्वानांनीं ' विचारलहरी ' नांवाचें पत्र काढून मिशनरी लोकांचे यत्न निष्फळ केले. या मंडळींत कृष्णशास्त्री हे बरेच प्रमुख होते; यामुळें त्यांजवर सरकारी अधिकाऱ्यांची गैरमर्जी झाली. याच सुमारास शास्त्रीबोवांच्या हातून बाहेर चालीची कांहीं आगळीक घडल्याची संधि साधून अधिकाऱ्यांनीं त्यांस कामावरून सस्पेंड केलें, परंतु शास्त्रीबोवांनीं या गोष्टीची फारशी परवा केली नाहीं. त्यांनीं कांहीं ग्रंथ लिहून किंवा वर्तमानपत्र चालवून किंवा एखादी खाजगी इंग्रजी शाळा काढून चरितार्थ चालविण्याचा संकल्प केला; परंतु लवकरच शास्त्रीबुवांचे दुसरे कांहीं पुरस्कर्ते साहेब होते त्यांनीं रदबदली करून त्यांस पुन: कामावर रुजू करविलें. यापुढें १८५९ सालीं कृष्णशास्त्री यांची बदली दक्षिणाप्राइझ कमिटीच्या सेक्रेटरीच्या जागीं झाली. हें काम त्यांनीं सुमारें सहा वर्षें केलें; आणि हें काम करीत असतांनाच शास्त्रीबोवांनीं बऱ्याच संस्कृत

नाटकांचीं मराठी भाषांतरें तपासून शुद्ध केलीं. यानंतर त्यांस १८६५ सालीं पूना ट्रेनिंग कॉलेजची प्रिन्सिपॉलची जागा मिळाली. या कॉलेजांत दादोबाचें व्याकरण शिकवितांना शास्त्रीबोवांस त्या व्याकरणांत ज्या न्यूनता दिसून आल्या त्या दाखवून देण्याकरितां व त्या सुधारण्याकरितां त्यांनीं 'शाळापत्रकांत' मराठी व्याकरणावर 'निबंध' या सदराखालीं २५ निबंध लिहिले. यापुढें १८६८ सालीं शास्त्रीबोवांची बदली 'रिपोर्टर ऑन दि नेटीव्ह प्रेस' या जागेवर झाली; व या कामावर ते पुढें दहा वर्षें राहिले.

वर सांगितलेल्या मराठी व्याकरणावरील निबंधांखेरीज कृष्णशास्त्री यांनीं मराठी भाषेंत दुसरे बरेच ग्रंथ लिहिले आहेत; परंतु ते बहुतेक भाषांतर रूपानेंच आहेत; मूळ ग्रंथ असा एकहि नाहीं. तथापि त्यांची भाषा शुद्ध, सोपी, खुबीदार आणि गोड अशी आहे; ती इतकी कीं, ते ग्रंथ भाषांतरें आहेत हें वाचकांस भासत सुद्धां नाहीं. शास्त्रीबोवांचे मुख्य ग्रंथ म्हटले म्हणजे आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, अनेक विद्यामूलतत्त्व-संग्रह, अर्थशास्त्रपरिभाषा, साक्रेटीस याचें चरित्र, व रासेलस याचें भाषांतर; यांशिवाय त्यांचा एक लहानसा परंतु खुबीदार असा 'पद्य-रत्नावलि' नामक कविताग्रंथ आहे. कृष्णशास्त्री यांनीं आपल्या अलौकिक व मनोरम ग्रंथरचनेनें मराठी भाषेस बरेंच चांगलें रूप आणून ती विष्णुशास्त्री वगैरे पुढील विद्वानांच्या उपयोगाकरितां उत्तम तऱ्हेनें कमावून तयार करून दिली असें म्हणण्यास हरकत नाहीं; व कृष्णशास्त्री यांच्या एकंदर चरित्रावरून त्यांनीं आपले चिरंजीव विष्णुशास्त्री यांनीं पुढें जीं कित्येक उत्तम लौकिक कृत्यें हातीं घेतलीं त्यांची थोडी बहुत सामुग्री आपल्या ग्रंथरचनेनें, विचारांनीं व कृतींनींहि न जाणतांच करून दिली कीं काय असा सहज भास होतो!

आपले चरित्रनायक विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचा जन्म तारीख २० मे १८५० रोजीं पुणें येथें झाला. हें कृष्णशास्त्री यांचे ज्येष्ठ चिरंजीव होत. हे लहानपणीं प्रकृतीनें अशक्त असून या वेळीं त्यांचें स्वरूप मनांत भरण्याजोगें नव्हतें. ते पहिल्यापासून आईबापांच्या अंगावर फारसे नसून

त्यांचें लालनपालन त्यांचा आजा हरीपंतमामा व आजी भागीरथी मामी हींच करीत असत. हें वृद्ध दंपत्य फार सालस, अब्रूदार व धर्मनिष्ठ असें असे. विष्णुशास्त्री यांच्या मनावर धर्म, नीति व आचारविचार यांच्या संबंधानें चांगले संस्कार लागण्यास हींच आजाआजी पुष्कळ अंशीं कारणीभूत झालीं यांत संशय नाहीं. हरीपंतमामा हे पुष्कळ अंशीं फार योग्य गृहस्थ असत. ह्यांचा जन्म चांगल्या संपन्न दशेंत होऊन त्यांस पुढें आपलें बहुतेक आयुष्य गरीबींत काढावें लागलें होते; परंतु त्यांची वागणूक मोठी नेकीची, अब्रूदार व सरळ अशी असे. त्यांच्या वृद्धपणीं कृष्णशास्त्री यांस रोजगार लागून त्यांस पुनः चांगली स्थिति प्राप्त झाल्यावरहि त्यांचें वर्तन कित्ता घेण्यासारखें असें. त्यांची सर्व भक्ति पुत्रावर असून जेणेंकरून कृष्णशास्त्री यांस सुख होईल तें करण्याकडे त्यांचें नेहमीं लक्ष असे. देवपूजा, सप्तशतीचा पाठ, एकादष्णी, पुराणश्रवण वगैरे धर्मकृत्यें आटोपून हरीपंतमामा यांनीं बाजार, हिशेबविशेब वगैरे सर्व लहान मोठीं संसारकृत्यें संभाळावीं. ते स्वभावतः तापट असून त्यांची मुद्रा पूर्ण गंभीर, कदाचित् कांहींशी रागीटहि असे; परंतु पुत्राविषयीं त्यांची इतकी कांहीं चमत्कारिक भक्ति असे कीं, स्वतःला कोणत्याहि तऱ्हेचें व्यसन नसतां चिरंजीवाकरितां विड्याचीं पानें आणून तीं साफ पुसून ठेवणें, आणि त्याच्या धोतरांच्या निऱ्या करून ठेवणें येथपर्यंतहि ह्या पुत्रभक्त म्हाताऱ्याची तयारी असे! आणि इतकेंहि करून ह्या म्हातारेबोवांच्या तोंडांतून कधीं शब्दहि बाहेर पडावयाचा नाहीं. बापलेकांचे कधीं दोन शब्द कोणत्याहि संबंधानें झालेले आमच्या ऐकिवांत नाहींत! येणेंप्रमाणें कृष्णशास्त्री यांस हरीपंतमामांच्या ममतेमुळें संसारांतील फक्त सुखाचाच मात्र लाभ होत असून दुःखाचा किंवा कटकटीचा भाग त्यांच्या वांट्यास कधीं येत नसे. यामुळें या वेळीं कृष्णशास्त्री यांच्यासारखा सुखी मनुष्य आढळणें खरोखरच कठिण होतें! हरीपंतमामांचें हें स्तुत्य वर्तन आपल्यांतील किती वृद्ध मातापितरांनीं घेण्यासारखें आहे!

विष्णुशास्त्री यांची आजी भागीरथी मामी हीहि फार लायक बायको होती; ती हरीपंतमामाप्रमाणें निबोली नसून साधारण बोलकी व हुशार

असे. नवऱ्याप्रमाणें हिचीहि आपल्या पुत्राच्या ठिकाणीं मोठी भक्ति होती; परंतु ती त्यापेक्षां कांहीं अंशीं अधिक धूर्त असे. विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " शास्त्रीबोवांस बाहेरचा नाद फार लागल्यामुळें मामा व माई यांस फार दुःख होई. एकदां बरीच रात्र झाली तरी शास्त्रीबोवा घरीं आले नाहींत हें पाहून मामा मनांत फार तळमळून म्हणाले कीं, ' मी याला (शास्त्रीबोवाला) एकदां बोलूं का ? " परंतु माई ही अधिक शहाणी ! तिनें उत्तर केलें, ' तुम्ही बोलूं नका; बोलण्यानें तो आपला कांहीं नाद सोडणार नाहीं; तुमचा थोडा बहुत जो वचक आहे तो मात्र नाहींसा होईल ! " विष्णुशास्त्री हे वयांत आल्यावर त्यांच्या स्वतःच्या आईबापां-विषयीं त्यांची भक्ति कमी जास्त असे, परंतु या आजाआजीविषयींचा त्यांचा पूज्यभाव शेवटपर्यंत कायमच होता !

विष्णुशास्त्री यांचे आजे व आजी यांविषयीं वर जी हकीगत दिली आहे ती इंग्रजींतील चरित्रकारांच्या प्रघातास अनुसरूनच दिली आहे. चरित्रनायकाच्या आंगच्या गुणावगुणांचा प्रादुर्भाव व विकास होण्यास ज्या कित्येक अनुकूल किंवा प्रतिकूल व्यक्ति व गोष्टी कारणीभूत झाल्या असतील त्यांचें यथास्थित विवेचन करणें हें चरित्रकारास अत्यंत जरूर आहे. कारण ज्याप्रमाणें इतिहासकारास राष्ट्रांचा उत्कर्ष व विनाश ह्यांचेंच फक्त वर्णन करणें पुरेसें नसतें; तर त्यांस वरील स्थित्यंतराची मीमांसाहि केली पाहिजे, त्याचप्रमाणें चरित्रकारास चरित्रनायकाच्या अंगीं अमुक अमुक अलौकिक सद्गुण व दुर्गुण होते येवढेंच सांगून पुरें होणार नाहीं; तर चरित्रपुरुषांच्या ठिकाणीं त्या गुणावगुणांचें अवतरण व नंतर त्यांचा विकास कसकसा होत गेला व तसें होण्यास कोणकोणत्या गोष्टी व व्यक्ति कारणीभूत झाल्या हेंहि सांगणें अगदीं अवश्य आहे; त्यावांचून कोणतेंहि थोर पुरुषाचें चरित्र पूर्ण आहे असें लेखलें जाणार नाहीं. यास्तव ज्या कांहीं गोष्टींच्या व व्यक्तींच्या योगानें विष्णुशास्त्री यांचे गुणावगुण व स्वभाव हीं बनत गेलीं त्यांविषयीं लिहितांना विषयांतर होत नसून, उलटें तसें करणें अगदीं जरूर आहे व ही गोष्ट उत्तम चरित्रकारांचें अनुकरणच आहे, येवढें सांगून विष्णुशास्त्री यांचें चरित्रवृत्त पुढें चालवितों.

विष्णुशास्त्री हे सहा सात वर्षांचे होईपर्यंत ते घरींच शिकत होते. त्यांचा आजा हरीपंतमामा व सदुआण्णा म्हणून कोणी एक घरीं ठेविलेला विद्यार्थी यांजपाशीं ते उजळणी व साधारण लिहिणें वाचणें शिकले. यानंतर ते बुधवारच्या वाड्यांत 'इन्फंट स्कूल' नामक शाळेंत शिकावयास जाऊं लागले. अशा प्रकारच्या शाळा हल्लीं कोठें दिसत नाहींत. साधारण खाऊन पिऊन सुखी अशा गृहस्थांच्या मुलांस, त्यांचा नियमित अभ्यास-क्रम सुरू होण्यापूर्वी, शिकण्याकरितां वरील इन्फंट स्कुल्स् उत्तम सोईची असत. त्यांत अर्धे शिकणें व अर्धे खेळणें हीं दोन्हीं होत असत; आणि विष्णुशास्त्री हे ज्या वेळीं वर लिहिलेल्या शाळेंत होते त्या वेळीं या शाळेंत जे शिक्षक—रावजी साठे —होते ते या दोन्ही कामांला फार योग्य होते असें विष्णुशास्त्री सांगत असत. ही शाळा सोडून विष्णुशास्त्री हे त्या वेळीं सदाशिव पेठेंत नागनाथाच्या वाड्यांत एक इंग्रजी–मराठी शाळा होती तींत शिकावयास गेले. येथें त्यांची मकलाक सीरीजचीं एक दोन बुकें वर्ष सव्वावर्षांत झालीं.

यापुढें सन १८५९ सालीं विष्णुशास्त्री यांचें व्रतबंधन विश्रामबागेच्या वाड्यानजीक कर्व्यांच्या वाड्यांत मोठ्या समारंभानें झालें. त्यानंतर त्यांस नागनाथाच्या वाड्यांतील इंग्रजी–मराठी शाळेंतून काढून त्या वेळच्या एका नामांकित गांवठी शाळेंत घातलें; व घरीं संध्या, पूजा वगैरे ब्रह्मकर्में त्यांस पढविण्यास सुरवात केली. त्या काळीं सरकारी शाळांतून मोडी अक्षर, मोडी वाचन, तोंडचे हिशेब वगैरे विषय गांवठी शाळांतल्याप्रमाणें चांगले शिकविले जात नाहींत असा जुन्या लोकांचा समज असे. त्याच प्रमाणें ब्रह्मकर्मांचे अध्ययनाची हल्लीं ज्याप्रमाणें पुष्कळांस अनावश्यकता वाटते त्याप्रमाणें त्या काळीं वाटत नसे; आणि हरीपंतमामांच्या समजुती अर्थातच वरच्या प्रकारच्या असल्यामुळें विष्णुशास्त्री यांच्या विद्याभ्यासांत वर सांगितल्याप्रमाणें एका तऱ्हेनें पिछेहाट झाली. वर लिहिलेली गांवठी शाळा विश्रामबागेच्या वाड्याच्या शेजारीं आबासाहेब पटवर्धन यांच्या वाड्यासमोर माडीवर असे. येथील गुरु हरिपंत लंगडे ह्यांच्या स्वरूपाचें,

विद्वत्तेचें व एकंदर गुणांचें साम्य ' डेझरटेड व्हिलेज ' मधील गांवठी पंतोजींशीं बहुतेक अंशीं जुळण्यासारखें होतें. *

वरील शाळेंत विष्णुशास्त्री हे सुमारें एक वर्ष होते. यानंतर त्यांस त्यांच्या वडिलांनीं पुन: इंग्रजी शिकण्यास त्या वेळीं शुक्रवार पेठेंत नाना महागांवकर यांची खाजगी इंग्रजी शाळा होती तेथें पाठविलें. नाना हे कृष्णशास्त्री यांच्या शिष्यांपैकीं असून त्या वेळीं ते हुशार इंग्रजी शिक्षकांत मोडले जात असत. या शाळेंतून सन १८६१ सालीं विष्णुशास्त्री हे पूना हायस्कुलांत गेले. तेथें ते प्रथम जुनियर चौथे वर्गांत म्हणजे हल्लींचे इंग्रजी चौथे इयत्तेंत बसले.[1] या वर्गांत असतांना विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " कधीं कधीं मास्तर आम्हांस मराठींत निबंध लिहून आणण्यास सांगत असत. एके प्रसंगीं 'उद्योगा' विषयीं निबंध लिहावयास दिला असतां मी सहाव्या पुस्तकांतून वरील विषयावरील निबंध उतरून नेला. तो वाचून मास्तरांस आश्चर्य वाटून ते म्हणाले, "अरे, तूं हा निबंध शास्त्रीबोवांस विचारून लिहिलास काय?" यावरून त्या वेळच्या शिक्षकांच्या अगाध मराठी वाचनाविषयींची बरीच कल्पना होण्यासारखी आहे !

या वर्गांतून विष्णुशास्त्री हे दरवर्षी दोन दोन वर्ग[2] वर चढत चालले.

---

* Well had the boding tremblers learn' d to trace
The day' s disaster in his morning face;
Full well the busy whisper, circling round,
Convey'd the dismal tidings when he frowned--
The village all declared how much he knew;
'Twas certain he could write and cipher too;
Lands he could measure, terms and tides presage,
And even the story ran that he could gauge."

Goldsmith' s Deserted Village.

१ या वेळीं पूना हायस्कुलांतील वर्गांचे सिनिअर डिव्हिजन व जुनिअर डिव्हिजन असे दोन भाग असत. पहिल्यांत चार व दुसऱ्यांत आठ वर्ग असत. ही व्यवस्था १८६५ च्या अखेरपर्यंत चालली होती.

२ या वेळीं हल्लीं चालू असलेल्या इंग्रजी इयत्ता झाल्या नव्हत्या. दर वर्गांत हल्लींची अर्धी इयत्ता (स्टयांडर्ड) संपे व म्हणून सहा महिन्यांनी वर्गांतून मुलें वर चढविलीं जात.

ते ज्युनिअर दुसऱ्या वर्गांत असतांना त्या वर्गाचे मास्तर रा. चिमणाजी महादेव यांनीं एकदां म्हटलें कीं, " जे विद्यार्थी अमुक दिवशीं ' डेझरटड स्पेलिंग ' सर्व बिनचूक म्हणून दाखवतील त्यांस मी एक एक हातरुमाल बक्षीस देईन. " त्यावरून नियमित दिवशीं परीक्षा होऊन चार विद्यार्थ्यांस बाक्षिसें मिळालीं. यांत विष्णुशास्त्री हे एक होते. हे चिमणाजी महादेव मोठे तरतरीत मास्तर असत, म्हणून विष्णुशास्त्री सांगत असत. यानंतर शास्त्रीबोवा हे रा. नारायण कृष्ण गोखले यांच्या वर्गांत म्हणजे सिनिअर चौथ्या वर्गांत गेले. रा. नारायण कृष्ण हे मोठे मेहनती व चोख शिक्षक आहेत म्हणून त्या वेळीं त्यांची ख्याति असे. यापुढें विष्णुशास्त्री हे क्रमाक्रमानें रा. नाना ठोसर व विनायकराव गोरे यांच्या हाताखालीं गेले. या दोघांहि शिक्षकांविषयीं विष्णुशास्त्री हे, पहिल्यांच्या मार्मिकपणाबद्दल व दुसऱ्यांच्या नियमित व रेखिव शिक्षणपद्धतीबद्दल तारीफ करीत असत. यानंतर सन १८६५ सालीं विष्णुशास्त्री हे मे. करख्यामसाहेब हेडमास्तर व रा. वामन आबाजी मोडक असिस्टंट हेडमास्तर यांच्या शिक्षणाखालीं गेले. साहेबमजकूर हे स्वतः शिकविण्याची मेहनत घेण्यापेक्षां शाळेचें यंत्र सुरळीत चालविण्याच्या कामांत विशेष चतुर असत. या सालीं प्रीलिमिनरी परीक्षा झाली, त्या वेळीं रा. वामनराव मोडक यांनीं जी खुबीदार हिकमत केली तिजबद्दल विष्णुशास्त्री एकदां सांगत होते कीं, " परीक्षेच्या पहिल्या दिवशीं सर्व मुलें कागद, दौती वगैरे सर्व सामान घेऊन तयार होऊन प्रश्नांच्या कागदांची वाट पहात बसले असतां, असिस्टंट हेडमास्तरांची स्वारी अंमळ इकडून तिकडून सावकाश अशी फेरी मारून सर्व यथास्थित आहे असें पाहून मध्येंच कांहीं स्मरण झाल्यासारखें करून अंमळ हिकमतीनें विद्यार्थ्यांस म्हणाली, 'अरे, येथें कोणापाशीं डिक्शनरी आहे काय ? मला एक शब्द पहावयाचा आहे. ' परंतु कोणी अजागळ मुलानें लपवून ठेवलेली पॉकेट–डिक्शनरी गुरूंची येवढी अडचण दूर करण्याकरितां चटकन् पुढें केली नाहीं ! तेव्हां स्वारी अंमळ हंसून प्रश्नांचे कागद वाटूं लागली. "

या वर्षाअखेर विष्णुशास्त्री हे मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत पास झाले. हे

हायस्कुलांत शिकत असतांना यांची वागणूक चांगली नियमित, अभ्यासी, गरीब व निबोली अशी असे. त्यांच्या घरांतील वागणुकीचाहि प्रकार तसाच असे खाण्यापिण्याच्या किंवा पोषाकाच्या किंवा कोणत्याहि प्रकारच्या बाबतींत त्यांची तक्रार म्हणून नसावयाची; यामुळें त्यांस कधीं कधीं त्रासहि सोसावा लागे. ते एकदां सांगत असत कीं, " मी चिमणाजी महादेव यांच्या वर्गांत असतां माझ्या अंगांत एके दिवशीं अंमळ फाटलेला अंगरखा त्यांच्या दृष्टीस पडला. त्यावरून ते अंमळ थट्टा करून इतर मुलां- कडे वळून म्हणाले, ' पहा रे, या विष्णूला धडका अंगरखा कांहीं मिळत नाहीं. याच्या बापाला पैसे मिळत नाहींतसें वाटतें ! "

या वेळीं पूना हायस्कुलांत कृष्णशास्त्री वैजापूरकर म्हणून कोणी शास्त्री असत; ह्याजपाशीं विष्णुशास्त्री यांनीं संस्कृतचा प्रथम अभ्यास केला. शास्त्रीमजकूर ह्यांच्याशीं इतर विद्यार्थ्यांची जशी वागणूक असे तशी विष्णुशास्त्री यांची अर्थातच नव्हती. शास्त्रीबोवांच्या थट्टेंत किंवा कुचेष्टेंत म्हणून ते कधींहि मिसळत नसत. ते जें सांगतील तें विष्णुशास्त्री हे भक्तीनें व नीट लक्ष लावून ऐकत. कधीं कधीं गुरूंच्या घरींहि विष्णु- शास्त्री यांनीं शिकावयास जावें. वैजापुरकर शास्त्री यांचें आणि कृष्णशास्त्री चिपळुणकर यांचें साधारण सूत नसे; तथापि विष्णुशास्त्री यांची शिकण्याची हौस व भक्ति पाहून वैजापुरकर शास्त्री यांनीं गुरुदाक्षिणेची वगैरे अपेक्षा न धरितां शक्त्यनुसार विष्णुशास्त्री यांस शिकवावें. याबद्दल विष्णुशास्त्री हे पुढें मोठे झाल्यावर या गुरूंची आठवण करीत असत व त्यांचा ते बराच बोज ठेवीत !

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचा प्राथमिक व हायस्कुल अभ्यासक्रम संपूर्ण झाला. त्या वेळच्या शिक्षणक्रमांत व हल्लींच्या शिक्षणक्रमांत जें बरेंच अंतर पडलें आहे त्यासंबंधानें येथें दोन शब्द लिहिणें जरूर आहे. विष्णुशास्त्री यांच्या वेळीं म्हणजे सुमारें तीस वर्षांमागें अभ्यासक्रम हल्लींप्रमाणें इयत्तांच्या सांखळींत ओंवला गेला नव्हता. वाचनक्रमिकपुस्तकें हीं नुकतींच रचलीं गेलीं होतीं; परंतु तीं अझून इयत्तारूढ झालीं नव्हतीं. मुलांस साधारण लिहितां वाचतां येऊं लागून त्रैराशिकापर्यंत

त्यांची मजल पोंचली म्हणजे त्यांस हायस्कुलांत इंग्रजी शिकण्यास घालीत असत. भूगोल, इतिहास वगैरे विषयांचें ज्ञान तर राहिलेंच, परंतु व्याकरण, शुद्धलेखन यांचा त्यांस सरासरी गंधहि असे नसे. विष्णुशास्त्री हे इंग्रजी चौथ्या इयत्तेंत येईपर्यंत वरील विषयांचें ज्ञान त्यांस साधारण तऱ्हेचें तरी होतें किंवा नाहीं याचा आम्हास संशयच आहे ! त्यांच्या समकालीन व सहाध्यायी रा० विष्णु मोरेश्वर महाजनी हे एकदां सांगत होते कीं, " शुद्धलेखन हें मी वर्गांत कधीं शिकलों नाहीं; तें मी साधारण पुस्तकें वाचतां वाचतांच शिकलों. " हल्लींच्या शिक्षण-पद्धतीनें विद्यार्थी एकंदरींत खालपासून तों वरपर्यंत पूर्वींपेक्षां अधिक तरबेज होत जातात यांत कांहीं संशय नाहीं; परंतु प्रत्येक इयत्तेंत अभ्यास बराच असल्यानें व कित्येक गौण विषयांचा त्यांत समावेश केल्याकारणानें व त्याचप्रमाणें परीक्षकांचीहि विद्यार्थ्यांच्या प्रवीणतेविषयीं अपेक्षा अधिक असल्याकारणानें सध्यांचा शिक्षणक्रम मुलांच्या शारीरिक व मानसिक शक्तीला बऱ्याच अंशीं अपायकारक होत चालला आहे, अशी पुष्कळांची समजूत आहे.

ज्या मुलांस उच्च प्रतीचें शिक्षण मिळावें अशी त्यांच्या आईबापांची इच्छा आहे व ज्यांस त्या शिक्षणांत हल्लींच्या पद्धतीनें पहिल्या इयत्तेपासून एलूएल्. बी. पर्यंत कमींत कमी अठरा वर्षे घालवावीं लागतात अशा मुलांचा शिक्षणक्रम आणि ज्या मुलांस नुसतें मराठीच शिकावयाचें आहे किंवा मॅट्रिक्युलेशनपर्यंत ज्यांची मजल आहे अशांचा शिक्षणक्रम एकच असावा हें सकृद्दर्शनींच गैर दिसतें. ज्या मुलांस पुढें पुष्कळ मजल मारावयाची आहे त्यांचा शिकण्याचा वेग व त्यांचें अभ्यासाचें ओझें हीं जर इतर मुलांप्रमाणेंच असतील तर ते मजलेस जेमतेम जाऊन पोहोंचत तोंपर्यंत अगदीं थकून भागून जाऊन निःसत्त्व होऊन जातील यांत नवल तें काय ? तेव्हां प्रथम विद्याखात्यानें अशा मुलांकरितां निराळा शिक्षण-क्रम ठरवून देऊन त्यांजकरितां निराळे वर्ग करून त्यांच्या शिक्षणक्रमांतून अडीचकीं, एकोत्रीं वगैरे उजळणी–भूगोल, इतिहास यांतील बारीक सारीक माहिती–त्याचप्रमाणें तोंडचे हिशेब वगैरे अनावश्यक विषय गाळले

असतां त्यांची पुष्कळ मेहनत व वेळ हीं दोन्हीं वांचण्यासारखीं आहेत. याशिवाय परीक्षकांचा मुलें तपासतांना कठिण कठिण उदाहरणें घालण्याकडे व कठिण कठिण शब्दांचे अर्थ विचारण्याकडे जो कल दृष्टीस पडतो त्यावरून आमच्या होतकरू विद्यार्थीप्रजेच्या शिक्षणास खालपासून वरपर्यंत कसें घोकीव तऱ्हेचें वळण लागत चाललें आहे व त्यापासून त्यांचें किती नुकसान होत आहे या गोष्टीचा आमच्या विद्यावृद्धीच्छु मंडळींनीं चांगला विचार करणें जरूर आहे. हल्लीं आपल्या मुलांस जें आद्य शिक्षण मिळतें तें आणि तीस वर्षांपूर्वी जें मिळत असे तें या दोहोंच्या चांगल्या वाईट परिणामांचा विचार केला असतां ज्या मुलांस पुष्कळ वर्षे शिकावयाचें आहे त्यांस विष्णुशास्त्री त्यांच्या वेळीं जें साधारण सळमिसळीचें शिक्षण मिळत असे तें पुष्कळ फायद्याचें होत असे असें आमचें मत आहे. विष्णुशास्त्री मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाले त्या वेळीं त्यांस सोळावें वर्ष संपलें होतें आणि येवढ्या अवकाशांतच त्यांनीं गांवठी शाळेंत एक वर्ष साधारण व्यर्थच घालविलें. या दोन गोष्टींचा विचार केला असतां पूर्वीचा शिक्षणक्रम अंमळ शिथिल असल्यामुळेंच त्यांचें नुकसान झालें नाहीं असें म्हणणें भाग पडेल. हल्लीं सर्व विद्यार्थ्यांस—मग ते अति बुद्धिमान् असोत किंवा मध्यम प्रतीचे असोत—प्रत्येक इयत्तेंत एक एक वर्ष रहावेंच लागतें; व कोणासहि एका वर्षाच्या आंत वरील इयत्तेंत घालूं नये म्हणून विद्याखात्याचा कांहीं अंशीं अधिक सक्तीचा नियम असल्यामुळें विशेष हुषार विद्यार्थ्यांचें पुष्कळ नुकसान होत आहे. हल्लीं कोणी विद्यार्थ्यानें विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणें एक दोन वर्षे गांवठी शाळेंत घातलीं तर त्यास इयत्तांच्या सांखळींतून पार पडून सोळाव्या वर्षी मॅट्रिक्युलेशनचा टप्पा गांठणें हें अशक्यच होणारें आहे. एकंदरींत हल्लींचा क्रम खालच्या स्थितींतील व सामान्य बुद्धीच्या मुलांस बराच फायद्याचा आहे; परंतु जीं मुलें संपन्न स्थितींतील असून शिवाय बुद्धीनेंहि तीव्र आहेत व ज्यांस या देशांतील विद्याक्रम संपवून विलायतेस सिव्हिल सर्व्हिस वगैरे वरच्या प्रतीच्या उद्योगांत पडावयाचें आहे किंवा ज्यांस या देशांतीलच उपलब्ध असा उच्च विद्याक्रम संपवून पुढें अंगांत बरीच तरतरी

राखून स्वतांस, स्वदेशबांधवांस व इतरांस आपल्या विद्येपासून कांहीं उपयोग करून घ्यावा अशी इच्छा आहे, त्यांस हल्लींचा निरनिराळ्या स्थितींतील, निरनिराळ्या बुद्धिमत्तेच्या मुलांस सरसकट एकच ठोकळ असलेला असा शिक्षणक्रम हा पुष्कळ गैरफायद्याचा व कांहीं अंशीं अपायकारकहि आहे असें आमचें मत आहे.

असो. येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांच्या प्राथमिक व हायस्कुल शिक्षणाविषयीं विवेचन झालें. आतां त्यांच्या भोंवतालीं या सुमारास जी बाळगोपाळ मंडळी—कांहीं त्यांचे आप्त व कांहीं सोबती—अशी जमूं लागली होती, त्यांकडे आपण वळूं. या छोटेखानी मंडळीचे त्या वेळचे खेळ, त्यांचीं भांडणें, त्यांचें प्रेम, द्वेष, मत्सर वगैरे निरनिराळ्या मनोवृत्तींचा प्रादुर्भाव, त्यांचा विद्याभ्यास वगैरे गोष्टींचा या स्थानीं निर्देश करणें जरूर आहे. ज्याप्रमाणें फोटोग्राफमध्यें एखाद्या प्रसिद्ध पुरुषाचें एकट्याचेंच चित्र न काढतां त्याच्या भोंवतालील मंडळी—कांहीं त्याच्या अगदीं शेजारीं बसलेली, कांहीं मागें अमळ दूर, व कांहीं त्याहीपेक्षां मागें उभी राहिलेली अशी—दाखविल्यानें मूळ मुख्य पुरुषाचें चित्र अधिक खुलतें, त्याप्रमाणेंच चरित्रनायकाच्या आप्त, स्नेही वगैरे मंडळीच्या थोडेंबहुत वर्णनानें मूळपुरुषाचा स्वभाव, त्याचे गुणावगुण वगैरे गोष्टी अधिक चांगल्या लक्षांत येतात व शिवाय मूळकथेंतहि विशेष वैचित्र्य येऊन ती अधिक मनोरंजक होते. म्हणून या बाबींतहि इंग्रजी चरित्रकारांचें अनुकरण साधेल तर करण्याचा यत्न आम्ही करतों.

आमच्या चरित्रनायकांचा ज्यांच्याशीं विशेष निकट संबंध असून ज्यांच्या योगानें त्यांच्या आयुष्यक्रमावर बराच परिणाम झाला, असे त्यांचे चुलते सीतारामपंत व त्यांचे धाकटे बंधु लक्ष्मणराव हे होत. सीतारामपंत हे हरिपंतमामांचे शेवटले चिरंजीव होत. हे विष्णुशास्त्री यांच्यापेक्षां सुमारें दोन वर्षांनीं लहान होते. त्यांची प्रकृति लहानपणीं फारच अशक्त होती व ते पांच सहा वर्षांचे होईपर्यंत त्यांस चालतां येत नव्हतें म्हणून सांगतात. लक्ष्मणराव हे सीतारामपंताहून नऊ महिन्यांनीं लहान होते, परंतु ते जास्त खुटखुटीत असत. असें सांगतात कीं, सीतारामपंत कोठें

तरी बसलेले असावयाचे, त्यांस लक्ष्मणराव यांनीं हळूच मागून येऊन ढकलून द्यावें आणि आजीस हाका मारून म्हणावें, " माई शिआम प—! " भागिरथीमामींनीं येऊन धाकट्या नातवाची लबाडी पाहून त्यास शिव्या देऊन म्हणावें, " मेल्या, आपणच ढकलून देऊन तो पडला म्हणतोस ! " सितारामपंत व लक्ष्मणराव हे पुढें अंमळ मोठे झाल्यावरहि त्यांच्या नेहमीं मारामाऱ्या व रडारडी होत असत. सीतारामपंत पहिल्यापासून कांहीं अंशीं अशक्त म्हणून व कांहीं अंशीं छांदिष्ट व हट्टी म्हणून भागिरथीमामी व घरांतील इतर माणसें हीं त्यांचीच कड घेऊन लक्ष्मणरावास व इतर मुलांस बोलत असत. ह्या लाडीकपणामुळें म्हणा, किंवा त्यांचा मूळ स्वभाव म्हणा, सीतारामपंतांची प्रकृति दिवसेंदिवस अधिकाधिक त्रासदायक अशी दिसूं लागली. दुसऱ्या मुलांस मारावें, चावावें, दगड घेऊन त्यांच्या मागें लागावें वगैरे वाईट खोडी त्यांस लागत चालल्या. विष्णुशास्त्री यांच्याबरोबर त्यांची मुंज होऊन त्यांजबरोबर ते संध्याहि शिकले; परंतु ती करण्याचें त्यांनीं वर्ष सहा महिन्यांतच सोडून दिलें. हरिपंतमामांची रागीट मुद्रा व त्यांनीं हातांत घेतलेली काठी हीं पाहून इतर मुलें चळचळां कांपत; परंतु चिरंजीवांना त्यांची भीतिच वाटत नसे ! एकदां त्यांनीं संध्या न केल्याबद्दल सीतारामपंतास मारूनहि पाहिलें; परंतु " मी नाहीं करणार जा " म्हणून चिरंजीवांचें निग्रहाचें भाषण ऐकून हरीपंतमामांनीं त्यांचें नांव सोडलें. म्हातारा त्यांजबद्दल मनांतले मनांत जळे मात्र !

सीतारामपंतांच्या ठिकाणीं लहानपणापासूनच रिकाम्या डौलाचीहि हौस दृष्टीस पडूं लागली. लहान सहान पागोटें गळबळीत बांधलेलें असें त्यांस आवडत नसे. एके वेळीं मोठ्या पागोट्यासाठीं स्वारी हट्ट धरून बसलेली पाहून हरिपंतमामा कृष्णशास्त्री यांचे क्लार्क व स्नेही नारायणशास्त्री टोकेकर जवळ बसले होते त्यांजकडे वळून म्हणाले, " थोरल्याला दीडशें हात पागोटें लागतें, तर धाकट्यांना पुढें तीनशें हात लागेल ! "

सीतारामपंताचा दुसरा वाईट गुण म्हटला म्हणजे आपलपोटेपणा. त्यांच्या जवळची कांहीं चीज म्हणून दुसऱ्या मुलांस मिळेल असें अगदीं

व्हावयाचें नाहीं. उलटें त्यांनीं दुसऱ्याची एखादी चांगली वस्तु पाहिली म्हणजे कसें तरी करून ती त्यांनीं हस्तगत करून घ्यावयाची व ती मग चांगल्या स्थितींत त्यांजकडून परत जाणें म्हणजे मुष्कीलच! विष्णुशास्त्री एकदां सांगत असत कीं, " चिमणाजी महादेव मास्तर यांनीं मला जो हातरुमाल बक्षीस दिला होता, तो मीं स्मारक वस्तु म्हणून तीन चार वर्षें पेटींत घालून नीट जपून ठेविला होता; पण तो पुढें केव्हां तरी सीतारामाच्या हातीं लागला. मीं तो त्याजपाशीं मागितला असतां ' मी तो नीट जपून ठेवीन, तो मजजवळ कां असेना? ' असें सीतारामानें म्हटल्यावरून मीं तो रुमाल त्याच्यापाशींच राहूं दिला. पुढें कांहीं दिवसांनीं पाहतों तों कपडे ठेवण्याच्या मोठ्या पेटीच्या आड काडलिव्हर ऑईल पिऊन तोंड पुसून अतिशय मळलेला असा तो मला सांपडला. "

हा वाईट स्वभाव व हे दुर्गुण झांकण्यासारखे सीतारामपंतांच्या आंगचे इतर गुण—विशाल बुद्धि, विलक्षण धिटाई व हुषारी, शिक्षकांवर व इतर मोठ्या माणसांवर—ज्यांचा त्यांच्याशीं फार वेळ संबंध नाहीं अशांवरहि—उत्कृष्ट तऱ्हेची छाप बसविण्याचें सामर्थ्य—याच वेळेस दृष्टीस पडूं लागलें. शाळेंत परीक्षेच्या वेळीं सीतारामपंतांची हुशारी पाहून परीक्षकांनीं हा मुलगा कोणाचा असें विचारलें नाहीं व पुढें कृष्णशास्त्री यांचा भाऊ असें ऐकून त्यांनीं मान डोलविली नाहीं असें बहुधा क्वचितच घडे!

विष्णुशास्त्री यांचे धाकटे बंधु लक्ष्मणराव यांचा या वेळीं कोणताहि गुण किंवा दुर्गुण विशेष दिसण्यासारखा नव्हता. त्यांची प्रकृति तापट, रागीट व भित्री अशी मात्र असे. मराठी शाळेंतून यांची हुशारी कधीं दिसून आली नाहीं. पुढें ते इंग्रजी शिकूं लागल्यावर तिचें साधारण स्वरूप दिसूं लागलें; परंतु तें अर्थांतच विष्णुशास्त्री किंवा सीतारामपंत यांच्याप्रमाणें विशेष लक्षांत येण्याजोगें नव्हतें.

या दोन छोट्या असामींच्या पलीकडे विष्णुशास्त्री यांचे दोन चुलत-चुलत बंधु—विनायकराव व माधवराव—व मातुल काशीनाथपंत जोशी हे होते. या तिघांचीहि वयें सरासरी विष्णुशास्त्री यांच्या वयाइतकींच

होतीं. विनायकराव व माधवराव हे जरी दूर रहात असत तरी जेवणा-खेरीज त्यांचा सर्व वेळ कृष्णशास्त्री यांच्या घरींच जात असे. विनायकराव हे स्वभावानें शांत, गरीब व बुद्धीनेंहि साधारण बरे होते; परंतु त्यांच्या अंगीं एक प्रकारचा आळस असल्यामुळें त्यांच्या हातून विद्याभ्यासाचें काम नेटानें होत नसे. त्यांच्यापेक्षां त्यांचे धाकटे बंधु माधवराव यांच्या अंगीं बुद्धि, तिखटपणा व हिंमत हीं विशेष असल्याकारणानें त्यांचें पाऊल दिवसानुदिवस पुढें पडूं लागलें. विनायकराव व माधवराव यांच्या वयाचें अंतर थोडें असल्यामुळें व माधवराव हे अंमळ फाज़ील असल्यामुळें ते वडील भावाच्या पायरीस पाय लावीत आणि ज्याप्रमाणें सीतारामपंत आणि लक्ष्मणराव यांच्या मारामाऱ्या चालत तशा या भावाभावांच्या होत असत. एके वेळीं या बंधुद्वयाची मारामारी होऊन कुस्ती लागली असतां वाड्याचे मालक जनुमामा, हे अंमळ विनोदी होते, त्यांनीं ती वालीसुग्रीवांची जोडी तशीच्या तशीच अलगत उचलून त्यांचे आजे हरिपंतमामा यांच्या पुढें नेऊन ठेविली !

विनायकराव व माधवराव हे लहानपणापासून मागें सांगितलेल्या हरिपंत लंगडे यांच्या गांवठी शाळेंत बारा तेरा वर्षांचे होईपर्यंत राहिले. शेवटीं आपले चुलतभाऊ व इतर सोबती हे सर्व इंग्रजी शाळेंत जाऊं लागले, तेव्हां त्यांनीं आपल्या बापापाशीं हट्ट धरिला कीं, याउपर आम्हीं गांवठी शाळेंत जाणार नाहीं, आम्हांस इंग्रजी शाळेंत घाला. यावरून त्यांस त्यांच्या बापानें मिशनस्कुलांत घातलें व त्यांचा इंग्रजी अभ्यास सुरू झाला.

विष्णुशास्त्री यांचे मातुल काशीनाथपंत यांस त्यांच्या खेडेगांवीं विद्येची सोय नसल्यामुळें त्यांच्या बहिणीनें आपल्या मुलांबरोबर याचीहि विद्या अनायासें होईल या बुद्धीनें आपल्या घरीं आणून ठेविलें होतें. मामा शरीरप्रकृतीनें सुदृढ असून साधारण दिसण्यांत हुशार दिसत; परंतु त्यांची बुद्धि फारच कमी असून त्यांचें लक्ष अभ्यासाकडे अगदीं नसे. शाळेंत मुलांमध्यें चावटपणा किंवा कुचेष्टा करण्यांत मामांचा नंबर पहिला असावयाचा. वाटेनें जातां येतां कोठें माकडांचा तमाशा किंवा कांहीं

मारामारी चालली असली म्हणजे मामांस घरचें किंवा शाळेचें भान रहात नसे. दिवसेंदिवस अभ्यासाच्या कामांत काशीनाथपंत हे आपल्या धाकट्या भाच्यांच्याहि मागें पडत चालले. यामुळें त्यांची बिचारी बहीण त्यांच्या नांवानें पुष्कळ हाका मारी; परंतु तें सर्व व्यर्थ. याशिवाय काका (सीतारामपंत) आणि मामा यांचे नेहमीं तंटे व मारामाऱ्या ह्या चालावयाच्याच. एके वेळीं काकांनीं मामांस दटावून सांगितलें कीं, ' बघ, पुढें ये; तुझें नाकच कांपतों ! ' यावर मातुलांनीं अंमळ धिटाईनें पुढें होऊन म्हटलें, ' काप, काप, नाक कसें तें पाहूं ! ' परंतु काकासाहेब म्हणजे ब्रह्मदेवासहि भ्यावयाचे नाहींत; त्यांनीं लागलाच मातुलांच्या नासिकेवर खरोखरच चाकू धारेकडून ठेविला; परंतु थोडी दुखापत होऊन रक्ताची रेषा उमटतांच मामांचें धैर्य सुटून त्यांनीं असल्या प्रसंगीं माघार खाल्ली !

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांच्या काकांचें आणि मामांचें कधीं कधीं मोठें भयंकर युद्ध माजे; परंतु एरवीं मामांचे आपल्या धाकट्या भाच्याबरोबर व विनायकराव व माधवराव यांजबरोबरहि पुष्कळदां भांडण-कज्जे होत असत; परंतु विशेष सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, काका मामा, मामा भाचे (धाकटे), चुलत भाऊ चुलत भाऊ, यांचीं सर्वांचीं परस्परांशीं भांडणें चालत; परंतु विष्णुशास्त्री यांची कधीं कोणा एकाशीं सुद्धां हाताहाती किंवा शिवीगाळ झाली आहे असें कधींहि झालें नाहीं. यावरून त्यांच्या गरीब, सुशील, पोक्त व हलकट मंडळीस अमर्यादा करण्यास अशक्य अशा वृत्तीची परीक्षा होते !

या वेळीं कृष्णशास्त्री हे विश्रामबागेजवळ कर्वे यांच्या वाड्यांत रहात असत, म्हणून मागें लिहिलेंच आहे. तेथेंच बचंभटमामा म्हणून एक महा निःस्पृह, खडखडीत व ठाकठिकीचे असे वृद्ध भिक्षुक असत. यांच्याविषयीं असें सांगत असत कीं, यांच्या पूर्व वयांतच यांची बायको वारली. तेव्हां आपणांस दोन पुत्र असून पुनः लग्नाच्या भानगडींत पडूं नये म्हणून यांचा निश्चय झाला असल्यामुळें आपणांस शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं दुसऱ्या लग्नाविषयीं उगीच आग्रह करूं नये म्हणून स्वारींनीं दोन तीन

वेंष दूर गांवीं जाऊन दडी दिली होती! यांची राहणी केवळ मठस्थाप्रमाणें एकीकडे—कोणाच्या आध्यांत ना मध्यांत—अशी असे. हरिपंतमामांनीं आपल्या नातवंडांस वगैरे कांहीं तरी ब्राह्मणकर्म शिकवावीं म्हणून बचंभटमामांस विनंति केल्यावरून विष्णुशास्त्री, सीतारामपंत, लक्ष्मणराव, विनायकराव, माधवराव व काशीनाथपंत हे सर्व त्यांजपाशीं पढावयास जाऊं लागले. वेदाध्ययन म्हणजे लहान मुलांस कंटाळवाणा अभ्यास होय. त्यांतील कांहीं अर्थ समजणें नाहीं; नुसती पोपटपंची. यामुळें मुलांचें लक्ष फारसें पढण्याकडे नसतें; आणि शिवाय वेदऋचांमध्यें मधून मधून अशा कांहीं शब्दपंक्तींच्यापंक्ती असतात कीं, त्यांच्या फक्त उच्चारापासूनच लहान पढणाऱ्या मुलांस अतिशय हसूं येण्यासारखें असतें. बचंभटमामांजवळ वरील बटुमंडळी संथा घेत असतांना त्यांस वरील प्रसंगीं कधीं कधीं हसूं फार येई व तें एकमेकांकडे पाहून तर अधिकच होत असे; परंतु समोर गुरूंची कडक मूर्ति बसलेली पाहून मंडळी कसें तरी हंसू दावी. याप्रमाणें ते वेदाध्ययनाचा मार्ग हंसू दावीत दावीत कसे तरी क्रमीत असतां, शेवटीं स्वाऱ्या जेव्हां—

मसदब्जा गोजा ऋतजा अद्रिजा ऋतं।

या सौरांतील ऋचाभार येऊन थडकल्या तेव्हां एखाद्या मोठ्या तळ्याचा बांध फुटून ज्याप्रमाणें एकदम प्रचंड पाण्याचा लोंढा बाहेर पडतो, त्याप्रमाणें या बटुमंडळीच्या मुखांतून जें हंसें कोसळलें तें त्यांच्यानें कांहीं केल्या आवरवेना! गुरुजींस प्रथम या उकळीचें कारण न समजल्यामुळें त्यांस मोठें आश्चर्य वाटलें; परंतु तें अंमळशानें ध्यानांत आल्यावर ते शिष्यांस दटावून म्हणाले, 'अरे, तुम्ही वेदवाणीस हंसतां? तुम्ही पुन्हां असें कराल, तर मी तुम्हांस संथा देणार नाहीं.' या अशा असमंजस कृत्यांत विष्णुशास्त्री यांचा अगदीं भाग नसे. त्यांच्या हातांत पोथी असून तिजवरून ते इतरांस संथा सांगत असत. शिवाय फावल्या वेळीं कोठें तरी बसून ती ते पाठ करीत. यामुळें वेदाध्ययनांतहि त्याचा या मंडळींत पहिला नंबर असे.

कर्व्यांचा वाडा हा फार मोठा असून त्यांतील पुढील अंगण फार

विस्तीर्ण असे. यामुळें तेथें नाना तऱ्हेचे खेळ खेळण्यास या छोटेखानी मंडळीस चांगली सोय होती. तेथें नेहमीं चेंडुदांडु, खो खो, आट्यापाट्या यांचा सपाटा चाले. शिवाय तेथें झाडेंहि बरींच मोठीं उंच असल्याकारणानें झाडांवर चढण्याचा अभ्यास मंडळीस करितां आला. व्यायामाचीं हीं निरनिराळीं साधनें मंडळींच्या प्रकृति सुदृढ करण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत झालीं यांत संशय नाहीं.

या सुमारास चिपळुणकर मंडळींचा स्नेह दिनकर रामचंद्र नातु म्हणून कोणी मुलगा होता त्याजबरोबर जडला. नातु हे दिसण्यांत भव्य, शरीरानें बळकट, स्वभावानें आनंदी व कांहीं अंशीं भोळे असे असत. सर्व खेळांत वगैरे यांचा पहिला नंबर असावयाचा. यांस तालमीचा कांहीं नाद असे; यामुळें त्यांनीं आपल्या सोबत्यांस तालमींतून वगैरे नेऊन त्यांस व्यायामाची ही नवीन दिशा दाखवून दिली. त्याचप्रमाणें पोहण्याचेंहि शिक्षण मंडळीस दिनकरपंतांपासूनच मिळालें. स्वारी मोठी भक्कम व धीट असल्यामुळें विहीरीच्या कांठावरून आंत उड्या मारणें, त्याचप्रमाणें दोरानें वर चढून येणें इत्यादि कामांत हे मोठे पटाईत असत. याशिवाय माधवराव वगैरे मंडळींनीं त्यांची थट्टा केली असतां ती कांहीं त्यांना समजावयाची नाहीं म्हणून व कांहीं त्यांना सोसे म्हणून जी एका तऱ्हेची गंमत उडे त्यावरून व कधीं कधीं स्वारीनें उलट खाऊन बाकी मंडळीवर जो कांहीं विनोदी थट्टेचा वहार उडवून द्यावा त्यावरून दिनकरपंत आले म्हणजे मंडळीच्या बैठकीस पूर्ण रंग यावयाचा ! चिंचवडास वगैरे बाहेर गांवीं गंमतीची मोहीम मंडळीस करावयाची असली किंवा नुसतें कोठें बागेंत फराळाचें घेऊन चंगळ करावयाची असली म्हणजे त्या वेळीं दिनकरपंत म्हणजे केवळ प्रधानमूर्ति असावयाची. त्यावांचून मंडळी आनंदांत किंवा वहारींत येत नसे. शिवाय दिनकरपंत हे कधीं कधीं स्वचारित्रांतील कांहीं गंमतीच्या अघटित लीलांचें कथन करूं लागले म्हणजे त्यांची बोलण्याची वगैरे हतोटी—तींत कांहीं भोळसरपणा, कांहीं आपल्या समजुतीचा धूर्तपणा, हीं शेलक्या शेलक्या जोरदार शब्दांनीं लपेटलेली असून—इतकी वहारदार असे कीं, विष्णुशास्त्री वगैरे

मंडळीची हंसून हंसून पोटें दुखूं लागत! येणेंप्रमाणें दिनकरपंतास हास्यदेवतां जणूं काय प्रसन्नच असल्यामुळें त्यांच्या समागमांत ज्या कित्येक आनंदाच्या व बहारीच्या संध्याकाळा गेल्या त्यांपेक्षां अधिक सुखाची वेळ मंडळीच्या आयुष्यांत क्वचित्च गेली असेल असा त्यांपैकीं कित्येकांचा अनुभव आहे!

वरील बैठकी संध्याकाळीं कृष्णशास्त्री बाहेर गेले म्हणजे बहुतेक त्यांचेच खोलींत व्हावयाच्या. कधीं कधीं त्या सकाळींहि शास्त्रीबोवा बाहेर गेल्यावर होत; परंतु ते एकाएकीं परत आले म्हणजे हा छोटेखानी दरबार एकदम मोडून बरखास्त होऊन जाऊन मंडळीहि पळून जाण्याची मोठी धांदल उडे. त्यांतून दिनकरपंताची स्वारी फार बारीक असल्यामुळें ती नेहमीं बहुतेक सर्वांच्या मागें रहावयाची! कृष्णशास्त्री यांची या वेळची वृत्ति मोठी आनंदी व चैनी अशी असे. संसारांतील हरएक प्रकारचीं सुखें- उत्तम सुदृढ शरीरप्रकृति, मोठा व सुखाचा रोजगार, चोहोंकडे विद्वत्तेबद्दल नांवलौकिक, स्वसुखाविषयीं मामा-पितर नेहमीं दक्ष, व होतकरू मुलें--हीं त्यांस सुदैवानें अनुकूल असल्यामुळें कृष्णशास्त्री यांचे दिवस मोठे सुखांत व चैनींत चालले होते. मुलें त्यांच्या खोलींत बसलीं म्हणजे हें टेबल उघड, तें कपाट धुंडाळ असें करून त्यांनीं तेथें बरीच अव्यवस्था करून ठेवावी; परंतु कृष्णशास्त्री हे कधीं त्याबद्दल त्यांस बोलत नसत. विष्णुशास्त्री सांगत असत कीं, ‘ एकदां शास्त्रीबोवा रात्रीं जेवावयास खालीं गेले असतां मी व काशीनाथ असे दोघेजण वर त्यांच्या माडींत गेलों. तेथें त्यांचें पडलेलें घड्याळ पाहून आम्ही तें उघडून पाहूं लागलों; परंतु उघडतांना त्याची कांच निघाली. ती बसविण्यास आम्ही खटपट करूं लागलों असतां ती एकाएकीं फुटली. मग आम्ही तें घड्याळ तसेंच्या तसेंच बंद करून खालीं पळून गेलों. पुढें दोन तीन दिवसांनीं अशाच वेळीं वर येऊन पहातों तों घड्याळाला दुसरीच कांच बसविलेली आहे असें आढळलें. परंतु पहिली कांच फुटली ती कशानें व कोणीं फोडली याबद्दल कांहीं चवकशीसुद्धां झाली नाहीं!’

आतां शेवटीं या मंडळीच्या विद्याभ्यासाविषयीं लिहून हा भाग संपवितों. विष्णुशास्त्री यांचा विद्याभ्यास चांगला होत चालला व ते क्रमाक्रमानें एकामागून एक वरच्या वर्गांत चढत चालले हें पाहून बाकीच्या मंडळीसहि आपण तसेंच करावें अशी ईर्षा अर्थात्च उत्पन्न झाली. कृष्णशास्त्री हे विष्णुशास्त्री यांस मधून मधून शिकवीत असत; त्यांची शिकविण्याची रीत म्हटली म्हणजे धड्यांतील अर्थ वगैरे सांगून शिवाय जेणेंकरून शिकणारास स्वतः विचार करण्याची शक्ति येईल असे प्रश्न विचारायाचे व त्यांतील कांहीं न सांगतां आलें म्हणजे मग आपण स्वतः त्याचें स्पष्टीकरण करावयाचें अशी असे. शिकण्याच्या योग्यते-संबंधानें बाकीच्या मुलांपेक्षां विष्णुशास्त्री यांच्या विषयीं कृष्णशास्त्री यांची अधिक खात्री असे. त्यांस ठाऊक होतें कीं, विष्णुशास्त्री यांच्या सारख्या मोहरप्याकडे लक्ष दिलें म्हणजे बाकीचा कळप त्यांच्या मागोमाग सहजच येईल. विष्णुशास्त्री यांजकडे सीतारामपंतास व सीतारामपंताकडे लक्ष्मणरावास वर्गांतील धड्यांचे अर्थ सांगण्याचें काम असे; परंतु सीतारामपंत म्हणजे महा तक्रारी असल्यामुळें लक्ष्मणरावासंबंधाचीहि मेहनत बहुतेक बिचारे विष्णुशास्त्री यांजवरच पडे. या दोन चुलते-पुतण्यांशिवाय चुलतबंधु, मातुल व नातू यांसारखे एकदोन स्नेहि यांसहि मधून मधून मदत विष्णुशास्त्री यांचीच असे. ते आपले स्वतःचे धडे करून इतक्या मंडळीस थोडी बहुत मदत करीत याबद्दल व त्यांच्या सुस्वभावावरून या सर्व छोटे मंडळीची त्यांच्या ठिकाणीं चांगली भक्ति व प्रेम हीं असत. विष्णुशास्त्री हे सर्वतोपरी त्यांचे मोहोरपे असत व त्यांजवर कृष्णशास्त्री यांचें साधारणे लक्ष नसतां त्यांचा जो बराच विद्याभ्यास झाला त्यास पुष्कळ अंशीं विष्णुशास्त्री हे कारणीभूत होत यांत संशय नाहीं.

या सालच्या सप्टेंबर महिन्याच्या दहाव्या तारखेस विष्णुशास्त्री यांचे आजे—हरिपंतमामा—हे वारले. या वेळीं त्यांचें वय पाऊणशें वर्षांचें होतें. त्यांची मोठी इच्छा होती कीं, आपल्या नातवाचा विवाह आपल्या दृष्टीस पडावा; परंतु हा योग थोडक्यानें चुकला. ते वारल्यावर तीन

महिन्यांनीं म्हणजे डिसेंबर महिन्यांत विष्णुशास्त्री यांचें लग्न मोठ्या थाटानें नारायण भिकाजी गोगटे म्हणून कोणी ओव्हरसिअर होते त्यांची कन्या व रावबहादूर विष्णु मोरेश्वर भिडे यांची भाची काशीबाई हिजबरोबर झालें. ही मुलगी चांगल्या संभावित घराण्यांतील असून ती रूपानें व स्वभावानें विष्णुशास्त्री यांस सर्व प्रकारें शोभण्यासारखी होती.

भाग २ रा.

डेक्कन कॉलेजांतील विद्याभ्यास.

Ye distant spires, ye antique towers
That crown the watery glade,
Where grateful science still adores
Her Henry's holy shade ;
And ye, that from the statcly brow
Of Windsor's heights the expanse below
Of grove, of lawn, of mead survey
Whose turf, whose shade, whose flowers among
Wanders the houry Thames along
His silver winding way.

ODE ON A DISTANT PROSPECT OF ETON COLLEGE.

GRAY.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें विष्णुशास्त्री हे मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होऊन ते १८६६ सालच्या आरंभीं पूना कॉलेजमध्यें पुढील अभ्यास करण्यास जाऊं लागले. या वेळीं या कॉलेजाची स्थिति कशी होती. म्हणजे त्या वेळीं तेथें प्रोफेसर व इतर शिक्षक कोण कोण होते, त्यांच्या शिक्षणाची पद्धत वगैरे कशी होती, कॉलेजाची इमारत कोठें व कशी होती, तेथील जेवणाचे क्लब कशाप्रकारचे होते, त्या वेळीं ठळक ठळक विद्यार्थी कोण कोण होते, त्यांचे निरनिराळे स्वभाव, त्यांच्या निरनिराळ्या वागण्याच्या व अभ्यासाच्या तऱ्हा कॉलेजामधील लायब्ररी व रीडिंगरूम, त्याचप्रमाणें त्या वेळचे विद्यार्थ्यांचे खेळ, नाटकप्रयोग वगैरे गंमती, त्या वेळची कॉलेजांतील शिस्त व व्यवस्था वगैरे गोष्टींचें वर्णन

करून विष्णुशास्त्री यांच्या विद्याभ्यासावर, त्यांच्या स्वभावावर, त्यांच्या वागणुकीवर व शरीरप्रकृतीवर वरील गोष्टींचे काय काय परिणाम झाले याचें निरूपण करण्याचें या भागांत योजिलें आहे.

विष्णुशास्त्री हे पूना कॉलेजांत शिकावयास जाऊं लागले त्या वेळीं तें कॉलेज विश्रामबागेच्या वाड्यांतून नुकतेंच निघून डेक्कन कॉलेजच्या हल्लींच्या प्रचंड इमारतीचें काम संपेपर्यंत वानवडीस एका बंगल्यांत गेलें होतें. या वेळीं कॉलेजांतील प्रिन्सिपॉलच्या जागीं प्रसिद्ध विद्वान मि० वर्डस्वर्थ साहेब असून मि० आक्सेनह्याम, डॉ० कीलहार्न, कै० केरोपंत नाना छत्रे हे प्रोफेसर होते. शिवाय रा. शंकर पांडुरंग पंडित व आबाजी विष्णु काथवटे हे फेलो असून अनंतशास्त्री पेंढारकर म्हणून कॉलेजचे शास्त्री होते.

प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थ* हे इंग्लंडांतील प्रसिद्ध कवि वर्डस्वर्थ यांचे नातू होत. हेहि मोठे विद्वान असून मनानें फार थोर असत. यांचीं धर्मासंबंधीं, विद्यापद्धतिसंबंधीं व राज्यव्यवस्थेसंबंधीं मतें अगदीं स्वतंत्र असत; यामुळें यांच्या कित्येक जुन्या व कोत्या समजुतीच्या साहेब लोकांशीं जुळत नसे. तथापि त्यांच्या विद्वत्तेवरून व त्यांच्या सरळ वर्तनावरून त्यांचा त्यांच्या लोकांत एकंदरींत मोठा मान असे. यांचा स्वभाव कांहींसा एकलकोंड्या असल्यामुळें ते युरोपियन लोकांच्या शर्यती, बाल वगैरे उलाढालींत फारसे पडत नसत. हे नेटिव लोकांचे मोठे पुरस्कर्ते असून, त्यांजवर म्याकलीन वगैरे नेटिव द्वेष्ट्यांनीं कधीं शिस्त धरली म्हणजे वर्डस्वर्थ साहेबांची लेखणी नेटिव लोकांच्या तर्फेनें हटकून चालावयाची ! येणेंप्रमाणें हे महा थोर व विद्वान साहेब डेक्कन कॉलेजाच्या मोठ्या नशिबानें त्याच्या वांट्यास बरेच दिवस आले होते.

प्रोफेसर वर्डस्वर्थ हे मूळचे विद्वान घराण्यांतील असून त्यांनीं आपल्या व्यासंगानें मोठी विद्वत्ता संपादन केली असल्यामुळें ते हिंदुस्थानांतीलच

---

* फोटोग्राफमधील वरून तिसऱ्या रांगेंतील डावेकडून उजवीकडे पांच नंबरचे साहेब.

काय, परंतु इंग्लंडांतील कोणत्याहि युनिव्हर्सिटींत प्रोफेसर होण्यालायक होते यांत कांहीं संशय नाहीं. यांची शिकविण्याची पद्धत इतर प्रोफेसरांपेक्षां वेगळी असे. परीक्षेस नेमलेलीं पुस्तकें समजून सांगितलीं म्हणजे बस झालें असें ते समजत नसत. विद्यार्थ्यांस अवांतर विषयांचेंहि ज्ञान व्हावें असा त्यांचा हेतु असे. विद्यार्थ्यांनीं ठरीव पुस्तकांखेरीज दुसरीं पुष्कळ पुस्तकें वाचावीं म्हणून ते त्यांस निरनिराळ्या ग्रंथांविषयीं माहिती सांगून ते त्यांस वाचण्यास सांगत असत; व तसें अवांतर ज्ञान विद्यार्थ्यांस असावें याबद्दल साहेबांची अपेक्षाहि फार अधिक असे; परंतु त्यांचा स्वभाव बराच तापट व संतापी असल्यामुळें आपल्या प्रश्नांचीं उत्तरें विद्यार्थ्यांकडून मिळेनाशीं झालीं म्हणजे पुष्कळ वेळां काय चमत्कार होत असे तो त्यांच्या विद्यार्थ्यांस आठवत असेलच ! ज्या बिचाऱ्या विद्यार्थ्यावरून साहेब संतापायचे त्यावर प्रथम " goose, stupid, blockhead, a mass of flesh without intellect " इत्यादि कठोर शब्दांचा भडिमार झाल्यावर साहेबांचा संताप अनिवार होऊन " Who passed you at the Matriculation? " " It is certainly better to teach grammar schools in England than to teach Colleges here. " वगैरे आपणाशींच पुटपुटत, डोक्यांतील व दाढींतील केसांची विसकळाविस्कळ करून सर्व चेहरा लाल झालेली अशी स्वारी शेवटीं कधीं कधीं विद्यार्थ्यांकडे पाठहि फिरवून बसे !

प्रो. वर्डस्वर्थ हे फार विद्वान व विद्यार्थ्यांस पुष्कळ ज्ञान प्राप्त व्हावें अशी अतोनात इच्छा बाळगणारे, शिवाय एतद्देशीय लोकांचे पूर्ण हितचिंतक वगैरे कित्येक अलौकिक गुण त्यांमध्यें असत; परंतु त्यांचा तापट स्वभाव जो शिक्षकाच्या अंगीं असणें म्हणजे मोठा दुर्गुणच होय, तो असल्यामुळें विद्यार्थ्यांस कांहीं शंका विचारणें झाल्यास त्यांस बराच विचार पडे. अगोदरच युरोपियन म्हणून एतद्देशीय विद्यार्थ्यांची अर्धी छाती दडपायची, त्यांतून साहेबांच्या विद्वत्तेबद्दल फार लौकिक, त्यामुळें आपण एखादा प्रश्न विचारला असतां साहेबांस तो वेडगळ म्हणून वाटण्याची भीति, आणि

याहीपेक्षां साहेबांचा तापट स्वभाव, मग काय विचारतां ! आमच्या आठवणींत जितके उत्कृष्ट व हुशार विद्यार्थी वर्डस्वर्थ साहेब डेक्कन कॉलेजवर असतां होऊन गेले त्यांपैकीं एकहि त्यांच्या मर्जीस उतरला किंवा त्यांस हव्या तशा शंका विचारण्याचें त्यास धैर्य झालें असें आमच्या ऐकिवांत नाहीं. ज्यांचा कॉलेजांत नुकताच प्रवेश झाला आहे असे पहिल्या वर्षाचे विद्यार्थी आणि ज्यांनीं तीन तीन वर्षे कॉलेजांत काढून जे बी. ए. च्या परीक्षेस जावयाचे आहेत असेहि विद्यार्थी वर्डस्वर्थ साहेबांच्या खोलींत लेक्चर ऐकावयास जावयाचे म्हणजे वाघाच्या जाळींत मेंढ्या घालावयाच्या ! स्वतः होऊन प्रश्न विचारणें तर एकीकडेच, परंतु साहेबांनीं विचारिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें नीटपणें देऊन शिष्यवर्ग शिव्या न खातां माघारा निभावून आला म्हणजे मोठी मिळविली असें बहुतेकांस वाटत असे !

विष्णुशास्त्री एकदां सांगत होते कीं " रा. दामोदर भिकाजी जठार व अच्युत नारायण अजगांवकर हे बी. ए. पास होऊन त्यांस फेलो नेमल्यांवर त्यांस वाटलें कीं, आपण बी. ए. च्या वर्गांत आणखी कांहीं दिवस प्रो. वर्डस्वर्थ यांच्या लेक्चरांस बसल्यानें आपणांस पुष्कळ फायदा होईल. म्हणून वरील दोन्ही गृहस्थांनीं साहेबांची परवानगी घेऊन ते इतर विद्यार्थ्यांबरोबर त्यांचें लेक्चर ऐकावयास येऊं लागले. पुढें एके दिवशीं अशी गंमत झाली कीं, इतर विद्यार्थ्यांसारखी मि. अच्युत यांजवरहि साहेबांच्या प्रश्नांची धाड येऊन त्यांजकडून बरोबर उत्तर न मिळतांच वरील गृहस्थ हे फेलो असून त्यांनीं नुसत्या हौसेखातरच आपलें छात्रत्व पुढें चालविलें आहे याबद्दल त्यांची कांहींएक उपेक्षा न करतां इतर विद्यार्थ्यांप्रमाणेंच साहेबांनीं त्यांजवर शिव्यांची जी गर्दी करून दिली त्यासरसें बिचाऱ्या अच्युत यांनीं व ' पुढल्यास ठेंच तर मागला शहाणा ' या म्हणीप्रमाणें मि. जठार यांनीं दुसऱ्या दिवसांपासून साहेबांच्या लेक्चरांस जाणें टाकून दिलें ! "

प्रो. वर्डस्वर्थ यांची या प्रकारची तापट प्रकृति असतांहि ज्याप्रमाणें दशरथ राजास अग्निनारायणाच्या प्रज्वलित मुखांतूनच पुत्रप्राप्ति झाली तशी

विष्णुशास्त्री यांस व दुसऱ्या पुष्कळ विद्यार्थ्यांस प्रो. वर्डस्वर्थ यांच्या व्याख्यानापासून ज्ञानप्राप्ति झाली. विष्णुशास्त्री यांचा स्वभाव अगोदरच संकोचित, त्यांतून प्रिन्सिपॉल साहेबांच्या प्रखर तेजानें तो अधिकच संकोचित झाला असेल यांत संशय नाहीं; यामुळें इतर विद्यार्थ्यांपेक्षां विष्णुशास्त्री यांच्या अंगीं जे गुण विशेष होते ते वर्डस्वर्थ साहेबांस कळून येण्याचा योग आला नाहीं; मात्र विष्णुशास्त्री यांनीं साहेबांच्या ज्ञान-भांडारांतून कांहीं अंश आपल्या ठिकाणीं मुकाट्यानें उतरून घेतला.

प्रो. वर्डस्वर्थ साहेबांविषयीं विष्णुशास्त्री यांचें असें मत असे कीं, साहेबमजकुरांची विद्वत्ता अलौकिक, परंतु त्यांचा स्वभाव संतापी असल्यामुळें कॉलेजांतील त्यांच्या व्याख्यानांपासून अपक्व विद्यार्थ्यांस व्हावा तितका लाभ होत नसे. यापेक्षां सरकारानीं साहेबमजकुरांची बी. ए. पास झालेल्या होतकरू विद्वान मंडळीस मुंबई, पुणें, नागपूर वगैरे मोठमोठ्या शहरांतून आठवड्यांतून दोन तीन वेळ व्याख्यानें देण्याकरितां जर योजना केली असती. तर त्यांस पुष्कळ फायदा झाला असता. ज्यांच्या ठिकाणीं ज्ञानदीप एकदां पेटविला म्हणजे तो तसाच जळत राहील अशी मंडळी आमच्यांत फारच थोडी; डिप्लोमा हातीं पडतांच पुस्तकांवर अक्षता टाकणारी भाडोत्री मंडळीच फार! तेव्हां वर्डस्वर्थ साहेबासारख्यांचा सहवास मधून मधून झाला असता आमच्या ग्रॅज्युएट मंडळींमध्यें वाचनाची गोडी तशीच कायम राहून आपलें ज्ञान दिवसानुदिवस अधिकाधिक वाढविण्याची इच्छा त्यांमध्यें कांहीं तरी जागृत होत जाईल यांत संशय नाहीं. ज्याप्रमाणें ऑडिसन किंवा जॉन्सन यांच्या सहवासानें राहणाऱ्या मंडळीस त्यांच्या विद्वत्तेपासून व सद्वर्तनापासून पुष्कळ फायदा झाला, तसाच प्रो. वर्डस्वर्थ साहेबांच्या व्याख्यानांपासून व सहवासापासून आमच्या तरूण विद्वानांस पुष्कळ फायदा होण्यासारखा होता हें कोणीहि कबूल करील.

प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थ यांच्या खालच्या योग्यतेचे साहेब डॉक्तर कीलहार्न*

---

* फोटोग्राफमधील वरून तिसऱ्या ओळींतील डावीकडून उजवीकडे सात नंबरचे साहेब.

हे होत. हे १८६६ सालीं बऱ्याच अल्प वयांत संस्कृत भाषेचे प्रोफेसर होऊन डेक्कन कॉलेजमध्यें आले. यांची संस्कृत भाषेंत इकडील एतद्देशीय पंडितांप्रमाणें मोठी प्रवीणता होती असें नाहीं; परंतु परदेशस्थांस वरील भाषेंत जितकी प्रवीणता मिळवितां येण्याचा संभव आहे. त्या मानानें डॉ० कलिहार्न साहेबांची योग्यता बरीच होती यांत संशय नाहीं. हे साहेब चांगले अभ्यासी व ठाकठिकीचे शिक्षक असत. त्यांची अभ्यास करण्याची, शिकविण्याची वागण्याची व राहण्याची रीत अगदीं जर्मन तऱ्हेची असे. त्यांचा नित्यक्रम असा असे कीं, मोठ्या पहाटेस उठून दोन मैलांची चक्कर मारून येऊन थोडा अल्प आहार झाल्यानंतर त्या दिवशीं विद्यार्थ्यांस जें शिकवायाचें असेल त्याच्या तयारीस लागावयाचें. ते बहुतेक अभ्यास उभ्यानेंच करीत असत म्हणून सांगतात. घरीं नीट तयारी करून शिवाय टीका व भाषांतरें यांची सामुग्री बरोबर आणल्याखेरीज साहेब कधीं वेळ मारून नेण्याचें धाडस करीत नसत. विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " एकदां शाकुंतल नाटक वर्गांत चाललें असतां मॉनियर वुइलियमकृत सदरहु नाटकाची प्रत साहेब घरून आणण्यास विसरले; आणि वर्गांत बसल्यावर पेटींत पहातात तों तें पुस्तक नाहीं. तेव्हां विद्यार्थ्यांपैकींच एकाद्याचें बिन टीकेचें पुस्तक घेऊन वर्ग चालू न करतां घरीं शिपायी पाठवून आपली प्रत आणीपर्यंत ते तसेच मुकाट्यानें बसले; आणि प्रत आल्यावर मग वर्ग चालू झाला ! "

डॉ. कीलहार्न साहेबांची संस्कृत भाषेंतील प्रवीणता अर्थातच साधारण असे; परंतु ती भाषा तरुण विद्यार्थ्यांस कशा रीतीनें शिकविली असतां त्यापासून त्यांस फायदा होईल ह्या गोष्टीचें ज्ञान साहेबमजकुरांस चांगलें होतें. त्यांच्या हाताखालीं अनंतशास्त्री पेंडारकर म्हणून एक पंडितरत्न होतें. हे शास्त्री अनेक शास्त्रांत मोठे निष्णात असत. त्यांच्या सहायानें कलिहार्न साहेबांनीं हल्लीं शाळाखात्यांत चालू असलेलें संस्कृत व्याकरण रचिलें. कित्येक अप्रबुद्ध लोकांचें म्हणणें आहे कीं, पेंढारकर शास्त्रीबुवांपासून कौमुदींतील एकंदर सूत्रें समजावून घेऊन कीलहार्न साहेबांनीं हें व्याकरण केलें, यांत साहेबांची हुशारी ती कोणती ? यावर आमचें

उत्तर हेंच आहे कीं, व्हिक्टोरिया टरमिनसच्या अवाढव्य व अत्यंत सुशोभित अशा स्टेशनाचें बांधण्याचें श्रेय ज्याप्रमाणें अत्यंत कुशल सुतारास किंवा लोहारास देतां येणार नाहीं, तर तें सर्व एंजिनियरसाहेबांचेंच, त्याचप्रमाणें वरील संस्कृत व्याकरणाची गोष्ट आहे.

डॉ. कीलहार्न यांच्या शिकविण्यांत गळबळीत म्हणून अगदीं कांहीं मिळावयाचें नाहीं. सर्व कांहीं चोख तयार केलेलें असें विद्यार्थ्यांस मिळावयाचें. वर्डस्वर्थ साहेबांच्या व्याख्यानाप्रमाणें यांचें व्याख्यान अन्य विषयाकडे बहुधा वळणारें नसे. तथापि परीक्षेंत उतरण्यास तें विद्यार्थ्यांस अत्यंत उपयोगी असे. त्यांच्या वर्गांत फक्त हजर असून त्यांनीं सांगितल्या प्रमाणें तयारी केली असतां कोणी विद्यार्थी परीक्षेमध्यें संस्कृतांत घसरला असें बहुधा होत नसे. तथापि या साहेबांमध्यें एक मोठा दुर्गुण असे. ते फार खुनशी व चुरसखोर असे असत. वर्गांत साहेबमजकूर अर्थ सांगतांना गोंधळले असतां कोणी विद्यार्थी हंसला किंवा त्यांची परीक्षा पाहण्याकरितां त्यांस त्यानें कांहीं अडचणीचा प्रश्न विचारला म्हणजे त्यावर साहेबांचा मोठा दंश राही. मग त्या बिचाऱ्या विद्यार्थ्यानें साहेबांची सुप्रसन्नता मिळविण्याकरितां आपल्याकडून कितीहि खटपट केली तरी ती सर्व व्यर्थ होत असे. ह्या खुनशी स्वभावाचें उदाहरण म्हणून विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " मि. काथवटे हे बी. ए. पास झाल्यावर त्यांस डॉकीलहार्न साहेबांनीं ' तुम्ही या सालीं भगवानदास पुरुषोत्तमदासच्या स्कॉलरशिपला बसा ' म्हणून सांगितलें; परंतु मि. काथवटे यांनीं कांहीं खोडसळपणानें कीलहार्न साहेबांस चिडविण्यासच जणूं काय त्या वेळीं नाहीं म्हणून म्हटलें. साहेबमजकुरांची तेवढ्यावरून मर्जी खप्पा होऊन त्यांनीं तेव्हांपासून मि. काथवटे यांचें नांव टाकलें. पुढें एक दोन महिन्यांनीं सदर परीक्षा होऊन तीस मि. काथवटे हेहि बसले. यानंतर परीक्षेचा निकाल करून कीलहार्न साहेब मुंबईहून कॉलेजांत आले असतां मि. काथवटे यांचे कोणी स्नेहि, तेथील फेलो, ' स्कॉलरशिप अखेर कोणास मिळाली ' म्हणून साहेबांस विचारायास गेले असतां पुढील चमत्कारिक बिननांवी संवाद झाला:—

Fellow--Doctor, which of us, after all, has got the Scholarship ? Is it Mr.--who gets it ?

Dr. K.--No.

Fellow—Then is it Mr—?

Dr. K.—No. Not he neither; but it is the *other* man who got it.

परीक्षेस तीनच उमेदवार होते हें सांगण्यास नकोच; परंतु नावडते शिष्य जे मि. काथवटे त्यांचा नुसता नामोच्चारहि करण्यास डॉ. कोलहार्न यांस संकोच वाटला ! ''

या वेळचे तिसरे प्रोफेसर ज्यांच्या मोठ्या विद्वत्तेवरून व साध्या व आनंदी स्वभावावरून त्यांच्या शिष्यवर्गाच्या ठायीं त्यांच्या विषयीं पूज्यभाव व प्रीति हीं दोन्हीं उत्पन्न होत असत असे प्रसिद्ध गणिताचे गुरु कै. केरोपंतनाना छत्रे* हे होत. आपल्या महाराष्ट्रांत जीं विद्वद्रत्नें होऊन गेलीं त्यांतील केरोपंतनाना हें खरोखरच फार मोठें रत्न होय. यांची डेक्कन कॉलेजांत गणिताच्या प्रोफेसरच्या जागीं नेमणूक १८६५सालीं झाली. यापूर्वी ते दोन तीन लहानसान हुद्यांवर होते; परंतु या मोठ्या जागीं ते आल्यावर त्यांच्या अंगच्या गुणांचें चांगलें चीज झालें. नेटीव लोकांस मोठ्या जागा कशा करतां येतील हें केरोपंतनानांनीं प्रथम स्वतःच्या उदाहरणावरून दाखवून दिलें. त्यांचे विद्यार्थी व विद्याधिकारी साहेब लोक या दोहोंच्या ठायीं यांजविषयीं चांगला आदर असे. ह्यांची गणित विषय समजावून देण्याची पद्धत फार सोपी व खुबीदार अशी असे. गणिताशिवाय इतर शास्त्रीय विषयांचेंहि थोडें बहुत ज्ञान विद्यार्थ्यांस असावें अशाविषयीं नानांचा नेहमीं यत्न असे. यासंबंधानें यांचें आणि प्रो. वर्डस्वर्थ साहेबांचें साम्य असे. परंतु विद्यार्थ्यांशीं नानांची वागणूक वरील साहेबांपेक्षां अगदीं निराळी; कदाचित् उलटीहि म्हटल्यास चालेल, अशी असे. नानांविषयीं सर्व विद्यार्थ्यांस आदर तर अर्थातच असे; परंतु प्रो०

* फोटोग्राफमधील वरून तिसऱ्या ओळींतील डावीकडून उजवीकडे चार नंबरचे गृहस्थ.

वर्डस्वर्थ यांप्रमाणें त्यांजविषयीं त्यांस भीति मुळींच वाटत नसे. विद्यार्थ्यानें कितीहि वेडगळ प्रश्न केला तरी नाना त्याच्या अंगावर ओरडतील किंवा त्याचें मन खट्टू होईल अशा तऱ्हेनें त्याची फजिती करतील असा कोणासहि धाक वाटत नसे. साधारणपणें त्याच्या मनास आनंदच वाटेल अशा तऱ्हेनें हंसत हंसत त्याची चूक त्यास दाखवून ते त्याची समजूत पाडीत.

केरोपंतनानांचा दुसरा विशेष गुण म्हटला म्हणजे वृथाभिमानाचा पूर्ण अभाव. एकदां कोणी विद्यार्थ्यानें कांहीं बिकट शंका काढली असतां त्यावर उत्तर देतांना नाना म्हणाले कीं, " अरे तुझ्या या शंकेचें तूर्त जरी समाधान झालें नाहीं, तरी तुला ही शंका उत्पन्न झाली हीच मोठी गोष्ट; तिचें समाधान पुढें केव्हां तरी होईल. अशी गोष्ट सांगतात कीं, एका कावळीस दोन पोरें होतीं. त्यांस ती म्हणाली कीं, " बाळानों, जिकडून कोणी धोंडा फेंकील त्याच्या उलट दिशेनें तुम्ही उडून गेला म्हणजे तुमचा बचाव होईल. " त्या दोन पोरांपैकीं एक जरा अधिक हुशार होतें त्यानें शंका काढली, " पण आई, जर दोन्हीं-कडून एकदम दोन धोंडे आले तर मग काय करावें ? " आईनें उत्तर केलें, " बाळा, इतकी कल्पना तुला सुचली एवढेंच बस आहे. मला आतां तुझ्या रक्षणाविषयीं काळजी उरली नाहीं ! " येणेंप्रमाणें युक्तिमान व खरे शहाणे असे केरोपंतनाना यांनीं विद्यार्थ्यांनीं बिकट शंका काढल्या असतां व्यर्थ अभिमानी प्रोफेसरांप्रमाणें त्यांजवर रागावून ज्ञानाचा जो खरा मार्ग—म्हणजे शंका निघणें—त्याचा अवरोध कधीं केला नाहीं; परंतु आपला बोज राखून विद्यार्थ्यांचें त्यांनीं नेहमीं समाधान करीत असावें.

केरोपंतनाना हे स्वभावानें इतके साधे व हौशी असत कीं, वेळ फावला म्हणजे मुलांस कधीं कधीं बोध करण्याकरितां आणि कधीं कधीं त्यांचें मनोरंजन करण्याकरितांहि आपल्या स्वतःविषयीं सुद्धां गोष्टी ते गमतीनें सांगत असत. विष्णुशास्त्री एकदां सांगत होते कीं, " एकदां स्वारी अशाच लहरींत येऊन सांगूं लागली कीं, ' मी नगरास असतां आमच्या सारखीच कांहीं मंडळी सुट्टीच्या दिवशीं तेथील तळ्यावर फिरावयास निघाली. तेथें गेल्यावर तळ्यांतील मध्यभागीं

खांब पाहून कोणीं म्हटलें कीं, या खांबापाशीं पाणी किती खोल असेल? त्यावरून चर्चा चालतां चालतां एका राजश्रींची कल्पना धांवली कीं, या खांबावर चढून उभें राहिलें असतां काय गम्मत दिसेल? यावरून आम्ही व आमच्यासारख्या तीन चार हौशी स्वाऱ्या तळ्यांत उड्या टाकण्यास तयार झालों; परंतु पंचे वगैरे कोणा एकापाशींहि नव्हते. पण तेवढ्यानें मंडळी काय अडते? एकानें लागलींच आपलें उपरणें फाडून तीन चार लंगोट तयार केले! मग ते नेसून आम्हीं आंत उड्या टाकल्या, आणि मी प्रथम खांबावर चढून उभा राहिलों. बाकीचे असामी मागून पोहून येतच होते; परंतु इतक्यांत लोक येऊं लागून गोळा होऊं लागले—" इतक्यांत कोणी शिपाई कहीं कामाकारतां वर्गांत आल्यानें ही रंगांत आलेली गोष्ट तशीच राहिली!"

विष्णुशास्त्री यांस गणित विद्येची प्रीति फारच थोडी होती; तेव्हां नानांपासून त्यांस अवांतर गोष्टींचेंच ज्ञान विशेषतः प्राप्त झालें. विष्णुशास्त्री यांस गणिताची जरी तादृश गोडी नव्हती तरी त्यांची योग्यता केरोपंतनाना हे जाणून होते. असें सांगतात कीं, "याच सुमारास एकदां विष्णुशास्त्री व सीतारामपंत हे उभयतां शुक्रवार पेठेंतील डिस्पेन्सरींत तेथील डॉक्टर बाळकृष्ण चिंतोबा हे सुक्ष्मदर्शक यंत्रानें रक्तबिंदूतील द्रव्यांच्या पृथक्करणाचा प्रयोग दाखविणार होते, तो पाहण्यास गेले असतां तेथें केरोपंतनाना हेहि सहज आले होते. डॉ. बाळकृष्ण चिंतोबा हे सूक्ष्मदर्शक यंत्र लावून रक्तबिंदूचा प्रयोग दाखवूं लागले. या वेळीं सीतारामपंताची चंचलता व बाह्य हुषारी पाहून वरवर परीक्षा करणारे डॉक्टरसाहेब हे त्यांजवर मोठे खूष झाले आणि त्यांच्या चंचलतेंत आणि विष्णुशास्त्री यांच्या संकोचित वृत्तींत मोठी तफावत पाहून केरोपंतनानांकडे वळून म्हणाले, "पहा, हा विष्णु किती थंड आहे! सीताराम बरा हुशार दिसतो, त्यानें इकडून तिकडून सर्व यंत्र पाहिलें; पण विष्णु हा एका जागेवरून हलला देखील नाहीं," परंतु केरोपंतनाना यांची परीक्षा अगदीं वेगळ्या तऱ्हेची. त्यांनीं उत्तर दिलें, "विष्णु हा दिसण्यांत चंचल नाहीं खरा, परंतु त्यानें एका जागेवरच उभें राहून या

प्रयोगांतील जितक्या खुब्या लक्षांत आणल्या असतील तितक्या चोहोंकडून फिरून पाहूनहि सीतारामाच्या लक्षांत आल्या नसतील, अशी माझी खात्री आहे ! ''

डेक्कन कॉलेजांतील प्रोफेसरांच्या हाताखालीं चार पांच उपगुरु होते. त्यांपैकीं एकाविषयींच येथें कांहीं विशेष लिहिण्यासारखें आहे. हे अनंतशास्त्री पेंडारकर * होत. हें विद्वद्रत्न माजी नीलकंठशास्त्री थत्ते, मोरशास्त्री साठे वगैरे दक्षिणेंतील जुन्या शास्त्रिवर्गापैकीं अखेरचेच म्हणावयास हरकत नाहीं. पाठशाळेंत अलीकडे तयार होऊन पुढें इंग्रजी विद्येचा ज्यांस संस्कार लागला असे जे कृष्णशास्त्री चिपळुणकर, विष्णुशास्त्री पंडित यांमध्यें आणि अनंतशास्त्र्यांसारखे जुने शास्त्री यांमध्यें पुष्कळच अंतर होतें. जुन्या शास्त्र्यांमध्यें विद्वत्ता अधिक, त्यांचे जुन्या विद्येविषयीं परिश्रम अधिक; परंतु त्यांच्यापासून हल्लींच्या काळीं आपणांस फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. हल्लींचे संस्कृतज्ञ लोक संस्कृत विद्येच्या ज्या भागांस—काव्यें, नाटकें, कादंबऱ्या यांस—मान देतात त्यांची जुने शास्त्री फारशी योग्यता समजत नसत. त्यांचा सर्व भर न्याय, मीमांसा, व्याकरण वगैरे शास्त्रांवरच असे. देशभाषा जी महाराष्ट्र भाषा तिजविषयीं यांच्या ठिकाणीं अत्यंत अनास्था असून मराठी कविता किंवा बखरी यांचा बहुतेक पंडितांस विटाळहि नसे. तेव्हां नवीन ग्रंथ करण्याचें ज्यांस सामर्थ्य नाहीं, जुन्याचीच मात्र काथ्याकूट करण्यांत ज्यांची प्रवीणता, असे हे जुने शास्त्री, इंग्रजी विद्येच्या प्रसारामुळें दशग्रंथी वैदिक मंडळीप्रमाणेंच हळूहळू मागें पडत चालले. या वर्गापैकीं अनंतशास्त्री पेंडारकर हे होते.

शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं पुष्कळ विद्वत्ता, पुष्कळ ग्रंथांचें झालेलें अवलोकन, वगैरे शिक्षकास लागणारे कित्येक अमोलिक गुण होते; परंतु कांहीं जुन्या शास्त्रीलोकांचा मुग्धतेचा जो दुर्गुण—म्हणजे होतां होईल

* फोटोग्राफमधील वरून तिसऱ्या ओळींतील डावीकडून उजवीकडे आठ नंबरचे गृहस्थ.

तोंपर्यंत कोणास कांहीं सांगू नये–तो पेंडारकर शास्त्री यांच्या ठायीं पूर्ण असल्यामुळें त्यांच्यापासून विद्यार्थ्यांस फारच थोडा लाभ होत असे. शास्त्रीबोवांवर डॉ. कीलहार्न साहेबांची मोठी मर्जी असून त्यांजविषयीं त्यांचा मोठा आदर असे. यामुळें शास्त्रीबोवांवर ते शिकविण्याचा फार बोजा घालीत नसत. त्यांस फक्त बी. ए. किंवा एम्. ए. च्या विद्यार्थ्यांस आठवड्यांतून तीन चार तास घेण्यास ते सांगत असत; परंतु तेवढ्यांतूनहि शास्त्रीबोवांनीं जितकी टाळाटाळ होईल तितकी करावयाची. वर्गांत होतां होईल तोंपर्यंत आपण होऊन म्हणून कांहीं सांगायचें नाहीं; होस हो ठेवून द्यावयाचा; परंतु त्यांतून एखादा विद्यार्थी खमाटीस बसलाच तर त्यास हळूच म्हणायचें, " साहेब (डॉ. कीलहार्न) याबद्दल काय म्हणतात ? " विद्यार्थ्यानें सांगितलें कीं, साहेब असें असें म्हणतात, म्हणजे शास्त्रीबोवा म्हणायचे, " बरोबर आहे. साहेब कांहीं चुकायचे नाहींत." परंतु शंकेबद्दल आपलें काय मत आहे हें शास्त्रीबोवांच्या तोंडावाटे कधींहि बाहेर पडावयाचें नाहीं!

अनंतशास्त्री यांस वाटत असे कीं, मला जो पगार मिळतो तो माझ्या विद्वत्तेच्या मानानें कांहींच नाहीं. साधारण ' यस्, नो ' करणाऱ्या गोपाळराव कारकुनासहि सरकार इतकाच पगार देतात. त्यांस योग्यतेची पारख मुळींच नाहीं. यामुळें शास्त्रीबोवा त्यांच्या वर्गाच्या चालीप्रमाणें नेहमीं असंतुष्ट असत, व त्यांस विद्यार्थ्यांस शिकविण्याचा उल्हास अगदीं नसे. शिवाय विद्यार्थ्यांचीहि त्यांच्याशीं जी वागणूक असे ती शास्त्रीबोवांस शिकविण्याची विशेष उमेद येण्यास अनुकूल नसे. त्यांच्या आंगीं अति कंजूषपणा, घामटपणा, मुग्धता, शिकविण्याची टाळाटाळ वगैरे जे कित्येक दोष होते त्यांवरून ते शास्त्रीबोवांचा जितका मान ठेवावा तितका ठेवीत नसत, व यामुळेंहि ते निरुत्साह असत. तथापि मृतसमुद्रासहि ज्याप्रमाणें भरती यावी त्याप्रमाणें कपिलाषष्ठीचा योग कधीं कधीं येत असे ! व मग कांहीं उत्कृष्ट जुन्या पंडितआख्यायिका, कांहीं सुभाषितरत्नें हीं पेंडारकर शास्त्रीबोवांच्या मुखांतून बाहेर पडावीं ! विष्णुशास्त्री हे अशा योगाची मार्गप्रतीक्षा करीत

बसलेले असतच. ते होऊन शास्त्रीबोवांशीं कधीं बोलावयाचे नाहींत; परंतु शास्त्रीबोवा लहरींत येऊन निवडक निवडक सुभाषितें किंवा आख्यायिका सांगूं लागले, म्हणजे त्या मुकाट्यानें टिपल्यावांचून त्यांतील एकहि ते जाऊं देत नसत.

परंतु कॉलेजांतील विद्यार्थी सर्वच सारखे कोठले असणार? कांहीं टवाळ, कांहीं अरसिक व पुष्कळ केवळ भाडोत्री वृत्तीचे असायचेच ! परीक्षेचा मुक्काम गांठण्याचें काय तें त्यांचें धोरण ! विष्णुशास्त्री अशा प्रसंगाविषयीं एकदां सांगत होते कीं, " शास्त्रीबोवांची स्वारी एके वेळीं अंमळ खुषींत येऊन महाभारताविषयीं एक आख्यायिका सांगूं लागले. ते म्हणाले कीं, एकदां कालिदास कवि स्वकाव्यप्रतिष्ठेनें उन्मत्त होत्साता महाभारत हातीं घेऊन त्यांतील कांहीं प्रमाद काढून ते खोडूं लागला. इतक्यांत तेथें वरील काव्याचा कर्ता जो व्यासमुनि तो शुकाचें रूप धारण करून येऊन "– इतक्यांत एक महारसिक विद्यार्थी या वाक्रसाच्या प्रवाहाचा अवरोध करून शास्त्रीबोवांस मध्येंच हटकून म्हणाले, ' शास्त्रीबोवा, त्या मंडळींना स्वर्गांतून खालीं कशाला उतरवितां ? '–मग काय विचारतां ? अगोदरच शास्त्रीमहाराजांची हौस आणि त्यांत विद्यार्थ्यांची अशी सहृदयता ! शास्त्रीबोवा, कविकुलगुरु, व्यासमुनि सर्व एकदम वरील परीक्षामुमुक्षु विद्यार्थ्यांच्या एका शब्दानें गप्प बसले !! " वर्डस्वर्थ साहेब अशा भाडोत्री मंडळीचा अतिशय तिटकारा * करीत असत, व त्यांनीं नेहमीं त्यांस

* विष्णुशास्त्री याबद्दल एकदां सांगत होते कीं, " आम्ही पाच चार असामींनीं एफ्. ए. च्या परीक्षेस बट्लर्स सर्मान्स म्हणून ऐच्छिक विषय घेतला होता. तो समजून घेण्याकरितां आम्ही एके दिवशीं साहेबांच्या बंगल्यावर गेलों. बट्लरच्या चवदा सर्मनांपैकीं आमच्या परीक्षेस फक्त तीनच असत; व यांखेरीज त्यांची प्रस्तावनाहि नेमिलेली असे. आमच्या तीन सर्मन्सपुरता प्रस्तावनेचा भाग संपलासा पाहून आम्हांपैकीं एक सिंधी विद्यार्थी होता तो साहेबांस हळूच म्हणाला ' Sir, are we to read the preface for the other remaining sermons also ? They are not appointed for our examination. " विद्यार्थ्यांचे शेवटले

[पुढें चालू]

शिव्या द्याव्या; परंतु पेंडारकर पडले शास्त्री; त्यांची असल्या फांकड्या घोकंपट्या विद्वानापुढें काय पाड! असो. एकंदरींत या जुन्या विद्वान शास्त्रीबोवांच्या शिक्षणापासून विष्णुशास्त्री व त्यांच्यासारखे जे कांहीं मार्मिक विद्यार्थी होते त्यांस फारच थोडा फायदा झाला असेल यांत संशय नाहीं.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री हे प्रथम पूना कॉलेजमध्यें गेले त्या वेळीं तेथील शिक्षणाची व्यवस्था होती. याशिवाय त्यांस दुसऱ्या तऱ्हेनें शिक्षण मिळण्याची सोय होती; ती अर्थातच त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांचें सान्निध्य ही होय. कृष्णशास्त्री हे बरींच वर्षे दक्षिणा प्राईज कमेटीचे रिव्हाइझर असल्यामुळें त्यांजकडे पुष्कळ नवीन मराठी ग्रंथ तपासण्याकरितां येत असत. ते व त्यांचें कृष्णशास्त्री यांनीं केलेलें परीक्षण हीं विष्णशास्त्री यांस वाचायास सांपडत. शिवाय कृष्णशास्त्री हे त्या वेळीं पुण्यांतील विद्वान मंडळीमध्यें प्रमुख असल्यामुळें त्यांच्याकडे त्या वेळचे पुष्कळ विद्वान लोक येत. त्यांचें अनेक विषयांवरील संभाषण, म्हणजे कधीं ग्रंथांवरील टीका व कधीं राजकीय व सामाजिक व्यवस्था वगैरे गोष्टींबद्दल उद्घाटण, हीं विष्णुशास्त्री यांस आइकून ऐकावयास सांपडत. या दोन्ही गोष्टींमुळें विष्णुशास्त्री यांच्या ज्ञानांत बरीच भर पडली असेल यांत संशय नाहीं.

याच सुमारास विष्णुशास्त्री यांस मराठी कवितेचा नाद लागत चालला. कृष्णशास्त्री हे ट्रेनिंग कॉलेजांत प्रिन्सिपॉल असतांना तेथील लायब्ररींत ' सर्वसंग्रह ' मासिक पुस्तकाचे अंक सर्व नीट एकत्र बांधून ठेविले होते, ते विष्णुशास्त्री यांनीं वडिलांच्या नकळत कारकुनाकडून

(मागील पृष्ठावरून)

चार शब्द साहेबांच्या कांनीं पडतांच ते रागानें लाल होऊन मोठ्यानें ओरडून म्हणाले:— What a mechanical, mercenay sort of fellow you are! Have you nothing better to aim at, than simply to cram and pass in the examinations?"

आणवून वाचावे. एकदां दोनदां कृष्णशास्त्री यांनीं चिरंजीवाच्या हातीं तीं पुस्तकें पाहून त्यास सुचविलें कीं, हीं पुस्तकें वाचून तुला तादृश कांहीं फायदा होणार नाहीं; परंतु यावरून विष्णुशास्त्री यांची मराठी कवितेविषयींची भक्ति कमी न होतां ती दिवसेंदिवस अधिकच वाढत चालली. असें होण्यास मुख्य कारण असें झालें कीं, या वेळीं म्हणजे १८६६ सालच्या अखेरीस पुण्यास पन्हाळकरबोवा म्हणून कोणी हरिदास आले होते. ते येथें पुढें सुमारें एक वर्षभर राहिले. त्यांचीं कीर्तनें गांवांत शेंकडों झालीं. विष्णुशास्त्री यांस त्यांचा फारच नाद लागला. पन्हाळकरबोवांची कीर्तनसामुग्री इतर हरिदासांप्रमाणें गायन, वाद्य वगैरे नसून ती मुख्यत्वेंकरून त्यांची रसाळ वाणी, उत्कृष्ट वक्तृत्व आणि मराठी कवितेंतील उत्तम उत्तम पद्यरत्नांचा मोठा सांठा, ही होती. हे बोवा पूर्वी सांगली, मिरज वगैरे संस्थानांत कारकून असून पुढें उतारवयांत त्यांचा वडील मुलगा वारल्यावरून त्यांनीं वैतागून ऐहिक व पारमार्थिक साधनांचा मार्ग जो हरिकीर्तन तो अवलंबिला होता. त्यांस जी कोणी बिदागी देईल ती ते मोठ्या संतोषानें घेत असत. येणेंप्रमाणें हे बोवा इतर प्रांपचिक हरिदासांप्रमाणें केवळ व्यवहारदृष्टि नसून त्यांचें वर्तनहि खऱ्या हरिदासाप्रमाणेंच शुद्ध असे. यामुळें त्यांच्या वक्तृत्वाचा ठसा विष्णुशास्त्री यांच्यासारख्या अल्पवयस्क मुलावर चांगला उमटला हें साहजिकच आहे. जेथें जेथें म्हणून पन्हाळकरबोवांचें कीर्तन असे तेथें तेथें विष्णुशास्त्री हे हटकून जावयाचे; परंतु कीर्तनस्थानीं पुढें अग्रभागीं जाऊन बसण्याची त्यांची कधीं इच्छा नसे. त्यांच्या भिडस्त व एकलकोंड्या स्वभावास अनुसरूनच ते बहुतेक मागील ओळींत बसलेले किंवा कधीं तर मागें उभेहि राहिलेले आढळावयाचे. इंग्रजी नवीन विद्वान मंडळींत हरिदासांच्या कीर्तनांची वगैरे फारशी चहा नसल्याकारणानें आपणांस त्यांची इतकी गोडी आहे असें आपल्या कालेजबंधूंस व विशेषतः आपले वडील यांस कळून येऊं नये अशी त्यांची इच्छा असे. कृष्णशास्त्री हे रात्रीं बारा एक वाजेपर्यंत घरीं येण्याची फारशी भीति नसे, व मुलें कोठें आहेत याविषयींहि त्यांची विशेष चौकशी नसे. यामुळें विष्णुशास्त्री

यांस पन्हाळकरबोवांच्या उत्कृष्ट कीर्तनांचा लाभ पुष्कळ वेळां घडला. या बोवांच्या एका कीर्तनप्रसंगीं प्रसिद्ध मराठी भाषाभिज्ञ कै. परशुरामपंत तात्या गोडबोले हे आले असून त्यांनीं कीर्तन संपवून बोवा खालीं बसल्यावर त्यांच्या रसाळ वक्तृत्वाची तारीफ करून म्हटलें, " बोवांची कर्तबगारी नांवाप्रमाणेंच आहे. कीर्तनास आरंभ झाला म्हणजे बुवांच्या रसाळ वाणीच्या पन्हाळांनीं श्रोतृजन अगदीं तृप्त होऊन जातो ! " येणेंप्रमाणें पन्हाळकरबोवा यांनीं विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं मराठी कवितेविषयीं जी मूळ प्रीति होती ती आपल्या उत्कृष्ट वक्तृत्वानें व महाराष्ट्र कवितें-तील उत्तम उत्तम पद्यरत्नांचा संचय दाखवून दिल्यानें वृद्धिंगत केली.

कॉलेजमध्यें विष्णुशास्त्री यांचा विद्याभ्यास इतर विद्यार्थ्यांप्रमाणें चाललाच होता. इंग्रजी, संस्कृत, इतिहास वगैरे विषयांत यांची चांगली प्रवीणता असे. त्यांस कॉलेजांत गेल्यापासून एक जुनिअर स्कॉलरशिप व क्यॉडीची मराठी स्कॉलरशिप ह्या दोन स्कॉलरशिपा होत्या; परंतु त्यांचें गणिताकडे बरेंच दुर्लक्ष असे; यामुळें १८६७ सालअखेर जेव्हां ते प्रथम लिटिलगोच्या परीक्षेस गेले तेव्हां ते तींत नापास झाले. या अपसिद्धीमुळें ते पुढील सालभर साधारण नाउमेदच होते.

सन १८६८ सालच्या आरंभीं डेक्कन कॉलेजची मोठी इमारत पूर्ण होऊन वानवडीहून कॉलेज तेथें गेलें. कॉलेजची ही इमारत पुणें शहरा-पासून बरीच दूर एरवडे गांवाजवळ खंडोबाच्या माळावर आहे. तेथील हवापाणी चांगलें असून तेथें लोकांचा अगदीं संपर्क नसल्यामुळें विद्यार्थ्यांस हें स्थळ अर्थातच फार सोईचें आहे. ह्या भव्य इमारतीस एक मोठा उंच टावर असून तेथून फार दूर असा शहराचा, छावणीचा, जेलाचा व खडकीच्या रिसाल्याचा रमणीय देखावा दिसतो. पावसाळ्यांत चोहों-कडे यथेच्छ पर्जन्यवृष्टि होऊन लहान लहान ओढे माळावरून धावूं लागतात. व भोंवतालील प्रदेश हिरव्यागार गवतानें आच्छादित झाल्या-मुळें चोहोंकडे मोठी मजा दिसूं लागते. कॉलेजच्या दक्षिण बाजूस मुळा नदी वाहत जात असून तिच्या कांठावरून झाडांची बरीच गर्द छाया

असल्यामुळें तेथें स्नान करण्यास, पोहण्यास किंवा चार घटका विश्रांति घेण्यासहि जागा फार चांगली आहे. ईशान्येस शादलबोवाच्या टेंकड्या असून त्यांवरून अस्तमानसमयीं कोणा स्नेह्याबरोबर किंवा एकट्यानेंच फिरण्यास फार मजा आहे. पलीकडे बंडगार्डनचा रमणीय असा बगीचा असून तेथें संध्याकाळीं किंवा चांदण्यारात्रीं मोठी मौज दृष्टीस पडते. मोठ्या हुद्देदार साहेबांचीं दंपत्यें उत्तम पोषाख करून इकडून तिकडे मोठ्या आनंदानें हिंडतांना दृष्टीस पडतात; त्याचप्रमाणें दुसरीकडे त्यांचीं गोजिरवाणीं अपत्यें सुंदर छोटे पोषाख घालून इकडे तिकडे बागडतांना दिसतात. शिवाय कधीं कधीं गव्हर्नरसाहेबांसारखे अधिकारी आले असतां युरोपियन व नेटिव्ह लोकांचा विशेष समुदाय जमून त्या रमणीय प्रसंगीं ब्यांडहि सुरू असल्यामुळें मोठी बहार उडून जाते. या सर्व गोष्टींच्या रम्य आठवणी कॉलेज सोडून गेल्यानंतर सुखदुःखमिश्र अशा संसारसागरावरून वहात जात असतां कोणा कॉलेजबंधूस होत नसतील बरें ?

विष्णुशास्त्री यांच्या वेळीं या विद्यालयांत कांहीं विशेष सोई होत्या असें ते सांगत असत. सध्यां एकेका खोलींत दोन दोन तीन तीन विद्यार्थ्यांची जशी खेंच आहे तशी त्या वेळीं नव्हती. खोल्या पुष्कळ व विद्यार्थी थोडे अशी स्थिति असल्यामुळें विद्यार्थ्यांची या वेळीं मोठी चैन असे. खोल्यांतील सामानसुमानहि अगदीं नवें कोरें होतें. शिकविण्यास प्रो. वर्डस्वर्थ, केरोपंतनाना यांच्या सारखे शिक्षक, राहण्यास व अभ्यास करण्यास उत्कृष्ट इमारत, हल्लींप्रमाणें अभ्यासाचा फारसा बोजा किंवा परीक्षांचा मार्ग नेट नव्हता व शिवाय सरकारी नोकऱ्यांची विपुलता इत्यादि गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनास उल्हास राहण्यास अत्यंत अनुकूळ असल्यामुळें त्या वेळच्या विद्यार्थ्यांची स्थिति मोठी सुखाची होती.

या वर्षभरहि विष्णुशास्त्री यांचें लक्ष परीक्षेच्या ठरीव विषयांपेक्षां सर वॉल्टर स्कॉटच्या नॉव्हेल्स, राजतरंगिणी इत्यादि पुस्तकांच्या वाचनाकडेसच अधिक असल्यामुळें या सालीं जी प्रिलिमिनरी परीक्षा झाली तींत ते लॉजिक (तर्कशास्त्र) मध्यें नापास झाले. यामुळें लिटिलगोच्या परीक्षेंत पुन्हां फॉर्म देण्याच्या अगोदर प्रो. वर्डस्वर्थ यांनीं कृष्णशास्त्री

यांस पत्र लिहिलें कीं, " तुमचा मुलगा या सालींहि विशेष तयार आहे असें नाहीं. तो गणितांत व इंग्रजींत सरासरीच उतरला आहे व लॉजिकमध्यें तर तो नापासच झाला आहे. तथापि तुम्ही जर हिंवाळ्याच्या सुट्टींत त्यास लॉजिक शिकविण्याचें पतकरीत असाल तर मात्र मी त्यास परीक्षेस पाठवितों. " या वर्षाअखेर विष्णुशास्त्री लिटिलगोच्या परीक्षेंत पास झाले.

या पुढील दोन सालें म्हणजे १८६९ व १८७० हीं विष्णुशास्त्री यांच्या सर्व आयुष्यांत अत्यंत सुखाचीं अशीं गेली. या वेळची त्यांची स्थिति खरोखरच मोठी स्पृहणीय होती. वडिलांस चांगला मोठा रोजगार, अल्पवयांतच दोन परीक्षा पास झालेल्या, गृहस्थिति सर्व प्रकारें अनुकूल, शिवाय विद्याभ्यास संपतांच मोठी नोकरी मिळण्याचा संभव, इत्यादि गोष्टी त्यांच्या मनांस अत्यंत उमेद आणणाऱ्या होत्या. विष्णुशास्त्री यांच्या बरोबरीच्या कित्येक साधारणपणें संपन्न अशा विद्यार्थ्यांनीं बेत केला कीं, बी. ए. च्या वर्गांत एक वर्षभर जास्त राहून चांगला अभ्यास करून मग डिग्रीची परीक्षा द्यावयाची. हा बेत विष्णुशास्त्री यांस पसंत पडला. डेक्कन कॉलेजची भव्य इमारत शहरापासून बरीच दूर असून तेथेंच अभ्यासाची, जेवावयाची व रहावयाची उत्कृष्ट सोय नवीनच झाली असल्यामुळें विष्णुशास्त्री यांस कॉलेजांतील स्वतंत्र रहाणें फार आवडलें. एक वर्ष तेथें मुक्काम केल्यानें त्यांच्या हौसेप्रमाणें त्यांस परीक्षेखेरीज अवांतर पुस्तकें वाचण्यास आतां चांगलें फावलें. त्यांचे वाचनाचा भर संस्कृत, मराठी व इंग्रजी पुस्तकांवर फार असे. याच वेळीं त्यांनीं कादंबरी, वासवदत्ता, राजतरंगिणी, व बहुतेक मोठमोठीं काव्यें व नाटकें, त्याचप्रमाणें मराठींतील मोरोपंताचीं बहुतेक प्रकरणें, शिवाय मुक्तेश्वर व वामन यांचीं ' सर्वसंग्रहांत ' आलेलीं काव्यें हीं वाचलीं. इंग्रजींतील भाषाज्ञान व इतिहास या विषयांवरील बरेच नामांकित ग्रंथ त्यांनीं चाळूनपाळून वाचले. त्यांचें कोणत्याहि ग्रंथाचें वाचन अथपासून इतिपर्यंत नसे. वारंवार ग्रंथ चाळून ते त्यांतील मथितार्थ काढीत असत; आणि वास्तविक हीच रीत मनुष्याचें बरेंच अध्ययन झालें म्हणजे त्याला उपयुक्त

अशी वाटूं लागते. डॉ० जॉनसन् याविषयीं असें म्हटलें आहे कीं, त्यानें जन्मांत दोनच ग्रंथ कायते समग्र असे वाचिले होते—एक 'बनियन्त पिलग्रिम्स प्रॅग्रेस' व दुसरा 'बर्टन्स आनाटमी ऑफ मेलांकली!' येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं आपला पुढील महदुद्योग जो निबंधमाला-रचना त्याची सामुग्री या वेळेपासून किंवा याच्याहि अगोदरपासून गोळा करून ठेवण्याचा यत्न चालविला होता !

विष्णुशास्त्री यांच्या वेळीं विद्यार्थ्यांस जेवण्यासाठीं हल्लींप्रमाणेंच निरनिराळे क्लब असत. यांची या वेळीं संख्या सुमारें सात आठ होती. यांत एक फेलोज क्लब म्हणून दोन तीन फेलोंचा वेगळा असे. या वेळीं त्यांत मि. काथवटे,* अच्युत व जोशी हे होते. या क्लबांत मंडळी थोडी असल्यामुळें त्यांत जेवणाखाण्याची व्यवस्था विशेष बरी असे. कृष्णशास्त्री व काथवटे यांचा बराच परिचय असल्यामुळें विष्णुशास्त्री व त्यांचे चुलते सीतारामपंत जे नुकतेच मॅट्रिक्युलेशन पास झाले होते ते याच क्लबांत गेले. चुलतापुतण्यांच्या वृत्तींतील मोठा फरक जो मागें सांगितलाच आहे तो येथेंहि मंडळीच्या सहज नजरेस आला. विष्णुशास्त्री यांस स्वतः होऊन कांहीं बोलायला नको असे; दुसरे कोणी बोललेच तर मात्र यांनीं उत्तर द्यावयाचें; एरवीं क्लबमध्यें पुष्कळ गोष्टी चालल्या असतांहि विष्णुशास्त्री हे केवळ श्रोतेच असावयाचे ! परंतु सीतारामपंतांची वृत्ति अगदीं वेगळी. ते स्वतः पुष्कळ बोलतील, चवकशा करतील, वादविवादांत शिरतील अशा तऱ्हेचा म्हणजे विष्णुशास्त्री यांच्या उलट दिशेचा त्यांचा स्वभाव होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा या दोघांच्या वृत्तींतील चमत्कारिक फरक पाहून मि. काथवटे एकदां म्हणाले "सीतारामपंतांचा स्वभाव बरा बोलका आहे. कृष्णशास्त्री यांस सुद्धां बोलावयास चालावयास बरेंच लागतें; पण हे शास्त्रीबोवा म्हणजे पेटींतलच शास्त्रीबोवा ! यांना बोलावयास म्हणून नकोच." आपणावरील अशा

* फोटोग्राफमधील वरून तिसऱ्या ओळींतील डावीकडून उजवीकडील पहिले गृहस्थ.

तऱ्हेची टीका विष्णुशास्त्री यांस रुचत नसेल हें उघडच आहे. मि. काथवटे यांच्या विद्वत्तेबद्दल, मार्मिकपणाबद्दल व हुषारीबद्दल शास्त्रीबोवा त्यांची तारीफ करीत; परंतु वर लिहिलेल्यासारख्या सहजरीत्या त्यांनीं केलेल्या टीकांवरून, याचप्रमाणें धर्म, आचार, राज्य व समाजव्यवस्था इत्यादि गोष्टींसंबंधानें मि. काथवटे व विष्णुशास्त्री यांचा बराच मतभेद असल्यावरून व इतर सुधारलेल्या नवीन विद्वानांप्रमाणेंच मि. काथवटे यांच्या ठिकाणीं विष्णुशास्त्री यांचें फारसें रहस्य नसे.

क्लबांतील दुसरे फेलो मि. अच्युत नारायण* हे शास्त्रीबोवांच्याच बरोबर मॅट्रिक्युलेशन पास होऊन पुढें ते तीन वर्षांतच बी. ए. पास झाले होते. विष्णुशास्त्री हे अच्युतरावांच्या मेहनतीची व हुषारीची तारीफ करीत; परंतु त्यांची खोड म्हणून ते ही सांगत कीं, परीक्षेस म्हणून जें कांहीं लागायचें तेवढेंच काय तें अच्युतरावांनीं वाचावयाचें; एरवीं इकडे तिकडे डोळाहि करावयाचा नाहीं. ते कधीं नाटक किंवा सरकस किंवा इतर कोणताहि खेळ म्हणून पहावयास जात नसत. ते एकदां शास्त्रीबोवांस म्हणाले कीं, " परीक्षा पास होईपर्यंत दुसरें अगदीं कांहीं करावयाचें नाहीं व कोणत्याहि विषयाचा नाद म्हणून धरावयाचा नाहीं असा मीं पहिल्यापासूनच निश्चय केला होता. एकदां कोठें मला चुकून आनालिटिकल जॉमेट्रीचा छंद लागत होता; परंतु मी लवकरच सावध झालों, आणि त्याबद्दल कानाला खडा लावून घेतला ! तुम्ही पहा, नाहीं तें भलतेंच संस्कृत, मराठी वाचीत बसतां आणि मग परीक्षेंत गोता खातां ! "

आमच्या पुष्कळ कॉलेजबंधूंची समजूत मि. अच्युत नारायण यांच्या-प्रमाणेंच असते; परंतु डिग्री मिळविल्यानंतर मग अवांतर वाचन व इतर व्यवसाय करावयाचा असा जो त्यांचा गर्भित निश्चय दिसतो तो मात्र डिग्री मिळाल्यावर शिथिलत्व पावतो ही गोष्ट फार शोचनीय आहे.

---

* फोटोग्राफमधील वरून पहिले ओळींतील डावीकडून उजवीकडे पांचवे विद्यार्थी.

अगोदर डिग्री मिळावी म्हणून वरील स्तुत्य निश्चयास काट, व मागून डिग्री मिळाल्यावर संसारसुखांत व चैनींत अंतर पडतें म्हणून काट; एकूण अधिक वाचन व ग्रंथरचना वगैरे उद्योगाच्या वांट्यास आमची किताबधारी मंडळी कधींहि येत नाहीं !

या क्लबांतील तिसरे फेलो कै. गणेश परशुराम जोशी * हे होत. ते गृहस्थ संभावित, शांत स्वभावाचे व मितभाषणी असे असत. विष्णुशास्त्री सांगत होते कीं, " एकदां डॉ. कीलहार्न साहेबांबरोबर त्यांच्या देशचा कोणी साहेब कॉलेजांत आला होता. त्याला तरुण मनुष्यांचीं डोकीं पाहून त्यावरूनच तीं पुढें कशीं निघतील हें कळत असे असें सांगत असत. या साहेबांनीं कॉलेजांतील बहुतेक विद्यार्थ्यांचीं डोकीं तपासलीं. त्यांत त्यांनीं माझें व जोशी यांचें अशीं दोन डोकीं पसंत केलीं. "

फेलोज क्लबांतील मंडळी बहुतेक खर्चीक व हौशी अशी होती. तेथील ब्राह्मणहि फार गमतीचा व चैनी असा असे. पोषाख छान–छोकदार, कप्यांत घड्याळ लटकावलेलें, तोंड नेहमीं रंगलेलें, बिछाना चांगला मऊ जाड असा, अशी ही कुक–साहेबांची स्वारी फेलोंच्या चैनी क्लबास शोभण्यासारखीच होती. विष्णुशास्त्री हे एकदां यांच्या एका गमतीच्या प्रसंगाचें वर्णन करीत असतां म्हणाले, " एकदां स्वारींनीं आपला धुतलेला मुकटा चुलीवरच दोन टोंकांस लावून देऊन दार लोटून ते नदीवर पाणी आणण्यास गेले. नदीवरून परत येतात तों दार उघडें ! पुढें आंत जाऊन पाहिलें तों समोरील दारहि तसेंच उघडें असून मुकटा कोठें नाहीं ! मीहि याच वेळीं तेथें सहज गेलों होतों तेव्हां तो मला मुकटा नाहींसा झाल्याची हकीगत सांगूं लागला. इतक्यांत आम्हां दोघांचीहि नजर चुलीवरील एका बाजूस खिळ्याला पिंवळें मुकट्याचें टोंक लागलेलें होतें तिकडे गेली, आणि मुकटा एकाएकीं अदृश होण्याचें

---

* फोटोग्राफमधील वरून पहिल्या ओळींतील डावीकडून उजवीकडील सातवे विद्यार्थी. हे गृहस्थ हल्लींच्या सचिव पंतांस कांहीं दिवस शिक्षक असून ते भोर येथें १८७३ सालीं फार अल्पवयांत मरण पावले.

कारण दोघांच्याहि एकदम ध्यानांत येऊन मला मोठें हसू आलें. वाऱ्यानें समोरासमोरील दारें उघडल्यानें मुकट्याचें एक टोंक सुटून तो अग्नि-नारायणांच्या प्रदेशांत लोंबत असा राहतांच त्यांनीं आपली जिव्हा लांब करून कुक—साहेबांचा मुकटा चटकावला असावा असा सहजच तर्क बसला!"

ह्याहिपेक्षां विशेष मौजेची अशी ह्या पाकाचार्यांची विष्णुशास्त्री एक आख्यायिका सांगत होते; ते म्हणाले, "एके दिवशीं एका फेलोंनीं या राजश्रींना आपल्या खोलींतून कांहीं जिन्नस आणावयास सांगितला. जिन्नस इकडे तिकडे शोधितां शोधितां स्वारींची नजर कपाटांतील एका बाटलीकडे गेली. राजश्री पडले फार तर्कवान्! बाटलींत निषिद्ध पेय पदार्थ आहे याची कल्पनाहि न होऊन त्यांस वाटलें कीं, तींत कांहीं विलायती गुलाब-पाणी आहे. मग तें यथेच्छ सर्वांगावर शिंपडून घेऊन स्वारी चोहोंकडे सुवास पसरवीत अशी खोलींतून बाहेर पडली!!"

फेलोंच्या क्लबाशिवाय इतर क्लबांतून या वेळीं आठपासून दहापर्यंत विद्यार्थी असत. त्यांतील खाण्यापिण्याची व्यवस्था जरी कोठें कमी, कोठें जास्त अशी असे, तरी एकंदरीनें ती चांगलीच असे यांत संशय नाहीं. कदाचित् आपल्या लोकांची गृहस्थिति पाहतां तसली व्यवस्था फारच थोड्यांच्या घरीं सांपडेल. खाण्यापिण्याचें सुख असणें, उत्तम हवेंत स्वतंत्र-पणानें व संसारांतील हरएक काळज्यांतून अलिप्त असें राहणें, ह्या गोष्टी विद्यार्थ्यांस अत्यंत इष्ट आहेत; आणि ही सर्व व्यवस्था सरकारानें आपल्या-करितां केली आहे त्याबद्दल विद्यार्थ्यांनीं त्यांस दुवा देणें हें अगदीं वाजवी आहे.

विष्णुशास्त्री यांच्या वेळीं कॉलेजांत सुमारें साठ सत्तर विद्यार्थी असत. ह्यांच्या स्वभावांत, समजुतींत, चालचालणुकींत, वगैरे पुष्कळच वैचित्र्य असे. यांत कोणी सुस्वभावाचे, कोणी खोड्याळ, कोणी हौशी, कोणी तिरसट, कोणी अभ्यासी, कोणी आळशी, कोणी हुषार व कोणी गैदी अशा सर्व तऱ्हा येथें असत. यांपैकीं ठळक ठळक व्यक्तींचें वर्णन य भागाच्या आरंभीं संकल्प दर्शविल्याप्रमाणें करण्यास आम्ही यत्न करितों.

या विद्यार्थीसमूहामध्यें योग्यतेनें व सुस्वभावानें श्रेष्ठ व ज्यांचा विष्णुशास्त्री यांच्याशीं विशेष स्नेह असे असे रा. विष्णु मोरेश्वर महाजनी * हे होत. दोघांचाहि स्वभाव सरळ व साधा असल्यामुळें त्यांचा लवकरच स्नेह जुळला. विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणें मि. महाजनी यांसहि अवांतर पुस्तकें वाचण्याची हौस असे; मात्र दोघांच्या अभ्यासाच्या प्रकारांत फरक येवढाच कीं, विष्णुशास्त्री हे परीक्षेच्या विषयांची हेळसांड करूनहि अवांतर पुस्तकें वाचीत; आणि मि. महाजनी हे परीक्षेचे सर्व अभ्यास नीट संपवून विष्णुशास्त्री यांच्याबरोबर राजतरंगिणीसारखीं पुस्तकें होतील तितकींच वाचण्यास वेळांत वेळ करीत. मि. महाजनी यांची बुद्धि चलाख असून त्यांस सर्वच विषय बरेच चांगले अवगत असत. हायस्कुलापासूनच त्यांची धांव वर्गांतील इतर मुलांपेक्षां नेहमीं पुढें असे. ते एकदां सांगत होते कीं, " मी धुळें हायस्कुलांत होतों तेव्हां वर्गांत भूमितीचे सिद्धांत चालू असतां माझें लक्ष अर्धेमुर्धें चालू असलेल्या सिद्धांताकडे तर असायाचेंच; परंतु तितक्याच्या तितक्यांत भूमितीच्या पुस्तकांची पुढचीं पुढचीं पानें चाळीत जाऊन पुढें कोणकोणते सिद्धांत आहेत हें मीं अर्धेमुर्धें पाहून टाकावें ! "

कॉलेजांत आल्यावरहि मि. महाजनी यांची हुषारी याच प्रकारची असे. कोणत्याहि विवक्षित विषयांत हे पहिलेच असतील नसतील; परंतु प्रत्येक विषयांत हे बहुधा दुसरे तिसरे हटकून असायाचेच. यामुळें एकंदरींत ते पहिले दुसरेच येत असत. अभ्यासाच्या कामांत जसा विष्णुशास्त्री व मि. महाजनी यांच्यामध्यें फरक असे तसाच त्यांच्या स्वभावांतहि थोडा फरक असे. मि. महाजनी हे विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणें साधे व सुस्वभाव असत; परंतु विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणें ते मुग्ध नसून कदाचित् त्यांच्या उलट दिशेचेहि होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. बाकीच्या विद्यार्थ्यांपेक्षां मि. महाजनी यांचें वय लहान, वृत्ति अत्यंत चंचल,

* फोटोग्राफमधील वरून चौथ्या आळींतील डावीकडून उजवीकडील सातवे विद्यार्थी.

कोणताहि विचार पोटांत आला कीं तो लागलाच बाहेर पडायचा, मात्र कोणांस लावून बोलणें वगैरे कधीं व्हावयाचें नाहीं अशी त्यांची स्थिति असल्यामुळें त्यांच्या कांहीं अप्रबुद्ध स्नेही विद्यार्थ्यांस त्यांचा भारदस्तपणा मुळींच वाटत नसे; व ते यामुळें त्यांच्या थट्टेस व चेष्टेसहि कधीं कधीं पात्र होत ! परंतु विष्णुशास्त्री यांचा मि. महाजनी यांच्याशीं अर्थातच अगदीं वेगळ्या प्रकारचा भाव असे. कधीं कधीं गमतीनें एकीकडे विनोदार्थ ते एकमेकांस काय बोलत असतील तें असो; परंतु त्यांपैकीं कोणाचीच वागणूक परस्परांशीं गैर किंवा अमर्यादेची अशी नसे. कॉलेज सोडल्यावर या दोघांचा निरनिराळ्या विषयासंबंधानें मतभेद बराच असे तरी त्यांचा स्नेह विष्णुशास्त्री यांच्या आमरणांत तसाच कायम राहिला.

विष्णुशास्त्री यांचे या वेळचे दुसरे स्नेही रा० महादेव बाळकृष्ण चितळे ऊर्फ बापुसाहेब भाजेकर * हे होत. मि० महाजनी व बापुसाहेब यांचें साम्य म्हणजे उत्तर आणि दक्षिण दिशांचेंच साम्य होय ! बापुसाहेबांचा या वेळचा स्वभाव उदात्त, चैनी व पूर्ण आढ्यतेचा असा असे. त्यांचा पोषाख उत्कृष्ट झोंकदार, ती खिशांतील घड्याळाची लोंबत असलेली साखळी, ती चक्रीदार पगडी, ती उभें राहण्याची ऐट, इंग्रजी उच्चार ठाकेदार, इत्यादि गोष्टींवरून बापुसाहेबांच्या त्या वेळच्या स्वरूपाची साधारण कल्पना करितां येईल. त्यांस इंग्रजी बोलण्याची फार सफाई असे. वाणी साफ, बोल अस्खलित, शब्द मोठमोठे, मतलबापेक्षां शब्दावडंबर फार अशी त्यांची भाषणशैली असे. बापुसाहेब आपल्या ह्या विद्वत्तेनें प्रथमदर्शनीं आपल्या कॉलेजबंधूंस थक्क करून टाकीत. यामुळें त्यांस आपल्या इंग्रजीची मोठी घमेंड असे. वर्ष दोन वर्षे कॉलेज सोडून ते पुन्हां जेव्हा विष्णुशास्त्री यांजबरोबरच लिटिलगोची परीक्षा पास होऊन १८७० सालीं बी. ए. च्या क्लासांत शिकावयास आले, तेव्हां त्यांस भरंवसा होता कीं, आपल्या भाषणशैलीवरून आपणांवर वर्डस्वर्थसाहेब बरेच खुष होतील; परंतु बापुसाहेबांचा हा अदमास अगदीं चुकला.

* हे गृहस्थ फोटोग्राफ काढला त्या वेळीं नव्हते.

प्रिन्सिपॉल साहेबांनीं बापुसाहेबांच्या वक्तृत्वाचा मासला दोन तीन वेळ ऐकून त्यांनीं त्याची किंमत लवकरच केली. बापुसाहेबांस कांहीं प्रश्न केला असतां लागलींच त्यांच्या वक्तृत्वाचा प्रचंड लोंढा निघायाचा; परंतु वर्डस्वर्थसाहेबांचें लक्ष शब्दावडंबराकडे मुळींच नसून तें फक्त अर्थाकडे असे. यामुळें वराल विपयास पाहून साहेब कपाळाला आंठ्या घालून बापुसाहेबांस रागावून म्हणत " Well, now, repeat the same again " बापुसाहेबांनीं कमी पाल्हाळानें आपला मतलब सांगितल्यावर साहेबांनीं पुन्हां ओरडून म्हणावें " Well, what does all this nonsense amount to ? " येणेंप्रमाणें दोन तीन वेळ आपली विद्वत्ता वर्डस्वर्थ साहेबांच्या कसावर निराळ्याच प्रकारची वठते हें पाहून बापुसाहेबांनीं आपलें वक्तृत्वच त्यापुढें आंवरून घेतलें! तथापि कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांच्या ज्या आठवडेसभा भरत त्यांत बापुसाहेबांचा वक्तृत्वप्रवाह जबरदस्त असा चाले. कधीं कधीं ह्या सभांचें अध्यक्षस्थान शिष्यवर्गाच्या आग्रहावरून प्रो॰ केरोपंतनाना स्वीकारीत; परंतु एवढे जाडी अध्यक्ष असले म्हणून मंडळी कांहीं दबणारी नव्हती! प्रेसिडेंटांकडे किंवा इतर छोटेखानी विद्यार्थ्यांकडे दृष्टि न फिरवितां ती आकुंचित करून खिडकींतून पार पोकळींत फेकून दिली आहे असा बापुसाहेबांचा वक्तृत्व प्रवाह एकसारखा अस्खलित चालून त्यांत सर्व श्रोतृसमाज तरंगतो आहे कीं काय असा क्षणभर भास व्हावा! व मग त्यांतून " Well, then, tigers have no news-papers, lions have no steam-engines " असले मोठमोठे चार गड्यांस उचलण्यास भारी असे विचार बाहेर पडत *!!

---

१ वरील वर्णन व्यक्तिविशेष नसून कॉलेजांत सालोसाल जे विद्यार्थी अभ्यास करण्यास येतात त्यांतील कांहींएकास जें पूर्णपणें लागूं पडण्यासारखें आहे म्हणूनच आम्हीं तें येथें विशेष चटकदार उठविण्याचा यत्न केला आहे. येवढ्याकरून बापुसाहेबांची उगीच थट्टा करावी किंवा त्यांच्या योग्यतेची हानि

[पुढें चालू]

याच सुमारास पुण्याकडे पुनर्विवाहाची मोठी चळवळ चालली होती. पांडुरंगपंत व वेणूबाई यांचा नुकताच पुनर्विवाह होऊन सात मोठमोठ्या विद्वान गृहस्थांनीं त्यांत पुढारीपणा घेतल्यामुळें चोहोंकडे मोठी गडबड उडून गेली होती. येणेंप्रमाणें पुनर्विवाहासारख्या अलौकिक गोष्टीनें लोकांचीं मनें चलित झालीं असतां बापुसाहेबांनीं त्या विषयास लागून असें 'मनोरमा' म्हणून एक नाटक मराठींत लिहिलें. यांतील कांहीं भाग

(मागील पृष्ठावरून)

करण्याचा यत्न करावा असा आमचा मुळींच संकल्प नाहीं. येथें बापुसाहेबांचें नांव गाळतां येतें तर तें आम्हीं मोठ्या खुषीनें गाळलेंहि असतें; परंतु तसें केल्यानें मुख्य खुबी राहणार असें समजून व पूर्ववयांत आपल्या कित्येकांच्या ठिकाणीं विद्वत्तेबद्दल बापुसाहेबांसारख्याच ज्या वेड्या कल्पना असतात त्यांचें निरसन व्हावें या हेतूनें वरील प्रसंग वर्णिला आहे. एरवीं बापुसाहेबांची हल्लींची योग्यता आम्ही पूर्णपणें जाणून तीस योग्य मानहि देतों असें आम्ही सर्वांस मनःपूर्वक कळवितों; आणि ही पूर्ववयांतील आपली तसबीर पाहून बापुसाहेबांस वाईट न वाटतां उलटें त्यांस इतर वाचकांप्रमाणें हंसेंहि येईल अशी आमची खात्री आहे.

ही जी बापुसाहेबांबद्दल माफीदाखल प्रस्तावना आम्हीं लिहिली आहे ती बाकीच्या व्यक्तीबद्दलहि लागू आहे. त्या सर्वांबद्दल आमची पूज्यबुद्धि आहे व, कोणाचाहि उगाच उपमर्द करावा या हेतूनें येथें अक्षरहि लिहिलेलें नाहीं. तेव्हां क्वचित् स्थळीं अमळ कमीपणा दाखविणारी आख्यायिका घातली असतां त्याबद्दल रोष न धरितां तिच्या सत्यांशाकडे लक्ष देऊन खरें चरित्र लिहिणारास अशा आख्यायिका अत्यंत अवश्य असल्यामुळें त्या येथें घातल्या पाहिजेत असें समजण्यास ज्या व्यक्तींविषयीं आम्हांस येथें कांहीं निर्देश करावा लागत आहे त्या सर्वांच्या ठिकाणीं पूर्ण उदारता आहे अशी आमची पक्की खात्री आहे.

वरील मजकूर लिहिल्यानंतर थोड्याच दिवसांनीं बापुसाहेब वारले. तथापि वरील मजकूर सर्वांस लागू पडण्यासारखा असल्यामुळें आम्हीं तो न बदलतां तसाच ठेविला आहे.

चांगले साधेल आहेत; परंतु कांहीं फार ग्राम्य आहेत. नाटकाची भाषा एकंदर सोपी असून चटकदार आहे; परंतु त्यास जी इंग्रजी प्रस्तावना जोडली आहे तिजवरूनच त्या काळीं बापुसाहेबांची इंग्रजी विद्वत्तेबद्दल जी समजूत—म्हणजे लांब लांब उच्च ध्वनित शब्दांची रेलचेल, परंतु अर्थांश थोडा—तिची बरीच कल्पना होण्यासारखी आहे.

विष्णुशास्त्री यांच्या वेळचे तिसरे ठळक विद्यार्थी प्रो. केरोपंतनाना यांचे ज्येष्ठ चिरंजीव रा. कोंडोपंत छत्रे* हे होत. ह्यांचा स्वभाव वरील दोन्ही गृहस्थांपेक्षां कांहीं निराळ्या तऱ्हेचा असे. स्वभावानें आनंदी व उल्हासी, जात्या बुद्धिवान् व हुषार, परंतु अभ्यासाविषयीं कममेहनती असे हे असत. कोंडोपंतांचा आणि शास्त्रीबोवांचा संबंध इतर स्नेह्यांपेक्षां अधिक काळचा खरा, परंतु दोघांच्या स्वभाववैचित्र्यामुळें विशेष खेळाच्या किंवा असेच कांहीं गमतीच्या प्रसंगास काय ती त्यांची संगत असे. कोंडोपंत स्वतः-विषयींच्या व वडिलांविषयींच्या ज्या कांहीं गमतीच्या गोष्टी सांगत त्या शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं चांगल्या बिंबल्या असल्यामुळें ते त्या मोठ्या खुबीनें रसभरित अशा सांगत असत. यांतील एक गोष्ट दोघा बापलेकांचें स्वभावदर्शक विशेष असल्याकारणानें ती येथें दाखल करितों. कोंडोपंत सांगत होते कीं "आम्ही मागें नगरास असतांना मी बाबांच्याच इंग्रजी शाळेंत त्यांच्या वर्गांत होतों. तेथें रोजच्या धड्यांतील शब्द डिक्शनरींतून काढण्याची तसदी आम्हीं फारशी घेत नसूं; बहुतेक ते बाबांनाच विचारावेत. कधीं कधीं कंटाळा आला म्हणजे आम्हीं आपल्या वहींत शब्दांचीं नुसतीं स्पेलें लिहून वही बुकांत घालून ती बाबांच्या टेबलावर ठेवून देऊन आपण निजून रहावें. मग बाबांनीं पहावें कीं चिरंजीव तर निद्रिस्त झाले; मग वही घेऊन स्पेलांच्या पुढें त्यांनीं आपणच अर्थ लिहून ठेवावा. कधीं कधीं आम्ही याहूनहि आळसलों म्हणजे नुसती बुकांत धड्याच्या पानांत वही घालून ठेवून बिछाना सुधारावा;

---

* फोटोग्राफमधील वरून पहिल्या ओळींतील डावीकडून उजवीकडील दहावे गृहस्थ.

आणि मग बाबांनीं आम्हांस कोणते शब्द अडतील याचा अजमास करून स्पेलिंग व अर्थ हे दोन्हीहि दुसरे दिवशीं आमच्या उपयोगी पडण्याकरितां लिहून ठेवावे ! ! " असे वत्सल बाप किती थोड्यांच्या नशिबास येत असतील बरें ?

याच वेळेस कै. जनार्दन बाळाजी मोडक* हेहि कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गांत होते. जनार्दनपंततात्यांची वृत्ति फारच शांत, गरीब व मनमिळाऊ अशी असे. कोणाच्या आध्यांत नाहीं, मध्यांत नाहीं; आपण बरें, कीं आपला अभ्यास बरा असा यांचा स्वभाव असे. खेळांत, सभांत, नाटकप्रयोगांत वगैरे विष्णुशास्त्री यांच्याहूनहि हे अधिक आर्लस असत त्यांच्या राहण्याचा, अभ्यासाचा वगैरे फार बेत असे. हे या वेळीं ट्रान्सलेशन एक्झिबिशनर असून यांस मराठी कवितेचा बराच नाद असे. यांचा स्वभाव फार भित्रा असे. विष्णुशास्त्री एकदां सांगत होते कीं, " क्वांतील ज्या विद्यार्थ्यांचीं घरें शहरांत असत ते शनवारीं दुपारीं चार वाजतां जेवण आटोपल्यावर शहरांत निघून जात. क्वाचा ब्राह्मणहि आपलें काम उरकून घेऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठवड्याचा बाजार करण्याकरितां लवकरच निघून जात असे. मग जनार्दनपंततात्यांनीं रात्रीं अपरात्रीं सर्पांचे वगैरे भीतींत पडण्याचे अगदीं न ठेवितां, दिवसाउजाडीं आपलीं बुकें, वह्या वगैरे रात्रीं अभ्यासास लागणारी सामुग्री कॉलेजांतील खोलींतून औटहौसमध्यें आणून दिवावत्ती, बिछाना, कानटोपी वगैरेंची कडेकोट तयारी करून अंधार पडण्याच्या पूर्वींच स्वारींनीं जी खोली बंद करायची ती सकाळीं अरुणोदय होईपर्यंत ! "

---

* फोटोग्राफमधील वरून दुसरे ओळींतील डावीकडून उजवीकडले दुसरे गृहस्थ.

१ या वेळीं कॉलेज येथील खोल्यांत निजण्याची वहिवाट नसे; त्यांत फक्त अभ्यास करावयाचा. रात्रीं अभ्यास झाल्यानंतर विद्यार्थ्यांस निजण्याकरितां औटहौसमधील कुकिंग रूमशेजारील हल्लाच्या सामानसुमान ठेवण्याच्या खोल्यांत जावें लागत असे.

यापुढील विशेष ठळक असे विद्यार्थी रा० गोविंद गंगाधर सानें* हे होत. त्यांच्या संबंधानें हंसून हंसून विष्णुशास्त्री एकदां सांगत होते कीं, " ही निर्भिड स्वारी पुष्कळ वेळां अकराच्या सुमारास जेवणखाण करून, अंगांत फक्त सदरा किंवा वरती हाफ जाकीट घालून उघडेबोडके अशी हातांत पाण्यानें भरलेला तांब्या व पंचपात्री घेऊन निःशंकपणें थोरल्या जिन्यानें लायब्ररा हालवरून कधीं कधीं वर्डस्वर्थसाहेब समोरून येत असतांहि न कचरतां पूर्वेकडील आपल्या वरच्या खोलीकडे जावयाची ! "

यापुढील एक निराळा मासला रा० * * * यांचा होय. हे गृहस्थ एका जुन्या श्रीमान् घराण्यांतील असून स्वभावानें गरीब व संतुष्टवृत्ति असे असत; परंतु त्यांचा आळशी स्वभाव व अक्षयनिद्राप्रीति यांवरून यांच्या कित्येक चावट स्नेह्यांनीं त्यांस ' प्रोफेसर ऑफ स्लीप ' असा किताब दिला होता ! वरील दोष या गृहस्थामध्यें बऱ्याच अंशीं वास करीत होतासा दिसतो. वेळांत वेळ करून हे झोंपेंत म्हणून कधीं अंतर पडूं देत नसत. चार वाजतां हजेरी होतांना सुद्धां हे माडीवरून झोंपेंतून नुकतेच उठून डोळे चोळीत चोळीत येतांना पुष्कळ वेळां दृष्टीस पडायाचे. विष्णुशास्त्री सांगत असत कीं, प्रो० वर्डस्वर्थ साहेबांच्या वर्गांत स्वारी समोर आढ्या घालून बसलेली असून मधून मधून शिव्यांचा गडगडाट चालू असतांना सुद्धां * * हे नुकतेच चमचमीत भोजन होऊन गांवांतून बऱ्याच दुरून गाडींत बसून आल्यानें व उन्हाच्या तीरमीनें मुरसुरी चढून आपले डुकल्या खात आहेत असे दृष्टीस पडावेत ! साहेबांनीं ही सुप्तावस्था पाहिली असतां काय अनर्थ होईल म्हणून इतर विद्यार्थ्यांस मात्र पोटांत धडकी भरावी, परंतु या निद्राप्रिय स्वारींच्या तें गांवींहि नाहीं ! ! " वरील सद्गृहस्थांचा त्यांच्या स्वभावविशेषानें पुढें फारसा अभ्यास झाला नाहीं, तरी त्यांच्या इतर चांगल्या गुणांमुळें ते हल्लीं एक न्यायासन

---

* फोटोग्राफमधील वरून पहिल्या ओळींतील डावीकडून उजवीकडले पहिले गृहस्थ.

सुशोभित करीत आहेत ही गोष्ट आम्ही आपल्या वाचकांस आनंदानें कळवितों.

आतां या वेळच्या एका व्यक्तीसंबंधानें मात्र लिहावयाचें राहिलें. हे हल्लींचे प्रसिद्ध विद्वान प्रो० जिनसीवाले * हे होत. हे सन १८६८ सालीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास होऊन पुढील सालच्या आरंभापासून ते कॉलेजांत शिकावयास येऊं लागले. यांच्या इंग्रजीच्या विस्तृत वाचनाबद्दल या वेळींहि यांची बरीच प्रसिद्धि होती. ते या वेळीं अत्यंत गरीब स्थितींत असून प्रथम ते गांवांतच राहत असत व तेथून ते कॉलेजांत शिकावयास जात असत. यांचा पोषाख अगदीं हलका असून पायांत जोडा आहे आहे, नाहीं नाहीं असे मि० जिनसीवाले यांनीं उष्णकाळांत अकरा वाजतां कॉलेज सुटल्यावर मग घरीं येऊन स्नानसंध्या वगैरे ब्रह्मकर्म साग्र संपवून त्यानंतर महाभागवताचा एखादा अध्याय वाचून पुढें अन्न गृहण करायचें! पुढें त्यांस स्कॉलरशिपा मिळून ते कॉलेजांत रहावयास आल्यावरहि यांच्या वर्तनांत फरक पडला नाहीं. या वेळीं पुष्कळ क्लबांतील विद्यार्थी ओंवळ्यांनींच जेवावयास बसत, परंतु मि० जिनसीवाले यांचा सोंवळ्यांनीं बसावयाचा परिपाट कायमच राहिला! आम्हांस या वेळच्या व या पूर्वींच्याहि पुष्कळ कॉलेजबंधूंची माहिती आहे; परंतु बऱ्याच विद्वान झालेल्या मंडळींत सोंवळ्याओंवळ्यास इतके जपणारे, व अपेय द्रव्यास अगदीं न शिवणारे असे हे एकच होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. कित्येक लोकांस मि० जिनसीवाले यांच्या या व याचसारख्या दुसऱ्या कांहीं मतांबद्दल मोठा चमत्कार वाटतो; परंतु निरनिराळ्या व्यक्तींची निरनिराळी धर्मवृत्ति असणें हें अगदीं साहजिक आहे. परवां नुकते निवर्तलेले प्रसिद्ध कै. पंडित अयोध्यानाथ यांचा अगदीं साहेबी थाटाचा पेहराव—हॅट, पाटलोन, दाढी वगैरे—घातलेला फोटोग्राफ ज्यांनीं पाहिला असेल त्यांना पंडितजींच्या धर्मसमजुतींविषयींची कल्पना म्हणजे ते पुरे सुधारलेले असावेत अशी चुकीची होण्यासारखी

---

* फोटोग्राफ काढला तेव्हां हे गृहस्थ कॉलेजांत आले नव्हते.

आहे; परंतु त्यांचा वास्तविक प्रकार परवां नागपूर येथें लोकांस कळून आला. पंडितजींचें वय बरेंच झालें असतां व थंडीचा येवढा कडाका असतांहि स्नान करून उघड्यानें घटका दोन घटका देवपूजा केल्यावांचून त्यांचा दिवस जावयाचा नाहीं !

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांच्या वेळच्या प्रमुख प्रमुख व निरनिराळ्या मासलेवाईक विद्यार्थीव्यक्तींचें विवेचन झालें. आतां त्या वेळची लायब्ररी व रीडिंगरूम यांविषयीं लिहावयाचें राहिलें. कॉलेजांतील लायब्ररी बरीच मोठी असून तींत पुष्कळ उपयुक्त पुस्तकांचा संग्रह आहे; परंतु विद्यार्थ्यांच्या मागें परीक्षेच्या अभ्यासांचेच अगोदर फार नेट असल्यामुळें त्यांस लायब्ररीकडे पाहण्यास फारसें होत नाहीं. विष्णुशास्त्री यांच्या सारखे जे कोणी नादी असून परीक्षा लवकर पास होण्याबद्दल कमी दक्ष असतील त्यांस किंवा ज्यांस नशीबानें फेलोशिप्स मिळून दोन तीन वर्षे कॉलेजांत काढितां येतात त्यांसच या अमोलिक पुस्तकसंग्रहाचा विशेष उपयोग होतो. एरवींच्या विद्यार्थ्यांस त्याच्या दृष्टिसुखाचाच सरासरी लाभ !

रीडिंगरूममध्यें हल्लींप्रमाणें विद्यार्थ्यांच्या उपयोगांकरितां ठेवलेलीं उपयुक्त पुस्तकें या वेळीं नव्हतीं. तींत फक्त इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रें असत; परंतु यांपासून विष्णुशास्त्री यांस कांहीं उपयोग झाला नाहीं असें म्हटल्यास चालेल. त्यांस पुस्तकें वाचण्याचा जरी फार नाद असे तरी वर्तमानपत्रें ते बहुधा कधीं वाचीत नसत. चालू राजकीय, सामाजिक व लौकिक घडामोडींच्या विवेचनाचें स्थान म्हटलें म्हणजे वर्तमानपत्रें हीं होत. इतिहास वाचण्याचा, त्यांतील मर्मस्थानें धुंडाळून काढण्याचा, विष्णुशास्त्री यांस फार नाद असे; परंतु मागील काळच्या इतिहासाच्या ज्ञानापेक्षां अधिक उपयुक्त जें प्रस्तुत काळचें ऐतिहासिक ज्ञान तें मिळविण्यास विष्णुशास्त्री यांस विशेष हौस नव्हती. ही त्यांची चुकीची समजूत होती असें म्हटल्यास चिंता नाहीं; कारण प्राचीन काळापेक्षां प्रस्तुत काळाशीं आपला विशेष संबंध असल्यामुळें हल्लींच्या घडामोडींचें ज्ञान आपणांस अर्थातच अधिक उपयोगाचें आहे. या वादाबद्दल विष्णुशास्त्री यांचें असें म्हणणें असें कीं, हल्लीं घडणाऱ्या गोष्टींस स्थिरता येण्यास बराच काळ

लोटला पाहिजे; त्यांच्या परिणामांची अटकळ आजला कांहीं करितां येत नाहीं; आणि म्हणून हल्लींच्या इतिहासग्रंथांतून अलीकडच्या सुमारें पन्नास वर्षांचा इतिहास फारच थोडका व मोठा जपून लिहिलेला आढळतो. शिवाय, हल्लीं आपल्यांत हजारों गृहस्थ वर्तमानपत्रांखेरीज दुसरें कांहीं वाचीत नाहींत; तथापि त्यांपैकीं पुष्कळांची स्थिति म्हटली म्हणजे त्यांस सात आठ वर्षें लोटलेल्या गोष्टींविषयीं विचारायास गेलें तर बहुतेक चार शब्दहि सांगण्याची पंचाईत !

वरील म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे यांत संशय नाहीं. तथापि विष्णुशास्त्री यांच्या सारखा मार्मिक व चौकस मनुष्य ज्यानें इतिहास, भाषाज्ञान वगैरे विषयांचा अभ्यास इतक्या हौसेनें व आस्थेनें करावयाचा त्यानेंच हल्लींच्या चालू घडामोडीचें ज्ञान मिळविण्यास टाईम्सपत्रास शिवूंहि नये आणि त्याकरितां सरासरी चारचौघांत बसले असतां कर्णोपकर्णीं ऐकूं येणाऱ्या मजकुरावर किंवा कधीं कधीं हातीं पडेल तर ज्ञानप्रकाशासारख्या वर्तमान पत्रावरच निर्वाह करावा हें मोठें आश्चर्य होय !

सभेमध्यें उठून बोलण्याची संवय व्हावी म्हणून कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या ज्या सभा दर आठवड्यास होत असतात त्यांत विष्णुशास्त्री यांनीं कधीं भाषण केलें आहे असें ऐकिवांत नाहीं. तथापि दोन तीन वेळां त्यांनीं तेथें निबंध लिहून वाचिले आहेत. यांतील एका निबंधाचा विषय " प्राचीन हिंदु लोकांचें ज्ञान " असा होता. यांत विष्णुशास्त्री यांनीं प्राचीन काळीं आपल्या लोकांस पृथ्वी सूर्याच्या आकर्षणांत आहे ही गोष्ट वेदांत आहे असा उल्लेख केला होता, व त्याबद्दल त्यांनीं विष्णुबोवा ब्रह्मचारी यांच्या ' वेदोक्तधर्मप्रकाश ' या पुस्तकांत दिलेल्या ऋचा आधार म्हणून दिल्या होत्या. या प्रसंगाचे प्रेसिडेंट मि. जोशी यांनीं या प्रतिपादनावर fanciful म्हणून टीका केली, असें विष्णुशास्त्री सांगत होते. ह्या प्रसंगाचा निर्देश करण्याचें कारण हेंच कीं, विष्णुशास्त्री यांचीं हिंदु लोक व हिंदु विद्या यांविषयीं जीं मतें होतीं व ज्यांबद्दल त्यांचा आणि कित्येक विद्वानांचा मतभेद आहे त्यांचा प्रादुर्भाव या वेळेपासूनहि दिसून येतो.

विष्णुशास्त्री यांचे वेळीं डेक्कन कॉलेजामध्यें लॉन टेनिस, क्रिकेट किंवा बोटक्लब हीं कांहीं नव्हतीं. फक्त ' बॅट अँड बॉल ' म्हणून क्रिकेटच्या धर्तीवर एक खेळ असे. हा खेळण्यास विष्णुशास्त्री साधारण नेहमीं जात असत. याशिवाय एक ओबडधोबड नेटीव चालीची तालीमहि कॉलेजांत होती. तींत हत्ती, जोड्या, हौदा वगैरे सामान असे. याशिवाय तिसरा प्रकार पोहण्याचा. कॉलेजशेजारीं नदी बरीच मोठी असल्याकारणानें तेथें पोहण्यास वगैरे चांगली जागा आहे. या विहाराची विष्णुशास्त्री यांस मोठी हौस असे. त्यांनीं पुष्कळ वेळ पाण्यांत डुंबत राहवें. ते एकदां सांगत होते कीं, " मी आणि महाजनी असे एकदां नदीवर पोहण्यास गेलों. आम्हां दोघांसहि पोहतां चांगलें येत होतें असें नाहीं; त्यांतून महाजनी हे या कामांत अंमळ नवखेच होते; म्हणून मी एक भोपळा घेऊन तुम्ही मध्येंच थकला तर मी तुम्हांकडे तो फेंकून देईन असें त्यांस सांगून आम्हीं दोघे नदींत उतरलों. नदींत बरेंच लांब जाऊन परत येत असतां महाजनी यांचे हातपाय थकले, आणि त्यांनीं मला भोपळा फेंकण्यास सांगितलें; परंतु आम्हांमध्यें अंतर साधारण बरेंच असल्यामुळें भोपळा महाजनीकडे जाऊन पोंचेना; परंतु नदीचा कांठ जवळच असल्यामुळें महाजनी यांनीं धीर न सोडतां तशीच धडपड करून शेवटीं किनारा गांठला ! "

आतां विष्णुशास्त्री यांच्या वेळीं कॉलेजांतील शिस्त, विद्यार्थ्यांची चालचलणूक व धर्मशिक्षा यांविषयीं कांहीं लिहितों. प्रो. वर्डस्वर्थ साहेबांचें बाह्य व्यवस्थेकडे फारसें लक्ष नसे. विद्यार्थ्यांनीं वर्गांत अमुक तऱ्हेचा पोषाख घालून बसावें असा त्यांचा कांहीं निर्बंध नसे. कांहीं विद्यार्थी आंगरखा, पागोटें वगैरे चालीचा पोषाख घालून येत, परंतु कांहीं पागोट्यांऐवजीं टोप्या घालीत व पुष्कळ तर असेल तसें धोतरच डोक्यास बांधून व आंगांत सदरा घालून बसत. असा हा शिष्यसमुदाय पाहिला म्हणजे इंग्रजी विद्येचें अधिष्ठान जें कॉलेज त्याच्या उच्च स्वरूपाची फारशी कल्पना होत नसे; तर पाहाणारांस ही एक बटुमंडळीची वेदशाळा आहे असा भास होण्यासारखा असे. प्रो. वर्डस्वर्थ साहेबांपेक्षां प्रो. आक्सेन-

ह्याम साहेबांचें या कामाकडे अधिक लक्ष असे. त्यांनीं प्रो. वर्डस्वर्थ साहेब १८६८ सालीं रजेवर गेले असतां सर्व विद्यार्थ्यांकडून गाऊन्स करविले होते, व ते घातल्याशिवाय विद्यार्थ्यांनीं वर्गांत बसूं नये अशी त्यांची सक्त मनाई असे; परंतु प्रो. वर्डस्वर्थ विलायतेहून परत आल्यावर ऋष्याश्रमवटूंचा वेष हळुहळू पुन्हां कॉलेजांत परतला ! हल्लीं प्रो. सेलबी साहेबांच्या तरतरीत कारकीर्दींत गाऊन्स वगैरे ठाकठीक पुन्हां अंमलांत आली आहे ही एक चांगली गोष्ट झाली असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

या वेळच्या विद्यार्थ्यांच्या चालचलणुकीसंबंधानें विशेष लिहिण्यासारखें फारसें नाहीं. हल्लींहि त्यासंबंधानें जी ओरडाओरड आहे ती त्या वेळीं सुद्धां होती. कॉलेजांत शिकण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळ्या स्वभावांचे, निरनिराळ्या समजुतींचे व निरनिराळ्या संवईचे विद्यार्थी एकत्र जमतात. त्यांत कोणांस कांहीं वाईट खोडी असून त्या त्यांच्या संसर्गानें दुसऱ्या विद्यार्थ्यांसहि लागण्याचा पुष्कळ संभव असतो. विद्यार्थ्यांच्या वर्तनावर नजर ठेवण्याकरितां विष्णुशास्त्री यांच्या वेळीं एका रेसिडेंट फेलोची नेमणूक असे; परंतु तोहि इतर विद्यार्थ्यांच्या वयाचा व साधारण तितक्याच योग्यतेचा असल्यामुळें त्याचा त्यांस वचक वाटत असे. कांहीं विद्यार्थी विशेष हूड व दांडगे, कित्येक अर्वाच्य व चावट, व कित्येकांस स्वतः अभ्यास नकोसा असून ते दुसऱ्यासहि अभ्यास करूं न देणारे असे असत. जे विद्यार्थी बुद्धिमान् असून त्यांस वरील द्वाड विद्यार्थ्यांशीं बेतानें राहतां येई त्यांचा निभाव लागे; परंतु कधीं कधीं वरील वृकमंडळांत एखादी बिचारी भोळी गाय सांपडली म्हणजे तिची दशा पुसूंच नये ! अशा प्रकारच्या एका विद्यार्थ्याची हकीकत सांगत असतां विष्णुशास्त्री म्हणाले " आमच्या वेळीं एक गोळे आड नांवाचा कोणी विद्यार्थी होता. तो स्वभावानें फारच भाबडा असे; त्यास छक्केपंजी अगदीं माहीत नव्हती. कांहीं चावट मंडळींनीं त्याची पारख करून एकदां ते त्याच्या खोलींत गेले. आणि एकजण म्हणूं लागला, " काय हो गोळे, तुम्ही रात्रीं खोलीच्या खिडक्या अगदीं बंद करून कसे हो निजतां ? आपण

श्वासोच्छ्वास करितों त्यानें खोलींतील हवा बिघडते हें तुम्हांस कसें ठाऊक नाहीं ? " बिचाऱ्या भोळ्या विद्यार्थ्यास वाटलें कीं, आपला सोबती म्हणतो तें कांहीं खोटें नाहीं. मग लागलीच स्वारींनीं उठून खिडकी उघडी केली. इतक्यांत दुसरे राजश्री म्हणतात, " अहो पण तुम्हांस सापाची वगैरे कांहीं भीति नाहीं का ? आपल्या जुन्या घरांना इतक्याशा खिडक्या कोठें असतात ? मग ते सगळे लोक मरतातच का ? " बिचाऱ्या गोळ्यांस ह्याहि गोष्टीस ना म्हणवेना. त्यांनीं पुन्हां उठून खिडकी बंद करून घेतली ! इकडे मंडळींनीं आपापसांत एकसारखा हंशा पिकविलाच होता ! "

वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, कॉलेजांतील वास्तव्यांत गेलेला काळ एकंदरींत फार सुखाचा—कदाचित् सर्व आयुष्यांत इतका सुखाचा काळ दुसरा कोणताहि नसेल—असा आहे, तथापि मधून मधून द्वाड विद्यार्थ्यांच्या संसर्गानें थोडीबहुत पीडा चांगल्या व संभावित विद्यार्थ्यांस सोसावी लागते; परंतु हल्लीं सरकारनें कृपा करून हीहि पीडा नाहींशी करण्याकरितां रेसिडेंट प्रोफेसर्स क्वार्टर्स म्हणून कोणी वजनदार प्रोफेसराला विद्यार्थ्यांच्या वर्तनावर नजर ठेवण्याकरितां कॉलेजशेजारींच राहण्याची योजना करण्याचें ठरविलें आहे; तेणेंकरून आतां विद्यार्थी स्वच्छंदपणानें किंवा दुर्वर्तनानें राहतील अशी फारशी भीति बाळगण्यांस जागा राहिली नाहीं.

येणेंप्रमाणें कॉलेजांतील शिस्त व विद्यार्थ्यांची चालचालणुकीविषयीं झालें. आतां या वेळच्या विद्यार्थ्यांच्या धर्मशिक्षेविषयीं चार शब्द लिहितों. याहि विषयासंबंधानें हल्लीं जी ओरड आहे ती विष्णुशास्त्री यांच्याहि वेळीं होती; परंतु वरील दोन गोष्टी—कॉलेजांतील शिस्त व तेथील विद्यार्थ्यांची चालचलणूक—याच्यासंबंधानें हल्लीं बंदोबस्त होत चालला आहे; परंतु तिसरी गोष्ट जी धर्मशिक्षा, जी वरच्या दोन्ही गोष्टींपेक्षां अधिक महत्त्वाची आहे, तिजविषयीं सध्यांच्या स्थितींत व्यवस्था होणें बहुतेक अशक्यच आहे. शाळांतून धर्मशिक्षण देण्याचें सरकार पतकरीत नसल्यामुळें त्याची सरासरी अनास्थाच होत आहे. विद्यार्थ्यांस बाळपणीं घरीं

जें कांहीं धर्मशिक्षण मिळतें तेवढाच त्यांना कायतो बहुतेक धर्मसंस्कार घडतो. पुढें ते हायस्कुलांतून कॉलेजमध्यें गेले म्हणजे ते धर्माचरणासंबंधानें पूर्ण मुक्त असे होतात. वाटेल तर स्नानसंध्या करावी, वाटेल तर न करावी. अगोदरच वरील धर्मोक्त कृत्यांस अभ्यासापुढें वेळ सांपडत नाहीं, आणि त्यांतून सांपडलीच तर धर्मश्रद्धेची अगोदरच सामुग्री थोडी असून, तींत पुढील शिक्षणानें भर न पडतां उलटी ती हमेश कमीकमीच व्हावयाची; आणि याशिवाय नवीन इंग्रजी ज्ञानाची घमेंड, मग काय विचारतां ? नको संध्या, नको पूजा, नको सोंवळें ओंवळें, नको कांहीं; येणेंप्रमाणें धर्मशिक्षा कॉलेजांत बहुतेक नसतेच असें म्हटलें तरी चालेल. कित्येक क्लबचे क्लब ओंवळ्यांनीं आंगांत सदरा–जाकिटें घालून जेवायास बसतात ! एखादा दुसरा विद्यार्थी हट्टी असतो, तो तसाच बाकीचे विद्यार्थी ओंवळ्यांनीं बसले असतां आपण एकटाच सोंवळ्यांनीं बसतो; परंतु अशाची फटफजीती काय विचारावी ? एका विद्यार्थ्याची अशी गोष्ट सांगतात कीं, तो एके दिवशीं संध्याकाळीं जेवावयास येण्यापूर्वी त्याच्या खोडकर सोबत्यांनीं त्याच्या पाटाखालीं एक जोडा घालून ठेविला होता. मग प्राणाहुति घेऊन तो जेवावयास बसल्यावर एकजण मोठ्यानें ओरडून म्हणतो, "अरे रामभाऊ, तुझ्या पाटाखालीं काळें काय दिसतें आहे ? कांहीं सापबीप नाहीं ना? " भोळी राममूर्ति पाटाखालीं डोकावून पाहते तों खरेंच खालीं बरेंच मोठें कांहीं काळें दिसत आहे ! त्यासरसें त्यांनीं पाटावरून उडी मारून खालीं पाहिलें तों कोणाची चर्मपादुका पडली आहे ! ! बिचाऱ्या रामभाऊस त्या रात्रीं थंडा फराळ करावा लागला हें सांगणें नकोच.

येणेंप्रमाणें कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं धर्मशिक्षा फारच थोडी असे असें म्हटल्यास चालेल. कधीं कोणी आजारी असेल, किंवा विशेष थंडी पडली असेल तर सोंवळ्याकडे अंमळ कानाडोळा केला असतां कोणास त्याबद्दल वाईट वाटणार नाहीं; परंतु दररोज केवळ आळसानें पंक्तीच्या पंक्ति ओंवळ्यांनीं बसतील तर ही कांहीं अभिनंदनीय गोष्ट नाहीं असें सर्व समंजस लोक कबूल करतील. जुन्या धर्मशिक्षेचें बंधन आजच

तोडल्यानें चांगले परिणाम होतील असा संभव नाहीं. आपल्या धर्मानें जागोजाग सवडी ठेविल्याच आहेत, त्यांचा फायदा करून घेतल्यानें आपलें पुष्कळ काम होण्यासारखें आहे; आणि जे विद्यार्थी कॉलेजांत असतां ओंवळ्यानें वगैरे बसत असत तेच त्यांस पुढें जगाचें अधिक ज्ञान प्राप्त झाल्यावर व त्यांचे समज अधिक पोक्त झाल्यावर, हल्लीं जनरीतीसच अनुसरून वागतात. यावरून ते कॉलेजांत असतांना शिष्टजनसंप्रदायाविरुद्ध जें आचरण करीत असत तें सुधारणा म्हणून नव्हे, तर पोरसमजूत व हुरळेपणा यांपेक्षां अधिक दुसरें कांहीं नाहीं असें दिसून येईल.

आतां शेवटीं विष्णुशास्त्री* यांचा या वेळचा स्वभाव, त्यांचें वर्तन व विशेष संवई यांविषयीं लिहून हा भाग पूर्ण करितों. विष्णुशास्त्री यांचा स्वभाव साधा, गरीब, कोणास शब्दानें किंवा कृतीनें अगदीं न दुखविण्याचा असून आपल्यास जें कांहीं येत असेल तें मोकळ्या मनानें आपल्या स्नेह्यांस समजून सांगण्याचा असल्यामुळें त्यांविषयीं त्यांच्या स्नेह्यांचा ग्रह चांगला असे. ते कधीं वादांत किंवा तंट्यांत अगदीं पडणारे नसून मितभाषणी असल्यामुळें त्यांस कोणी कोणी आडिसनची उपमा देत. विष्णुशास्त्री यांस फारसें बोलावयास नको असे खरें, परंतु त्यांचा स्वभाव पुष्कळ अंशीं अंतर्गत रसिक व हौसी असा असे. कॉलेजमध्यें कोठें मंडळी जमून, खेळ, गाणें वगैरे चाललें असलें म्हणजे ते अभ्यास सोडून हटकून तेथें यावयाचे; मात्र त्यांत त्यांचा फारसा कार्यभाग नसून फक्त ते दूर बसून प्रेक्षक किंवा श्रोतेच असायचे.

विष्णुशास्त्री यांच्या अभ्यासाचा परिपाठ म्हटला म्हणजे साधारण दिवसां होईल तितकाच अभ्यास करावयाचा. रात्रीं ते फार बसत नसत; आणि त्यांतून परीक्षेचा लकडा मागें नसला म्हणजे स्वारी संध्याकाळीं

* फोटोग्राफमधील वरून दुसऱ्या ओळींतील उजवीकडून डावीकडील दुसरे विद्यार्थी. येथे डावीकडून उजवीकडे असें लिहिलें असतां मध्यें अर्धेमर्धेच दोन विद्यार्थी आले आहेत, त्यांच्यामुळें घोटाळा न पडावा म्हणून उजवीकडून डावीकडे असेंच म्हटलें आहे.

जेवण झाल्यावर मि० महाजनी वगैरे कोणी आले तर त्यांच्याशीं कांहीं ग्रंथगुणदोषविवेचन, कांहीं व्यक्तिगुणदोषविवेचन व कांहा नुसत्या गप्पागोष्टी यांत तासचे तास घालवीत बसायचीं; परंतु कोणी जर आलें नाहीं तर खोलींत दिवा वगैरे लावण्याची पंचाईत न करितां अंधारांतच खिडकी उघडून तींत पाय टाकून स्वस्थ कांहीं तरी गुणगुणत खुर्चीवर बसून रहावयाची !

तथापि या वेळच्या त्यांच्या अभ्यासांतील कांहीं नियमितपणा मोठा तारीफ करण्याजोगा आहे. कॉलेजांतून शनवारीं गांवांत आले म्हणजे त्यांचा असा परिपाठ असे कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठी क्रमिक पुस्तकांतून पांच ओळींचें भाषांतर संस्कृतांत लिहून त्या दिवसाची तारीख त्या खालीं लिहून ठेवायची. हा क्रम त्यांनीं तीन वर्षें एकसारखा चालविला; मध्यें भाषांतराची नेमलेली तारीख बहुतेक अगदीं चुकलेली आढळत नाहीं. तीन वर्षांअखेर पहिलीं तीन पुस्तकें संपून चौथ्या पुस्तकाचें सुद्धां कांहीं पानांचें भाषांतर झालें आहे ! या परिपाठानें त्यांस संस्कृतांत भाषांतर किंवा नवीन रचना करण्याची सफाई अधिक आली असें ते म्हणत असत.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं बी. ए. च्या वर्गांत दोन वर्षें काढलीं. या दोन्हीं वर्षीं त्यांस त्यांच्या इंग्रजींतील व संस्कृतांतील प्रवीणतेमुळें सीनिअर स्कॉलरशिप मिळाली असून शिवाय क्यांडीची मराठीची व संस्कृतची अशा स्कालरशिपाहि त्यांस मिळत होत्या; परंतु परीक्षेच्या ठरीव विषयांची व्हावी तशी तयारी त्यांच्या हांतून न झाल्यामुळें ते १८७० सालच्या अखेरीस परीक्षेंत नापास झाले. यानंतर त्यांचें कॉलेजांतील वास्तव्य संपलें. यापुढें परीक्षेचा अभ्यास ते घरींच करूं लागले. येथें विष्णुशास्त्री यांच्या आयुष्यांतील पहिला भाग जो शिक्षण-काल तो संपला.

भाग ३ रा.

अध्यापन.

The teacher excites an enthusiastic admiration among his pupils and many are there who confess that they owe to him the main bent of their lives and action and all the good that has followed them.

Teachers and Taught.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें विष्णुशास्त्री यांचा कॉलेजांतील अभ्यास संपूर्ण झाला. यापुढें ते शिक्षकाच्या धंद्यांत शिरून प्रथम कै० बावा गोखले यांच्या खाजगी इंग्रजी शाळेंत कसे गेले, त्या वेळेस त्या शाळेची स्थिति कशी होती, तेथें दोन अडीच वर्षे विष्णुशास्त्री राहिले असतां त्यांनीं काम कसें केलें, त्यानंतर पूना हायस्कुलांत सरकारी नोकरीचा योग त्यांस कसा आला, त्या वेळीं त्या हायस्कुलची स्थिति कशा तऱ्हेची होती, त्याचप्रमाणें या वेळीं विष्णुशास्त्री यांजवर वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी असून त्यांचा बोज कसा होता इत्यादि सन १८७१ पासून १८७३ सालपर्यंत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांची हकीकत या भागांत देण्याचें योजिलें आहे.

१८७१ सालच्या आरंभापासून विष्णुशास्त्री हे बी. ए. चा अभ्यास घरींच करूं लागले. त्यांचा बहुतेक अभ्यास झालाच होता; कांहीं थोडे विषय कच्चे होते ते कायते तयार करावयाचे होते. यामुळें त्यांस बरीच फुरसत असेल असें समजून कृष्णशास्त्री यांचे स्नेही कै० गोखले यांनीं त्यांस पत्र पाठवून "विष्णु यास आमच्या शाळेंत तुम्ही शिकविण्यास पाठवाल काय ?" म्हणून विचारलें. कृष्णशास्त्री यांनीं विष्णुशास्त्री यांस विचारून होय म्हणून परत उत्तर पाठविलें. यावरून विष्णुशास्त्री १८७१ सालच्या जानेवारी महिन्यापासून बावा गोखले यांच्या शाळेंत शिकवावयास जाऊं लागले.

या वेळीं बाबांची शाळा शुक्रवार पेठेंत हल्लीं जेथें म्युनिसिपल कमेटीच्या हेल्थ ऑफिसरची कचेरी आहे तेथें होती. ही शाळा सकाळींच चार तास भरत असे. येथें पहिल्या बुकापासून मॅट्रिक्युलेशनपर्यंत सर्व वर्ग मिळून तीनशें साडेतीनशें मुलें शिकत असत. सरकारी हायस्कुलापेक्षां येथील फीचा दर निम्मा होता; म्हणजे हायस्कुलांत दोन रुपये व येथें एक रुपया असा सरसकट दर असे. ही शाळा स्थापन होऊन या सुमारास सात वर्षे झालीं होतीं. हिला सरकारांतून मे. पीलसाहेब डायरेक्टर यांच्या कारकीर्दींत ग्रँटहि सुरू झाली होती. यामुळें ही शाळा त्या वेळच्या इतर खाजगी इंग्रजी शाळांपेक्षां अधिक चिरस्थाई झाली होती; तथापि सरकारी हायस्कुलाच्या तोडीस ही कोणत्याहि प्रकारें लागण्यासारखी नव्हती.

बाबा हे स्वतः चांगले हुषार, इंग्रजींत उत्तम निष्णात, चांगले वजनदार शिक्षक असत; परंतु त्यांच्या आंगचा आळस व स्वछंदीपणा या दोन दुर्गुणांमुळें त्यांच्या वरील सद्गुणांचा परिपाक फारसा चांगला उतरला नाहीं. बाबा मॅट्रिक्युलेशन वर्गास इंग्रजी शिकवीत असत. स्वारी शिकविण्यास बसली म्हणजे कांहीं कमताई नाहीं; मर्मज्ञ विद्यार्थी लागलाच प्रसन्न व्हावयाचा; परंतु इंग्रजी शिकविण्याचा तास बाबांचा दररोज एक असतांहि विद्यार्थ्यांच्या पदरांत आठवड्यांतून ते दोन तीनच पडावयाचे! बाबांच्या आंगीं जे वर दुर्गुण म्हणून सांगितले त्याशिवाय त्यांत भरती घालण्यासच जणूं काय त्यांस दोन भयंकर व्यसनें होतीं—एक निशा व दुसरें तिचेंच भावंड परदारवास—स्वारी सकाळीं मुळीं आठ वाजल्यावर निजून उठून शाळेंत यावयाची! मॅट्रिक्युलेशन क्लासाचा पहिला तास संपवून फर्स्ट असिस्टंट मास्तर दुसऱ्या वर्गावर गेले म्हणजे तेव्हांपासून मुलांनीं रस्त्यावरील माडीच्या सज्जांत बावनखणीच्या रस्त्याकडे डोळे लावून बाबांची मार्गप्रतीक्षा करीत बसावें; मग वाट पाहतां पाहतां कंटाळून जाऊन बिचारे विद्यार्थी घरीं निघून जात. कांहीं पुढें पुढें करणारे विद्यार्थी कधीं कधीं धिटाई करून अंतर्महालांत प्रवेश करून गुरूंस जागें करीत व शाळेंत येण्याची त्यांस आठवण देत. मग लहर

लागलीच किंवा वर्गास दोन तीन दिवस फाक्या दिला असला म्हणजे नाइलाज होऊन ' आलोंच ' म्हणून सांगावयाचें; परंतु बात देण्याची सवड असली म्हणजे सांगावें कीं, ' आज मला सकाळीं यावयाला फावणार नाहीं. तुम्ही सर्वजण दुपारीं चार वाजतां या. ' याप्रमाणें हिरमोड झालेले भाविक विद्यार्थी गुरूंच्या अभिवचनावर विश्वास टेऊन पुन्हां दुपारीं उन्हांतान्हांचे चार वाजतां जमत; परंतु बाबासाहेब याहि वेळीं येतील न येतील याची वानवाच असे !

पहिल्या वर्गांत विद्यार्थ्यांची संख्या साठ सत्तरपर्यंत असे; परंतु त्यांत पुष्कळ गाबाळसाबाळ मुलांचा भरणा असे. ज्यांस सरकारी हायस्कुलांत वरच्या वर्गांत चढविलें नसेल, किंवा ज्यांस तेथील कैद सोसवत नसेल, किंवा जीं बाहेर गांवांहून पुण्यास कांहीं अभ्यास, कांहीं चैन, अशाकरितां येत, अशा मुलांची येथें संख्या फार असे. सकाळीं तीन चार तास शाळेंत गेले किंवा एक तास बाबांच्या वर्गास बसले म्हणजे ज्यांस बस वाटत असे अस या वर्गांत भाविक विद्यार्थी पुष्कळ असत. शिवाय एक रुपया फी दिली म्हणजे विद्यार्थी कोणत्या वर्गांत बसूं इच्छितो, किंवा तो शाळेंत किती वेळ येतो, अभ्यास करतो किंवा नाहीं याविषयीं बाबांचा वारकावा मुळींच नसे !

ही तऱ्हा स्वतः हेडमास्तर बाबा गोखले यांची झाली. बाकी असिस्टंट मास्तर—त्यांतूनहि वरच्या वर्गांवरील तरी—बहुतेक उपरेच असत. कोणी वर्षभर, कोणी दोन वर्षें, सरकारी नोकरी मिळेपर्यंत शाळेंत काम करावयास येणारे असत. सरकारी हायस्कुलांतील मास्तरांप्रमाणें त्यांस स्थिरता म्हणून कांहींच नसे. आपणांस येथें फार दिवस रहावयाचें नाहीं म्हणून असिस्टंट मास्तरांस शाळेबद्दल विशेष कळकळ वाटत नसे. शिवाय बाबांचा स्वभावहि बराच लोभी व छांदिष्ट असल्यामुळें सरकारी ग्रँट बरीच मिळत असतां एकदोन होतकरू ग्रॅज्युएट सरकतीनें मिळवून घेऊन किंवा त्यांसच अधिक पगार देऊन शाळेला विशेष व्यवस्था किंवा दृढता आणण्याची त्यांची इच्छा नसे. सरासरी फीवर मास्तरांचा पगार भागून आपणास शाळेशिवाय इतर व्यवसाय—कोर्टांत मुखत्यारी करणें, वर्तमान-

पत्र चालविणें वगैरे—करितां येऊन सरकारी ग्रँट सर्व खिशांत पडावी असा त्यांचा बेत असे ! येणेंप्रमाणें बाबांची व त्यांच्या आसिस्टंट मास्तरांची शाळेविषयीं फारशी आस्था नसल्याकारणानें तिची स्थिति सरासरीच असे हें साहजिकच आहे. बाबांकडे मॅट्रिक्युलेशन क्लासचें इंग्लिश असून बाकी एक दोन असिस्टंटांकडे इतर विषय असत. परंतु वर्गांत चांगल्या ब्राईट मुलांची भेसळ असल्यामुळें व पुष्कळ मुलें बाबांच्या इंग्लिशविषयींच भुकेलीं असून त्यांस बाकीच्या मास्तरांचें शिकविणें किंवा बाकीचे विषय शिकण्यास नकोतसे असल्यामुळें असिस्टंट मास्तरांच्या वर्गांत मुलें बसलीं बसलीं, न बसलीं न बसलीं असा प्रकार चाले. त्याविषयीं मास्तर किंवा बाबा पर्वा करीत नसत. वर्षाच्या अखेर साठसत्तर मुलांपैकीं जीं कांहीं गरीब आस्थेवाईक असत तीं घरींदारीं अभ्यास करून म्यॅट्रिक्युलेशन परीक्षेंत सातआठ जण पास होत आणि त्यांवर शाळेचें नांव व ग्रँट हीं राहून बाबांच्या शाळेचा गाडा सरासरी चाले !

याप्रमाणें विष्णुशास्त्री या शाळेंत शिकविण्यास जाऊं लागले त्या वेळीं तिचीहि स्थिति होती. त्यांची नेमणूक मॅट्रिक्युलेशन क्लासच्या ज्या दोन तुकड्या होत्या त्यांकडे असून त्यांस संस्कृत, इतिहास, भाषांतर वगैरे शिकवावें लागे. विष्णुशास्त्री हे स्वतः सुशिक्षित, त्यांस शिकविण्याची हौस मोठी, त्यांचें शिकविणें पद्धतवार असे, चांगल्या शिक्षकाचे कित्येक मोठमोठे गुण त्यांच्या आंगीं होते; परंतु वर्गांतील ठाकठीक व व्यवस्था, छडीचा किंवा कठोर शब्दाचा खरमरीत अंमल, वगैरे शिक्षणकलेचीं अप्रधान आंगें हीं विष्णुशास्त्री यांच्या शिक्षणांत बरींच कमी असत. त्यांतून बाबांच्या शाळेंतील वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था असल्यामुळें, विष्णुशास्त्री यांच्या शिक्षणापासून त्यांच्या विद्वत्तेच्या मानानें विद्यार्थ्यांस जितका फायदा व्हावा तितका होत नसेल असें वाटतें. विष्णुशास्त्री यांचा दुसरा दुर्गुण म्हटला म्हणजे वेळेवर वर्गावर न येणें. ते कांहीं वाचीत बसले असले म्हणजे तासाची घंटा वाजली असतां चट्कन् उठून वर्गावर जातील असें बहुधा व्हावयाचें नाहीं. पंधरा वीस मिनिटें निघून जावयाचींच ! मुलें गरीब, आस्थेवाईक असतील तर विष्णुशास्त्री यांच्या शिक्षणाचें चीज होण्यासारखें

असे; नाहीं तर मुलांना धाक दाखवून त्यांच्यापासून धडे चोपून घेण्याचें काम त्यांच्या हातून होत नसे.

येणेप्रमाणें विष्णुशास्त्री हे सकाळीं बाबांच्या शाळेंत शिक्षकाचें काम करून दुपारीं बी. ए. च्या परीक्षेचा अभ्यास करीत. तथापि पहिल्यापासून त्यांना गणिताचा जो कटाळा असे तो कायमच होता. शेवटीं नाइलाज होऊन ते दुपारच्या वेळीं शेजारींच त्यांचे स्नेही कै० गणेश परशुराम जोशी यांच्या घरीं स्ट्याटिक्स* हें समजावून घेण्याकरितां जात. सरतेशेवटीं जेमतेम करून या वर्षाअखेर तें एकदांचे डिग्रीच्या परीक्षेंतून पार पडले!

याच सालीं पुण्यास तीन नवीन गोष्टींचा आरंभ झाला. एक वक्तृत्वोत्तेजक सभा, दुसरी डेक्कन कॉलेज ग्यादरिंग व तिसरी डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे नाटकप्रयोग. यांत पहिली संस्था आज २२ वर्षें बरीच चांगली चालली आहे. तिजविषयीं येथें विशेष कांहीं लिहिण्यासारखें नाहीं; कारण तिजशीं विष्णुशास्त्री यांचा संबंध केवळ एक नियमित श्रोता यापेक्षां अधिक नसे. दुसरी संस्था डेक्कन कॉलेज ग्यादरिंग. हिची प्रथम कल्पना कै० विष्णु परशुराम रानडे यांनीं काढली. हीहि संस्था आजकाल चालू आहे; परंतु तिचा उत्कर्ष दिवसेंदिवस कमी कमी आहे. जुन्या व नव्या कॉलेजबंधूंची भेट होऊन स्नेहभाव वाढावा हा जो मूळचा ह्या संस्थेचा स्तुत्य उद्देश तो एक दिवसाच्या गांठीनें व एकत्र जेवल्यानें फारसा सिद्ध होत नाहीं. शिवाय सुट्टीचे दिवस असल्यामुळें पुष्कळ मंडळी आपापल्या गांवीं जाते. अशा कित्येक अडचणीमुळें ग्यादरिंग चांगलें उदयास येत नाहीं. विष्णुशास्त्री हे या ग्यादरिंगला हरहमेश जात असत. जेथें पांचपंचवीस लोक जमून कांहीं चालत असेल तेथें हे गेल्यावांचून कधीं रहावयाचे नाहींत; तथापि त्यांच्या निबोल्या व सभाभीरु स्वभावामुळें ते पुढल्या मंडळींत जात नसत; काय होईल तें दुरून पहावें व ऐकावें यापेक्षां त्यांचा या कामांत भाग नसे.

* हा विषय पुष्कळ विद्यार्थ्यांस त्रास देऊन तो अखेर सन १८८९ सालीं बी. ए. च्या अभ्यास क्रमांतून कमी केला गेला.

आतां तिसरी गोष्ट—संस्कृत नाटक प्रयोग—हिजविषयीं विष्णुशास्त्री यांचा अधिक उल्हास असे. या सालीं वेणीसंहार नाटकाचा प्रयोग डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं केला. यांत प्रमुख मंडळी मि० सखाराम रामचंद्र किर्लोस्कर, * कोंडोपंत छत्रे, व गोविंदराव जोगऽ ही होत. ह्या तिघांनीं अनुक्रमें भीम, दुर्योधन, व अश्वत्थामा यांच्या भूमिका घेतल्या होत्या. ह्या तिघांचे भाग उत्तम साधले होते व त्यांतून अश्वत्थाम्याच्या भागाची तर कमालच झाली! पांचव्या अंकांत दुर्योधनाच्या वधानें आपली घोर प्रतिज्ञा पूर्ण करून सर्व अंग रक्तानें भरलेला व भोंवतालील लोकांस भूत, पिशाच किंवा राक्षस यांची आपल्या भयंकर वेषानें भीति उत्पन्न करीत आणि गंभीर व भयंकर शब्दानें याज्ञसेनीचा शोध करणारा असा भीमसेन पडद्यांतून बाहेर आलेला पाहून प्रेक्षक समुदाय क्षणभर भयचकित व तटस्थ होऊन गेला. त्याचप्रमाणें दुसऱ्या अंकांत दुर्योधनमहाराज आपली प्रिया दुःस्वप्नानें अस्वस्थ झाली असून त्याच वेळीं मोठें वादळ सुटल्यानें ती त्यानें अगदीं भिऊन जाऊन महाराजांच्या आंगावर पडली असतां महाराजांनीं शृंगारवीरमिश्रित अशा मधुर व बहारदार पद्यांनीं तिचें चित्त स्वस्थ करून तिला उपवनमंदिरांत हळूहळू नेलें हा खुबीदार प्रयोग उत्तम रीतीनें वठला जाऊन श्रोतृसमूह कांहीं वेळ आनंदांत तन्मय होऊन गेला. त्याचप्रमाणें तिसऱ्या अंकांत कर्णाबरोबर द्रोणपुत्राची झटापट लागून एकास एकीएढून दुर्योधनराजा व दुसऱ्यास दुसरीकडून त्याचा मातुल कृप आवरून धरीत असतां द्रोणपुत्र अनावर होऊन पितृनिंदक जो अंगधिप त्याजवर धांवू पाहतो आहे, इतक्यांत तो देहावसानहि विसरून जाऊन त्याच्या डोक्यास गुंडाळलेला शालपट सहजरित्या निसटून सर्व केशकलाप उघडा पडला व त्याजबरोबर प्रेक्षकसमुहाच्या टाळ्यांचा गजर उडाला!!

* दुसऱ्या भागांतील फोटोग्राफमधील वरून दुसऱ्या ओळींतील उजवीकडून डावीकडील दुसरे विद्यार्थी.

ऽ दुसऱ्या भागांतील फोटोग्राफमधील वरून पहिल्या ओळींतील डावीकडून उजवीकडील अकरावे विद्यार्थी.

या प्रयोगांत विष्णुशास्त्री यांजकडे धर्मराजाची भूमिका होती. पांचव्या अंकांत दुर्योधनमित्र जो चार्वाक राक्षस त्याच्या तोंडून भीमसेनाचा वध झाला ही खोटी बातमी ऐकून आतां जगून कांहीं उपयोग नाहीं असें समजून धर्मराजा अग्निप्रवेश करण्याची तयारी करून पितृतर्पण करितो आहे त्याप्रमाणें विष्णुशास्त्री यास समोर कृष्णशास्त्री प्रेक्षक जनांत बसले असतांना त्यांच्यापुढें हा पितृतर्पणविधि करतांना पाहून कांहीं ओळखीच्या मंडळींनीं बराच हंशा पिकविला!

मागें सांगितल्याप्रमाणें विष्णुशास्त्री हे बी. ए. च्या परीक्षेंत उतरल्यामुळें त्यांस आतां बरेंच हलकें झाल्यासारखें वाटलें. किताबावांचून लोकांत फारशी प्रतिष्ठा नाहीं असें त्यांस वाटत असे. तो प्राप्त झाल्यावर आतां आपणास आवडेल त्या विषयांचें हवें तितकें अध्ययन करण्यास आणि देशभाषेंत ग्रंथरचना करण्यास अवकाश पुष्कळ सांपडेल म्हणून त्यांस फार आनंद झाला. आपणाकडील पुष्कळ मंडळी बी. ए. झाल्याबरोबर तिच्या पुढील पायरी जी एल्एल्. बी. तिच्या चढणीच्या तयारीस लागतात, त्याप्रमाणें करण्याचें विष्णुशास्त्री यांनीं मुळींच मनांत आणिलें नाहीं. त्यांच्या मनानें यापूर्वींच बी. ए. पर्यंतच अभ्यास संपविण्याचा निश्चय केला होता. यापुढें कायद्यांच्या परीक्षेच्या पंचाईतींत न पडतां इंग्लंडमध्यें ॲडिसन्, जॉन्सन्, मेकाले यांनीं ज्या व्यासंगांत आपलें आयुष्य घालविलें त्यांतच आपणहि घालवावें असा त्यांनीं संकल्प केला होता. त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांनीं त्यांना मधून मधून कित्येक वेळां इतर होतकरू विद्वान लोकांप्रमाणें एल्एल्. बी. च्या किंवा मुनसफीच्या परीक्षेचा अभ्यास करून पैसा व स्वतंत्रता हीं दोन्हींहि मिळविण्याचा मार्ग सुचविला; परंतु त्यांनीं चिरंजीवास त्याबद्दल आग्रह केला नाहीं. विष्णुशास्त्री यांच्या मनांत वकीलीच्या धंद्याविषयीं व एकंदर कायद्यांच्या अभ्यासाविषयीं फार अप्रीति असे; व यांत त्यांचें कांहीं स्वभाववैचित्र्य व कांहीं दुराग्रह हीं दोन्ही मिश्रित होतीं. असो. एकंदरींत मराठी भाषेविषयीं नवीन विद्वान लोकांमध्यें जी अनास्था दृष्टीस पडते ती दूर करून तींत ग्रंथरचना करून देशसेवेचें जें प्रधान अंग—कीं

देशभाषा प्रगल्भ दशेस आणणें—तें यथाशक्ति करण्याचा विष्णुशास्त्री यांनीं निश्चय केला.

मराठी शाळापत्रकाचें काम कृष्णशास्त्री यांजकडे सन १८६५ पासून होतें. तें त्यांनीं तीन साडेतीन वर्षें एकट्यांनींच चालविलें होतें. त्यांत त्यांनीं ' मराठी व्याकरणावरील निबंध ' व ' रासेलस ' चें भाषांतर हीं दोन्हीं चालविलीं होतीं रासेलसच्या भाषांतराचे अठरा वीस भाग झाल्यावर सन १८६८ सालीं कृष्णशास्त्री यांनीं भाषांतराचे पुढील भाग चिरंजीवास करितां येतील कीं नाहीं म्हणून पाहण्याकरितां त्यांस दोन भागांचें भाषांतर करून आणण्यास सांगितलं. तें कृष्णशास्त्री यांस पसंत पडून पुढील राहिलेलें भाषांतर त्यांनीं चिरंजीवावरच सोंपविलें! या वेळेपासून शाळापत्रकांत विष्णुशास्त्री यांचा थोडाबहुत हात असेच. पुढें त्यांनीं डिग्री मिळविल्यावर त्या पत्रकाचें सर्वच काम त्यांजकडे आलें.

येणेंप्रमाणें आपला मजकूर छापण्यास आयतेंच स्थळ मिळाल्यामुळें विष्णुशास्त्री यांनीं आपला मराठी ग्रंथरचना करण्याचा संकल्प ज्या महिन्यांत त्यांस डिग्री मिळाली त्याच महिन्यापासून तडीस नेण्यास कंबर बांधिली. या वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या अंकांत ' संस्कृत कवि ' नामक टीकाग्रंथास त्यांनीं आरंभ केला. तो महिन्याच्या महिन्यास थोड-थोडा बाहेर पडत जाऊन दोन वर्षांअखेर पांच मुख्य मुख्य कवींचीं चरित्रें छापून निघालीं. यांत अनुक्रमें कविकुलगुरु कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु व दंडी या कवींची मिळेल तितकी माहिती देऊन नंतर त्यांच्या काव्यग्रंथांचें परीक्षण केलें आहे. या पुस्तकाची भाषा सुबोध, प्रौढ व मार्मिक अशी आहे. यांत वरील कवींचे गुणावगुण दाखवून त्यांच्या स्पष्टिकरणार्थ त्यांतील उत्कृष्ट उतारे दिले आहेत. कांहीं कवींचा काल-निर्णयहि करण्याचा यत्न केला आहे. कालांतरानें संस्कृत भाषेच्या स्वरूपांत, तींतील कवींच्या कल्पनेंत, त्याचप्रमाणें विद्वान लोकांच्या काव्यरुचीच्या समजुतींत जो फरक पडत गेला आहे तो येथें दाखविला आहे. त्याचप्रमाणें आपल्या देशांत ज्या कांहीं राज्यसंबंधीं व धर्मसंबंधीं मोठमोठ्या उलाढाल्या प्राचीन काळीं होऊन गेल्या त्यांबद्दल वरील कांहीं

कवींनीं मधून मधून कसे उल्लेख केले आहेत हेंहि या पुस्तकांत दर्शविलें आहे. या पुस्तकांत विष्णुशास्त्री यांनीं संस्कृतज्ञ पाश्चिमात्य पंडितांच्या मतास योग्य मान द्यावयाचा तो दिला आहेच;परंतु जेथें जेथें त्यांचा मतभेद झाला आहे तेथें तेथें त्यांनीं स्वतंत्रपणें आपले विचार प्रदर्शित केले आहेत. वासवदत्ता कादंबरीचें प्रकाशन करतांना डॉ. हॉल यांची सुबंधूविषयीं कोठें कोठें आदरबुद्धि कमी होऊन साहेबमजकुरांनीं स्वतःच्या लोकांचाच तोरा मिळविण्याचा जेथें जेथें यत्न केला आहे तेथें तेथें विष्णुशास्त्री यांनीं मजबूत प्रमाणें देऊन तो तोरा मोडून टाकून सुबंधु कवींची वास्तविक योग्यता उज्ज्वलित करण्याचा यत्न केला आहे. एकंदरींत संस्कृत कवींचें अध्ययन करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांस हें 'संस्कृत कवि' नामक पुस्तक त्यांतील प्रौढ भाषा व मार्मिक विचार हे वाचून बरेंच आवडण्यासारखें आहे.

सन १८७१ सालच्या शेवटीं शेवटीं पूना हायस्कुलाचे हेडमास्तर मि० जेकब हे रजेवर जाऊन त्यांच्या जागीं कै० महादेव मोरेश्वर कुंटे यांची नेमणूक झाली. हे पुण्यास येण्यापूर्वी त्यांनीं एज्युकेशन रेकॉर्डमध्यें पाणिनिविषयीं कांहीं मजकूर म्हणून लिहितांना प्रो० भांडारकर यांच्या संस्कृत पुस्तकांवर कांहीं अप्रयोजक टीका केली होती तिजवरूनच कायती त्यांची थोडी माहिती पुण्यांतील विद्वान लोकांस होती. पुढें हे हेडमास्तर बनून आले तेव्हां त्यांची इंग्रजी बोलण्याची सफाई, चंचल मुद्रा व पुण्यांतील मोठमोठ्या पुढारी लोकांविषयींचे त्यांचे अनादरबुद्धीचे उद्गार यांवरून पुणेंकर मंडळीस प्रथम हें कांहीं प्रचंड धेंड आहे असें वाटलें ! पुढें महिना दोन महिन्यांनीं त्यांचा जसजसा अधिकाधिक परिचय होत चालला तसतसें त्यांचें खरें स्वरूप लोकांच्या चांगलें लक्षांत येऊं लागलें. त्यांची अनेक विषयांसंबंधीं चमत्कारिक मतें, त्यांची निर्भिड व लोकमताविरुद्ध विलक्षण वागणूक, शाळेंतील मुलांशीं सलगी—त्यांजबरोबर जिन्यांतून जातांना चेंगराचेंगरी, कोणत्याहि शरीरावयवाचा निःशंकपणें उच्चार करणें, मुलांच्या करमणुकीकरितां असिस्टंट मास्तरांच्या चालण्याचा, बसण्याचा, बोलण्याचा फार्स करून दाखविणें—इत्यादि विलक्षण गुणांनीं

मि० कुंटे लवकरच लोकांच्या टीकेस प्रधान विषय होऊन बसले ! कोणी ज्ञानप्रकाशांत ' पढत मूर्ख ' या सहीच्या पत्रांत तर कोणी ' मी कोण व माझें नांव काय ? ' अशा शिरोलेखाखालीं मि० कुंटे यांस अनुलक्षून त्यांच्या वर्तनांतील लाजिरवाणें दोष काढून त्यांची पुष्कळ शोभा केली. त्याचप्रमाणें त्या वेळच्या ' लोककल्याणेच्छु ' वर्तमानपत्रांतहि मि० कुंटे यांच्या विरुद्ध मजकूर बहुतेक दर आठवड्यास येऊं लागला. पुण्यास येण्यापूर्वी मि० कुंटे यांनीं ' राजा शिवाजी ' नामक एका बड्या वीररस-प्रधान काव्यास आरंभ करून त्याचे दोन सर्ग छापून बाहेर काढिले होते. पुढें पुण्यास आल्यावर त्यांनीं वीररसप्रधान कवीची वीणा अमळ एकीकडे ठेऊन ' मना ' सारख्या गहन विषयाकडे भरारी मारली !

मि. कुंटे यांचे ' मन ' या लहान मराठी कवितेवर विष्णुशास्त्री यांनीं आपलें पेन उचललें आणि ज्ञानप्रकाशांत इंग्रजींत ' A poet turned a philosopher' या शिरोलेखाखालीं त्यांनीं आपले भावी हेडमास्तर यांच्या कवनावर बरीच चरचरीत टीका केली. विष्णुशास्त्री यांनीं मराठींत पुष्कळ लिहिलें आहे; परंतु इंग्रजींत असा त्यांनीं दोनच वेळ वर्तमानपत्रांत मजकूर लिहिला आहे; त्यांपैकीं हा पहिला होय. यांतील भाषा जरी इंग्रजी आहे तरी त्याची चटकदार भाषासरणी, मार्मिकपणा व कांहीं अंशीं एक तर्फेनें लिहिण्याची तऱ्हा हीं सर्व मालाकाराचींच आहेत !

पुढील सालच्या म्हणजे १८७३ च्या आरंभीं पूना हायस्कुलांत तिसऱ्या असिस्टंट मास्तरची जागा रिकामी झाली. तिजवर तुम्ही " कृष्णशास्त्री यांच्या मुलास घेतां का ? " म्हणून विद्याखात्याचे डायरेक्टर मि० चाटफील्ड यांनीं मि० कुंटे यांस लिहिलें. मि० कुंटे यांनीं विष्णुशास्त्री यांस बोलावून आणून त्यांस डायरेक्टर साहेबांच्या पत्राचा उल्लेख वगैरे न करतां म्हणाले, " आमच्या शाळेंतील थर्ड असिस्टंट मास्तरच्या रिकाम्या जागेबद्दल तुम्ही खुषी असाल तर तुमची आम्ही डायरेक्टर साहेबांकडे शिफारस करून पाठवितों. " विष्णुशास्त्री यांनीं बरें म्हणून म्हटलें. पुढें लवकरच ही मेहेरबानी मि० कुंटे यांची

नसून तिच उगम याहूनहि वरच्या शिखराचा आहे अशी वातमी ऑफिसांतून बाहेर पडली ! मि. चाटफील्ड साहेबांचा कृष्णशास्त्री यांवर बराच लोभ असे. शास्त्रीबोवांच्या विद्वत्तेबद्दल मि. हावर्ड, ग्रांट, पील वगैरे मोटमोठ्या साहेबांचें चांगलें मत असे. मि. चाटफील्ड साहेब १८७२ सालीं कृष्णशास्त्री यांच्या घरीं रिपोर्टरचें ऑफीस पाहण्याकरितां आले होते. त्या वेळीं साहेबमजकूर शास्त्रीबोवांच्या गृहस्थितीविषयीं कुशल प्रश्न विचारीत असतां त्यांस समजलें कीं, शास्त्रीबोवांचे वडील चिरंजीव नुकतेंच बी. ए. पास झाले आहेत, तेव्हां साहेबांनीं ' मुलगा चाकरी धरीत नाहीं कां ? ' म्हणून विचारिलें असतां ' तो तूर्त एम. ए. चा अभ्यास करीत असतो, चाकरीचा अद्याप निश्चय नाहीं ' म्हणून शास्त्रीबोवांनीं उत्तर दिलें या गोष्टीची आठवण ठेवून पुण्यांतल्या पुण्यांत जागा असून चांगली सोईची आहे अशा समजुतीनें मि० चाटफील्ड साहेबांनीं कृष्णशास्त्री यांस संतुष्ट करण्याकरितां विष्णुशास्त्री यांस हायस्कुलांत स्वतः होऊन जागा दिली ही साहेब मजकुरांची मोठीच कृपा म्हणायाची.

मि० कुंटे यांची नेमणूक पूना हायस्कुलावर झाली असतां त्यांची स्थिति कशी झाली असेल याची कल्पना वर जो आम्हीं मजकूर लिहिला आहे त्यावरून साधारण होण्यासारखी आहे. पुण्यांतील विद्यार्थी म्हणजे पहिल्यापासूनच हुषार, तरतरीत; परंतु चावट व टवाळ अशाविषयीं त्यांची ख्याति ! नावडत्या मास्तरांच्या खुर्च्यांचे वेत कापून ठेवणें, त्यांच्या अंगरख्यास म्हाताऱ्या किंवा कुत्रीं चिकटविणें वगैरे माकडचेष्टा त्यांच्या नेहमीं मधून मधून चालू असावयाच्याच. सन १८७० सालीं मि०जेकब साहेबांच्या कडकडीत अंमलाखालीं मॅट्रिक्युलेशन वर्गांतील कांहीं उनाड व द्वाड मुलांनीं दोन चार बाकें मोडून टाकल्यावरून विद्यार्थ्यांचा आणि हेडमास्तर यांचा बेबनांव होऊन परीक्षेच्या ऐन संधानांत सत्तर ऐशी मुलें पहिल्या वर्गांतून शाळा सोडून निघून गेलीं व शेवटीं मि० पीलसाहेब डायरेक्टर ह्यांनीं मध्यें पडून विद्यार्थ्यांची व हेडमास्तर यांची तडजोड पाडली. या गोष्टीची आठवण पुण्यांतील बऱ्याच लोकांस अझून असेल ! अगोदर हायस्कुलांतील विद्यार्थी अशा तऱ्हेचे आणि त्यांतून

त्यांजला शिस्त लावण्यास व विद्यादान करण्यास मि० कुंटे यांच्या सारख्यांची योजना! मग काय विचारतां? मि० करख्याम मि० जेकब यांच्या वेळची शाळेंतील शिस्त व व्यवस्था मि० कुंटे यांच्या तऱ्हेवाईक वागणुकीनें कोठें सांधींकोपऱ्यांस जाऊन दडली ती अझूनहि परत आली कीं नाहीं याचा संशयच आहे!

मि० कुंटे हे मोठे विद्वान खरे, कदाचित् आमच्या विद्वान लोकांत त्यांच्या इतका वाचलेला, त्यांच्या सारखा इंग्रजींत चटकदार लिहिणारा, त्यांच्या सारखा तात्काल स्फूर्तीनें आवेशयुक्त व श्रोतृजन एकदम थक्क करून टाकणारा असा वक्ता सांपडणेंहि कठिण आहे. तसेंच मि० कुंटे यांचा विद्येविषयीं अव्याहत व्यासंग, बरेंच वय झालें असतांहि संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू करून ' षड्दर्शनचिंतनिके ' सारखें पुस्तक चालविण्यापर्यंत मजल पोहोंचविणें, शिवाय अलीकडे अलीकडे कांहीं गृहविपत्तीनें त्यांचें चित्त व्यग्र झालें असतांहि देशी कलाकौशल्याविषयीं नुसती कोरडी हकाटी न करितां पेन्सिलींचा कारखाना काढून आपल्या अंगाला व द्रव्याला झीज लावून घेणें या त्यांच्या पुष्कळ प्रशंसनीय गोष्टींबद्दल आम्ही त्यांस पूर्ण चाहतों; परंतु त्यांच्याकडे पूना हायस्कूलचें अधिपत्य जें सुमारें सोळा सतरा वर्षें होतें त्या काळांत त्यांच्या विद्वत्तेपासून शाळेस फायदा थोडा व नुकसान फार झालें असें कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. त्यांची नेमणूक शाळेवर न होतां एखाद्या ऑफिसवर होती तर त्यांच्या पुष्कळ अमोलिक गुणांचें सार्थक झालें असतें असें आमचें मत आहे. परंतु पुणेंकरांच्या नाशिबानें ते त्यांच्या हायस्कूलच्याच वांट्यास आले! पुणें शहरांतील विद्यार्थ्यांच्या आंगीं जो एक तऱ्हेचा उद्दामपणा, टवाळपणा, मोठमोठ्या लोकांविषयीं अनादरबुद्धि व कोणत्याहि सभा किंवा व्याख्यानप्रसंगीं घोंटाळा करून देण्याची हौस दृष्टीस पडते यांचें बरेंच श्रेय मि० कुंटे यांजकडे येण्यासारखें आहे.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री पूना हायस्कुलांत शिक्षक होऊन गेले त्यावेळची त्या शाळेची ही स्थिति होती. या वेळीं या शाळेंत निरनिराळ्या तऱ्हेचे मास्तर होते. त्यांत कांहीं विष्णुशास्त्री यांच्या मागले व कांहीं त्यांच्या

बरोबरीचे असे होते. त्या वेळची मुख्य मुख्य मंडळी म्हणजे मि० द्वारकानाथ राघोबा, नाना घाटे, कृष्णाजीपंत गाडगीळ, बळवंतराव सहस्रबुद्धे, शेंडेशास्त्री व विनायकराव क्लार्क हे होते. यांपैकीं विष्णुशास्त्री यांचें विशेष रहस्य त्यांचे गुरु नाना घाटे व सहाध्यायी कृष्णाजीपंत गाडगीळ यांजबरोबर असे; बाकीच्या मंडळीबरोबर ते साधारण बेताबातानेंच असत. नाना घाटे मोठे खुबीदार व चाणाक्ष म्हणून विष्णुशास्त्री त्यांची तारीफ करीत असत. त्यांजविषयीं ते वरील गुणाबद्दल एक दोन गोष्टी सांगत असत. ते म्हणाले, ' कुंटे यांचा शाळेंतील बेबंदी अंमल; घरीं कांहीं काम असलें तर विचारून जाण्याची कांहीं सोय नसे. तेव्हां नानांनीं युक्ति करावी कीं, वर्गांत खुर्चीवर धोतर ठेवून देऊन खुशाल एक दोन चकरें गांवांतून मारून यावीं ! ' खुर्चीवर धोतर असल्यावर नाना शाळेंतच कोठें तरी आहेत असा समज सहजच व्हावयाचा !

" त्याचप्रमाणें कर्नल वॉडिंगट्न साहेब हायस्कुलची वार्षिक परीक्षा संपविल्यावर शेवटीं क्लासांतील एक्सरसाईज बुकें मास्तरांनीं कशीं तपासलीं आहेत हें पाहण्याकरितां तीं सर्व वर्गांचीं मागवीत असत. मग साहेबांची तपासणी होऊन कोणांस Exercise books kept very shabbily कोणांस not corrected carefully व कोणांस तर corrected for the worse याप्रमाणें परीक्षेचा तीर्थप्रसाद वांटला जावयाचा ! या प्रसंगीं नानांचा धूर्तपणा वेगळाच. त्यांनीं पाहिलें कीं, वीस बावीस वर्गांच्या एक्सरसाईज बुकांचे गठ्ठेच्या गठ्ठे जावयाचे, त्यांत एक दोन गठ्ठे चुकल्यास काय दाद लागावयाची आहे ? मग स्वारींनीं इतर मास्तरांबरोबर आपला गठ्ठा ऑफिसपर्यंत नेऊन कांहीं विसरल्यासारखें करून गठ्ठा परत मुकाट्यानें टेबलांत आणून टाकून द्यावयाचा ! " जेथें कामाची बरोबर परीक्षा नाहीं तेथें धूर्त मनुष्य अशीच कांहीं तरी सोय काढीत असतो.

विष्णुशास्त्री यांच्या विशेष रहस्याचे दुसरे असिस्टंट मि० गाडगीळ हे होत. हे गृहस्थ स्वभावानें मोकळे, निर्भिड व हौशी असल्यामुळें त्यांच्याशीं विष्णुशास्त्री यांचें चांगलें जुळत असे. गाडगीळ यांनीं विष्णुशास्त्री यांस

ते शाळेंत येण्यापूर्वी मि० कुंटे यांच्या मौजेच्या मौजेच्या घडून आलेल्या गोष्टी सांगाव्या; व पुढेंहि हेडमास्तरांच्या कुचेष्टा सांगण्यांत व ऐकण्यांत या दोघांस विशेष हौस असे. शिवाय नवीन मंडळीचे धर्मपंथ, त्यांच्या विलक्षण समजुती वगैरे गोष्टींबद्दल या दोघांचीं मतें बरींच सारखीं असत.

विष्णुशास्त्री यांच्या शिकविण्याच्या पद्धतीविषयीं मागें लिहिलेंच आहे. त्याविषयीं येथें अधिक लिहिण्याची गरज नाहीं. या वेळीं त्यांचें आणि मि० कुंटे यांचें बरेंच साधारण सूत होतें; यामुळें विष्णुशास्त्री यांच्या शिक्षणक्रमांत पुढें जो कांहीं खोडसाळपणा उत्पन्न झाला तो अझून उत्पन्न झाला नव्हता. आपणाकडून होईल तितकें ते शिकविण्यास कधीं कमी करीत नसत; तथापि ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं, त्यांस या वेळीं इंग्रजी, इतिहास वगैरे मुख्य मुख्य विषय शिकविण्याची संधि नसल्यामुळें त्यांच्या विद्वत्तेचें जितकें तेज पडावें तितकें पडत नसे.

याच सालीं मे महिन्यांत डेक्कन कॉलेजांतील मंडळींनीं संस्कृत मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग केला. यांत पहिल्या प्रयोगापेक्षां जास्त मोठमोठी मंडळी पडली होती. पहिल्या प्रयोगांतील प्रमुख गृहस्थ मि० किर्लोस्कर व छत्रे हे यांतहि असून त्यांशिवाय मि० काथवटे, महाजनी वगैरे मंडळींनीं भूमिका स्वीकारून या खेळास विशेष भूषित केलें होतें. या प्रयोगांत शर्विलकाचा भाग कै० चौबळ* यांनीं व मैत्रेयाचा भाग मि० आगाशे यांनीं फार चांगला केला. याशिवाय पांचव्या अंकांत चोहोंकडे आकाश मेघानें व्याप्त होऊन बलाकापंक्ति इकडून तिकडे उडत जात असतां भगवान् विष्णूच हातांत शुभ्र शंखावली घेऊन आकाश आक्रमून जात आहे असा भास उत्पन्न होत आहे अशा रम्य संध्याप्रसंगीं मदन-वेदनेनें विव्हल व आपल्या प्रियाच्या दर्शनासाठीं उत्सुक झालेली अशी वसंतसेना, मागें दासीनें मोठी छत्री धरली आहे व बरोबर आपला वीट घेतला आहे अशी पडद्याबाहेर पडून उभयतांनीं सभोंवतालील रम्य

---

* फोटोग्राफमधील वरून चौथ्या ओळींतील डावीकडून उजवीकडील नववे विद्यार्थी.

देखाव्याच्या वर्णनपर जीं सुरस पद्यें म्हटलीं तीं ऐकून श्रोतृसमुदाय क्षणभर आनंदांत तल्लीन होऊन गेला ! त्याचप्रमाणें वसंतसेनेला राजशालकानें मारलेलें पाहून विटानें केलेला शोक, जुवेबाज मंडळींची झगड, मैत्रेयाची खुबीदार मस्करी, राजशालकाची बौद्धधर्मी यतीबरोबर दांडगाई, शेवटीं वधस्तंभाजवळ चारुदत्ताची व त्याच्या पुत्राची गांठ पडली असतां शोकरसाची कमाल हे सर्व भाग फार उत्कृष्ट साधले होते. या प्रयोगांत विष्णुशास्त्री यांजकडे न्यायाधिशाची भूमिका होती. ती त्यांच्या स्वभावास अनुकूल असल्यामुळें तीहि साधारण बरी वठली गेली.

या सालच्या अखेरीस मि० द्वारकानाथ रावोबा यांची बदली मुंबईस झाल्यामुळें त्यांची जागा पुन्हां मि० चाटफील्ड साहेबांच्या मेहेरबानीनें विष्णुशास्त्री यांस कांहीं खटपट करावी न लागतां मिळाली. या जागेकरितां मि० भिडे म्हणून कोणी नुकतेच एम्. ए. पास झालेले गृहस्थ होते त्यांची डॉक्टर कीलहार्न साहेब शिफारस करण्याकरितां गेले असतां कीलहर्न साहेबांनीं भिडे यांची चिपळुणकरापेक्षां एक परीक्षा अधिक उतरली आहे असें सुचविलें; परंतु मि० चाटफील्ड यांनीं उत्तर केलें, ' चिपळुणकर हा एम्. ए. पास झाला नसेल, परंतु त्याच्या लायकीची मला खात्री आहे. ' येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांस त्यांनीं डायरेक्टर साहेब बहादुरांचें पुरतें तोंडहि पाहिलें नसतां नुसत्या वडिलांच्या नांवावरच प्रथम नोकरी व नंतर लवकरच बढतीहि या सालांत मिळाली.

आतां शेवटीं विष्णुशास्त्री यांचें छोटेखानी आप्त--मित्र- मंडळ ज्याची हकीकत मागें पहिल्या भागांत आपण १८६५ पर्यंत आणून पोंचविली आहे त्याचा पुढील चरित्रभाग त्या सालापासून १८७३ पर्यंत सांगणें राहिला आहे तो सांगून हा भाग पुरा करितों.

सीतारामपंत यांचे वडील हरिपंतमामा हे १८६५ सालीं वारले म्हणून मागें सांगितलेंच आहे. यावेळीं सीतारामपंतांचें वय सुमारें तेरा वर्षांचें होतें. हरिपंतमामांचा जो थोडाबहुत वचक होता तो नाहींसा झाल्यावर सीतारामपंतांस आळा कायतो त्यांच्या आईच्या उपदेशाचा किंवा ममतेचा

हाच उरला. पुढें हळुहळू त्यांस समजूं लागलें तसें बाळपणच्या त्यांच्या माराहाण्या कमी झाल्या; परंतु मूळचा छांदसपणा, डामडौलाची आवड व आपमतलबाविषयीं दृष्टि हीं त्यांची कायमच राहिलीं. त्यांस शाळेंत स्कॉलरशिप वगैरे मिळून जे पैसे मिळत ते त्यांनीं स्वच्छंदपणानें हवेतसे नासून टाकावे. दिवाळींत पांच पांच रुपयांची दारूच उडवावी; परंतु त्यांतील एक फटाकीहि दुसऱ्यांस देऊं नये. सर्व आपणच उडवून टाकावे! त्याचप्रमाणें दुसऱ्यांपासून काम चोपून घेण्याची त्यांची कांहीं हद्द असे. या वेळीं कृष्णा म्हणून कोणी विद्यार्थी घरीं जेऊन असे. त्याजकडून धड्याचा अर्थ सांगण्याच्या लालुचीनें रात्रीं आपला बिछाना घालवून घेऊन व कधीं कधीं पादसंवाहनहि करून त्यांनीं घ्यावें व पुढें इतक्या श्रमाचा मोबदला—धड्यांचा अर्थ सांगणें—त्याची पाळी आली म्हणजे गुरूंनीं बिछान्यावर पडून शिष्यास वाचावयास सांगावें. दोन तीन वाक्यें न होताहेत तोंच गुरुजी कुशीस वळायचे. बिचारा कृष्णा इकडे वाक्य वाचून छोटेखानी गुरुजी अर्थ सांगतील म्हणून स्तब्ध होऊन पाहतो तों ते कुशीस वळून घोरावयासहि लागले आहेत. मग सीतारामपंत, सीतारामपंत म्हणून त्या भाविक शिष्यानें दोन तीन हाका मारून—अधिक मारिल्यास कदाचित् स्वारी रागावेल या भीतीनें—खांकेस बुकें मारून उठून जावें!

येणेंप्रमाणें सीतारामपंताच्या वाईट बाजूंविषयीं झालें; परंतु दुसरीकडील बाजूकडे वळलें असतां त्यांच्या आंगची बुद्धि व धिटाई यांचें तेज दिवसानुदिवस अधिकाधिक पडूं लागलें होतें. हे प्रथम संस्कृत शिकत होते; परंतु पूना हायस्कुलांत मि. जेकब यांची १८६७ सालीं नेमणूक होऊन त्यांनीं तेथें लॅटिन भाषा शिकविण्यास सुरवात केली असल्यामुळें सीतारामपंत हे संस्कृत सोडून लॅटिन शिकूं लागले. तींत ते लवकरच इतके प्रवीण झाले कीं, त्यांजवर मि. जेकब साहेबांची मोठी मर्जी बसली. सीतारामपंतांनीं यूरोपियनावर उत्कृष्ट छाप प्रथमच बसविली असे मि० जेकब साहेब हे होत.

यानंतर सन १८६८ सालीं सीतारामपंत हे मॅट्रिक्युलेशनची परीक्षा

पास होऊन पुढील सालापासून ते कॉलेजांत जाऊं लागले. तेथें ते एक वर्षभर राहिल्यानंतर त्यांस अपस्मार वायूचा विकार सुरू झाला. त्यांनीं आदल्या रात्रीं जागरण केलें म्हणजे दुसऱ्या दिवशीं ते निजून उठले म्हणजे त्यांस हटकून घेरी येई. परंतु त्यांचा असा कांहीं चमत्कारिक छांदस स्वभाव असे कीं, अशी स्थिति असतांहि त्यांचें त्या वेळचें शनवारचें नाटक बहुतेक चुकत नसे ! यानंतर ते १८७१ सालीं लिटिलगो परीक्षेंत उतरले, व पुढें आणखी दोन वर्षें ते बी. ए. च्या क्लासांत राहिले; परंतु विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणेंच यांचीहि अभ्यास करण्याची कांहीं अंशीं तऱ्हा असल्याकारणानें त्यांची शेवटीं बी. ए. च्या परीक्षेस जाण्यापुरती तयारी झाली नाहीं. यापुढें १८७३ अखेर त्यांनीं कॉलेज सोडून मागें विष्णुशास्त्री जात असत त्याप्रमाणें हेहि बाबा गोखले यांच्या शाळेंत शिकविण्यास जाऊं लागले.

सीतारामपंतांच्या पलीकडील, परंतु विष्णुशास्त्री यांशीं निकट संबंधानें आप्त असे त्यांचे बंधु लक्ष्मणराव हे होत. हे हायस्कुलांत असतांना ह्यांचा वर्गांत नंबर साधारण वरच असे हेहि सीतारामपंतांप्रमाणेंच लॅटिन शिकत होते. हे मॅट्रिक्युलेशनमध्यें दोन वर्षें नापास होऊन शेवटीं १८७१ सालीं पास झाले. यानंतर ते आपले चुलते सीतारामपंत यांजबरोबर कॉलेजांत रहावयास जाऊं लागले. लक्ष्मणरावांच्या आंगचा झळझळीतपणा कॉलेजांत गेल्यावर कांहींसा दिसूं लागला. त्यांस एक ज्युनिअर स्कॉलरशिप होती. पुढें १८७३ सालीं ते लिटिलगोच्या परीक्षेंत उतरले; परंतु याच साल अखेर त्यांचे डोळे बिघडल्यामुळें त्यांस मुंबईस औषधोपचारासाठीं निघून जावें लागलें. यांचा विशेष गुण विष्णुशास्त्री जसें सांगतील तसें ऐकावयाचें हा असे. यामुळें विष्णुशास्त्री यांचें लक्ष्मणरावांशीं विशेष जमे. त्यांस स्वतः संस्कृत जरी येत नसे तरी विष्णुशास्त्री यांनीं संस्कृत ग्रंथांतील मुख्य मुख्य मर्मस्थानें यांस सांगावीं; त्याचप्रमाणें इंग्रजी ग्रंथांतीलहि त्यांनीं श्रमानें मिळविलेली माहिती आपल्या भाविक कनिष्ठ बंधूस देत असावी. यामुळें लक्ष्मणरावांस यासंबंधानें पुष्कळ फायदा झाला. विष्णुशास्त्री यांचा स्वभाव संकोचित असल्यामुळें

ज्यांस विशेष भाव किंवा हौस नाहीं अशा मनुष्यांस ते फारसें कांहीं सांगत नसत, परंतु लक्ष्मणरावांची वृत्ति पूर्ण भाविक असल्यामुळें त्यांस विष्णुशास्त्री यांनीं आपल्या एखाद्या स्नेह्याप्रमाणें हरएक प्रकारच्या गंमती, सोबत्यांच्या व प्रोफेसर लोकांच्या नकला, त्याचप्रमाणें धर्म, राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था वगैरे विषयांवरील त्यांचे विचार हीं मोकळ्या मनानें सांगावीं; व लक्ष्मणराव हें सर्व नीट लक्ष लावून ऐकत म्हणून विष्णुशास्त्री यांस अधिकाधिक सांगण्याची हौस वाटे!

यानंतर विष्णुशास्त्री यांचे चुलतबंधु विनायकराव; यांचा विद्याभ्यास कांहीं त्यांच्या आळसानें व कांहीं कमकुवतीमुळें चांगलासा झाला नाहीं. त्यांची मजल मॅट्रिक्युलेशनपर्यंत पोहोंचून त्यांनीं १८७३ सालअखेर कृष्णशास्त्री यांच्या ऑफिसांत क्लार्कची नोकरी पतकरली. यांचा स्वभाव गरीब, भिडस्त व निर्लोभी असल्यामुळें विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं त्यांजविषयीं चांगला आदरभाव असे. यांचे धाकटे बंधु माधवराव हे अधिक चपळ असल्यामुळें १८६९ सालीं मॅट्रिक्युलेशन पास झाल्यावर ते विशेषेंकरून स्वतःच्या हिंमतविरच कॉलेजांत विद्याभ्यास करावयास गेले. यांनींहि लॅटिन घेतलें होतें, व यामुळें मि० जेकब साहेबांची यांजवरहि बरीच मर्जी असे. कॉलेजांत गेल्यावर यांनीं लष्करांतील एका श्रीमान् पार्शी गृहस्थाच्या मुलांस लॅटिन शिकविण्याचें काम पतकरून कांहीं या उत्पन्नावर व कांहीं कृष्णशास्त्री हे माधवरावांचा बाप वारल्यापासून जी मदत करीत असत त्यावर असा त्यांनीं आपला पुढला अभ्यास चालविला. माधवराव हे १८७२ सालीं लिटिलगोमध्यें पास झाले; परंतु पुढील सालच्या अखेर ते बी. ए. मध्यें नापास झाल्यावर त्यांनीं एंजिनिअरिंग कॉलेजची वाट धरली.

वरील सर्व मंडळींत शेवटला नंबर म्हणजे मामांचा. ते इतर मंडळीप्रमाणें मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकून परीक्षेसहि गेले होते; परंतु त्यांची गति तितपतच होती. पूर्वीप्रमाणें त्यांच्या चेष्टाकुचेष्टा चालूच होत्या. नुकताच वर सांगितलेला कृष्णा विद्यार्थी याची आणि मामांची चुरस सहजच

असे. कृष्णा हा कांहीं अभ्यासासाठीं व कांहीं ढेंकणांचा त्रास चुकविण्यासाठीं इतर मंडळीबरोबर माजघरांत—ढेंकणांच्या आगरांत—न निजतां कधीं कधीं तो देवघरांत देवांच्या दिव्याजवळच कांहीं चोकीत कांहीं निजत असा पडून राही. एका रात्रीं ढेंकणांनीं पिसाळून जाऊन मामा देवघरांत येऊन पहातात तो कृष्णमूर्ति हरिचरणीं स्वस्थ समाधिस्त झालेली आहे ! त्यास अशा सुखाच्या स्थितींत पाहून मातुल आपल्याशीं म्हणतात " हा पहा लबाड ! माजघरांत ढेंकूण चावतात म्हणून आम्हां सर्वांस ढेंकणांत टाकून आपण एकटाच कसा इकडे येऊन स्वस्थ निजला आहे ! याची आतां गंमत केली पाहिजे. असें म्हणून त्यांनीं बरेचसे ढेंकूण भांड्यांत धरून आणून निजलेल्या कृष्णाच्या पासोडींत हळूच सोडून दिले, व मग ढेंकणांनीं एकदम हल्ला केलेल्या प्रतिस्पर्ध्याची तळमळ पाहून हंसत मातुलांची स्वारी मुकाट्यानें अंधेरांत उभी राहिली !

आतां यापुढील, परंतु शेवटाला गोड घास दिनकरपंत नातू हे होत. यांचाहि अभ्यास मामाप्रमाणेंच रेंगाळला. हे मॅट्रिक्युलेशनपर्यंत सुद्धां गेले नाहींत. त्यांनीं या शाळेंतून त्या शाळेंत, त्या शाळेंतून या शाळेंत व कधीं कधीं अजीबात घरींच, असें करितां करितां यांचा अभ्यास १८७० सालीं अगदीं बंद पडला. यानंतर वर्ष दीडवर्ष इकडे तिकडे चाकरीच्या शोधार्थ घालवून शेवटीं ते १८७१ सालच्या अखेरीस अक्कलकोट संस्थानांत पिलीव या गांवीं मराठी मास्तराची जागा पतकरून तिकडे गेले. तेथें ते दोन तीन वर्षें राहिले. तेथून ते कधीं कधीं पुण्यास आले म्हणजे मागील मंडळीच्या गांठी पडून महिना पंधरा दिवस पुनः गंमत चाले !

पहिल्याच वर्षीं कर्नल वाडिंगटन साहेब शाळेच्या परीक्षेस आले असतां या फाकड्या मास्तरांची कशी गंमत उडाली तिची हकीकत स्वारी स्वतःच सांगत होती. ते म्हणाले " साहेब घोड्यावरून उतरून शाळेंत आले. इकडे तिकडे शाळा पाहून परीक्षकरितां मुलांस बसवावयास सांगितल्यानंतर साहेबांनीं मुलांस एक विविध भागाकाराचें उदाहरण घातलें, आणि मजकडे वळून म्हणाले " उदाहरण णमूद केलें ? "

साहेब ' गमूद गमूद ' काय म्हणतात हें मला प्रथम समजेना; परंतु ' काय ' म्हणून विचारलें असतां साहेब रागावतील असें समजून व त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ साधारण समजून मीं होय म्हटलें. पुढें पाहतों तों साहेबांनीं नोटवही काढून तें उदाहरण सोडविण्यास आरंभ केला. त्यांनीं एकदम भाजक संख्येनें विविध भाज्यसंख्येस भागून लागलेंच उत्तर काढिलें. हें पाहतांच माझ्या छातींत धस्स झालें! कारण आमच्या एकूणएक मुलांनीं प्रथम रुपये, आणे, पै यांच्या पै करून नंतर त्यास भाजकानें भागून पुन्हा एकंदर पयांच्या पै, आणे आणि रुपये असें केलें होतें!! परंतु साहेबबहादूर शाळेंतील टापटीप पाहून अगोदरच खुष झाले होते म्हणून व शिवाय त्यांच्या उपहारार्थ डाळिंबांच्या डालीचा नजराणा नुकताच झाला होता म्हणून ते रागावले नाहींत; मात्र मी वरील उदाहरणाची खरी रीत त्यांच्यापासून तेव्हां उत्कृष्ट रीतीनें शिकलों!"

दिनकरपंतांच्या मागील काळच्या विहिरीवरून उड्याबिड्या मारण्याच्या गंमती जाऊन त्या आतां केवळ ऐतिहासिक गोष्टी होऊन गेल्या होत्या. त्यांच्या व्याख्यानाचा ओघ आतां बालक्रीडांस सोडून तरुण मंडळीस विशेष प्रिय अशा ज्वानींतील सुखांच्या गोष्टींकडे वळे व मंडळीहि त्या ऐकण्याविषयीं सहजच लुब्ध असत. दिनकरपंतांच्या कथासारित्सागरांतील एका कथेचा विषय पिलीव येथील फौजदार साहेब असून त्यांचें आणि त्यांच्या प्रियपात्राचें विलक्षण प्रेम, तिचें तें एरवीं दुसऱ्यांस न आवडणारें रूप, परंतु फौजदारसाहेब त्याजवरून अगदीं मरून मरून जावयाचें, त्यांच्या मधून मधून होणाऱ्या रुसवारुसवी, दिनकरपंतांच्या मग समजावणुकी, एके वेळीं या दंपत्याचा बराच कलह होऊन कॉन्स्टेबल बहादूर एकाएकीं खुनी खटल्याच्या चौकशीकरतां बाहेरगांवीं गेले असतां मागें न कळत बिबीसाहेबांचें दूर गांवीं झालेलें प्रयाण, मग घरीं माघारें आल्यावर मेमसाहेबांच्या स्वाऱ्या निघून गेल्या असें कळतांच चारी दिशा एकंदर शून्य होऊन घरदार बायकोमाणसें सर्व टाकून देऊन एक घोडा व चार लाड्डू येवढी कायती बरोबर सामुग्री

घेऊन प्रियपात्राचा शिपाईबहाद्दरांनीं केलेला पाठलाग, व शेवटीं चार दिवसांनीं विजयी फौजदारसाहेबांचा चार लाडूंपैकीं दोन तसेच माघारी आणून पिलीव नगरांत आपल्या प्रियपात्राबरोबर झालेला आनंदाचा प्रवेश, इत्यादि गंमती गंमती दिनकरपंतांनीं उत्तम चटकदार रीतीनें सांगून मोठी बहार उडवून द्यावी !

या मंडळींत दिवसानुदिवस स्वभाववैचित्र्य अधिकाधिक दिसूं लागलें. विष्णुशास्त्री, लक्ष्मणराव व विनायकराव यांचें परस्परांशीं विशेष जमत असे. काकांचें घरांत कोणाशीं विशेष रहस्य नसून त्यांचे स्नेही सर्व बाहेरचे असावयाचे. माधवराव हळू हळू छत्रे मंडळींत मिसळूं लागले. येणेंप्रमाणें लहानपणीं सर्व मंडळी भांडतबिंडत, परंतु एकत्र ठिकाणीं असत; त्यांना आतां निरनिराळ्या दिशा फुटूं लागल्या. विष्णुशास्त्री, लक्ष्मणराव व विनायकराव यांस मात्र कांहीं व्यसन लागलें नाहीं— सुपारीच्या खांडाचीहि त्यांस खोड नसे; परंतु मामा आणि माधवराव यांनीं प्रथम तंबाखु खाण्याची सुरुवात केली. येणेंप्रमाणें हळू हळू या मंडळीमध्यें जरी स्वभाववैचित्र्य दृष्टीस पडूं लागलें तरी त्या सर्वांवर विष्णुशास्त्री यांच्या चांगल्या वर्तनामुळें व योग्यतेमुळें चांगली छाप असे. विष्णुशास्त्री यांची पैसे खर्चण्याचीहि रीत तशीच प्रशंसनीय होती. कृष्णशास्त्री यांच्या वेळीं त्यांच्या घरची लायब्ररी साधारण बरीच होती; परंतु तींत नवीन नवीन चांगल्या मोठ्या किंमतीच्या पूस्तकांची भरती करण्याकडे विष्णुशास्त्री हेच आपले स्वतःचे पैसे खर्च करीत असत. शिवाय घरांतील बागेंत फुलझाडें विकत आणण्याकडे व त्यांना पाणी घालण्याकरितां पाट बांधण्याकडे वगैरे त्यांचेच पैसे खर्च होत असत. एकंदरींत स्वतःच्याच ऐषआरामाकडे पैसे खर्च न करितां आपले व आपले आप्त व मित्र यांच्या सुधारणेकरितां व सुखाकरितां विष्णुशास्त्री यांचा बराच पैसा खर्च होत असे. या गोष्टीमुळें वरील मंडळीचें प्रमुखत्व जें त्यांजकडे लहानपणापासून चालत आलें होतें तें तसेंच चालू राहिलें. शिवाय या वेळपर्यंत त्यांचा स्वभाव अगदीं गरीब, शांत व मनमिळाऊ असून त्यांत मागें प्रस्तावनेंत दाखल केलेले दुर्गुण—अभिमान,

हेकेखोरपणा इत्यादिकांचा प्रादुर्भाव अझून झाला नसल्यामुळें ते कुटुंबांतील माणसांस व इतर सर्व लोकांस अत्यंत प्रियच होते.

आतां शेवटीं या मंडळींचे आदिगुरु व पालक असे जे कृष्णशास्त्री त्यांच्या वृत्तींतहि वरील आठ वर्षांत कोणता फरक पडत गेला हेंहि सांगणें एकंदर कथाभागास जरूर आहे. हरिपंतमामा जिवंत असतांना कृष्णशास्त्री यांची वृत्ति अगदीं आनंदी व पूर्ण बेफिकिरीची असे म्हणून मागें पहिल्या भागांत सांगितलें आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या अवकृपेची किंवा भिक्षुकांच्या ग्रामण्याची, किंवा संसारांतील कोणत्याहि गोष्टीची म्हणून त्यांस ददात नसे; परंतु चाळिशी उलटून जसजसा उतार वयाचा व कांहीं अंशीं योग्य विचाराचा अंमल त्यांच्यावर बसत चालला व वडील वारून जाऊन त्यांच्यामागें बराच विस्तार पावत चाललेल्या संसाराचा बोजा त्यांच्या अंगावर जसजसा पडूं लागला तसतशी त्यांची पूर्वींची निवळ आनंदी वृत्ति कमी कमी होत जाऊन तींत काळजी व कांहींसा तिरसटपणा ह्यांची छटा दिसूं लागली; व ती दिवसानुदिवस अधिकाधिक वाढूं लागली. वरिष्ठ अधिकाऱ्यांविषयीं व पूर्वापार चालत आलेल्या संप्रदायाविषयीं नम्रभाव हा त्यांच्या ठायीं दृष्टीस पडूं लागला. सर आलेक्झांडर ग्रांट हे हिंदुस्थान सोडून विलायतेस जाऊं लागले तेव्हां त्यांनीं आपल्या खात्यांतील कांहीं विशेष लोभांतले असे नेटीव अधिकारी आपल्या बंगल्यावर मेजवानीला बोलाविले होते. त्या वेळीं कृष्णशास्त्री यांनीं तेथें इतर कांहीं गृहस्थांबरोबर फळें व बर्फ खाऊन धर्मविरुद्ध आचरण केल्याबद्दल पुणेंकर ब्राह्मणांनीं त्यांजवर मोठें ग्रामण्य रचिलें. त्यामुळें मुलांमुलींचीं लग्नें थोपून राहिल्यानें शास्त्रीबोवांनीं निमुटपणें श्रींस शरण जाऊन दोनशें तीनशें रुपयांचा होम करून सर्व प्रायश्चित्त घेतलें ! त्याचप्रमाणें १८७१ सालीं पुण्यास पुनर्विवाहाबद्दल श्रीमच्छंकराचार्य

यांच्यासमोर जो मोठा वादविवाद झाला त्यांतहि कृष्णशास्त्री हे जरी नवीन पक्षाकडील पुढारी लोकांत होते व वादप्रसंगीं त्यांस कोटीक्रम सुचविण्यांतहि त्यांची पुष्कळ मदत असे तरी शेवटीं पंच या नात्यानें त्यांनीं जें आपलें मत दिलें तें सरासरी दुटप्पीच दिलें. त्यांची ग्रंथरचनेची तरतरीहि हळुहळू शिथिल होत जाऊन ग्रंथकाराची दीक्षा जी त्यांनीं अविश्रांत सुमारें वीस वर्षें चालविली होती ती त्यांनीं या सुमारास आपयले चिरंजीव विष्णुशास्त्री यांच्या गळ्यांत घालून देऊन यापुढील काल नुसत्या सरकारी कामांत व एरवीं गप्पाष्टकांत घालविण्याचा क्रम चालू केला होता.

———

भाग ४ था.

निबंधमालेचा आरंभ.

दृशः पृथुतरीकृता जितनिजाब्जपत्रत्विष-
श्चतुर्भिरपि साधु साध्विति मुखैः सभं व्याहृतम् ।
शिरांसि चलितानि विस्मयवशाद्ध्रुवं वेधसो
विधाय ललनां जगज्जनललामभूतामिमाम्
कालिदास—विक्रमोर्वशी नाटक.

मागील भागांत आपण विष्णुशास्त्री यांस वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पूर्ण मर्जींतले असे सोडिले. आतां ह्यापुढें त्यांनीं आपल्या आयुष्यांतील मोठा जो उद्योग—निबंधमालारचना—तो आरंभून महाराष्ट्राभिज्ञांस आपल्या शुद्ध व सरस अशा भाषासरणीनें प्रथमच आनंदीत कसें केलें, व पुढें तींतच मेकॉलेच्या भाषाशैलीचाहि परिपाक उतरवून देऊन खुद्द मेकॉले, मिल्ल वगैरे इंग्रजी ग्रंथकार, मिशनरी लोक, ·आपल्याकडील नवीन विद्वान् मंडळी यांजवर उत्कृष्ट तऱ्हेचा कोटिक्रम कसा चालविला; त्याचप्रमाणें या अपूर्व चर्चेचा गवगवा हलुहळू वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानांवर जाऊन त्यांनीं विष्णुशास्त्री यांस सामोपचाराचा बुद्धिवाद केला असतांहि विष्णुशास्त्री यांनीं त्याकडे दुर्लक्ष करून त्यांच्या मर्जीची किंवा गैरमर्जीची पर्वा न ठेवतां आपलीं मतें स्वतंत्रपणें प्रतिपादन करण्याचा क्रम तसाच कसा चालू ठेविला हें प्रकरण या भागांत आणिलें आहे.

सन १८७३ सालच्या अखेरीस नाताळच्या सुटींत विष्णुशास्त्री व त्यांचे कांहीं स्नेही—मि० किर्लोसकर, जांभेकर, आगाशे—हे आळंदीस सहज मौजेनें म्हणून गेले होते. तेथें एरवा सर्व गमती बिमती झाल्यावर मंडळी परत येत असतां वाटेनें मि० जांभेकर हे विष्णुशास्त्री यांस सहज

म्हणाले, " तुम्ही एखादें मासिक पुस्तक कां काढीत नाहीं ? त्यांत कधीं नवीन विषय घालावेत व कधीं तुम्हीं शाळापत्रकांत ' संस्कृतकवी ' विषयीं जे निबंध यापूर्वी छापिले आहेत त्यांतीलच कांहीं घालावेत " ही कल्पना विष्णुशास्त्री यांस पसंत पडली. त्यांनीं पूढें लवकरच जें नवीन साल (१८७४) लागणार होतें त्याच्या आरंभापासून निबंधमाला नामक मासिक पुस्तक काढण्याचा विचार केला व त्याबद्दल ज्ञानप्रकाश वर्तमानपत्रांत जाहिरात दिली. हें पुस्तक कोणत्या तऱ्हेनें चालवायाचें याविषयीं विष्णुशास्त्री यांच्या मनांत प्रथम वर सांगितल्यापेक्षां अधिक कल्पना नव्हती; परंतु त्यांना हळुहळू असें दिसून आलें कीं, एकदां छापिलेले निबंध पून्हां छापणें हें प्रशस्त दिसणार नाहीं. म्हणून निबंध-माला ही स्वतंत्र मासिक पूस्तकाप्रमाणेंच चालविण्याचा त्यांनीं निश्चय केला. यावरून विष्णुशास्त्री यांचें महत्कृत्य जें निबंधमालालेखन, ज्याच्या योगानें त्यांनीं महाराष्ट्राच्या स्वरूपांत इतकें अंतर पाडिलें, व तींत उत्तम ग्रंथरचना करितां येईल असा विद्वान लोकांस भरंवसा आणिला, व ज्याच्या द्वारें त्यांनीं आपल्या लोकांच्या अनेक विषयांवरील समजुतींत बदल केला, त्याची उत्पत्ति कशी सहज होऊन त्याची प्रथम कल्पना कशी अगदीं साधी व अपूर्ण होती हें वाचकांच्या लक्षांत येईल !

निबंधमालेच्या पहिल्या अंकावरच काय तें विष्णुशास्त्री यांनीं आपलें पूर्ण नांव—विष्णु कृष्ण चिपळूणकर बी. ए.—असें घातलें होतें; यानंतर तें कोणत्याहि अंकावर त्यांनीं घातलें नाहीं. निबंधमालेच्या रचनेसंबंधानें विष्णशास्त्री यांच्या अंगचे दोन गुण लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. पहिला हा होय कीं, आपण मासिक पुस्तक काढणार याबद्दल कोणाचा सल्ला घेणें, किंवा आपण लिहिलेला मजकूर चार तज्ज्ञ स्नेह्यांस दाखवून त्याबद्दल ते काय म्हणतात हें पाहणें, किंवा त्यांपैकीं कोणाची कांहीं मदत मिळेल किंवा काय म्हणून विचारणें, हें त्यांस अगदीं पसंत नसे. मग सरकारी अधिकाऱ्यांकडे जाऊन आमच्या पुस्तकाच्या कांहीं प्रति घ्या म्हणून भीक मागणें किंवा आपणच होऊन लोंचटपणा करून स्नेह्यांच्या किंवा नुसता अमुक अमुक गृहस्थ विद्वान आहे किंवा पगार-

वाला आहे म्हणून त्याजकडे पुस्तक पाठविलें असतां तो मुरवतीस्तव तरी तें माघारें पाठविणार नाहीं अशा तऱ्हेनें अगांतुकी करून लोकांच्या गळ्यांत पुस्तक बांधणें, हें त्यांच्या गृहस्थी व मानी स्वभावास अत्यंत विरुद्ध असे. कोणी स्वतः होऊन मागितल्याशिवाय किंवा पत्र पाठविल्याशिवाय विष्णुशास्त्री कोणाकडेहि निबंधमाला पाठवीत नसत. येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचा पुस्तकाच्या खपासंबंधानें स्वभाव अत्यंत मानी असे; व यामुळें त्यांच्या पुस्तकाचा बोज सहजच राही. हा गुण आमच्याकडील किती वर्तमानपत्रकारांनीं, मासिकपुस्तकवाल्यांनीं, ग्रंथकर्त्यांनीं व ग्रंथोत्तेजक मंडळ्यांनींहि घेण्यासारखा आहे बरें ?

विष्णुशास्त्री यांचा दुसरा विशेष गुण हा असे कीं, निबंधमाला पुस्तकासंबंधानें हरएक उद्योग आपण एकट्यानेंच करावयाचा. पुस्तकांतील सर्व मजकूर आपण स्वतः लिहावयाचा, येवढेंच नाहीं तर त्याचीं प्रुफें तपासणें देखील ते कोणावर टाकीत नसत. यामुळें निबंधमाला हें एखाद्या स्वतंत्र ग्रंथाप्रमाणें एकाच मनुष्याची कृति आहे; त्यांत दुसऱ्याच्या हातचा एकहि शब्द मिळावयाचा नाहीं. निबंध, सुभाषित, विनोदमहदाख्यायिका, उत्कृष्ट उतारे वगैरे पुस्तकांत येणारा मजकूर विष्णुशास्त्री यांच्या हातचा असावयाचा ! त्यांचे कोणी स्नेही आम्ही कांहीं मजकूर निबंधमालेंत घालण्यास देतों ' असें कधीं म्हणत; परंतु मंडळी पडली फार निश्चयाची ! यामुळें विष्णुशास्त्री यांस कोणासहि नको म्हणण्याचा प्रसंग आला नाहीं. ते यासंबंधानें असें म्हणत कीं, " जे लोक आम्ही लिहूं म्हणत ते अगोदर चांगले काळजीपुरस्पर लिहिणारे नसावयाचे व त्यांतून आपल्या निबंधांतच दुसऱ्यांचे निबंध घुसडल्यानें त्यांत पुष्कळदां मतविरोध होणार. तेव्हां पुस्तकाचें काम सर्वच एकट्याचें असलें म्हणजे वरील अडचण अर्थातच राहणार नाहीं. " हा सर्वथैव स्वावलंबनाचा निश्चय चालविण्यास विष्णुशास्त्री यांस पुष्कळदां अडचणी येत; यामुळें निबंधमालेचे अंक पहिल्या तारखेच्या पहिल्या तारखेस निघाले आहेत असें कधींहि होत नसे. नेहमीं ते दोन तीन महिन्यांनीं तरी मागासलेले असावयाचे. यामुळें कित्येक वर्गणीदारांची त्यासंबंधानें बरीच कुरकूर असे;

परंतु विष्णुशास्त्री यांची नजर माला वक्तशीर काढण्यापेक्षां तींतील मजकूर उत्कृष्ट तऱ्हेचा असावा याकडे विशेष असल्यामुळें त्यांनीं तिजकडे फारसें कधींहि लक्ष दिलें नाहीं !

मालेचे तीन चार अंक बाहेर पडतांच त्यांतील शुद्ध व प्रौढ भाषा आणि पोक्त व निर्भीड विचारसरणी हीं पाहून तिचें नांव हळुहळू महाराष्ट्रभाषाभिज्ञांत पसरूं लागलें. कित्येकांस असा सुद्धां संशय उत्पन्न झाला कीं, कृष्णशास्त्री यांनींच हे निबंध लिहिले असतील किंवा निदान त्यांत त्यांचा पुष्कळच हात असेल. परंतु जसजसे अधिकाधिक अंक बाहेर पडूं लागले तसतसा हा भ्रांतिमूलक समज निरसन पावत चालला. कृष्णशास्त्री यांचा या कामांत हात नव्हता येवढेंच नाहीं, तर त्यांतील पुष्कळ मजकूर त्यांस आवडण्यासारखाहि नव्हता. ही गोष्ट विष्णुशास्त्री यांस पूर्ण ठाऊक होती व यामुळेंच ते आपली माला वडिलांच्या दृष्टीस न पडेल अशीच खबरदारी ठेवीत असत !

याप्रमाणें मालेचा उदय होऊन तिचें सुंदर व सौम्य रूप पाहून तिजबद्दल लोकांचा बराच चांगला समज होत चालला असतां त्या वेळीं 'दंभहारक' म्हणून एक मासिक पुस्तक मुंबईस निघत असे त्यांत मालेविषयीं एक अप्रयोजक टीका आली. तींतील भावार्थ असा होता कीं, आपल्या देशाच्या सध्यांच्या निकृष्ट स्थितींत काहीं शास्त्रीय किंवा राजकीय किंवा व्यापारसंबंधीं विषयांवर पुस्तकें निघूं लागतील तरच देशाचा फायदा होणारा आहे; एरवीं 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' 'विद्वत्व आणि कवित्व' अशा सारख्या केवळ भाषाज्ञान विषयांच्या चर्चेनें तो होण्यासारखा नाहीं. तेव्हां मालेसारखीं पुस्तकें केवळ निरुपयोगीं होत. विष्णुशास्त्री यांनीं या अप्रयोजक टीकेस उत्तर मालेच्या पांचव्या अंकांत दिलें. हें चांगलें चटकदार व मुद्देसूद असल्यामुळें तें वाचण्यासारखें आहे. पहिल्या चार अंकांवरून व विष्णुशास्त्री यांच्या एकंदर शांत व निबोल्या स्वभावावरून त्यांच्या लेखणींतून इतका तीव्र व प्रतिपक्षास अगदीं चीत करून टाकणारा लेख उतरेल असें कोणांसहि वाटलें नव्हतें ! निबंधमालेंतील कठोर व सणसणीत टीकेचा हा पहिलाच

मासला होय. याचा परिणाम अर्थातच असा झाला कीं, केवळ दंभहारकच नव्हे तर इतर प्रतिपक्षीहि या उत्तरानें अगदीं दडपून गेले व मालेचें नांव मराठी वाचकांमध्यें अधिक पसरत चाललें! यानंतर मालेविरुद्ध मिशनरी ज्ञानोदयाच्या पिरपिरीखेरीज बरेच वेळ वर्तमान-पत्रांतून किंवा मासिक पुस्तकांतून कोणीहि चकारशब्द काढला नाहीं.

यानंतरहि दुसरा मोठा प्रसंग म्हटला म्हणजे मालेच्या आठव्या अंकाचा होय. या अंकांत मालेच्या सहाव्या व सातव्या अंकांतील विषय इतिहास-हा संपवितांना विष्णुशास्त्री यांनीं हिंदुस्थानच्या इतिहासाकडे वळून मिल्ल, मेकॉले, मारीस वगैरे इंग्रजी इतिहासकारांच्या ठिकाणीं हिंदुस्थान देशा-विषयीं, तेथील लोकांविषयीं, तेथील जुन्या विद्या व कला यांविषयीं, केवढा दुराग्रह व अज्ञान हीं होतीं व अशा लोकांच्या ग्रंथांच्या वाचना-पासून, त्याचप्रमाणें त्यांच्याच विचारांचा फैलाव करणाऱ्या आपल्या नवीन विद्वान् लोकांच्या लेखांपासून व भाषणांपासून आपल्या होतकरू प्रजेच्या मनांवर किती अनिष्टकारक ग्रह उत्पन्न होत आहेत याचें विवेचन केलें आहे. हा अंक खरोखरच फार कडक रीतीनें लिहिला आहे. तो सुमारें वीस वर्षांनीं पुन्हा वाचण्याचा आम्हांस आज योग आला; आणि तेव्हांच्या आणि आतांच्या स्थितींत जरी पुष्कळ अंतर पडलें आहे, तरी सरकारी नोकरानें आणि त्यांतून ज्याच्या हातून विद्यार्थी तयार व्हावयाचे अशा हायस्कुलांतील शिक्षकानें ‘ इंग्रजांच्या तरवारीच्या धारे ’ विषयीं, ‘ त्यांनीं खेडींचीं खेडीं उद्ध्वस्त केलीं ’ याविषयीं व त्याचप्रमाणें ‘ नाना * * ’ विषयीं लिहावें यांत विष्णुशास्त्री यांच्या धाष्टर्यांबद्दल किंवा विद्या-खात्याचे अधिपति मि. चाटफील्ड यांनीं असले लेख वाचूनहि त्यांची वृत्ति शांतच राहावी यांत त्यांच्या मनाच्या औदार्यांबद्दल, अधिक कोणाची तारीफ करावी हें आम्हांस समजत नाहीं!!

हा अंक बाहेर पडून महिनापंधरा दिवस झाले नाहींत, तोंच त्याज-बद्दल चोहोंकडून गवगवा ऐकूं येऊं लागला. मिशनरी लोकांवर या अंकांत बराच तडाखा उडविला असल्यामुळें त्यांनीं तो अंक अर्थातच महाराष्ट्रभाषागुरु जे माजी मेजर क्यांडीसाहेब त्यांच्या अवलोकनांत

आणिला. साहेबांचें आणि कृष्णशास्त्री यांचें पितापुत्राप्रमाणें नातें असल्यामुळें विष्णुशास्त्री यांची ही उद्दामपणाची कृति पाहून साहेब-मजकुरांस फार वाईट वाटलें; त्यांनीं मालाकारांच्या वडिलांकडे सदरील अंकाबद्दल गाऱ्हाणें करून व फार खेद प्रदर्शित करून पत्र लिहिलें. त्यांत त्यांनीं सुचविलें कीं, ' तुमच्या सारख्यांच्या मुलानें अशा तऱ्हेचा मजकूर लिहिणें म्हणजे अतिशय शोचनीय गोष्ट आहे; तेव्हां असें पुन्हां न करण्याबद्दल तुम्हीं चिरंजिवांस ताकीद द्यावी. ' कृष्णशास्त्री यांनीं क्यांडीसाहेबांचें पत्र विष्णुशास्त्री यांस दाखविलें व आठवा अंक मागून घेऊन तो त्यांनीं वाचून पाहिला. मग अशा तऱ्हेचा मजकूर लिहिण्यापासून तादृश काय उपयोग आहे व तुला वाटेल तर वकिलीचा वगैरे स्वतंत्र धंदा पतकरून मग असें कां लिहीत नाहींस वगैरे कृष्णशास्त्री हे विष्णुशास्त्री यांस बोलले, व क्यांडीसाहेबांस कांहीं सामोपचाराचें उत्तर पाठवून त्यांची त्यांनीं समजूत केली.

यानंतर या वर्षाच्या अखेरीस मि० चाटफील्ड हे सहज हायस्कूल पाहण्याकरितां म्हणून आले होते. त्या वेळीं त्यांनीं शाळेंतील वरवरचे मास्तरांची गांठ घेण्याकरितां त्यांस हेडमास्तरांच्या खोलींत बोलावून आणून प्रत्येकास कांहीं कांहीं प्रश्न विचारिले. विष्णुशास्त्री यांशीं साहेब बोलत असतां निबंधमालेच्या आठव्या अंकाबद्दल सहज बोलणें निघून साहेब त्यांस म्हणाले, " तुम्ही मराठींत नवीन मासिक काढतां ही फार चांगली गोष्ट आहे. परंतु तुम्ही अझून तरुण आहां, तुमचे विचार अझून पक्क झाले नाहींत. तेव्हां कोणत्याहि संबंधानें कडक लेख लिहिणें तुम्हांस बरें नाहीं. शिवाय मेकॉले, मिल्ल यांनीं जीं मतें प्रदर्शित केलीं आहेत, तीं म्हणजे सर्वांसच सर्वथैव मान्य आहेत असें कांहीं नाहीं. " येणेंप्रमाणें मि० चाटफील्ड साहेबांनीं सौम्यपणानें व सभ्यपणानें शिष्णुशास्त्री यांस उत्तम बुद्धिवाद केला व त्याबद्दल साहेबमजकूर खरोखरच प्रशंसेस पात्र आहेत. *

* मि० चाटफील्ड साहेबांच्या या भेटीवरून विष्णुशास्त्री यांच्या मनावर

[पुढें चालूं]

यापुढें या सालांत निबंधमालेचे जे अंक निघाले त्यांचे विषय भाषादूषण, लेखनशुद्धि, वाचन व भाषांतर हे आहेत. हे सर्व भाषाज्ञानसंबंधाचे असून त्यांचें स्वरूप सौम्य, भाषा सरळ व विचारसरणी पोक्त अशी आहे. ज्या तरुण विद्वानास महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ करण्याची इच्छा असेल त्यांस या निबंधांत पुष्कळ नवीन गोष्टी शिकण्यासारख्या आहेत व ज्या कांहीं गोष्टींविषयीं त्यांस संशय असेल त्यांचें त्यांस कांहीं निराकरण यांत सांपडेल. याप्रमाणें निवळ महाराष्ट्र भाषाजिज्ञासा हे निबंध फार उपयोगाचे आहेत.

या वर्षाअखेरीस अशी गोष्ट घडली कीं, विष्णुशास्त्री यांनीं कोजागरीसाठीं दूध वगैरे आणवून आपल्या निवडक स्नेह्यांबरोबर ती रात्र खेळांत व मजेंत घालविण्याचा विचार केला असतां संध्याकाळीं बातमी आली कीं, ग्वाल्हेरीस शेवटले बाजीराव साहेब यांचे दत्तकपुत्र नानासाहेब हे गोसाव्याच्या रूपानें लपून छपून असतां शिंदेसरकारास त्यांचा शोध लागून त्यांनीं त्यांस पकडून कैद करून रेसिडेन्सिमध्यें रवाना केलें. ही वार्ता ऐकून विष्णुशास्त्री एकदम निरुत्साह होऊन त्यांनीं कोजागरीचा बेत सर्व बंद ठेवला ! त्यांस आपल्या प्राचीन इतिहासाविषयीं, प्राचीन राजघराण्यांविषयीं त्यांतील पराक्रमी व राजधुरंधर पुरुषांविषयीं अत्यंत अभिमान वाटत असे. पेशव्यांच्या वैभवाविषयीं, त्यांच्या पराक्रमांविषयीं, त्यांच्या शहाणपणांविषयीं वृद्ध लोकांच्या तोंडून गोष्टी ऐकण्याचा व गोंधळ्यांपासून त्यांजविषयींचे पोंवाडे ऐकण्याचा विष्णुशास्त्री यांस फार नाद असे. त्यांच्या वरीं हरिशास्त्री पंडित–प्रसिद्ध विष्णुशास्त्री पंडित यांचे चुलत बंधु–म्हणून कोणी सातारचे वृद्ध शास्त्री पुण्यांतील दक्षिणेकरितां कधीं कधीं उतरण्यास येत असत. ते आले म्हणजे पुण्यांत तीन तीन चार चार महिने रहात असत. यांनीं विष्णुशास्त्री यांस पेशवाईतील जुन्या

साहेबांबद्दल बराच चांगला ग्रह झाला. याबद्दल त्या दिवसांच्या त्यांच्या डायरींत असे शब्द आहेत.

" An illustrious visitor. made a favourable impression by his polite behaviour."

गोष्टी सांगाव्या. हरिशास्त्री यांची बोलण्याची धाटणी मोठी अलौकिक असे. त्यांची मुद्रा गंभीर, स्वर मोठा, शब्द रेखल्यासारखे व वर्णनशक्तीहि उत्तम असल्यामुळें ते वरील ऐतिहासिक गोष्टी सांगूं लागले म्हणजे रंग तेव्हांच उभा रहावयाचा ! महादजी शिंदा पुण्यास मोठ्या इतमामानें येऊन आपला अल्पवयी यजमान जो सवाईमाधवराव त्यास शिकारीस वगैरे नेऊन त्याचें मन आपल्या प्रतिस्पर्ध्यावरून उडावें म्हणून त्याच्या खटपटी, दिल्ली वगैरे प्रांत जिंकून आल्यामुळें आपलें मूळ पद विसरून पुणेंकर पेशवाईवर शिंदेशाईची हरएक कसबाच्या, चातुर्याच्या कामांत चढाई दाखविण्याची त्याची इच्छा, व हें सर्व मोडून काढण्याकरितां नानाफडणवीस यांच्या शहाणपणाच्या युक्त्या; त्याचप्रमाणें सवाईमाधवराव गेल्यावर त्यांच्या गादीवर बाजीरावसाहेब आले असतां त्यांचा स्वच्छंदी व बेबंदशाही कारभार; पुढें यशवंतराव होळकर पुण्यावर चाल करून येत असतां त्यानें वाटेंत जेजुरीस सैन्याचा तळ देऊन तेथें आपलें कुलदैवत जे खंडेराव महाराज त्यांजपुढें भंडारा उधळिला असतां देवाचा खंडा उभा राहिलेला पाहून आतां फत्ते खास होते असा अंगांत आवेश पूर्ण चढून तो पुण्यावर एकदम कसा चालून आला व नंतर त्याच्या सैन्याची व शिंद्यांच्या फौजेची लढाई सुरू झाली असतां शिंद्याचे घोडेस्वार घमेंडींत चढून मूर्खपणानें तोफखाना मागें सारून होळकरावर चाल करून कसे गेले व त्यांची होळकरानें लवकरच कशी कत्तल उडवून टाकून व शिंद्याचा सर्व मोड करून तो पुण्यांत एकदम कसा घुसला इत्यादि पेशवाईच्या इतिहासांतील गोष्टी इतक्या रसभरीत व चित्तवेधक अशा हरिशास्त्री यांनीं सांगाव्या कीं, त्यापुढें त्यांच्या श्रोत्यांस वेळेचें किंवा नैमित्तिक कर्माचेंहि भान राहूं नये !

येणेंप्रमाणें पेशवाईंतील मोठमोठ्या थोर पुरुषांच्या शूरपणाविषयीं, त्यांच्या शहाणपणाविषयीं व वैभवाविषयीं अशा उत्कृष्ट रीतीनें मनावर ठसणाऱ्या गोष्टी ऐकून विष्णुशास्त्री यांच्या स्वदेशाभिमानानें विशेष पेट घेतला. विष्णुशास्त्री यांच्या देशाभिमानांत आणि हल्लींच्या आपल्या दुसऱ्या विद्वान् लोकांच्या देशाभिमानांत फरक येवढाच आहे कीं, हल्लींच्या

विद्वानांच्या देशाभिमानाची स्फूर्ति युरोपियन लोकांच्या इतिहासांच्या वाचनापासून व ब्राईट, ब्राडलॉ, ह्यूम वगैरे अति थोरमनाच्या पुरुषांच्या भाषणांपासून उत्पन्न झाली आहे; आपले हल्लींचे राज्यकर्ते इंग्लिश लोक यांस या देशांत बादशाही अंमल चालविण्याला कोणत्याहि प्रकारें अधिकार नसून, या देशांतील लोकांस अमेरिका किंवा कानडा या देशांतील लोकां-प्रमाणें प्रजेचे हक्क मिळण्यास कोणतीहि हरकत नाहीं; व ते मिळविण्या-करितां त्यांनीं जात, धर्म, पंथ वगैरे आपापसांतील भानगडी विसरून जाऊन एक जुटीनें फक्त स्वदेशाविषयीं अभिमान धरून राजकर्त्यांबरोबर भांडण्यासाठीं कंबरा बांधल्या पाहिजेत. अशी स्वदेशाभिमानाबद्दल जी अलीकडे राष्ट्रीय सभेच्या चळवळीनें सुधारलेल्या तऱ्हेची समजूत उत्पन्न झाली आहे, ती विष्णुशास्त्री यांची नव्हती. त्यांच्या देशाभिमानाचा उगम मराठे व पेशवे यांच्या इतिहासापासून होता. या देशांत इंग्रजी अंमल बुडून जाऊन पुन्हां पेशवाई होईल अशी जरी त्यांस आशा नव्हती, तरी ज्याप्रमाणें प्रसिद्ध कादंबरीकार सर वॉलटर स्कॉट हा जॉर्ज राजांची पूर्ण कृपा अनुभवीत असतां व युवराजांस आपल्या घरीं मोठ्या सन्मानानें आणून, त्यांचें चांगलें आदरातिथ्य करून, त्यांच्या हातून बारोनेट हा किताब मोठ्या संतोषानें घेत असतांहि, त्याच्या स्वामिभक्तीचा गुप्त प्रवाह मागेंच पदच्युत होऊन देशोधडीस लागलेल्या हतभाग्य स्टुअर्ट राज-घराण्यांतील पुरुषांकडे वाहत असे, त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री यांची ब्राह्मण-बादशाहीचें बिनवारस ठरलेल्या, राज्यभ्रष्ट झालेल्या, दुर्दैवी, परंतु मानी, अशा शेवटल्या पुरुषाविषयीं मनोवृत्ति पूर्ण स्वामिभक्तीची व कनवाळू-पणाची होती!

सन १८७५ सालच्या आरंभास कृष्णशास्त्री हे तीन महिन्यांची रजा घेऊन विष्णुशास्त्री व सीतारामपंत याजवर घर सोंपवून वृद्ध मातुःश्री, कुटुंब, व लहान मुली वगैरे मंडळी बरोबर घेऊन महायात्रेस निघून गेले. काशीस जाण्याविषयीं मातुःश्रींची बरेच दिवसांपासून कृष्णशास्त्री यांच्या मागें उठावणी होती. शेवटीं या वर्षी वरील योग येऊन मंडळी यात्रेच्या मार्गास लागली. यात्रा करीत असतां जागोजाग स्नानें, उपास, श्राद्धें वगैरे

करितां करितां कृष्णशास्त्री यांची प्रकृति बरीच अशक्त झाली. तथापि इतके लांब आलेच होते, तेव्हां खटलें काशीस ठेवून ते एक ब्राह्मण व एक कारकून येवढेच बरोबर घेऊन दिल्ली व आग्रा हीं शहरें पाहून आले. आग्रा येथील ताजमहाल पाहून कृष्णशास्त्री यांस—विष्णुशास्त्री सांगत असत—फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. विणुशास्त्री म्हणत कीं, "ज्या महालाचें पूर्व वयांत पूर्ण हौस व उल्हास असतांना शास्त्रीबुवांनीं येवढें उत्कृष्ट वर्णन केलें आहे तोच * * त्यांनीं या वयांत प्रत्यक्ष पाहूनहि त्याची त्यांस फारशी मौज वाटली नाहीं !".

आग्र्याहून परत येत असतां कृष्णशास्त्री यांच्या उरांत कळ निघण्यास आरंभ झाला. पुढें ते लवकरच पुण्यास आले परंतु कळ कमी न होतां त्यांस पालपिटेशन (काळजाची धडधड) हें सुरू झालें. डॉक्टरांस वगैरे दाखवून पाहतां ही विकृति हार्ट डिझीज होय व त्याजबरोबर डायाबिटिस सुद्धां उत्पन्न झाला आहे असें त्यांस कळून आलें, परंतु औषधोपचार वगैरे केल्यानें कृष्णशास्त्री यांस तूर्त आराम पडला. या वेळीं कृष्णशास्त्री यांच्या समाचारास विष्णुशास्त्री यांचे हेडमास्तर मि. कुंटे हे आले होते. इकडील तिकडील गोष्टी झाल्यावर वरील नवीन उपस्थित झालेल्या विकृतीसंबंधानें संभाषणाचा ओघ आला असतां समयोचित भाषणांत महाचतुर असे मि. कुंटे अस्वस्थचित्त असलेले कृष्णशास्त्री यांस म्हणतात, "नाहीं, पण रोगानें आपलें बिऱ्हाड एकदाचें आणून ठेवलेंच म्हणावयाचें तर !"

या सालच्या फेब्रुवारी व मार्च महिन्यांत बडोद्याचे स्वामी मल्हारराव गाइकवाड यांजवरील विषप्रयोगाचा खटला उपस्थित होऊन मोठमोठ्या राजांच्या कमिशनाची स्थापना, विलायतेहून सारजंट बालंटाईन यांचें आगमन, मल्हारराव महाराजांवर विषप्रयोगाचा चार्ज स्थापित न होतांहि त्यांची मद्रपट्टणाकडे उचलबांगडी, व त्या सरसींच नेटीव वर्तमानपत्रांची कोल्हेकुई इत्यादि गोष्टींनीं पुण्यांत कांहीं वेळ बरीच चळवळ होऊन राहिली होती. या वेळीं पुणेंकर मंडळीस झालेलें दुःख व सरकारांनीं केलेल्या अन्यायाबद्दल त्यांची पूर्ण नापसंती हीं दर्शविण्याकरितां भरलेल्या

सभेचा पुचाटपणा हा लक्षांत ठेवण्याजोगा होता. विष्णुशास्त्री या प्रसंगाची हकीगत सांगत असतां म्हणाले, " कोणी पूर्ण देशाभिमानी गृहस्थांनीं सभेंत सूचना आणली कीं, सरकारच्या या अन्यायी वर्तनाबद्दल त्यांजकडे पुणेंकर लोकांच्या नांवानें एक प्रोटेस्ट पाठवावा; कोणाचें म्हणणें कीं, आपल्या लोकांत एखादा वडा राजा मरण पावला म्हणजे त्याबद्दल सुतक दाखविण्याकरितां कांहीं वेळ गंध लावणें टाकण्याची जी चाल आहे तिचें या प्रसंगीं अवलंबन करावें; अशा प्रकारच्या जबरदस्त सूचनांवर सूचना बड्या मंडळींत चालल्या असतां व कोणाचा कोणाशीं मेळ न पडत असतां तेथेंच दूर बसलेल्या छोटेखानी मंडळींत टीका चालू झाली कीं, ' या बड्या धेंड्यांच्यांनीं गप्पांशिवाय दुसरें कांहीं होणें नाहीं. कांहीं झालेंच तर छोटेखानी मंडळी करील तर करील ! ' येणेंप्रमाणें बरीच भवति न भवति होऊन कांहीं तरी एक पोकळ रेझोल्यूशन करून सभा विसर्जन झाली. "

पुणें शहरास सार्वजनिक सभा भरण्याकरितां स्वतंत्र व सोयीची अशी जागा नाहीं अशी पुष्कळ दिवस पुढारी मंडळीस उणीव वाटत होती. परंतु अशा कामास पैसे पुष्कळ लागणार असल्यामुळें व यापूर्वी सार्वजनिक चळवळहि थोडीच असल्यामुळें टौनहॉलसारख्या सार्वजनिक इमारतीचा योग आला नाहीं. परंतु रावबहादूर माधवराव गोविंद रानडे यांची या शहरीं प्रिन्सिपॉल कोर्टवर सन १८७२ सालीं नेमणूक झाल्यापासून सार्वजनिक कामास बरीच तरतरी आली. शेवटीं या सालच्या ऑगस्ट महिन्यांत मुंबईप्रमाणें येथेंहि टौनहॉल बांधण्याच्या विचाराकरितां एक सभा भरली. तिच्या संबंधानें हकीकत विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " मंडळी जमून सभेचा उद्देश वगैरे सांगितल्यानंतर त्याच्या उपयुक्ततेबद्दल सर्वांची खात्री तेव्हांच झाली; परंतु तो तडीस नेण्याकरितां पैशाची यादी निघून तत्त्वमशीशीं गांठ आली तेव्हां यादी गोरीची काळी न होता, ती एकाच्या हातांतून दुसऱ्याच्या, दुसऱ्याच्या हातून तिसऱ्याच्या हातांत पडूं लागली ! इतक्यांत सार्वजनिक सेक्रेटरी मि. शिवराम हरि साठे हे सहज ती यादी घेऊन छोटेखानी मंडळीकडे आले असतां मी प्रथम

तिजवर एक महिन्याच्या भर पगाराचा आंकडा टाकला असतां मि. शिवरामपंत आश्चर्य करून म्हणाले, " ही नवी मंडळी कांहीं चमत्कारिक आहे ! " मि. कुंटे यांनींहि सर्व पगाराचा आंकडा घातला; परंतु व्यवहारदक्ष रावबहादुरांचा पगाराच्या निम्माच आंकडा पडला ! "

येथें विष्णुशास्त्री यांच्या पैशाच्या व्यवस्थेसंबंधानें कांहीं लिहिणें जरूर आहे. विष्णुशास्त्री यांस हायस्कुलांत नोकरी लागल्यापासून कृष्णशास्त्री यांनीं त्यांस आपला पगार घरांत खर्चावयास न देतां तो निराळा ब्यांकेंत ठेवीत जावा म्हणून सांगितलें होतें; व तसेंच सीतारामपंतांसहि सांगितलें होतें. घरांत जेवणाखाण्याचा वगैरे सर्व खर्च कृष्णशास्त्री यांच्या पगारावरच दोघांचा चाले. आपल्या मागें आपल्या चिरंजिवांनीं व बंधूंनीं आपल्या उत्पन्नावर निर्वाह करावा व सर्वांचा पैसा एकत्र केल्यानें संसार वाढल्यावर भांडणाचा प्रसंग न यावा म्हणून कृष्णशास्त्री यांनीं ही उत्तम व्यवस्था केली होती; व पुढें लक्ष्मणरावांनींहि हीच वहिवाट अनुसरून चालावें अशी शास्त्रीबोवांची इच्छा होती.

याप्रमाणें विष्णुशास्त्री यांस आपल्या पगारांतून कुटुंबाकरितां म्हणून खर्च मुळींच करावा लागत नसे. कृष्णशास्त्री यांनीं विष्णुशास्त्री यांस आपले पैसे वेगळे ठेवण्यास सांगितल्यानंतर मग ते किती सांचले आहेत, किंवा ते ते ब्यांकेंतच ठेवतात किंवा दुसरीकडे खर्च करितात, याबद्दल त्यांची कांहीं विचारपूस नसे. अशा रीतीनें पहिल्यापासून कुटुंबखर्चाचा कांच नसल्यामुळें व शिवाय पगाराखेरीज निबंधमालेपासून वर्षाच्या अखेरीस सुमारें चारशें पांचशें रुपये रहात असल्यामुळें विष्णुशास्त्री यांस पैशाची फारशी कदर वाटत नसे. तथापि मोठा भळभळीत झोंकदार पोषाख करावा, गाड्याघोड्यांवरून मिरवावें, अत्तरगुलाबांनीं लिप्त असावें किंवा दारू, रंडिबाजी वगैरे ढंगांत पैसे नासावे अशी विष्णुशास्त्री यांच्या मनाची प्रवृत्ति कधीं झाली नाहीं. अशी स्थिति असल्यावर पैशाला खर्च तो कशाचा ? त्यांना पुस्तकांचा मात्र नाद असल्यामुळें या बाबीकडे त्यांचा साधारण बराच खर्च होत असे; मुंबईस ते किंवा त्यांचे कोणी स्नेही गेले म्हणजे नवीन पुस्तकांबद्दल विष्णुशास्त्री यांची नेहमीं ऑरडर

असावयाचीच ! मराठींतील कोणतेंहि उपयुक्त ग्रंथ किंवा मासिक पुस्तकें असोत, तीं त्यांनीं विकत घेऊन आपल्या संग्रहीं आणून ठेवावयाचीं. त्याचप्रमाणें मेमन लोकांच्या दुकानांतून किंवा आदितवारच्या लिलावांतून जुने ऐतिहासिक ग्रंथ, ज्यांच्या आतां पुनरावृत्ति न निघून ते फारसे दृष्टीस पडत नाहींतसे झाले आहेत, ते नीट बांधवून त्यास ते मोठ्या आस्थेनें आपल्या लायब्ररींत ठेवीत. येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांच्या पैशाची स्थिति असल्यामुळें व शिवाय टाऊनहालसारख्या उपयुक्त संस्थेला पैशाची चांगली मदत देणें अत्यावश्यक आहे असें त्यांस वाटल्यामुळें वर निर्दिष्ट केलेल्या प्रसंगीं यादीवर त्यांच्या हातून जें रौप्यमुद्राशतकाचें अवतरण झालें तें ठीकच झालें.

या सालच्या ऑगस्ट महिन्यांत विष्णुशास्त्री यांस प्रथमच कन्या झाली; परंतु ती पांच सहा दिवसांतच मरण पावली. यानंतर दहा पंधरा दिवसांनीं त्यांची आजी, जिनें त्यांचें लहानपणापासून त्यांच्या आईपेक्षांहि अधिक असें लालनपालन केलें होतें व जिची त्यांच्यावर त्यांच्या गुणांवरून सीतारामपंतांपेक्षांहि जास्त प्रीति असे, तीहि मरण पावली. हिचें या वेळीं वय सुमारें ६८ वर्षांचें होतें. काशीयात्रेहून आल्यापासून ही आजारीच होती. विष्णुशास्त्री यांना हिजविषयीं तिच्या शहाणपणावरून व तिच्या त्यांजवरील ममतेवरून यापुढें पुष्कळदां आठवण होत असे.

याच सुमारास विष्णुशास्त्री आणि मि. कुंटे यांच्या बेबनावास प्रथम आरंभ झाला. मि. कुंटे यांच्या तऱ्हेवाईक वागणुकीवरून व त्यांच्या धर्म, आचार यासंबंधीं मतांवरून विष्णुशास्त्री यांच्या मनांत पहिल्यापासूनच आपल्या हेडमास्तरांविषयीं अनुकूलसा ग्रह नव्हता. तथापि उघडपणें त्यांच्याविरुद्ध बोलण्याचा किंवा त्यांच्या बरोबर वाद घालण्याचा अझून त्यांस प्रसंग नव्हता. दोघांचीहि परस्परांशीं वागणूक बेताबाताचीच होती. परंतु या वेळीं एकदां मि. कुंटे, विष्णुशास्त्री व दुसरे कांहीं असिस्टंट मास्तर हे सहज गप्पा मारीत बसले असतां मि. कुंटे, ज्यांस कोणास काय बोलावें किंवा कोठें बोलावें याचा मुळींच पोंच नसे व ज्यांस

लोक बराच मान देतात अशा गृहस्थांविषयीं विशेष कारण नसतां अनादरानें बोलण्याची वाईट खोडी असे, ते अंमळ रंगांत येऊन हंसून बोलले, " There are some people here (Poona) who pass for great men and yet who cannot speak two sentences correctly in English ; (विष्णुशास्त्री यांजकडे हंसून पाहून व त्यांच्या पाठीवर हात ठेऊन) Shastriboa well knows that ! " असेंच दुसऱ्या एका प्रसंगीं मि. कुंटे हे विष्णुशास्त्री यांस उद्देशून जातां जातां चेष्टा करून म्हणाले, " तें आहे कीं नाहीं—अनेकविद्यामूलतत्त्वांत—घटका—भटकावयव." हेडमास्तरांच्या आपल्या वडिलांविषयीं अनादरपणाच्या अशा ह्या जल्पनेपासून विष्णुशास्त्री यांच्या मनांत मि. कुंटे यांजविषयीं जी आढी बसली ती आमरणांत तशीच राहिली. त्यांचा स्वभाव जात्या गरीब, स्वतः होऊन दुसऱ्यास म्हणून कधीं त्रास द्यावयाचा नाहीं असा असे खरा; परंतु कुंटे यांच्याप्रमाणें कोणीं खोडी केली असतां ती ते कधीं विसरत नसत, असा त्यांचा बराच खुनशी स्वभाव असे. दुसरा एखादा व्यवहारदृष्टि मनुष्य असता तर स्वीय किंवा पितृनिंदाहि निमुटपणें गिळून जाऊन पुनः हेडमास्तरांपुढें लाळ घोटण्याकरितांहि जाता, किंवा विष्णुशास्त्री यांच्या खुनशी स्वभावापेक्षां अधिक सुस्वभावाचा मनुष्य असता तर मि. कुंटे यांची विद्वत्ता वगैरे गुणांकडे लक्ष देऊन त्यांची जल्पना मनावर न घेता; परंतु ज्याप्रमाणें वसंत ऋतु एरवीं रम्य व उपभोग्य खरा आणि वर्षाकाळ एकसारखी झिमड लागून चोहोंकडे चिखलच चिखल झालेला असा सकृत्दर्शनीं अप्रिय वाटतो, तथापि परिणामीं पहिल्या काळापेक्षां दुसराच अधिक फलद्रप असतो; त्याप्रमाणेंच आमच्या मतें विष्णशास्त्री हे अधिक सुस्वभाव असून त्यांच्या अंगीं वरिष्ठांचे टोले न जुमानण्याची शक्ति असती, तर त्याजपासून विद्याखात्यास त्यांच्यापासून केवळ बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर किंवा कृष्णशास्त्री यांच्याप्रमाणें उपयोग झाला असता; व स्वतः विष्णुशास्त्री यांस चांगली बढती मिळून त्यांचें पुष्कळ हितहि झालें असतें. परंतु असा योग घडला असता तर त्यांच्या अंगची मोठी योग्यता व अलौकिक हिंमत हीं प्रकट होऊन त्यांच्या हातून यापुढें

जी अमोल्य देशसेवा घडून आली तो मात्र होण्याचा संभव नव्हता!

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री व मि. कुंटे यांच्या वैमनस्यास मूळ बीज पितृनिंदा हें होय. यानंतर त्यांत भर पडण्यास विष्णुशास्त्री यांच्या अंगीं जे कांहीं दोष होते तेहि कारणीभूत झाले. विष्णुशास्त्री यांच्या अंगीं शिक्षकामध्यें जे कांहीं गुण—वेळच्या वेळीं शाळेंत जाणें, नियमित वेळीं वर्ग घेणें, चांगल्या आस्थेवाईक विद्यार्थ्यांप्रमाणें वाईट उनाड मुलांच्याहि अभ्यासाकडे लक्ष पुरविणें वर्गांतील क्याटलागांची वगैरे ठाकठोक ठेवणें हे असावे लागतात—त्यांची बरीच कमतरता होती. विष्णुशास्त्री यांचा सकाळचा वेळ बहुतेक लिहिण्यांत व वाचण्यांत जावयाचा; यामुळें वेळेचें फारसें भान न राहून व शिवाय घरांतील माणसांमागें वेळेवर स्वयंपाक करण्याचा त्यांचा लकडा नसल्यामुळें शाळेंत जाण्यास त्यांस बहुतेक उशीरच व्हावयाचा. त्याबद्दल हेडमास्तर कधीं त्यांच्यापाशीं, कधीं दुसऱ्यांपाशीं बोलत; परंतु विष्णुशास्त्री यांनीं आपण शाळेंत वेळेवर जाण्याची तजवीज न करितां ते हेडमास्तरांवरच विनाकारण रागावत! त्याचप्रमाणें घंटा वाजतांच लागलींच वर्गावर जाणें हेंहि विष्णुशास्त्री यांच्या हातून होत नसे. पहिला तास लीझरचा असून शास्त्रीबोवांची स्वारी लायब्ररींतील बुकांत गढली असली आणि शिवाय हेडमास्तर वर्गाकडे जाण्याची भीति नसली म्हणजे त्यांची वर्गावर जाण्याची अर्धा तास तरी निचिंती झाली म्हणून समजावें! बरें, वर्गावर गेल्यावरहि गणित वगैरे विषय शिकविण्याचें त्यांच्या वांट्यास आलें असलें म्हणजे मुलांस उदाहरणें वगैरे समजून सांगण्याचें काम पहिल्या मुलावरच पडावयाचें. येणेंप्रमाणें स्थिति असल्यामुळें वार्षिक परीक्षेंत विष्णुशास्त्री यांच्या वर्गाचा रिझल्ट बेताबाताचाच होई व त्यामुळें त्यांस नांव ठेवण्यास मि. कुंटे यांस जागा सांपडे. मग कधीं त्यांच्याकडे मि. कुंटे यांनीं खालचा क्लास द्यावा, कधीं सर्व शाळेचें संस्कृतच त्यांस घ्यावयास लावावें; यावरून नंतर विष्णुशास्त्री यांची व हेडमास्तरांची कटकट व्हावी; दोन दोन दिवस शास्त्रीबोवांनीं हेडमास्तरांनीं केलेले व्यवस्थेस न जुमानतां मला अमुकच वर्ग माझ्या हक्काचा आहे तो मला दिल्याशिवाय मी

मुळींच शिकविणार नाहीं, असा हेका धरून कोणतेहि वर्गावर न जातां लायब्ररींतच वाचीत बसून रहावें. अशी बेबंदी मधून मधून चाले! मि. कुंटे यांचा स्वभाव जसा अप्रबुद्ध होता तसा तो भित्राहि असे. शास्त्रीबोवांचा आणि त्यांचा सामना प्रत्यक्ष झाला म्हणजे मि. कुंटे यांची नांगीच पडे. मग याला मध्यस्थ घाल, त्याला मध्यस्थ घाल, असें करून शास्त्रीबोवांची कशी तरी समजूत पाडून मि. कुंटे शाळेचा गाडा एकदांचा चालता करीत !

तथापि येथें ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं, विष्णुशास्त्री यांस त्यांच्या लहान सहान दोषांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या गुणांची पारख करणारा असा एखादा दुसरा समंजस हेडमास्तर मिळाला असता तर त्यांत त्याचा, शास्त्रीबोवांचा व एकंदर शाळेचा फार फायदा झाला असता यांत संशय नाहीं. कारण विष्णुशास्त्र्यांसारखा मर्मज्ञ व विद्वान् मनुष्य, ज्याचा स्वभाव मानी खरा, परंतु त्यांच्या वांटेस न गेलें तर तो अतिगरीब असे, ज्याचा इंग्रजी, संस्कृत व मराठी या भाषांतील ग्रंथांशीं उत्तम परिचय, ज्याचे पूर्ण वक्तृत्वानें भरलेले अप्रतिम लेख आमच्या महाराष्ट्र देशांतील विद्यार्थ्यांच्या कित्येक पिढ्या विद्याभिरुचीनें व देशाभिमानानें उज्ज्वलित करण्यास साधनीभूत होऊन राहिले आहेत, त्यापेक्षां त्या वेळीं विद्या-खात्यांत अधिक खऱ्या योग्यतेचा शिक्षक सांपडणें म्हणजे विचाराचीच गोष्ट होती ! त्यांतून विष्णुशास्त्री त्यांस शिकविण्याची म्हणजे स्वाभाविकच मोठी हौस असे. ते एकदां सांगत होते कीं, " रा. काशीनाथपंत गोडबोले एक्झिक्युटिव एंजिनियर हे एके दिवशीं सहज हायस्कुलांत येऊन गप्पाटप्पा चालत असतां म्हणाले, " काय बोवा, मास्तरच्या कामाचा मोठा त्रास, नाहीं बरें ? मला वाटतें कीं, एक तास शिकविणें आणि तीन तास वाचीत बसणें बरोबर होईल ! " यावर टीका करून विष्णुशास्त्री म्हणाले, " या मंडळीस शिकविण्याचा येवढा काय त्रास वाटतो कोण जाणें; मी स्वतः चार चार तास शिकविलें तरी मला त्याचें फारसें कांहीं वाटत नाहीं. " याशिवाय विष्णुशास्त्री यांच्या अध्यापनाच्या हौसेचें दुसरें प्रमाण म्हटलें म्हणजे त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे वारंवार

त्यांस वकीलीचा वगैरे अधिक प्रतिष्ठेचा व किफायतीचा धंदा करण्यास सांगत असतां ते त्याकडे दुर्लक्ष करीत व शिवाय सरकारी हायस्कुलाची नोकरी सोडल्यावरहि जर त्यांस तो धंदा आवडता ना तर त्यांनीं तो पुन्हां खासगी रीतीनें पतकरला नसता; परंतु त्यांस त्या धंद्याची पूर्ण हौस असल्यामुळें त्यांनीं लागलीच न्यू इंग्लिश स्कूलचा खटाटोप मांडला !

तेव्हां शिक्षकाच्या अंगीं जे प्रधान गुण—विद्वत्ता, शिक्षणपद्धति व त्या धंद्याबद्दल हौस—हे तिन्ही गुण विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं अप्रतिमपणें वास करीत असून त्यांस नादान शिक्षकांत मोडणें म्हणजे आपल्या शहाणपणाचीच परीक्षा दाखविणें होय ! विष्णुशास्त्री यांच्या हातून शिक्षकाचें काम जितकें चांगलें वठावें तितकें न वठण्याचीं कारणें अर्थातच दुसरींच कांहीं असलीं पाहिजेत. तीं हींच कीं, हेडमास्तरची असिस्टंट मास्तरांस वागविण्याची तऱ्हेवाईक रीत—म्हणजे वरच्या तीन चार असिस्टंटांस खालचे वर्ग व खालच्या असिस्टंटांस वरचे वर्ग शिकविण्यास सांगणें—व त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री यांचा एरवीं गरीब स्वभाव खरा, परंतु कांहीं अंशीं तो तर्कटी असलेला ओळखून त्यांस जे विषय शिकविण्यास आवडतील ते द्यावयाचे टाकून त्यांऐवजीं भलतेच व त्यांची मानखंडना व्हावयाजोगे असे द्यावयाचे. यामुळें शिकविण्याच्या कामांत त्यांचें फारसें मन नसे. एकदां याच सुमारास त्यांचे मित्र मि० महाजनी हे सहज पुण्यास आले असून ते त्यांस शाळेंत भेटण्याकरितां गेले असतां त्यांचें वर्गाचें काम तसेंच चालू होतें. तें पाहून मि० महाजनी हे पुढें एका प्रसंगीं सांगत होते कीं, "वर्गांतील पहिल्या दहा बारा मुलांनाच कायतें येत होतें; बाकी तितक्याच मुलांस कांहीं समजत होतें असें दिसत नव्हतें. प्रश्न विचारतांना शास्त्रीबोवांचें बोट आठ दहा मुलांखालीं गेलें म्हणजे पुढील दशकावरून तें झरकन् फिरून पहिल्या मुलावर येई !" विष्णुशास्त्री सांगत असत कीं, "पहिला वर्ग आम्हांकडे मराठीशिवाय कधीं यावयाचा नाहीं; कधीं दुसऱ्या वर्गाची एखादी तुकडी व कधीं दुसऱ्या वर्गापासून बाकी सर्व खालच्या इयत्तांचें संस्कृत हीं आम्हांस मिळायाचीं; परंतु पहिल्या क्लासचें इंग्लिश किंवा संस्कृत किंवा इतिहास

हे विषय आमच्या वांट्यास कधींहि आले नाहींत. " यावरून एखाद्या उमदी आरबी घोड्यास नांगरास किंवा खटाऱ्याच्या गाडीस जुंपून त्याच्या हातून बैलासारखेंहि काम होत नाहीं म्हणून म्हणणाऱ्या गांवढळ मनुष्याचा जितका शहाणपणा तितकाच, शिक्षकास अत्यावश्य लागणाऱ्या प्रधान गुणांनीं विभूषित अशा विष्णुशास्त्रयांस नादान शिक्षक म्हणून ठरविण्यांत आपला होणारा आहे !

या सालाच्या मालेंतील अंकाचा मुख्य विषय लोकभ्रम व वक्तृत्व हे आहेत. लोकभ्रमावरील तीन अंकांत पिशाच, शकुन, व ग्रहफळें, ज्यांच्याविषयीं आपल्या लोकांत व विशेषेंकरून जुन्या समजुतींच्या लोकांत मोठा विश्वास दृष्टीस पडतो व जेणेंकरून आपली गृहस्थिति बरीच दूषित झाली आहे, त्यांजकडे विष्णुशास्त्री यांची लेखणी फिरली. हल्लीं कांहीं लोकांचा असा समज झाला आहेसा दिसतो कीं, विष्णुशास्त्री यांस अलीकडलें सर्व नापसंत व पूर्वींचें तेवढें सर्वच पसंत वाटत असे. परंतु हा समज केवळ ज्यांनीं निबंधमालेचा मधलाच एखाद दुसरा अंक वाचला असेल त्यांचा होय. वरील समजूत पूर्ण चुकीची असून विष्णुशास्त्री कित्येक जुन्या अनर्थकारक समजुतींविषयीं किती कडक रीतीनें लिहित असत याविषयीं पुढील एक उतारा देतों.

" आतां विशेषतः आपल्याच लोकांत चालू असणारे असे कांहीं प्रकार सांगतों. पहिला मोठा अपशकून म्हणजे विधवा स्त्रियांचा. या करुणास्पद विषयाविषयीं क्षणभरहि विचार करतांना ज्याचें हृदय अत्यंत खेदानें व संतापानें व्याप्त होऊन जात नाहीं त्यास केवळ पाषाणहृदय व अधमाधम म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. स्त्रियांचें जिणें मुळींच पराधीन असल्यानें व संसारदुःखाचें मोठें ओझें त्यांच्यावरच नेहमीं असल्यानें त्यांची स्थिति एकंदरींत कठिणच; पण त्यांतूनहि वैधव्याच्या योगानें त्यांचा सगळाच आधार जेव्हां एकदम तुटतो, तेव्हां त्यांच्या विपत्तीची तर सीमाच होते. त्यांतहि आमच्या देशांत जी त्यांची स्थिति दृष्टीस पडते तीहून दुःखास्पद अशी स्थिति थोडीच ! इतरांस दुःखाची स्थिति प्राप्त झाली असतां ते लागलेच सर्वांच्या दयेस व मैत्रीस पात्र होतात; पण तेंच सगळें वरील अनाथ प्राण्यांच्या ठायीं विपरीत होतें. ज्या

वैधव्यदुःखाची वेदना सहन न होऊन बिचाऱ्या स्त्रियांनीं सुष्ट दुष्ट कसाहि नवरा असला तरी आपल्या पातिव्रत्यधर्मास जागून अंगावर शहारे आणणाऱ्या रीतीनें त्याच्या चितेवर आपल्या देहाची आहुति द्यावी, किंवा तसें न झालें तर आमरणांत त्याच्या करितां केवळ तपस्व्याच्या वृत्तीनें रहावें, त्याच महा दुःखाबद्दल त्यांचा कळवळा कोणास येत नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यांच्याच प्रारब्धदशेचें तें फळ असें म्हणून त्यांचा उलटा छळच होण्यास आरंभ होतो! हा प्रकार आमच्या देशास अत्यंत लांछनरूप होय यांत संशय नाहीं. असो; यासंबंधानें जितकें लिहावें तितकें थोडेंच. प्रस्तुतस्थलीं इतकेंच सांगतों कीं, ज्या अपशकुनाच्या प्रकारासंबंधानें सध्यां आम्ही लिहित आहों, तो सर्वथा व्यर्थ आहे हें तर आहेच. पण शिवाय तो मानणें हें विपद्ग्रस्त मानवी प्राण्याचा उपमर्द करणेंहि होय. केवळ दैवयोगानें किंवा यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या स्थिति-विशेषावरून मनुष्यास मंगल किंवा अमंगल मानावें हा केवढा अन्याय आहे? स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप, भाऊ, बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाईकांचें तरी कां तोंड बघावें? पण मुळीं हा केवढा मूर्खत्वाचा प्रकार आहे? जी अत्यंत सदाचरणानें आपलें आयुष्य क्रमून आपल्या कुलासच तर काय, पण साऱ्या मनुष्यजातीस भूषण आणीत आहे—कारण मनुष्याचें अंतःकरण स्वभावतःच किती अस्थिर व दुष्ट असतें हें सर्व प्रसिद्धच आहे—त्याच साध्वीचें दर्शन, पुरते तेरा दिवसहि जाऊं न देतां जो निर्लज्ज व विषयांध पुनः नवरा मुलगा होऊन उभाच, अशा पुरुषानें अशुभ मानावें हा केवढा उलटा न्याय!! आणि अशा निष्पाप स्त्रीचें दर्शन जर शुभ नव्हे, तर सगळ्या कपाळभर जिनें कुंकवाचा पट्टा ओढला आहे अशा एखाद्या नगरभवानीचें अथवा उभयकुलांस आणि अवघ्या मनुष्यजातीस जिनें स्त्रियांचें सहज भूषण जी लज्जा ती समूळ टाकून देऊन काळोखी आणली अशा बाजारबसवीचें तिच्या केवळ बाह्यवेषावरून अत्यंत शुभदर्शन झालें काय? असो; तर याप्रमाणें सुविचारानें दिसणारा मार्ग आणि जगाचा धोपटमार्ग या दोहोंत अनेक वेळां इतकें अंतर दिसतें. यासारखेंच दुसरेंहि वेडगळ अपशकून, कोणी दाराबाहेर पडतो आहे इतक्यांत पुढें जर बोडका ब्राह्मण आला तर खुंटलेंच त्याचें जाणें! मग हा ब्राह्मण चांगला सत्पात्र, सुशील, सज्जन कसाहि कां असे ना! पण तोच

जर एखादा महाशंख मोठी शालजोडी पांघरून व मोठ्या लफ्याचा पदर लावून पुढें आला, कीं शकुन उत्तम! तसेंच कोणी क्लीबांचेंहि दर्शन तसेंच अशुभावह मानतात. हें करणें म्हणजे जें मनुष्याच्या स्वाधीनचें नाहीं त्याबद्दल उगीच विनाकारण त्यास हिणविणें आहे."

लोकभ्रमानंतर विशेष महत्त्वाचा या सालचा विषय वक्तृत्व हा होय. वक्तृत्वगुण संपादण्याकरितां कोणकोणत्या गोष्टींची जरूर आहे, तो निरनिराळ्या देशांत कसकसा प्रगल्भ दशेस आला, त्यांत अतिप्रवीण असे ग्रीस, रोम, इंग्लंड वगैरे देशांतून कोण कोण होऊन गेले, त्यांच्या पासून त्या देशांस कोणकोणते फायदे झाले वगैरे गोष्टींचें विवेचन संपवून विष्णुशास्त्री हे या देशांतील वक्तृत्वाकडे वळले. प्राचीन काळीं इकडील वक्तृत्वाचें स्वरूप कसें होतें हें पुराणांवरून व बखरींवरून दाखवून, त्याचप्रमाणें धर्मविषयक वक्तृत्व जें कीर्तन त्याचीहि हकीकत देऊन हल्लीं हा वक्तृत्वगुण आपणांमध्यें कोणत्या स्थितींत आहे, तो सुधारण्यास वक्तृत्व सभांची वगैरे योजना किती उपयोगी पडण्यासारखी आहे व हल्लींची आपल्या देशाची स्थिति या गुणाच्या उत्कर्षास कितपत अनुकूल आहे इत्यादि गोष्टींचें या निबंधावलींत पूर्ण विवेचन केलें आहे. शेवटीं आपल्या देशांत निरनिराळ्या भागांत हल्लीं नांव घेण्यासारखे असे वक्ते कोणकोण आहेत त्यांचा निर्देश करून हा विषय संपविला आहे. या वक्ते मंडळींत आर्यसमाजाचे स्थापक माजी पंडित दयानंद यांचा शिरकाव नवीन मंडळींनीं केलेला न साहून विष्णुशास्त्री यांनीं पंडितजींची विद्वत्ता, त्यांचीं वेडगळ मतें, त्यांचा या शहरांत झालेला वडा सत्कार, त्यांचीं व्याख्यानें, त्याचप्रमाणें त्यांचें मूर्तिपूजाखंडणार्थ पारायण संपल्यावर भटभिक्षुकांच्या नाकांवर मोठ्या थाटानें गजेंद्रावरून काढलेला त्यांचा छबिना, व शेवटीं त्याचें धुळवडीवर झालेलें हास्यास्पद पर्यवसान ह्या सर्वांचें मोठें मजेदार वर्णन शास्त्रीबोवांनीं मालेच्या तोविसाव्या अंकांत केलें आहे. ज्या पुष्कळ लोकांस आजच आपल्या मूर्तिपूजाधर्माचा उच्छेद होऊन त्याच्या जागीं आर्यसमाज किंवा प्रार्थनासमाज यांसारख्या निर्जीव संस्थांची स्थापना होणें इष्ट वाटत नसेल व ज्यांस वाचनाची कांहीं तरी गोडी असेल त्यांचीं तर

वरील बहारीचें वर्णन वाचून हंसून हंसून पोटें दुखूं लागतीलच; परंतु ज्यांचीं धर्ममतें विष्णुशास्त्री यांच्यापेक्षां वेगळीं असतील त्यांस सुद्धां वरील वर्णनांतील भाषेचा चटकदारपणा व वर्णनांची खुबी पाहून मौज वाटल्यावांचून राहणार नाहीं !

वरील अंक प्रसिद्ध होतांच व नवीन मंडळींनीं लागलीच चोहोंकडून काहूर आणिलें. विष्णुशास्त्री यांचे पूर्वाश्रमींचे गुरु मि० वामन आबाजी मोडक यांनीं मालेचा एकविसावा अंक परशुराम क्षेत्रीं वाचून नवीन धर्मसमाज व नवीन सुधारक मंडळी यांचा कैवार घेऊन विष्णुशास्त्री यांजकडे त्यांच्या वेड्या समजुती नाहींशा करण्याकरितां एक 'निबंधमालेच्छु' या सहीचें पत्र निबंधमालेंत छापण्याकरितां पाठविलें. तें मालेच्या चोविसाव्या अंकांत छापिलें आहे. मि. मोडक यांचें पत्र येण्यापूर्वींच पुण्यांतील नव्या मंडळींतील कित्येक जुन्या मतांच्या लोकांस पंडित दयानंदाचा केलेला गौरव, त्याचप्रमाणें पुनर्विवाह, देशी व्यापारोत्तेजन वगैरे महत्कार्यांकडे लहानसहान मंडळींची योजना करून देऊन आपण वऱ्हाडी मंडळींच्या मानापमानाचे गात्र धनी होऊन बसण्याची कित्येक विद्वान व पुढारी म्हणून मिरविणाऱ्या मंडळींची हौस हीं रुचत नसून अशा मंडळींची एकदां चांगली शोभा करावी अशी त्यांची फार इच्छा असे. एके वेळीं विष्णुशास्त्री यांचे स्नेही रा. कृष्णाजी परशुराम गाडगीळ हे त्यांस म्हणाले, "शास्त्रीबोवा, या रिकामटवळ्या मंडळींचा एकदां चांगला फजिता करा हो. मीं त्यांचा खोटाच कैवार घेतलासा करून तुम्हांस पत्र पाठवून देतों आणि सर्व मंडळी तुमच्या जाळ्यांत घालून देतों. मग घ्या तुम्ही त्यांचा चांगला समाचार ! उगाच वेड्यांनीं दंभ मांडायाचे. एकाच्या तरी अंगांत खरी कळकळ, कीं देशप्रीति, कीं धर्मवासना आहे काय ? सर्व पोषाखी मंडळी !"

परंतु मि. मोडक यांच्या पत्रानें रा. गाडगीळ यांच्या वरील खोट्या पत्राची गरजच ठेविली नाहीं; आणि कदाचित् मि. मोडक यांच्या खऱ्या पत्रापेक्षां मि. गाडगीळ यांच्या खोट्या पत्रानें वरील पोषाखी सुधारक मंडळी विष्णुशास्त्री यांच्या लेखणीच्या तडाख्यांत अधिक बिनचूक आणून

देतां आली असती किंवा नाहीं याचा संशयच आहे ! मि. मोडक यांचें मूळ पत्र व त्यावर विष्णुशास्त्री यांनीं दिलेलें उत्तर हीं दोन्हीं वाचण्यासारखीं आहेत. मि. मोडक यांचें म्हणणें कीं, “ या देशांत हल्लीं धर्म, नीति, लोकाचार, व्यापार वगैरे संबंधानें चळवळ सुरू होऊन तिजमुळें जागोजाग निरनिराळ्या वक्तृत्वसभा, पुनर्विवाहोत्तेजक मंडळ्या, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, व्यापारोत्तेजक मंडळ्या स्थापन झाल्या आहेत व होत आहेत, व त्या सर्वांचे उद्देश चांगले असून त्यांचे उत्पादक व चालक हे सर्वत्र चांगले थोर परोपकार बुद्धीचे लोक असून शास्त्रीबुवांना त्यांचे नाहींत ते दोष काढून त्यांचा व्यर्थ अमर्याद उपहास करण्यांतच मोठें भूषण वाटतें. हल्लीं या देशास जी नष्ट दशा प्राप्त झाली आहे ती नाहींशी करावी म्हणून जी प्रमुख मंडळी खटपट करीत आहे, तिच्या अंगीं वरील महत् कार्यास लागणारी योग्यता—देशाविषयीं खरा कळवळा,—वगैरे कांहीं नसून नुसता डौल मिरविण्याकरितांच ती पुढें होते; तेव्हां अशा लोकांपासून देशाचें कल्याण होण्याचें तर दूर राहून त्यांच्या दुर्बलतेनें व अप्रयोजक प्रयत्नांनीं आपल्या लोकांची कमी योग्यता मात्र व्यक्त होत आहे, असे जे दोषारोप निबंधमालाकारानें केले आहेत ते वरील मंडळ्यांस व पुढारी झालेल्या व्यक्तींस ‘ एकहि अंशीं लागू न पडतां ’ मालाकाराचा मात्र आपला डौल मारण्याचा झोंक दृष्टीस पडतो. ” येणेंप्रमाणें मि. मोडक यांनीं विष्णुशास्त्री यांस वरील मंडळ्यांविषयीं व त्यांच्या पुढारी व्यक्तींविषयीं आपले विचार स्पष्ट कळविण्याची न कळत संधि आणून देतांच विष्णुशास्त्री यांनीं एकविसाव्या व तेविसाव्या अंकांत जे नुसते दोषारोपच केले होते त्यांच्या पुष्टीकरणार्थ त्यांनीं आतां चोविसाव्या अंकांत प्रमाणेंहि दिलीं. त्यांनीं पुनर्विवाहोत्तेजक सभा, देशी व्यापारोत्तेजक मंडळ्या वगैरेंची प्रथम हकीकत देऊन मि. मोडक यांच्या पत्रांतील अखेरचे कांहीं शब्द—“ निःस्पृहपणा, स्वदेशाविषयीं योग्य अभिमान, खरा कळवळा, कोणत्याहि कार्याच्या सिद्ध्यर्थ निर्भयपणें व निभिडपणें सतत प्रयत्न करणें हे गुण आपल्या लोकांत फारच थोड्यांच्या अंगीं आहेत ” —जे कदाचित् आपल्या मुख्य मुद्याविरुद्ध जातील हें त्यांच्या लक्षांत न

येऊन सहजवृत्त्या पडून गेले होते, तेच विष्णुशास्त्री यांनीं उचलून त्यांचा पूर्ण विरोध मि. मोडक यांच्या पत्रांतील पूर्व भागांतील मुख्य वादाचे शब्द–" सर्वच सुधारणेच्या पद्धति व्यर्थ, पोकळ व आरंभशूरपणाच्या, व त्यांचा उपक्रम करणारे सर्व लब्धप्रतिष्ठ, डौल मिरविणारे, दांभिक, भलताच आव घालणारे, अविचारी व आरंभशूर असें म्हणणें एकांशीं देखील खरें नाहीं, "–यांच्याशीं दाखवून विष्णुशास्त्री यांनीं आपल्या गुरूंवर कोटी ठेवून दिली ! हा गुरुशिष्यांचा सामना पाहून अंबिकेचा कैवार घेऊन आलेला व पूर्ववयीं चोवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केलेला भार्गवराम व त्याचा शिष्य जो शंतनुपुत्र यांच्या पुराणगत युद्धकथेची कोणा रसिक वाचकांस आठवण होणार नाहीं बरें ?

या वर्षाच्या बऱ्याच अंकांत विष्णुशास्त्री यांनीं आपल्याकडील नवीन मंडळींनीं प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरे जे नवीन धर्मपंथ चालू केले आहेत त्यांसंबंधानें त्यांजवर जागोजाग बरेच टोले दिले आहेत व यापुढें ते इतके फारसे आले नाहींत; तेव्हां हा भाग संपविण्यापूर्वीं विष्णुशास्त्री यांची धर्मसंबंधीं मतें काय होतीं, याविषयीं या स्थलीं उल्लेख करणें जरूर आहे. हीं त्यांस स्वतंत्रपणें सांगण्याचा कधीं प्रसंग आला नाहीं; दुसऱ्या विषयासंबंधानें लिहितांना कधीं त्यांचा भाग आला तेवढाच उरकून घेऊन त्यांचा मधून मधून निर्देश मात्र त्यांनीं केलेला आहे. त्यांचें स्वतंत्र व यथास्थित प्रतिपादन एक वेळ करण्याचा त्यांचा बेत होता; परंतु त्यांचा अल्पवयांतच काळ झाल्यामुळें इतर पुष्कळ गोष्टींप्रमाणें तोहि सिद्धीस गेला नाहीं. तथापि त्यांचीं धर्ममतें जीं त्यांच्या लेखांतून तुटक तुटक अशीं आढळतात त्यांवरून व शिवाय चरित्रकार व इतर जवळची मंडळी यांच्यापाशीं तीं प्रतिपादन करतांना ते जें बोलत असत त्यावरून तीं देण्याचा आम्ही यत्न करितों.

धर्मासंबंधीं विचार म्हटला म्हणजे तो दोन प्रकारचा आहे. एक धर्मतत्त्वाविषयींचा—म्हणजे ही सृष्टि कोणी केली, तिचा कर्ता कोणी आहे किंवा नाहीं, असलाच तर तो सर्व शक्तिमान् असा आहे कीं काय, कीं त्याच्या इच्छेनेंच केवळ आपणांस या जगांतील सर्व सुखदुःखें हीं

प्राप्त होतात, तसें असेल तर ज्या अनंत यातना आपण येथें भोगतों त्या त्याच्याच इच्छेचीं मूळें आहेत कीं काय, व तसें असेल तर त्यास बापापेक्षां दयाळू व आईपेक्षां कनवाळू असें कसें म्हणतां येईल, त्याच-प्रमाणें जननमरण वगैरे अनेक महत्त्वाचे विषय यांच्यासंबंधानें आपल्या भोंवतालील समाज काय म्हणतो याचा विचार न करितां केवळ तत्त्ववेत्त्याप्रमाणें फक्त सत्याकडे नजर देऊन त्यांचा निकाल दुसऱ्यांस न सांगतां आपणांपुरतांच आपण करावयाचा. दुसरा प्रकार निवळ सत्यास अनुसरून नसून तो केवळ समाजाकरितां सांप्रदायिक असा म्हणजे आपल्या एकट्या व्यक्तीचींच धर्ममतें, ज्यांच्या सत्यतेबद्दल आपली इतकी खात्री नाहीं कीं तीं दुसऱ्यांस प्रतिपादन करून सांगावीं; तीं आपल्या ठिकाणींच राहूं देऊन पूर्वापार चालत आलेलीं जीं समाजाचीं धर्ममतें तीं आपलींहि आहेत असें म्हणून त्याप्रमाणें आपलें बाह्य वर्तन ठेवणें. तेव्हां या दोन्ही प्रकारासंबंधानें विष्णुशास्त्री यांचे काय समज होते याचा आपणांस विचार करावयाचा आहे.

आतां प्रथम विष्णुशास्त्री यांच्या फक्त धर्मतत्त्वाविषयींच्या मताबद्दल विचार केला असतां तीं अर्थातच इतर पुष्कळ विद्वान लोकांप्रमाणेंच होतीं—म्हणजे मनुष्यांचें ज्ञान या येवढ्या मोठ्या प्रश्नाच्या विचारांच्या मानानें फारच अल्प आहे; ईश्वर आहे किंवा नाहीं हें आपल्याच्यानें निश्चित असें कांहीं सांगतां येणार नाहीं; त्याचप्रमाणें तो सर्वसमर्थ असून त्याची इच्छा हीच केवळ आपल्या सुखदुःखांस कारणीभूत आहे, तो दयावंत आहे किंवा कसा आहे वगैरे त्याचे गुणावगुण ह्यांचें ज्ञान आपणा मनुष्यांस निश्चित झालें आहे, हें म्हणणें म्हणजे निवळ खोटें बोलण्याप्रमाणें होय; त्यापेक्षां ह्या गोष्टी आम्हां अल्पज्ञ मनुष्यांस कांहींच बरोबर कळत नाहींत असें म्हणणें हें सत्यनिष्ठ तत्त्वज्ञाच्या ब्रीदास अधिक अनुसरून आहे. विष्णुशास्त्री ह्यांनीं दोन तीन वेळां कणादाची मरणसमयींची गोष्ट—त्यास कोणी ईश्वराच्या नामस्मरणाची आठवण केली असतां त्यानें तत्त्वज्ञानाचा बाणा निर्वाणप्रसंगींहि न विसरून फक्त ' कणाः कणाः ' हेच शब्द उच्चारले—ही सांगून त्याबद्दल त्यांनीं आपली पसंती दाखविली

असें आम्हांस आठवतें.* याशिवाय खऱ्या धर्मतत्त्वाविषयींचें सर्व प्रसिद्ध वचन " धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां। महाजनो येन गतः स पंथाः । " हें असल्या विषयासंबंधानें त्यांच्या तोंडीं नेहमीं असे. तेव्हां तत्त्ववेत्त्याच्या दृष्टीनें देव एक आहे किंवा ते अनेक आहेत किंवा कोणी देवच नाहीं या गोष्टीबद्दल विष्णुशास्त्री यांच्या मनाची खात्री नव्हती.

ही गोष्ट केवळ त्यांच्या स्वतःच्या तत्त्ववेत्त्याच्या सत्यदृष्टीपुरती झाली. येथपर्यंत त्यांचा आणि इतर विद्वान मंडळींचा पूर्ण मेळ आहे; परंतु धर्ममतांचा दुसरा प्रकार म्हणजे सांप्रदायिक तऱ्हेचा—जेथें मतांच्या सत्यतेबद्दल विचार नसून समाजाच्या व्यवस्थेला कोणतीं मतें उपयुक्त आहेत येवढाच विचार आहे, तेथें कित्येक नवीन विद्वानांचा आणि विष्णुशास्त्री यांचा मोठा मतभेद आहे. आपला हिंदुधर्म जुना खरा; परंतु त्यांत वेळोवेळीं योग्य फेरबदल न झाल्याकारणानें कालांतरानें त्यांत पुष्कळ दोष जमले आहेत, यामुळें व त्याचा आणि इतर पुष्कळ धर्मांचा दिवसेंदिवस अधिकाधिक निकट संबंध येत चालला आहे, यामुळें त्याच्या ठिकाणीं पुष्कळ नवीन विद्वान मंडळींची श्रद्धा कमी होत चालली आहे हें साहजिकच आहे. कोणत्याहि राष्ट्राची उन्नति होण्यास प्रथम त्याची धर्मोन्नति झाली पाहिजे हा जो इतिहासवेत्त्यांचा सिद्धांत आहे त्याप्रमाणें धर्मोन्नतीचा जो एक प्रकार धर्मशुद्धि तिजविषयीं हल्लीं चोहोंकडे थोडी-बहुत चळवळ सुरू झाली आहे. थोड्या बहुत प्रकारें आपल्या धर्मांत सुधारणा होऊन त्याचा गाडा चांगला चालू व्हावा अशी बहुतेक लोकांची इच्छा आहे; परंतु आपल्यांतील कांहीं मोठमोठ्या पुढारी मंडळींची धांव धर्मशुद्धीपेक्षांहि जास्त असून नवीन धर्मस्थापनेविषयीं त्यांची खटपट चालू आहे व आज हजारों वर्षें चालत आलेला जो मूर्तिपूजा धर्म त्याचा उच्छेद करून टाकून त्याच्या जागीं ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज यांची स्थापना व्हावी अशी त्यांची इच्छा आहे. विष्णुशास्त्री यांचें म्हणणें असें

* यांपैकीं विशेष महत्त्वाचा प्रसंग म्हटला म्हणजे पुढें ६ वे भागांत सांगितलेला कृष्णशास्त्री यांचे मरणसमयीं ईश्वराच्या नास्तित्वाबद्दल त्यांच्या भाषणावरून आलेला होय !

असें कीं, कोणत्याहि धर्मपद्धतींत दोष दाखवणें हें सोंपें आहे; परंतु तें काढून टाकणें म्हणजे महाप्रयासाचें काम होय; आणि त्यांतून नवीनच धर्मस्थापना आणि तीहि सध्यांच्या सज्ञान व चौकस अशा काळांत करणें म्हणजे दिवसाढवळ्या जादूचा प्रयोग करून दाखविण्यासारखें अशक्य होय! धर्मास जीं कित्येक आंगें असतात त्यांत दैविक चमत्कार (Miracles) म्हणून एक प्रधान आंग असतें; आणि तें समाजांतील अज्ञ लोकांस बंधन करणारी अशी एक मोठी बळकट शृंखलाच होय. परंतु हें प्रधान आंग प्रस्तुतसारख्या काळीं नवीन समाजधर्मांत कसें आणतां येईल हें कळत नाहीं. मिलटन् कवीनें कवितेसंबंधानें म्हटलें आहे कीं, कवितेला उत्कृष्ट अनुकूल काल म्हटला म्हणजे होमर कवीचा प्राचीन काल होय. ज्या वेळीं एखादें राष्ट्र उदयास येऊं लागतें आणि बहुतेक समाज कांहीं अज्ञान कांहीं सज्ञान अशा स्थितींत असतो आणि त्यांच्या ठिकाणीं विचारशक्तीपेक्षां कल्पनाशक्तीचा प्रभाव अधिक असतो अशी वेळ कवीच्या उदयाला फार उत्तम होय. हीच गोष्ट पुष्कळ अंशीं धर्मस्थापनेलाहि लागू पडणारी आहे. बौद्ध धर्म, ख्रिस्ती धर्म, महंमदी धर्म हे स्थापन होतांना त्यांच्या राष्ट्रांची हीच स्थिति होती; परंतु आपल्या सध्यांच्या स्थितीकडे पाहिलें तर आपल्या समाजाचें दिवसोंदिवस वृद्धिंगत होणारें ज्ञान हें, व बुद्ध, ख्रिस्त व महंमद यांसारख्या केवळ सध्यांच्या काळीं अवतारी पुरुषांचा आपणांमधील अभाव यामुळें आपल्या देशांत नवीन धर्मस्थापनेचा योग येणें बरेंच कठिण दिसतें!

तेव्हां हल्लींच्या आपल्या स्थितींत मूळ धर्मास अजिबात सोडून देणें हें आपणांस फायदेशीर होणार नाहीं, असें विष्णुशास्त्री यांचें म्हणणें असे. सर्व जगांत अत्यंत प्राचीन जो आपला हिंदुधर्म, ज्यांचें अवलंबन करूनच प्राचीन काळीं आपले विख्यात पूर्वज जे आर्य लोक त्यांचा सर्व प्रकारें उत्कर्ष झाला त्यांत कांहीं दोष आहेत म्हणून त्यांचा उच्छेद करून त्याच्या जागीं अधिक प्रबल व अधिक शुद्ध असा धर्म आमच्या हल्लींच्या लोकांत धैर्य, धर्मश्रद्धा वगैरे गुणांचा अभाव असतांहि स्थापूं पाहणाऱ्या आमच्या पुढारी लोकांचें शहाणपण मात्र व्यक्त होत आहे! ज्याप्रमाणें

एखाद्या भव्य व विस्तीर्ण परंतु जुन्या इमारतींत कांहीं गैरसोयी वाटूं लागल्या आहेत म्हणून तिच्या जागीं दुसरी नवीन इमारत बांधण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य नसतां ज्यांना जुनी इमारत पाडण्याचें मात्र सोपें काम करितां येईल अशा असमंजस लोकांनीं पुष्कळ लोकांचा आश्रयहेतु जो वरील जुनी इमारत ती पाडण्याच्या कामीं एकदम प्रवृत्त व्हावें या तोडीचेंच आमच्या कित्येक विद्वान् लोकांचें वरील कृत्य होय! आज युरोपांत आपल्या देशापेक्षां सर्व गोष्टींचें ज्ञान इतकें अधिक असतां, शिवाय तेथील लोकांच्या अंगीं धैर्य, पराक्रम, सहस्रपट अधिक असतां, त्याचप्रमाणें आपल्या हिंदुधर्माप्रमाणेंच त्यांच्या ख्रिस्ती धर्मांतहि दोषस्थलें बरींच असतां, त्यांमध्यें फार झालें तर कोणी ह्यूम, गिबन, मिल्ल यांसारखें एरवीं समाजापेक्षां पुढें जाऊन ख्रिस्ती धर्मावरचा विश्वास उडालेले व धर्मसंबंधानें केवळ उदासीन असे आढळतात; परंतु एकंदर सामान्य लोक हें नवीन धर्मस्थापना करणें किती कठिण आहे हें जाणून प्रार्थनासमाज, आर्यसमाज यांसारख्या हास्यास्पद यत्नांस मुळींच हात घालीत नाहींत! कधीं कधीं ख्रिस्ती धर्माच्या वेगळ्या वेगळ्या शाखा निघतात; परंतु मूळ धर्म झुगारून देण्याची कल्पना कोणाच्याहि मनांत येत नाहीं; तर सर्व लोक—मग ते विद्वान असोत किंवा अविद्वान असोत—अंशतः दोषरूप अशा जुन्या ख्रिस्ती धर्माचाच आश्रय धरून आहेत.

तेव्हां सुधारलेल्या व ज्ञानसंपन्न अशा युरोपखंडाची जर अशी स्थिति आहे तर आमच्या पुढारी मंडळीनें आमच्या जुन्या हिंदुधर्मांत कांहीं दोष आहेत म्हणून त्यास झुगारून देऊन नवीन धर्मस्थापनेची व्यर्थ खटपट करण्यापासून आमच्या देशाचें हित न होतां व्यर्थ तंटेबखेडे मात्र माजून आज विनाकारण पीडा मात्र होणारी आहे. त्यापेक्षां पूर्वापार ज्या आपल्या लोकांत धर्मसमजुती आहेत—म्हणजे कांहीं वेदग्रंथांतून, कांहीं धर्मशास्त्रांतून, कांहीं पुराणांतून अशा आलेल्या, व कांहीं अलीकडील साधुसंत यांच्या ग्रंथांतून व चरित्रांतून घेतलेल्या, व कांहीं तर फक्त रूढीमार्गानें चालत आलेल्या—या सर्वांची विसंगतता न करितां ज्याप्रमाणें इतर धर्मांत लोकांच्या लक्षांत न येतां शेंकडों बदलाबदली झाल्या आहेत

त्याप्रमाणें आमच्या धर्मांत हळुहळू होत गेल्यानें त्यांतील दोषसंख्या कमी कमी होत जाऊन तो विस्तवांतून काढलेल्या सोन्याप्रमाणें अत्यंत उज्ज्वल असा होईल. परंतु हा क्रम सोडून देऊन आर्यसमाजाचे स्थापक पंडित दयानंद यांच्या प्रमाणें वेदांचाच पक्ष धरून पुराणांचा उपहास केल्यानें व मूर्तिपूजानिषेधाबद्दल भलतीच वडवड केल्यानें आज लाखो मनुष्यांच्या धर्मसमजुतींस व्यर्थ धक्का देण्याचें अत्यंत वेडेपणाचें कृत्य होणारें आहे! तर ज्याप्रमाणें आपल्या लोकांनीं यामागें आपल्या पूज्य ग्रंथ-श्रुति, स्मृति, पुराण—व रूढि यांची विसंगति न दाखवितां त्या सर्वांचा उलटा मिलाफच आहे असें गृहीत धरून त्याप्रमाणें सामान्य जनसमूहास ते सांगत आले—तें इतकें कीं तुकारामबोवा ज्यांच्या अभंगांतील मजकुराचा आणि वेदांतील मजकुराचा कांहीं एक संबंध नाहीं, त्यास ‘ तुका पांचवा हा वेद ’ असें सामान्य लोक तर समजतातच; परंतु वामन पंडितांनींहि ज्यांस उद्देशून ‘ जयाची वदे नित्य वेदांतवाणी। कसें हो म्हणावें तयालागिं वाणी ॥ ’ असें म्हटलें—तोच प्रशस्य प्रघात हळुहळू आमच्या पुढारी विद्वान लोकांनीं चालविला तर आमची धर्मशुद्धि होऊन आमचें व आमच्या पुढील प्रजांचें असें सर्वांचेंच हरएक प्रकारें कल्याण होण्यासारखें आहे.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचीं दोन प्रकारचीं मतें सांगितलीं. पहिलीं मतें अर्थातच स्वतः पुरतीं असल्यामुळें ते लौकिकांत कधीं सांगत नसत. दुसरीं जीं सांप्रदायिक तीं सुद्धां केवळ जुन्या तऱ्हेचीं नसून पुष्कळ अंशीं एकेश्वरी पद्धतीचीं अशीं त्यांनीं गुप्तपणें दर्शविलीं आहेत. ज्यांनीं निबंधमालेच्या प्रत्येक वर्षाचे अखेरचे अंक लक्ष लावून वाचले आहेत त्यांस आमच्या म्हणण्याची प्रचिति आलीच असेल. पहिल्या वर्षाचे अखेरच्या अंकांत आपलें मासिक पुस्तक निर्विघ्नपणें चालू झालें याबद्दल परमेश्वराची प्रार्थना करतांना ते येणेंप्रमाणें लिहितातः——

“ पहिल्यानें संपूर्ण विश्वाचें सूत्र चालविणारा जो परमेश्वर, ज्याच्या कृपेशिवाय सर्व मनुष्यप्रयत्न व्यर्थ होत, त्यास आम्ही मनोभावानें कृतज्ञता-

पूर्वक नमन करितों; आणि आमच्या कृत्यास यश येण्याकरितां प्रसाद मागतों. ”

यापुढील वर्षांच्या अखेरीच्या अंकांतून सुद्धां अशाच प्रसंगीं त्यांचे शब्द ‘ विष्णु ’ किंवा ‘ शिव ’ वगैरे नसून केवळ मोघम ‘ जगन्नियंता, ’ ‘ जगच्चालक ’ इत्यादिच आहेत. तेव्हां कित्येक मंडळींचा जो समज आहे कीं, विष्णुशास्त्री यांचीं धर्ममतें अगदीं जुन्या तऱ्हेचीं होतीं तो चुकीचा होय. ते प्रार्थनासमाज वगैरेंची निंदा करीत, परंतु ती केवळ त्यांच्या देशसुधारणेच्या चुकीच्या मार्गासंबंधानें, मतांच्या संबंधानें नव्हे. वेद, पुराण व रूढि यांतून चांगल्या चांगल्या गोष्टी मुकाट्यानें घेतल्या म्हणजे त्या चालतात; परंतु त्यांविषयीं विनाकारण बभ्रा किंवा वितंडवाद केल्यानें लोकांचा विरोध मात्र जागृत होऊन इच्छित कार्य फसतें ही गोष्ट विष्णुशास्त्री यांच्या पूर्ण लक्षांत होती; व त्यांनीं नवीन धर्मसमाजांवर जरी मधून मधून कडाखा उडविला आहे तरी त्यांचें मुख्य एकेश्वरी मत हें त्यांनीं मुकाट्यांनीं स्वीकारलें आहे हें जो कोणी त्यांचे लेख अंमळ लक्ष लावून वाचील त्यास कळण्यासारखें आहे !

———

भाग ५.

विचारस्वातंत्र्य.

"I am sure that no good in the way of self-culture will be done by young men who accustom themselves to lean upon others, who are always finding new leaders and professing themselves disciples of new Ganvaliels. They must learn to think their own thoughts, to form their own opinions, valuing authority justly but not submitting to it slavishly."

—Plain living and high thinking, D. Adam.—

मागील भागांत विष्णुशास्त्री यांस वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं सामोपचाराचा बुद्धिवाद केला असतां त्यांनीं त्याकडे दुर्लक्ष करून आपलीं मतें निर्भिडपणें प्रतिपादन करण्याचा क्रम चालू ठेविला म्हणून सांगितलें आहे. आतां यापुढें त्यांचा हाच क्रम चालू असतां एके प्रसंगीं इंग्लिश ग्रंथकारांच्या संबधानें त्यांच्या कडक टीकेवरून पुनः मोठा गवगवा होऊन विद्याखात्याचे डायरेक्टर यांची त्यांजवरील मर्जी अगदीं उडून जाऊन ते त्यांस या कामीं प्रतिबंध कसा करावा याविषयीं विचार करूं लागले; इतक्यांत विष्णुशास्त्री यांच्या गृहस्थितींतहि बरीच बदल होऊन तिचें पर्यवसान त्यांच्या पुढील आयुष्यक्रमावर या सुमारास कसें होऊं लागलें वगैरे गोष्टींची हकीकत, त्याचप्रमाणें नवीन स्वतंत्र उद्योग—ज्यांपैकीं चित्रशाळा छापखाना हा मुख्य होय—यास प्रथम सुरवात कशी झाली याचाहि वृत्तांत या भागांत आणिला आहे.

विष्णुशास्त्री* यांचे बंधु लक्ष्मणरावऽ हे १८७३ अखेर डोळे बिघडून मुंबईस औषधोपचारासाठीं गेले म्हणून तिसऱ्या भागांत सांगितलें आहे. यानंतर त्यांची प्रकृति बरी होऊन ते १८७५ सालच्या अखेरीस बी. ए. च्या परीक्षेंत उतरून ते पुढील सालच्या आरंभापासून मेडिकल कॉलेजांत पुढें अभ्यास करण्यास जाऊं लागले. कृष्णशास्त्री यांची इच्छा होती कीं, निदान धाकट्या मुलानें तरी एल्. एल्. बीचा अभ्यास करावा; परंतु विष्णुशास्त्री यांच्या सहवासानें लक्ष्मणराव यांसहि कायद्याच्या अभ्यासाचें महत्त्व न वाटून त्यांनींहि पित्राज्ञा उल्लंघिली. यामुळें कृष्णशास्त्री यांस अंमळ वाईट वाटलें.

यानंतर विष्णुशास्त्री यांचे चुलते सीतारामपंत× यांनीं १८७४सालापासून डेक्कन कॉलेज सोडून बाबा गोखले यांच्या शाळेंत शिक्षकाचें काम पतकरलें म्हणून मागें सांगितलेंच आहे. हे स्वभावतः मोठे धीट असून त्यांची बोलण्याची वगैरे शैली चांगली असल्यामुळें त्यांची विद्यार्थीवर व जे कोणी गृहस्थ शाळा पाहण्यास येत, त्यांजवर चांगली छाप बसे. सन १८७६ सालीं शाळेची वार्षिक परीक्षा घेण्याकरितां कर्नल वाडिंग्टन साहेब आले असतां त्यांनीं सीतारामपंताची हुषारी पाहून शाळेचे हेडमास्तर बाबा गोखले यांजकडे पाहून विचारलें " हा इतका हुषार असिस्टंट तुम्हांला कोठें मिळाला ? " यावर बाबांनीं " हा कृष्णशास्त्री यांचा धाकटा भाऊ आहे " असें उत्तर दिल्यावरून साहेब खुष झाले ! सीतारामपंत शाळेचें काम करून ज्ञानप्रकाश छापखान्याच्या प्रथम एडिटरचें व मागून म्यानेजरचेंहि काम पाहूं लागले. याप्रमाणें ते हळुहळू अभ्यास सोडून प्रपंचाच्या मार्गास लागत चालले.

येणेंप्रमाणें वडील मुलगा व भाऊ प्रपंचाच्या मार्गास लागून ते

---

* या भागाच्या आरंभीं घातलेल्या फोटोग्राफमधील खुर्चीवर बसलेल्या गृहस्थांपैकीं डावीकडून उजवीकडील दुसरे गृहस्थ.

ऽ खुर्चीवर बसलेल्या गृहस्थांपैकीं डावीकडून उजवीकडील तिसरे गृहस्थ.

× खुर्चीवर बसलेल्या गृहस्थांपैकीं डावीकडील पहिलेच गृहस्थ.

आपणांपासून बहुतेक अंशीं सुटल्यासारखेच झाले व धाकटा मुलगाहि क्रमाक्रमानें त्यांच्याच मार्गास लागेल व आपण संसाराच्या कचाटींतून निर्विघ्नपणें पार पडून जाऊं असें कृष्णशास्त्री यांस वाटूं लागतें न लागतें तोंच आपल्या हिंदुलोकांच्या कुटुंबांत दर पिढीच्या अखेरीस जी अधिकार-क्रांति होत असते तिची वेळ येऊन ठेपली ! कृष्णशास्त्री यांचा उदय अगदीं गरीब स्थितींतून झाला असल्यामुळें त्यांच्या भोंवतालील पूर्वसंबंधाचा आप्तगोत सर्व गरीब स्थितींतलाच होता. त्या सर्वांचा थोडाबहुत परामर्ष त्यांस घ्यावा लागत असे. सीतारामपंतांचा विद्याभ्यास, लग्नकार्य वगैरे सर्व स्वतःच्या मुलांप्रमाणेंच कृष्णशास्त्री यांनीं केलें होतें;शिवाय त्यांचे चुलत पुतणे विनायकराव* माधवरावऽ यांसहि लग्नकार्यानिमित्त व एरवींहि थोडा बहुत हात द्यावा लागत असे; व याहूनहि त्यांच्या बायकोच्या माहेरची गरीबी असून खटला मोठा असल्यामुळें त्यांजकडे तिचा कांहीं आंतून कांहीं बाहेरून असा बराच ओढा असे. दोघे तिचे भाऊ विद्याभ्यासासाठीं नेहमीं घरांत असतच; परंतु विशेष प्रसंगीं त्यांस अधिक मदत तिला करावी लागे. याशिवाय कांहीं दूर नात्याचे व कांहीं फार दिवस ओळखीचे म्हणून त्यांचाहि मदत मागण्याचा हक्क असे. येणेंप्रमाणें कृष्णशास्त्री यांच्या घरीं या सुमारास बराच मोठा परिवार जमला होता. यापूर्वी त्यांचे चिरंजीव, बंधु, पुतणे, मेव्हणे वगैरे सर्वच लहान असल्यामुळें त्यांच्या पोरकट भांडणापेक्षां अधिक त्रास होत नव्हता; परंतु दिवसेंदिवस ते वयांत येऊं लागून त्यांच्या वेगवेगळाल्या प्रकृति होत चालल्यामुळें व निरनिराळ्या हिताहिताच्या गोष्टींवरून त्यांचीं मनें एक-मेकांविषयीं वितुष्ट होऊं लागल्यामुळें कृष्णशास्त्री यांच्या कुटुंबांत इतके दिवस स्वस्थता व आनंद जो दृष्टीस पडत होता तो हळुहळू नाहींसा होऊं लागला !

कृष्णशास्त्री यांची बायको काशीताई यांजकडे घरांतील खर्च व व्यवस्था हीं अर्थांतच असत. त्यांचा स्वभाव धार्मिक व कनवाळू असल्या-

* फोटोग्राफमधील उभ्या राहिलेल्या गृहस्थांपैकीं उजवीकडून पहिलेच गृहस्थ.
ऽ खुर्चीवर बसलेल्या गृहस्थांपैकीं उजवीकडून पहिलेच गृहस्थ.

मुळें माहेरच्या गरीब स्थितींतील माणसांस आपल्या हातून होण्यासारखी असलेली मदत करणें आपणांस उचित आहे असें त्यांस वाटत असे; मग ही मदत कधीं कधीं वाजवीपेक्षां जास्तहि होत असे. ही स्थिति कृष्णशास्त्री यांस ठाऊक नव्हती असें नाहीं; तथापि आपल्या कुटुंबांतील मनुष्यांस तिजपासून विशेष कोणताहि त्रास होत नाहीं हें पाहून ते त्या गोष्टीकडे कानाडोळा करीत; परंतु ही गोष्ट सीतारामपंत वगैरे मंडळींस पसंत वाटेना; यामुळें त्यांची आणि काशीताई यांची घरांतल्या घरांत धुसपुस होण्यास आरंभ झाला. कृष्णशास्त्री व त्यांची बायको हीं इतके दिवस आपण सीतारामपंतांचें पुत्राप्रमाणें संगोपन करून आतां त्यांच्याशीं दुजाभाव करितों ह्या दुर्लौकिकास भीत; परंतु सीतारामपंतांचा स्वभाव लहानपणापासून स्वच्छंदी, एककल्ली व अविचारी असल्यामुळें त्यांच्या दुपारीपासून कुटुंबांतील मनुष्यांस जें सुख होण्यासारखें होतें त्याचा संभव नाहींसा झाला. प्रथम पोरपणानें कृष्णशास्त्री यांचे मेहुणे काशीनाथपंत-मामा, यांचें शास्त्रीबोवांबरोबर जें त्यांचें वांकडें होतें तें आतां त्यांच्या बायकोशीं पडत चाललें; व येवढ्यावरच ही गोष्ट थांबून न राहतां ज्यांनीं सितारामपंतांचें त्यांच्या वडिलांच्या मागें सर्वतोपरी उत्तम रीतीनें संगोपन केलें त्या आपल्या वडील बंधूंविषयींहि त्यांची अप्रीति हळुहळू होऊं लागली ! मग कधीं कधीं रुसून राहून सीतारामपंतांनीं महिना महिना घरीं जेवावयास येऊं नये; दुपारीं आले तर संध्याकाळीं नाहीं, संध्याकाळीं आले तर दुपारीं नाहीं, असा क्रम त्यांनीं चालविला. कृष्णशास्त्री हे काशीयात्रेहून परत आल्यापासून हार्ट डिझीज व डायाबिटिस या दोन व्याधींनीं साधारण अव्यवस्थच असल्यामुळें ते घरांतील भानगडींत फारसें मन घालीत नसत; परंतु सीतारामपंतांच्या पोरबुद्धीला येवढा नाजूकपणा कसला ? त्यांनीं शास्त्रीबोवांस तुमची बायको मला असें असें करिते, मला घरांत राहणें बरोबर वाटत नाहीं, मला अमुक जिन्नस द्या, मला तमुक जिन्नस द्या, अशाविषयीं लांब लांब पत्रें पाठवून द्यावीं. त्यांपासून शास्त्रीबोवांस अत्यंत पीडा होई; परंतु निरुपाय होऊन थापाथापीनें कसें तरी दिवस ढकलण्याचा त्यांनीं क्रम चालविला !

आपली गृहस्थिति सुधारण्यास अझून किती जागा आहे यास हें वरील उदाहरण पुरें आहे. मुलांचें आईबापांवर हक्क कोणते, लहान भावांचे वडील भावांवर कोणते, त्याचप्रमाणें बंधूंनीं किंवा पुतण्यांनीं विती वेळ राहिलें असतां कुटुंबांतील स्वस्थतेस बाध येणार नाहीं वगैरे गोष्टींचा विचार आपल्या लोकांची गृहस्थिति सुधारणाऱ्यांनीं अवश्य करण्यासारखा आहे. आपल्या देशांत इतके दिवस बराच दंगाधोपा असल्यामुळें आपले लोकांस आपल्या रक्षणार्थ सर्वांनीं एकत्र राहण्याची इतके दिवस जरूरच होती; परंतु हल्लीं देशांत चोहोंकडे इंग्रजी अंमल सुरू होऊन स्वस्थता झाल्याकारणाणें एकत्र राहण्याची आतां फारशी गरज राहिली नाहीं. तेव्हां वेगवेगळे राहून आपापल्या उत्पन्नावर ज्याचा त्यानें आपला निर्वाह करावा ही गोष्ट अर्थातच इष्ट आहे; परंतु हें स्थित्यंतर एकाएकीं व्हावें कसें ? हळुहळू जसजसा वरील प्रकार पाहून त्यांतील अडचणी आपल्या लोकांच्या लक्षांत येत जातील तसतशी आपल्या गृहस्थितींत सुधारणा करण्याची आपणांस इच्छा होणारी आहे. वरील उदाहरणांत सीतारामपंतांचाच म्हणजे कांहीं विशेष दोष आहे असें आमच्या म्हणण्याचा भावार्थ नाहीं; असले प्रकार घरोघर वारंवार घडून येताहेत व सध्यांच्या आपल्या समाजाच्या स्थितीवरून पाहतां तसें होणें हें साहजीकच आहे. यासाठीं आमच्या सुधारक मंडळींनीं मुलांचे हक्क वेगळे, बंधूंचे वेगळे, पुतण्यांचे वेगळे यांबद्दल पूर्वीपासूनच त्यांची समजूत करून देऊन स्वतःचा चरितार्थ चालविण्याचें सामर्थ्य येतांच त्यांस त्यांच्याकडून समयिक कुटुंबांतून वेगळे राहण्याचा उपक्रम वेळेवर करविला असतां वडील पक्षाच्या ठिकाणीं संगोपन करण्याची इच्छा व धाकट्या पक्षाच्या ठिकाणीं कृतज्ञताबुद्धिहि नष्ट न होतां आपल्या कित्येक कुटुंबांत जीं भांडणें, अतोनात त्रास व आजन्म वितुष्टें हल्लीं उत्पन्न होतात तीं होणार नाहींत ! !

वरील गृहस्थित्यंतरांत विष्णुशास्त्री यांनीं मन घातलें नाहीं; कारण वडीलपणाचा अधिकार त्यांच्याकडे नसून तो त्यांच्या वडीलांकडे पूर्णपणें होता. शिवाय सीतारामपंतांचा एकवल्ली व हट्टी स्वभाव हा ते चांगला

जाणत होते. या संबंधानें ते कधीं कधीं म्हणत कीं, मनुष्य कोठें तरी पांचचार वर्षें घर सोडून बाहेर गांवीं राहून आल्याशिवाय त्याला घरचें सुख चांगलें कळत नाहीं! दिवसेंदिवस कुटुंब वाढत चालल्यामुळें व त्यांतील माणसांचे स्वभाव वेगवेगळे होत चालल्यामुळें त्यांचें एकमेकांशीं पटूं नये असें होऊं लागल्यानें विष्णुशास्त्री यांस बराच त्रास सोसावा लागे; परंतु निरुपाय असल्यामुळें तो ते मुकाट्यानें सोशीत. येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांच्या गृहस्थितीचा बिघाड, ज्याचा परिणाम त्यांच्या पुढील आयुष्यक्रमावर बरेच अंशीं झाला त्याचा प्रादुर्भाव या वेळेपासून झाला!

या सालच्या मार्च महिन्यांत कृष्णशास्त्री यांच्या हार्ट डिझीजचा आजार अधिक होऊन त्यांतच त्यांस अर्धांगवायूचीहि लहर उत्पन्न झाल्यामुळें या दुखण्यांतच त्यांचा अंत होतो कीं काय अशी एक दोन दिवस भीति वाटली; परंतु त्यांचे स्नेही डॉ. विश्राम यांनीं वेळेवर औषधोपचार केल्यामुळें ती वेळ तूर्त टळली. याच सालच्या अखेरीस विष्णुशास्त्री यांचे बंधु लक्ष्मणराव हे मेडिकल कॉलेजांत अभ्यास करीत असतां त्यांस एकाएकीं उरांत दुखण्याची व्याधि उत्पन्न झाली. लक्ष्मणरावांचा स्वभाव अगोदरच भित्रा व उतावळा आणि त्यांतून वरच्या प्रकारची व्याधि! एक दोन महिने डॉक्टरी उपचार करूनहि छातींतील दुःख कमी होत नाहीं असें पाहून हा आजार कदाचित् वडिलोपार्जित आपणांकडे आला कीं काय अशी त्यांस भीति वाटूं लागली. यामुळें त्यांनीं पुढील अभ्यास सोडून देऊन ते स्वस्थ घरीं बसले. ही त्यांची स्थिति पाहून कृष्णशास्त्री व घरांतील इतर माणसांस हें नवीनच संकट प्राप्त झालें. येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांस संसारसागरांतील वादळांचें काहूर हळुहळू दृष्टिगोचर होऊं लागलें!

या वर्षाच्या निबंधमालेच्या अंकांतील विषयांचें विवेचन करण्यापूर्वी ज्या मासिक पुस्तकांत विष्णुशास्त्री यांचा ग्रंथकार या नात्यानें प्रथम उदय झाला तें मराठी शाळापत्रक या सालच्या आरंभापासून बंद करण्यांत आलें. हें पुस्तक शाळाखात्याचेंच असून मराठी मास्तरांचें ज्ञान वृद्धिंगत व्हावें या हेतूनें तें प्रथम १८६१ सालीं सुरू झालें. पुढें तें विष्णुशास्त्री

यांच्या हातांत मागें सांगितल्याप्रमाणें अप्रत्यक्ष रीतीनें १८७५ सालीं आलें. या वेळेपासून असल्या मासिक पुस्तकाचा जो वास्तविक उद्देश तो विष्णुशास्त्री यांच्या हातून जितका सिद्धीस गेला तितका त्याच्या मागील कोणांहि चालकांच्या हातून सिद्धीस गेला नाहीं असें म्हटल्यास चालेल. ट्रेनिंग कॉलेजांत तीन वर्षे अभ्यास करून जे विद्यार्थी आपल्या मराठी शाळांवरून जातात त्यांस तेथें गेल्यावर अधिक ज्ञान प्राप्त होणें हें अगदीं इष्ट आहे. तेव्हां मराठीपेक्षां ग्रंथसंग्रहानें अधिक गब्बर अशा ज्या संस्कृत व इंग्लिश भाषा त्यांतील माहिती करून देण्याकरितां विष्णुशास्त्री यांनीं प्रथम मुख्य मुख्य संस्कृत कवींविषयीं उत्कृष्ट तऱ्हेचें विवेचन करून त्यांच्या ग्रंथांविषयीं मराठी वाचकांमध्यें अभिरुचि उत्पन्न करण्याचा यत्न केला. यानंतर कित्येक शिक्षकांनीं विष्णुशास्त्री यांजपाशीं अशी इच्छा प्रदर्शित केली कीं, संस्कृत कवींचें जसें उत्तम विवेचन झालें तसें मराठी कवींचेंहि जर तुमच्या हातून होईल तर मराठी भाषाग्रंथांत एक उत्कृष्ट भर पडल्यासारखी होईल. यावरून विष्णुशास्त्री यांनीं १८७५ सालीं ' मराठी कविता ' हा विषय हातीं घेऊन त्याचें विवेचनास आरंभ केला; परंतु त्यास प्रस्तावनेदाखल जो मजकूर त्यांनीं लिहिला त्यांत त्यांनीं शाळाखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं कांहीं अरसिक मंडळी व मिशनरी लोक यांच्या सांगण्यावरून सर्वसंग्रह नामक मासिक पुस्तकाचा सरकारी आश्रय काढून घेतल्यामुळें जुन्या मराठी कवितेचें पुनरुज्जीवनाचें काम बंद पडलें ही त्यांची मोठी चूक झाली असा निर्देश केला होता. विष्णुशास्त्री यांच्या अशा तऱ्हेच्या टीकांनीं अधिकाऱ्यांचीं डोकीं अगोदरच उठलीं होतीं, आणि त्यांतून वर सांगितलेला सरकारी अधिकाऱ्यांविरुद्धचा मजकूर सरकारी पत्रकांतच आलेला, मग काय विचारतां ? याशिवाय मराठी शाळापत्रकाचे अंक वेळचे वेळीं निघत नसल्याकारणानें कांहीं डेपुटींची त्याबद्दल बरीच ओरड होती. शेवटीं मि० चाटफिल्ड यांनीं पाहिलें कीं, शाळापत्रकाबद्दलचा बोभाट कांहीं खोटा नाहीं; तथापि तें कृष्णशास्त्री यांजकडून काढून दुसऱ्या कोणाकडे दिल्यानें कृष्णशास्त्री यांस आपला अपमान केलासा वाटेल म्हणून तें मासिक पुस्तक अजिबात बंद केल्यानें

सर्वच कटकट टळेल असा साहेबांनीं विचार करून त्याप्रमाणें या सालच्या आरंभापासून मराठी शाळापत्रक बंद करण्याबद्दल हुकूम पाठवून दिला ! या कामांत दोघांहि पक्षांचा दोष होता हें कोणीहि समंजस व निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. मराठी कवितेचें मोठ्या आस्थेनें व मार्मिकपणानें अध्ययन केलें असल्यामुळें विवेचन चांगल्या प्रकारें करण्यास विष्णुशास्त्री यांच्या सारखा ग्रंथकार सांपडणें म्हणजे खरोखरच मोठी कठिण गोष्ट होय ! परंतु विष्णुशास्त्री यांच्या शिक्षणपद्धतीविषयीं मागें लिहितांना त्यांच्या अंगीं कांहीं दोष होते म्हणून सांगितलें, तसेंच शाळापत्रक चालविण्यासंबंधानें त्यांचे जे दोन दोष होते तेहि सांगणें जरूर आहे. मराठी शाळामास्तर यांचें ज्ञान वृद्धिंगत व्हावें हा शाळापत्रकाचा एक हेतु खरा, व त्यामुळें त्यांतील मजकूर उत्कृष्ट तऱ्हेचा असावा हेंहि खरें; पण त्यांत शाळा खात्याच्या वगैरे जाहिराती घालावयाच्या त्या वेळेवर प्रसिद्ध न झाल्या तर त्या पत्रकाचा दुसरा जो हेतु कीं, इन्स्पेक्टर साहेबांचे हुकुम मास्तरांस वेळचे वेळीं कळावेत, तो शालापत्रकाचे अंक महिना दोन महिन्यांनीं मागाहून उशीरानें काढल्यानें सिद्ध होणार नाहीं हें विष्णुशास्त्री यांच्या लक्षांत येऊंच नये. त्याचप्रमाणें मराठी शाळापत्रक हें सरकारी असल्यामुळें त्यांत सरकाराविरुद्ध किंवा मिशनरी लोकांविरुद्ध मजकूर घालणें हें प्रशस्त नाहीं हीहि गोष्ट त्यांच्या मनांत येत नसे. तेव्हां एक पक्षीं सरकारचा विष्णुशास्त्री यांच्या योग्यतेसंबंधानें अजाणपणा व दुसऱ्यापक्षीं विष्णुशास्त्री यांचा एक प्रकारचा हेंकटपणा हे असल्यामुळें मराठी शाळापत्रक बंद होऊन मराठी कवितेचें विवेचन म्हणून जें अप्रतिम काम विष्णुशास्त्री यांनीं हातांत घेतलें होतें तें तसेंच्या तसेंच आरंभ होऊन पडलें. यावरून ज्या रसिक वाचकांनीं त्यांचे इतर लेख वाचिले असतील त्यांस वरील दोन गोष्टींबद्दल दुःख व तहकूब राहिलेल्या कामाबद्दल हलहळ वाटल्यावांचून खरोखर राहणार नाहीं !

या सालच्या निबंधमालेच्या अंकांचे मुख्य विषय वेदार्थयत्नावरील टीका व इंग्रजी भाषा, हे होत. वेदार्थयत्न हें मासिक पुस्तक रावबहादूर शंकर पांडुरंग पंडित हे १८७६ सालापासून काढूं लागले. यांत आपल्या

लोकांचे अत्यंत प्राचीन जे वेदग्रंथ त्यांचें मराठींत भाषांतर ते छापीत असत. त्यांचा उद्देश महाराष्ट्रभाषा ग्रंथवृद्धि हा तर खराच; परंतु त्यांहूनहि आपल्या लोकांस वेदांतील मजकुराची माहिती व्हावी असाहि होता. ज्याप्रमाणें यूरोपांत पंधराव्या शतकांत प्राचीन ग्रीक व लॅटिन या भाषांच्या अभ्यासानें जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होऊन धर्म, नीति, राज्यव्यवस्था, लोकाचार वगैरे सर्व बाबतींत तिकडील लोकांची सुधारणा झाली, तशी वेदग्रंथांचें भाषांतर झाल्यानें या देशाचीहि उन्नति होईल अशी समजूत आपल्याकडील कांहीं विद्वान लोकांची झाली आहे; परंतु ज्या पूज्य बुद्धीनें यूरोपखंडांत विद्वान लोकांनीं बायबलचें भाषांतर सर्व जनभाषांमध्यें केलें व मूळ ख्रिस्ति धर्माच्या जीवतत्त्वास धक्का न लावितां त्यावर कालांतरानें जीं दुष्ट पटलें जडलीं होतीं तीं मात्र दूर केलीं, त्या पूज्य बुद्धीनें आमच्या विद्वान लोकांनीं जर इकडे उद्योग चालविला असता तर आपलेंहि धर्मतत्त्व जें आज कालांतरानें बरेंच मलिन झालें आहे तें उज्ज्वल होऊन त्यापासून आपल्या देशाचें पुष्कळ हित होण्याचा संभव होता.

विष्णुशास्त्री यांच्या आपल्या धर्माविषयीं व तो कोणत्या रीतीनें सुधारतां येईल याविषयीं कशा समजुती होत्या; हें मागील भागांत सांगितलेंच आहे. त्यावरून त्यांस रावबहादूर पंडितांच्या 'यत्नाचा' अश्रद्धेचा झोंक आवडण्यासारखा नव्हता. वेदार्थयत्नांत जागोजाग पुराण-ग्रंथांचा कमीपणा दाखविला आहे, ब्राह्मणांस नांवें ठेविलीं आहेत, व श्रुति, स्मृति व पुराण यांची संगति तोडण्याचा यत्न केला आहे व शिवाय वेदवाक्याचें भाषांतर भारदस्त आणि मूळ ग्रंथांविषयीं पूज्यभाव उत्पन्न होईल अशा भाषेंत उतरविण्याची रावबहादुरांनीं फारशी खटपट न केल्याकारणानें विष्णुशास्त्री यांनीं 'यत्नावर' बराच कडाका उडविला आहे! त्याचप्रमाणें वेदांचें भाषांतर जें रावबहादूर यांनीं आरंभिलें त्यास आधारभूत जी सायनाचार्यांची टीका व म्याक्समूलर यांचें इंग्रजी भाषांतर त्यांचा मुळींच प्रस्तावनेंत वगैरे कोठेंच उल्लेख न केल्यामुळें व सदर्हू भाषांतर केवळ 'यत्नकारांच्याच' बुद्धीचें फळ आहे असा जो तज्ञ

नसणाऱ्या वाचकांस भास होण्यासारखा आहे त्याबद्दल तर विष्णुशास्त्री यांस अधिकच वाईट वाटून त्यांनीं ' यत्नकारांच्याच ' नीतिमत्तेबद्दल पुढील बराच कडक लेख लिहिला आहे.

" तसेंच पुन: त्याच्या चुका ज्या काढल्या आहेत त्या यत्नकारांनीं आपल्या बुद्धीनें काढिलेल्या आहेत किंवा त्या यूरोपीयन पंडितांच्या कोट्या आहेत हेंहि समजून देण्याचा बिलकूल मार्ग ठावला नाहीं. एकंदरींत वरील कृतीवरून मनुष्याच्या मनाची स्थिति ' वरुणाच्या सार्वभौमत्वाच्या वेळीं ' बरी होती किंवा विष्णूच्या हातीं सत्ता असतांना होती कीं, आतां एकेश्वराच्या अमलांत बरी आहे, याची आमच्या सर्व वाचकांस बरीच कल्पना झाल्यावांचून राहणार नाहीं ! "

विष्णुशास्त्री यांचा ज्याप्रमाणें संस्कृत ग्रंथांविषयीं प्रेमभाव असे त्याचप्रमाणें सर वुइल्यम जोन्स, डॉ० विलसन्, म्याक्समूलर वगैरे ज्या युरोपियन पंडितांच्या निष्प्रांजल व अविश्रांत मेहनतीच्या योगानें संस्कृत भाषा व तींतील ग्रंथरत्नें हीं सर्व जगापुढें आलीं त्यांविषयींहि फार प्रेमभाव व पूज्यबुद्धीहि असे. यामुळें मोक्षमुल्लराचार्यांची ' यत्नकारांकडून ' झालेली असंभावना ही विष्णुशास्त्री यांस सहन झाली नाहीं. रावबहादूर पंडितांविषयीं विष्णुशास्त्री यांचा पहिल्यापासून पूज्यभाव होता खरा; परंतु पंडित मोक्षमुल्लर यांविषयीं तो फारच अधिक असल्यामुळें व शिवाय रावबहादुरांचें नांव पुस्तकावर नसल्यामुळें विष्णुशास्त्री यांनीं तेवढीच सवलत पाहून जणुं काय न कळतच ' यत्नावर ' त्यांस जसा योग्य अभिप्राय द्यावासा वाटला तसा त्यांनीं दिला.

वेदार्थयत्नावरील टीका यापुढें या वर्षाचा निबंधमालेंतील मोठा विषय म्हटला म्हणजे इंग्रजी भाषा हा होय. या विषयावर चार निबंध आहेत. यांत इंग्रजी भाषेची उत्पत्ति, तिची वृत्ति, व हल्लींची तिची प्रगल्भ दशा या सर्वांचें विवेचन करून, तींत जो ग्रंथसंग्रह आहे तो कशा प्रकारचा आहे याविषयीं मजकूर आहे. यानंतर त्या भाषेंतील कविता ग्रंथांचें सरासरी दिग्दर्शन करून तींतील विशेष अमोलिक जो गद्यग्रंथसंग्रह त्याकडे विष्णु-शास्त्री हे वळले आहेत. गद्यग्रंथांची प्रवृत्ति इंग्लंडांत प्रथम कशी झाली

व पुढें तिचा फैलाव कसकसा होत गेला व शेवटीं गद्यग्रंथांतील मोठ्या महत्त्वाचा भाग जो ऐतिहासिक ग्रंथसमूह त्याला आठराव्या शतकांत आरंभ होऊन तो लवकरच चांगल्या स्थितीस कसा आला याचें विशेष विस्ताररूपानें विवेचन केलें आहे. इंग्रजी भाषा हा विषय फारच व्यापक असल्यामुळें त्याचें विवेचन एकाच निबंधांत होण्यासारखें अर्थातच नाहीं; म्हणून या निबंधांत या विषयाच्या इतर भागांचा केवळ निर्देश मात्र करून एका भागाचें–ऐतिहासिक ग्रंथसंग्रहाचें–पूर्ण विवेचन केलें आहे. त्याचप्रमाणें इंग्रजींतील प्रसिद्ध इतिहासकार ह्यूम, गिबन, हालाम, आर्क्, आर्म, मिल्ल, मेकाले, ग्रांटडफ इत्यादिकांची थोडक्यांत परंतु चटकदार व खुबीदार अशी माहिती दिली आहे. शेवटीं बहुतेक इंग्रजी इतिहासकारांचे प्राच्य देशांचे इतिहास लिहितांना जे ठरीव सिद्धांत–कीं, पूर्वेकडील राष्ट्रें म्हणजे नुसतीं ऐषआरामांत मग्न, भपकेदार, व नीतीनें फार खालच्या प्रतीचीं–याचें सर्वोत्कृष्ट व मुद्देसूत खंडण करून असले अप्रयोजक सिद्धांत इतिहासकारांनीं मोठ्या डौलानें प्रतिपादन केल्यापासून प्राच्य व पाश्चिमात्य अशा दोन्ही राष्ट्रांचें किती अहित होण्यासारखें आहे हें दाखविलें आहे. एकंदरींत हा निबंध विष्णुशास्त्री यांनीं जे पुष्कळ निबंध लिहिले आहेत त्यांतील, उत्कृष्टांपैकीं एक आहे. तो आमच्या देशाभिमानी व विशेषतः सत्यप्रिय वाचकांनीं अवश्य वाचावा अशी आम्ही शिफारस करितों.

या विषयांवरील तिसरा व निबंधमालेंतील एकंदरींत तिसावा अंक हा युरोपियन इतिहासकारांच्या वर सांगितलेल्या महासिद्धांतांच्या खंडणार्थ असल्यामुळें त्यांत कांहीं मजकूर इंग्रज लोकांस न आवडण्या-सारखा आहे. यामुळें इंग्लिश लोकांचे, त्यांच्या देशाचे, त्यांच्या ग्रंथांचे गुण असतील तेवढेच एत्तद्देशीयांनीं गावेत; परंतु त्यांचे दोष त्यांनीं दाखविणें म्हणजे राजद्रोह होतो असा ज्या कित्येक साहेबलोकांचा समज आहे त्यांस हा अंक पाहून फार राग आला. मेजर जेकब म्हणून पूना हायस्कूलचे माजी हेडमास्तर यांचे बंधु होते, त्यांच्या वाचण्यांत तो येऊन त्यांनीं बांबेग्याझिट वर्तमानपत्रांत 'एलिफ्यास' (हत्ती) या

सहीखालीं एक पत्र छापून त्यांत या अंकांतील चार उतारे इंग्रजींत भाषांतर करून एतद्देशीय विद्वान लोकांचे राजभक्तीचे मासले म्हणून या रत्नचतुष्टयाचा नजराणा इलाखाधिपतीस केला ! साहेबमजकूर निबंधमालेपर्यंतच थांबले नाहींत. त्यांची स्वामिभक्ति व कल्पना ह्या अनावर होऊन त्यांनीं सरकारास असें सुचविलें कीं, ज्या पुस्तकांतून हे उतारे घेतले आहेत तें राजद्रोही व कारस्थानी अशा ब्राह्मण लोकांचें वसतिस्थान जें पुणें शहर तेथील हायस्कुलांतील एक बी. ए. मास्तर काढीत असतात; शिवाय या ग्रॅज्युएट मास्तरांचे तीर्थरूप तरी कोण आहेत म्हणाल तर तेहि रिपोर्टर आन् दि नेटीव प्रेस यासारख्या मोठ्या हुद्यावर असणारे सरकारी अधिकारी आहेत, याखेरीज याच शहरांत ब्राह्मण लोकांची सार्वजनिक सभाहि असते. एकंदरींत मासिक पुस्तक काढणारा ब्राह्मण, एतद्देशीय वर्तमानपत्रांतील मजकूर सरकारांत कळविणारा तोहि ब्राह्मण, सार्वजनिक सभा हीहि ब्राह्मण मंडळींचीच, तेव्हां पुणें शहर हें राजद्रोही मंडळीचें एक मोठें जुटीचें ठिकाण आहे; याकरितां सरकारांनीं याबद्दल वेळेवर जरूर खबरदारी घ्यावी !!

एलिफ्यास* ह्याचें पत्र बांबेग्याझिट पत्रांत २९ सप्टेंबरचें छापलें आहे. त्यांतील मजकूर तर अप्रयोजकच आहे; परंतु उताऱ्यांचीं भाषांतरें साहेबमजकुरांनीं केलीं आहेत तीं उत्कृष्ट चटकदार अशीं आहेत. या पत्रास उत्तर टाईम्स ऑफ इंडिया पत्रांत ११ आक्टोबरचें 'ब्राह्मण' या सहीनें मि. महाजनी यांनीं फार चांगलें मुद्देसूत दिलें आहे. हें उत्तर मि. महाजनी यांनीं परभारें वऱ्हाडांतून छापण्यास पाठविल्यामुळें विष्णुशास्त्री यांस तें आपल्या स्नेह्यांनींच लिहिलें आहे हें पुढें त्यांनीं स्वतः त्यांस सांगे तोंपर्यंत ठाऊक नव्हतें. विष्णुशास्त्री हे मि. महाजनी यांच्या उत्तराची त्यांच्या मुद्देसूतपणाबद्दल व एकंदर भाषेच्या सफाईबद्दल पुष्कळ तारीफ करीत असत.

---

* 'एलिफ्यास' व 'ब्राह्मण' व 'विष्णुशास्त्री यांचें ज्ञानप्रकाशांतील एलिफ्यास यास उत्तर,' हीं तिन्हीं शेवटीं पुरवणींत दिलीं आहेत.

विष्णुशास्त्री यांनींहि आपल्यातर्फे एलिफ्यास यास उत्तर* ज्ञानप्रकाशांत इंग्रजींत याच आठवड्यांत दिलें आहे. बांबेग्याझिटसारख्या वजनदार इंग्रजी वर्तमानपत्रांत जेव्हां वरील विलक्षण मजकूर आला तेव्हां त्याचा गवगवाहि फारच झाला. निबंधमालेचें नांव व त्यांत विषयाच्या प्रतिपादनार्थ प्रसंगविशेषीं कशा तऱ्हेचा मजकूर येतो याची माहिती कांहीं युरोपियन अंमलदारांस प्रथमतःच या वेळीं झाली. मेजर जेकब हे एलिफ्यास पत्र लिहूनच स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं सबंध तिसावे अंकाचें इंग्रजींत भाषांतर करून तें सरकारांस पाठवून दिलें. सरकारपर्यंत विष्णुशास्त्री यांची अगळीक ही दुसऱ्यांदा गेली. याच सुमारास रावबहादूर शंकर पांडुरंग पंडित* हे त्या वेळचे चीफ सेक्रेटरी मि. गॉन साहेब यांच्या भेटीस त्यांचा कांहीं हक्क कमी केल्याबद्दल वगैरे दाद लावण्याकरितां गेले होते. त्या वेळीं मि. गॉन साहेब हे कांहींसे त्रुश्शांत दिसले; व रावबहादुरांस " पुण्यांतील कोणी ब्राह्मण ग्रॅज्युएट कांहीं वर्तमानपत्र काढतो, व त्यांत इंग्लिश लोकांविषयीं कांहीं वाईटसाईट मजकूर छापतो; तुम्हां ब्राह्मण लोकांना विद्या देऊन सरकारनीं मोठमोठ्या हुद्याच्या जागा दिल्या त्याचें हें फळ ! " असें कांहीं रागांतच पुटपुटले. साहेबांच्या या संदिग्ध व त्रुश्शाच्या भाषणावरून रावबहादूर यांना आपणांस प्रथम दर्शनींच अपशकुन झालासा वाटला ! त्यांनीं सरासरी तर्क केला कीं, कांहीं तरी कटकट विष्णुशास्त्री यांच्या निबंधमालेनें उत्पन्न केली असावी. मग मि. गॉनसाहेबांस त्या वेळीं याबद्दल उत्तर न करितां ते घरीं परत येऊन त्यांनीं विष्णुशास्त्री यांस वरील प्रसंगाचा उल्लेख करून निबंधमालेचा तिसावा अंक आपणांकडे पाठवून देण्याबद्दल पत्र लिहिलें.

रावबहादुरांच्या या पत्रावरून व दुसऱ्या ज्या बातम्या मधून मधून ऐकूं येत त्यांवरून तिसाव्या अंकाचें प्रकरण अझून धुमसतें आहे हें विष्णुशास्त्री यांस ठाऊक होतें. कृष्णशास्त्री हे स्वतः होऊन कधीं निबंधमाला वाचीत नसत; तथापि असें एखादें कांहीं काहूर उठलें म्हणजे

---

* दुसऱ्या भागातील फोटोग्राफमधील वरून तिसऱ्या ओळींतील डावीकडून उजवीकडील एक नंबरचे गृहस्थ.

तें त्यांच्या कानावर जाईच. या वेळीं ते अंमल असून विष्णुशास्त्री यांस उद्देशून म्हणाले, "This boy will one day bring himself into scrape!" कृष्णशास्त्री यांचें आतां वय बरेंच झाल्यामुळें व शरीरव्याधीनेंहि ते अस्वस्थ असल्यामुळें त्यांच्या अंगीं पूर्ववयांत जी सरकारी नोकरीविषयीं व लोकमताविषयीं बेपरवाई होती ती जाऊन त्यांस आतां असें वाटूं लागलें होतें कीं, आपल्या मुलांनीं वरीष्ठ अधिकाऱ्यांशीं व एकंदर लोकांशीं साधारण गरीबीनें राहिलें असतां त्यांत त्यांचें हित आहे; परंतु विष्णुशास्त्री यांच्या अंगांत पहिल्यापासूनच स्वाभिमान, देशाभिमान, स्वमताभिमान यांच्याकरितां कांहीं जरी गैरसोयी सोसाव्या लागल्या तरी त्या सोसण्याची पूर्ण रग असल्यामुळें त्यांनीं वरील काहुरास मुळींच जुमानिलें नाहीं! त्यांची भिस्त पूर्वीपासूनच सरकारी नोकरीवर किंवा सरकारच्या आश्रयावर किंवा कोणी बड्या सरकारी अंमलदाराच्या मर्जीवर अगदींच नव्हती! तशी असती तर किंवा त्यांच्या अंगीं अलीकडील विद्वान लोकांत जितकी आर्जवशक्ति व मनोधारणावृत्ति आढळून येते तितकी जरी असती तरी त्यांच्या वडिलांच्या वजनावरून व त्यांच्या अंगच्या योग्यतेवरून त्यांची सरकारी नोकरींत चांगली बढती होऊन ते चांगल्या मान्यतेस चढले असते यांत कांहीं संशय नाहीं; परंतु विष्णुशास्त्री यांचा मूळ स्वभावच मानी असून शिवाय इंग्रजी ग्रंथकार जॉनसन, ह्यूम, जेम्स मिल्ल, आर्क अशांसारख्या निर्लोभी व उदात्त मनाच्या ग्रंथकारांचें ग्रंथ वाचल्यानें त्यांच्या मनावर उच्च संस्कार झाल्यामुळें त्यांस मनोधारणा किंवा आर्जव हे शब्दच माहीत नव्हते असें म्हटलें तरी चालेल! मि. चाटफील्ड साहेबांनीं येवढी मेहेरबानी करून स्वतः होऊन त्यांस चांगली सोयीची सरकारी नोकरी लावून दिली व पुढें लवकरच बढतीहि दिली, तर त्यांबद्दल त्यांच्या भेटीस जाऊन त्यांचे आभार वगैरे मानून यावें म्हणून कृष्णशास्त्री यांनीं त्यांस एक दोन वेळ सांगितलें; परंतु त्यांच्या एरवीं लाजाळू स्वभावामुळें व आपण तेथें जाऊन काय बोलावें, असें त्यांस वाटत असल्यामुळें त्यांच्या हातून शेटीं डायरेक्टर साहेबांची भेट कधीं घेववली नाहीं. त्याचप्रमाणें कृष्णशास्त्री किंवा परशुरामपंततात्या

गोडबोले यांना नवीन ग्रंथ करून त्याबद्दल दक्षिणाप्राईझ कमेटीकडून बक्षिसें मिळून पैशाचा बराच फायदा झाला तसाहि सरकारी आश्रयाचा फायदा ग्रंथरूपानें करून घेण्याची विष्णुशास्त्री यांनीं लालसा कधीं दाखविली नाहीं! त्यांचा मनोदय असा होता कीं, ज्याप्रमाणें इंग्लंड वगैरे देशांत केवळ लोकाश्रयावरच तेथील ग्रंथकार अवलंबून राहतात व त्यांस आपल्या स्वतंत्र मतांचा प्रसार निर्भिडपणें करितां येतो, त्याप्रमाणेंच होतां होईल तोंपर्यंत आपण करावयाचें. सरकारी वरीष्ठ अधिकाऱ्यांस जर त्याबद्दल राग आला तर ते नोकरी काढून घेतील यापेक्षां त्यांच्या हातून अधिक तें काय होणार आहे? कोठेंहि नवीन पुस्तकें लिहून किंवा खाजगी शाळा काढून चरितार्थ चालविण्याला पंचाईत पडेल असें नाहीं; पांच रुपये कमी कीं जास्त, येवढेंच काय तें!! एलिफ्यास यानें उत्पन्न केलेल्या काहुरानें दुसरा एखादा कमी धैर्याचा मनुष्य लागलीच गांगरून जाऊन सर्व कट-कटीचें मूळ जी निबंधमाला ती तो प्रथम बंद करता! परंतु विष्णुशास्त्री यांनीं या अनर्थाचा अगोदरच अंदाज केला असून आपणांस आपल्या पुस्तकाच्या पायीं कधीं तरी सरकारी नोकरीची फारकत करावी लागणार अशाविषयीं त्यांच्या मनाचा मागेंच धडा होऊन चुकला होता व त्या गोष्टीस ते तयारहि होते!

'एलिफ्यास'चें पत्र वाचून व शिवाय मेजर जेकब यांनीं निबंधमालेबद्दल कची हकीगत कळविल्यावरून मि. चाटफील्ड यांच्या ठिकाणीं यापूर्वीं विष्णुशास्त्री यांच्याविषयीं जो कांहीं प्रेमभाव होता तो अगदीं उडून गेला. कोणत्याहि मनुष्यास स्वतःविषयीं किंवा स्वजातीविषयीं लिहिलेली सत्य परंतु अप्रिय अशी गोष्ट आवडते असें बहुधा होत नाहीं; आणि त्यांतून सर्वतोपरी आपल्या हाताखालच्या मनुष्यानें ती लिहिली असतां ती सहन करणारा म्हणजे मनुष्य विरळाच! तेव्हां अर्थातच मि. चाटफील्ड साहेब हे मालेंतील मजकूर ऐकून विष्णुशास्त्री यांजवर बरेच गरम झाले होते; तथापि त्यांनीं आपला राग बरेच दिवस बाहेर दाखविला नाहीं. परंतु विष्णुशास्त्री यांचे बंधु लक्ष्मणराव हे पुढील अभ्यास सोडून देऊन शाळाखात्यांत कोठें तरी नोकरी मिळावी म्हणून ह्या सुमारास मि.

चाटफील्ड साहेब यांजकडे अर्ज घेऊन गेले असतां व शिवाय कृष्णशास्त्री यांची चिठ्ठीहि अर्जाच्या पाठबळास घेतली असतां, साहेबमजकुरांनीं लक्ष्मणराव यांस पाहतांच त्यांस निबंधमालेची आठवण होऊन ते रागानें म्हणाले, " तुम्हां लोकांस सरकार विद्या शिकवितें, मोठमोठ्या नोकऱ्या देतें आणि त्याचें उसनें तुम्ही लोक त्याच सरकारची निंदा करण्यासाठीं वर्तमानपत्रें लिहून फेडतां ! " शेवटीं अर्जाच्या उत्तरादाखल साहेबांनीं सांगितलें कीं, अर्जदारांच्या अर्जांच्या क्रमानें तुमच्याहि अर्जाचा विचार होईल. तीन वर्षांपूर्वीं विष्णुशास्त्री यांस नोकरी मिळाली तेव्हां केवळ कृष्णशास्त्री यांच्या वजनावरच अर्जाची वगैरे जरूर न लागतां ती आपल्या पायींच चालत आली; आणि तीच लक्ष्मणराव हे अर्ज व शिवाय कृष्णशास्त्री यांची चिठ्ठी घेऊन मागावयास गेलें असतां त्यास मिळेनाशी झाली ! ह्या सर्व सृष्टि-पालटीचें कारण विष्णुशास्त्री यांचा मताभिमान हा होय.

विष्णुशास्त्री यांजकडे दोन वर्षांपासून काळेसांवळे रंगाचे, साधारण ठेंगण्या बांध्याचे, वागण्यांत साधे, वृत्तीनें सदां उल्हासी, वय सुमार पंचविशींत असे एक गृहस्थ येऊं लागले होते. हे समशेरपुरचे कुळकर्णी असून घरचे खाऊन पिऊन साधारण सुखी होते. ह्यांचें नांव शंकर तुकाराम शाळिग्राम* हें होय. ह्यांचा आणि विष्णुशास्त्री यांचा परिचय पडण्यास कारण असें झालें कीं, ते निबंधमालेचे वर्गणीदार असून पुढें ते जेव्हां बाळकृष्ण आणि मार्गन यांच्या दुकानीं कारकुनाची नोकरी धरून पुण्यास स्थाईक झाले, तेव्हां त्यांनीं विष्णुशास्त्री यांजकडे नेहमीं येऊन जाऊन त्यांचें भाषण लक्ष लावून ऐकावें. शंकरराव यांस स्वतः मराठींत लिहिण्याची हौस असल्यामुळें त्यांनीं कांहीं बखरी व लावण्या यांचा संग्रह केला असून तो छापण्याचा उद्देश त्यांनीं विष्णुशास्त्री यांस कळविला; तो अर्थातच विष्णुशास्त्री यांस मान्य होऊन त्यांनीं तसें

---

* आठव्या भागाच्या आरंभीं जो फोटोग्राफ घातला आहे त्यांतील मागील ओळींत उभे राहिलेल्या गृहस्थांपैकीं डावीकडून उजवीकडील तिसरे गृहस्थ.

करण्याबद्दल शंकरराव यांस उत्तेजन दिलें. येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री आणि शंकर तुकाराम शाळिग्राम यांच्या स्नेहास आरंभ झाला व तो एकवेळ जरी शंकरराव यांच्या अंगच्या कांहीं दुर्गुण–आळस, व्यवहारांतील वक्तशीरपणा व चोखपणा यांची कमतरता–यांवरून विगलित झाला होता, तरी तो एकंदरीनें विष्णुशास्त्री यांच्या हयातीपर्यंत तसाच कायम राहिला.

शंकरराव यांच्या अंगीं ओळख पाडून स्नेह संपादण्याचा गुण कांहीं विलक्षण आहे. मुंबईस व पुण्यास ज्या थोर गृहस्थांस मराठींत पुस्तकें लिहिण्याचा नाद आहे किंवा जे पुस्तकांचे दुकानदार आहेत त्या सर्वांशीं थोडाबहुत परिचय शंकररावांचा आहेच. नुकतेंच जें ' ऐतिहासिक थोर पुरुषांचे पोवाडे ' म्हणून पुस्तक निघालें आहे त्याच्या मुखपृष्ठावर शाळीग्राम यांचें नांव मुंबईचे म्युनिसिपॅल कमिशनर मे. आक्वर्थ साहेब यांच्या नांवाशीं बरोबरीनें झळकत आहे तें या त्यांच्या गुणाची साक्षच होय! तेव्हां विष्णुशास्त्री यांचा व शाळिग्राम यांचा स्नेह जुळला यांत नवल नाहीं. विष्णुशास्त्री यांस प्राचीन इतिहासाचीं साधनें जीं बखरी, पोवाडे, लावण्या इत्यादि यांविषयीं केवढी भक्ति होती हें मागें सांगितलेंच आहे व ती त्यांच्या निबंधांतूनहि जागोजाग दृष्टीस पडत आहे. तेव्हां बखरी, पोवाडे वगैरे छापण्याचें मोठें उपयुक्त काम शाळिग्राम यांनीं हातीं घेतलें आहे व तें तडीस नेण्याकरितां जागोजागीं ओळख पाडून ते मिळविण्याचा त्यांच्या अंगीं गुण चांगला आहे व त्यांनीं मेहनत करून या जुन्या लेखांचा जीर्णोद्धार केला असतां मोठा फायदा होणार आहे, हें जाणून विष्णुशास्त्री हे शाळिग्रास यांस उत्तेजन देत असत.

या सालच्या मे. महिन्यांत रा. काशीनाथ नारायण साने व कै. जनार्दन बाळाजी मोडक हे रत्नागिरीहून पुण्यास आले होते. मि. साने यांस जुन्या बखरींचा नाद असे. व त्या छापून काढल्या असतां चांगला फायदा होईल असें त्यांस वाटत होतें. विष्णुशास्त्री यांची वरील दोन गृहस्थांशीं गांठ पडली असतां बोलतां बोलतां बखरीबद्दल मि. साने यांनीं गोष्ट काढली. ती विष्णुशास्त्री यांस पसंत पडून त्यांनीं सुचविलें कीं, या कामांत शाळिग्राम यांनीं थोडाबहुत यत्न चालविला आहे. तेव्हां

या गोष्टीबद्दल बराच वेळ भाषण झाल्यावर शेवटीं असें ठरलें कीं, जुन्या बखरीं, जुने महाराष्ट्र कवींचे आजपर्यंत प्रसिद्ध न झालेले ग्रंथ, व त्याच-प्रमाणें अप्रसिद्ध संस्कृत ग्रंथ हे एकेठिकाणीं छापण्याकरितां एक मासिकें पुस्तक मि. साने, मोडक, विष्णुशास्त्री व शाळिग्राम यांनीं काढावें; त्यांत बखरींचा भाग मि. साने, मराठी कवितांचा भाग मोडक, व संस्कृत ग्रंथांचा भाग विष्णुशास्त्री यांजकडे असावा अशी योजना झाली. शाळिग्राम यांजकडे बखरीं, मराठी कविता वगैरे यांचा शोध लावून या छापण्याकरितां आणण्याचें काम दिलें. शिवाय पुस्तक छापण्याची, त्याचा हिशेब वगैरे ठेवण्याची व्यवस्था मि. कृष्णाजी रघुनाथ केळकर यांजकडे सोंपविली. या कामाकरितां पांचहि जणांनीं पन्नास पन्नास रुपये भांडवल म्हणून द्यावेत व सरकतीप्रमाणें पुस्तकाचा नफा तोटा वाटून घ्यावा व हें पुस्तक पुढील सालापासून म्हणजे १८७८ जानेवारीपासून काढावें असा निश्चय ठरला. येणेंप्रमाणें कांहीं दिवसांमागें जें ' काव्येतिहाससंग्रह ' म्हणून मासिक पुस्तक निघत होतें त्याच्या उत्पत्तीची हकीकत आहे.

याच सालीं आगस्ट महिन्यांत शाळिग्राम यांनीं विष्णुशास्त्री यांस सांगितलें कीं, त्यांचे स्नेही शनवार पेठेंत असतात, त्यांस चित्रें काढण्याचा नाद असून त्यांनीं बऱ्याच तसबिरी, चित्रें, नकाशे वगैरे काढिले आहेत. विष्णुशास्त्री यांस लहानपणापासून चित्रांचा नाद असेच. त्यांनीं शाळिग्राम यांस त्यांच्या स्नेह्याचा चित्रसंग्रह पाहण्याची इच्छा दर्शविल्यावरून शाळिग्राम हे विष्णुशास्त्री यांस त्यांचे बंधु लक्ष्मणराव, विनायकराव व दोन तीन मंडळी यांसह आपल्या स्नेह्याच्या घरीं एके दिवशीं संध्याकाळीं घेऊन गेले. हे स्नेही चित्रशाळा छापखान्याचे मूळ उत्पादक रा. बाळकृष्ण वासुदेव जोशी* हे होत. हे त्या वेळीं फोटोझिंको हापिसांत ड्राफ्ट्समन होते. त्यांस लहानपणापासून चित्रें, नकाशे वगैरे काढण्याचा नाद असे. त्यांच्या घरीं चित्रांचा, तसबिरींचा, फोटोंचा वगैरे संग्रह चांगला होता.

---

* आठवे भागाच्या आरंभीं असलेले फोटोग्राफमधील मागें उभे राहिलेले गृहस्थांपैकीं डावीकडील पहिलेच गृहस्थ.

शिवाय हे गृहस्थ हौशी व ठाकठिकीनें राहणारे असल्यामुळें त्यांनीं खर्चाकडे फारसें न पाहतां सर्व चित्रांस उत्कृष्ट फ्रेमींत बसवून तीं नीट व्यवस्थेनें ठेविलीं होतीं. हा संग्रह पाहून व रा. बाळकृष्णपंतांचा एकंदर बेतबात पाहून विष्णुशास्त्री यांस मोठा आनंद वाटला. येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री व बाळकृष्णपंत यांचा प्रथम परिचय शाळिग्राम यांनीं करून दिला.

बाळकृष्णपंत यांस इंग्रजी येत नसून मराठी अभ्यास त्यांचा थोडाच झाला होता. यामुळें ऐतिहासिक तजबिरींकडे यांचें लक्ष गेले नव्हतें. विष्णुशास्त्री यांनीं सुचविल्यावरून त्यांनीं प्रथम बेलबागेंतील मेणवलीकर फडणवीस यांच्या घरच्या दोन तसबिरी—एक सवाई माधवराव पेशवे यांची व दुसरी नाना फडणवीस यांची अशा तेलाच्या रंगांत वरील पेशव्यांच्या वेळीं कोणी युरोपियन कारागिरानें काढिलेल्या होत्या, त्यांवरून पाण्याच्या रंगांत त्यांच्या प्रति घेण्याचा विचार केला. या कामांत त्यांस बरेंच यश आल्यावरून त्यांना तो उद्योग पुढें चालविण्याची अधिक उमेद आली. बाळकृष्णपंत यांस फोटोझिंकोच्या हापिसांत नकाशे कसे छापतात हें माहीत होतें. त्यांस आता कल्पना आली कीं, ज्याप्रमाणें नकाशे छापून काढतात त्याप्रमाणें निरनिराळे रंगांत शिळांवर चित्रें छापतां येतील. व हें काम जरी या देशांत कोठें होत नाहीं तरी इंग्लंड व अमेरिका येथें अशीं कामें पुष्कळ निघतात. तेव्हां रंगीत चित्रें छापण्याचा कारखाना या देशांत काढला असतां फायदा होण्यासारखा आहे. हा विचार बाळकृष्णपंत यांनीं विष्णुशास्त्री यांस शाळिग्राम यांच्या द्वारें कळविला. बाळकृष्णपंत यांस पगार थोडा असून त्यांची राहणी विशेष कसोशीची नसल्यामुळें त्यांजपाशीं वरील उद्योगास अवश्य लागणारा जो द्रव्यसंचय तो नव्हता. तेव्हां विष्णुशास्त्री यांच्या सारखा कोणी तज्ज्ञ मनुष्य पैशाची जर मदत करील तर वरील उद्योगास हात घालण्यास ते तयार होते. बाळकृष्णपंतांचा स्वभाव भिडस्त होता व विष्णुशास्त्री यांचा तर त्याहूनहि जास्त, तेव्हां कला व द्रव्य यांचा मिलाफ व्हावा कसा? परंतु हा योग शाळिग्राम यांच्या मध्यस्थीनें घडून आला. विष्णुशास्त्री यांनीं चित्रांचा

कारखाना काढला असतां त्यास प्रथम पैसे किती लागतील याचा शोध करून आणण्यास सांगितलें; त्यावरून बाळकृष्णपंत यांनीं एक विलायती प्रेस, पांच सात शिळा, कागद, रंग वगैरे मिळून प्रथम ४०० रुपयांचा अंदाज केला. रक्कम फारशी नाहीं व चित्रें छापून काढलीं असतां त्यांची विक्री साधारण बरीच होईल व शिवाय नवीन सुरू होणाऱ्या काव्येतिहाससंग्रहांत ऐतिहासिक तसबिरी घालण्याचीहि यांत सोय होईल अशी विष्णुशास्त्री यांस कल्पना होऊन त्यांनीं वरील रक्कम देण्याचें कबूल केलें. पुढें लवकरच सालअखेर शिळाप्रेसाचें सामान मुंबईहून येऊन पडलें व बाळकृष्णपंत हे चित्रांच्या कारखान्यास लागले. याप्रमाणें हल्लींच्या चित्रशाळेच्या उत्पत्तीची हकीकत आहे.

या सालच्या निबंधमालेच्या अंकांतील मुख्य विषय जॉनसनचें चरित्र हा होय. या विषयावर एकंदर आठ अंक आहेत. या विस्तृत व यथास्थित विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत सहज येईल कीं, या वेळेपासून विष्णुशास्त्री यांची लिहिण्याची शक्ति अधिकाधिक वाढत चालली होती. निबंधमालेच्या आरंभीं एक दोन वर्षें विष्णुशास्त्री हे दोन तीन अंकांतच विषय संपवीत; परंतु तेच आतां इंग्लिश भाषेवर चार व जॉनसनच्या चरित्रावर आठ व पुढें पुढें याहूनहि जास्त सविस्तर असें लिहूं लागले. हे अधिक विस्तृत निबंध जेव्हां प्रथम प्रसिद्ध होत असत, तेव्हां ‘ जॉनसन ’ हाच विषय नवीन अंकावर पाहून प्रथम अंमळ कंटाळा वाटे; परंतु अंक उघडून वाचूं लागलें म्हणजे आंतील मजकूर पाहून समाधान वाटल्यावांचून राहत नसे. कारण विषय जरी तोच तरी आंतील मजकूर नवीनच असे. परंतु आतां तर सर्व अंक एकत्र छापिले असल्यामुळें विषयवैचित्र्याचें प्रकरण मुळींच राहिलें नाहीं; मात्र उलटें असें वाटतें कीं, विष्णुशास्त्री यांनीं या वैचित्र्याकडे लक्ष न देतां एखाद्या स्वतंत्र ग्रंथाप्रमाणें हातीं धरलेल्या विषयाचें विवेचन यथास्थित करून सर्वांगांनीं पूर्ण केलें आहे ही फार उत्तम गोष्ट केली.

जॉनसनचें चरित्र हा निबंध एकंदरींत अनेक कारणांनीं उत्तम साधला आहे. याची भाषा इतर निबंधांप्रमाणें साधी व मार्मिक अशी आहेच;

परंतु त्यांतील विशेष हा आहे कीं, इतर निबंधांतून जो स्थलविशेषीं कडकपणा, मधून मधून मिशनरी लोक, दयानंद वगैरे मंडळींवर तडाखे इत्यादि असतात ते यांत नसल्याकारणानें ज्याप्रमाणें एखादें मोठें वादळ संपून जाऊन नंतर समुद्र अगदीं शांत झाला असतां विशेष रमणीय दिसतो त्याप्रमाणें नुकतेंच एलिफ्यास प्रकरण होऊन गेल्यानें प्रस्तुत निबंध अगदीं शांतवृत्तीचा असा दिसतो! व म्हणून तो वाचकांसहि कांहीं निराळ्या तऱ्हेनें आवडण्यासारखा आहे. यांत प्रथम चरित्रनायक जो स्यामुएल जॉनसन त्याचा जीवनवृत्तांत देऊन त्यानें फार दरिद्रावस्थेंत आपले ऐन उमेदीचे दिवस काढून कोणकोणते लोकमान्य ग्रंथ केले त्यांची हकीकत दिली आहे. त्याच्या वेळीं इंग्रजी भाषा कोणत्या वाईट स्थितींत असून तींत शब्द, अर्थ, उच्चार वगैरे संबंधानें केवढा घोंटाळा होता, तो त्यानें आपल्या प्रचंड कोशानें कसा नाहींसा केला आणि आपल्या अविश्रांत व अलौकिक ग्रंथरचनेनें त्यानें इंग्रजी भाषेस कसें चांगलें स्वरूप आणलें व ती विद्वान लोकांच्या उपयोगास कशी पात्र केली ह्या गोष्टींचें निरूपण केलें आहे. यापुढें जॉनसन याच्या स्वरूपाचें, त्याच्या स्वभावाचें, त्याच्या मानसिक व्यथेचें, त्याच्या चमत्कारिक संवयींचें, त्याच्या धर्मसंबंधीं व राजकीय संबंधीं मतांचें, त्याचप्रमाणें त्याच्या नैसर्गिक गुणावगुणांचें वगैरे यथास्थित वर्णन केलें आहे; व शेवटीं त्याच्या चरित्रापासून आपल्या लोकांनीं देशभाषा सुधारण्यासंबंधानें, राज्यव्यवस्थेसंबंधानें, धर्मसंबंधानें वगैरे कोणकोणता बोध घेण्यासारखा आहे हें सांगितलें आहे. हा उपदेशाचा भाग फारच उत्तम साधला आहे व त्यांतूनहि पहिल्या बाबीसंबंधानें जे दोन अंक—४० व ४३—हे विशेष महत्त्वाचे आहेत. आपल्या कॉलेजांतून तयार झालेली विद्वान मंडळी ज्यांच्यावर देशोन्नतीचा बोजा मुख्यत्वेंकरून आहे त्यांनीं देशोन्नतीचें प्रधान अंग जें देशभाषा प्रगल्भ दशेस आणणें त्या कामीं जॉनसन याचें स्तुत्य उदाहरण घेऊन कसे सतत परिश्रम केले पाहिजेत याबद्दल त्यांस मोठ्या कळकळीचा व वक्तृत्वानें पूर्ण भरलेला असा उपदेश विष्णुशास्त्री यांनीं केला आहे. तो इतका उत्कृष्ट आहे कीं, प्रत्येक

होतकरू विद्वान मनुष्यानें तो आपल्या हृदयफलकावर लिहून ठेवण्यासारखा आहे. तो अंमळ लांब आहे तरी खालीं देतों:—

"तर प्रस्तुत चरित्रापासून सर्व लोकांनीं व विशेषतः आमच्या नवीन विद्वानांनीं सतत उद्योग करण्याविषयीं उपदेश घ्यावा. हें नवीन मंडळीस विशेषेंकरून सांगण्याचें प्रयोजन असें आहे कीं, जॉनसननें आपल्या देशबंधूंची जी सेवा केली, ती करण्याचें सामर्थ्य व तिचा बोजा सारा त्यांच्याच डोक्यावर आहे. आणि सामान्यतः पहातां ही देशकल्याणाच्या कामाची धुरंधरता त्यांच्याकडे आहे, व ती वहिवाटण्यास वरील गुणांची तर अत्यंत आवश्यकता आहे, यास्तव त्यांनींच त्याच्या संपादनार्थ विशेषतः झटलें पाहिजे. आजपर्यंत त्यांचा क्रम जो चालत आला आहे, कीं सरकारच्या मेहेरबानीनें व देशाच्या खर्चानें जी विद्या त्यांस दिली जाते तिचें वास्तविक चीज करण्याचें कधीं स्वप्नांतहि न येऊन गप्पाबिप्पा, ख्यालीखुशाली वगैरेंतच बहुधा काळक्रमणा करावयाची; ज्या गोष्टी आपल्या हातून होण्यासारख्या आहेत त्यांविषयीं काडीइतकाहि यत्न न करितां, नवे धर्म स्थापणें, जुने अनादिसिद्ध चालत आलेले प्रचार मोडून टाकून कोणी कधीं न ऐकिलेले असे नवे आचार बळेंच सुरू करणें, अशा सारख्या रिकाम्या उठाठेवी करीत बसावयाचें; सुधारणा करण्याच्या मिषानें परकी लोकांचे निंद्य आचार प्रचारांत आणूं पहावयाचें; व ज्यांस सज्ञान करण्याकरितां सरकारानें रानटी स्थितींतून काढून सुशिक्षित केलें त्यांस स्वतः तर ज्ञानाचा लवलेश पोंचविण्याची कधीं तजवीज न करितां उलट त्यांचा उपहास मात्र करून फुकाची फुशारकी मिरवावयाची, व आपले हात आज गगनाला लागलेले आहेत, तेच आपण कांहीं काळापूर्वीं काय होतों याचें बिलकूल स्मरण ठेवायाचें नाहीं;—हा सर्व प्रकार अगदीं बदलून गेला पाहिजे इंग्रजांसारख्या परम ज्ञानसंपन्न राष्ट्राशीं सुदैवेंकरून एत्तद्देशीयांचा जो योग झाला आहे त्याचें जर साफल्य व्हावयाचें असेल, व स्वातंत्र्य नाशरूप जी या देशाची महा हानि झाली आहे तिची जर भरपाई व्हावयाची असेल, तर लोकसुधारणेचें स्तोम म्हणविणारांनीं सध्यांपेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. हल्लीं जी त्यांस पोकळ घमेंडी वाटते, कीं युनिव्हर्सिटींतून आपण पार पडलों कीं ज्ञानाची अत्यंत सीमा आपण गांठली, ती त्यांनीं अगोदर दवडली

पाहिजे. विद्यालयांतील सर्व संस्कार होऊन बाहेर पडलेला मनुष्य हा खरोखर पाहतां पंख फुटून घराच्या बाहेर पडलेल्या पांखरांच्या बच्चासारखा होय; म्हणजे त्यास त्याचीं आईबापें ज्याप्रमाणें पोसून उडण्याजोग्या स्थितीपर्यंत आणून पोंचवितात त्याप्रमाणेंच आमच्या विद्यालयांतील पंडितहि तीन चार वर्षांच्या शिक्षणाच्या योगानें सामान्यतः कोणत्याहि विषयांत स्वतःच्या परिश्रमानें प्रवेश होईल इतक्या प्रगल्भतेला येऊन पोहोंचलेले असतात, इतकेंच काय तें. मग ही त्यांची स्थिति त्यांनीं ज्ञानसमुद्राचें पैल तीर गांठलें कीं ते अलीकडच्याच तीरावर आहेत हें कोणांसहि समजेल. पंख फुटलेल्या पक्ष्यास आकाशक्रमण जसें पुढें करायाचें असतें, त्याप्रमाणें विद्यालयाच्या बंधांतून जो सुटला तो विद्यासमुद्रावर सफर करण्यास नव्या नाविकाप्रमाणें नुकता तयार झालेला असतो. तर ही वास्तविक स्थिति मनांत आणून आमच्या होतकरू लोकांनीं अल्पविद्येंत संतोष न मानतां व वृथा गर्वानें फुगून न जातां जॉनसनची ज्ञानप्राप्तीविषयीं जशी पराकाष्ठेची उत्कंठा होती व तो स्वतः मोठमोठ्या ग्रंथकारांस वंद्य असतांहि शेवटपर्यंत त्याचें अध्ययन जसें खुंटलें नाहीं, तसाच त्यांनीं क्रम ठेविला पाहिजे. त्याचप्रमाणें परीक्षांच्या तडाक्यांतून सुटून आपला चरितार्थ व्हावयाला लागला म्हणजे आपण कृतकृत्य झालों व इतःपर कोणतीहि कर्तव्यता उरली नाहीं. हीहि कोती समजूत वरील मंडळीनें सोडून दिली पाहिजे. वर विद्येच्या संबंधानें जसें सांगितलें कीं, जें तीर त्यांस पलीकडचें वाटतें तें वस्तुतः पाहतां अलीकडचें आहे; त्याप्रमाणेंच जेथें कर्तव्यतेची त्यांच्या बुद्धीनें समाप्ति झाली तेथेंच खरोखर पाहिलें असतां तिचा नुसता आरंभ आहे असें त्यांनीं समजावें. उघडच आहे कीं, शिपायास कवायतींत तयार करून त्यास जाम्यानिम्यानिशीं बाहेर पाठवून दिला म्हणजे त्याच्या कामाची सुरुवात झाली म्हणायाची कां अखेर झाली म्हणून समजायाची? कवाइतीची अखेर झाली खरी, पण ती होऊन पुरा शिपायी तयार होतांच खऱ्या कामाची सुरवात झाली असें समजायाचें. तर याप्रमाणें विद्यालयांतील सर्व अध्ययन पुरें होऊन ज्यांचा शेवटला सोहाळा झाला, व इलाखाधिपतींचा गुरुमंत्र ज्यांच्या कानीं पडला, त्यांनीं लगेच दुसऱ्या दिवसापासून आपल्या साऱ्या बुकांस एकदम रजा देऊन टाकावी, व शिकंदर बादशहा ज्याप्रमाणें सारें जग जिंकून बाबिलोन

शहरी स्वस्थ येऊन पडला, व जे जे मनास वाटतील ते ते चार करून आपल्या परम देदीप्यमान कीर्तीस डाग लावून घेऊं लागला, त्याप्रमाणेंच आमच्या नव्या मंडळीपैकीं वहुतेकांचा प्रकार आढळून यावा ही केवढी दिलगिरीची गोष्ट आहे ? जॉनसनसारख्यांचा कित्ता घेऊन वरील मंडळीनें थोडाबहुत जरी आजपर्यंत उद्योग केला असता तरी त्यांच्या विद्वत्तेचें किती चीज झालें असतें व लोकांस किती उपयोग होता ? युनिव्हर्सिटी स्थापन होऊन आज वीस वर्षें झालीं व त्या पूर्वींहि कित्येक वर्षांपासून इकडे इंग्रजी विद्येचा प्रचार सुरू झाला होता; मग इतक्या वीस तीस वर्षांत लोकसुधारणेला किती साह्य झालें असतें ? तरुणजनांस वाचण्यालायक अशीं नानाप्रकारचीं मनोरंजक पुस्तकें, बहुश्रुत लोकांच्या उपयोगीं पडण्यासारखे तऱ्हेतऱ्हेच्या माहितीचे चमत्कारिक ग्रंथ, विद्यार्थ्यांस इष्ट असे देशोदेशींचे संक्षिप्त इतिहास, निरनिराळ्या शास्त्रांवर सुबोध ग्रंथ, त्याप्रमाणेंच या देशांतील जुनी कविता व जुना इतिहास यांचा संग्रह–कीं जो होण्याची सोय दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, तसेंच साऱ्या भारतवर्षीयांच्या किंबहुना साऱ्या जगाच्या प्रीतीचें व पुज्यबुद्धीचें स्थान झालेली जी प्राचीन गीर्वाण भाषा तींत काय काय ज्ञानभांडार आहे, तिच्या खालोखाल मानलेली जी फारशी भाषा तींत काय मौज आहे याविषयीं शोध, हिंदुस्थानी, गुजराथी वगैरे एतद्देशीय भाषांचा मराठीशीं कितपत संबंध आहे, व्याकरणरीत्या सर्वांचा कसा कसा मेळ आहे इत्यादि विचार–या या प्रकारें उद्योग करण्याचें आमच्या पुढारी मंडळीनें जर मनावर घेतलें असतें तर आजला लोकांची किती निराळी स्थिति असती ? यासारखेंच देशी शेतीकडे व देशी व्यापाराकडे जर कोणी लक्ष दिलें असतें, व आपल्या इंग्रजी ज्ञानाचा लाभ आपल्या देशबंधूस त्यांच्या भाषेच्या द्वारें करून दिला असता, व व्यावहारिक कृत्यांच्या संबंधानेहि त्यांस माहिती करून दिली असती, तर त्यांस व सर्वांस केवढें भूषण झालें असतें ! ”

या निबंधांत मधून मधून जॉनसनची शाळा, त्याची बायको, त्याचा शिष्य व मित्र ग्यारिक व चरित्रकार बॉसवेल यांचीं जीं वर्णनें दिलीं आहेत तीं चांगलीं साधलीं आहेत. त्याचप्रमाणें मेकॉले यांनीं बासवेल विषयीं जी व्यर्थ निर्भर्त्सना केली आहे तिचें व तो महाशय होता

म्हणूनच तो मोठा अद्वितीय चरित्रकार झाला हा जो विलक्षण सिद्धांत त्यांनीं प्रतिपादन केला आहे त्याचें विष्णुशास्त्री यांनीं इंग्रजींतील चांगल्या ग्रंथकारांचे आधार देऊन उत्कृष्ट तऱ्हेचें खंडण केलें आहे. या निबंधांत जागोजाग ज्या पुष्कळ टिपा दिल्या आहेत त्या चांगल्या खुबीदार व चटकदार असून त्यांच्या योगानें निबंधांतील मजकुराचा परिपाक विशेष चांगल्या तऱ्हेनें उतरला आहे.

आतां या निबंधांतील एक विशेष सांगून हें प्रकरण संपवितों; तो हा कीं, हा निबंध वाचीत असतां पुष्कळ ठिकाणीं चरित्रनायकाच्या जीवनवृत्तांतांतील गोष्टी व त्याचीं मतें सांगत असतां विष्णुशास्त्री यांची पूर्ण तदात्मक वृत्ति झालेली दृष्टीस पडते. जॉनसन हा " एका खासगी शाळेंत दुय्यम (असिस्टंट) म्हणून राहिला; परंतु शाळेच्या अध्यक्षाचें व त्याचें कधींहि नीट न पटल्यामुळें त्यानें ती जागा लवकरच त्रासून सोडून दिली. शाळेचे सर मास्तर स्वभावानें मोठे गर्विष्ठ व तिसमारखान होते. त्यांचा हिशेब असा होता कीं, या दुय्यमाला आम्हीं मोठी मेहेरबानी करून अन्नाला लावला आहे, तेव्हां आमचा मोंगलाई अंमल यानें निमुटपणें मान खालीं घालून सोसला पाहिजे. पण जॉनसन कसचा? त्यानें खाड्दिशीं चाकरीला लाथ मारली व बर्मिंगह्याम शहरास निघून गेला ! " त्याचप्रमाणें ' त्यास सरकारांतून जें पेनशन मिळत असे त्याचा रिकाम्या छानछुकींत किंवा ऐषआरामांत त्यानें कधींहि व्यय केला नाहीं. * * जॉनसन याचें वर्तन एकंदरींत पाहतां पुरातन काळच्या तत्त्वज्ञाप्रमाणें असे; म्हणजे ते स्वभावतःच निरिच्छ असून जें यदृच्छेनें मिळेल त्यावर काळक्रमण करून जसे नित्यसंतुष्ट असत, तसाच प्रस्तुत पंडित असे. ' धर्ममतांसंबंधानें लिहीत असतांना ' जॉनसन यास लहानपणीं त्याच्या आईबापांनीं जीं धर्मसंबंधीं मतें मनांत भरवून दिलीं होतीं तींच त्यानें शेवटपर्यंत कायम ठेविलीं, व त्यांचेच तर्फे तो नेहमीं भांडत असे. * * * दुसऱ्याच्या धर्मांच्या रिकाम्या कुटाळ्या करण्यापेक्षां जो धर्म ज्यास जन्मतः प्राप्त झाला आहे, त्यासच अनुसरून त्यांतच सदाचरणाचा व परमार्थाचा जो मार्ग त्यास सांपडेल तो त्यानें स्वीकारले

असतां कलहाचें तोंड मिटेल, अमूल्य काळाचा अपव्यय होणार नाहीं व खरी धार्मिकताहि जगांत वाढेल असे आम्हांस वाटतें.' त्याचप्रमाणें एत्तद्देशीय ग्रंथकारांच्या कर्तव्याविषयीं लिहीत असतां 'वरील गोष्टींपासून एत्तद्देशीय ग्रंथकर्त्यांनीं दोन प्रकारचा बोध घ्यावा. एक द्रव्याच्या संबंधानें त्यांनीं असें मनांत आणावें कीं, जॉनसन सारख्यास गेल्या शतकांतील इंग्लंडासारख्या देशांत जर इतकी विपत्ति सतत काढावी लागली व तितकी काढावी लागली असतांहि त्यानें एकदां धरलेला मार्ग अस्खलितपणें तसाच सतत चालविला, तर आमच्या धनहीन व ज्ञानहीन देशांत ग्रंथरचनेपासून फलनिष्पत्ति कितपत होण्याचा संभव आहे हें जाणून मुख्यतः देशहित करण्याच्या बुद्धीनेंच आपलें काम आपण बजाविलें पाहिजे. भाषारूप उपवनास आपल्या ज्ञानोदकाचें सेचन निदान आरंभीं तरी त्यांनीं केवळ निरपेक्षबुद्धीनें केलें पाहिजे. कालेंकरून त्यांच्या श्रमाचा परिपाक कीर्तिरूप सुमनांनीं व अर्थरूप फलांनीं प्रकट होईलच होईल; पण या अदृष्ट लाभावर नजर न देतां पहिल्यानें केवळ आपलें कर्तव्यच म्हणून त्यांनीं हातांत लेखणी धरली पाहिजे. दुसरी गोष्ट कीर्ति व लोकमान्यता हीहि जॉनसनसारख्यास सुद्धां किती दीर्घ काळानें प्राप्त झाली हेंहि होतकरू ग्रंथकर्त्यांनीं विसरतां कामा नये.'

या सालांत दोन नवीन उद्योग—काव्येतिहाससंग्रह व चित्रशाळा—जे विष्णुशास्त्री यांनीं आपल्या स्नेह्यांच्या सहाय्यानें चालविण्याचें योजिले तें पुढील सालापासून सुरू करण्याच्या बेतांत ते असतां नाताळच्या सुटींत एकाएकीं बातमी निघाली कीं, विष्णुशास्त्री यांची बदली पुण्याहून रत्नागिरीस सारख्याच पगारावर हायस्कुलांत मे. डायरेक्टर साहेब यांनीं केली. एलिफ्यास प्रकरण पुष्कळ वेळ धुमसतां धुमसतां त्याचा निकाल शेवटीं येणेंप्रमाणें झाला! विष्णुशास्त्री यांची बदली रत्नागिरीस केल्याबद्दल कित्येक लोक मि. चाटफील्ड साहेब यांस बराच दोष देतात; परंतु वास्तविक पाहतां मि. चाटफील्ड साहेबांचा यांत शांत व एक प्रकारचा गरीब स्वभाव दिसून येतो. दुसरे एखादे अरेराव साहेब डायरेक्टर असते तर ते सारख्या पगारावर बदलीपर्यंतच थांबते असें नाहीं! आपल्या लोकां

विषयीं इतका निर्भिडपणानें व कडकपणानें व तेंहि आपल्या हाताखालील मनुष्यानें लिहिलेला मजकूर दुसऱ्या वरील स्वभावाच्या साहेबांस कधीं खपला नसता. तेव्हां मि. चाटफील्ड साहेबांनीं विष्णुशास्त्री यांस एका हायस्कुलांतून काढून दुसऱ्या हायस्कुलांत सारख्याच पगारावर घातलें यांत त्यांनीं मोठा अन्याय किंवा कठोरपणा केला असें कोणी समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. डायरेक्टर साहेबांस वाटलें कीं, रत्नागिरीसारख्या दूर गांवीं बदली केल्यानें विष्णुशास्त्री आपला हेकटपणणा सोडून देऊन नीट ताळ्यावर येतील; परंतु साहेबमजकुरांनीं इतर ग्राज्युएट मंडळींच्या स्वभावावरून विष्णुशास्त्री यांच्या बद्दल जो तर्क बांधिला होता तो चुकीचा होय. विष्णुशास्त्री यांचें ब्रीद अगदीं वेगळ्या तऱ्हेचें असल्यामुळें ते स्वमतप्रतिपादनार्थ साहेबांची कृपा, मोठा पगार, सरकारी नोकरीचें सुख वगैरे पुष्कळ गोष्टी खर्चीं घालण्यास मागें पुढें पाहणारे नव्हते.

रत्नागिरीस बदली झाली ही गोष्ट जेव्हां विष्णुशास्त्री यांच्या आप्तमित्रांस कळली तेव्हां त्या सर्वांस अर्थातच वाईट वाटलें. त्यांपैकीं कित्येकांनीं त्यांस सांगितलें कीं, उगाच हेडमास्तरशीं वांकडें पाडून घेऊन व वरिष्ठ अधिकाऱ्यांचें मन दुखवून तुम्ही आपला सुखाचा जीव दुःखांत काय म्हणून घालून घेतां? तुम्हाला सरकाराविरुद्ध मजकुरावांचून दुसरें कांहींच लिहितां येणार नाहीं का? या उपदेशास विष्णुशास्त्री फार करून उत्तर देतच नसत. जें काम स्वतः एकट्याचेंच असून त्यांत दुसऱ्याच्या हिताहिताचा संबंध नाहीं त्याबद्दल लोकांचा सल्ला म्हणून ते कधीं घेत नसत, व कोणी आपण होऊनच सल्ला देऊं लागला तर त्याजबरोबर पूर्वपक्ष उत्तरपक्ष करण्याची तसदी ते कधीं घेत नसत. त्यांस पक्कें ठाऊक होतें कीं, आपली दिशा व आपल्यास सल्ला देणाऱ्या लोकांची दिशा या अगदीं वेगळ्या आहेत! विष्णुशास्त्री यांच्या मतें स्वाभिमान व स्वदेशाभिमान हीं राखून अन्नानें चरितार्थ चालला म्हणजे बस आहे. सरकारी नोकरीकरितां आपल्या ठिकाणच्या सर्व उच्च मनोवृत्ति संकुचित करून ठेवाव्या हें त्यांस बरें वाटत नसे; परंतु त्याच्या उलट समज त्यांच्या हितचिंतक मित्रांचा असल्यामुळें ते त्यांशीं वादाच्या भानगडींत पडत नसत.

विष्णुशास्त्री यांचें कुटुंब या वेळीं गरोदर असल्यामुळें त्यांस रत्नागिरीस एकटेंच जावें लागलें. त्यांच्या बरोबर कृष्णशास्त्री यांची वृद्ध मामी, त्यांच्या घरीं वीस वर्षे राहिलेला काशीबा नांवाचा गडी, व एक महादेव म्हणून कोणी विद्यार्थी, इतकी मंडळी होती. विष्णुशास्त्री पुण्याहून मुंबईस गेले, तेथें दोन तीन दिवस राहून तेथील नवलविशेष गोष्टी पाहून ते आगबोटीनें रत्नागिरीस डिसेंबर ३१ तारखेला जाऊन पोहोंचले.

भाग ६ वा.

रत्नागिरीस बदली.

कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्तेर्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।
अधोमुखस्यापि कृतस्य वन्हेर्नोऽधः शिखा याति कदाचिदेव ॥

भर्तृहरी.

मागील भागांत विष्णुशास्त्री यांची बदली रत्नागिरीस होऊन ते १८७७ सालच्या अखेरीस तेथें जाऊन दाखल झाले म्हणून सांगितलें आहे. आतां यापुढें त्यांचें रत्नागिरीस वर्ष दीड वर्ष वास्तव्य होऊन मध्यंतरी त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे वारल्यानें प्रपंचाचा खटला त्यांच्या शिरावर पडला असतां त्यांचा पूर्व निश्चय जो कीं, सरकारी नोकरी सोडून देऊन स्वतंत्र उद्योग काढून त्यावर निर्वाह करावयाचा, तो दृढतर होत जाऊन त्यांनी सरतेशेवटीं तो अंमलांत कशाप्रमाणें आणिला व किताबखाना व न्यू इंग्लिश स्कूल यांची स्थापना कशी झाली हा मनोरंजक वृत्तांत या भागांत आणिला आहे.

विष्णुशास्त्री हे रत्नागिरीस येऊन दाखल झाल्यावर त्यांस प्रथम कांहीं वेळ बराच संतोष झाला. ते एक दोन दिवस त्यांचे मित्र कै. जनार्दन बाळाजी मोडक तेथील हायस्कुलांतील फर्स्ट असिस्टंट मास्तर यांचे घरीं उतरले होते. त्या वेळीं हायस्कुलचे हेडमास्तर विष्णुशास्त्री यांचे पूर्वाश्रमांतील गुरु मि. वामन आबाजी मोडक हे होते. त्यांनीं विष्णुशास्त्री हे येऊन दाखल झाले हें ऐकून त्यांस आपल्या घरीं बोलावून आणून त्यांचा चांगला सत्कार केला व कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर ते आपल्या नहमींच्या शांत व प्रौढ वृत्तीनें विष्णुशास्त्री यांस म्हणाले, " या शाळेंतील सर्व शिक्षक मंडळी बहुतेक नाहीं, सर्वतोपरी एकाच कुटुंबांतील मांणसांसारखी अशी आम्हीं आहोंत ! " हें आश्वासन

रूप भाषण ऐकून विष्णुशास्त्री यांस वाटलें कीं, मि. मोडक यांजबरोबर मालेच्या चोवीस व सव्वीस अंकांत जी झटापट झाली होती तिजपासून त्यांचें मन कलुषित झालें नसून पुण्याप्रमाणें येथें आपणांस हेडमास्तर यांच्यापासून त्रास होणार नाहीं.

विष्णुशास्त्री हे घर सोडून दूर गांवीं गेल्यानें या वर्षापासून त्यांच्या पत्रव्यवहारास आरंभ झाला. तो तसाच यापुढें त्यांच्या हयातीपर्यंत चालू राहिला. त्यांनीं आपल्या वडिलांस रत्नागिरीहून जें प्रथम पत्र पाठविलें आहे तें खालीं देतों:—

RATNAGIRI
2-1-78.

My dear Father,

I am now safely at Ratnagiri, quite comfortably lodged. I have with me our Mami, Kashiba and Mahadeo whom I took from Bombay. Mami was prostrated on board ths steam-boat by the osoillations of that vehicle and myself also suffered somewhat. We have lodged at a small, neat dwelling; our neighbour is a brother of my earliest tutor, Sadoba Limaye. Everything in short is pretty much to our satisfaction.

There are other conveniences also at this plaoe. There is a General Library containing a considerable number of books and affording several newspaper and reviews for perusal. There are excellent walks on the sea-side and on the common. There are here and then many good views and shady avenues. Above all there are several good friend of mine who hardly allow me to think that I am a stranger here. My present Head-Master, too, I find, as every subordinate of his finds, to be emiently gentlemanly and sociable, and every moment I have been with him, I cannot helf looking back on that hateful tyranny that I have escaped.

Pay my reverential respects to my dear mother,

Yours affectionately ever
Vishnu K. Chiplunkar.

वरील पत्रावरून विष्णुशास्त्री यांस हें नवीन स्थळ प्रथम खेपेस बरेंच मजेचें व आनंदकारक वाटलें असें दिसतें. त्यांस विशेषेंकरून आवडणाऱ्या कांहीं गोष्टी—समुद्रकांठ, तेथील रम्य शोभा, फिरावयास सोयींचे रस्ते, मोठी लायब्ररी, व स्नेही मंडळी—या येथें होत्या. यांपैकीं ते परशुराम क्षेत्राचा त्याग करून पुण्यास आल्यावरहि तेथील लायब्ररीची व तींतील पुस्तकसंग्रहाची फार तारीफ करीत असत. ते सांगत असत कीं, " ही लायब्ररी पूर्वी युरोपियन व नेटीव लोक या दोहोंची एकच असल्यामुळें तींत कित्येक जुनीं जुनीं ऐतिहासिक पुस्तकें जीं इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वीं किंवा अवल इंग्रजींत कांहीं थोर थोर साहेबांनीं लिहिलीं असून त्यांच्या पुढें पुनरावृत्ति न निघाल्या कारणानें त्यांच्या प्रति आतां बहुतेक दुर्मिळच झाल्या आहेत, तीं होतीं. हीं आपल्या देशाचा खरा इतिहास लिहिण्यास फार उपयोगी पडण्यासारखीं अर्थातच आहेत. त्याचप्रमाणें या लायब्ररींत दोन मोठ्या दुर्बिणी असून त्यांतून रात्रींच्या वेळीं तारे पाहण्याची वगैरे चांगली सोय असे. "

मि. वामन आबाजी मोडक हे दररोज सकाळीं फिरावयास जात असत. त्यांची वाट विष्णुशास्त्री यांचे बिऱ्हाडावरूनच असल्यामुळें ते विष्णुशास्त्री यांस हाक मारून त्यांस फिरावयास बरोबर घेऊन जात; परंतु सकाळीं फिरावयास गेल्यानें लिहिण्यावाचण्याचा बहुतेक वेळ निघून जाई म्हणून, व शिवाय मि. मोडक यांच्यासारख्या आपल्यापेक्षां वयानें व अधिकारानें जास्त अशा गृहस्थांबरोबर फिरावयास बरोबर जातांना वाटेनें रोजच्या रोज नवीन काय बोलावें ही विष्णुशास्त्री यांस पंचाईत पडल्यामुळें ते हेडमास्तरबरोबर—जरी ते प्रेमपूर्वक बोलावीत असत तरी—जाण्यास टाळाटाळी करू लागले. ते एकदां सांगत होते कीं, " हेडमास्तरांची स्वारी एके दिवशीं सकाळीं आमच्या बिऱ्हाडाशीं येऊन मला हाक मारून दरवाज्यांत काशीबा गडी उभा होता त्याजपाशीं चवकशी करीत आहेत हें मी ओटीवरून आइून ऐकिलें. इतक्यांत काशीबा आंत धांवत येऊन हेडमास्तर फिरावयास येण्याबद्दल बोलावीत आहेत म्हणून सांगूं लागला. मी हळूच त्यास साधारण खुणेनेंच सुचविलें

कीं, मी बाहेर गेलों आहे म्हणून सांग. यावरून हेडमास्तर त्या दिवशीं तसेच एकटे फिरावयास निघून गेले. पण ही त्या दिवसापुरती बतावणी झाली! दुसऱ्या दिवशीं पुन्हां तोच प्रसंग यावयाचा. पण आमचा काशीबा मोठा धूर्त असे. 'त' म्हणतांच 'ताक भात' ओळखणारा असा तो हुषार होता. दुसऱ्या दिवशीं हेडमास्तरांची स्वारी त्यानें दुरून येतांना पाहतांच तो देवडीवरून मुकाट्यानें आपला आंत उठून आला म्हणजे आपणांस खोटें बोलण्याची पाळी न येतां, हेडमास्तर यांची मर्जी न दुखावतां यजमानांचेंहि काम व्हावें!!"

विष्णुशास्त्री यांस रत्नागिरीस जसजसे अधिकाधिक दिवस जाऊं लागले तसतसे त्यांस तेथील हायस्कुलांतील मास्तर मंडळी म्हणजे सर्वतोपरी एकाच कुटुंबांतील माणसांसारखी आहे हें केवळ सांप्रदायीकच भाषण होय असें दिसून आलें. व इतर ठिकाणच्या हायस्कुलांप्रमाणेंच तेथेंहि कांहीं मोठी, कांहीं लहान मंडळी असून त्यांमध्यें परस्परांविषयीं कांहीं प्रेम, कांहीं द्वेष, कांहीं मत्सर वगैरे सर्व चांगले व वाईट मनोविकार त्यांस दृष्टिगोचर होऊं लागले. तेथें मि. बाबा लेले म्हणून कोणी शेवटले असिस्टंट तेथीलच राहणारे होते. ते त्याच हायस्कुलांतून मॅट्रिक्युलेशन पास होऊन त्यांस तेथेंच नोकरी मिळाली होती. त्यांनीं चार पांच हेडमास्तरांच्या रशिदी पाहिल्या होत्या. हे गृहस्थ मोठे खुबीदार व मार्मिक असल्यामुळें त्यांच्या पाहण्यांत ज्या कित्येक चमत्कारिक व गमतीदार गोष्टी घडून आल्या होत्या त्यांचा त्यांजपाशीं चांगला सांठा असे. विष्णुशास्त्री यांचा स्वभाव साधा असून मार्मिक असल्यामुळें त्यांचे आणि बाबांचे आंकडे लवकरच पडले. बाबांनीं आपल्या आख्यायिकांचा सांठा विष्णुशास्त्री यांजपुढें ओतल्यानें विष्णुशास्त्री यांस परशुरामक्षेत्राची मागील हकीकत थोडक्या दिवसांतच चांगली ध्यानांत आली. विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं हा एक विशेष असे—पण त्यास गुण म्हणावें किंवा अवगुण म्हणावें याचा अंमळ वादच आहे. तो हा कीं, प्रत्येक मोठ्या प्रसिद्ध व्यक्तीविषयीं चांगल्या वाईट गोष्टी ऐकण्याचा त्यांस मोठा नाद असे, व या त्यांनीं एकदां ऐकिल्या म्हणजे त्या त्यांच्या स्मरणांतून कधींहि जात

नसत. आपल्या लोकांत मोठ्या लोकांच्या गोष्टी ऐकण्याविषयीं इच्छा फारशी दृष्टीस पडत नाहीं; आणि त्यांतून वाईट गोष्टींचें तर विचारूंच नये ! त्या चार सारख्यासारख्या मंडळींत सुद्धां गमतीनें सांगणें किंवा ऐकणें हें शिष्टपणाविरुद्ध आहे अशी आपल्या लोकांची साधारण समजूत आहे. त्यांचें म्हणणें कीं, तसें करणें म्हणजे मोठ्या लोकांची व्यर्थ निंदा करणें होय; आणि शिवाय त्यापासून फायदा तो काय ? पण ही समजूत केवळ अज्ञाणीपणाची होय. कारण मोठमोठ्या पुरुषांचीं जर खरीं चरित्रें लिहावयाचीं व त्यांपासून बोध होईल म्हणून अपेक्षा धरावयाची तर वरील गोष्टी—चांगल्या व वाईट अशा दोन्हीहि—यांचा संग्रह केल्यावांचून मोठ्या पुरुषांचीं चरित्रें व्हावींत कशीं ? आणि इंग्रजींत जीं उत्तम चरित्रें आहेत तीं सर्व गोष्टीमय आहेत व म्हणूनच तीं फार मनोरंजक झालीं आहेत. शिवाय चरित्रनायकाचा वृत्तांत नुसता वर्णनपर लिहिण्यापेक्षां तो मधून मधून आख्यायिकांनीं गुंफून तयार केला असला म्हणजे तो कंटाळवाणा न होतां वाचण्यास मोठा मजेदार वाटतो; व नुसत्या वर्णनावरून मूळ पुरुषाची ओळख पटण्याचा जितका संभव आहे त्यापेक्षां मधून मधून आख्यायिका दिल्यानें तो अधिक आहे. याचा प्रत्यय कोणास पाहणें असल्यास त्यानें बासवेलचें चरित्र पहावें.

तेव्हां या आख्यायिका ऐकण्याचा विष्णुशास्त्री यांस नाद असल्यामुळें त्यांस कधीं कधीं जी खुबीदार मंडळी भेटे त्यांजपासून त्या ऐकण्याची संधि ते बहुधा दवडीत नसत; व अशा लोकांवर त्यांचें बरेंच प्रेमहि असे; परंतु अशी मंडळी बहुतकरून मोठ्या दर्ज्याची फार करून नसायची. कारण लहान मनुष्यास त्यांच्या शेजारील मोठ्या मनुष्याच्या अंगचे गुणावगुण समजण्याच्या जशा पुष्कळ संधि असतात तशा दुसऱ्या एखाद्या मोठ्या मनुष्यास अर्थातच असूं शकणार नाहींत. तेव्हां अशा खालच्या दर्ज्याच्या मंडळीपासून तत्कालिन प्रसिद्ध व्यक्तींविषयींच्या ऐकलेल्या आख्यायिकांचा विष्णुशास्त्री यांच्या जवळ मोठा सांठा असे. तथापि यांपैकीं त्यांच्या पूर्वींचे हेडमास्तर मि. कुंटे यांच्या दोन तीन आख्या-यिकांशिवाय त्यांनीं आपल्या लेखांत इतर कोणा मोठ्या व्यक्तीच्या

आख्यायिकांचा उल्लेख करून त्यांनीं आपल्या वरील संग्रहाचा दुरुपयोग केला आहे असें आम्हांस ठाऊक नाहीं.

मि. बाबा लेले यांनीं विष्णुशास्त्री यांच्या जवळ त्यांचे हेडमास्तर मि. मोडक यांजविषयीं ज्या कांहीं गमती सांगितल्या त्यांतून ते दोन तीन गमती कित्येक वेळ आपल्या स्नेह्यांस सांगत असत. ते म्हणत कीं, " मि. मोडक यांस शनिवारीं, रविवारीं दुपारीं वेळ जाण्याकरितां आपल्या घरीं असिस्टंट मास्तरांनीं येऊन सोंगट्या, बुद्धिबळें वगैरे खेळ खेळावेत अशी इच्छा असे; पण हे खेळ खेळतांना त्यांनीं आपापला दर्जा विसरतां कामा नये-म्हणजे फार तर एक दोन वरचे असिस्टंट यांनींच खुद्द यजमानां-बरोबर खेळावें, बाकीच्या असामींनीं दूर अदबीनें राहून डोक्यांवरूत पागोटीं न काढतां बुद्धिबळाचा किंवा सोंगट्यांचा खेळ मुकाट्यांनीं दुरून पहात बसावें ! "

याच प्रकारची अंमळ फाजील शिष्टपणाचा व शाळेंतील कवायतीचा मासला म्हणून विष्णुशास्त्री हे बाबांपासून ऐकलेली दुसरी एक गोष्ट सांगत असत कीं, " एके दिवशीं हायस्कुलांतील लायब्ररीची तपासणी करून ज्या पुस्तकांवर हायस्कुलच्या नांवाच्या चिठ्या नसतील त्यांवर त्या घालावयाच्या वगैरे काम निघालें असतां, असिस्टंट मंडळीकडे कोणांकडे यादीवरून बुकें तपासणें, कोणांकडे तीं कपाटांतून काढून पुन्हां नीट जागच्या जागीं व्यवस्थेनें लावून ठेवणें, वगैरे कामांची वांटणी होऊन छोटेखानी बाबांकडे पुस्तकांवर खळीनें चिठ्या चिकटविण्याची बिगार आली ! तेव्हां एका शनिवारीं दुपारीं लायब्ररीच्या तपासण्याचें काम जारीनें चालू असतां व बाबांची स्वारी मोठा मांडा घालून, अंगरख्याच्या अस्तन्या वर सरसावून, डोक्यावरील पागोटें खालीं काढून ठेवून, खळींत हात भरवून, चिठ्या चिकटविण्याच्या मोठ्या सपाट्यांत आहे, इतक्यांत हेडमास्तरसाहेब जे अंमळ दूर पलीकडच्या खोलींत पुस्तक वाचनांत गुंतले होते, त्यांची नजर सहज बाबांच्या डोक्याकडे जाऊन त्याजवर मुकुट विलसित नसलेला पाहून त्यांस ती शिष्टसंप्रदाया-विरुद्ध झालेली आगळिक सहन न होऊन त्यांनीं तत्काळ चुटकी वाजवून

' बाबा, बाबा ' अशा हाका मारून व त्यानें त्यांच्याकडे पाहतांच आपल्या डोक्याकडे बोट दाखवून व तें चक्राकार फिरवून त्यास डोक्यावर पागोटें चढविण्यास खूण केली ! बिचारा बाबा करितो काय ! मनांत रागावला खरा; परंतु तीस रुपयांकडे नजर देऊन लागलीच खळीनें भरलेल्या हातांनींच डोक्यावर मुंडासें चढवून आपलें काम तसेंच पुढें ढकलूं लागला. ''

विष्णुशास्त्री यांचें रत्नागिरीस थोडेंच दिवस वास्तव्य असल्यामुळें तेथील शाळेंतील काम त्यांच्या हातून कसें होत होतें याजविषयीं विशेष लिहिण्याची गरज नाहीं. तें साधारण नेमस्तच असेल असा अदमास आहे. रत्नागिरी हायस्कुलाची याच्या पूर्वी म्हणजे मि. भांडारकर तेथें हेडमास्तर असतांना जी भरभराट होती ती आतां राहिली नसून दिवसानुदिवस ती शाळा मोडकळीस येऊं लागली होती. विष्णुशास्त्री यांजकडे तेथील दुसऱ्या वर्गाचेंच बहुतेक काम असे. ते रत्नागिरीस येऊन दोन तीन महिने झाल्यावर हायस्कुलची तपासणी करण्याकरितां कर्नेल वाडिंटगूनसाहेब ह्यांची स्वारी मार्च महिन्यांत येणार अशी बातमी आली. तेव्हां क्याटलॉग, राजिस्टरें वगैरेंच्या साफसुफीकडे शिक्षक मंडळी लागली. विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " या वेळीं माझ्या एका क्याटलॉगांत बरीच चिताड झाली होती, व त्याजवर शाईचा एक मोठा डाग पडला होता; तेव्हां मीं हेडमास्तर यांस विचारिलें कीं, हा क्याटलॉग बदलून मी पुन्हां दुसरा स्वच्छ तयार करून आणूं कां ? परंतु हेड-मास्तरांचा स्वभाव विशेष चोखीचा व संशयी असल्यामुळें त्यांनीं म्हटलें, " No. Let every thing be done in good faith ! " मे. वाडिंटग्न साहेबांची स्वारी क्याटलॉगांची तपासणी करीत असतां वरील डाग पडलेला क्याटलॉग साहेबांच्या नजरेस पडतो कीं काय म्हणून मला बराच धाक होता; परंतु तसें कांहीं न होऊन साहेबांची स्वारी एकदांची विन रागावतां निघून गेली, तेव्हां मला बरें वाटलें ! ''

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांच्या हायस्कुलांतील कामकाजाची हालहवाल झाली. आतां आपण त्यांच्या बरोबर त्यांच्या बरदास्तीकरितां जी मंडळी

आली होती, तिजकडे अंमळ वळूं. कारण तीहि त्यांजविषयीं कांहीं वर्णन देण्यालायकच होती. त्यांच्या घरचा गडी काशीबा यांच्या धूर्तपणाबद्दल मागें नुकतीच एक आख्यायिका दिली आहे, तिजवरून त्याच्या स्वभावाविषयीं साधारण वाचकांस कल्पना होण्यासारखी आहे. दुसरा इसम महादेव हा कृष्णशास्त्री यांच्या घरीं विद्याभ्यासासाठीं राहिला असून पुढें तो मुंबईत एका गिरणींत चाकरीस होता; परंतु तेथें तो कंटाळलेला असल्यामुळें तो विष्णुशास्त्री यांजबरोबर कांहीं दिवस रत्नागिरीस राहण्याकरितां म्हणून त्यांजबरोबर आला होता; परंतु ह्या दोहोंतूनहि विशेष चमत्कारिक व गमतीची असामी म्हटली म्हणजे विष्णुशास्त्री यांच्या वडिलांची म्हातारी मामी ही होय. विष्णुशास्त्री यांस काळजीनें खाण्यापिण्यास घालण्याकरितां म्हणून या बाईस बरोबर दिलें होतें. मामी या वयानें सुमारें साठी उतरून गेल्या होत्या; परंतु त्यांच्या स्वभावांत, त्यांच्या बोलण्या चालण्यांत वगैरे अद्याप त्यांची बाल्यवस्थाच दृष्टीस पडत असे! दुपारीं जेवणीं खाणीं झालीं म्हणजे मामींचा पाय घरांत फार करून ठरत नसे. या शेजाऱ्याकडे जा, त्या शेजाऱ्याकडे जा, असें करून व जागोजागीं ओळख पाडून व कोठें कोठें नातेंहि काढून त्यांनीं लवकरच पुष्कळ ओळखी जोडल्या. जुनी भोळसर म्हातारी—तीस कोठें काय बोलावें, किंवा कोणास काय म्हणावें, याचा फारसा बारकावा नसे! 'माझा विष्णु किती शहाणा, किती थोरामोठ्याचा मुलगा, त्याच्या बापाचा केवढा नांवलौकिक, त्याच्या सारखा शहाणा आहे कोण? त्याचं आणि मेल्या त्या साहेबाचं कुठं वांकडं आलं आणि त्यानं याला इकडे दूर पाठवून दिलं; नाहीं तर तो कुठला इतका लांब यायला?' याप्रमाणें जेथें जेथें म्हणून मामी जात तेथें तेथें शेजाऱ्यांपाजाऱ्यांपाशीं त्या विष्णुशास्त्री यांचा प्रस्ताव करीत. त्याचप्रमाणें संध्याकाळीं मामीसाहेबांची स्वारी घरीं परत आली म्हणजे गांवांतली सगळी खबर विष्णुशास्त्री यांस त्यांनीं निवेदन करावयाची! व म्हणावें कीं, "कायरे विष्णु! तुझा कितीरे नांवलौकिक गांवभर आहे? जें तें म्हणतें तूं काय काय लिहितोस? तुझा हात धरणारा कोणी नाहीं; तूं साहेबाविषयीं जर वांकडें लिहितास

ना तर एव्हांना कोठें तरी दोनशें चारशें रुपयांवर असतास ! खरंच का ? विष्णु ? " येणेंप्रमाणें या भोळ्या म्हातारीची घरून गांवांत व गांवांतून घरांत दररोज डाक चालायची ! !

मामींची बोलण्याचालण्यांत जशी चंचलता असे तशीच ती त्यांच्या एकंदर वृत्तींतहि असे. त्या कोंकणांतलिच मूळच्या राहणाऱ्या असून रत्नागिरीपासून जवळच त्यांच्या मामाचें राहण्याचें गांव होतें. कोंकणांत फणसांची, आंब्यांची वगैरे चांगली चंगळ असते तेव्हां मामाच्या गांवीं एकदां जाऊन यावें म्हणून मामींचा मोठा नाद होता. त्यांनीं एके दिवशीं रात्रीं काशीबास व महादेवास सांगितलें कीं " मी उद्यां मामाच्या गांवीं जाऊन पुष्कळ फणसबिणस घेऊन येतें; कोंकणांत दुसरें खायला आहे काय ?" महादेवानें मामींस म्हटलें "तुम्ही गेलां म्हणजे विष्णुशास्त्री यांस जेवावयास कोण करून घालील ? शिवाय कोंकणची हवा म्हणजे कोण वाईट; आम्ही एका गऱ्यासहि शिवणार नाहीं; आणि तुम्हांस पाहिजेच तर या गांवांत तरी फणसांचा काय तोटा पडला आहे ? " मामींस ही गोष्ट खरीशी वाटून त्या म्हणाल्या " तेंहि खरंच आहे. येथेंहि कांहीं कमताई नाहीं " या बोलण्यावरून मामींच्या प्रयाणाचा जो धाक मंडळींस पडला होता तो निघून ते सर्व त्या रात्रीं स्वस्थ झोंपीं गेले; परंतु मामींची स्वारी मोठ्या पहाटेस उठली व खेडगांवच्या फणसांच्या चंगळीची आठवण त्यांस येऊन त्यांनीं लागलींच शौच, मुखमार्जन वगैरे आटपून घेतलें. मग खांद्यावर दोन लुगडीं टाकून व थोडेंसें फराळाचें बरोबर घेऊन त्या दरवाजांतून बाहेर पडल्या व तेथूनच " महादेव, मी डोणगांवास जातेंरे; दरवाजा लावून घ्या. " म्हणून आरोळी मारून फणसगांवाची वाट त्यांनीं सुधारली ! इकडे माधवराव व काशीबा अंथरुणांतून लगबगीनें उठून मामी रस्त्यांत असतील म्हणून जों पहायला जातात तों त्या बऱ्याच दूर निघून गेल्या होत्या. मग करितात काय ? माधवरावांनीं दोन दिवस मामी-साहेबांचें काम बरें वाईट ढकललें; व दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं पहातात तों मामींची स्वारी फणसांची वगैरे चंगळ मारून घरच्या मंडळीकरितां म्हणून भले दोन सपाटे फणस पाठीस मारून येऊन दाखल झाली ! मग

त्याच संध्याकाळीं त्यांतील एक फणस कापून त्यांतील गरे काढून पांच पांच महादेव, काशीबा व विष्णुशास्त्री यांस त्या देऊं लागल्या; परंतु हवेच्या धाकानें त्या तिघां असामींत तीनहि गरे खपले नाहींत ! काशीबाचा खाण्यापिण्याचा बेत विशेषच असल्यामुळें तो बिचारा एकास सुद्धां शिवला नाहीं. पण मामींची जिव्हा व कोठाहि अत्यंत प्रज्वलित असल्यामुळें हवेचा किंवा पाण्याचा बारकावा त्यांच्या लक्षांत कधींच आला नाहीं. त्यांनीं आयताच त्या रात्रीं एकाचा व दुसऱ्या दिवशीं दुसऱ्याचा अशा दोन्ही फणसांचा समाचार एकट्यांनींच घेतला ! !

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं मामी, काशीबा, महादेव व बाबा यांच्या समागमांत बऱ्याच गंमतींत दिवस काढून ते मे महिन्याच्या सुट्टींत पुण्यास घरीं आले. तेथें सालाबादप्रमाणें वक्तृत्वसभा वगैरे धामधूम चाललीच होती. वक्तृत्वसभेस कृष्णशास्त्री या सालीं मधून मधून जात होते; परंतु अखेरच्या दिवशीं समारंभाचें विसर्जन जें त्या सालीं १० तारखेस व्हावयाचें होतें तें त्यांची प्रकृति बरी नसल्यामुळें नेहमींप्रमाणें त्यांच्या हातून न होतां मि. कुंटे यांच्याच हातून झालें. याच तारखेस रात्रीं बारा वाजल्यावर कृष्णशास्त्री यांस Augina Pectoris या व्याधीची प्रथम लहर येऊन त्या सर्व रात्रभर त्यांच्या उरांतील कळ राहिली नाहीं. दुसऱ्यादिवशीं सकाळीं ती नाहींशी होऊन तिचामागमूसहि नाहींसा झाला. यानंतर १४ व १७ तारखांस पुन्हां त्यांस रात्रीं कळ आली. या दुसऱ्या प्रसंगीं ती इतक्या जोरानें आली कीं, तिच्या वेदना सहन न होऊन कृष्णशास्त्री गुरासारखें ओरडूं लागले. डॉक्टर विश्राम यांनीं मॉरफिया, इंजेक्शन वगैरे उपचार केला, परंतु कळ कमी होईना. इतक्यांत काशीताई (कृष्णशास्त्री यांची बायको) त्यांस रामराम म्हणून देवाचें नांव घ्या म्हणून सांगूं लागल्या; परंतु कृष्णशास्त्री यांची धर्मसमजूत नास्तिकपणाची असल्यामुळें ते तसें कांहीं एक न म्हणतां फक्त ' आई, आई ' म्हणून ओरडत राहिले ! तीन चार तासांनीं ही कळ कमी होत चालली. या सुमारास शास्त्रीबोवांच्या दुखण्याची बातमी कळून त्यांचे मित्र बाबा गोखले, त्रिंबकराव सरंजामे वगैरे रंगेल मंडळी कोठें चंगळ करीत बसली होती ती लागलींच

तेथें आली. या वेळीं कळ अगदीं नाहींशी होऊन कृष्णशास्त्री अगदीं पूर्ववत् खडखडीत झाले होते. मग या चमत्कारिक दुखण्यावरून गोष्टी निघतां निघतां देवाविषयीं सहज गोष्ट निघाली असतां कृष्णशास्त्री म्हणाले " Vishram, you are my God; I know no Vishnu or Rama "

येणेंप्रमाणें १७ तारीख तर टळली; मग अधिक बंदोबस्त करण्याकरितां डॉ. विश्राम यांनीं कृष्णशास्त्री यांच्या छातीवर ब्लिस्टर मारिलें; परंतु त्याचा उपयोग न होऊन १९ तारखेस पुन्हां रात्रीं कळ निघूं लागली. ती १७ तारखेच्या कळीप्रमाणें तीव्र नव्हती; परंतु पूर्वींच्या तीन लहरींच्या योगानें कृष्णशास्त्री यांची प्रकृति पुष्कळ क्षीण होऊन गेली असल्यामुळें त्यांच्यानें आतां वेदना अगदीं सहन होईनात. डॉ. विश्राम यांनीं कृष्णशास्त्री यांस बेशुद्धि यावी म्हणून क्लोरोफॉर्मचा उपचार केला; परंतु या औषधाचा अंमल असे तोंपर्यंत मात्र ते निश्चेष्ट पडून राहत; परंतु तो कमी होतांच वेदना पुन्हां सुरू होऊन कृष्णशास्त्री ओरडूं लागत. ही रात्र तशीच कशी तरी गेली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कळ विशेष राहिली नव्हती; परंतु काळजाची शक्ति नष्ट झाल्यामुळें अंगावर ग्लानि येऊन हातपाय हळुहळू गार पडूं लागले. त्यांची अवस्था आतां कठिण आहे असें सर्वांस वाटूं लागलें. यानंतर आपण आतां जगत नाहीं असें जाणून ते विष्णुशास्त्री यांस शेवटचेच शब्द म्हणून इंग्रजींत म्हणाले, " माझें हें दुखणें कठिण दिसतें; तूं रजा घेऊन कांहीं दिवस येथेंच रहा. तुम्ही आतां सर्व मोठें झालांच आहां; मला तुम्हांविषयीं काळजी वाटत नाहीं. " मग सीतारामपंतांस बोलावून आणून त्यांसहि उपदेशादाखल ते इंग्रजींत म्हणाले, " तुम्ही तिघेजण भांडण न करितां इतके दिवस जसें गोडीनें एकत्र राहिला तसेंच यापुढेंहि रहावें अशी माझी इच्छा आहे. मीं आतांच विष्णूला एक मोठी गुप्त गोष्ट सांगितली आहे. ती आतां तुला पुन्हां सांगण्यास मला शक्ति नाहीं. ती तो तुला सांगेल. " इतके शब्द बोलून ते स्तब्ध राहिले. यानंतर दोन तीन मिनिटांनीं कृष्णशास्त्री यांचें प्राणोत्क्रमण झालें.

येणेंप्रमाणें कृष्णशास्त्री यांचा अंत तारीख २० मे रोजीं दुपारीं एक वाजतां झाला. या वेळीं त्यांचें वय ५४ वर्षांचें होतें. त्यांची बुद्धि, त्यांची विद्वत्ता व त्यांनीं केलेले ग्रंथ यांबद्दल त्यांचा उत्कृष्ट नांवलौकिक असल्यामुळें त्यांच्या मरणाचें वृत्त ऐकून पुण्यांतच काय, परंतु सर्व महाराष्ट्र देशांत जेथें जेथें म्हणून महाराष्ट्र भाषेचा प्रचार आहे तेथें तेथें लोकांस दुःख वाटलें. कृष्णशास्त्री यांची मान्यता जुन्या पंडितांत असून ते नवीन विद्वान् मंडळींत प्रमुख म्हणून मोडले जात असत. पुण्यांत ज्या ज्या म्हणून सभा होत, त्यांत त्यांच्याकडे अध्यक्षत्व असे. शिवाय त्यांचा सर्व जन्म पुण्यांतच गेला असल्यामुळें त्यांच्या सारखें वजन नवीन विद्वान लोकांत दुसऱ्याचें क्वचित्च असे. त्यांच्या हातून जे शेंकडों विद्यार्थी तयार होऊन गेले होते ते व जे प्रत्यक्ष त्यांचे शिष्य नसून ज्यांचा त्यांच्यांशी परिचय व स्नेह हा मोठेपणीं जडला होता असे पुष्कळ नवीन विद्वान गृहस्थ या दोहोंच्या ठिकाणीं कृष्णशास्त्री यांच्या अंगची विद्वत्ता, रसिकता व बहुश्रुतपणा या गोष्टींवरून त्यांजविषयीं चांगली पूज्यबुद्धि असे. त्यांची मुद्रा प्रथमदर्शनीं मोठी उग्र व मनांत भरण्यासारखी नसे, व त्यांस स्वतः होऊन कोणाशीं बोलावयास नको असे; परंतु एकदां थोडी भाषणाची सुरुवात झाली म्हणजे कृष्णशास्त्री यांचा साधा स्वभाव, त्यांची विद्वत्ता व त्यांचें बुद्धिवैभव हीं सहज लक्षांत येण्यासारखीं असत. कोणतेंहि मोठें लौकिककृत्य गांवांत निघालें म्हणजे शास्त्रीबोवांचा सल्ला मंडळी घेत असत. साहेबलोकांत व विशेषेंकरून विद्याखात्याच्या साहेबलोकांत त्यांची मोठी मान्यता असे. सर आलेक्झ्यांडर ग्रांट, प्रो. वर्डस्वर्थ, मि. चाटफील्ड वगैरे विद्वान साहेबांच्या ठिकाणीं शास्त्रीबोवांविषयीं कशी आदरबुद्धि असे याविषयीं आख्यायिका मागें सांगण्यांत आल्याच आहेत. येणेंप्रमाणें कृष्णशास्त्री हे सरकारी नोकरी उत्तम रीतीनें करून, त्याचप्रमाणें मराठी भाषेस आपल्या गद्य व पद्य ग्रंथरचनेनें बरेंच रमणीय स्वरूप आणून देऊन व तेणेंकरून सर्व महाराष्ट्र देशभर चांगला नांवलौकिक व मान्यता यांचा सुमारें पंचवीस वर्षें उपभोग घेऊन स्वर्गस्थ झाले.

कृष्णशास्त्री यांचा उदय दरिद्रावस्थेंतून होऊन त्यांचा संसार दिवसांनु-

दिवस वाढत गेल्यानें व त्यांच्या ऊर्जित दशेमुळें त्यांच्या आश्रयाखालीं बरीच भिन्न भिन्न प्रकृतींची, भिन्न भिन्न गुणांची मंडळी हळुहळू जमत चालल्यामुळें त्यांच्या मरणापूर्वी कांहीं दिवस त्यांच्या कुटुंबांत कलह, कटकटी वगैरेचा बराच संचार होऊं लागला होता म्हणून मागें पांचव्या भागांत सांगण्यांत आलेंच आहे; परंतु त्यांचा पूर्ण विकास होण्यास कृष्णशास्त्री यांचा अंतच आड होता! तो झाल्याबरोबर त्यांच्या कुटुंबांतील माणसें जीं इतका वेळ त्यांच्या वजनानें व दराऱ्यानें बऱ्यांच अंशीं आकळून धरलेलीं होतीं तीं आतां अगदीं अनावर झाली! विष्णुशास्त्री यांस इतके दिवस संसारांतील कटकटींचा व त्रासांचा फारच थोडा अनुभव होता. आपली आई, आपले चुलते व आपले मामा यांच्यांमधील कटकटींच्या संबंधानें ते इतका वेळपर्यंत केवळ उदासीनच होते; परंतु कृष्णशास्त्री यांच्या मागें कुटुंबाचें प्रमुखत्व त्यांजकडे आल्यामुळें वरील कटकटीचा मोर्चा आतां त्यांजकडे फिरला!

कृष्णशास्त्री वारल्यानंतर थोडेच दिवसांत सीतारामपंतांनीं विष्णुशास्त्री व लक्ष्मणराव यांस सुचविलें कीं, 'सध्यां आपणांमध्यें पूर्ण स्नेहभाव आहे तो तसाच रहावा याकरितां आज घरांत जी चीज वस्त आहे त्याची आपण वांटणी करून घेऊन शास्त्रीबोवांनीं कित्ता घालून दिल्याप्रमाणें आपापलें उत्पन्न वेगळें वेगळें ठेवून एकत्र राहूं. मीं ही गोष्ट केरोपंतनानांना सांगितली व ती त्यांनींहि पसंत केली.' सीतारामपंतांचें म्हणणें सरळ असल्यामुळें व पुढें मागें विभक्त होणें इष्ट आहे असें समजून विष्णुशास्त्री व लक्ष्मणराव हे त्या गोष्टीस मान्य झाले. मग एकंदर सोन्यानाण्याची किंमत करून प्रत्येकानें त्याचा तृतीयांश घ्यावा असें ठरलें; व ही व्यवस्था कोणा मोठ्या मनुष्याच्या देखत मुकरर करण्याकरितां सीतारामपंत यांनीं केरोपंतनाना यांस एके दिवशीं रात्रीं बोलावून आणिलें. नानांनीं ही व्यवस्था पाहून त्याबद्दल त्यांनीं आपली पसंती प्रदर्शित केली. ते म्हणाले, "सीतारामाला शास्त्रीबोवांनीं आपल्या मुलाप्रमाणेंच वाढविलें; त्यांस तुम्ही एकंदर मालमत्तेचा एक तृतीयांश देतां हें पाहून मला फार संतोष वाटतो. तुम्ही याप्रमाणें शहाणपणानें व्यवस्था करीत आहां तर माझ्या सारख्या परक्या मनुष्यानें यांत पाहण्याची गरज दिसत नाहीं."

मग यादी काढून वांटणीचे आंकडे काढीत असतां सीतारामपंतांनीं बूट काढला कीं, "आज तारखेस जी एकंदर मालमत्ता आहे तिचा मला तृतीयांश मिळाला पाहिजे." यावर लक्ष्मणरावांनीं म्हटलें कीं, "शास्त्रीबोवांनीं पांच वर्षांपासून ज्याचें त्यानें आपापलें उत्पन्न वेगळें वेगळें ठेवण्याची जी योजन केली होती, त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री यांचें स्वतःचें उत्पन्न असेल तें समाईक मालमत्तेंत घालणें हें बरोबर नाहीं, तें अगदीं. गैर होईल." केरोपंतनानांचेंहि मत असेंच पडलें; परंतु सीतारामपंतांस तें न रुचून आपलें म्हणणें चालणार नाहीं असें पाहून तें तेथून उठून आपल्या खोलींत खालीं जाऊन बसले. विष्णुशास्त्री यांपेक्षां लक्ष्मणरावांना ह्या कटकटी एकदांच्या मिटविण्याची इच्छा व एक प्रकारची हुशारी ही अधिक असल्यामुळें त्यांनीं सीतारामपंतांकडे जाऊन व दुसऱ्या एका दोघांस मध्यें घालून त्यांचें एकंदर म्हणणें तरी काय आहे म्हणून समजून घेण्याची पुष्कळ खटपट केली; परंतु मागें कृष्णशास्त्री यांस जसें माझें म्हणणें अमुक अमुक आहे असें कांहीं स्पष्ट न सांगतां त्यांनीं सर्व प्रकरण धुमसत टाकून आपणास व दुसऱ्यांस व्यर्थ पीडा केली तोच क्रम त्यांनीं आतांहि सुरू केला. कृष्णशास्त्री यांची शेवटली मुलगी ही या वेळीं आठ वर्षांची असून तिचें लग्न व्हावयाचें होतें. तें होण्यापूर्वींच कृष्णशास्त्री यांच्या नांवावर व्यांकेंत जे दोन तीन हजार रुपये होते त्यांतून लग्नाच्या अगोदरच आपला हिस्सा आपणास मिळावा किंवा एकंदर मालमत्तेच्या निम्मे हिश्शाला जो आपला हक्क पोंचतो त्याप्रमाणें आपणाला वांटा मिळावा किंवा याहून दुसरें कांहीं त्यांच्या मनांत होतें किंवा यांतून एकहि नव्हतें, हें त्यांच्या तऱ्हेवाईक मुग्ध रुसण्यामुळें कांहींच कळेना! इकडे बिचारे केरोपंतनाना हे सीताराम आतां वर येतो, अंमळशानें येतो, अशी वाट पाहतां पाहतां कंटाळून झोपीं गेले. मग कांहीं वेळानें जागे होऊन पाहतात तों मध्यरात्र होऊन गेली आहे व सीताराम तर वर येत नाहीं असें पाहून केरोपंतनाना कंटाळून आपल्या घरीं निघून गेले!

ही धुमसाधुमस तारीख १० जूनला झाली. लक्ष्मणराव यांस याच सालच्या एप्रिल महिन्यांत उमरावती हायस्कुलांत चाकरी लागली

असल्यामुळें त्यांना तिकडे तसेंच जाव लागलें. या वेळीं मि. चाटफील्ड हे विलायतेस गेले असून त्यांचें काम कर्नल वॉडिंगूटन साहेब हे पहात होते. त्यांजप्रपासून विष्णुशास्त्री यांस जेमतेम करून एका महिन्याचीच हक्काची रजा मिळाली असल्यामुळें त्यांनाहि पुण्यास राहण्यास फारसा अवकाश नव्हता; यामुळें सध्यां घरांत कांहीं तरी व्यवस्था करणें जरूर आहे, हें जाणून विष्णुशास्त्री यांनीं सीतारामपंतांस सांगितलेंकीं, "वांटणीची भानगड म्हणजे आतांच उलगडते असें कांहीं नाहीं. मी पुढें दिवाळींत आलों म्हणजे त्याचें पाहूं. तूर्त तूं आणि काशीताई असे सलोख्यानें एकत्र रहा." येणेंप्रमाणें तूर्तातूर्त घडीवर घडी ठेवून विष्णुशास्त्री यांनीं रत्नागिरीची वाट धरली. तथापि त्यांच्या मनाची स्थिति या वेळीं कशी झाली होती व त्यांनीं आपले धाकटे बंधु लक्ष्मणराव यांस आपल्या गृहस्थितीबद्दल कसा उपदेश केला हें त्यांच्या पुढील पत्रावरून दिसून येईल.

Ratnagiri 16/7/78.

My dear brother,

Arrived here safe on the 14th. I and Rambhaoo are doing all right.

You may have ere now received intelligence how matters progressed at home. S. is still with us, to the exclusion of that entire set of mischievous people ; K's mother alone is allowed. Patkar and Chhatre are the trustees so to speak, of the peace of the family during our absence. Let us see how things progress now.

Now that things are daily developing a new phase of trouble I would seriously advise you the following:—Let us look upon ourselves as completely separated. Let us in every respect keep clear of each other. Above all be ware how you show yourself towards your wayward uncle on one side and your unmanageable mamma on the other. Your experience of late of either, has I presume, cured you completely of those tender sympathies which you extended simultaneously

towards both. Now if you want to keep out of trouble and injury to yourself, show marked coldness to either.

I would recommend to you, in all seriousness, the policy of dogged silence. You need not trouble yourself with frequent correspondence with either of the parties. It is just sufficient if you only send home once a month a short, cold, formal letter of your being well off. Neither of your uncles dare play their pranks to me. Leave it to me therefore to manage them. I was so disgusted with those squabbles, especially on the last day of my residence in Poona, that I would have been glad even to have placed the Arabian sea between me and such wretches. I thought fit to forewarn you because I see clearly that you must be troubled by these folks more than myself and especially as your inferior age places you in a false position with regard to them all.

Yours affectionately

Vishnu K. Chiplunkar.

यामागें दिलेल्या हकिकतीवरून व वरील पत्रावरून ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे कीं, पिढीच्या पिढीस उत्पन्न होणाऱ्या अडचणीचे निवारण त्या त्या वेळीं न केलें तर त्यापासून पुढें अतोनात त्रास विनाकारण वितुष्टें, काळजांच्या जळफळी—अशा कीं, ज्यामुळें समुद्रहि ओलांडावासा वाटतो असें विष्णुशास्त्री यांनीं लिहिलें आहे—त्या उद्भवतात. कृष्णशास्त्री यांनीं मृत्युपत्र वगैरे करून त्यांत त्यांनीं आपल्या समजुतीप्रमाणें दोन मुलगे व भाऊ यांचे हिस्से ठरवून दिले असते म्हणजे अर्थांतच येवढा त्रास कोणासहि झाला नसता असें आम्हांस वाटतें. याकरितां मुलगे गरीब आहेत, ते शहाणे आहेत, ते भांडावयाचे नाहींत या भ्रमांत न पडतां दर पिढीच्या पिढीस साहेबलोकांप्रमाणें मालमत्तेची वांटणी करून मृत्युपत्र वगैरे कायदेशीर बंदोबस्त करण्याचा आपल्या लोकांत अधिकाधिक प्रचार पडत जाईल, तर आपल्या कुटुंबांतील

पुष्कळ कटकटी नाहींशा होण्याचा संभव आहे हें कोणींहि समंजस मनुष्य कबूल करील !

या सालच्या आरंभीं विष्णुशास्त्री यांस मुलगा झाला होता; परंतु तो फारच अशक्त असल्यामुळें रत्नागिरीस इतक्या लांब कुटुंबास तूर्त त्यांच्यानें नेववेना; म्हणून त्यांच्या सासऱ्यापाशीं सुमारें वीस वर्षें राहिलेला वर पत्रांत लिहिलेला रामभाऊ म्हणून ब्राह्मण होता त्यासच बरोबर घेऊन ते गेले; परंतु त्यांचें आतां रत्नागिरीस मन लागेना. पहिल्या खेपेसच त्यांस या गांवचा कंटाळा आला होता. चार महिन्यांतच त्यांचें पोट सुट्टं लागून पूर्वीं त्यांस जी तरतरी वाटत असे ती आतां कमी भासूं लागली. शिवाय या खेपेस पुष्कळच गोष्टींच्या संबंधानें स्थित्यंतर झालें होतें. मि. वामन आबाजी हे बदलून जाऊन त्यांच्या जागेवर मि. नारायण विनायक साठे हे आलें होते मि. जनार्दन बाळाजी यांची बदली होऊन त्यांची जागा अजीच बंद करण्यांत आली होती; मामी, आशीबा व महादेव हीं त्रयी जाऊन त्यांच्या जागीं एक विश्वासू परंतु वयस्क, निबोल्या व एकमार्गी असा ब्राह्मण आला होता. शिवाय वडील वारल्यानें कुटुंबांत नुकतीच एक मोठी घडामोड होऊन अनेक तऱ्हेच्या काळज्या त्यांस उत्पन्न झाल्या होत्या. या सर्व गोष्टींमुळें विष्णुशास्त्री यांच्या मनाची या वेळची स्थिति पुष्कळच अंशीं नाउमेदीची असेल यांत संशय नाहीं.

याच सुमारास सप्टेंबर महिन्यांत विष्णुशास्त्री यांची दुसरी बहीण दुर्गा हिचा नवरा एकाएकीं अगदींच अल्पवयांत वारला. हा अनर्थ विष्णुशास्त्री यांच्या संसारसागराच्या पर्यटणांतील प्रथमच वादळप्रसंग होय ! याविषयीं उल्लेख करीत असतां ते लिहितातः—

Ratnagiri 26|9|78.

My dear Lakhu,

× × You have heard, of course, of the recent disaster. This surely was the most malignant stroke of misfortune that could have befallen us.

We may now be said to have fully entered the stormline

of the voyage of life. Instead of being over depressed, therefore, let us bear up and rally as soon as we can. Like sturdy sailors we should be prepared to encounter every species of adverse weather. × × ×

Yours Affectionately,

V. K. Chiplunkar.

विष्णुशास्त्री यांचा तान्हा मुलगा जो जन्मापासूनच फार अशक्त होता तोहि आक्टोबर महिन्यांत वारला. यानंतर दिवाळीच्या सुटींत विष्णुशास्त्री पुण्यास आले. तेथें पहातात तो घरांत सीतारामपंत व काशीबाई यांचा पूर्ण बेबनाव झालेला त्यांच्या दृष्टीस पडला. परंतु पुण्यास राहण्यास अवकाश नसल्यामुळें निरुपायास्तव गृहस्थितीकडे कानाडोळा करून ते कुटुंबास घेऊन रत्नागिरीस परत गेले. त्यांच्या बरोबर रामभाऊ ब्राह्मण हा होताच.

निबंधमालेचा या सालचा मुख्य विषय ' मोरोपंताची कविता ' हा होय. विष्णुशास्त्री यांस मोरोपंताच्या कवितेची आवड ते हायस्कुलांत नवनीतांतील ययातिआख्यान, दुष्यंत-शकुंतला-आख्यान वगैरे प्रकरणें वर्गांत शिकत असतांनाच उत्पन्न झाली होती; परंतु विशेष नवल हें कीं, ते या पाठाच्या आर्या वडिलांपाशीं वाचीत असतां व त्यांचा (प्रतिकूल) रोंख प्रस्तुत कवीवर एकसारखा असतां विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं आलीकडील नवीन विद्वानांप्रमाणें पंतांच्या कवितेविषयीं अप्रीति उत्पन्न न होतां उलटें तिजविषयीं प्रेम जडत चाललें. यानंतर १८६५ सालीं कै. दादोबा पांडुरंग यांची केकावलीवरील यशोदा पांडुरंगी म्हणून टीका प्रसिद्ध होऊन तीच विष्णुशास्त्री यांच्या कानीं ' मयूर कवीचा अपूर्व टाहो ' पडण्यास कारण झाली; आणि तेव्हांपासून त्यांचें ' प्रेम पंतांच्या कवितेवर जें स्थिरता पावलें तें उत्तरोत्तर तेथें दृढतरच होत गेलें. '

प्रस्तुत निबंध प्रसिद्ध होण्यापूर्वी विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणें मोरोपंतांच्या कवितेचें इतक्या आस्थेनें व प्रेमानें अध्ययन करून तिचें योग्य विवेचन कोणींहि केलें नव्हतें. या विषयावर त्यांचा व्यासंग थोडाबहुत

तरी तेरा चौदा वर्षे चालू होता. या वेळांत कै. परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्याप्रमाणें पंतांच्या कवितेची त्यांच्या हातून किती पारायणें झालीं असतील हें त्यांच्या वरील कवींचे ग्रंथांतून 'मराठी कवितेंतील उत्कृष्ट उतारे' म्हणून जे निबंधमालेच्या अंकांतून मधून मधून दिले आहेत, यांवरून व प्रस्तुत निबंधांत पंतांच्या कवितेंतील गुणदोषांविषयीं जें मार्मिकपणें विवेचन केलें आहे त्यावरून वाचकांच्या लक्षांत सहज येणारें आहे. कोणत्याहि विषयासंबंधानें लिहितांना विष्णुशास्त्री चांगला पूर्णपणें विचार केल्याशिवाय व त्यांच्या विवेचनास लागणारीं साधकबाधक प्रमाणें उत्कृष्ट तऱ्हेचीं काढून कडेकोट तयारी केल्याशिवाय लेखणी उचलीत नसत. अशी त्यांची पद्धत असल्यामुळें त्यांचें विवेचन उत्कृष्ट तऱ्हेचें वठून त्यांच्या कोटिक्रमरूप बुरुजावर प्रतिपक्षांचा गोळा सहसा लागूं पडत नसे, यांत नवल नाहीं !

प्रस्तुत विषयावर विष्णुशास्त्री यांनीं ११ निबंध लिहिले आहेत. त्यांत प्रथमतः टीकाविषयक कवीश्वराच्या संबंधानें आपले जुने पंडित व नवीन विद्वान् लोक यांमध्यें जे कित्येक प्रतिकूल व चुकीचे समज दृष्टीस पडतात ते व त्याचप्रमाणें पंतांचे महद्भक्त जे हरिदास ते त्यांच्या काव्यांत न आढळणारे जे कित्येक दोष—जे ते महद्गुण समजून त्यांच्या ठिकाणीं वेड्या भक्तीनें स्थापूं पहतात ते अशा दोहोंचें निरूपण केलें आहे. पंतांचे प्रतिपक्षी, ज्यांनीं आपल्या लेखांतून त्यांवरील आक्षेप प्रसिद्ध केले आहेत, असे चार आहेत—ते विविधज्ञानविस्तारकर्ते, रावबहादूर माधवराव रानडे, माजी डॉ. इलसन व विष्णुशास्त्री यांचे वडील कृष्णशास्त्री हे होत.

आतां यांपैकी विविधज्ञानविस्तारकर्ते व इतर कित्येक नवीन विद्वान् यांचा मुख्य आक्षेप जो कीं, मोरोपंतांची कविता ही रामायण, महाभारत वगैरे संस्कृत ग्रंथांवरून केवळ भाषांतररूपानें असल्यामुळें तीस स्वतंत्र कविता अशी म्हणतां येणार नाहीं, त्याचें विष्णुशास्त्री यांनीं ४६ वे अंकांत उत्कृष्ट रीतीनें सप्रमाण खंडन केलें आहे. कित्येक तरतरीत इंग्रजी ग्रंथकारांत कोणत्याहि विषयासंबंधानें व विशेषतः प्राच्य देश, प्राच्य लोक, विद्या, प्राच्य इतिहास, एकंदर हरएक प्राच्य गोष्टी यांविषयीं समग्र

माहिती मिळविण्याच्या व त्याजविषयीं शांतपणें पूर्ण विचार करण्याच्या अगोदरच कांहीं तरी मत झोंकून देण्याची जी फार वाईट खोड दृष्टीस पडते व जिचें—लिहिण्यास मोठें दुःख वाटतें—आमच्या कित्येक नवीन विद्वानांनीं बऱ्याच अंशीं अनुकरण करून महाराष्ट्र भाषा,महाराष्ट्र कविता वगैरे संबंधानें वरच्या सारख्या निराधार प्रमेयांचा प्रचार करण्याचा प्रसार चालू केला आहे, तिजवर विष्णुशास्त्री यांनीं प्रथम लेखणी उचलून वरील मंडळींनीं जें भ्रांतिमूलक मतजाल उत्पन्न केलें होतें त्याचें यथायोग्य खंडन करण्याचें फार महत्त्वाचें काम केलें.

आमच्या नवीन शिकलेल्या लोकांस मराठी पुस्तकें वाचणें किंवा लिहिणें म्हणजे कांहीं मोठें काम आहे किंवा त्याची कांहीं विशेष जरूर आहे असें वाटत नाहीं. सर्व प्रकारच्या विषयांवर इंग्रजींत ग्रंथ असून त्यांत चांगली पूर्ण व चोख अशी माहिती सांपडते; मग मराठी पुस्तकांचें काय प्रयोजन, असें पुष्कळांचें मत दृष्टीस पडतें; परंतु ही समजूत चुकीची होय. कारण नुसत्या निबंधमालेंतहि अशा पुष्कळ विषयांचें उद्घाटन सांपडेल कीं, जें केवळ एतद्देशीयच असल्यामुळें त्यांचें विवेचन इंग्रजी ग्रंथांतून सांपडावयाचेंच नाहीं. शिवाय याहून मोठ्या महत्त्वाचीहि ही गोष्ट लक्षांत आणली पाहिजे कीं, या व इतर अनेक विषयांसंबंधानें आपल्या नवीन तऱ्हेनें शिकलेल्या एतद्देशीय लोकांचें काय म्हणणें आहे हें अर्थातच त्यांस इंग्रजी भाषेपेक्षां देशी भाषांतच अधिक यथास्थितपणें लिहितां येईल. तेव्हां मराठी ग्रंथांविषयीं आमच्या नवीन शिकलेल्या लोकांची अनास्था अगदीं गर्हणीय होय. अशा मंडळींनीं अर्थातच, ज्याप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं मागील पंडितांच्या कित्येक चुकीच्या समजांचें निरसन करण्याचा यत्न केला त्याप्रमाणें त्यांनीं विष्णुशास्त्री यांचे जे कित्येक गैरसमज असतील त्यांबद्दल चर्चा करून यथार्थ ज्ञानाचा आपल्या लोकांत देशी भाषाद्वारेंच प्रसार करण्याची हांव धरावी हेंच त्यांस उचित आहे!

पंतांची कविता भाषांतररूप आहे वगैरे विविधज्ञानविस्तारांतील मुद्यांचें निरसन केल्यावर विष्णुशास्त्री हे दुसरे प्रतिपक्षी जे रावबहादूर रानडे यांच्या आक्षेपांच्या विवेचनास सरसावले. ज्या कित्येक लोकांनीं निबंध-

माला ही लक्षपूर्वक वाचली नसून ती मधून मधूनच वाचली आहे, त्यांचा असा समज आहे कीं, विष्णुशास्त्री यांचा निबंधमाला प्रसिद्ध करण्याचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे मोठमोठ्या मंडळींचे नाहींत ते दोष काढून त्यांची फजिती करून आपला वडेजाव वाढवावा असा होता. परंतु अशा लोकांनीं रावबहादूर रानडे यांच्या लेखावर टीका करण्याच्या अगोदर त्यांच्या मोठ्या विद्वत्तेस व शोधकपणास योग्य मान देऊन प्रत्येक विद्वान् मनुष्यास दुसऱ्या विद्वान् मनुष्याच्या लेखावर टीका करण्याला जो पूर्ण अधिकार आहे तो बजावण्यास सरसावत असतां कदाचित् आपलाच कोटिक्रम फसेल याविषयीं साशंक होऊन विष्णुशास्त्री यांनीं जो पुढील मजकूर लिहिला आहे तो वाचावा म्हणजे त्यांचा चुकीचा समज नाहींसा होईल:—

" रावबहादुरांचा महाराष्ट्र कवितेवर कितपत व्यासंग आहे हें आम्हांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी निदान शोधकपणा व मार्मिकपणा हे गुण त्यांच्या अंगीं पूर्ण असून, त्यांचा अभिप्राय लिहिण्यांत किंबहुना बोलण्यांतहि कधीं लेचापेचा बाहेर पडावयाचा नाहीं, तर तो नेहमीं यथान्याय व प्रोक्त असाच असायाचा, याविषयीं पहिल्यापासून त्यांची प्रसिद्धि आहे. तेव्हां या ख्यातीवरून पाहतां वर त्यांनीं एकंदर महाराष्ट्र कवींविषयीं व मोरोपंताविषयीं जो येवढा निक्षून अभिप्राय दिला आहे, त्याचा आम्हांस अत्यंत विस्मय होतो. त्यांच्यासारख्या बड्या विद्वानांच्या लेखावर आक्षेप घेणें हें कांहीं अंशीं मोठें साहसच होय; पण स्वपक्षाची चांगली बळकटी पाहून या साहसास आम्ही प्रवृत्त होत आहों. आतां इतकेंहि करून आमची कोटि जर त्यांच्यावर लागू झाली नाहीं व आमचाच पक्ष खोटा ठरला तर आम्ही आपले आक्षेप माघारे घेऊं. "

यानंतर रावबहादुरांचा पंतांवरील आक्षेप कीं, त्यांच्या कवितेंत व विशेषतः केकावलींत पुष्कळ श्लोकांचे एकापेक्षां अधिक अर्थ निघतात; तो अजिबात ढासळून जाऊन महाभारतांतील कर्ण युधिष्ठिरयुद्धप्रसंगीं पहिल्या महावीराचे हातीं दुसरा साधुवृत्त राजा सांपडला असतांहि पहिल्यानें दुसऱ्यास सोडून दिलें त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं आपल्या

बड्या प्रतिपक्षावर फारसे कडक प्रहार न करितां त्यास कसें सोडून दिलें आहे, त्याचा प्रकार खालीं देतों:—

" यास्तव पंतांच्या काव्यांत अर्थांतराचा संभव जर लेशमात्राहि असता तर तो त्यांनीं (परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं) मोठ्या आनंदानें व धन्यतेनें प्रकट केला असता. × × वरील पंडितासारख्या जुन्या अभिरुचींच्या व्याख्याकाराच्या ठायीं वरील श्लेषानभिज्ञत्व किंवा श्लेषाविमुखता मुळींच संभवत नाहीं. मल्लिनाथासारख्यांनीं नैषधावर टीका केली आणि येथून तेथून एकहि श्लेष त्यांनीं उलगडला नाहीं; किंवा राघवपांडवीय काव्यावर टीका लिहून एक रामायणपर अर्थ मात्र टीकाकारानें लावला व दुसरा भारतपर अर्थ द्यावयाचा तो मुळींच विसरला, हें जितकें संभवदुक्तिक, तितकेंच प्रस्तुत महाराष्ट्रीय टीकाकाराचें प्रस्तुत महाराष्ट्रीय कवीच्या संबंधाचें विस्मरण होय. त्यांतून रावबहादुरांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ केकावलींतील कांहीं स्थलांचा नुसत निर्देश जरी केला असता, कीं या या ठिकाणीं दोन अर्थ स्पष्ट असतां रा० गोडबोले यांनीं ते दिले नाहींत, तर टीकाकारांवरील आरोपाची शाबिती झाली असती; पण हें ज्या पक्षीं त्यांनीं केलें नाहीं त्या पक्षीं आपल्या वृद्ध पंडितांची योग्यता नीटशी मनांत न आणितां केवळ वरिष्ठपणाच्या नात्यावर जाऊन त्यांनीं कांहीं तरी अभिप्राय झोंकून दिला असें म्हणणें भाग आहे. "

पंतांवर अर्थबाहुल्याचा मिथ्या दोषारोप केला असतां विष्णुशास्त्री यांनीं फारसें कडक लिहिलें नाहीं; परंतु रावबहादुरांनीं केकावली काव्याच्या परीक्षणास प्रार्थनासमाजांतील धर्मतत्त्वांचा जेव्हां कांटा लावला आणि काव्यपरीक्षकांचा जो मोठा सिद्धांत कीं, कवित्वाचा आणि तत्वज्ञाच्या सत्यप्लुत प्रमेयांचा संबंध कांहीं नाहीं,त्याचें उल्लंघन करून केकावलीसंबंधानें,

'As a devotional hymn, it does not strike harsh to the orthodox reader, but it is disqualified for any higher acceptance by the fault above pointed out.'

असा इंग्रजी नमुन्याचा सफाईदार शेरा झोंकून दिला, तेव्हां विष्णुशास्त्री यांनीं त्यावर कोटिक्रम लढवून अगोदर न्यायाधीशबोवाच त्यांच्या ठिकाणीं आरोपीविरुद्ध प्रथमच वाईट ग्रह असल्या कारणानें चवकशी करण्यास

अयोग्य असून ती चवकशी त्यांच्याकडून मुळींच काढून टाकिली पाहिजे असें सिद्ध करून दाखवीत होत्साते लिहितातः—

" ज्याप्रमाणें परिसाशीं संघट्टन होऊन लोखंड सोनें बनेल खरें, परंतु लोहचुंबकाची आणि त्याची संगत तुटली व त्यामुळें लोहचुंबकाचें सामर्थ्य ओळखण्याची त्याची लायकीहि पण गेली, तशीच वरील पंडिताची स्थिति आहे. ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, ब्राह्माचा धर्म, प्रार्थनासमाज या सर्वांतील देवांकडे जितकें सन्निध जावें व तन्मय व्हावें, तितका इकडचा संबंध तुटला व महाराष्ट्रीय कवींच्या कृतीवर अभिप्राय देण्याचा तितका अधिकारहि कमी झाला. पोरपणाचा अनुभव जसा तरुणपणीं नाहीं, तरुणपणाचा वार्धक्यांत नाहीं; वीराचें बाहुस्फुरण भित्र्यास नाहीं, कामिजनांचा रोमांचानुभव क्लीबास नाहीं, तसेंच मूर्तिपूजकांच्या काव्यांतील प्रेम इतर धर्मांच्या लोकांस कळायाचें नाहीं, व त्यांच्या काव्यांतील रसानुभव मूर्तिपूजकांस घेतां येणार नाहीं. यास्तव ज्यानें त्यानें आपला जितका अधिकार आहे तितकाच संभाळून त्याचें अतिक्रमण न करणें हें फार बरें. आमच्या रावबहादुरांस व त्यांच्या सद्धर्मानुसारी समाजबंधूंस आमच्या मूर्तिपूजक कवींचें काव्य पसंत न झालें म्हणून तें वाईट ठरलें असें मुळींच होत नाहीं. जोंपर्यंत हजारों महाराष्ट्रीय जनांच्या हृदयास आमच्या सरस्वतीप्रिय मयूराचा टाहो भेदून जात आहे, जोंपर्यंत त्याचा सारा पिसारा उभारलेला पाहून त्याच्या अप्रतिम वैचित्र्यानें जनसमूह चकित होऊन रहात आहे, जोंपर्यंत मेघदर्शनजनित हर्षभरांत तो नृत्य करीत असतां वाग्देवीच्या नूपुरांचा मंजुल रव रसिकजनांस त्यांच्या कर्णांची धन्यता वाटवीत आहे, तोंपर्यंत कितीहि रेवरेंड साहेबांचे, मुल्ला साहेबांचे, किंवा रावबदुरांचे अभिप्राय त्यास प्रतिकूळ पडले तरी त्यास तिळमात्रहि धाक धाळगायला नको. एका कवीनें म्हटलें आहेः—

उदितवति द्विजराजे, कस्य न हृदयं मुदं परां धत्ते ।
संकुचसि कमल ! यदयं हर हर वामो विधिर्भवतः ॥

" चंद्राचा उदय झाला असतां कोणाचें हृदय आनंदभरानें व्याप्त होत नाहीं ? पण अशा वेळींहि जेव्हां तुझा संकोच होतो, तेव्हां हे कमला ! तुझें दुर्दैव बलवत्तर म्हटलें पाहिजे ! याप्रमाणेच आमच्या ' द्विजराजा ' च्या वाणींचा

रसानुभव घडण्यास ज्यांस समाज आडवा येतो ते एकेश्वरभक्तहि अत्यंत अनुकंपनीय मात्र होत!"

रावबहादूर यांचे पुढील प्रतिपक्षी माजी डॉ. वुइलसन हे होत. हे साहेब मोठे विद्वान्, सुस्वभाव; परंतु रावबहादुरांप्रमाणें विशेष शोधकबुद्धीचे किंवा सावधपणें लिहिणारे नसल्यामुळें, त्यांचा लेख अगदीं लेचापेचा असून त्यांत बहुतेक जितकीं वाक्यें आहेत, त्यांच्या दुप्पट किंवा तिप्पट त्यांत ढळढळीत चुकाच आहेत. जागोजाग शक चुकलेले, मोरोपंतानें आपल्या अप्रतिम कवितेनें आपल्या कऱ्हाडे ज्ञातीस एकंदर ब्राह्मणसमूहांत उच्च पदास चढविलें, किंवा त्याची उपास्य देवता विष्णु ही असून त्यानें पेशव्यांची अपल्यावर मेहेरबानी व्हावी म्हणून त्यांची उपास्य देवता जी शिव त्यावरहि कविता रचिली व शेवटीं केकावली हें काव्य कृष्णाचें स्तुतिपर स्तोत्र म्हणून लिहिलें आहे वगैरे अगदीं वेडगळ मजकुरानें भरलेला असा त्यांचा लेख असल्यामुळें विष्णुशास्त्री यांच्या टीकेपुढें त्याचा भूसच उडाला, हें सांगावयास नकोच.

यानंतर चौथे प्रतिपक्षी जे विष्णुशास्त्री यांचे खुद्द वडील कृष्णशास्त्री यांच्या अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहांतील आक्षेपांवर टीका करण्यास आरंभ करण्यापूर्वी त्यांजविषयीं आपला आदर व पितृभक्ति प्रदर्शित करीत होत्साते विष्णुशास्त्री यांनीं एक उत्तम लेख लिहिला आहे. हा भाषाप्रकाराचा एक उत्कृष्ट मासला म्हणून नवव्या भागांत पुढें दाखल केलाच आहे. वडिलांच्या आक्षेपांचें तर उत्कृष्ट तऱ्हेनें निरसन केलेंच आहे; परंतु मोरोपंतहि उत्तम कवि व तदाक्षेपक कृष्णशास्त्री हेहि पण अरसिक परीक्षक नव्हत असें प्रतिपादन करीत होत्साते विष्णुशास्त्री मार्मिकपणें लिहितात:—

"प्रस्तुत कवी—(मोरोपंत) विषयीं आमच्या वडिलांचा जो अभिप्राय होता तो प्रांजलबुद्धीचा किंवा शोधपूर्वक स्वीकारलेला होता असें नाहीं, हें उघड आहे. जॉनसनच्या ग्रंथांत व भाषणांत बिचाऱ्या ग्रे कवीविषयीं जशी सदोदित अवहेलना आढळते, तसाच प्रकार कवीचा व प्रस्तुत रसिकाचा होय

पहिल्याचें कवित्व सामान्यांतलें आहे असें नाहीं व दुसऱ्याची रसज्ञताहि साधारण होती असें नाहीं. एका कवीनें म्हटलें आहेः—

भ्रमन् वनांते नवमंजरीषु ना षट्पदो गंधफलीमजिघ्रत् ।
सा किं न रम्या स च किं न रंता बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥

" भ्रमर हा वनांत विकास पावलेल्या नूतन मंजरींचा स्वाद घेत असतां एका चंपककलिकेचा मात्र अनादर करितां झाला. आतां वस्तुतः पहातां ती म्हणजे रमणीय नाहीं असें नाहीं व तो भोक्ता नाहीं असेंहि नाहीं; केवळ ईश्वरेच्छा प्रबळ इतकीच गोष्ट! सारांश, प्रस्तुत प्रकरणीं वरील समाधानच पतकरलें पाहिजे, दुसरा उपाय नाहीं. "

येणेंप्रमाणें मोरोपंताच्या प्रतिपक्ष्यांच्या आक्षेपांचें निरसन केल्यानंतर विष्णुशास्त्री हे वरील कवीच्या पदरीं महद्गुण म्हणून नाहींत ते दोष बांधूं पाहणारी जी हरिदास वगैरे भाविक मंडळी यांजकडे वळले. पंतांची कविता प्रथमतः लोकांच्या श्रवणांत कथाप्रसंगीं येऊं लागली असतां तिचें बाह्य स्वरूप पाहून श्रोतृजनांच्या मनाची स्थिति कशी झाली असेल याविषयीं विष्णुशास्त्री लिहितातः—

" आतां हा जो मोरोपंताच्या कवितेंत आढळणारा विशेष वर सांगितला तो त्याची प्रसिद्धि प्रथमतः त्वरित होण्यास कारणभूत होऊन पुढें त्याची कीर्ति स्थिरावल्यावरहि तीस मुख्यतः आधारभूत होऊन बसला. अजून पाहिलें तरी प्रस्तुत कवीची जी चहा आढळते ती पुष्कळ अंशीं वरील विशेषावरून होय. इंग्लंडांत पोपची प्रख्याति त्याच्या अपूर्व पदलालित्यावरून जशी झाली व वीस वर्षांच्या वयांतच वरील कवि तत्कालीन कवींत अग्रगण्यत्व पावून पूर्वींच्या महाकवींशीं टक्कर मारूं लागला, किंबहुना त्यांच्याहूनहि लोकांस अधिक प्रिय झाला, त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्र कवीचेंहि झालें असावें. बारामतींतून त्याच्या आर्या जेव्हां प्रथमतः बाहेर पडूं लागल्या असतील; तेव्हां महाराष्ट्र कवितावधूचा हा नवीन थाटमाट पाहून तत्कालीन जन मोठें चकित होऊन राहिले असतील ! ' उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चंद्रमाः ' किंवा ' उदिते नैषधे काव्ये क्व माघः क्व च भारविः ' अशाच प्रकारचा अनुभव त्यांस घडला असेल ! आपल्या धर्मपित्याच्या आश्रमांत तपस्विकन्येप्रमाणें वाढलेली जी

शकुंतला तिनें पूर्वस्थितींतील वल्कलें टाकून देऊन महिषीपदोचित राजवेष धारण केला असतां तिच्या स्वरूपांत जसें विलक्षण अंतर दिसलें असेल त्याप्रमाणेंच जी कविता पूर्वीं ओंवी व अभंग या छंदांत असून प्रायः अलंकारविरहितच होती तिला--

झणत्कार जीच्या पदीं नूपुरांचा। रुणत्कार जीच्या करीं कंकणाचा॥

असें स्वरूप एकदम प्राप्त झालेलें पाहून सारा जनसमूह अत्यंत विस्मित होऊन गेला असेल! गीर्वाणवाणीच्या सुवर्णसूत्रांनीं जागोजाग विणून काढलेलें व अनुप्रासानें स्थलविशेषीं विचित्रित केलेलें असें उज्वल वस्त्र परिधान केलेली वरील अभिनव कविता जनमनःप्रांगणीं जेव्हां नटीप्रमाणें अवतीर्ण झाली असेल, तेव्हां तिचा अलंकारांचा थाटमाट पाहून व चरणांत रुणझुणणाऱ्या यमकरूप पैंजणांचा कर्णमनोहर नाद ऐकून जोशीबोवांसारखी मंडळी तल्लीन होऊन गेली यांत काय आश्चर्य?"

आतां पंतांची कविता येवढी लोकमान्यतेस चढण्यास प्रथम तिचें बाह्यस्वरूप जसें कारण झालें, तसेंच तिचें सर्व महाराष्ट्र देशभर प्रसरण करण्यास हरिदास हे कारण झाले हें उघडच आहे. तथापि या वर्गापैकीं कांहींजणांचा व पुष्कळ तज्ज्ञ नसणाऱ्या लोकांचा असा समज आहे कीं, मोरोपंताच्या कित्येक आर्यांतून दहा दहा अर्थ निघतात व आपली कविता बहुलार्थ असावी असा पंताचाहि हेतु होता; परंतु हा वस्तुतः पंतांवर मिथ्या आरोप आहे. त्यांच्या कवितेचा अर्थ इतर कवींप्रमाणें एकच व तोहि उघडच असा आहे. परंतु तिजपासून ओढून ताणून भलते भलते अनेक अर्थ काढण्याची कित्येक मंडळी जी खटपट करिते व तेवढ्यावरून ते पंतांस कविवर्गांत अग्रस्थानी बसवितात त्यावर विष्णुशास्त्री तडाखा देऊन लिहितातः—

"सत्कवींच्या कृति छिन्नभिन्न करून त्यांत मौज वाटणें, यास मनुष्यभक्षक रानटी लोकांचा जो प्रेतांशीं विनोद चालतो त्याचीच उपमा साजेल! आणि त्यांतून वरील पोरखेळावरून कवीचा अभिप्राय तसाच होता म्हणून त्यावर बालिशत्व आणूं पाहणें आणि या बालिशत्वावरून त्याची महाकवींत गणना करणें म्हणजे तर अरसिकत्वाचा व असमंजसपणाचा कडेलोटच होय!!"

येणेंप्रमाणें मोरोपंताच्या कवितेवर त्याच्या प्रतिपक्ष्यांनीं नाहींत ते दोष काढून जे आरोपिले होते ते, व पंतांचे अनभिज्ञ भक्त यांनीं त्यांच्या ठायीं महद्गुण म्हणून कित्येक दोष जे वस्तुतः त्यांच्या कवितेंत नाहींत ते वेड्या समजुतीनें अर्पण केले होते ते, अशा दोहोंचेंहि उपयुक्त रीतीनें निरसन करून विष्णुशास्त्री यांनीं या निबंधाच्या अखेरीस ६३ व्या अंकांत सदरील कवीश्वराच्या कवितेसंबंधानें आपलीं स्वतःचीं मतें प्रदर्शित केलीं आहेत. हा अंक प्रस्तुत निबंधसमूहांतील शेवटला खरा, तथापि आंतील मजकुराच्या योग्यतेच्या मानानें तो पहिलाच होय असें आम्हांस वाटतें. तो विशेषेंकरून समग्र वाचण्यास आम्ही आपल्या वाचकांस शिफारस करितों. यांत विष्णुशास्त्री यांनीं पंतांच्या कवितेबद्दल आपलें योग्य मत दिलें आहे. ते केकावलीकारांची गणना पहिल्या प्रतीच्या कवींमध्यें करितात. तथापि यास प्रमाण काय म्हणून जर प्रश्न केला तर त्यास उत्तर देणें कठिणच आहे असें दर्शवित होत्साते ते पुढील उत्कृष्ट प्रतिपादन करितातः—

" वरील निर्णय आम्हीं कशावरून केला असें जर प्रस्तुत कवीचे प्रतिपक्षी आम्हांस विचारतील, तर त्यांस निश्चयात्मक उत्तर देणें कठिण पडेल. कविता हा विषय हृदयगम्य आहे, बुद्धिगम्य नव्हे; म्हणजे कविता म्हणावी कोणती व न म्हणावी कोणती याचा निर्णय सहृदय मनुष्यास करितां येईल, केवळ जो बुद्धिमान् आहे तो करूं शकणार नाहीं. ज्याप्रमाणें अंधळ्या मनुष्यास एकाद्या पदार्थाची केवळ स्पर्शज्ञानावरून काय होईल तेवढीच कल्पना होईल, रंगाची कल्पना तर त्यास स्वप्नींहि व्हावयाची नाहीं; किंवा उत्कृष्ट रूपवतीविषयींहि क्लीबाची भावना म्हणजे काय ती मानुषीत्वधर्मेंकरून होईल; बाकी कामिजनास जो अनुभव घडतो, कीं—

स्पृशंत्यास्तारुण्यं किमिव नहि रम्यं मृगदृशः ।

" यौवनांत आलेल्या सुंदर स्त्रीचें मनोहर नाहीं असें काय आहे ? "—या गोष्टीची त्यास कल्पनाहि करितां येणार नाहीं, त्याप्रमाणेंच सत्कवीच्या कृतींचा साक्षात्कार नेत्रद्वारा किंवा कर्णद्वारा झाला असतां थरारून जाणें, देहभान विसरणें, साश्रु होणें, हीं सर्व लक्षणें जो सहृदय त्याच्याच ठायीं दृष्टीस पडतील.

एरवीं कोणी केवढाहि पंडित असला, तरी वरील गुणाव्यतिरिक्त त्यास अत्युत्कृष्ट काव्याचेंहि रमणीयत्व बिलकूल कळून येणार नाहीं. तसेंच काव्यांतील रस हा केवळ स्वानुभवगम्य असल्यामुळें तो दुसऱ्याच्या आटोक्यांत आणून देणें हेंहि दुर्घटच आहे. प्रस्तुत विषय तर्कशास्त्रास अगोचर असल्यामुळें अमुक काव्य रसभरित आहे व अमुक काव्य निरस आहे हें सिद्ध करून दाखविणें केवळ अशक्य होय. यास्तव मोरोपंत हा खरा कवि होय असें आम्ही कां समजतों याचीं कारणें आमच्यानें देववत नाहींत. वरील विधानाची सिद्धता आम्ही केवळ पुढील रीतीनें करतों."

यानंतर पंतांच्या हातून महाराष्ट्र कवितेची व एकंदर भाषेची कोणती सेवा घडली आहे, ह्याचें निरूपण करून नंतर तींत मुख्य दोष जो अश्लेषत्व तो दाखवून त्यांचीं उदाहरणें देऊन हा निबंध पुरा केला आहे.

हा निबंध एकंदरीनें चांगला साधला आहे यांत संशय नाहीं. यांतील प्रतिपादन उत्कृष्ट तऱ्हेचें, मुद्देसूद व चांगलें मजबूत आधार देऊन केलें आहे, हें जो कोणी तो लक्ष लावून वाचील त्यास कळून येण्यासारखें आहे. मधून मधून माहितीहि शोधपूर्वक व चांगला विचार करून दिलेली आहे. कांहीं उपविवेचन भाग जसें नैषधकाव्याचें गुणवर्णन, संस्कृत व मराठी कवितांच्या स्वरूपांची तुलना, त्याचप्रमाणें विद्वद्रत्न पंडित गट्टुलाल यांजवरील टीप हे फार चांगले आहेत. कोणताहि कवि उदयास येतो तो सामान्य लोकांच्या लेखनश्रमानें येत नाहीं. कोणा त्याच्याच योग्यतेच्या चांगल्या ग्रंथकाराची या कामीं योजना अवश्य लागते. मिल्टन कवि उदयास येण्यास आडिसनसारखा लोकमान्य निबंधकार कारणीभूत झाला. शेक्सपियरची अनुपम कृति प्रख्यात नट जो ग्यारिक यानें जगभर पसरविली. मोरोपंताची गोष्ट पाहिली तरी त्याची थोड्या काळांत येवढी प्रसिद्धि होण्यास तरी ' सोलापूरकर जोशीबोवा'च कारण झाले. यापुढें मध्यंतरीं कित्येक अज्ञानमूलक समजांचें पटल त्याच्या कवितेवर जें पडत चाललें होतें तें दूर करण्यास विष्णुशास्त्रयांसारख्या रसिक व मार्मिक ग्रंथकाराचें निपजणें हा तरी आमच्या महाराष्ट्र कवीश्वराचा मोठा भाग्योदयच म्हटला पाहिजे ! कारण महाकवि होणें हें जसें साधारण कठिणच

आहे, त्याचप्रमाणें त्याचा खरा परीक्षक होणें हें सुद्धां कठिणच होय. पंतांनीं ईश्वरास उद्देशून त्याचा अनुपम महिमा वर्णावयास कवि निपजण्यासंबंधानें जें म्हटलें आहे कीं:—

स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती !

तेंच पंतांच्या कवितेच्या परीक्षकांसंबंधानेंहि म्हटल्यास चालेल ! विष्णुशास्त्री यांच्यासारखा रसिक व शोधक पंडित तरी जोशीबोवांच्या मागें होण्यास सुमारें साठ वर्षें लागलीं ! ते जर जानसन किंवा आडिसन यांच्यासारखे दीर्घायु झाले असते तर पंतांची कविता, महाराष्ट्र ग्रंथ व देशोन्नतीचीं इतर कृत्यें हीं किती ऊर्जित दशेस आलीं असतीं, हें सांगणें नकोच ! पण हें व्हावें कसें ?

आतां सरते शेवटीं या निबंधासंबंधानें एक विशेष महत्त्वाची गोष्ट सांगून हा विषय पुरा करितों. हा निबंध जो कोणी सबंध वाचील त्यास त्यांतील विषयरचनेच्या संबंधानें अंमळ अव्यवस्था दिसून येण्यासारखी आहे. समग्र निबंध वाचून गेल्यावर पंतांच्या प्रतिपक्ष्यांचे काय आक्षेप आहेत व त्यांवर विष्णुशास्त्री यांचें काय म्हणणें आहे, त्याचप्रमाणें हरिदास वगैरे पंतांचे भाविकभक्त यांचें त्यांच्या कवितेसंबंधानें काय चुकीचे समज आहेत व त्यांवरहि विष्णुशास्त्री यांचें काय म्हणणें आहे, वगैरे गोष्टींचा एकदम प्रकाश वाचकांच्या ठिकाणीं पडत नाहीं; त्यांस अंमळ घोंटाळा झाल्यासारखा वाटतो. एकदोनदां सर्व अंक चाळून त्यांतील विवेचनसंगति लावल्याशिवाय सर्व मुद्दे एकंदर लक्षांत येत नाहींस. या गोष्टीचा प्रत्यय आम्हांस वरील विवेचन करतांना आला. ही थोडीबहुत अव्यवस्था असण्याचें कारणहि उघडच आहे. विष्णुशास्त्री जेव्हां एकदां निबंध लिहिण्यास आरंभ करीत, तेव्हां तो अगोदर सबंध यथास्थित लिहून मग तो प्रसिद्ध करीत असें होत नसे; व असा क्रम कोणत्याहि मासिक पुस्तकाचा नसतो. यामुळें मासिक पुस्तकांतून क्रमाक्रमानें अंकाअंकांतून येणारें विवेचन आणि तेंच एखाद्या स्वतंत्र पुस्तकांतून एकदम आलेलें यांत अर्थातच बरेंच अंतर असावयाचें. आमच्या मतें विष्णुशास्त्री यांनीं जर या निबंधांची पुनरावृत्ति काढली असती, तर त्यांस कांहीं पुढील भाग मागें,

व मागील पुढें असें व कांहीं विवेचन जें कोठें कोठें अधिक पाल्हाळवार झालें आहे तें आकुंचित करून विशेष चटकदार करावें लागलें असतें.

शिवाय हीहि गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे कीं, निबंधमाला पुस्तक ज्यांत पुष्कळ उपयुक्त तऱ्हेचा मजकूर ग्रथित केला आहे, व त्यामुळें ज्याच्या आवृत्तीवर आवृत्ति निघत आहेत व ज्याचें वाचन चोहोंकडे चांगलें जारीनें चालू आहे, तेंच त्यांत कांहीं भाग सरकारास आवडण्यासारखा नाहीं असा शाळाखात्याच्या कांहीं अधिकाऱ्यांचा समज असल्यामुळें वाचन पुस्तक, किंवा बक्षीस पुस्तक, किंवा लायब्ररी पुस्तक म्हणून कोणत्याहि रूपानें सरकारी शाळांत प्रवेश होण्यास नालायक ठरलें आहे, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे! ज्या ग्रंथाचा सरकारच्या आश्रयाखेरीज हल्लींच्या काळींहि येवढा मोठा खप आहे, जो आंतील मजकुराच्या योग्यतेच्या मानानें आज मितीला सर्व महाराष्ट्र ग्रंथांत अग्रगण्य म्हणून मानला जात आहे व जो प्रस्तुत काळीं लोकशिक्षणाच्या कामीं उत्कृष्ट साधनभूत होऊन राहिला आहे, तोच शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांच्या गैरसमजामुळें त्यांस त्यांच्या कामीं उपयुक्त रीतीनें लावतां येत नाहीं, ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे, असें म्हणणें भाग आहे. आमच्या मतें जर कोणी विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांची एखादी नवीन आवृत्ति काढून तींतून सरकारास अग्राह्य असे भाग गाळून टाकील व कांहीं मजकूर जो मागचा पुढें व पुढचा मागें असा झाला आहे तो व्यवस्थित करील व त्याचप्रमाणें कोठें कोठें पुन्हां पुन्हां तोच मजकूर आला आहे तो अजिबात कमी करील व क्वचित् स्थळीं जितकें असावें त्यापेक्षां अधिक विस्तृत झालेलें विवेचन आकुंचित परंतु विशेष चटकदार करील, आणि ही अशी आवृत्ति आमच्या शाळाखात्याचे अधिकारी यांस पसंत पडून तिचा प्रवेश आमचे नूतन विद्यार्थी—ज्यांच्या करितांच केवळ निबंधमालाकर्त्यानें सात आठ वर्षें येवढे ग्रंथरचनेचे परिश्रम अगदीं निरपेक्षबुद्धीनें केलें, त्यांजवळ होईल तर त्यापासून आमच्या देशाचें खरोखर अतोनात हित होईल!

विष्णुशास्त्री यांस यापूर्वीच पुष्कळ दिवसांपासून सरकारी नोकरीचा कंटाळा आला होता; परंतु ती सोडली असतां कृष्णशास्त्री यांस बरें वाटणार नाहीं अशी जी त्यांस भीति वाटत होती—ती आतां न राहिल्यामुळें या सालच्या म्हणजे १८७९ च्या आरंभापासून त्यांचे विचार तिकडे विशेष ओढ घेऊं लागले. सरकारी नोकरी सोडून बाबा गोखले यांच्या-सारखी एखादी खाजगी शाळा घातली असतांहि आपला निर्वाह चालेल असें त्यांस वाटूं लागलें. शिवाय निबंधमाला चालवून व दुसरीं स्वतंत्र पुस्तकें लिहून आपलीं मतें स्वतंत्र रीतीनें सरकारी अधिकाऱ्यांचा धाक न बाळगतां प्रदर्शित करण्याचीहि त्यांत विशेष सोय होईल, ही गोष्ट त्यांच्या मनांत आली. शंभर रुपयांच्या नोकरीकरितां पुण्यापासून इतक्या दूर राहण्यांत फारसा नफा आहे असें त्यांस आतां वाटेना. अशा प्रकारची त्यांच्या मनाची प्रवृत्ति होऊन ते हळुहळू आपणास सरकारी नोकरीच्या बंधनांतून सोडविण्याच्या तजविजीस लागले; परंतु त्यांनीं हा आपला विचार कोणा मित्रांस किंवा कोणा आप्तांस कळविला नाहीं, किंवा कोणा एकाचा सल्ला सुद्धां घेतला नाहीं! निबंधमाला सुरू करतांना किंवा यापुढें त्यांनीं जीं दुसरीं मोठीं कामें हातीं घेतलीं त्यांबद्दल तरी सल्लामसलत काय ती त्यांची एकट्याचीच होय!.

सरकारी नोकरीचा राजीनामा देण्यापूर्वी सहा महिन्यांची अर्ध्या पगारावर रजा मे महिन्याच्या सुट्टीसच लागून घेण्याचा विष्णुशास्त्री यांनीं आपल्या मनांत विचार केला. तेवढ्या अवकाशांत आपणास नोकरी सोडल्यानंतर जे उद्योग सुरू करावयाचे त्यांची प्रथम तयारी बरीच करितां येईल असें त्यांस वाटलें. आपण सुट्टींत गेलों असतां मागें फारसें कांहीं न रहावें असा त्यांचा संकेत होता; तथापि आपण परशुरामक्षेत्रास आतां शेवटचा रामराम करणार याचा लोकांस संशय न यावा म्हणून त्यांनीं पूर्ण काळजी घेतली होती. हा गुप्त बेत त्यांनीं फक्त आपल्या बायकोस मात्र कळविला होता; रामभाऊ ब्राह्मणास सुद्धां त्याची वार्ता नव्हती; यामुळें एके दिवशीं पुढील गंमत झाली म्हणून विष्णुशास्त्री सांगत होते. ते म्हणाले, ‘ एके दिवशीं दुपारीं पाहतों तों रामभाऊ आपला

सुट्टींतून परत आल्यावर त्रास पडूं नये म्हणून तांदुळाचीं सहा पोतीं घेऊन आला ! मग त्यास मीं बायकोकडून युक्तीनें सांगितलें कीं, सध्यांच इतकें धान्य कशाला आणिलें ? आपण सुट्टींत गेलों म्हणजे त्यास जपून कोण ठेवील ? तेव्हां तें लवकरच परत करून द्या ! '

विष्णुशास्त्री यांनीं रत्नागिरी सोडण्यापूर्वीं सर्व गोष्टींची जी वारसात केली त्याजबरोबरच महिन्यांच्या शेवटल्या दोन तीन आठवड्याच्या परीक्षेच्या बंडलांचीहि त्यांस व्यवस्था करावी लागली. याबद्दल ते एकदां पुढील हकीकत विनोदानें सांगत होते. ते म्हणाले, " कांहीं फुटकळ कागद पेणसलीनें फराटे न मारतांच रामभाऊस चुलींत टाकावयास मीं दिले; पण सात आठ बंडलांची तर ग्रंथिविसर्जन न होतांच अग्निनारायणाच्या मुखांत पूर्णाहुति होतांना पाहून, एरवीं पूर्ण स्तिमित व थंड अशा त्या वृद्ध ब्राह्मणाच्या चेहऱ्यावर हास्याची छटा दिसूं लागून तो कांहीं वेळ अंमळ उज्ज्वलित झालेला दिसला ! "

येणेंप्रमाणें परशुरामपुरीस शेवटलाच रामराम करून विष्णुशास्त्री हे सहकुटुंब पुण्यास मे महिन्याच्या आरंभीं येऊन दाखल झाले. ते घरीं येऊन पाहतात तों सीतारामपंत हे तीन महिन्यापूर्वींच घरांतून निघून जाऊन काळ्यावावरांत जाऊन राहिले होते. यामुळें तूर्त एक कटकट दूर झाल्यानें त्यांस बरें वाटलें. चित्रशाळा छापखाना जो ते रत्नागिरीस गेल्यापासून बाळकृष्णपंत व शाळिग्राम यांच्या नजरेखालीं शनवार पेठेंत एका लहान जागेंत होता तो विष्णुशास्त्री यांच्या घरांतच या सालच्या आरंभांपासून आणिला होता. या वेळीं या कारखान्याची अगदीं बाल्यावस्था होती. बाळकृष्ण-पंत सकाळीं तीन तास व संध्यांकाळीं तीन तास असे एकटेच शिळेवर काम करीत असत; व प्रेमाचें काम करण्याकरितां फोटोझिंको हापिसांतलिच कांहीं लोक निम्मे पगारावर सकाळीं एक वेळ येत असत. बाळकृष्णपंतांनीं प्रथम सवाई माधवराव व नाना फडनवीस व साधु मामलेदार यांच्या तसबिरी छापून काढल्या होत्या; परंतु त्या मनांत भरण्यासारख्या निघाल्या नाहींत. तेव्हां कांहीं जास्त सामान आणविल्याखेरीज काम चांगलें निघणार नाहीं, असें बाळकृष्णपंतांचें म्हणणें पडलें; व या सामानाकरितां आणखी आठशें

रुपये लागतील, असा त्यांचा अंदाज होता. विष्णुशास्त्री हे रत्नागिरीहून मध्यंतरीं दिवाळीच्या सुटींत आले होते तेव्हां त्यांस ही गोष्ट कळविली होती. यावर त्यांनीं असें सुचविलें होतें कीं, या चित्रशाळेच्या कारखान्यांत हळुहळू अधिकाधिक पैसे लागणार, तेव्हां तो भागीनें चालविला तर सोईचें पडेल. मग कांहीं वेळ विचार झाल्यावर असें ठरलें कीं, विष्णुशास्त्री यांनीं सुचविल्याप्रमाणें भागी करावी; त्यांत विष्णुशास्त्री यांचे सात आणे, बाळकृष्णपंत यांचे सात आणे व शाळिग्राम यांचे दोन आणे असे हिस्से असावेत. बाळकृष्णपंत यांनीं प्रेसाचें काम पहावें व शाळिग्राम यांनीं हिशेब वगैरे ठेवावे. छापखाना सुरू करतांना विष्णुशास्त्री यांनीं जसे चारशें रुपये दिले होते, तसेच आतांहि आणखी सामान आणण्याकरितां जास्त आठशें रुपयेहि तूर्त त्यांनींच द्यावेत; व बाळकृष्णपंत व शाळिग्राम यांनीं आपापले हिश्शाचे चारशें चारशें रुपये शेंकडा बारा आणे व्याजाप्रमाणें सव्याज रुपये कारखान्याच्या उत्पन्नाच्या आपापल्या वांट्यांतून परत द्यावेत, अशी सरासरी तूर्त व्यवस्था करून विष्णुशास्त्री रत्नागिरीस निघून गेले होते त्यांच्या मागें आतां नवीन सामान आल्यावर बाळकृष्णपंतांच्या अदमासाप्रमाणें पूर्वीपेक्षां अधिक सफाईदार काम निघूं लागलें. ऐतिहासिक तसबिरींचें प्रकाशन तर आपणांस करितां येईलच, परंतु जे कित्येक प्रसिद्ध लोक हल्लीं आपल्या डोळ्यांसमोर आहेत त्यांच्या तसबिरींहि आपणांस हुबेहुब छापून काढतां येतील, हें प्रत्यक्ष दाखविण्याकरितां बाळकृष्णपंत यांनीं डॉ. विश्राम यांची तसबीर त्यांच्या एका फोटोग्राफवरून छापून विष्णुशास्त्री यांजकडे रत्नागिरीस पाठवून दिली होती. ही तसबीर बरीच चांगली साधली असल्यामुळें विष्णुशास्त्री यांस नवीन कारखान्याबद्दल व बाळकृष्णपंत यांच्या कर्तृत्वाबद्दल बरीच उमेद आली. यापुढें ते रत्नागिरीहून पुण्यास आले तों चित्रशाळेंतून प्रो. केरोपंतनाना यांची तसबीर तयार होऊन नुकतीच बाहेर पडली होती. हीहि तसबीर बरीच चांगली साधली असून तिजवरून मूळ प्रसिद्ध पुरुषांची ओळख बरीच पडण्यासारखी असल्यामुळें या तसबिरीचा बराच खप होईल व हळुहळू चित्रशाळा छापखाना स्वतःच्या उत्पन्नावर चालूं लागेल अशी त्यांस उमेद आली.

याच सुमारास म्हणजे मे महिन्याच्या अखेरीस बुधवारच्या वाड्यास आग लागून तेथील सरकारी बुकडेपो जळून गेल्यामुळें पुस्तकें विकण्याचें एक नवीन दुकान काढलें असतां बराच फायदा होईल असा विचार विष्णुशास्त्री यांच्या मनांत आला. त्यांस या पूर्वीच वाटत असे कीं, गोंधळेकर व गोडबोले यांनीं अगदीं थोड्या भांडवलावरच चांगली मेहनत करून दहा पंधरा वर्षांत छापखाना व दुकान यांच्या बळावर चांगला कारखाना वाढविला आहे, तर हाच मार्ग जर आपले नवीन विद्वान् लोक अवलंबतील तर त्यांसहि सरकाच्या आश्रयावर सर्वथैव अवलंबून न राहतां अन्नें निर्वाह करितां येईल. या वेळीं त्यांजजवळ कांहीं त्यांनीं स्वतः केलेलीं व कांहीं कृष्णशास्त्री यांनीं केलेलीं अशीं बरींच पुस्तकें होतीं; त्याचप्रमाणें शाळीग्राम यांचींहि नुकतींच प्रसिद्ध झालेलीं एक दोन पुस्तकें होतीं. तेव्हां एखादें पुस्तकविक्रीचें दुकान काढलें तर आपलीं पुस्तकें व चित्रशाळेंतील नवीन तजबिरी हीं दोन्हींहि विकावयास चांगली सोय होईल; व शिवाय त्यांत सरकारी डेपोंतील मराठी पुस्तकें व विलायतचीं इंग्रजी पुस्तकेंहि विक्रीस ठेविलीं तर बराच फायदा होईल, असें विष्णुशास्त्री यांस वाटलें. याखेरीज त्यांच्या मनांत पुढील सालापासून नवीन खाजगी इंग्रजी शाळा काढण्याचें घाटत होतेंच; तेव्हां शाळा व दुकान यांची सांगड घालून दिल्यानें दुकानास आयती गिऱ्हाइकी मिळून तें चांगलें चालेल असा विष्णुशास्त्री यांनीं अदमास केला, आणि लागलीच त्यांनीं जुलई महिन्यांत बुधवार पेठेंत 'किताबखाना' म्हणून एक पुस्तकविक्रीचें नवीन दुकान शाळीग्राम यांच्याबरोबर निम्मे निम्मे अशा भागीनें काढलें.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं सरकारी नोकरीशीं फारकत करण्यापूर्वी स्वतंत्र रीतीनें आपला निर्वाह चालण्याची तीन साधनें—निबंधमाला, चित्रशाळा व किताबखाना—हीं तयार करून ठेविलीं होती. सरकारी नोकरीचा राजीनामा आपण लवकरच देणार आहोत हें त्यांना पुण्यास आल्यावर सुद्धां कोणास कळविलें नव्हतें. फक्त कांहीं खाजगी कामाकरितां सहा महिन्यांची रजा घेतली आहे; एवढें मात्र कोणीं विचारपूस केल्यास

ते सांगत असत. शेवटीं सप्टेंबरअखेर रजा संपतांच त्यांनीं नोकरीचा राजीनामा रत्नागिरीस हायस्कूलचे हेडमास्तर मि. नारायण विनायक साठे यांजकडे पाठवून दिला. तो वाचून पाहून मि. साठे व विष्णुशास्त्री यांचे कित्येक स्नेही, ज्यांस त्यांच्या मनोधर्माच्या उच्चतेची व बुद्धिवैभवाची चांगली कल्पना झाली नव्हती, त्यांस विष्णुशास्त्री हा चांगली सुखाची सरकारी नोकरी सोडून देऊन बिचारा काय कोणते फंदांत पडतो आहे म्हणून त्यांस त्याबद्दल वाईट वाटलें. मि. साठे यांनीं विष्णुशास्त्री यांस पत्र लिहिलें कीं, " तुम्हीं राजीनामा पाठविला आहे तो मे. डायरेक्टर-साहेब यांजकडे तसाच पाठवून देऊं काय ? परंतु कदाचित् जर तुमचा विचार फिरेल व त्याबद्दल तुम्ही मला कळवाल तर राजीनामा मी पुढें पाठवीत नाहीं. " परंतु विष्णुशास्त्री हे अर्धवट विचाराचे नव्हते. कोणत्याहि वोष्टीचा एकदां त्यांच्या मनाचा विचार झाला म्हणजे त्यांतून ते पाय मागें घेत नसत ! त्यांनीं लागलीच उत्तर पाठविलें कीं, " राजीनाम्याविषयींचा माझा फार दिवसांचा व पक्का निश्चय झालेला आहे; तो आतां मी फिरवूं इच्छीत नाहीं. तुम्हीं कृपा करून राजीनामा मंजुरीकरितां पुढें पाठवून द्यावा ! "

विष्णुशास्त्री यांचे रत्नागिरीस तेथील हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर मि. गांगल म्हणून कोणी स्नेही होते, त्यांनीं विष्णुशास्त्री यांचें मन फिरविण्याकरितां पत्र पाठाविलें असतां त्यांस विष्णुशास्त्री यांनीं जें उत्तर पाठविलें, तें पुष्कळ कारणांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तें जरी इंग्रजींत आहे तरी त्याची भाषासरणी, आंतील आवेश व विचारांचा उदात्तपणा हीं सर्व मालाकारास पूर्ण शोभण्यासारखीं आहेत. आपण सरकारी नौकरी काय कारणांनीं सोडतों व ती सोडल्यानंतर कोणकोणते उद्योग हातीं घेणार याचें दिग्दर्शन या उत्तरांत थोडक्यांत चटकदार असें केलें आहे. त्याचा उतारा पुढें खालीं देतों:—

❀❀No wonder that my throwing up my plase has called forth many a remark both here and there. In these days of helplessness and subserviency Government service is looked up-

on in something of a heavenly light and one deliberately giving it up must consequently be looked upon as little short of a madman or a suicide. But for my own part I have always thought very differently of the matter. Rather than bend the knee to tyranny. I would snap asunder the chain once and for ever. I have told you once and often on what terms I stood while here with Mr. Kunte, and I resolved to throw up my place when i received the order for Ratnagiri. But various circumstances compelled me then to leave my native place and home. But even then I cherished the hope that I would achieve my liberty the moment a suitable opportunity occurred.

"It is then my supreme disgust of the drudgery of a government school-life that led me to resign my place... I am resolved to try what might be done for public good with the potent instrumentality of a press establishment worked by a vigorious hand. You will have in course of time a fresh edition of the Arabian Nights carried on to the end, the essays on Marathi grammar in the शालापत्रक, essays on the remaining Sanskrit poets and several other works which I have long since contemplated.

" I have said, I believe, enough to assure you that it was in no momentary freak that I resolved to bear the chain no longer. "

❀ ❀ ❀

वरील उताऱ्यांत सरकारी नोकरीची बेडी व सरकारी अधिकाऱ्यांचा जुल्म यांविषयीं विष्णुशास्त्री यांनीं जो उल्लेख केला आहे व ज्यावरून त्यांस सरकारी नोकरी सोडावी लागली असें त्यांनीं म्हटलें आहे त्याविषयीं येथें दोन शब्द लिहिणें जरूर आहे. सरकारी नोकरी म्हणजे मोठ्या जाचाची, ती केवळ गुलामगिरीपेक्षां गुलामगिरी आहे, व ज्यास म्हणून सुखाची अपेक्षा आहे त्यानें ती कधीं पतकरूं नये, असे पुष्कळ लोक फारसा विचार न करतां किंवा वरपांगी बोलतांना दृष्टीस पडतात; पण वरील गुलाम मंडळींपैकीं म्हणजे कोणी कधीं म्हटल्याप्रमाणें कंटाळून

इबकी वाईट व नीच अशी जी सरकारी नोकरी ती आपण होऊन सोडली आहे, असें मात्र बहुधा आढळण्यांत येत नाहीं. उलट वीस वर्षां- पर्यंत मजल पोंचली असतां तसाच नेट धरून पंचविशीचें निम्में पेन्शन् मारण्याची उमेद धरणारी मंडळी पुष्कळ ! व पंचविशीचीहि एकदांची यमराजाच्या कृपेंकरून मुदत पोंचली तरीहि सरकारी नोकरीस नांवें ठेवणारे रावसाहेब कंटाळून न जातां गुडसरव्हीस भरण्याबद्दल कंबर बांधतांना दृष्टीस पडतात !! आणि कधीं कधीं तर गुडसरव्हीस व पंचावन्नी अशा चोहोंकडूनहि कडेलोट झाला असतां अद्याप मुलाबाळांचा अभ्यास होणें आहे, वगैरे जबरदस्त सबबी काढून एक्सटेंशनबद्दलहि सरकारांत भीक मागण्याची अशा मंडळींची तयारीच असते ! ! !

सरकारी नोकरी आपणांस जी येवढी प्रिय वाटते, याचीं कारणें अनेक आहेत. प्रथम सरकारी नोकरी म्हणजे केवळ सरदारी नोकरी—श्रम थोडे व पगार अधिक. ज्यांना म्हणून सरकारी नोकरीचा आणि सावकारी कंपनी किंवा इतर खाजगी नोकरीचा अनुभव असेल, त्यांस वरील गोष्टीचा प्रत्यय आल्यावांचून राहिला नसेल. त्याचप्रमाणें सरकारी नोकरींत जो निश्चितपणा, जी अन्न व कांहीं अंशीं दुसऱ्याची हांजी हांजी न करितां स्वपराक्रमावरच निर्वाह करण्याची सोय असते, तसा प्रकार इतर कोणत्याहि खाजगी नोकरींत असत नाहीं. शिवाय सरकारी नोकरींत अशी एक विशेष गोष्ट आढळून येते कीं, तींत जितके जितके अधिक दिवस जातील व जितका जितका मनुष्य अधिकाधिक वाढत जाईल तितकें तितकें त्याचें काम कमी होत जाऊन त्याचा पगार मात्र वाढत जात असतो ! याखेरीज अनेक प्रकारच्या रजा, ग्राच्युईटी, पेन्शन् वगैरे तर विशेष चांगल्या गोष्टी या सरकारी नोकरीलाच लागू आहेत. तेव्हां सरकारी नोकऱ्यांसाठीं आमच्या सुशिक्षित लोकांची जी एवढी झिंमड पडते व युरोपियन अधिकाऱ्यांच्या चेष्टेस * व तिरस्कारास मुद्धां ते जे पात्र होतात याचीं कारणें वरीलच होत.

---

* I believe that institutions like your New School, have got

तेव्हां सरकारी नोकरी इतक्या तऱ्हेनें चांगली, सोईची व पुष्कळ अंशीं अखर्चीहि असतां तीस नांवें ठेवणें म्हणजे केवळ असमंजसपणाचें व कृतघ्नपणाचेंहि काम होय! परंतु विष्णुशास्त्री यांस सरकारी नोकरीचा ज्या कारणांवरून तिटकारा आला, तीं वर सांगितल्यापेक्षां निराळ्या तऱ्हेचीं होतीं. त्यांस सरकारी नोकरीच्या वर सांगितलेल्या चांगल्या गोष्टी माहीत नव्हत्या, किंवा त्यांची त्यांस किंमत समजत नव्हती असें नाहीं; परंतु अशा गोष्टीबद्दल सरकारी नोकरांपासून सरकार जो मोबदला घेऊं पाहतें, तो त्यांच्या मानानें फार अधिक किंमतीचा आहे असें त्यांस वाटत असे. सरकारी नोकरीच्या एका पारड्यांत बडा तनखा, छोटें काम, अनेक प्रकारच्या रजा, पेन्शन् वगैरे शारीरसुखाच्या साधनांची रेलचेल, व दुसऱ्या पारड्यांत त्यांचा मोबदला म्हणून स्वाभिमान, स्वमताभिमान, स्वदेशाभिमान वगैरे कित्येक उन्नत मानसिक वृत्तींची घातलेली रांगोळी, हें पाहून विष्णुशास्त्री यांस सरकारी नोकरीचा कंटाळा आला होता. ज्यांस आपल्या फक्त तनख्याच्या राशीकडे पाहून त्यावर आपल्या परिवाराचा उत्तम सुखानें निर्वाह चालतो येवढ्याच गोष्टीनें आनंद होतो,

---

all the elements-and if you have not, you will be able to obtain them with the aid of the Educational Department to prevent as much as possible that the whole current of education should not lead only to what, I am afraid, is present in the minds of many of you—Government Service. There is no doubt at the present moment a great danger that there will be such a demand for Government Service that Govesnment itself will become of a kind of plethora of B. A. s! And I believe that the day is not far distant that when the Government shouts *qui hai*. the chowbdar at Government house will be engaged with the A. D. C. in discussing some question of history; or perhaps ths Chowbdar will instruct the A. D. C. in waiting in Sanskrit. ❀ ❀

Lord Reay's Speech—July 16, 1886.

व जन्मांत येऊन कृतकृत्यता काय ती यांतच आहे, असें ज्यांस वाटत असेल, त्यांस सरकारी नोकरीची रुपेरी बेडी ही उत्तम वाटून तिजबद्दल त्यांस इसापनीतींतील गळ्याभोंवतीं पट्टा वागविणाऱ्या पुष्ट कुत्र्याप्रमाणें उलटी प्रतिष्ठाहि वाटेल, व ते विष्णुशास्त्री यांस अविचारी व वेडगळ म्हणून समजतील यांत नवल नाहीं; परंतु ज्यांची ' स्व ' ची मर्यादा आपल्या कुटुंबापलीकडे विस्तृत होऊन ती स्वज्ञाति व स्वदेश यांपर्यंत पसरली असून ज्यांस केवळ शारीरसुखापेक्षां हृदयांतील वर निर्दिष्ट केलेल्या उच्च मनोवृत्ति तृप्त झाल्यापासून अधिक संतोष होतो ह्याचा अनुभव असेल, त्यांस विष्णुशास्त्री यांविषयीं आदर वाटल्यावांचून राहणार नाहीं !

आपल्या विद्वान् लोकांच्या दुबळेपणाबद्दल व सरकारावर सर्वस्वी भिस्त ठेवण्याविषयीं जी त्यांची अतोनात इच्छा दृष्टीस पडते त्याजबद्दल विष्णुशास्त्री यांचें पुष्कळदां बोलणें होत असे. एकदां सार्वजनिक कामांत बरेच वापरणारे येथील रा. काशीनाथपंत खरे यांच्याशीं विष्णुशास्त्री यांचें बोलणें चालतां चालतां गोष्ट निघाली कीं, सार्वजनिक कामांत पडणारे असे बऱ्याच योग्यतेचे लोक आपणांमध्यें अगदीं नाहींतच म्हटलें तरी चालेल. शेवटीं गोष्टी निघतां निघतां आमच्या ग्राज्युएट मंडळींतील प्रमुख व ज्यांस देशाच्या हिताहिताबद्दल उत्कृष्ट तऱ्हेची माहिती आहे असे आमचे रावबहादूर रानडे यांची सहजच गोष्ट निघाली. विष्णुशास्त्री म्हणाले, " रानडे यांच्यासारख्या विद्वान्, उद्योगी व सार्वजनिक कामासाठीं हौस बाळगणाऱ्या गृहस्थानें मनावर घेतलें तर सार्वजनिक कामें उत्कृष्ट रीतीनें उठणार नाहींत काय ? " यावर रा. खरे यांनीं हळूच उत्तर केलें, " अहो, पण आठशें रुपये आज त्यांना देण्यास कोणी तयार आहे का ? " विष्णुशास्त्री हा संवाद स्नेह्यांपाशीं सांगत असतां म्हणाले, " एकूण हत्तीवित्तीला जशी बाराशें रुपयांची नेमणूक हवीच, त्यापेक्षां कमींत व्हावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच रावबहादुरांची गोष्ट म्हणायची. शेंदोनशें कमी मिळालें तर कांहीं चालावयाचें नाहीं ! "

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं, आपल्या विद्वान् मंडळानीं पहिल्यापासून सरकारावर सर्वथैव अवलंबून राहण्याची संवय असल्यामुळें, ज्या गोष्टींमध्यें म्हणून इंग्लिश लोकांचा आणि एतद्देशीय लोकांचा मतभेद पडतो तेथें त्यांना आपले स्वतंत्र विचार प्रसिद्ध करण्यास अडचण खरी; व याच गोष्टीमुळें आज इंग्रजी विद्येचा प्रसार जरी झपाट्यानें चालू आहे, आणि युनिव्हर्सिटींतून शेंकडों ग्राज्युएट, अंडरग्राज्युएट लोक बाहेर पडले आहेत व त्यांपैकीं कित्येक चांगले योग्यतेचेहि आहेत, तरी त्यांपैकीं मराठींत किंवा इंग्रजींत नांव घेण्यासारखे स्वतंत्र विचाराचे ग्रंथ ज्यांनीं केले आहेत, असे बहुश: आढळणार नाहींत. ग्राज्युएट लोकांच्या नांवांनीं भूषित केलेलीं पुस्तकें पांचदहांवर निघतील किंवा नाहीं याचा आम्हांस संशयच आहे ! तेव्हां सरकारी नोकरी आणि तिचीं सुखें यांची आणि स्वतंत्रता, स्वाभिमान, देशाभिमान वगैरे गोष्टींचा झगडा लागला असतां दुसऱ्या गोष्टींकडेसच आमच्या विद्वान् लोकांचा कानाडोळा होतो हा बहुतेक नियम; पहिल्याकडे होणें हा अपवाद ! विष्णुशास्त्री यांची वृत्ति बहुतेक इतर विद्वान् मंडळीपेक्षां स्वाभाविकच वेगळी असल्यामुळें व जानसन, ह्यूम, गिबन, मेकाले वगैरेंच्या ग्रंथांच्या वाचनानें ती दृढतर झाली असल्यामुळें, ते अर्थातच शारीरसुखापेक्षां ह्रदयांतील अधिक उच्च ज्या वृत्ति–स्वाभिमान, देशाभिमान स्वमताभिमान–त्यांस ते अधिक मान देत असत. त्यांचें पहिल्यापासूनच इतर विद्वान् मंडळीप्रमाणें पैशाविषयीं येवढें प्रेम नव्हतें. सरासरी निर्वाह चालून अब्रूनें राहतां आलें म्हणजे बस झालें असें त्यांस वाटत असे. आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आर्जवें करून बढतींवर बढती ठोकीत जाणें हें तर नाहींच, परंतु जेथें जेथें वरील वृत्तींचा आणि अधिकाऱ्यांच्या मर्जीचा विरोध असे, तेथें तेथें विष्णुशास्त्री हे अधिकाऱ्यांच्या मर्जीवरच पाणी सोडण्यास तयार असत, येवढेंच नाहीं, तर त्यांच्या रागास देखील ते जुमानीत नसत. त्यांची वृत्ति म्हटली म्हणजे—

अकृत्वा परसंतापमकृत्वा खलनम्रताम् ।
अनुसृत्य सतां वर्त्म यत्स्वल्पमपि तद्बहु ॥

या पद्यांत वर्णिल्याप्रमाणें असे. यामुळें योग्य संधि आल्याबरोबर ते सरकारी नोकरीच्या वेडींतून पार निघाले यांत नवल नाहीं !

विष्णुशास्त्री यांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला ही गोष्ट जेव्हां त्यांच्या इष्टमित्रांस समजली, तेव्हां त्यांपैकीं थोडक्यांसच त्यापासून वाईट वाटलें नसेल. त्यांना त्यांचें हें कृत्य अगदीं वेडेपणाचें वाटलें. त्यांचें म्हणणें, " आज मित्तीला शंभर रुपयांची चाकरी आहे कोठें ? सर्व लोक नोकरीसाठीं येवढें झटपटतात आणि याला त्या निबंधमालेच्या पायीं सुखाचा जीव दुःखांत घालावासा वाटतो, यास काय म्हणावें ! " तथापि विष्णुशास्त्री यांचा स्वभाव एरवीं गरीब खरा; तरी तो कांहीं अंशीं हट्टी असल्यामुळें त्यांना त्याबद्दल सांगून कांहीं उपयोग नाहीं असें समजून कोणीं त्यांजजवळ फारशी कटकट केली नाहीं. आठ पंधरा दिवसांत राजीनामा मंजूर होऊन आला, आणि विष्णुशास्त्री यांस आतां आपणास स्वतंत्रपणानें अनेक उद्योग करतां येतील हें मनांत येऊन बराच संतोष झाला.

विष्णुशास्त्री हे सहा महिन्यांची रजा घेऊन घरीं होते, त्या वेळांत सरकारी नोकरी सोडल्यावर आतां पुढें काय काय उद्योग हातीं घ्यावयाचे ह्या विचारांतच ते होते. त्यांच्या मनांत प्रथम एक खाजगी इंग्रजी शाळा काढून तींत विद्यार्थ्यांस कमी खर्चानें व सरकारी शाळांपेक्षां कांहीं निराळ्या तऱ्हेनें शिकण द्यावयाचा संकल्प होता; परंतु राजीनामा पाठवून देईपर्यंत त्यांनीं हा आपला बेत कोणासहि कळविला नव्हता. तो पाठवून दिल्यानंतर त्याची बातमी जेव्हां गांवांत पसरली व यापुढें विष्णुशास्त्री यांचा बेत एक नवीन धर्तीवर खाजगी इंग्रजी शाळा घालण्याचा आहे, असें डेक्कन कॉलेजांतून नुकतेंच बाहेर पडलेल्या कांहीं होतकरू मंडळीस समजलें, तेव्हां त्यांच्या मनासहि विष्णुशास्त्री यांच्या उदाहरणाचा संसर्ग लागून त्यांनाहि या नवीन शिक्षणक्रांतींत आपण हात घालावा अशी सहजच स्फूर्ति झाली. हे गृहस्थ* रा. टिळक, रा. आगरकर, रा. भागवत

* विष्णुशास्त्री यांनीं या सुमारास लक्ष्मणराव यांस पत्र पाठविलें आहे, त्यांत वरील शाळेच्या संबंधानें ते पुढें लिहिल्याप्रमाणें लिहितातः—

* * " The memorable 1st of October is approaching.

व रा. करंदीकर हे होत. या वेळीं मागें तिसऱ्या भागांत सांगितलेली बाबा गोखले यांची इंग्रजी शाळा सुमारें दहा वर्षे चालून बाबांचें मन जसजसें वकिलीच्या धंद्यांत अधिकाधिक पडूं लागलें तसतशी त्यांची शाळा संपुष्टांत येऊन ती १८७६ सालीं अगदीं बंद झाली. यानंतर हल्लीं बऱ्याच प्रकारें चालू असलेली मि. भावे यांची ' नेटिव्ह इन्स्टिटयूशन ' नांवाची इंग्रजी शाळा १८७६ सालच्या मध्यभागीं सुरू होऊन ती कधीं स्वतंत्र, कधीं मिशनस्कुलांत मिसळून व पुन्हां स्वतंत्र, अशीं तिचीं बरींच रूपांतरें होऊन ती या सालाच्या म्हणजे १८७९ च्या अखेरीस बऱ्याच चांगल्या स्थितींत आली होती. मि. भावे यांनीं जेव्हां प्रथम विष्णुशास्त्री व इतर मंडळी यांचा बेत ऐकिला, तेव्हां त्यांस आपल्या शाळेंतच ओढावें असा त्यांचा विचार होता; परंतु मि. भावे यांची वड्या वड्या साहेब लोकांचे आर्जव करून त्यांच्या कुमकेवर शाळा चालविण्याची रीत विष्णुशास्त्री यांस पसंत न पडून त्यांनीं त्या कामांत लक्ष घातलें नाहीं. त्यांचें म्हणणें पडलें कीं, साहेब लोकांचेच आर्जव करून जर शाळा चालवावयाची तर मग सरकारी हायस्कुलांतीलच नोकरी काय वाईट होती ?

याप्रमाणें नवीनच स्वतंत्र शाळा काढण्याचा विष्णुशास्त्री यांनीं निश्चय केला; परंतु मि. आगरकर, भागवत व करंदीकर हे तूर्त कांहीं कारणास्तव या बेतांत येईनात. मि. टिळक हे मात्र येण्यास कबूल झाले; परंतु त्यांचें म्हणणें पडलें कीं, नवीन शाळा न काढतां कॉलेज काढावें. ते म्हणाले, " मी महिना पंधरा दिवस तूर्त येतों; परंतु मी एल. एल. बी. चा डिल्पोमा घेऊन आल्यावर मग काय तो कायमचा निश्चय करीन. " येणेंप्रमाणें प्रथम

I shall enjoy the pleasure of kicking off my chains that day. Mr. Agarkar (going for M. A.), Mr. Tilak (going for L.L.B.) Mr. Bhagwat and Karandikar (appearing for B. A.) have tendered proposals for joining me in the enterprise. This they have done of their own accord. We have settled 1st Jan. for the hoisting of the standard. Such a battery must carry the High School instantaneously before it." × ×

13-9-79.

मदतगार मंडळींत अंमळ डळमळच होती ! तथापि विष्णुशास्त्री यांनीं नवीन मंडळी हळुहळू येऊन मिळतील अशी उमेद धरून नवीन शाळेबद्दल जाहिरात वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केली.

ही जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वीच विष्णुशास्त्री हे पुढील सालाच्या आरंभापासून नवीन इंग्रजी शाळा काढणार ही बातमी विद्यार्थ्यांमध्यें दाट पसरली होती. यामागें कोणतीहि नवीन शाळा निघण्याच्या अगोदर पुणें शहरांत विद्यार्थ्यांमध्यें येवढी चळवळ उत्पन्न झाली नव्हती. विष्णुशास्त्री यांच्याविषयीं विद्यार्थ्यांमध्यें त्यांच्या सुस्वभावावरून, त्यांच्या विद्वत्तेवरून व त्यांच्या उदात्त वर्तनावरून जितका पूज्यभाव होता तितका यापूर्वी कोणाहि शिक्षकाविषयीं त्यांमध्यें नसेल. दुसऱ्या कित्येक शिक्षकांविषयीं वर निर्दिष्ट केलेल्या एकदोन गुणांवरून विद्यार्थ्यांची त्यांजवर भक्ति असे; परंतु विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं तिन्हीहि गुण एकवटल्यामुळें ती फारच मोठी होती यांत नवल नाहीं ! कित्येक विद्यार्थ्यांस ही बातमी पक्की आहे असें समजतांच ते दोन दोन महिने अगोदरच सरकारी हायस्कूल सोडून देऊन घरीं बसले; यांत कित्येक त्या वेळचे चांगले नांवाजलेले पगारी विद्यार्थीसुद्धां असून त्यांस या नवीन होणाऱ्या शाळेविषयीं उल्हास वाटून आपण जगन्नाथ शंकरशेट स्कालरशिप या शाळेंतून पास होऊन मिळवावी अशी त्यांस मोठी हौस वाटली ! येणेंप्रमाणें न्यू इंग्लिश स्कूल स्थापन होण्यापूर्वी या सालच्या दिसेंबर महिनाभर पुण्यास बरीच चळवळ होऊन राहिली होती !

गेल्या दोन सालांत विष्णुशास्त्री यांची गृहस्थिति बरीच बदलून जाऊन शिवाय त्यांची मध्यंतरीं पुण्याहून बदली झाल्याकारणानें निबंधमालेचे अंक वेळेवर निघतनासे झाले होते व ते मागें पडतां पडतां या सालच्या अखेर बारा अंक मागें पडले. इतकी खांच भरून काढण्याची आशा विष्णुशास्त्री यांस न वाटून त्यांनीं हें साल अजिबात गाळून टाकून ६१ वा अंक १८८० सालच्या जानेवारींत काढण्याचा विचार केला. तेव्हां या सालीं निबंधमालेसंबंधी लिहिण्यासारखें अर्थांतच विशेष कांहीं नाहीं.

भाग ७ वा.

न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना.

मुख्यमेकं पुरस्कृत्य शून्यात्मानोऽपि साधकाः ।
भवंति तं विना नैव यथा संख्यांकबिंदवः ॥ *

मागील भागांत विष्णुशास्त्री यांनीं सरकारी नोकरी सोडून देऊन ते आतां नवीन स्वतंत्र उद्योग करण्यास मोकळे झाले म्हणून सांगितलें आहे. आतां यापुढें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल हें कसें स्थापन केलें, तें करतांना त्यांचे कोणकोणते स्तुत्य उद्देश होते, त्या शाळेस एकामागून एक चांगले शिक्षक कसकसे मिळत गेले व त्यामुळें तिचा दिवसानुदिवस उत्कर्ष कसा होत चालला; त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री यांस साह्य करण्यास जी नवीन ग्राज्युएट मंडळी मिळाली त्यांनीं एक मोठा छापखाना हाताशीं करून घेऊन आपलीं नवीन व स्वतंत्र मतें हीं प्रसिद्ध करण्याकरितां केसरी व मराठा हीं वर्तमान पत्रें कशीं सुरू केलीं, ही हकीगत या भागांत आली आहे.

विष्णुशास्त्री यांनीं यापुढें जे नवीन उद्योग सुरू केले त्या सर्वांमध्यें मोठा उद्योग म्हटला म्हणजे न्यू इंग्लिश स्कूल ह्याची स्थापना हा होय. सरकारी शाळांतून जें शिक्षण मिळतें त्याची मर्यादा अर्थातच सरकारच्या हुकुमांनीं नियमित केलेली आहे. डायरेक्टर काय, हेडमास्तर काय आणि असिस्टंट मास्तर काय सर्वांसच त्यांस योग्य वाटेल त्या पद्धतीनें शिक्षण देण्याची मुळींच मोकळीक नाहीं. हिंदुस्थान सरकारनें जी एकंदर शिक्षणपद्धति १८३५ सालीं

*वरील श्लोकांतील अर्थ सर्वतोपरी लागू असा घ्यावयाचा नाहीं. तो विष्णुशास्त्री यांच्या नायकत्वासंबंधानें मात्र घ्यावयाचा. परंतु त्यांच्या सहायकारी मंडळीकडे जें शून्यत्व येण्यासारखें आहे तें मात्र अर्थातच घ्यावयाचें नाहीं.

घालून दिली तीच सर्व देशभर चालू आहे. ती युरोपांतील चांगल्या चांगल्या सुधारलेल्या देशांतील शिक्षणपद्धतीच्याच धर्तीवर बनविली असून ती पुष्कळ अंशीं चांगली आहे यांत संशय नाहीं; परंतु या पद्धतींत जे दोष आहेत त्यांतील मुख्य हे होत कीं, या पद्धतीनें विद्यार्थ्यांचें ज्ञान मात्र वाढतें व तेवढ्यावरून त्यांच्या हातून नेहमींच्या व्यवहारांतील साधारण भाग बऱ्याच रीतीनें पार पडतो; परंतु स्वाभिमान, स्वदेशप्रीति, आपल्या ऐतिहासिक पुरुषांविषयीं आदर वगैरे उच्च मनोवृत्ति या सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होणें म्हणजे कठिणच खरें! आपले विद्यार्थी कालेजांतून बाहेर पडले म्हणजे ते स्वदेशाविषयीं बहुतेक उदासीनच असतात. स्वतःच्या देशाच्या इतिहासाचें अज्ञान असल्यामुळें त्यांमध्यें स्वदेशभिमान जो जागृत व्हावयाचा तो केवळ ह्यामडन्, वाशिंगटन वगैरे परदेशस्थ थोर पुरुषांच्या चरित्रांपासून व्हावयाचा. आपल्या देशांत पूर्वीचें अभिमान धरण्यासारखे फारसें कांहीं नाहीं असा त्यांचा ग्रह होऊन जाऊन, इंग्लिश लोकांच्या अलौकिक ज्ञानानें, त्यांच्या अपरंपार राजसत्तेनें, त्यांच्या अचाट उद्योगांनीं, त्यांच्या अंगच्या साहसादि अनेक गुणांनीं आपले तरुण विद्वान् लोक अगदीं दिपून जाऊन आपण कोणत्या कोंपऱ्यांतील चिठोरा अशी आपणा स्वतःविषयीं, आपल्या पूर्वजांविषयीं त्यांची कल्पना होऊन जाऊन व आपल्या पुढील प्रजेच्या अभ्युदयाविषयीं निरुत्साह होऊन सध्यां जी आपणास अर्धी चतकोर भाकरी मिळत आहे त्यांतच सुख मानून घ्यावें, अशा त्यांच्या समजुती होतात हें साहजिकच आहे. याशिवाय मेकाले, मिल्ल वगैरेंच्या ग्रंथाच्या वाचनापासून या समजुती अर्थातच दृढ होण्यासारख्या आहेत. सरकारी हायस्कुलांतून मेकाले याचे वारनहेस्टिंग्स किंवा क्लाइव्ह हे निबंध शिकवितांना त्यांतील प्राचीन आर्यविद्या, बंगाली लोक, हिंदुस्थानची दरिद्रावस्था वगैरे संबंधानें साहेबमजकुरांच्या चुकीच्या समजुती होत्या हें विद्यार्थ्यांस सिद्ध करून देण्यास सरकारी हायस्कुलांतून किती शिक्षकांचें धैर्य होत असेल कोण जाणें! तेव्हां निबंधमालेंतील स्वतंत्र मतांचा शिक्षणद्वाराहि प्रसार करून इंग्रजी ग्रंथकारांच्या व वर्तमानपत्रकारांच्या एकतर्फी मजकुरानें होतकरू विद्यार्थ्यांच्या मनावर होणारे दुष्ट संस्कार हे काढून टाकतां यावे, त्यांचे

मनांत स्वदेशाभिमान जागृत व्हावा, सरकारावर सर्वथैव भिस्त टाकून सर्व जन्म आळसांत व ख्यालीखुशालींत न काढतां त्यांच्या अंगीं स्वावलंबन, सतत उद्योग, साहस वगैरे गोष्टींविषयीं प्रीति उत्पन्न व्हावी व त्याचप्रमाणें स्वतःच्या प्रत्यक्ष उदाहरणावरून आपल्या विद्यार्थ्यांस नवीन ग्रंथरचना करून देशभाषा ऊर्जितदशेस आणण्याची इच्छा व्हावी, व आपण जो उपक्रम केला आहे त्याचाच त्यांनीं अधिकाधिक प्रसार आपल्या मागें करावा, असा विष्णुशास्त्री यांचा न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करण्यांत मुख्य उद्देश होता !

येणेंप्रमाणें तारीख १ जानेवारी १८८० रोजीं मोरोबादादा फडनवीस यांच्या वाड्यांत न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करण्याची सर्व तयारी झाली; परंतु अकस्मात् आदल्या रात्रीं सीतारामपंत यांच्या कुटुंबास मध्यरात्रीच्या सुमारास कालऱ्याचा उपद्रव झाला. डिसेंबर महिन्यांत भर हिंवाळ्यांत पुण्यास कालरा प्रथम सुरू झाला तो याच बिचाऱ्या बाईवर झाला. चुलतीची अशी अत्यावस्था झाल्यामुळें विष्णुशास्त्री यांस तिकडे जावें लागलें. दुसऱ्या दिवशीं नवीव शाळा उघडण्याचा समारंभ असल्यामुळें आपण तेथें न गेलों तर प्रथम दर्शनींच अपशकून असें लोक समजतील; असें वाटून विष्णुशास्त्री यांनीं तेवढ्याच्या तेवढ्यांतच वेळ काढून समारंभ उरकून घेतला. त्यांनीं प्रथम थोडें इंग्रजींत भाषण करून ही नवीन शाळा स्थापन करण्याचे मुख्य हेतु काय हें जमलेल्या लोकांस कळविलें; व आलेल्या सुमारें १५० मुलांचीं नांवें पटावर नोंदून शाळेच्या कामास सुरुवात केली. या वेळीं या शाळेंत मुख्य म्हणून शिक्षक तीनच होते—विष्णुशास्त्री, रा. टिळक व रा. माधवराव नामजोशी. रा. टिळक यांचा प्रथम निश्चय जरी पक्का नव्हता व शाळेऐवजीं कॉलेज स्थापन करावें असा जरी त्यांचा मतभेद होता तरी ते शाळेला जे एकदां चिकटले ते तीस दृढ धरूनच राहिले. विष्णुशास्त्री यांच्या अंगीं धैर्य, विद्वत्ता व देशहिताकरितां स्वतःस पैशाची व अंगमेहनतीची झीज लावून घेणें वगैरे जे गुण होते त्यांमध्यें त्यांच्या खालोखाल यांचीच पायरी लागेल यांत संशय नाहीं. रा. टिळक यांच्या कित्येक मतवैचित्र्याबद्दल व त्यांच्या कांहीं अंशीं तापट व आग्रही

प्रकृतीवरून त्यांस कित्येक लोक नांवें ठेवितात. तरी ज्या गृहस्थांनीं एल. एल. बी. चा डिप्लोमा मिळाल्याबरोबर इतर होतकरू विद्वान् मंडळीप्रमाणें हायकोर्टाची वाट न धरितां किंवा मुनसफीची जागा पटकावण्याची हांव न बांधतां विष्णुशास्त्र्यांप्रमाणें देशसेवेकडे आपलें आयुष्य खर्चण्याचा निश्चय केला, त्यांची योग्यता कमी मानणें आणि ज्या रावसाहेबांचा आणि रावबहादुरांचा सरकारी नोकरींत स्वतःची व स्वतःच्या कुटुंबाची चैन चालण्याकरितां जन्माचा जन्म जायचा त्यांचा मोठा बडेजाव करणें, यांपेक्षां आपल्या लोकांमध्यें खऱ्या थोरपणाची यथार्थ परीक्षा करण्याची अद्याप समजूत आली नाहीं याबद्दल दुसरें कोणतें प्रमाण पाहिजे बरें?

मे महिन्याची सुट्टी होण्यापूर्वी शाळेंतील मुलांची संख्या पांचशेंपर्यंत येऊन पोंचली. सुट्टी होण्याच्या दिवशीं सरकारी हायस्कुलांतील रिवाजाप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं न्यू स्कूलचे विद्यार्थी व इतर जमलेले सभ्य गृहस्थ ह्यांस उद्देशून पुढें दिलेला आड्रेस वाचलाः—

"My colleagues and my pupils,–It is customary with Heads of Educationa Institutions to conclude the business of a term with an address, retrospecting the work done during the time and concluding with a word of parting advice to the pupils before they are dismissed for the vacation. Such an address is generally delivered orally, and I might have done the same, as I did on the occasion of opening the present Institution; bnt I feel that the solemnity of the present moment requires something more fitting the occasion. It was not generally expected that I should have the gratification of addressing as full a hall as I see at present before me; but since under favour of a gracious Providence our cup has been already full even to overflowing, it is befitting that something more formal and more substantial than the speeches, which usually notify the welcome advent of the longest vacation in the year, should be forthcoming on such an occasion.

In the first place, then, let us congratulate ourselves on the

splendid success which has already attended this magnificent enterprise;–an enterprise on which so many varied interests are staked. It is more than fifteen months since I first conceived definitely the idea of a project which has in so short a time been so fully consummated, almost I might say, 'with the rapidity of the prophet's gourd'! with so many divers institutions, educational, social, religious, and what not, lying in mouldering ruins around us, and others at best dragging on but a miserable life, it is surely no small matter for congratulation to behold this young institution, but a quarter of a year old, not only out-stripping in its rapid career similar enterprises of many a year's standing, but already threatening, at least such is the report, to prove no contemptible rival even to the Government Institution, supported as it is by the munificence of Government, by a long prestige secured under a succession of able officers, both European and Native and no less by a strong popular prepossession in its favour. The fact, then, of even such an institution having already begun to feel no inconsiderable perturbations in its hitherto smooth and regular course by its proximity to a new portentous birth, must be regarded as something very remarkable, and to an observer of the signs of the times cannot but present itself as fraught with no ordinary import. But I must not allow my feelings to hurry me beyond the legitimate bounds of a school-address; suffice it, therefore, to say that the New English School being a fully accomplished fact, accomplished too in the midst of a hundred difficulties, amidst popular apathy, in utter desregard of desponding opinions, in direct defiance of official denunciation, in contemptuous indifference to showers of epithets of 'mad,' 'hopeless,' 'chimerical,' 'Utopia,' the invariable lot of every one who would be so bold as to disturb the dull routine of things,–accomplished, I say again, in spite of desertion, in spite of calumny, in spite of paragraphs in news-papers, in

spite of the little interested doing of little folks, in a word, in spite of all the mean devices of disappointed malice,–our institution triumphing over one and all of these by its innate energy is calculated to fill every one of us here with a feeling of triumph for the present and hope for the future !

So much then by way of retrospect of the rise of the present institution. Let me pass now to actual work done during the term. On this work it would be rather improper to make any remarks here. and that for very obvious reasons. We may however say, I believe. in all conscienciousness, that we have worked strenously and well, and that the results of the late examination will amply prove the same.In connection with this work it is besides necessary to bear in mind two important things. The one is the necessary confusion attendant on the first establishment of all institutions, and especially of one of such a unique and anamolous character;–an institution without funds save those derivable directly from itself, without organization save what may be developed in its own progress, without character or prestige save what it may hope to secure by the manner of its working ! Under these circumstances it would be no matter for surprise that no greater progress was effected than has actually been done; indeed the wonder rather would be that any considerable advance has at all been made. The other important thing to be like-wise borne in mind is what constitutes the peculiar feature of this institution. It is that full measure of freedom which is accorded both to the teachers and the taught. A teacher in our institution has to fear no hourly rounds of the Head Master, no annual bugbear of the Inspectorial visit;; he has no official etiquette to observe variable with the whims and caprices of every new head; no useless infiiction of no end of catalogues, registers, books and papers to submit to. He is here something better than a living

automaton ruled by the time-table on one hand and ihe clock on the other; something better than a wretched slave condemned for his allowance of bread to watch the looks of that Superior Intelligence whose word is law aud whose Olympian thunders he may never venture to tempt! To our pupils too we have proclaimed here the like latitude of conduct. While the terrors of the eternal ferule have not been held in abeyance and every undue transgression is duly chastised, a boy may yet find here the rigours of the pedagogue rule considerably softened down. In the Master he may see here something less of a Bogul Bowa than he has yet been accostomed to– submitting to be questione l full as often as the querist may choose, ond not willing to escape from the meshes of a difficulty in the lesson in the reverberations of angry reproof. The youngster may likewise ffnd greater indulgence made to him in consideration of his youthful feelings;—no juvenile exuberance of spirits being mistaken for deliberate impertinence, and no forwardness of youttful ambition treated as saucy presumtion and repressed as such.

Now then a few last words to the students and I have done. You have now, my pupils, a long vacation before yau, a vacation extending over nearly six weeks. The question therefore that must occupy you at the present moment must naturally be how to spned this long portion of time with best advantage to yourself. 1 will offer a few remarke to guide your judgment in the solution of this important problem. I use the word impcrtant advisedly;for your future success in the career you are running and in that higher career to which the shorter one is but a preparative, must in a great measure depend on the way in which you utilize the present. You cannot therefore take too much care in determining as to how you will employ yourself during such long periodes of time in which you are left entirely to yourselves. There were times when the student could afford to

sleep off or play off whole vacations and live as merrily as the day was long: days when Government was as solicitous to impart education as it is at present indifferent or chary, days when scholarships at college sometimes outnumbered the pupils themselves, days when a graduate fresh from the University was a nine days' wonder! But those golden days,-golden in more senses than one-are now no more. The present is an age of stern necessities, when the struggle for life has become tenfold more arduous than it ever was. With the furious battle therefore going round you, and the din of blows given and received resounding in your ears, you cannot afford to indulge in similar sloth; you must be up and doing. While therefore a vacation is alwys meant for rest and recreation, you cannot ignore the stern facts I have dwelt on above. Of course I am not to be understood to advise you to observe the rigour of the Spartan discipline, nor would I willingly allow the youth to be completely merged in the student. Such a course would be as useless as it would be foolish. I cannot forget the moral of the Æsopian bow, nor need anybody remind me of how fatal has been the error of not a few among us, who have fallen martyrs to their exclusive devotion to study and morbid ambition: youthful buoyancy of mind and body must have a legitimate vent and I would not for all the world withhold an hour of harmless jollity from a boy when he can well spare it. Keep an equal eye therefore on work and rest, on study and recreation. Those of you that will go abroad can command the plesures of the country, those pleasures for which your classical education both Eastern and Western, must have given, or ought to give you a lively relish. Those on the other hand who have their homes in the city shall have the advantage of enjoying those manifold attractions, which, thanks to the energy and zeal of some of our public men, crowd together so conspicuously in the blessed month of May and invest this glorious metropolis,

illustrious with a hundred historic associations, with the fresher glory of a new type of civilizations ! "

न्यू इंग्लिश स्कूलची भरभराट होत चालल्यानें पूना हायस्कुलास बराच धक्का पोहोंचेल अशी तेथील हेडमास्तर व इतर शिक्षकांस भीति वाटूं लागली. एप्रिल महिन्यांत हायस्कूलचा वार्षिक रिपोर्ट जो त्या वेळचे आक्टिंग हेडमास्तर मि. वामन आबाजी मोडक यांनीं लिहिला, त्यांत हायस्कुलांतील मुलांची संख्या कमी झाली याबद्दल उल्लेख करितांना त्यांनीं लिहिलें कीं, " येथें कांहीं उनाड व हुच्चे तरुण लोकांनीं एक नवीन खाजगी शाळा काढल्यामुळें तूर्त ह्या शाळेंतील संख्या कमी झाली आहे; परंतु अशा शाळांची स्थिति केवळ कुत्र्याचे मुताच्या झाडांप्रमाणें क्षणिक असल्यामुळें आमच्या शाळेची संख्या नेहमींची कमी होण्याची फारशी भीति नाहीं." याप्रमाणें प्रतिपक्षीय शाळेविषयीं मि. मोडक यांनीं अगदीं अन्यायाचा व असमंजसपणाचा अभिप्राय ठोकून दिला होता; व त्याबद्दल त्या वेळीं कित्येक वर्तमानपत्रांतून बरीच टीकाहि झाली होती. वरील उनाड व हुच्चे (vagabond) हा अमोलिक किताब कोणास उद्देशून लिहिला आहे याचें अद्यापपर्यंत गूढच आहे. तो विष्णुशास्त्री यांस लागू पडतो किंवा मि. टिळक हे खाशी सरकारी नोकरी पटकावयाची सोडून खाजगी शाळेच्या भिकार खेळांत पडले म्हणून तो त्यांजवर लादावयाचा किंवा बाकी राहिलेले तिसरे गृहस्थ मि. नामजोशी—ज्यांच्या विलक्षण हुषारीनें व खटपटीनें सन १८९० सालीं पूना आर्ट एक्झिबिशन उभारलें जाऊन त्याबद्दल त्यांचें नांव नामदार रे साहेब गव्हरनर यांनीं प्रदर्शन उघडण्याच्या समारंभीं आपल्या भाषणांत प्रथमारंभीं घेऊन त्यांचे आभार मानले—त्या बिचाऱ्या गृहस्थाचे वांट्यास तो जातो हें कांहीं कळत नाहीं !

या सालच्या आगष्ट महिन्यांत न्यू इंग्लिश स्कुलास दुसरे एक चांगले विद्वान् व मेहनती असे शिक्षक येऊन मिळाले. हे रा. वामन शिवराम आपटे * हे होत. हे त्या वेळीं एम्. ए. झाले असून त्यांचा कॉलेजा-

* हे सद्गृहस्थ हा लेख लिहून संपल्यावर थोडेच दिवसांनीं ता. ४ आगस्ट १८९२ रोजीं वारले.

पासूनच चांगला नांवलौकिक असे. हे मूल्यवान शिक्षक न्यू इंग्लिश स्कूलच्या नशिबानें त्याच्या वांट्यास कसे आले याविषयीं विष्णुशास्त्री एकदां सांगत असतां ते म्हणाले, " ग्राज्युएट लोक या सुमारास पुष्कळ अधिक होऊन शाळाखात्यांत त्यांस पूर्वीप्रमाणें मोठ्या पगाराच्या व सोईच्या जागा मिळत नाहींशा झाल्यामुळें मि. आपटे हे कांहीं दिवस मिशन स्कूलमध्येंच होते. मि. चाटफील्ड हे त्यांस मधून मधून आक्टिंग जागा देत; परंतु त्या हंगामी, कमी पगाराच्या व शिवाय आज या जिल्ह्यांत तर उद्यां दुसऱ्याच जिल्ह्यांत अशा तऱ्हेच्या असल्यामुळें त्यांनीं त्या दोन तीन वेळां नारकल्या; व शेवटीं त्यांनीं मनाचा निश्चय करून ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले. इतक्यांत महिना पंधरा दिवसांत त्यांस मि. चाटफीट साहेब यांनीं बोलावून नेऊन त्यांस सांगितलें कीं, " मी तुम्हांस कल्याणास फर्स्ट असिस्टंटची जागा देतों. " त्यावर मि. आपटे यांनीं उत्तर दिलें, " ती मला आतां नको. मी नुकताच न्यू इंग्लिश स्कूलमध्यें राहिलों आहें. " यावरून मि. चाटफील्ड हे अंमळ रागावून म्हणाले, "मी प्रथम तुम्हांस–येथें जागा देऊं केली; ती तुम्हीं नाकारली. यानंतर–येथची जागा देऊं केली; परंतु तीहि तुमच्या मनास आली नाहीं. आतां कल्याणची जागा चांगली सोईची म्हणून मी तुम्हास देतों; परंतु तुम्ही आतां हीहि जर नाकाराल तर यापुढें निदान मी जोंपर्यंत शाळाखात्यावर मुख्य आहें तोंपर्यंत तुम्हांस या खात्यांत जागा मिळणार नाहीं ! "

मि. आपटे हे न्यू इंग्लिश स्कुलांत आल्यापासून त्या शाळेस विशेष टापटीप व व्यवस्था हीं आलीं. थोडक्याच दिवसांत न्यू इंग्लिश स्कूलमध्यें सुप्रिंटेंडेंटची नवीन जागा करून ती प्रथम यांस दिली; व ती यापुढें पाळीपाळीनें दर वर्षास एकेकास अशी मिळत असते. या वर्षभर उत्तम प्रकारची मेहनत शिक्षकांनीं केल्यामुळें सालअखेर मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेमध्यें १६ मुलांपैकीं १२ पास होऊन त्यांतील एकास जगन्नाथ शंकरशेटची पहिली स्कॉलरशिप मिळाली. यामुळें शाळेचें नांव हळुहळू पुढें निघायला लागून तिचा उत्कर्ष दिवसेंदिवस अधिकाधिकच होऊं लागला.

न्यू इंग्लिश स्कुलांत इंग्रजी बुकांचा बराच खप असल्यामुळें किताब-

कै० विष्णुशास्त्री चिपळुणकर व त्यांची स्नेही मंडळी.



उभी रांग–१ बा. वा. जोशी, २ दामोदरपंत दिवेकर, ३ शं. तु. शालीग्राम, ४ वि. त्रि. चिपळुणकर.
बसलेली रांग––१ त्रि. रि. जोशी, २ विष्णुशास्त्री, ३ बा. ग. जोशी.

खाना म्हणून बुधवारांत पुस्तकविक्रीचें जें नवीन दुकान विष्णुशास्त्री व शाळिग्राम यांनीं काढलें होतें, त्याची बरीच भरभराट होऊं लागली. तथापि शाळिग्राम यांचा आळस व अव्यवस्थित कारभार यामुळें ती जितकी एरवीं व्हावी तितकी होईना. शाळिग्राम मध्येंच पांच चार दिवसांच्या सवडीनें आपल्या गांवीं गेले म्हणजे त्यांस मागील कामाची फारशी शुद्धि नसे. यामुळें किताबखान्याच्या व चित्रशाळेच्या हिशेबांत व व्यवस्थेंत बराच गोंधळ होई. एकदां तर या वर्षाच्या आगस्ट महिन्यांत शाळिग्राम यांची स्वारी चार पांच दिवस मुंबईस जाऊन येतो म्हणून जी गेली ती परत न येतां किंवा पत्र वगैरे न पाठवितां आपल्या गांवीं जाऊन तेथेंच चार पांच महिने तळ देऊन राहिली ! इकडे विष्णुशास्त्री यांनीं त्यांची बरेच दिवस वाट पाहिली व मधून मधून त्यांस पत्रें पाठविलीं; परंतु शाळिग्राम यांचा ठिकाण नाहीं. इतक्या सुमाराम ठाणें येथील पंचांत त्यांस अनुलक्षून कांहीं वाईट प्रकारचा मजकूर छापून आला. शाळिग्राम हे चित्रशाळा व किताबखाना यांच्या हिशेबांची व व्यवस्थेची कांहीं समजूत करून न देतां आपल्या गांवीं जाऊन राहिल्या-मुळें विष्णुशास्त्री यांस पुष्कळ गैरसोई उत्पन्न झाल्या. यामुळें ते शाळिग्राम यांजवर बरेच रागावले. सरतेशेवटीं चार पांच महिन्यांनीं शाळिग्राम एकदांचे परत आल्यावर आपली चूक कबूल करणें तें एकीकडेस ठेवून ते विष्णुशास्त्री यांस उलट्या कांहीं तेढ्या गोष्टी सांगूं लागले. तेव्हां यापुढें शाळिग्राम यांजबरोबर केलेल्या भागी मोडल्यावांचून उपाय नाहीं असें विष्णुशास्त्री यांस वाटूं लागलें; व त्याप्रमाणें ते या कामाच्या उपक्रमास लागले; परंतु शाळिग्राम यांनीं त्याबद्दल फारशी घाई किंवा फिकीर न दाखवितां तें सर्व प्रकरण घोटाळ्यांत टाकून पुन्हा खुशाल आपल्या गांवीं निघून गेले !

इकडे विष्णुशास्त्री यांनीं शाळिग्राम हे प्रथमच गांवीं गेल्यापासून चित्रशाळेचे हिशेब वगैरे सर्व व्यवस्था रा. बाळकृष्णपंत यांजकडे सोंपविली होती व हें काम त्यांनीं योग्य रीतीनें बजावलें यांत संशय नाहीं. सरकारी नोकरीचें काम संभाळून सकाळीं व संध्याकाळीं घड्याळ

लावून तीन तीन तास ते काम करीत असत. प्रेसाचें काम संभाळून शिवाय हिशेब, पत्रव्यवहार वगैरे गोष्टींत त्यांची सर्व व्यवस्था नीट व ठाकठिकीची असे. त्यांच्या मधील दोष कायतो म्हटला म्हणजे कारखान्याच्या जिवाच्या मानानें खर्च ठेवणें हें त्यांस येत नसे हाच असे.

किताबखान्याची व्यवस्था शाळिग्राम यांच्या मागें विष्णुशास्त्री यांनीं रा. वासुदेव गणेश जोशी हल्लींचे चित्रशाळेचे म्यानेजर यांजकडे सोंपविली. या वेळीं या गृहस्थांचें वय अगदीं लहान म्हणजे विशींतच असून ते अग्रिकल्चरल् क्लासांत शिकत होते; परंतु विष्णुशास्त्री यांच्या सहवासानें यांच्या मनांत सरकारी नोकरीविषयीं अप्रीति व स्वतंत्र उद्योगां-विषयीं हौस हीं उत्पन्न झालीं असल्यामुळें त्यांनीं किताबखान्याचें हें नवीन काम मोठ्या उत्सुकतेनें पतकरलें. हे घरचे खाऊन पिऊन बरेच सुखी असल्यामुळें मला अमुक पगार द्या किंवा हिस्सा द्या वगैरे कांहीं एक न ठरवितां ते एकदम उद्योगास लागले. विष्णुशास्त्री यांच्या सहवासानें, त्यांच्या लेखांनीं व त्यांच्या स्वतःच्या उदाहरणानें ज्यांच्या अंगीं साहस, स्वतंत्र धंदा करण्याबद्दल आवड, व सतत व निस्सीमभावानें उद्योग करणें वगैरे गुण आले, त्यामध्यें रा. जोशी यांचा नंबर पहिलाच लागेल! बाळकृष्णपंत व वासुदेवराव यांच्या अंगचे गुण बहुतेक सारखेच होते; परंतु कारखान्याच्या जिवामाफक त्याचा खर्च ठेवतां न येणें म्हणून जो दोष पहिल्या गृहस्थाविषयीं सांगितला तो या दुसऱ्या गृहस्थामध्यें नव्हता, कदाचित दोष असलाच तर तो उलट दिशेचाच होता!

येणेंप्रमाणें दोन्ही कारखान्यांची अधिक चांगली व्यवस्था झाल्यामुळें ते दोन्हीही लवकरच चांगल्या स्थितीस येतील अशीं चिन्हें दिसूं लागलीं. चित्रशाळेंतून या वेळपर्यंत जीं चित्रें छापून निघत तीं बहुतेक प्रसिद्ध पुरुषांचींच असत. त्यांचा जितका खप व्हावा तितका होत नसे. या सालीं विष्णुशास्त्री यांस रा. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं असें सुचविलें कीं, " आपले लोकांत मनुष्यांच्या चित्रांची तादृश गोडी नाहीं; तुम्ही एकदां देवांची चित्रें काढून पहा; त्यांचा खप अतोनात होईल असें मला वाटतें."

यावरून या गोष्टीची प्रतीति पाहण्याकरितां म्हणून बाळकृष्णपंपत यांनीं भिवा सुतार नामक एका प्रसिद्ध चिताऱ्यानें श्रीमंत पंतप्रतिनिधि यांस रामपंचायतन नांवाचें एक उत्कृष्ट ऑईल पेंटिंग करून दिलें होतें, त्याचा फोटो आणवून मोठा करवून त्याची तजवीर छापून काढली. ही मोहक तजवीर बाहेर पडतांच रा. गोंधळेकर यांचें म्हणणें खरें ठरून तिजवर गिऱ्हाइकांच्या एकदम उड्यांवर उड्या पडल्या. महिन्या दीड महिन्यांतच २००० प्रती पार खपून जाऊन दुसऱ्या आवृत्तीची तयारी सुरू झाली! या तजबिरीच्या जलद खपानें गिऱ्हाईकांस कोणत्या तऱ्हेचा माल पाहिजे आहे हें सहजच कळून आलें. आणि मग लागलेंच रामपंचायतनाच्या मागोमाग शिवपंचायतन, गणपतिपंचायतन वगैरे देवादिकांच्या तजबिरी भराभर निघूं लागल्या; परंतु गिऱ्हाइकांची उडी फार असल्यामुळें तजबिरींची नेहमीं चणचणच राही!

निबंधमालेचा ह्या वर्षाचा मुख्य विषय 'लोकहितवादी' हा होय. या विषयावर एकंदर बारा अंक आहेत. यांत चालू शतकाच्या आरंभीं आपल्या महाराष्ट्र देशांत इंग्रजी अंमल व त्या बरोबरच इंग्रजी विद्या हीं सुरू होऊन नवीन सुशिक्षित मंडळींची जी पहिली पिढी झाली, तिच्या आपल्या ब्राह्मणवादशाहींतील वीरांविषयीं, मुत्सद्यांविषयीं, जुन्या पंडितांविषयीं, भिक्षुकांविषयीं, वगैरे ज्या विलक्षण अनादराच्या समजुती झाल्या व ज्यांचा प्रसार आपल्या देशोन्नतीस अत्यंत अनिष्टकारक आहे त्यांचें निरसन केलें आहे. लोकहितवादी या निबंधसमूहाचे कर्ते कै० गोपाळराव हरि देशमुख हे वरील नवीन विद्वान् लोकांच्या पहिल्या पिढींतील प्रमुख होत यांत संशय नाहीं. यांचे बरोबरीचे जे दुसरे विद्वान् लोक होऊन गेलें त्यांनीं आपले विचार यांच्याप्रमाणें लेखद्वारा प्रसिद्ध न केल्यामुळें त्यांचीहि मतें रावबहादुराप्रमाणेंच होतीं की काय हें समजण्यास आज प्रत्यक्ष मार्ग राहिला नाहीं. तथापि वरील मंडळींतील कित्येक प्रमुख मंडळींचीं मतें कांहीं भाषण-प्रसंगीं ज्यांच्या ऐकण्यांत आलीं असतील त्यांस तीं लोकहितवादीप्रमाणेंच पुष्कळ अंशीं होतीं हें ठाऊकच असेल. तेव्हां लोकहितवादी यांनीं प्रसिद्ध केलेलीं मतें हीं केवळ रावबहादूर देशमूख यांचींच व्यक्तिमात्र नसून तीं

त्या वेळच्या सुशिक्षित लोकांच्या वर्गाची होती. रावबहादुरांसारखे प्राचीन विद्येंत गति नसून ज्यांस केवळ इंग्रजी विद्येचाच थोडाबहुत संस्कार झाला होता अशा लोकांचीच केवळ वर सांगितल्याप्रमाणें मतें होतीं असें नाहीं; तर विष्णुशास्त्री यांचे वडील कृष्णशास्त्री ज्यांनीं पूर्ववयांत बऱ्याच शास्त्रांचा चांगला अभ्यास केला होता, त्यांच्या सुद्धां आपल्या जुन्या विद्येविषयींच्या समजुती रावबहादुरांच्यापेक्षां फार वेगळ्या होत्या असें नाहीं. शास्त्रीबुवांविषयीं असें आम्हांस ठाऊक आहे कीं, त्यांनीं एकदां इंग्रजीचा अभ्यास सुरू केल्यापासून त्यांच्या हयातीच्या अखेरपर्यंत ज्या कित्येक शास्त्रांमधील प्रवीणतेबद्दल त्यांचा एवढा नांवलौकिक होता त्यांचें त्यांनीं पुन्हां मुखावलोकन सुद्धां केलें नाहीं ! संस्कृत काव्यग्रंथांविषयीं मात्र त्यांस आवड असे व त्यांपैकीं कांहींकांचीं त्यांनीं चांगलीं रसाळ भाषांतरेंहि केलीं आहेत; परंतु इतर विषयांची गोष्ट निघाली असतां त्यांची त्यांबद्दलची अनादर-बुद्धिच दृष्टीस पडे. सर्व भर काय तो इंग्रजी विद्येवर असावयाचा !

येणेंप्रमाणें ज्यांना जुन्या आर्यविद्येचें यथार्थ ज्ञान असण्याचा मार्ग होता त्यांची व ज्यांस तो नव्हता त्यांची अशा दोहोंचीहि स्थिति अव्वल इंग्रजींत सारखीच होती. ज्या लोकांच्या पराक्रमानें व राजकारणानें सर्व हिंदुस्थानदेश या समुद्रापासून त्या समुद्रापर्यंत अल्प काळांत जिंकला गेला, ज्यांनीं पेंढारी,, भिल्ल, ठग वगैरे बखेडेखोर लोकांच्या टोळ्यांचा समूळ उच्छेद करून सर्व देशभर स्वस्थता व अबादानी पसरून दिली, ज्यांचें कलाकौशल्य आगगाड्या, तारायंत्रें, विद्युद्दीप वगैरे अनेक अद्भूत गोष्टींच्या द्वारें प्रकट होऊन त्यानें कादंबरींतून वर्णिलेल्या अद्भुत चमत्कारांसहि मागें हटविलें. त्यांच्या तेजानें आमचे पहिले विद्वान् लोक दिपून गेले असतील यांत नवल नाहीं ! त्यांस इंग्लिश लोकांचें जें थोडेंबहुत ज्ञान प्राप्त झालें होतें तें सर्व त्यांच्या चांगल्या गुणांचेंच झालें होतें; अधिक परिचय होऊन त्यांमधिल वाईट गुण अझून दृष्टीस पडूं लागले नव्हते. यामुळें आपले लोक इंग्लिश लोकांच्या मानानें कसले पासंगास सुद्धां पुरावयाचे नाहींत; आपला देश काय, आपलें जुनें राजकारण

काय, आपल्या जुन्या विद्या काय, धर्म काय, धर्माधिकारी भिक्षुक काय, कांहींहि घेतलें तरी तें सर्व इंग्लिश लोकाचें शहाणपण, त्यांचा पराक्रम, त्यांची विद्या यापुढें सर्वथैव तुच्छ होय, असें प्रथम आपल्या लोकांस विशेषेंकरून जे इंग्रजी विद्येचें अध्ययन करून मोठमोठ्या हुद्यांवर चढले त्यांस सहजच वाटूं लागलें व त्यांपैकीं प्रमुख जे रावबहादुर ते नवीनच या देशांत सुरू झालेलीं जीं वर्तमानपत्रें त्यांतून आपलीं मतें प्रसार करूं लागले.

येणेंप्रमाणें या नवीन लोकमताची कमान चढत जाऊन तिनें ब्राह्मण-बादशाई, तींतील वीरांचें शौर्य, मुत्सद्यांचें शहाणपण, पंडितांचें ज्ञान, भिक्षुकांचा धर्माधिकार या सर्वांस रसातळाला नेऊन इंग्लिश लोकांची हरएक गोष्ट लोकमान्यतेच्या शिखरावर नेऊन बसविली; परंतु हळुहळू आमच्या लोकांस राज्यकर्ते लोकांचा जसजसा अधिकाधिक परिचय होत चालला तसतसें त्यांतील कमीजास्त दोषहि त्यांच्या दृष्टीस पडूं लागले. त्याचप्रमाणें संस्कृत विद्यांचाहि इंग्रजी तऱ्हेनें अभ्यास सुरू झाल्यामुळें आपल्या जुन्या विद्यांविषयीं कोलब्रुक, स्लेजेल, विलसन, मॅक्समुलर वगैरे युरोपियन पंडितहि विलक्षण आदरबुद्धि वागवितात, व त्या विद्यांचा आपल्या होतकरू विद्वान् लोकांनीं आस्थेनें अभ्यास करावा म्हणून ते मोठे कळकळीनें शिफारस करितात, हें जसजसें दुसऱ्या पिढींतील विद्वानांस समजूं लागलें तसतसें आमचे वडील जें इतके दिवस सांगत आले व लिहीत आले तें सर्वथैव खरें नाहीं असें त्यांस वाटूं लागलें. पुढें हाच क्रम बळावत जाऊन लोकमतानें उलट खाऊन त्याच्या ओहो-टीस आरंभ झाला आणि यामागें इंग्लिश लोकांचें महत्त्व जें मागील पिढीनें शिखरास चढविलें होतें तेंच आतां या नवीन पिढीनें हळुहळू खालीं आणून त्याच मानानें ब्राह्मणबादशाईचें तळीं जाऊन बसलेलें जहाज वर चढूं लागलें. ही उलट दिशेची चळवळ अझून संपली नसून ती मोठ्या जोरानें चालू आहे व ती अझून किती दिवस चालेल व तिचे परिणाम कोठपर्यंत जातील हें आज सांगणें कठिण आहे!

येणेंप्रमाणें लोकमताचे दोन हेलकावे जे साधारण आमच्या देखत झाले

त्यांची हकीकत आहे. पहिल्या चळवळींत जसे रावबहादुर यांस प्रमुख म्हणून धरितां येईल तसें दुसऱ्यांत विष्णुशास्त्री हे प्रमुख होत असें धरिलें असतां चालेल. आतां अमुकच तऱ्हेचीं मतें अमुक गृहस्थांचीं होतीं म्हणूनच ते शहाणे किंवा वेडे हें समजणें असमंजसपणा आहे. रावबहादुर यांच्या काळामध्यें आणि विष्णुशास्त्री यांच्या काळामध्यें एका पिढीचें म्हणजे सुमारें ३० वर्षांचें अंतर आहे. इतक्या काळांत आपल्या लोकांचें ज्ञान आपल्या स्वतःच्या संबंधानें युरोपियन लोकांच्या संबंधानें व हरएक गोष्टीच्या संबंधानें पुष्कळच वाढलें आहे यांत संशय नाहीं. तेव्हां पहिल्या पिढीचे समज अर्थातच दुसरीच्या अधिक ज्ञानाच्या मानानें पुष्कळ चुकीचे ठरण्याचा संभव आहे; परंतु तेवढ्यावरून पहिली मंडळी वेडगळ किंवा कमी बुद्धिमान् होती असें लेखणें अगदीं बरोबर होणार नाहीं. मनुष्यमात्राचें ज्ञान पिढीनपिढी कमीजास्त प्रमाणानें एकंदरींत वाढत जात आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. तेव्हां लोकहितवादी यांच्या निबंधांत कित्येक मतें जीं आपणास हल्लीं अगदीं वेडगळ व खोटीं अशीं वाटतात तीं ग्रथित केलीं आहेत, म्हणून त्यांचे ग्रंथ सर्वथैव त्याज्य आहेत व त्यांजवर विष्णुशास्त्री यांनीं टीकाहि करायाची नव्हती असें म्हणणें सयुक्तिक होणार नाहीं. कारण पिढीनपिढी कमी जास्त मतांतर तर होत जाणारच; तेव्हां मागील पिढींतील प्रमुख लोकांचीं निरनिराळ्या विषयांसंबंधीं मतें—मग तीं कितीहि असमंजस असलीं तरी तीं—आपणास व आपल्या पुढील होणाऱ्या लोकांस माहिती नसावीं असें ज्यांस इतिहासाचें खरें महत्त्व ठाऊक आहे त्यांस कधींहि वाटणार नाहीं. रावबहादूर व त्यांच्या बरोबरीचे लोक यांचीं जीं मतें होतीं त्यांत त्यांचा स्वतःचा कांहीं दोष नसून तो केवळ त्या काळाचा व स्थितीचा परिणाम होय. प्रस्तुत निबंधांत विष्णुशास्त्री यांनीं जरी रावबहादुर यांच्यावर बराच कडाखा उडविला आहे, तरी तो व्यक्तिमात्र नसून तत्कालीन एकंदर विद्वान् वर्गासच उद्देशून आहे; व लोकहितवादीच्या मतांचा प्रसार जो विष्णुशास्त्री यांच्या वेळीं विद्वान् लोकांत बराच होता तो कमी व्हावा म्हणून त्यांनीं त्या मतांचें निरसन करण्याकरितां हा विषय हातीं घेतला.

हल्लींहि जरी तीं मतें कमी झालीं आहेत तरी त्यांतील कित्येक चांगलीं विचार करण्यासारखीं असल्यामुळें त्यांजबद्दल विवेचन जें विष्णुशास्त्री यांनीं प्रस्तुत निबंधांत केलें आहे तें आमच्या होतकरू विद्वान् मंडळींनीं अवश्य वाचण्यासारखें आहे.

लोकहितवादीचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, ब्राह्मण लोकांच्या हातीं एका काळीं राज्यच्छत्र, विद्या व धर्माधिकार ह्या तिन्ही गोष्टी आल्या असतांहि त्यांस त्यांचा चांगलासा उपयोग करतां आला नाहीं. हें त्यांचें मत दर्शविण्याकरितां विष्णुशास्त्री यांनीं त्यांच्या ग्रंथांतून तीन मासले-वाईक पत्रें दाखल केलीं आहेत—एक ' नाना फडणवीस यांचें शहाणपण, ' दुसरें ' सांप्रतचें पंडितांचें ज्ञान, ' व तिसरें ' भटांनीं लावून दिलेलें वेड. ' यांपैकीं पहिलें पत्र जो कोणी हल्लीं वाचून पाहील त्यास ४० वर्षांमागें तीनशें चारशें रुपये पगाराच्या एका मोठ्या हुद्यावर असलेल्या व त्या वेळीं मोठ्या नांवाजलेल्या एका विद्वानानें तें लिहिलें आहे असें ऐकून त्यांतील शुष्कपणा, पोरकटपणा व असमंजसपणा पाहून त्या वेळच्या विद्वत्तेची व सरकारच्या कामगार नेमण्याच्या शहाणपणाबद्दलची भलतीच कल्पना होण्याचा संभव आहे; परंतु रावबहादूर यांचीं इतर विषयांवरील भाषणें व लेख ज्यांनीं वाचले असतील त्यांस वरील पत्र-लेखन हें त्यांचे बुद्धिमत्तेचें दर्शक नसून तें केवळ त्यांच्या काळाचें व स्थितीचें दर्शक होय असें दिसून येईल. सवाई माधवराव पेशवे यांच्या जन्माच्या आधींपासून ज्या ब्राह्मण मुत्सद्यानें केवळ आपल्या अकलेच्याच जोरावर सुमारें वीस वर्षें मराठी राज्य चालवून त्यास थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीतील भरभराटीस आणून पोंचविलें त्याजवर राव-बहादुरांनीं अनेक अप्रयोजक आक्षेपांचा वर्षाव करून त्याजविषयीं शेवटीं " तो जर आतां असता तर त्याजला लोक वेडा म्हणूं लागते व तो पळूनहि जाता यांत संशय नाहीं, " असें म्हणून त्यांनीं आपल्या अकलेची व लोकहितेच्छेची कमाल केली! या आक्षेपास उत्तर देतांना विष्णुशास्त्री यांनीं ग्रांटडफ् यांच्या इतिहासांतून दोन व एशियाटिक अॅन्यूअल रजिस्टर

मधून एक असे तीन उतारे दिले आहेत; त्यावरूनच वरील वादाचा निकाल होण्यासारखा आहे.

यानंतर लोकहितवादी यांचें दुसरें पत्र—सांप्रतच्या पंडितांचें ज्ञान—हें जरी पहिल्याप्रमाणें प्रथमदर्शनींच अप्रयोजक असें दिसण्यासारखें नाहीं तरी त्यांतील जुनीं शास्त्रें, काव्यें वगैरेंविषयीं जो मजकूर आहे तो आपल्या लोकांस रुचण्यासारखा नाहीं; व त्यांतून तो अगदीं असत्य असल्यामुळें तर तो त्यांस अतिशय तिटकारा येण्यासारखा आहे. हा वाचल्यानें आपल्या शिक्षणपद्धतींत संस्कृताचा थोडा बहुत तरी अभ्यास ठेवणें किती अवश्य आहे हें दिसून येण्यासारखें आहे. रावबहादूर यांच्या वेळीं व त्यापुढें कांहीं काळपर्यंत फक्त इंग्रजीचाच अभ्यास आपल्या लोकांत चालू असल्यामुळें आपल्या जुन्या विद्येविषयीं त्यांच्याप्रमाणेंच भ्रांतिमूलक समज आपल्या लोकांत उत्पन्न झाले यांत आश्चर्य नाहीं. ज्या ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनानें युरोपांतील हल्लींची सुधारणा दृष्टीस पडत आहे, जिचा प्रताप येवढा कीं, तिच्या अध्ययनानें बेकन, ग्यालिलिओ, प्यासकल वगैरेंसारखे तत्त्ववेत्ते झाले, सरव्हांटीज, शेक्सपियर, मिल्टन यांच्या कवित्वास उत्कृष्ट तऱ्हेचें उज्ज्वलन मिळालें व पिट, बर्क यांच्या वक्तृत्वास उत्तम स्फूर्ति आली, त्या विद्येविषयीं युरोपांत किती आदरबुद्धि आहे व तिचें अध्ययनहि हल्लीं चोहोंकडे मोठमोठ्या युनिव्हर्सिटींतून विद्वान् लोक केवढ्या प्रीतीनें करितात! तेव्हां तिजपेक्षां पुष्कळ अधिक योग्यतेची जी आपली आर्यविद्या तिजविषयीं केवळ अज्ञानानें भलतें भलतें बोलणें व लिहिणें हा केवळ पोरकटपणा आहे. ग्रीक विद्येविषयीं लिहितांना मेकॉले साहेबांचा लेख जो निबंधमालेच्या ७० व्या अंकांत टिपेंत दिला आहे तो वाचीत असतां त्यांतील प्रत्येक शब्दानें अंग थरारून जातें व लिहिणाऱ्या साहेबांच्याप्रमाणें प्रेमाश्रूंनीं नेत्र पदोपदीं भरून येतात आणि हा एवढा पान्हा शेंकडो वर्षांमागें होऊन गेलेल्या एका दूरस्थ लोकांविषयीं एका इंग्लिश ग्रंथकाराच्या व त्याचप्रमाणें त्यांच्या हिंदु वाचकांच्या ठिकाणीं—ज्यांचा त्यांच्याशीं कांहींएक संबंध नाहीं अशांच्या ठिकाणीं—उद्भवतो, तर ज्या आर्य लोकांचे आपण प्रत्यक्ष वंशज, त्यांच्या फार अधिक

योग्यतेच्या विद्यांविषयीं—ज्यांनीं स्लेजेल, कोलब्रुक, वुइलसन, मॅक्समुलर वगैरे परदेशीय, व परधर्मीय लोकांसहि वेडे करून सोडले—त्यांविषयीं आपल्या वृत्ति किती प्रेमळ व किती आदराच्या सहजच व्हाव्या हें कोणीहि सांगू शकेल ! परंतु आमच्या पहिल्या पहिल्या इंग्रजी शिकलेल्या लोकांस त्यांची किंमत मुळींच न होऊन ते मेकाले, मिल्ल वगैरे दुराग्रही व तज्ज्ञ नसणाऱ्या ग्रंथकारांच्या लेखांवर गेल्यानें त्यांची त्यांच्या हातून अत्यंत अवहेलना झाली ही मोठी शोचनीय गोष्ट खरी !

रावबहादुर यांनीं प्राचीन आर्य विद्यांची कवडीमोल किंमत जी केली त्याचें कारण हें कीं, ' ती जिवास, शरीरास, किंवा प्रपंचास कांहींच उपयोगी पडत नाहीं. ' रावबहादुरांच्या या विवेचनास बहुतेक मेकॉले-साहेबांच्या बेकनवरील निबंधांतील ग्रीक लोकांचें तत्त्वज्ञानसंबंधाचें पांडित्य आधारभूत असेलसें वाटतें. तें वाचूनहि पुष्कळांच्या कल्पना रावबहदुरांप्रमाणें होण्यासारख्या आहेत. या मुद्याचें खडण विष्णुशास्त्री करीत असतां ते लिहितातः—

' लोकहितवादी ' चा व्यवहारोपयुक्ततेचा सिद्धांत अंगीकारला तर आज विद्यादेवीचे किती मुलूख ओसाड पडणार आहेत ? मोठमोठ्या दुर्बीणीवर आरूढ होऊन अंतराळांतील दूरदूरच्या प्रदेशांत डोकावून येणारे ज्योतिषी, पृथ्वीच्या पोटांत शिरून कोसकोस खोल जाणारे भूगर्भवेत्ते, नीलनदीचा उगम हुडकून काढणारे, ध्रुवप्रदेशांतील गोठलेल्या समुद्रांत जाणारे, आफ्रिकेच्या मध्यभागांत घुसणारे, मुंग्यांच्या व मधमाशांच्या प्रजासत्तात्मक राज्याविषयीं शोध करणारे, हजारों वर्षांपूर्वीचे सांगाडे गोळा करून ब्रह्मदेवाच्या अव्वल कारकीर्दीतील प्रजेची स्थिति कशी होती याचा तल्लास लावणारे, वगैरे शेंकडों वेड्यापिरांची काय अवस्था होईल ? त्यांतून हीहि लहान चमत्काराची गोष्ट नव्हे काय कीं, आमच्या रावबहादुरांच्या मताप्रमाणें शहाण्यांतलें शहाणें जें इंग्रजसरकार तेंहि वरील खुळास सर्वथा अनुकूलच आहे. लाखों रुपयांचा खर्च ठेवून वरील खुळें विलायतसरकारनें उराशीं बाळगिलीं आहेत व येथेंहि वरील प्रकार दृष्टीस पडत नाहींसा नाहीं. तशीच दुसरीहि मोठी गोष्ट लक्षांत आणण्यासारखी आहे कीं, जगाच्या आरंभापासून प्रस्तुत ग्रंथकाराच्या महत्‌तत्त्वाचीच जर प्रवृत्ति असती, तर

आजला चोहोंकडे काय स्थिति दृष्टीस पडली असती बरें! जगानें वेडे ठरविलेल्या मंडळीनें विद्यादेवतेची केवळ निरपेक्ष व निष्काम बुद्धीनें जर हजारों वर्षें उपासना चालविली नसती, तर आजपर्यंत जगांत कितीसें ज्ञान सांठलें असतें! सरकारानें आपला खर्च देऊन श्वेतद्विपीची महायात्रा करविण्याचा कपिल षष्ठीचा योग आणला असतां आपलें जन्मभर केललें पांडित्य चटदिशीं गुंडाळून ठेवून रावबहादुरांनीं मुखास्थानें माघारी पाय घेतला या कृतींत[1] आणि वर्षानुवर्षें मनांत सांठविलेला संकल्प सिद्ध होण्याचा समय आला असतां तीन डाकलग जहजांनिशी कोलंबसानें पृथ्वीसीमाभूत मानलेल्या महासागरावर धाड घातली या कृतींत किती जमीनअस्मानची तफावत; तर विद्येचा खरा भक्त म्हटला म्हणजे तिजपासून आपणांस कांहीं लाभ होईल कीं नाहीं, ही कल्पनाहि त्याच्या मनांत येत नसते; केवळ ज्ञानजन्य जें सुख त्याचीच तो पर्वा करीत असतो. प्रणयी पुरुषाचें मन प्रेमविषयक स्त्रीवर लुब्ध होऊन पडलेलें असतें. तें जसें तिच्या वस्त्राभरणाविषयीं किंवा तिजकडून घडणाऱ्या सेवेविषयीं निरपेक्ष असून केवळ तिच्या समागमाविषयींच आतुर असतें, तशीच गोष्ट खऱ्या विद्याविलासी पुरुषांची होय![2]

---

१ विविधज्ञानविस्तार' पु० ११, अंक १०, पृष्टें २३५—६ पहा.

2 "What is the use of logic ?–I answer, that knowledge itself is a use that all legitimate inquiry rewards itself with its own plea ures. The appetite for finding out laws from facts, causes from effects, necessary truth from fleeting occurrence of the day, puts in its claim to gratification, which is as legitimate, if less imperious, as that of the animal nature for food and sleep. The studies which enwrapt the soul of Josep Scaliger during the massacre of Saint Bartholomews, must have been source of pleasure pure and high, from which they had a right to draw. If the question, what "fruit" does it bring ?–which the Baconian philosophy puts so often--be understood, as it certainly. ought not, to refer only to the *naterial* wants and

(पुढें चालू)

त्याच प्रमाणें:—

प्रस्तुत लेखांत आमच्या रावबहादुरांनीं एकंदर शास्त्रविद्येवर जो भडिमार केला आहे त्याचें सार पुढील वाक्यांत आहे:—" ही विद्या कांहीं उपयोगीं नाहीं. " हें लहानसें वाक्य नमूद करतांना प्रस्तुत ग्रंथकारानें कितीसा विचार केला असेल बरें ! ' उपयोगी ' म्हणजे काय ? उपयोगित्वाची काय व्याख्या करावयाची ? ' जिवास, शरीरास, प्रपंचास ' जें अवश्य लागेल तें उपयोगीं हा जर सिद्धांत स्वीकारला, तर साऱ्या जगांत दोन विद्या मोठ्या उपयोगाच्या दिसतात. एक नांगऱ्याची व दुसरी रोटीवाल्याची. अन्नावांचून जीव जगत नाहीं यास्तव धान्य जमिनींतून उत्पन्न केलें पाहिजे. व कच्चें धान्य मनुष्यास पचत नाहीं म्हणून त्यास अग्निसंस्कार करून तें भक्षणीय केलें पाहिजे. या व्यतिरिक्त इतर ज्या हजारों विद्या व कला सर्व सुधारलेल्या देशांतून चालू आहेत त्या सर्व निरुपयोगीच म्हटल्या पाहिजेत. उदाहरणार्थ बागाईत व गायनकला घ्या. ' लोकहितवादी ' च्या शिष्यास मोठ्या नंदनवनांत नेलें तरी तो भोंवतालचा सर्व देखावा पाहून म्हणणार' " काय हो, काय हा धनाचा अपव्यय ! हीं शेंकडों तऱ्हेचीं तुम्हीं फुलझाडें लावलीं आहेत यांच्यापासून उपयोग तो कोणता ? या संगमरवरी दगडांच्या वाटा तुम्हीं केल्या आहेत व चंदनाचे मंडप उभे केले आहेत, हा तुमचा कोण मूर्खपणा ! या बागेचा धनी महामूर्ख आहे असें मी समजतों. या फुलांपासून, फळांपासून व कुंजांपासून अमुक अमुक उपयोग आहे असें मला कोणी दाखवून द्यावें म्हणजे मी खरें म्हणेन. माझी येथें सत्ता असती, तर मी या साऱ्या बगीच्यावर गाढवांचा नांगर फिरविला असता, व एक खास

---

comforts of humanity, it is a base, sordid, and stupid question, against which every better mind indignantly protests. Science was never brought to its present height by hopes of wealth, plenty, and comfort alone, but chiefly by those *mirabiles amores* with which she can inspire her followers. He who loves to see the processes of his mind reduced to their laws and causes, to him are logical studies a pleasure—to him they bring fruit.

भटारखाना येथें उठवून दिला असता ! " गायनकलेच्या संबंधानेंहि वरील राज-श्रींच्या तोंडून वरच्यासारखेंच पांडित्य निघायाचें. मोठ्या तानसेनाच्या आवाज-दारीपेक्षां जात्याचा घर्घर शब्द त्यांच्या कानास अधिक गोड लागेल; कां कीं, पहिला स्वर केवळ निष्फळ असून दुसरा मात्र चपातीच्या रूपानें फलद्रूप होणार आहे. तर ' जीव, शरीर व प्रपंच ' यांचा जर अगदीं मूळचा अर्थ घेतला, तर चपातीवाल्याची पायरी तानसेनाच्या वरची होणार हें उघड आहे. ' जीव ' व ' शरीर ' शब्दांत जर इंद्रियगणाचाहि. अंतर्भाव केला, तर बरीक बगीच्या व गायन हीं केवळ निरुपयोगी ठरणार नाहींत; कां तर, पहिल्यानें चक्षुरिंद्रियाची व दुसऱ्याच्या योगानें श्रोत्रेंद्रियाची तृप्ति आहे. पण ही मीमांसा एकदां सुरू झाली म्हणजे ती कोठपर्यंत जाऊन थडकेल याचा नियम नाहीं. शरीरनिर्वाहा-पासून इंद्रियतृप्तीपर्यंत एकदां मजल येऊन पोंचली, कीं लागलीच पुढें 'उपयोगी' या विशेषणाच्या अर्थांत शिवडमरूंतून प्रकट झालेलीं चवदा सुत्रें, 'अवच्छे-दकावच्छिन्ना ' ची गर्दी, ' घटपटाची लटपट ' व एकंदर ' पुरंदरचें बंड ' हीं येऊन घुसलींच समजायाचीं ! कारण मनुष्य हा चिदंश व जडांश या दोहोंचा संयोग होय; चिदंश म्हणजे मन व जडांश म्हणजे शरीर. मग एका अंशाला जेणेंकरून सुख होतें तो पदार्थ जर उपयोगी समजावयाचा, तर निदान तितक्याच मानानें दुसरा अंश जें मन त्यास आनंद देणाऱ्या वस्तुहि उपयोगीच मानल्या पाहिजेत हें उघड आहे. चपातीनें भूक निवते म्हणून ती जर उपयोगी, व गाण्यानें कर्णेंद्रियाचें समाधान होतें म्हणून तेंहि जर उपयोगी, तर बिचारें पाणिनीयच कशानें निरुपयोगी झालें ? पाणिनीयाचें अध्ययन करणारास त्यापासूनहि आल्हाद होतो. आमच्या रावबहादुरांसारख्या महापंडितांस " अंतीं ' च ' असला काय, आणि ' चा ' असला काय ' त्याची कांहींच क्षिति नाहीं हें उघड आहे; पण त्यांच्या अभिप्रायावरून जर मुनित्रयाची किंमत करावयाची, तर एकाद्या नांगऱ्याच्या हातून तानसेनाला सर्टिफिकीट पोंचविलें पाहिजे !

वरील प्रतिपादन वाचून मेकॉले साहेबांनीं बेकन याच्या नवीन तत्त्व-ज्ञानपद्धतीचा पक्ष उचलून जुन्या तत्त्वज्ञानपद्धतीवर जी गर्दी करून दिली आहे ती यथार्थ आहे, असें म्हणण्यास बराच विचार पडणार आहे; व त्याचप्रमाणें तिचा आधार घेऊन तीच कोटी आमच्या इकडील प्राच्य

तत्वज्ञानास लागू करण्यांतहि किती समंजसपणा आहे हेंहि करून येण्यासारखें आहे.

आतां लोकहितवादी यांचें तिसरें पत्र–भटांनीं लावून दिलेलें वेड– याविषयीं विचार करतांना रावबहादुरांनीं भिक्षुकांवर जे नाहींत ते दोष लादले आहेत त्यांचें निरसन विष्णुशास्त्री यांनीं मोठ्या समर्पक रीतीनें ७३ व्या अंकांत केलें आहे. भिक्षुकांचें मूळ कर्तव्य कीं, त्यांनीं वेदग्रंथांचें पठन करून त्यांचें रक्षण करावें, तें त्यांनीं उत्तम तऱ्हेनें बजाविलें असतां लोकहितवादी हे त्यांजवर आक्षेप आणतात कीं, भिक्षुक हे वेदग्रंथांतील अर्थ समजून घेण्याची खटपट न करितां ते केवळ तोंडपाठ मात्र करितात, तेव्हां ते महामूर्ख होत. या मुद्याचें खंडण करीत असतां विष्णुशास्त्री लिहितात:—

प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आणखी असाहि एक विचार सहज मनांत येण्यासारखा आहे कीं, जेव्हां कोणत्याहि राष्ट्राचा जम बसून त्याची सर्व प्रकारची व्यवस्था लागते, तेव्हां चोहोंकडे श्रमविभाग म्हणून जो अर्थशास्त्रांत सांगितला आहे तो सुरू होतो. कोणत्याहि देशांत पाहिलें असतां गृहस्थ व भिक्षुक हे दोन वर्ग अगदीं निरनिराळे झालेले आढळतात; पहिल्याकडे सारा ऐहिक व्यवहार सोंपविलेला असतो, व दुसऱ्याकडे साऱ्या पारमार्थिक प्रकरणाचा म्हणजे धर्मखात्याचा हवाला दिलेला असतो. वरील श्रमविभाग एकदां ठरून गेला म्हणजे मग त्याच्या मर्यादा अगदीं नियमित होऊन जातात. तर याप्रमाणें पाहतां आमच्या देशांतील भटांकडे अखिल वेदराशीचें पठनद्वारा रक्षण, यज्ञयागादिक अनुष्ठानें, नित्यनैमित्तिक विधि लोकांकडून करविणें, हीं कामें आज हजारों वर्षें सोंपवून दिलेलीं आहेत. मग हा सोंपवून दिलेला कार्यभाग जर त्यांनीं आजपर्यंत चांगल्या रीतीनें संभाळलेला आहे तर त्या व्यतिरिक्त इतर गोष्टींचें ज्ञान त्यांस नाहीं म्हणून त्यांच्यावर प्रहार करणें हा केवढा अन्याय होय ! येथील सरकारी तिजोरीवर संगिनीची बंदूक खांद्यावर टाकून पाहारा करणाऱ्या एखाद्या हैलंडर बाळाला जर आमच्यापैकीं एखादे फांकडे विद्वान् म्हणूं लागले कीं, ' कायरे, तूं घाण्याच्या बैलासारखा आपली रेखलेली मर्यादा न सोडतां नुसता इकडून तिकडे हिंडतोस; व तुझें कसब म्हटलें तर काय, संगिनीनें भोंसकायाचें किंवा

बंदुकीचा चाप दाबून कोणावर गोळी घालायाची, येवढेंच. तुला या खजिन्यांत कितीं पैसा आहे, त्याची काय व्यवस्था करतात वगैरे कांहीं माहीत आहे काय? सराफांचा कांटा, कारकुनाची लेखणी, हीं तुझ्या हातांत देऊन कांहीं फळ आहे? तूं बेट्या नुसता टोणगा, तुझ्या वेळाचा दुसऱ्यांनीं उपयोग करून घ्यावा तेवढाच: तुझा तुला कांहीं नाहीं!' इत्यादि पांडित्य जर एखादे कागदी जवान वरील श्वेतद्वीपस्थापुढें करायाला लागले, तर त्यनें काय उत्तर करावें बरें? त्यानें वरील कोटिक्रमास एका शब्दानेंहि उत्तर न करतां जातां जातां वरील राजश्रींच्या कानशिलावर बंदुकीचा दस्ता चांगला पाहून दिला तर त्याला देवाच्या घरचा बोल आहे काय? तर वरच्या सारखेंच जबरदस्त उत्तर आजपर्यंत जी टारगी मंडळी भटांस 'बैल' म्हणणारी निघाली आहे त्यांसहि खरोखर पाहतां पाहिजे. पण हें व्हावें कसें? बिचारे बुधवारी पंचा लावणारे व भांग्या मारुतीच्या आश्रयानें राहणारे आमचे भिक्षुक कोणीकडे, आणि बुट स्टॉकिंग चढवलेले आधुनिक रावसाहेब, रावबहादूर, नामदार ही राजदरबारी मंडळी कोणीकडे? आमची तिसऱ्या बुकांतील म्हण सर्वांच्या तोंडीं आहेच, कीं 'कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी!' तेव्हां अशा स्थितींत आजपर्यंत आमच्या देशांतील सर्व वेदमूर्ति 'लोकहितवादी' प्रभृति अर्वाचीन पंडित मंडळीच्या हातून होणारी पुष्पवृष्टि सतत सेवीत मुकाट्यानें राहिले यांत कांहीं आश्चर्य नाहीं!

येणेंप्रमाणें लोकहितवादी यांचे मुख्य तीन मुद्दे—ब्राह्मण मुत्सद्यांचें वेडेपण, ब्राह्मण पंडितांची निरुपयोगी विद्या व ब्राह्मण धर्माधिकाऱ्यांचें अज्ञान–यांच्या खंडनाबद्दल झालें. यानंतर लोकहितवादीप्रभृति मंडळींच्या भाषणांपासून व लेखांपासून कोणकोणते अनिष्ट परिणाम झाले व होत आहेत व म्हणून त्यांच्या मतांचें खंडन करणें किती अवश्य आहे हें दर्शवीत होत्साते विष्णुशास्त्री लिहितात:—

३. तर 'लोकहितवादीं'च्या मतांवर आम्हीं जी इतकी चरचरीत टीका केली ती येवढ्याकरतां कीं, त्यांच्या या देशाच्या संबंधानें ज्या समजुती आज चाळीस वर्षें होऊन बसल्या आहेत, व ज्यांचा आज इतके दिवस लेखनद्वारा व वाग्द्वारा ते प्रसार करीत आहेत त्या अगदीं चुकीच्या व अनर्थकारक आहेत;

त्यांच्यापासून आजतागाईत देखील थोडा अनर्थ झाला आहे असें नाहीं. मनांतील विचार सर्व क्रियांचे मूळ होत; मग तेच जर बिघडलेले असले तर हातून घडणारा उद्योग तरी कोठून धड होणार ? लहानपणापासून पोरांस जर दोन महातत्त्वें शिकवून ठेविलीं, कीं तुमच्या वाडवडिलांनीं आजपर्यंत जें जें म्हणून करून ठेवलें आहे तें तें सारें निवळ गाढवपणाचें आहे व देवबापानें हल्लीं जे धनी आपणांस पाठवून दिले आहेत ते साऱ्या दुनियेंतले शहाणे आहेत, यास्तव आपल्या आचारविचारांचा जितका तिटकारा करावा तितका थोडा, व इंग्रेजांचें जितकें अनुकरण करावें तितकें श्रेयस्कर; तर मग तेच अंकुर वळावून पुढें जो विचित्र शाखाविस्तार दृष्टीस पडतो तो कां पडूं नये ? कोणी बापाची ओळख विसरतात, कोणांस बापाची लाज वाटूं लागते, कोणी आईशीं विनोद करतात, कोणी अर्वाचीन सोमरसाचें सेवन करून गटारोदकाचें अवभृतस्नान करतात इ० इ० शतशः प्रकारांनीं आमच्या अर्वाच्य पंडितांची बुद्धि जी आज फांकलेली दृष्टीस पडते ती कशामुळें बरें ? तीस वरील दोन महासिद्धांत हेच कारणीभूत नव्हेत काय ? आपले लोक पेशवाईत अगदीं मूर्ख होते यांत संशय नाहीं, हें महातत्त्व ज्यांच्या हृदयांत एकदां बाणलें त्यांच्या ठायीं स्वदेशाचा इतिहास वाचण्याविषयीं कितीशी उत्कंठा उत्पन्न होईल बरें ? असे लोक ' बापू गोखल्यांचें चरित्र, ' ' पानपतची लढाई, ' ' महादजी शिंद्यांचें चरित्र, ' ' ऐतिहासिक गोष्टी, ' हीं पुस्तकें मोठ्या प्रेमानें वाचतील काय ? त्यांस अर्थातच असें वाटणार आहे कीं, या बेवकूब लोकांचीं चरित्रें वाचल्यापासून काय फायदा होणार आहे ? त्यापेक्षां क्लैव् साहेबांचें चरित्र, किंवा हावलॉक् साहेबांचें चरित्र, अथवा 'युनैटेड स्टेट्स्' चा इतिहास वाचलेला बरा नव्हे काय? गेल्या तीन हजार वर्षांत आपल्या देशांत शहाणा म्हणून कोणी निपजलाच नाहीं हें जर खरें आहे, तर या तीस शतकांचा इतिहास म्हणजे मूर्खत्वाचाच इतिहास नव्हे काय? तर आमच्या देशांत स्वतः विषयींचें जें लज्जास्पद अज्ञान आढळतें, व स्वदेशाच्या इतिहासाविषयीं अरुचि व अनास्था जी चोहोंकडे दृष्टीस पडते, हीं सर्व फळें 'लोकहितवादी' प्रभृति अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांच्या पांडित्याचींच होत हें उघड आहे. युरोपांत व अमेरिकेंत इतिहासप्रसिद्ध थोरथोर पुरुषांचीं नांवें निघालीं असतां लोकांचीं अंतःकरणें थरारून जातात, मद्यप्राशनाच्या वेळीं त्यांच्या नांवानें जयजयकार होतो, त्यांच्या नांवानें शतवार्षिक उत्सव होतात,

त्यांच्या संबंधाच्या सामान्य वस्तुसुद्धां लोक मोठ्या प्रेमानें जतन करून ठेवतात; त्यांचीं चरित्रें, कितीक वेळां लिहिलीं जातात, शिवाय त्यांचे पुतळे, तसबिरी वगैरे तयार होतात; आणि तोच इकडचा प्रकार पहा! कोण आपासाहेब आणि कोण दादासाहेब; होते कधींकाळचे कोणी; सारेच लोक एकंदर मूर्ख होते; त्यांत ' एरंडोऽपि द्रुमायते ' या न्यायानें यांनीं चार दिवस दुड्डाचार्यपणा मिरविला; इतकेंच काय तें! हल्लींच्या शहाणपणाला हें जुनें अर्धबोबडें शहाणपण तोलेल कीं काय? छे, गोष्टहि बोलायला नको! ' आतां जर नाना फडनवीस असता तर त्यांस पळून जावें लागतें ' हा नामदारसाहेबांनीं सिद्धांत करून ठेवला आहे!—हें इतिहासप्रकरण झालें. याप्रमाणेंच इतर प्रकरणाविषयींहिं ' लोकहितवादी ' चे अभिप्राय किती समंजस आहेत हें यापूर्वी दर्शविण्यांत आलेंच आहे. कालिदासादि कवींची ख्याति साऱ्या भूगोलावर पसरून युरोपांतील व अमेरिकेंतील मोठमोठें पंडित त्यांच्या कृति पाहून तन्मय होतात; इकडे आमच्या रावबहादुरांनीं पहिल्यापासून एक मत बळकट करून ठेवलें आहे कीं, वरील कवि हे देशाच्या अपकर्षास कारणीभूत होत. त्यांनीं लोकांत शृंगारोद्दीपन करून हिंदु लोकांस हतवीर्य करून टाकलें. मोरोपंतावर एके ठिकाणीं प्रस्तुत ग्रंथकारानें असा आक्षेप आणिला आहे कीं, तो भर पेशवाईंत हयात असतां त्यानें पेशव्यांवर एखादें वीररसप्रधान काव्य करावयाचें टाकून जुन्या पौराणिक कथाच तो कुटीत बसला! कोण विलक्षण कल्पना ह्या! लोकांचे पुढारी म्हणविणाऱ्या महाजनांचे असे बुद्धितरंग प्रकट होऊं लागले म्हणजे मग राष्ट्रांत किती सुधारणा होत जाणार व किती यथार्थ ज्ञान प्रसृत होणार हें सांगायला नकोच!

या निबंधांत पुष्कळ मुद्दे विचार करण्यासारखे आहेत व कित्येक पारिग्राफ मधून मधून फार उत्कृष्ट तऱ्हेचे साधले आहेत. या सर्वांचा येथें निर्देश करणें अर्थातच कठिण आहे. तथापि कांहींकांचा मात्र तो करतों. अंक ६५ यामधील ' हिंदुस्थानची सध्यांची स्थिति निकृष्टच आहे कीं काय व ती होण्यास आपल्या जुन्या लोकांचा मूर्खपणा कितीसा कारणीभूत झाला; ' त्याचप्रमाणें ' या देशाच्या अत्यंत विस्तारामुळें व प्राचीनत्वामुळें त्यासंबंधानें कोणत्याहि तऱ्हेनें निर्णय ठरविणें म्हणजे मोठ्या विचाराचें काम असतां अलीकडे कित्येक युरोपियन व एतद्देशीय ग्रंथकार

अविचारानें भलभलते सिद्धांत बेलाशक झोंकून देतात हें किती अनिष्ट-कारक आहे ' इत्यादि मुद्दे आहेत. यानंतर अंक ६८ यांत ' नाना फडनवीस कांहीं विद्वान् नव्हता, तो जुन्या चालीचा ब्राह्मण, त्यास माहिती कमी; त्याच्या समजुती अशा होत्या कीं, पृथ्वी काय ती येवढीच व सर्व जग काय तें इतकेंच; त्यानें आपलें राज्यांत हल्लींप्रमाणें अधिकाऱ्यांची रचना व पदव्या ह्या ठरविल्या नव्हत्या व त्यानें कोणतीहि देशसुधारणा करण्याचें मनांत आणिलें नाहीं, ' हा मुद्दा आहे. अंक ७० यांत ' संस्कृत विद्या ही कांहीं उपयोगाची नाहीं; जर असें नसेल तर कोणी मला उत्तर द्यावें कीं, व्याकरणाचें पंधरा वर्षे अध्ययन केलें त्यापासून अमुक उपयोग होतो असें मला दाखवून द्यावें म्हणजे मी वास्तविक म्हणेन ' या लोकहितवादीच्या मुद्याचें खंडन आहे. अंक ७५ यांत 'मनूनें ब्राह्मणांस देहांत शासनाची माफी दिली हा भिन्नभावाचा अत्यंत अन्यायाचा प्रकार होय ' व ' ब्राह्मण लबाड, ब्राह्मण मतलबी, ब्राह्मण लोभी असतात ' व ' त्यांनीं आपली विद्या लपवून ठेविली व तसें केल्यानें त्यांचा आजपर्यंत बोज राहिला. ' इत्यादि लोकहितवादीच्या आक्षेपांचें चांगलें मजेदार निरसन केलें आहे, तें मूळ ग्रंथांतूनच वाचण्यास आम्ही वाचकांस शिफारस करितों.

लोकहितवादीवरील विष्णुशास्त्री यांचा हा निबंध वाचून शेवटीं अशी इच्छा उत्पन्न होते कीं, विष्णुशास्त्री यांनीं आपला पक्ष जसा उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन केला आहे तसें त्याच्या उलट पक्षी मागील पिढींतील कृष्णशास्त्री किंवा रावबहादुर देशमुख वगैरे सारख्यांच्या हातून प्रतिपादन झालें असतें म्हणजे मराठी वाचकांस मोठी मौज झाली असती व त्यापासून अधिक यथार्थ ज्ञान होण्याचा संभव होता. विष्णुशास्त्री जिवंत असतां त्यांचीं कांहीं मतें कित्येक विद्वान् लोकांस पसंत नव्हतीं तरी त्याबद्दल ते फक्त आपापसांत तोंडानें चर्चा मात्र करीत; परंतु त्यांपैकीं कोणी म्हणून खरोखरच लेखणी हातीं घेऊन विष्णुशास्त्री यांजबरोबर उत्तरपक्ष करण्यास सरसावला आहे असें कधींहि घडून आलें नाहीं. यामुळें कोर्टांत प्रतिवादी हजर न झाला म्हणून ज्याप्रमाणें कोर्टास एक

पक्षीयच्च फैसल करावा लागतो, त्याप्रमाणें विष्णुशास्त्री यांचे लेख सरस्वती देवीच्या सिंहासनापुढें अद्वितीयत्व पावून राहिल्यामुळें उलट पक्ष हिरमुसला होऊन राहिला आहे; ही स्थिति एकंदर लोकसुधारणेच्या दृष्टीनें पाहतां मोठीशी अभिनंदनीय आहे असें नाहीं !

या सालच्या अखेरीस रा. गोपाळ गणेश आगरकर एस्. ए. हे न्यू इंग्लिश स्कुलास येऊन मिळाले. हे गृहस्थ मूळ अकोला हायस्कुलांतील विद्यार्थी असून त्यांचा बराच अभ्यास रा. रा. महाजनी यांच्या हाताखालीं झाला होता. शिवाय गोपाळराव हे आपल्या गुरूंच्या शेजारींच रहात असल्याकारणानें घरींदारीं मि. महाजनींसारख्या विद्वान्, बहुश्रुत व शिष्यवर्गाविषयीं विलक्षण कळकळ बाळगणाऱ्या सद्गृहस्थाचा समागम त्यांस पुष्कळ दिवस घडला. यामुळें गोपाळराव यांचे विचार इतर विद्यार्थ्यांप्रमाणें एकमार्गी न होऊन त्यांस देशोन्नतीच्या कामीं जे अनेक उद्योग चालू आहेत त्यांतील कांहींकांत तरी आपला हात असावा असा त्यांच्या मनाचा कल ते कॉलेजात येण्यापूर्वीच झालेला दिसून येण्यासारखा होता. विष्णुशास्त्री यांची व गोपाळरावांची पहिली मुलाखत म्हटली म्हणजे दोघांचीं राजकीय विषयासंबंधानें मतें बहुतेक अंशीं सारखींच असल्यामुळें गोपाळरावांनीं अशाच विषयावरील लिहिलेला एक निबंध विष्णुशास्त्री यांस वाचून दाखविण्याकरितां ते १८७६ सालअखेर विष्णुशास्त्री यांच्याकडे आले होते. यानंतर विष्णुशास्त्री व इतर मंडळी यांनीं जेव्हां न्यू इंग्लिश स्कूलचा उद्योग आरंभिला तेव्हां गोपाळराव हे त्यांस सहजच येऊन मिळाले.

न्यू इंग्लिश स्कूलमध्यें आतां बरीच नव्या दर्जाची डिग्रीवाली मंडळी जमली असून ते सर्वच कॉजेजांत असतांना चांगले हुषार म्हणून नांवाजलेले असल्यामुळें व त्यांस शाळेंत शिकविण्याचें काम करूनहि बराच दम व फुरसत रहात असल्यामुळें त्यांस असें वाटूं लागलें कीं, शाळेचें काम चालवून आपण एखादा छापखाना हातीं घेऊन नवीन स्वतंत्र मतांचा प्रसार केला असतां पुष्कळ उपयोग होईल. या कामांत मुख्य उचल अशी मि. आपटे व आगरकर यांची होय. विष्णुशास्त्री

यांनीं या सालचे आरंभीं माजी " किरण " छापखान्याचें सामान एका व्यापाऱ्यापासून अडीच हजारांस विकत घेतलें होतें; व ही रक्कम तावडतोब न देतां प्रत्येक वर्षी अडीचशें रुपये देऊन दहा वर्षांनीं फेडून द्यावयाची असा त्याबद्दल करार होता. हें सामान शिवाजी छापखान्यांत घालून रा. कृष्णराव मांडे, रा. विष्णु श्रीपत देशपांडे व रा. शाळिग्राम यांजबरोबर सरकतीनें एक मोठा छापखाना चालविण्याचा विष्णुशास्त्री यांचा प्रथम विचार होता; परंतु तो बेत पुढें मोडून विष्णुशास्त्री यांनीं किरण प्रेसाचें सामान शिवाजी छापखान्यांतून काढून घेऊन तें न्यू इंग्लिश स्कूलच्या नवीन मंडळीच्या इच्छेप्रमाणें एक नवीनच छापखाना काढण्याच्या कामीं दिलें; व हा छापखाना या मंडळीमध्यें भागीनें चालवून मूळ व्यापाऱ्याची अडीच हजार रुपयांची जी फेड करावयाची ती या भागीच्या उत्पन्नांतून करावी असें ठरलें. येणेंप्रमाणें या सालअखेर हल्लींच्या ' आर्यभूषण ' छापखान्याची स्थापना झाली.

छापखान्याची योजना झाल्यावर आतां वर्तमानपत्र काढावयाचें तें कोणत्या धर्तीवर काढावें याबद्दल विचार चालला. शेवटीं असें ठरलें कीं, मराठी व इंग्रजी मजकुरांचें असें एकच वर्तमानपत्र न काढतां एक निवळ मराठी व दुसरें निवळ इंग्रजी अशीं दोन निरनिराळीं वर्तमानपत्रें काढावीत. नंतर लवकरच पुढील सालाच्या आरंभापासून ' केसरी ' व ' मराठा ' हीं पत्रें काढण्याबद्दल नोटिशी चोहोंकडे वाटण्यांत आल्या. हीं पत्रें काढणारांच्या बऱ्याच सह्या होत्या. त्यांत विष्णुशास्त्री यांची प्रथम असून रा. टिळक, आपटे, आगरकर, डॉ. गर्दे वगैरे आठ दहा गृहस्थांच्या सह्या खालीं होत्या. येणेंप्रमाणें पुढील सालापासून सुरू होणाऱ्या केसरी व मराठा या वर्तमानपत्रांचा एक नवीनच उद्योग विष्णुशास्त्री यांनीं आपल्या साह्यकारी मंडळींच्या मदतीनें या सालअखेरपासून हातीं घेतला.

आपण सरकारी नोकरी सोडून स्वतंत्र धंदे हातीं घेतले व त्यांत नवीन दमदार मंडळी मिळून ते बरेच चांगले स्थितीस येत चालले हें पाहून विष्णुशास्त्री यांस आतां बरीच हुषारी वाटूं लागली. तथापि त्यांचें चित्त

अस्वस्थ करण्यास दुसरीं बरींच कारणें राहिलीं होतीं. त्यांच्या गृहस्थिती-विषयीं यामागें बरेंच लिहिलें आहे; त्यांच्या कुटुंबाची प्रकृति नेहमीं अस्वस्थ असून त्यांत संततीचा योग फारसा दिसत नसल्याकारणानें विष्णुशास्त्री यांस त्याबद्दल स्वत: जरी कांहीं वाटत नसे तरी घरांतील इतर माणसें तेणेंकरून साधारण नाउमेदच असत. शिवाय सीतारामपंतांची वांटणीबद्दल कुरकूर मधून मधून चालेच. त्याबद्दल निकाल करण्याकरितां कधीं कधीं त्यांजकडून विष्णुशास्त्री यांस बोलावणें येई; परंतु तेथें गेलें असतां मुख्य मुद्याविषयीं गोष्टहि न काढतां व कधीं कधीं तर चकार शद्बहि न होतां विष्णुशास्त्री यांस उगीच बसून उठून यावें लागे. कधीं कधीं उलट पक्षीं सीतारामपंत हे विष्णुशास्त्री यांजकडे आले असतां त्यांचीहि तशीच मानखंडणा होई! सीतारामपंत ज्याप्रमाणें आपला मनसोबा कळवीतना त्याप्रमाणें विष्णुशास्त्रीहि तो कळवून घेण्याविषयीं यत्न करीतनासे झाले, असें झाल्यावर सीतारामपंत यांनीं विष्णुशास्त्री यांचा नाद सोडून देऊन ते लक्ष्मणरावांस वांटणीबद्दल तुमचें काय मत आहे असें मोघम लिहूं लागले. लक्ष्मणराव यांनीं सरळ बुद्धीनें "शेवटल्या बहिणीचें लग्न होऊन जो रोख पैसा राहील त्याचा व इतर मालमत्तेचा एक-तृतीयांश प्रत्येकानें घ्यावा" म्हणून उत्तर दिलें. हें विष्णुशास्त्री यांस जेव्हां कळलें तेव्हां त्यांनीं लक्ष्मणरावांस सांगितलें कीं, "तूं सीतारामास असलीं रिकामीं पत्रें पाठवीत जाऊं नकोस. तो हळुहळू सोईवर येईल; घाई करून कांहीं उपयोग नाहीं. तो सोईवर आला म्हणजे मीच त्याचा निकाल करीन." येणेंप्रमाणें आपला मनसोबा उघड न सांगतां सर्व खटला व्यर्थ कुचंबत ठेवण्याची *सीतारामपंताच्या मनाची तऱ्हा अस-

---

* यापुढें सीतारामपंतांचा विशेषसा उल्लेख आलेला नाहीं. यामागें अगदीं पहिल्या भागापासून त्यांच्याविषयीं जो मजकूर आम्हीं येथें लिहिला आहे, तो केवळ नि:पक्षपात बुद्धीनेंच लिहिला आहे असें बहुतेक वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तथापि कांहींकांची अशी कल्पना होण्याचा संभव आहे कीं,

[पुढें चालू]

त्यामुळें व विष्णुशास्त्री यांस स्वतः होऊन त्याचा खुलासा करून एकदांची कटकट संपविण्याचा उरक नसल्यामुळें निकाल न पडतां दोघेंहि आपली

[मागील पृष्ठावरून पुढें चालू.]

आमचा त्यांजविषयींचा कांहीं गैरसमज झाला असून त्यांजविषयीं जितकी आदरबुद्धि असावी तितकी आमची नाहीं; परंत वास्तविक प्रकार असा आहे कीं, सीतारामपंतांची खरोखर योग्यता व त्यांच्या हातून घडलेली लौकिक सेवा हीं विष्णुशास्त्री यांच्या मरणानंतरच विशेषेंकरून होण्याचा योग आल्यामुळें त्याबद्दल या पुस्तकांत अर्थातच उल्लेख करितां आला नाहीं. यावरून त्यांची योग्यता प्रस्तुत चरित्रकार जाणूत नाहीं असें नाहीं. उलटें विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणेंच सीतारामपंतांच्याहि ठिकाणीं सरकारी नोकरी किंवा बडा पगार यांविषयीं लालसा नसून सार्वजनिक कामें चालविण्याविषयीं त्यांची पहिल्यापासून एक प्रकारची हौस दृष्टीस पडत आहे, याबद्दल त्यांनीं सुमारें दहा बारा वर्षें पुणें सार्वजनिक सभेच्या आनररी सेक्रेटरीचें जें काम चांगल्या हुषारीनें चालविलें, फारेस्ट कमिशनमध्यें त्यांनीं जो पुढारीपणा घेतला, क्राफर्ड प्रकरणांत आपले स्नेही म्हटविलेले सदर्हू साहेबांचा पक्ष जो केवळ निरपेक्ष बुद्धीनें व मोठ्या औदार्यानें आपलें पुष्कळ नुकसान करूनहि त्यांनीं उचलिला व शेवटीं पुणें म्युनिसिपालिटींत मधून मधून सरकार व शहरवासी लोक यांचे तंटे चालतात त्यांत सीतारामपंत हे दुसऱ्या पक्षाकडून करीत असलेली तरफदारी हीं उत्कृष्ट प्रमाणें म्हणून आम्ही मोठ्या संतोषानें येथें दाखल करितों. या शेवटल्या बाबतींत सीतारामपंतांच्या एका उत्कृष्ट कामगिरीबद्दल कै. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर यांनीं मोठी तारीफ करून एक पत्र पाठवून दिलें होतें तें आम्ही येथें सादर करितों:—

Private

30th October 1892.

My Dear Mr. Chiplunkar.

At yesterday's meeting of the Suburban Municipality I had an opportunity of reading the proceeding, of the

[पुढें चालू]

मनें एकमेकांविषयीं तशींच कलुषित ठेवून आपल्या जिवांस व्यर्थ त्रास करून घेत !

[मागील पृष्ठावरून पुढें चालू.]

special Committee appointed to decide the question of the apportionment of the Octroi revenue between the three Municipal bodies and I must congratulate you sincerely on the honest and reasonable attitude you took in dealing with the several points which the protracted and troublesome controversy involved. I do not know another member of your Municipality who could have done greater credit to himself and to the interests he represented by an honest discussion of each and all the points of difference and by a readiness to accept fact and circumstances when properly explained and made plain. Of course, I do not mean that I expected anything less of you; but I do not forget that in these days of earning cheap and easy popularity by blind and unreasonable persitence and obstinacy in sticking to a spirit of partisanship, a willingness to be guided by honest conviction at the certain sacrifice of that cheap popularity is not very common.

I have always greatly regretted your withdrawal into your shell as it were. I hope it is only for a time and there will be yet opportunities for you to be more and more useful in public interests.

Hoping you are enjoying good heatlh,

Believe me,
Yours very truly
K. S. NULKAR,

[पुढें चालू]

न्यू इंग्लिश स्कूलची भरभराट पाहून पुष्कळ विद्वान् व प्रसिद्ध गृहस्थाहि शाळा पाहण्याकरितां येऊं लागले. या सालच्या (१८८२) आगस्ट महिन्याच्या सुमारास मि. तेलंग हे एके दिवशीं मि. टिळक यांजबरोबर शाळा पाहण्याकरितां आले. या नूतन संस्थेची एकंदरींत नवीन कल्पना व तिची व्यवस्था पाहून ते खूष झाले. शेवटीं बोलतां बोलतां आम्ही हळुहळू या शाळेला जोडून एक कॉलेजहि काढणार आहोंत असें मि. टिळक यांनीं सुचविलें. त्यावरून मि. तेलंग हे न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीच्या संसर्गानें क्षणभर तल्लीन होऊन म्हणाले " मलाहि तुम्हांमध्यें येऊन मिळावेंसें वाटतें. आणखी साधारण चार पांच वर्षांनीं मला तसें करितां येईल. दोन लाख रुपये जमले म्हणजे मी असें करणार. कांहीं थोडे हजार कमी आहेत, ते तेवढ्या वेळांत भरून येतील. " हा तत्समयोत्पन्न उद्गार विष्णुशास्त्री यांनीं मुकाट्यानें ऐकून घेऊन त्याबद्दल घरीं येऊन सांगत असतां ते म्हणाले, " काय हो, एकूण दोन लाखांत दहा पांच हजार कमी असले म्हणजे कांहीं बरें नाहीं! दोन लाख तंतोतंतच पाहिजेत; एरवीं चालावयाचेंच नाहीं अं!! "

या महदाख्यायिकेस आज बारा वर्षें होऊन गेलीं; आणि विष्णुशास्त्री हे जर स्वर्गांतून आपल्या पुण्यपत्तनाकडे नजर फेंकून न्यू इंग्लिश स्कुलचे कॉलेजांत वरील विद्वान बॉरिस्टर हे दोन लाखांची भरती झाल्याबरोबर

[मागील पृष्ठावरून पुढें चालू]

कै. नूलकर यांच्यासारख्या चोख, अनुभविक व वजनदार गृहस्थानें वर दाखल केल्याप्रमाणें पत्र लिहिणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे; नूलकर यांचें आणि सीतारामपंत यांचें पहिले गृहस्थ मरण पावण्यापूर्वीं कांहीं दिवस बरेंच वांकडें आलें होतें. तथापि नूलकर यांच्या तापट परंतु गुणग्राही स्वभावावरून व वरील पत्राच्याहि झोंकांवरून त्यांनीं तें केवळ सीतारामपंतांच्या बद्दलची योग्यता व त्यांनीं चांगल्या प्रकारें बजावलेल्या कामगिरीबद्दलची आपली पसंती दर्शविण्याकरितांच लिहिलें होतेंसें दिसतें. हें पत्र आम्हांस सीतारामपंतांच्या व्यतिरिक्त मिळाल्यामुळें त्याची किंमत विशेष आहे.

आपलें उत्तर वय विद्यादानांत घालविण्याचा जो त्यांनीं संकल्प केला होता त्याप्रमाणें ते आतां प्रोफेसरची कोणती जागा सुशोभित करीत आहेत म्हणून पाहूं जातील, तर त्यांस वरील गृहस्थ हे मुंबापुरींतील उच्च कोर्टांतील बॅरिस्टरचा झगा टाकून देऊन व त्याजबरोबरच वरील पोरकट संकल्पहि झुगारून देऊन ते आतां त्याच कोर्टांतील एका न्यायासनावर विराजमान झालेले आहेत हें पाहून त्यांस आपले मोठमोठे विद्वान लोकहि स्वदेशसंबंधी आपल्या खऱ्या योग्यतेच्या कर्तव्यापासून केवळ पैसा नाहीं म्हणूनच नाहीं, तर सरकारी नोकरीची भपकी व वडेजाव या करितांहि पराङ्मुख होतात हें मनांत आणून त्यांस खरोखरच खेद वाटेल !! *

विष्णुशास्त्री यांस सरकारी हायस्कुलांतील शिक्षणपद्धतीचा कंटाळा आला होता म्हणून त्यांनीं आपल्या रत्नागिरिस्थ मित्राच्या पत्रांत उल्लेख केला आहे, व त्या पद्धतींत कोणत्या उणिवी आहेत म्हणून त्यांचें मत होतें हेंहि मागें सागितलेंच आहे. आतां न्यू इंग्लिश स्कुलच्या स्थापनेनें त्यांस शिक्षणस्वातंत्र्य मिळाल्यावर विद्यार्थ्यांस शिकवितांना मधून मधून प्रसंग पाहून त्यांच्या मनांत जेणेंकरून आपल्या पूर्वजांविषयीं पूज्यभाव उत्पन्न होईल, कित्येक दुराग्रही इंग्रजी ग्रंथकारांच्या मतांचें खंडन करून त्यांच्या ठिकाणीं यथार्थ ज्ञानाचा प्रसार होईल, सरकारी नोकरीच्या मिंधेपणाबद्दल अप्रीति व स्वतंत्र धंदे चालवून त्यांवर निर्वाह करण्याची आवड हीं त्यांमध्यें उत्पन्न होतील, त्याचप्रमाणें इंग्लिश लोकांचा पेहराव त्यांचे ऐषआराम वगैरे ढंग न उचलतां त्यांनीं त्या लोकांच्या अंगचे धैर्य, साहस, सतत उद्योग, स्वाभिमान, देशाभिमान वगैरे उच्च नैसर्गिक गुण हे घ्यावेत अशा गोष्टींकडे त्यांच्या शिक्षणाचा पुष्कळदां रोख असे. ज्याप्रमाणें निबंधमालेच्या वाचनानें विद्याभ्यास संपून जगाच्या राहटीस लागलेल्या तरुण मंडळींचीं मतें बरींच बदलत चाललीं, त्याप्रमाणेंच त्यांहीपेक्षां अगोदर म्हणजे जे अझून विद्यार्थीच आहेत, त्यांचीं मनें

* हा लेख कै० तेलंग हे मरण पावण्याच्या अगोदर लिहिला होता हें सांगणें नकोच.

शाळेंत असतांनाच शिक्षणानें फिरविली तर त्यापासून फार अधिक फायदा होईल असें मनांत आणून विष्णुशास्त्री यांनीं विद्यार्थ्यांच्या बुद्धीस मुळापासून निराळेंच वळण लावण्याचा प्रयत्न सुरू केला; परंतु हा क्रम अगदीं नवीन असल्यामुळें व अशा शिक्षणाचा उपयोग परीक्षा पास होण्यास मुळींच नसल्यामुळें ज्या कित्येक विद्यार्थ्यांची शिक्षणाच्या परमावधीची कल्पना म्हटली म्हणजे होईल तितकें करून लवकर परीक्षा पास होऊन एकदांची सरकारी नोकरी पटकावून चैनींत दिवस काढावयाची—ज्यांच्याविषयीं मागें दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें प्रो. वर्ड्स्वर्थ अत्यंत तिटकारा प्रदर्शित करीत व ज्यांची दुर्दैवेंकरून आमच्या मंडळींत बरीच संख्या आहे—अशा विद्यार्थ्यांस विष्णुशास्त्री यांचें वर सांगितलेलें विषयांतर अगदीं निरुपयोगी वाटे. त्यांची कल्पना म्हणजे मास्तरांनीं त्यांच्याकडून म्याकमोर्डींच्या ईडियम्स पाठ करून घ्याव्या, हिस्ट्रीची घोकंपट्टी करून घ्यावी आणि कसें तरी करून त्यांस एकदांचे परीक्षांच्या कचाटींतून लवकर ओढून काढावें ! परंतु शाळा किंवा कॉलेज सोडून विद्यार्थी जगाच्या मार्गांत पडल्यावर त्यांना विद्येशिवाय स्वाभिमान, स्वजात्यभिमान, स्वदेशाभिमान, स्वावलंबन वगैरे जे अमोलिक गुण त्यांच्या अंगीं येणें इष्ट आहे व ज्यांवाचून नुसत्या विद्येची कांहीं किंमत नाहीं त्यांबद्दल विद्यार्थ्यांनीं आपल्या आपणच पाहून घ्यावयाला सोडून देणें हें चांगल्या शिक्षकाचें काम नाहीं हें कोणीहि खरा शिक्षणज्ञ मनुष्य कबूल करील; परंतु आपल्या बहुतेक लोकांच्या समजुती अगदीं वेगळ्या असल्यामुळें व विद्यार्थ्यांच्या त्यामुळें अर्थातच घरच्या लोकांप्रमाणें असल्यामुळें विष्णुशास्त्री हा जो प्रजोन्नतीसाठीं उद्योग करीत होते, त्यांस विद्यार्थ्यांची फारशी अनुकूलता दृष्टीस पडत नसे. याबद्दल विष्णुशास्त्री कित्येक वेळीं बरीच दिलगिरी दाखवीत असत ! विद्यार्थ्यांच्या अल्प समजुतीनें त्यांस असें वाटूं लागलें कीं, विष्णुशास्त्री यांच्यापेक्षां इतर शिक्षक मंडळी बरी ! ! ते रिकाम्या गोष्टींत न शिरतां त्यांचें धोरण फक्त लेसनांकडेसच असतें. परंतु नुसत्या परीक्षा पास करून देऊन डिग्रीवाल्या विद्वानांच्या झुंडीच्या झुंडी सरकारी आश्रयावांचून अगदीं पंगु अशा बडे

साहेबांच्या पादरजांत लोळण्याला पाठवून द्याव्या किंवा त्यांची योजना ' गव्हरनर साहेबांच्या बंगल्यावर पंखेवाले, देवडीवाले वगैरे उंच उंच अधिकारावर ' व्हावी असाच जर न्यू इंग्लिश स्कूल स्थापण्याचा उद्देश असेल तर सरकारी हायस्कुलापेक्षां यांत विशेष तें काय ? पुढील विद्यार्थी प्रजा ज्यांच्या शिक्षणावर आपल्या देशाची पुढें होणारी बरी वाईट स्थिति अवलंबून आहे त्यांमध्यें राष्ट्रास उदयास आणणारे जे स्वाभिमान, देशाभिमान, साहस वगैरे उत्तम गुण यांविषयीं प्रीति उत्पन्न करावी व न्यू इंग्लिश स्कूल ज्या चार पांच थोर गृहस्थांनीं स्वतःस हरएक प्रकारें झीज लावून घेऊन स्थापन केलें व आपल्या लोकांस एका उपयुक्त व स्वतंत्र उद्योगाचें उदाहरण घालून दिलें, त्यांच्या मागें त्याच शाळेंतून तयार झालेल्या विद्वान् लोकांनीं कांहींकांनीं त्यांच्या स्वतंत्र लोकशिक्षणाच्या कामास हात लावूं लागावें व दुसऱ्यांनीं दुसरीं देशहिताचीं याहूनहि मोठीं कामें हातीं घ्यावीं असा जर वरील संस्थेच्या स्थापनेचा उद्देश असेल तर ठरीव अभ्यासांच्या शिक्षणांतून कांहीं वेळ विष्णुशास्त्री जो वर सांगितलेल्या विषयांतराकडे लावीत असत त्यांस दोष कसा लावतां येईल हें आम्हांस समजत नाहीं !

विष्णुशास्त्री यांचें पुढील विद्यार्थीप्रजेच्या शिक्षणासंबंधानें जें हें मत होतें, त्यास त्यांच्या सहायकारी शिक्षकमंडळीकडून फारसें पाठबळ मिळालें नाहीं. आपल्या विद्यार्थ्यांमध्यें आपल्या कृत्यांबद्दल उत्साह उत्पन्न होऊन ते मोठे झाल्यावर त्यांना आपल्या कामास हात लावण्याची इच्छा व्हावी अशाबद्दल शिक्षणद्वारें त्यांची खटपट नसे; व यानंतर विष्णुशास्त्री हे लवकरच मरण पावले यामुळें या बाबतींत पुढें कोणीं फारसें लक्षहि घातलें नाहीं; यामुळें न्यू इंग्लिश स्कूल यासारखीं इतर ठिकाणीं स्वतंत्र स्कुलें होण्याची वाढ खुंटली जाऊन स्वतः न्यू इंग्लिश स्कूलच हळूहळू सरकारी हायस्कुलांच्या धर्तीवर येऊन पोंचलें आहे ! हल्लीं न्यू इंग्लिश स्कूलचें काम कॉलेज स्थापन झाल्यापासून जरी अतोनात वाढलें आहे तरी त्यांत विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर वगैरे सारखी पहिल्या पाण्याची मंडळी दिवसानुदिवस कमी कमीच होत आहेत. न्यू इंग्लिश

स्कूल स्थापन होतांच पहिल्याच वर्षी जसें मि. आपटे व आगरकर वगैरे निवडक मंडळी भरामर येऊन मिळाली तशी या पुढील दहा बारा वर्षांत त्याच शाळेंत वरील बाणेदार शिक्षकांच्या तालमींत तयार झालेली अशी निदान पांच सात नांव घेण्यासारखी मंडळी निघून आपल्या गुरुवर्यांच्या शिरावरील ओझ्यास हात लावायास पुढें आली पाहिजे होती ! शिवाय बारा वर्षांत डिग्रीवाल्यांची संख्या पुष्कळच वाढल्यामुळें बाजारभावाप्रमाणें त्यांची जी कमी किंमत होत चालली आहे ती मनांत आणली असतां न्यू इंग्लिश स्कूलचे शिक्षकमंडळींत जी अगदीं थोडी भरती पडली आहे त्याचें कारण विद्यार्थ्यांस शिक्षण देतांनाच मधून मधून त्यांच्या मनांत स्वतः हातीं घेतलेल्या महत् कार्याविषयीं यथार्थ पूज्यभाव उत्पन्न करून त्यापैकीं कांहीं तरी मंडळी आपल्या मागें आपली दीक्षा चालविण्यास त्यांच्या मनाची प्रवृत्ति करण्याकडे मूळ चालक मंडळीनें केलेलें दुर्लक्ष हें होय ! न्यू इंग्लिश स्कूल स्थापन होऊन आज बारा वर्षें झालीं; इतक्या काळांत त्याची चांगली भरभराट होत जाऊन हल्लीं त्यास पूर्ण कॉलेजहि जोडण्यांत आलें आहे, तरी मूळ शिक्षक मंडळींत नांव घेण्यासारखी फारशी नवीन भरती न पडतां मृत्यु, मतभेद यांनीं त्यामध्यें जी खांच पडली आहे ती अझून भरून येत नाहीं; व जी बाकी थोडी जुनी मंडळी उरली आहे त्यांजवरच हा शाळेचा गाडा चालल्यानें अशीच रेटारेटी आणखी किती दिवस चालेल हा सध्यां या शाळेच्या हितचिंतकांस मोठाच प्रश्न आहे ! *

विष्णुशास्त्री यांनीं सरकारी नोकरी सोडल्याबरोबर जे अतोनात नवीन उद्योग सुरू केले त्यांवरून ज्या कित्येक गृहस्थांस त्यांच्या अंगच्या योग्यतेची परीक्षा झाली नव्हती, त्यांना आतां त्यांबद्दल आश्चर्य वाटूं लागलें. मि. जेकब साहेब ज्यांच्या हाताखालीं विष्णुशास्त्री हे कांहीं वेळ

* हा लेख लिहिल्यानंतर थोडेच दिवसांत मि. आपटे हे वारले. या गृहस्थाच्या मृत्यूनें न्यू इंग्लिश स्कूलचें किती मोठें नुकसान झालें हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

पूना हायस्कुलामध्यें होते व ज्यांना सीतारामपंतांच्या विशेष परिचयावरून ह्यांची साधारण बरीच माहिती होती ते एके दिवशीं विष्णुशास्त्री यांच्या एका स्नेह्यापाशीं त्यांची नवीन शाळा वगैरे अनेक उद्योगांविषयीं चांगला मजकूर ऐकून त्यांजविषयीं म्हणाले, " त्याच्या [विष्णुशास्त्री] मध्यें इतकें पाणी असेल असें मला वाटलें नव्हतें. " खुद्द मि. चाटफील्ड साहेब हे विष्णुशास्त्री यांजविषयीं यापुढें कांहीं दिवसांनीं गोष्ट निघाली असतां एका प्रसिद्ध विद्वान् गृहस्थापाशीं बोलले, " He is clear enough; but he has too many irons in the fire. " येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री हे ज्या साहेब लोकांचे व आपल्या लोकांतील कांहीं मोठमोठ्या गृहस्थांचे ग्रह त्यांनीं आपल्या तीव्र लेखांनीं प्रतिकूळ केलें होते त्यांचीं मनें नम्रभाव प्रकट करून किंवा आर्जव करून नव्हे तर आपल्या मोठ्या व स्वतंत्र उद्योगांनीं आपणाविषयीं अनुकूळ करून घेऊं लागले !

या सालीं न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींनीं केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें सुरू केलीं म्हणून मागें सांगितलेंच आहे. प्रथम नोटिशींत मजकूर लिहिणारांचे यादींत आठ दहा गृहस्थांचीं नांवें होतीं, तथापि डॉ. गर्दे वगैरे शाळेबाहेरील लोकांच्या हातचीं आर्टिकलें त्यांत कधीं आलीं असतील किंवा त्यांचा संबंध त्यांशीं फार वेळ राहिला असेल असें दिसत नाहीं. केसरीच्या प्रकाशनाचें काम रा. आगरकर यांजकडे व मराठ्याचें टिळकांकडे होतें. तथापि केसरींतील पहिलेंच आर्टिकल विष्णुशास्त्री यांचें असे. त्यांनीं मराठ्यांत इंग्रजी आर्टिकल कधीं कांहीं लिहिलें असें ऐकिवांत नाहीं. टिळकांना मराठा चालविण्यास मि. आपटे यांची चांगली मदत असे. केसरींत विष्णुशास्त्री जे विषय लिहीत ते साधारण वर्तमानपत्रांच्या धर्तीवर नसत. हल्लीं जे राजकीय प्रश्न चालू आहेत त्यांवर विष्णुशास्त्री यांची लेखणी कधीं वळतच नसे. त्यांना वर्तमानपत्रें वाचण्याचा जो विलक्षण कंटाळा असे म्हणून मागें सांगितलें आहे तेंच ह्या त्यांच्या एकाच तऱ्हेच्या विषयावर लिहिण्याचें कारण होय. एरवीं टाईम्स किंवा ग्याझिट वाचून साधारण मनुष्यांसहि वर्तमानपत्रें भरून देतां येतात, परंतु विष्णुशास्त्री यांस तसल्या विषयांवर लिहिण्यास सांगितलें म्हणजे तें

त्यांस साधारण संकटच वाटे ! म्हणून त्यांचे विषय नेहमीं विद्या किंवा समाजव्यवस्था या संबंधानेंच असून ते अर्थातच विशेषेंकरून मासिक पुस्तकांस शोभण्यासारखे असत. नवनीताची नवीन आवृत्ति, अनुकरण, देशोन्नति, प्रार्थनासमाज, जातिभेद वगैरे विषयांवरच त्यांची लेखणी फिरे, व त्यांतील विवेचनपद्धति निबंधमालेच्या धर्तीवरच असे. भेद इतकाच कीं, कमी जास्त वेळ फावे त्या मानानें कित्येक निबंध चांगले वठत व कित्येक सरासरीच निघत. या निबंधापैकीं देशोन्नति, अनुकरण, देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता, वर्तमानपत्रें, मुद्रणस्वातंत्र्य, भोजनगृह व नाटकें करावीं किंवा करूं नये हे निबंध चांगल्यांपैकीं आहेत.

प्रार्थनासमाज या विषयावरील निबंधाविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, विष्णुशास्त्री यांनीं निबंध छापण्याकरितां पाठवून दिला असतां तो केसरीचे एडिटर मि. आगरकर यांच्या पाहण्यांत आला. तेव्हां त्यांतील बरींच धर्मसंबंधीं मतें मि. आगरकर यांस पसंत न पडून तीं तशींच केसरी वर्तमानपत्रांत येणें त्यांस बरें न वाटून त्यांनीं त्या निबंधांत बरीच बदलाबदल करून तो छापला. हा निबंध जेव्हां आम्हीं प्रथम वाचला तेव्हां तो विष्णुशास्त्री यांनीं अगदीं आळसांत लिहिल्यासारखा भास झालासा आम्हांस आठवतो. पुढें या बदलाबदलीची जेव्हां हकीकत समजली, तेव्हां आमचा तर्क खरा झाला! एका मनुष्यानें एका धोरणावर लिहिलेल्या मजकुरांत दुसऱ्या भिन्न मताच्या मनुष्यानें फेरबदल केला असतां वरील परिणाम होणें हें साहजिकच आहे. विष्णुशास्त्री यांनीं छापून आलेल्या निबंधांत बरेंच रूपांतर झालेलें पाहून त्यांस कांहींसें वाईट वाटलें; परंतु चार चौघांस धरून काम करावयाचें म्हणजे कधीं कधीं असें होणारच असें समजून ते स्वस्थ राहिले!

या सालच्या अखेरीस विष्णुशास्त्री यांच्या मातुःश्रींनीं त्यांची पत्नी नेहमीं आजारी असून तिला संततीचा योग फारसा दिसत नाहीं असें पाहून एकदां त्यांजपाशीं रा. त्रिंबकराव क्लार्क यांजकडून दुसऱ्या लग्नाची गोष्ट काढिली. विष्णुशास्त्री यांनीं बराच वेळ उत्तर दिलें नाहीं; परंतु नंतर ते अंमळ रागावून म्हणाले, " या म्हाताऱ्यांना नाहींत त्या उठाठेवी

सुचतात ! " त्यांचें साधारण मन असें दिसे कीं, स्वतःस जरी संतति नाहीं तरी आपले धाकटे बंधु लक्ष्मणराव यांस आहे ती बस आहे; पुनः दुसरें लग्न करून विनाकारण भानगडींत पडण्याच्या विचारांत त्यांनीं कधीं मन घातलें नाहीं !

येथवर विष्णुशास्त्री यांच्या आयुष्यांतील मुख्य गोष्टींचें मुख्य कालानुक्रमाप्रमाणें वर्णन झालें. आतां त्यांच्या आयुष्यांतील फक्त दोन तीन महिन्यांचीच हकीकत देणें राहिली आहे, ती देण्यापूर्वी त्यांच्या शरीराची ठेवण, त्यांचा स्वभाव, त्यांचा नित्यक्रम, त्यांच्या विशेष मनोवृत्ति, त्यांच्या हौशी, त्यांची संभाषणपद्धति, त्यांची डायरी, टिपणें वगैरे लिहिण्याची तऱ्हा—ज्या गोष्टी यापूर्वीं बऱ्याच बदलत जाऊन त्या आतां पूर्णावस्थेस पावल्या असतील असें मानतां येईल त्याविषयीं कांहीं मजकूर लिहिणें जरूर आहे. यांपैकीं कांहींकांविषयीं यामागें प्रसंगोपात मधून मधून उल्लेख केलाच आहे, त्यावरून त्यांजबद्दल वाचकांस साधारण कल्पना होण्यासारखी आहे. त्याशिवाय विशेष सांगण्यासारखें जें राहिलें आहे तें येथें सांगून ह्या वर्षाची हकीकत पुरी करितों.

विष्णुशास्त्री यांचें या वेळीं वय बत्तीस वर्षांचें होतें. त्यांच्या शरीराची ठेवण मध्यम उंचीची असून त्यांचा अंगलोट विशेष कृश किंवा स्थूल नाहीं असा साधारण मध्यम तऱ्हेचा होता. त्यांच्या स्वरूपाची कल्पना चित्रशाळेंत ज्या त्यांच्या तसबिरी काढिल्या आहेत त्यांवरून व या पुस्तकांत मधून मधून जे फोटोग्राफ घातले आहेत त्यांवरून पुष्कळ चांगली होण्यासारखी आहे. त्यांचा चेहरा प्रथमदर्शनींच मनांत भरण्यासारखा किंवा बुद्धिदर्शक होता असें नाहीं, तथापि त्यांचें उंच कपाळ, काळे विशाळ डोळे, मोठे व जाडी एकमेकांशीं लागून राहिलेले असे ओंठ व एकंदर चेहऱ्याची ठेवण ह्यांकडे अंमळ नजर दिली असतां त्यांचें एकंदर बाहेरील स्वरूप गरीब व कांहींसें मंद दिसतें खरें; परंतु त्यांत विशाळ बुद्धि, पूर्ण दृढनिश्चय कदाचित् हेकेखोरपणाहि झांकलेले असतील असा पहाणाराच्या मनांत संशय येण्यासारखा असे. ज्यांची विष्णुशास्त्री यांची प्रथमच गांठ पडली असेल व त्यांशीं विशेष बोलण्याचें कारण नसेल अशा

गृहस्थांचा विष्णुशास्त्री यांविषयीं फारसा चांगला ग्रह होत नसे. त्यांस स्वतः होऊन प्रथम बोलावयास नको असे, व सामोपचारार्थ भाषणांत त्यांची हुशारी किंवा योग्यता हीं दिसून येत नसत. व्यावहारिक गोष्टी, वर्तमानपत्रांतून चाललेल्या राजकीय विषयांच्या चर्चा वगैरे गोष्टी जर निघाल्या तर संभाषणाचा बहुतेक भाग अपरिचित मनुष्याकडेसच यावयाचा. विष्णुशास्त्री यांच्या तोंडांतून हं, हं, पेक्षां फारसें बाहेर कांहीं पडावयाचें नाहीं ! परंतु हे विषय सोडून जर मासिक पुस्तकांतील विषय, नवीन मराठी ग्रंथ, त्यांवरील टीका, जुनी मराठी किंवा संस्कृत कविता, त्याचप्रमाणें इंग्रजी ग्रंथ यांकडे जर भाषण वळलें तर विष्णुशास्त्री यांच्या संभाषणाचा कांहीं मासला दृष्टीस पडे; परंतु त्यांचा स्वभावच संकुचित असल्यामुळें विशेष परिचय असल्याशिवाय ते कधीं फारसे बहारींत येत नसत. चित्रशाळेचे माजी म्यानेजर रा. बाळकृष्णपंत हे सांगत असत कीं, त्यांजबरोबर सुद्धां विष्णुशास्त्री कामाशिवाय कधीं चार गप्पाविप्पा मारीत बसले आहेत असें कधींहि होत नसे. त्याचप्रमाणें न्यू इंग्लिश स्कूलच्या इतर चालकांपैकींहि कोणाबरोबर ते विशेष रहस्यानें कधीं बोलत बसले असतील असे प्रसंग तरी बहुधा विरळाच ! दुसरे काय बोलत असतील त्याकडे त्यांचें लक्ष असे, व मधून एखादे वेळीं ते एखादा खुबीदार शब्द बोलत असतील, परंतु मोठेंसें त्यांचें भाषण कधींहि म्हणून व्हावयाचें नाहीं. फार दिवसांचा ज्यांचा परिचय असेल किंवा त्यांच्याविषयीं ज्यांचा पूर्ण पूज्यभाव असून त्यांचें भाषण जे लक्ष लावून ऐकतील आणि स्वभावतः रंगेल असून त्यांच्या भाषणास आपल्या भाषणानें जे मधून मधून विसावा देत जातील, त्यांसच त्यांच्या भाषणाची किंमत होऊन त्यापासून लाभ होत असे. त्यांचा रंग म्हटला म्हणजे त्यांच्याच कुटुंबांतील त्यांचे बंधु लक्ष्मणराव, चुलतबंधु विनायकराव, दिनकरपंत, शाळिग्राम वगैरे मंडळी जमली असतां उडावयाचा ! तथापि निरनिराळ्या ग्रंथांवरील टीका, त्यांतील उत्कृष्ट स्थळें वगैरे ज्यांस विशेष ज्ञानाची जरूर आहे त्यांसंबंधीं विवेचन चाललें असतांना त्यांना प्रस्तुत चरित्रलेखकाशिवाय दुसरा अधिक भाविक श्रोता मिळत नसे हें उघडच आहे. पुष्कळदां संध्याकाळीं इतर सर्व उद्योग आटपून गेला आहे व इतर मंडळी

दुसरीकडे कोठें गेली आहे व अंधार थोडा थोडा पडत चालला आहे व पश्चिमेकडील आकाशांत चंद्राची कोर ताऱ्यांच्या समुदायांत रमणीय अशी दिसत आहे अशा वेळीं विष्णुशास्त्री वहारींत येऊन संस्कृत काव्यांतील खुबीदार स्थळें स्फुट सुभाषित पद्यें, मोरोपंतांच्या आर्या, त्याचप्रमाणें शेली बायरन वगैरे मधील उत्कृष्ट उतारे हीं मधून मधून आणून जें उत्कृष्ट विवेचन करीत त्या प्रसंगापेक्षां अधिक आनंदाचे व सुखाचे असे प्रस्तुत चरित्रलेखकाच्या आयुष्यांत दुसरे प्रसंग क्वचित्‌च आले असतील ! *

विष्णुशास्त्री यांच्या नित्यक्रमाची कल्पना चौथ्या भागाच्या शेवटीं त्यांचीं धर्मसंबंधीं मतें म्हणून जीं दिलीं आहेत त्यांवरून बरीच होण्यासारखी आहे. धर्मतत्त्वांचाच विचार केला असतां त्यांचा कल त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांच्याप्रमाणें कणादमताकडे असे; परंतु स्वमत म्हणून प्रसिद्धपणें प्रकट करतांना त्याची मर्यादा एकेश्वरी मतापर्यंतच असे,

---

* अशा प्रसंगीं विष्णुशास्त्री यांनीं म्हटलेलीं कांहीं उत्कृष्ट पद्यें जीं आम्हांस आठवतात व जीं आतां त्यांसच विशेष लागू पडणारीं असल्यामुळें तीं पूर्वींपेक्षां मनास अधिक चटका लावणारीं झालीं आहेत, तीं खालीं देतों:—भारतीययुद्ध संपल्यानंतर कर्णपत्नी त्याचें प्रेत समरांगणांत पडलेलें पाहून त्यास उद्देशून म्हणते:—

धर्मा त्रयोदशाब्द न ज्याच्या चिंतेकरूनि निज लागे ।
तो हा पुन्हां नुठाया वसुधे तुज दृढ धरूनि निजला गे ॥

भारत.

त्याचप्रमाणें रामायणांत महायुद्ध होऊन रावण मरण पावलेला पाहून त्याचा बंधु बिभीषण म्हणतो:—

तव हृदय श्रीकंठीं शिव शिव म्हणशी सदैव तूं वदनें ।
म्हणुनि जणो तुज वधिलें शिवदग्धें अन्यदुस्सहें मदनें ॥
कीं राज्यमदें राजा ! शिवासि विसरूनि सेविला काम ।
या अन्यायें क्षोभ स्मररिपुचा जाहला महोद्दाम ॥

मंत्ररामायण.

म्हणून मागें सांगितलेंच आहे. तथापि त्यांचा गृहक्रम पाहिला असतां त्यांचीं धर्ममतें वरील प्रकारचीं असतील असें वाटत नसे. दोन्ही सांज संध्या, पडली तर देवपूजा, आठा दिवसांनीं सप्तशतीचा पाठ, वसंतपूजेला ब्राह्मणांचे पाय धुणें वगैरे साधारण धर्माचरण त्यांचें असे; परंतु ज्याप्रमाणें त्यांचे वडील पाटावर जेवावयास बसले म्हणजे चार आचमनें टाकीत किंवा प्राणाहुति घेत, त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री हे वरील धर्माचार केवळ सांप्रदाय म्हणूनच करीत; यापेक्षां त्यांच्या मनावर त्यांचा अधिक संस्कार नसे.

विष्णुशास्त्री यांचा पोषाख साधाच असून त्यांचें ऐषआरामाकडे साधारण दुर्लक्षच असे. नवीन विद्वानांचे ढंग-पाटलोण, बूट, चहा, काफी,-यांचा त्यांस कंटाळा असे. त्यांची पत्नी ही आईबापांची एकुलती एक कन्या असल्यामुळें ती कधीं कधीं वर्षवर्ष त्यांच्या बरोबर दूर गांवीं असे व पुढें पुढें तिची प्रकृतिहि अस्वस्थ असे; परंतु विष्णुशास्त्री यांचें कधींहि वाईट मार्गांत पाऊल पडलें नाहीं; आणि पुणें शहरासारख्या साधुक वस्तींत याप्रमाणें आचरण ठेवणें म्हणजे मोठीच गोष्ट यांत संशय नाहीं! अशा वियुक्तप्रसंगीं विष्णुशास्त्री यांस रात्रीं पहावें तों उशाशीं शामदान जळत ठेवून अंथरुणावर पालथें पडून कोणातरी संस्कृत कवीचें किंवा मोरोपंताच्या भारतांतील एखाद्या प्रकरणाचें चालन ते करतांना पुष्कळदां बारांवर एकएक वाजेपर्यंत जागे राहिलेले दृष्टीस पडत. त्यांचा बहुतेक घरचा वेळ लिहिण्यांत किंवा वाचण्यांत जात असे. निबंधमालेचा मजकूर लिहिण्याचें काम त्यांचें नेहमीं चाले. त्यांची लिहिण्याची किंवा वाचण्याची अमुकच वेळ म्हणून नसे, लिहितां लिहितां कोणी गप्पा ठोकण्यास आला तर त्याबद्दल त्यांस कंटाळा आलासें दिसत नसे. कदाचित् पुष्कळ वेळां त्यांच्या चांगला अवडीचा मनुष्य आला तर तो आपणास विश्रांति देण्यासच आला असें समजून त्यांस बरेंहि वाटे. तथापि दररोज थोडीबहुत तरी त्यांची लेखणी मजल मारीतच असे; परंतु कधीं कधीं व विशेषतः शेवटल्या दोन वर्षांत ते गप्पा मारण्यांत बराच वेळ घालवीत. कदाचित् अशा रीतीनें त्यांस विश्रांति होत असेल

असें वाटतें. त्यांस फिरावयास जाणें दररोजच्या दररोज नियमानें हवें असे असें नसे. कोणी त्यांचे बंधु किंवा जवळचे स्नेही बरोबर असले तर त्यांशीं गप्पा मारीत चतुःशृंगीकडे किंवा पर्वतीच्या तळ्याकडे ते जात. गांवांत कांहीं नवीन गंमत-मग ती नाटक, सरकस, जादूचा खेळ, व्याख्यान, कथा कांहीं जरी-असलें तरी ते त्या प्रसंगाला हटकून जावयाचे ! उत्तम लळीत, उत्तम रंगदारी तमाशा किंवा गोंधळ्यांच्या पोवाड्यांची बैठक चालली आहे आणि तेथें प्रतिष्ठित मनुष्यांस दुरून ती ऐकण्याची संधी असेल तर ते ती बहुधा दवडीत नसत. त्यांचे मित्र रा. शाळिग्राम यांनीं 'ऐतिहासिक थोर पुरुषांचे पोवाडे' व 'रामजोशी, अनंतफंदी, गोविंदराव होनाजीबाळ यांच्या लावण्यांचा संग्रह' हीं जीं केलीं तीं विष्णुशास्त्री यांच्या उत्तेजनावरूनच प्रथम केलीं. मराठी कवितेचे पुष्कळ उत्कृष्ट मासले यांमधून निघण्यासारखे आहेत व महाराष्ट्र भाषा ऊर्जित दशेस आणण्यास हीं हल्लीं ग्राम्य मानलेलीं व हेळसांड झालेलीं साधनें फार उपयोगाचीं होतील असें त्यांचें मत असे. या गंमतीशिवाय विष्णुशास्त्री यांच्या हौशी म्हटल्या म्हणजे आपलें इष्टमित्रमंडळ बरोबर घेऊन कधींकधीं चिंचवडासारख्या अंमळ दूर अशा रम्य खेड्यास बरोबर फराळाचा सांठा घेऊन पायांनींच गमतरमत गप्पा मारीत व गमती करीत व वाटेंत नदीवर तासचे तास पाण्यांत डुंबत अशा सफरी करणें ह्या होत. असल्या प्रसंगीं शाळिग्राम, दिनकरपंत वगैरे मंडळींची मोठी धूम चाले !

विष्णुशास्त्री यांच्या स्वभावांत एक विशेष हा असे कीं, त्यांच्या ठिकाणीं स्वतःविषयीं बराच अहंपणा असे व तो त्यांच्या लेखांत बराच दिसूनहि येतो. या विशेषाचें दोषत्व त्यांनीं निबंधमालेच्या १६ व्या अंकांत 'गर्व' या निबंधांत जगन्नाथ पंडित, मिल्टन, मोरोपंत वगैरे कवींचीं उदाहरणें देऊन दूर करण्याचा यत्न केला आहे; तथापि हें खरें आहे कीं, कोणत्याहि पुरुषाच्या जीवितकालानंतर या उक्ति जशा लोकांस आवडतात किंवा कधींकधीं ह्रदयद्रावकहि वाटतात, तशा त्या त्यांच्या जीवितकालांत वाटत नाहींत. विष्णुशास्त्री हे एके प्रसंगीं-कदाचित्

नुकताच मालेचा ३० वा अंक संपवून उठले असतां—ते प्रस्तुतचे चरित्रकारास आपणा स्वतःविषयीं म्हणाले, 'I am the Sivaji of the Marathi language, who had not his equal either to precede or succeed him ! " त्या वेळीं ही उक्ति आम्हांस जरा उद्दामपणाची व अतिशयोक्तीची वाटली; परंतु आतां या गोष्टीस सतरा वर्षे होऊन जाऊन विष्णुशास्त्री यांची त्यांच्या मागें होऊन गेलेले व त्यांच्या नंतर झालेले कित्येक महाराष्ट्रीय ग्रंथकार यांची तुलना करून पाहतां वरील उक्ति अयथार्थ आहे असें म्हणण्याचें धाडस आमच्यानें करवत नाहीं !

विष्णुशास्त्री यांच्या मधील दुसरा विशेष म्हटला म्हणजे त्यांच्या वेळीं जे कित्येक विद्वान् व देशसेवेच्या कामांत पुढारी म्हणून म्हणविणारे लोक असत त्यांजविषयीं त्यांच्या ठिकाणीं फारसा पूज्यभाव नसे व हीहि गोष्ट त्यांचे लेखांवरून स्पष्टच आहे. वरील मंडळी आपण जुने पुराणे म्हणून जें शहाणपणाचें अवडंबर घालीत त्यावरून. त्यांस विष्णुशास्त्री उपहासानें First bones of Time असें म्हणत. या मंडळीविषयीं विष्णुशास्त्री यांस स्वतः चांगली माहिती होती व शिवाय अशा बड्या मंडळींशीं ज्या छोटेखानी मंडळीचा प्रवेश असून त्यांना पडद्याच्या आंतील त्यांच्या सर्व गोष्टी ठाऊक असतात, त्यांजपासून खरी हकीकत काढून घेण्याचा त्यांस हौस असे. यामुळें त्यांस या बड्या मंडळीच्या चांगल्या व वाईट अशा दोन्ही गुणांची माहिती होती. या मंडळीवर विष्णुशास्त्री यांचा मोठा आक्षेप असा असे कीं, तींत बरेचजण विद्वान्, बहुश्रुत, हुषार आहेत तरी त्यांचें बोलणें फार आणि करणें थोडें. व्याख्यानांची मात्र झोड; परंतु प्रत्यक्ष कृतीचा प्रसंग आला म्हणजे कोणी शकल काढणार कीं, ' हा काळ फक्त बोलण्याचा आहे, कृतीचा तो अद्याप यापुढें यावयाचा आहे !' दुसरे म्हणणार ' समाजापुढें एकट्यानेंच जाण्यांत बरें नाहीं; त्यांस आपणाबरोबर घेऊन चाललें पाहिजे. ' विष्णुशास्त्री यांचें म्हणणें असें असे कीं, या कोस्यांचा विचार बड्या मंडळींनीं व्याख्यानांच्या अगोदर केला असतां तर त्यांची इतकी फाजिती झाली नसती व लोकांत खुशालपणें एक बोलावें आणि वेळ पडली म्हणजे दुसरें करावें हें नवीन विद्वत्तेचें लक्षण म्हणून तीस

जें लांछन लागूं पहात आहे तें लागलें नसतें ! विष्णुशास्त्री यांस निदान हें—अस्थिर बुद्धीचें म्हणा अगर लबाडीचें म्हणा—लांछन लागलें नाहीं. त्यांनीं पहिल्यापासून जीं मतें निर्भीडपणानें प्रकट केलीं त्यांचें पर्यवसान सरकारी नोकरीवर पाणी सोडून स्वतंत्र उद्योगपरंपरेच्या अवलंबनावर न होतें व त्यांनीं इतके दिवस इंग्लिश विद्येचा वर्णिलेला जो प्रभाव—कीं तिच्या अध्ययनानें स्वतंत्रता, स्वाभिमान, देशाभिमान, स्वमताभिमान वगैरे उदात्त वृत्ति उत्पन्न होतात—त्याची प्रतीति दृष्टीस न पडती, तर विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं जुन्या वड्या मंडळीविषयीं पूज्यभावाचा अभाव जो दृष्टीस पडे तो केवळ व्यर्थ कुत्सितबुद्धि म्हणूनच म्हणावयाला पाहिजे होता !

विष्णुशास्त्री यांची पैशाविषयींची व्यवस्था त्यांचे वडील जिवंत असतां कशी असे हें मागें सांगितलेंच आहे. पुढें कृष्णशास्त्री यांच्या पश्चात् कुटुंबाची जोखीम त्यांच्या अंगावर पडल्यानंतरहि तींत फारसा फरक पडला नाहीं. लहानपपणीं कॉलेजांत राहण्यास जाण्यापूर्वी त्यांच्या आजोबांच्या मागें घरांतील किरकोळ खर्च करून तो लिहून ठेवण्याचें काम त्यांजकडे असे. त्या वेळीं ते आजोबांप्रमाणेंच तो फार चोख रीतीनें वेळच्या वेळीं लिहून ठेवीत असत; परंतु पुढें पुढें पैशाच्या कामांत त्यांची हलुहलू बरीच ढिलाई होऊं लागली. पगाराचे किंवा दुसरीकडले पैसे आले म्हणजे ते उघड्या कपाटांत किंवा पेटींत कधीं कधीं पडून रहावयाचे. एकदां ते सांगत होते कीं, त्यांच्या घरचा गडी काशीबा यास मीं एकदां माझ्या उघड्या पेटींतील रुपयांच्या चवडींतून कांहीं रुपये काढीत असतांना त्यांच्या चवडीवर हात ठेवलेला असा पाहिला; परंतु या अदतीपासून पैसे अव्यवस्थितपणें ठेवण्याची त्यांची खोड गेली नाहीं ! त्यांचा स्वभाव पैशासंबंधानें मूळचा भोळसर असून त्यांस अद्याप पैशाची किंमत कळून येण्याचा प्रसंग नसल्यामुळें दुसऱ्यांस उसनें-पासनें म्हणूनहि बऱ्याच रकमा त्यांच्या हातून जात व त्या परत आणण्याचा लकडा न केल्यामुळें कित्येक वेळां बुडूनहि जात. हिशेब ठेवण्याचें काम त्यांच्या मंडळीपैकीं कोणाकडे तरी असे; परंतु त्यांच्यावर

विष्णुशास्त्री यांचा विश्वास असल्यामुळें लिहिलेला हिशेब ते बहुतकरून पहात नसत; व पुष्कळ वेळां हिशेब व तिजोरीची किल्ली या दोघांचाहि चार्ज कारकुनाकडेसच असे! या ढिलेपणानें त्यांचें कधीं कधीं बरेंच नुकसान झालें. तरी त्यांच्या एकंदर सरळ व उदात्त वर्तनानें ज्यांच्या स्वाधीन त्यांचे कारखाने असत त्यांच्या मनावर अशी कांहीं चमत्कारिक छाप पडली असे कीं, पैशाची अफरातफर करावी अशी त्यांस बुद्धि झाली नाहीं व ते स्वतः मरून जाऊन आज दहा वर्षे होऊन गेलीं आहेत तरी वरील कारखान्यांपैकीं एकाचेंहि मागें पाऊल नसतां त्यांतील एक दोन तर त्यांच्या वेळेपेक्षां हल्लीं दसपट भरभराटींत आहेत. अशा प्रकारें हिशेब किंवा तिजोरी यांपेक्षां जास्त सुरक्षितपणा त्यांच्या पैशास येण्यास त्यांचें केवळ सरळ व उन्नत वर्तन हेंच कारणीभूत झालें!

विष्णुशास्त्री यांचा संबंध त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांशीं जो असे तो त्यांच्या एरवींच्या स्वभावास अनुसरूनच होता. त्यांच्या पासून कोणास कधीं उपद्रव होईल किंवा ते कोणास टाकून बोलतील असें कधीं होत नसे. तथापि त्यांचा स्वभाव कांहींसा खुनशी व आग्रही असल्यामुळें ज्यांविषयीं त्यांचें मन एकदां उतरलें त्यांविषयीं तें पुन्हां नीट बहुधा होत नसे. परंतु अशा मनुष्यास त्यांपासून कधीं कांहीं उपद्रव पोहोंचत नसे; मात्र ते त्यांशीं भाषण म्हणून करीत नसत. त्यांचें प्रेम व कळकळ हींहि यांच प्रकारचीं नेमस्तच असत. साधारण होण्यासारखी असेल ती मदत ते करीत; परंतु आपला उद्योग सोडून कोणाच्या पाठीस लागून त्याच्याकडून बळेंच अभ्यास किंवा दुसरा एखादा उद्योग करून घेणें हें त्यांच्या हातून होत नसे. त्यांचा पत्रव्यवहार साधारण बेताचाच असे, व तो अर्थातच हल्लींच्या प्रघातास अनुसरून इंग्रजींतच असे. विशेष कांहीं कारण नसेल तर त्यांच्या बंधूस सुद्धां ते महिनामहिना पत्र पाठवीत नसत. इंग्रज लोकांत पत्रव्यवहाराचा प्रघात फारच आहे; तो आपल्याकडे अद्याप कमीच असल्यामुळें चरित्रलेखनाच्या कामांत त्याची मोठी उणीव आहे. विष्णुशास्त्री यांचीं मूळ पत्रें थोडीं व त्यांतून पुष्कळ केवळ खाजगी मजकुराचीं असल्यामुळें त्यांतून निवडून चार पांचच येथें

दिलीं आहेत. हीं पत्रें सहज व सुवाच्य लिहिलीं असून त्यांतील भाषा चटकदार व आवेशयुक्त अशी आहे.

आतां शेवटीं विष्णुशास्त्री यांची डायरी व तसेंच कांहीं गुप्त लेख हीं लिहिण्याची तऱ्हा याविषयीं लिहून हें प्रकरण आटपतों. त्यांनीं डायरी लिहिण्यास १८७३ सालीं आरंभ केला. तेव्हांपासून तों मरण्याच्या तीन चार दिवस अगोदरपर्यंत ती त्यांनीं लिहून ठेवलेली आहे; परंतु तींत कोणत्याहि गोष्टीची दुसऱ्यांस समजेल अशी हकीकत वगैरे कांहीं नाहीं. फक्त तुटक दोन दोन चार चार शब्द आणि तेहि कांहीं इंग्रजींत, कांहीं मराठींत, आणि कांहीं कांहीं तर अशा तऱ्हेनें लिहिलेले कीं, ते दुसऱ्यांस वाचतांच येऊं नयेत. अशी या डायरीची तऱ्हा आहे. त्याच-प्रमाणें त्यांचीं कांहीं पेणसलीनें लिहिलेलीं तुटक टिपणें आहेत; परंतु त्यांतील लिपी म्हणजे मुंग्यांच्या पायांच्याच पंक्ति! डायरी व गुप्त टिपणें हीं लोकांस समजलीं असतां व्यर्थ वितुष्ट व द्वेष उत्पन्न होण्याचा संभव असतो व तीं केवळ लिहिणाराच्याच उपयोगाकरितां असतात; तेव्हां या मूळ उद्देशास अनुसरून विष्णुशास्त्री यांनीं तीं अशा तऱ्हेनें लिहिलीं असावींत. हे दोन्ही लेख त्यांच्या मनाचा खोलपणा व मनुष्यस्वभावाच्या निरनिराळ्या गंमती समजण्याची त्यांची आवड ह्या दोन गुणांचे दर्शक होत. ह्या शेवटल्या गुणाला लागूनच कोणत्या विवक्षित प्रसंगीं मिळालेल्या वस्तु मोठ्या काळजीनें राखून ठेवण्याची त्यांची आवड असे. अमुक प्रसंगीं अमुक मास्तरांनीं दिलेला हातरुमाल, अमुक प्रसंगाचा अमुक रुपाया इत्यादि वस्तूंविषयीं वरील टिपणांप्रमाणेंच त्यांची त्यांस आठवण व प्रीति हीं असत!

निबंधमालेंतील या वर्षाचा मुख्य विषय–' आमच्या देशाची स्थिति ' हा होय. इतके दिवस विष्णुशास्त्री यांनीं जे विषय हातीं घेतले ते बहुतेक विद्यासंबंधानेंच होते. राजकीय असा विषय त्यांनीं प्रथम हाच हातीं घेतला. या महत्त्वाचे विषयासंबंधानें त्यांचीं कांहीं कांहीं मतें यामागें इतर विषयांच्या विवेचनांत मधून मधून आलेलीं होतीं; परंतु त्यांचें संगतवार व स्वतंत्र रीतीनें विवेचन करणें अत्यंत जरूर असून तें अधिक

काळाचें व विशेष शोधकपणा व विचाराचें काम असल्यामुळें विष्णुशास्त्री यांनीं इतका वेळ तें मागें ठेवलें होतें. शिवाय असल्या विवेचनास सरकारी नोकरीची शृंखला अगदीं उपयोगाची नाहीं तीहि अद्याप निघावयाची होती. तेव्हां प्रस्तुत निबंधांतील विवेचन जितकें स्वतंत्रपणानें व निर्भीडपणानें झालें आहे तितकें मागें कधींहि झालें नव्हतें. या विषयाच्या संबंधानें विष्णुशास्त्री यांचीं काय मतें आहेत हें जाणण्याची अर्थातच वाचकांस पुष्कळ दिवस इच्छा होती; ती प्रस्तुतच्या निबंधांत त्यांनीं पूर्ण केली आहे.

या निबंधावर एकंदर ७ अंक आहेत. त्यांत इंग्लिश लोक या देशांत प्रथम कसे आले व त्यांनीं अल्प काळांत येथें चोहोंकडे आपली सत्ता कशी पसरविली, त्यांच्या ठिकाणीं आपल्या एत्तद्देशीय प्रजेविषयीं कशा भावना आहेत व प्रजेच्या त्यांजविषयीं कशा आहेत, त्याचप्रमाणें प्रस्तुत सरकारापासून आपलें कोणकोणतें हित झालें आहे इत्यादि गोष्टी मोठ्या प्रांजलपणानें व निर्भीडपणानें सांगितल्या आहेत. इंग्लिश लोकांच्या अंमलाखालीं या देशांत अनेक कला सुरू होऊन काय अद्भूत गोष्टी दृष्टीस पडूं लागल्या आहेत याचें विष्णुशास्त्री यांनीं पुढील चमत्कारिक वर्णन केलें आहे—

दुसरी गोष्ट व्यावहारिक कलांचें ज्ञान. या कला अलीकडे साऱ्या युरोपांत व अमेरिकेंत किती वाढल्या आहेत व त्यांच्यापासून मानवजातीचें किती कल्याण झालें आहे व होण्यासारखें आहे हें आजच्या मित्तीला कोणालाहि सांगण्याची जरूर उरली आहे असें नाहीं. छापखाना, आगगाडी, आगबोट, तारायंत्र, प्रकाशालेख्य, गिरणी वगैरे गोष्टींकडे जो क्षणभर लक्ष पुरवील त्यास ' सहाव्या पुस्तकां'तील ' तीन राक्षसां'च्या धड्याची आठवण झाल्या-शिवाय खास राहणार नाहीं. केवढ्या अद्भूत या शक्ति! ' महाभारतांत ' वेषधारी नलराजाच्या सारथ्यकर्माचें वर्णन केलेलें आहे कीं, ऋतुपर्ण राजाचा शेला रथवेगाच्या सपाट्यांत उडून खालीं पडला, तेव्हां बाहुकानें त्यास सांगितलें कीं, ' तो राहूं द्या आतां, एक योजनभर तो मागें राहिला आहे ! '

वरील इतिहासांत अर्जुनाच्या हस्तलाघवाचें वर्णन केलें आहे कीं, त्यानें एका बाणाच्या टोंकाला पत्र लावून तें आपल्या बापाच्या कचेरींत धाडून दिलें. त्याप्रमाणेंच कर्णानें पृथ्वी उचलिली, मारुतीनें सूर्यबिंबाच्या ग्रासार्थ उड्डाण केलें, दुर्वासऋषीनें एकदम अठ्यांयशीं सहस्र ऋषींचा तांडा आणून पांडवाच्या आश्रमाशीं 'अलक्ष' म्हणून गर्जना केली, व येवढा जबरदस्त भोजनसमारंभ काम्यकवनांत घडविला ! वरील सर्व अचाट गोष्टी आज एकोणिसाव्या शतकांत प्रत्यक्ष घडूं लागल्या आहेत ही केवढी अजब बात आहे ! आमच्या गुर्जरदेशाधिपतींस जेव्हां परवां अग्निरथांत घालून चाळीस तासांत पूर्वसमुद्रतीरचें मद्रपुर दाखविलें, तेव्हां त्यास ऋतपर्णाचा हेवा करण्यास थोडेंच कारण राहिलें असेल ! मोठमोठ्या राजेरजवाड्यांच्या डोक्यांवरून सफाई हात फिरवून लॉर्ड डालहौसीसाहेब जेव्हां थकले भागले होत्साते हरि हरि म्हणावयाला परत निजधामास गेले, व लंडनांतल्या तारागृहांतून त्यांनीं हिंदुस्थानाची आलबेली विचारली, तेव्हां अर्जुनाच्याच कृतीचा नमुना उतरला नाहीं काय ? वरील भारती वीराच्या प्रतिपक्ष्यानें 'सप्तद्वीपा पृथ्वी' मोठ्या प्रयासानें सारी चार अंगुलें उचलिली; आज एकोणिसाव्या शतकांत तर तिला तागडींत घालून तिचें वजनहि काढून मंडळी मोकळी झाली आहे ! अंतरालांत लाखों कोस उड्डाण एका क्षणांत करण्याचें अद्भुत साधन आज मानवजातीस उपलब्ध झालें आहे हें कोणास माहीत नाहीं ? त्याप्रमाणेंच वरच्यासारखा दाढीवाल्यांचा कंपू जर एकदम येऊन उतरला, तर तितक्यांची अन्नसामग्री एका सपाट्यास तयार करण्याची तजवीज या अद्भुत शतकांतल्या एखाद्या सार्वजनिक महानसांत सहज होण्यासारखी आहे. बोळवणी करतांना प्रत्येक ऋषिजनास वस्त्रदान करावयाचें मनांत आणल्यास तेंहि तसेंच सुकर आहे ! सारांश, रावणानें जसे सर्व देव काबीज करून कोणाची पाककर्मावर तर कोणाची सम्मार्जनावर वगैरे नेमणुक करून साऱ्यांस सारखें राबविलें होतें, त्याप्रमाणेंच आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांनीं सर्व महाभूतें वठणीस आणून त्यांजपासून ते चोपून कामें घेत आहेत !

यानंतर इंग्लिश लोकांचे राज्यापासून आमच्या लोकांचें झालेलें अहित हें सांगत असतां स्वातंत्र्यनाश याचा प्रथम निर्देश करून आमच्या

कित्येक सुखावलेल्या मंडळींचें जें म्हणणें आहे कीं, ‘ स्वातंत्र्य हें वस्तुतः अत्यंत इष्ट खरें; परंतु ‘ आम्ही आपला स्वतःचा कारभार करण्यास अगदीं नालायक आहों व स्वातंत्र्य हें आम्हांस हितकारक न होतां उलटें अगदीं अनिष्टप्रद होणारें आहे, ’ ह्या मुद्याचें खंडण विष्णुशास्त्री यांनीं फार उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे तें वाचकांस वाचण्यास आम्ही शिफारस करितों.

यापुढें इंग्लिश राज्यकर्त्यांचीं आमच्या देशासंबंधानें कर्तव्यें कोणतीं आहेत व हल्लीं त्या संबंधाचा प्रकार कसा आहे हें दाखवून तो ख्रिस्ती धर्माच्या शुद्ध तत्त्वांविरुद्ध, नीतितत्त्वांविरुद्ध व राज्यव्यवहाराच्याहि विरुद्ध आहे हें फार चांगल्या रीतीनें प्रतिपादन केलें आहे. ख्रिस्ती धर्म मूळ परमपवित्र व त्याचा उत्पादक महासाधु पुण्यात्मा असतां त्याचें नांव पुढें करून इतिहासांतील मोठमोठे पुरुष म्हणून गाजलेल्या कितीएक ख्रिस्ती बहादरांनीं आपल्या दुष्ट व घोर कृत्यांनीं त्यास व त्याच्या सद्धर्मास कशी काळोखी आणिली आहे हें दर्शवीत होत्साते विष्णुशास्त्री लिहितातः—

सदरील ख्रिस्ती धर्माचा पैगंबर हा युधिष्ठिर, बुद्ध, सॉक्रेटीस, तुकाराम या लोकांच्या कोटींतला होता. अशा विभूति ‘ भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् ’ या महाकविवचनास अनुसरून या भूतलावर कधीं कधीं अवतीर्ण होत असतात; तर तोच मासला परम शठ जे यहुदी लोक त्यांच्यांत ‘ भांगेंत तुळस ’ या न्यायानें वरील महापुरुषाच्या रूपानें दृष्टीस पडला. त्यानें तीसपासून तेहेतीस वर्षांपर्यंतच काय तो धर्मोपदेश केला; पण त्या तीन चार वर्षांत पेरलेल्या बीजाचेंच फळ येवढ्या प्रचंड व वैभवयुक्त रूपानें साऱ्या पृथ्वीभर आज कित्येक शतकें दृष्टीस पडत आहे. आतां वरील उपदेश काय होता हें जर पाहिलें, तर सर्वांवर दया करावी, प्रत्यक्ष शत्रूचीहि क्षमा करून त्याजबद्दल ईश्वरापाशीं करुणा भाकावी, एका गालावर मारली असतां दुसरा पुढें करावा, सारें मनुष्यमात्र हीं परमेश्वराचीं लेंकरें होत, यास्तव अमुक मंडळी देवाची लाडकी आणि अमुक नावडती या कल्पना कुत्सित होत, याप्रमाणें अत्यंत सात्त्विकपणाचा तो होता. तुम्ही आपल्या देशांतून उठा आणि परमुलखावर जाऊन धाड घाला, ज्यांनीं तुम्हांस कधीं काडीचाहि उपद्रव दिला नाहीं त्यांचे मुलुख काबीज करा, ज्यांनीं

सालसपणानें तुम्हांस आश्रय दिला त्यांच्यावरच उठून अरेरावी करा, रणवाद्यें वाजवा, जयस्तंभ उभारा, खोट्या सह्या करा, दुसऱ्यांच्या बायका उपटा, दिवसाढवळ्या दरवडे घाला, वाटेल त्यास उचलून फांशीं द्या, यांपैकीं एकहि प्रकार ' शुभवर्तमानां ' त आढळत नाहीं. वरील सर्व प्रकार मुसलमानांच्या पैगंबरानें केलेल्या उपदेशास कांहींसे साजणारे आहेत; कां कीं, जरी वरील घोर कर्मांचा त्यानें साक्षात् उपदेश केला नाहीं, तरी तरवारीच्या लखाखीनें सद्धर्माचा प्रकाश साऱ्या दुनियेवर पाडण्याची त्यानें आज्ञा दिली असल्यामुळें एकंदरींत तोच पर्याय झाला. पण बिचाऱ्या येशूनें तीहि आज्ञा आपल्या शिष्यांस दिली नाहीं, व स्वतः तरवारीस तो कधीं शिवलाहि नाहीं. उलट त्याच्या चरित्रकारांचा तर असा उल्लेख आहे कीं, त्यास सुळावर चढवितांना त्यानें अत्यंत थोरपणाची गंभीरवृत्ति धारण करून लोकांच्या अज्ञानाबद्दल कारुण्य प्रकट केलें, आणि त्यांच्या कल्याणार्थ आपल्या पित्यापाशीं मनोभावेंकरून प्रार्थना केली ! मग हें सर्व जर खरें आहे, तर गुरूंत व शिष्यांत हें केवढें महदंतर ! आमची तर पक्की खात्री आहे कीं, हेस्टिंग्स, डालहौसी, लिटन्, टेंपल, फ्रीयर अशांसारख्यांस खिस्ताच्या शिष्यांत सामील करणें म्हणजे ' वेषधारी लांडग्यां ' स मेंढ्यांत गणणें किंवा डंकनरोडवासी अखंड सुवासिनींचें ' सीता, मंदोदरी, तारा ' या वर्गांत परिगणन करणें यासारखेंच होय ! ' पवित्रशास्त्र ' म्हणजे ' इसापनीति ' जर नसेल, आणि ' आकाशांतील बापा ' नें जर खरोखरच सिनिया पर्वतावर मोश्याला ' आज्ञादशक ' दिलें असेल, तर वरील खाशा मंडळींची व त्यांच्या लक्षावधि देशबंधूंची इतउत्तर काय व्यवस्था होणारी असेल ती असो !!

त्याचप्रमाणें—

बिचारा येशूख्रिस्त दोन हजार वर्षांपूर्वी हालअपेष्टा होऊन मरण पावला, त्याच्या नांवावर आज हवें त्यानें हवें तें कृत्य करावें. तो आकाशांतून उतरून कोणाचा हात धरायाला येतो आहे असें कांहीं नाहीं, किंवा बीकन्सफील्ड महाराज व त्यांचें पंचायतन यांच्या ' सीक्रेट डिपार्टमेंटां ' त तो थोडकाच डोकावून पाहतो आहे; मग त्याचें फुकाचें नांव घेऊन त्याखालीं जर हवें तें दडपून द्यावयाला सांपडतें आहे तर कशाला कमी करा ! पंढरपुरच्या विटोबानें दामाजीपंताबद्दल जशी एकदम भरपूर रसद पोंचवून दिली, त्याप्रमाणें

वरील प्रभूनें आपल्या रक्तानें आपल्या क्रोधाविष्ट पित्यास संतुष्ट करून पुढच्या व मागच्या सर्व पापांबद्दल साऱ्या मनुष्यजातीची हमी भरून भरभक्कम ऐवज स्वर्गाच्या दरबारीं एकदम पटवून दिला आहे. तेव्हां आतां ख्रिस्तभक्तांच्या आचरणांत वैगुण्य काढण्याची प्रत्यक्ष आकाशांतील बापाचीहि पुण्याई नाहीं ! !

हे वरील लेख खरोखर सत्यशील व दयाशील अशा खिस्ती धर्मानुयायी मनुष्यास किती यथार्थ म्हणून वाटण्यासारखे आहेत बरें ! !

या नंतर या देशांतील राजेरणवाड्यांच्या शोचनीय स्थितीचें वर्णन करून हल्लींच्या स्थितींत त्यांनीं काय काय केलें पाहिजे याविषयीं समर्पक असा त्यांस बुद्धिवाद केला आहे. शेवटीं सामान्या लोकांच्या स्थितीकडे वळून आपल्या मागील पिढींतील पुढारी लोकांचे आपल्या देशोन्नतीसंबंधानें जे कित्येक चुकीचे ग्रह — कीं आपल्या देशांत मूर्तिपूजा, धर्म, बालविवाह जातिभेद, मांसभक्षणाविषयीं प्रतिबंध वगैरे गोष्टींमुळें आपल्या देशाचें या मागें नुकसान होऊन तो परतंत्र झाला—यांचें खंडन करीत असतां आपला हिंदुधर्म हा केवळ अव्यावहारिक असल्यामुळें तो आपणांस सोयीचा नाहीं असें जें कित्येकांचें म्हणणें आहे त्यावर विष्णुशास्त्री पुढील समर्पक उत्तर देतात:—

ख्रिस्ती धर्म येवढा सोज्ज्वल व सुधारणेस अत्यंत अनुकूल म्हणून त्याचा मिथ्यास्तव तदनुयायी करतात, व तेंच तुणतुणें आमच्या इकडे नूतन पंडितहि पुढें चालवतात; पण वस्तुतः पाहतां वरील धर्मासारखा व्यवहारदृष्ट्या अप्रयोजक धर्म दुसरा फारच थोडा सांपडेल. आमच्या राज्यकर्त्यांचे सद्गुरु साक्षात् ईश्वरपुत्र हे आपल्या अनुयायांस उपदेश करतात,—" बाबांनों, तुमच्या एका गालावर कोणीं मारली असतां दुसरा गाल पुढें करीत जा, " " तुमच्यांशीं दुसऱ्यानें जसें वागावें असें तुम्हांस वाटतें तसें दुसऱ्यांशीं वागत जा, " " माझें राज्य या लोकांचें नाहीं, तर आकाशीचें आहे व तें जवळ येत आहे. " हा उपदेशाचा भाग झाला. आतां ' पवित्र शास्त्रांतील ' आचार-प्रकरण पहा. आदितवारीं ईश्वरानें विश्रांति घेतली, यास्तव सर्व मनुष्यांनीं त्या पवित्र दिवशीं विश्रांति घ्यावी, कांहींएक काम करूं नये, जो करील तो महापातकाचा अधिकारी होईल. त्याचप्रमाणें ईश्वराची मोठी तुतारी

शेवटल्या न्यायाच्या दिवशीं वाजणार आहे. यास्तव सर्वांनीं आपापल्या थडग्यांतून बाहेर पडण्याची त्या दिवसाची तयारी करून ठेवावी ! आतां वरील उपदेश व वरील आचार यांविषयीं जर विचार केला तर साऱ्या ख्रिस्ती लोकांच्या माथीं ईश्वरदत्त आज्ञांचा केवळ भंग केल्याचा चार्ज येत नाहीं काय ? एका थोबाडींत लगावली असतां दुसरें थोबाड पुढें करणारे ख्रिस्तपुत्र आज साऱ्या भूमंडळावर कितीसे आढळतील बरें ? येशूच्या नांवावर विकून प्रतिमासीं हजारों रुपये पोतडींत भरणाऱ्या पाद्रीसाहेबांवरच वरील चपेटिका-प्रयोग केला असतां पोलिसास न बोलावणारे देवाचे लाल कितीसे सांपडतील ? क्लैव, हेस्टिंग्स्, डालहौसी, लिटन्, टेंपल वगैरे मंडळींची शेवटल्या दिवशीं ईश्वरपुत्र सपाटून पाठ थोपटील काय ? ही सारी खासी मंडळी जर ख्रिस्ती होय, तर उमाजी रामोशास वरील न्यायाच्या दिवशीं ख्रिस्ताचें धर्मासन कां मिळूं नये ? इंग्रजांचा व साऱ्या ख्रिस्ती लोकांचा आज कित्येक शतकें जो एकंदर जगाशीं व्यवहार चालू आहे त्यास वरील ख्रिस्तप्रणीत द्वितीय सूत्र कितपतसें लागू पडेल बरें ? इंग्रज लोक गेल्या शतकभर आमच्याशीं ज्या तऱ्हेनें वागले त्याच तऱ्हेनें इतरांनीं त्यांच्याशीं वागावें असें ते इच्छितात काय ? आम्ही उठून उद्यां इंग्लंडावर गेलों, आणि सारी दौलत आणून हिंदुस्थानांत भरली तर चालेल काय ? नाना तऱ्हेचे चरक लावून तेथील सारी प्रजा पिळून काढली असतां तें आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंस कितीसें मानवेल बरें ? फुलर साहेबांनीं एका शिपायास मारलें आणि त्याच्या बायकोला तीस रुपये त्याच्या प्राणाची भरपाई म्हणून दिले, त्याप्रमाणें एखाद्या ख्रिस्तपुत्रास आकाशांतील बापाकडे रवाना करून मडमसाहेबांची समजूत वरील दक्षिणा देऊन केली तर मोठी मौज होईल नाहीं बरें ! बिचारा क्रुसावर चढणारा येशू जर आपल्या शिष्यांस असें सांगतो, कीं मी तुम्हांस आकाशांतील राज्याचे वांटेकरी करीन, तर आजपर्यंत या सच्छिष्यांनीं साऱ्या पृथ्वीवर जो धिंगाणा घातला व अझूनहि घालीत आहेत, व नवी नवी रणसामग्री करून एकमेकांच्या उरावर बसण्यास ते जे नेहमीं टपलेले असतात, हा सर्व प्रकार ईश्वरपुत्राच्या कानावर जेव्हां पूर्वोक्त दिवशीं जाईल तेव्हां त्यास काय वाटेल बरें ? आमच्या साध्याभोळ्या आदिपितरांनीं नुसतें झाडाचें फळ तोडून खाल्लें येवढ्याबद्दल जर

अल्लासाहेब इतके क्रुद्ध झाले, तर त्यांच्या पुत्रास वरील आज्ञाभंग पाहून किती अपरिमित संतोष होईल कोण जाणे !! याप्रमाणेंच विश्रामदिवशीं काम केलें असतां महापातक लागतें या पवित्र आज्ञेचा तरी वरील सत्यधर्मी लोक कितीसा प्रतिपाळ करतात हें दिसतेंच आहे; तसेंच जहाजावर जे जे मरतात त्यांचा अंत्यविधि 'समुद्रास्तृष्यंतु' या बचनास अनुसरून जो होत असतो त्या वेळेस तरी पवित्र शास्त्र गुंडाळूनच ठेवतात कीं नाहीं? कां कीं अटलांटिक किंवा पासिफिक महासागराच्या तळीं शेवटल्या दिवशींची तुतारी वरील ख्रिस्तपुत्रांच्या कानीं पडेल हें म्हणणें नीट दिसत नाहीं; आणि त्यांतून ही जी मंडळी माशांच्या उदरीं जाऊन त्यांचा तळिराम गार करीत असेल त्यांची तर बिचाऱ्यांची मधल्यामध्यें काय वाट होणार कोण जाणे! 'इतो भ्रष्टास्ततो भ्रष्टाः'!! असो; तर एकंदरींत काय सांगावयाचें, कीं ईश्वरप्रणीत व अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचा जो खासा ख्रिस्तीधर्म त्याची वर सांगितल्याप्रमाणें दशा आहे. त्यांतील अत्यंत मूलभूत सिद्धांतहि व्यवहाराला अत्यंत विरुद्ध आहेत. त्याप्रमाणें जर कोणी चालेन म्हणेल तर त्या बिचाऱ्यास एक पाऊलहि पुढें टाकण्याची सोय नाहीं. मग असें असतांहि आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंनीं जर आज इतकी मजल मारली, तर प्राच्य आर्यांनीं येवढें हवालदील होऊन हात टेकून कशाला बसायाला पाहिजे बरें? आम्हांस तर खास वाटतें कीं, आजपर्यंत आमच्या खाशा विद्वन्मंडळानें आपल्या जुन्या धर्माच्या संबंधानें व भटांच्या नांवानें सदोदित हाकाटी करीत बसायाचें सोडून आपला देश सुधारण्याच्या कामीं जर एकदम कंबर बांधली असती, तर आज मित्तीला आम्हीं केवढा पल्ला आटपला असता! पण आजपर्यंत झालेला प्रकार कांहीं विचित्रच। मूर्तिपूजा ही आमच्या देशाच्या सुधारणेस अत्यंत विघ्नभूत, म्हणून ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरेंची स्थापना अवश्य झाली पाहिजे; जुने शास्त्री व जुनीं भटें मोठीं खडतर, म्हणून 'प्रथम पाठशाळेचा विध्वंस होऊन हें पुरंधरचें बंड मोडलें पाहिजे;' जातिभेद हा तर मोठाच समंध, यास्तव सब्‌गोलंकार करण्याचा मक्ता पाश्चात्य सुधारणेचा केवळ अर्कच जो द्राक्षरस त्याच्याकडे सोपून दिला पाहिजे; युरोपांत स्त्रियांच्या पाणिग्रहणास कांहीं मर्यादा नाहींच. यास्तव चाळीस व पन्नास वर्षांच्या कोंवळ्या वधूवरांचा

संयोग होऊन लग्नाची टाळी वाजली पाहिजे; आमच्यांतले नामदारपुत्रप्रभृति एकेक जाडे जाडे पंडित तिकडे विलायतेस जाऊन पार्लमेंट गर्जवून देणार, यास्तव सोंवळ्याओंवळ्याचें मूर्खपणाचें लचांड काढून टाकण्याकरितां देहास पावन करणाऱ्या बुटणेरी पावांचा ओनामा येथपासून पढला पाहिजे ! याप्रमाणें आमचीं सुधारणेच्छु मंडळी आजपर्यंत कोणीकडे भकून गेली आहे याचा पत्ता नाहीं; आणि इतके दिवस सुधारणेच्या मार्गे लागलें असतां ती अद्याप घावली नाहीं ती नाहींच ! नाहीं म्हणायला ' शिव शिव न हिंदुर्नयवनः ' इतक्या मासल्याचें कांहीं चार चार करायाला मात्र शिकलों आहों ! त्यांच्या योगानें आमच्या पूर्व स्वरूपास आम्ही मुकून हल्लींच्या दैन्य व विपत्ति यांच्या विलक्षण स्थितीस मात्र येऊन पोंचलों आहों !–ना धर्म, ना देश, ना सामर्थ्य, ना संपत्ति, ना कांहीं ! !

प्रस्तुत निबंधाच्या शेवटील अंकांत हल्लीं आमच्या देशाची खरोखरच निकृष्टावस्था आहे कीं काय या प्रश्नाचें उत्तर विष्णुशास्त्री पुढीलप्रमाणें देतात:—

प्रथमतः आमच्या प्रस्तुतच्या ऱ्हासास्थितीची उपपत्ति. प्रस्तुत विषयावर आमच्या आजपर्यंत काय समजुती झाल्या आहेत त्या नुकत्याच आम्हीं प्रदर्शित केल्या आहेत; यास्तव त्या पुनः येथें दाखल करण्याची जरूर नाहीं. आमचा ठरलेला सिद्धांत आम्हीं मागेंच नमूद केला आहे, कीं आमच्या देशास कांहींएक झालें नाहीं. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांहींएक विकार नाहीं. यास्तव आमच्या अर्वाचीन पंडितमंडळीनें डॉक्टरी पद्धतीस अनुसरून एकावर एक जालीम दवे करून व शस्त्रक्रियेचे तीव्र प्रयोग करून त्याची जी हलाखी मांडली आहे व विनाकारण विटंबना आरंभली आहे, ती सर्व सोडून देऊन साधारण पौष्टिक उपचार त्याजवर सुरू केले असतां तो लवकरच पुनः पहिल्यासारखा सशक्त व तेजस्वी होईल याविषयीं आम्हांस बिलकूल संशय नाहीं. हल्लीं जी आमच्या राष्ट्रास विपत्तीची स्थिति प्राप्त झाली आहे ती आमच्या अंगच्या कांहीं अनिवार्य दोषामुळें आली नसून ती यदृच्छेनें कोणत्याहि देशास येण्यासारखी आहे, व आजपर्यंत आलीहि आहे. इंग्रेज लोक हे आम्हांहून अनेक प्रकारांनीं बलिष्ठ असल्यामुळें व आमचें दैव फिरल्यामुळें

हलीच्या अवस्थेंत आम्ही येऊन पडलों आहों. ज्या प्रबलतेमुळें व ज्या सद्गुमुळें स्कॉटलंडसारखा वीर्यपरिप्लुत देश आमच्या राज्यकर्त्यांच्या सत्तेखाली आला, आणि फिलिप व नेपोलियनसारखे मी मी म्हणत त्यांच्यावर चढाई करून गेले असतां ते हतवीर्य होऊन माघारीं आले, त्याच दोन कारणांचा येथेंहि प्रभाव गाजला आहे. बाकी ज्या देशांत शिवाजी, बाजीराव, माधवराव, राघोबा, हैदर, यशवंतराव, रणजितासिंग, तात्या टोपी, असले तरवार बहादर होऊन गेले व बाळाजी विश्वनाथ, नाना फडनवीस सखाराम बापू, महादजी शिंदा, नानासाहेब, असले मसलती पुरुष ज्या देशांत निपजले तो म्हणजे क्यापटन क्लैवसारख्यांस व वारन् हेस्टिंग्ससारख्यांसहि हार जावा, अशांतलीं बिलकुल गोष्ट नव्हती ! पण कालगति विचित्र आहे; त्या वैचित्र्यांतीलच आमची प्रस्तुतची स्थिति हा एक प्रकार होय.

येणें प्रमाणें रोगाचें निदान ठरवून त्यास उपचार काय केला म्हणजे देशस्थिति सुधारेल तो विष्णुशास्त्री सांगतातः—

तर देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञान संपन्न करणें हा होय. ही संपन्नता सिद्ध करण्याची मोठीं दोन साधनें म्हटलें म्हणजे रसना व लेखणी हीं होत. पहिल्या सदराखालीं शाळा, व्याख्यानें हीं येतात, व दुसऱ्याखालीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व ग्रंथ हे येतात. या दोन्ही साधनांचा उत्कर्ष होऊन या अज्ञानांध राष्ट्राचे डोळे उघडावे एतदर्थ आमच्या थोर व दयाळू सरकारानें आजपर्यंत थोडा उद्योग केला आहे असें नाहीं. युनिव्हर्सिटी (विद्यापीठ,) विद्यालयें, शाळा, वगैरेंची स्थापना करून आज वर्षोनवर्षे त्यांची व्यवस्था चालविली आहे व देशभाषांची अभिवृद्धि व्हावी म्हणूनहि होईल तितका यत्न सरकारानें केला असून अजूनहि तो चालू आहेच. पण सरकारानें आपलें काम बजाविलें म्हणून तितक्यानें काय झालें ? आम्ही स्वतः मोठे कर्तृत्वाचे पडलों ना ! आमच्या तोंडावर अचानक जांभूळ पडलें तरी तें आंत लोटायलाहि आणखी कोणी पाहिजेच ! आमची मर्दुमकी अशी कीं, रहतरावाप्रमाणें आम्हांला घोड्यावर बसवून शिवाय आमच्या हातून लोकांनीं तरवारहि मारविली पाहिजे ! वस्तुतः पाहतां सरकारानें जर इतका पल्ला मारला, तर बाकीची मजल आम्हीं मोठ्या संतोषानें व उत्साहानें केव्हांच

आटपावी. येवढा ज्ञानाचा प्रवाह आडवून त्याची मालकी जर आमच्या सरकारानें आमच्या नवीन बांडास दिली, तर नलिकाद्वारें घरोघर उदकसंचय करण्याचें अल्पस्वल्प कामहि त्यांच्यानें होऊं नये? पण हें करतो कोण व गरज कोणाला? शिवाय असें करण्यापासून कांहीं फायदा होण्यासारखा आहे हें तरी कोणाच्या अंतःकरणांत बिंबलें आहे? आमच्या भाषेंत म्हण आहे कीं, 'डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर,' तर याच न्यायानें सारी व्यवस्था चालली आहे. आमची अन्नान्नगत झाली आहे, दुष्काळाचा तडाका उडाला म्हणजे लाखों लोकांची चांदी उडते आहे, सरकारदेण्याखालीं रयतेचा चुराडा होत आहे, लोकांस आपल्या सामान्य हक्कांचें व सामान्य गोष्टींचें सुद्धां ज्ञान नसून त्याच्या अभावीं त्यांची स्थिति पशुवर्गासारखी होऊन गेलेली आहे, येवढा हा संपन्न देश असतां, येथील लोकसंख्या येवढी असतां, लोकांची बुद्धि येवढी प्रखर असतां व आहे तेथें अर्थसंचयहि विपुल असतां कल्पवृक्षाखालीं उपवास या न्यायानें इतकी प्रजा व्यर्थ हाल सोसते आहे,—ही स्थिति सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे; आणि देशोन्नतीचे धुरंधर वरील विपत्तींच्या प्रतिकारार्थ उद्योग काय करीत आहेत म्हणाल, तर एक आकाशांतील बापास आरोळी देत आहेत, दुसरे आपल्या लेंडकिरवीं कोणा गौरकाय अधिकाऱ्याचें हस्तपीडनपूर्वक स्वागत करताहेत, कोणी पार्लमेंटच्या गर्दीत गुंग होऊन गेले आहेत, कोणी अर्वाचीन सोमरसांत तल्लीन होऊन जातिभेदरूप महान् अनिष्टाचा उपशम होऊन या देशास आराम पडावा म्हणून अर्वाचीन ऋषींचा तांडा जुळवून गवालंबाचें अनुष्ठान करीत आहेत, कोणी सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिदिवशीं उंबरठे पुजून त्यांच्यापुढें निरंतर. लांगूलचालन करीत आहेत, इ० इ० ! हा सर्व प्रकार आम्हांस तर केवळ लज्जास्पद दिसतो. मेकॉलेसारख्यांनीं येवढी भवति न भवति करून व येवढा अट्टाहास करून जो नवीन शिक्षणपद्धति सुरू केली तिचीं वर सांगितलीं हींच फळें काय? त्यांनीं लावलेल्या उत्तम वृक्षास दरवर्षीं येवढा मोहोर येत असतां तो बहुधा सगळाच्या सगळा गळून जावा आणि फळ म्हणून प्रायः मुळींच धरूं नये ही केवढी खेदाची गोष्ट आहे! आमच्या राष्ट्राचे पालक म्हणून ज्यांस सरकारानें नेमलें आहे त्यांनीं आपला अधिकार किती उत्कृष्ट रीतीनें आजपर्यंत बजावला बरें?

वरील पारिग्राफ ऐन वक्तृत्वाच्या भरांत आलेला असून तो विष्णुशास्त्री यांच्या अकालिक मृत्यूनें तसाच अर्धाच राहिलेला पाहून सहृदय वाचकांस चांगला चटका लागल्यावांचून राहणार नाहीं !

एकंदरींत हा निबंध मागील दोन तीन निबंधांपेक्षां लहान आहे खरा, तथापि त्यांतील विषयांच्या महत्त्वाच्या मानानें तो त्या सर्वांमध्यें अग्रगण्य म्हणून धरितां येईल; तो नवीन होतकरू विद्वानांनीं अवश्य वाचावा अशी आम्ही त्यांस शिफारस करितों. येथें त्यांतील जे उतारे घेतले आहेत त्यांशिवाय आणखीहि दुसरीं त्यांत उत्कृष्ट स्थळें आहेत. त्यांपैकीं मुख्य म्हटलीं म्हणजे–अंक ७७, आकडा ६ यांतील इंग्लिश राज्यापासून झालेला तिसरा फायदा–मानसिक उन्नति–याचें निरूपण, अंक ७८. आंकडा २ यांतील आपल्या देशाचा स्वातंत्र्यनाश याचें विवेचन; अंक ७८ आंकडा ३।४ यांतील इंग्लिश लोक या देशांत आल्यानें ज्याप्रमाणें चौदाव्या शतकाच्या अखेर मूर लोकांच्या अंमलापासून स्पेन देश मुक्त झाला त्याप्रमाणें या भरतभूमीस मुसलमान लोकांच्या राज्याचा र्‍हास करून मराठे वीरांनीं व मुत्सद्यांनीं स्वातंत्र्य व स्वराज्य यांचा अमृतयोग आणला असतां तो नाहींसा कसा झाला याचें निरूपण व अंक ७९ आंकडा २ यांतील आपल्या देशांतील हल्लींचे इंग्लिश राजसत्तेचा अपूर्व प्रकार याचें खुबीदार वर्णन–हीं होत.

या वर्षाच्या अखेरीस विष्णुशास्त्री यांच्या मातुश्री रामेश्वरास निघून गेल्या. यामुळें घरांत नियंत्रितपणें वागण्यास सांपडून त्यांस कांहींसा आराम वाटला. या वेळेस त्यांनीं लक्ष्मणरावांस पत्र पाठविलें तें खालीं देतों:—

Poona 28|12|81

Dear brother,

Mother is going shortly to Rameshwar. So dispatch your quota of fifty.

I am doing all right. I have settled the business of Kaviatihasa, Shivaji, the two presses, the school and the shop to entire satisfaction of myself. I separated myself from the Kaviatihasa yesterday on the receipt of Rs. 700 * *

Our uncle has been to Baroda with the other fashionable folks. The other uncle is away on tour. Mother will shortly be off. My wife is now doing pretty well ; her short stay at Supa with Wari has apparentlly done her good. From the above you will see that I will enjoy a quite christmas and you can very well understand what shall contribute to that quiet. I hear from mother that you complained of my non-communication to her. You can lay this to no worse account, I am sure, than want of matter and of time. The time is fast coming when the so many volcanoes at home will be lulled into decent calmness, and shall leave us leisure to indulge our communications. You yourself can have but a faint idea of my critical position for the last three years. It is now that I may be said to have broken the two hostile camps that directed their batteries upon each other and upon ourselves. * *

Yours affectionately
V. K. CHIPLONKAR.

भाग ८ वा.

अंत.

Life's race well run,
Life's work, well done
Life's crown well won,
Now comes rest.

मागील सात भागांत विष्णुशास्त्री यांचें चरित्र कालक्रमानें त्यांच्या वयाच्या बत्तिसाव्या वर्षापर्यंत आणून पोंचविलें आहे. आतां या भागांत त्यांच्या आयुष्यांतील बाकी राहिलेल्या दोन आडीच महिन्यांचा इतिहास सांगून यापुढें अधिकाधिक नवीन उद्योग हातीं घेण्याचे संकल्प त्यांच्या मनांत घोळत असतां मध्येंच कोणत्या चमत्कारिक रीतीनें त्यांचा अल्पवयांत अकस्मात अंत झाला हा अनुत्साहाचा कथाभाग आणिला आहे.

या वर्षाच्या आरंभी विष्णुशास्त्री यांची तब्येत चांगली हुषार व तरतरीत असून त्यांनीं यापुढें नवीनच एका मोठ्या उद्योगास आरंभ करण्याचा संकल्प केला होता. निबंधमाला त्यांनीं प्रथम सुरू केल्यास आतां आठ वर्षें होऊन गेलीं होतीं. इतक्या काळांत तिचे चवऱ्यांयशी अंक संपून त्यांचा एकंदर संग्रह केला तर तो बाराशें पंधराशें पानांचा प्रचंड ग्रंथ होण्यासारखा झाला होता. तथापि निबंध लिहिणें म्हणजे ग्रंथकाराच्या कामगिरीची केवळ पहिलीच पायरी होय, व शिवाय मासिक पुस्तकांत त्यांचा समावेश होत असल्याकारणानें थोडेबहुत ते वेळेवर काढावेच लागत असल्यामुळें निबंध हे कांहीं अंशीं अपुरेच लेख होत असें समजून विष्णुशास्त्री हे यापुढें निबंधमाला बंध करून त्यापुढील जी पायरी—ग्रंथमाला—तिजवर पाऊल ठेवण्याच्या विचारांत होते. ज्याप्रमाणें मेकॉले साहेबांचे प्रसिद्ध निबंध त्यांच्या इंग्लंडच्या इतिहासाची केवळ प्रथम पायरीच होती व ती संपतांच ते एकदम आपले प्रचंड इतिहासाच्या

उद्योगास लागले, त्याप्रमाणेंच विष्णुशास्त्री यांचाहि निबंधमाला संपवून 'ग्रंथमाला' म्हणून नवीनच महदुद्योगास लागण्याचा संकल्प होता. तो कांहीं काळ चालला असता तर हल्लीं इंग्रजींत ज्याप्रमाणें International series, Morley's Series, Huxley's Primer series वगैरे अनेक ग्रंथमाला आहेत, त्याप्रमाणेंच मराठी भाषेंतहि 'ग्रंथमाला' अत्यंत उपयुक्त झाली असती यांत संशय नाहीं. आठ दहा वर्षें एकसारखें लिहून लिहून उत्तम चटकदार अशी साधलेली भाषापद्धति, अनेक ग्रंथांच्या वाचनानें व बऱ्याच अधिक आलेल्या जगाच्या अनुभवानें बनलेली प्रौढ विचारसरणी, व शिवाय वडिलांपासून प्राप्त होऊन ती निदान द्विगुणित केलेली अशी ग्रंथकार म्हणून ख्याति या सर्व कारणांनीं ही माला लवकरच लोकप्रिय होऊन तिच्या योगानें लोकशिक्षणांत खरोखर मोठी भर पडली असती यांत संशय नाहीं, परंतु आपल्या या हतभाग्य देशांत-हतभाग्य यांत संशय नाहीं ज्यांनीं ज्यांनीं म्हणून देशहिताच्या कामीं झटून थोडेंबहुत वर डोकें काढूं लागावें त्यांजवर अकालिक मृत्यूची धाड आली नाहीं असें अलीकडे बहुधां होत नाहीं, असा जो साधारण नाउमेदीचा सिद्धांत होऊं पहात आहे, त्याप्रमाणें विष्णुशास्त्री यांनीं जो महत्संकल्प योजिला होता तो त्यांचे अकालिक मरणानें जागच्या जागींच राहून गेला ! विष्णुशास्त्री यांस आपल्या मंडळींचा फोटोग्राफ बऱ्याच दिवसांत काढला नाहीं, तो पुन्हां काढवावा असें वाटून त्यांनीं त्याजबद्दल तजवीज करण्यास सांगितलें. त्यावरून पुरुष मंडळींचा एक व बायकांचा एक असे दोन फोटोग्राफ काढण्याचा विचार झाला. त्याप्रमाणें एका पोर्तुगीज फोटोग्राफरास घरीं बोलावून आणून त्याजकडून बायकांचा फोटोग्राफ ता. १५ जानेवारीस काढून घेतला. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं पुरुष मंडळींचा फोटोग्राफ काढण्याकरितां सर्व मंडळी गाडींत बसून लष्करांत फोटोग्राफरच्या घरीं गेली. मंडळींच्या फोटोच्या दोन प्रती घेणें झाल्यावर विष्णुशास्त्री यांचा एकट्याचाच ते उभे आहेत असा एक निराळाच फोटो घ्यावा अशी मंडळींनीं इच्छा प्रदर्शित केल्यावरून हा नवीन फोटो घेण्यास ते उभे राहिले असतां फोटोग्राफर अमळ कमी वाकबगार असल्यामुळें विष्णुशास्त्री

यांस उन्हांत तसेंच अधिक वेळ उभें राहवें लागलें. इतक्यांत त्यांस घेरी येऊन ते एकदम भुईवर खालीं पडले. थोड्या वेळानें पाणी वगैरे लावून ते सावध झाले; परंतु त्यांच्या तोंडास दुखापत होऊन पुढील दोन दांत दुखावले व उजव्या कानांतून रक्त आलेंसें दृष्टीस पडलें. या अपघातामुळें मंडळी घाबरून तशीच लवकर घरीं परत आली. ही दुखापत प्रथम फारशी भयंकर वाटली नाहीं; परंतु एक दोन दिवसांनीं विष्णुशास्त्री यांस बारीक ताप येऊं लागून हातपायांची आग होते असें त्यांस वाटं लागलें; परंतु ही व्याधि सौम्य उपचारांनींच हळुहळू दूर होईल असें वाटून त्यांनीं सामान्य घरगुतीच औषधोपचार चालविला. महिना पंधरा दिवसांनीं तोंडांची दुखापत बरी झाली; परंतु बारीक ताप चालूच राहिला व शरीरांतील अशक्तताहि कमी होईना. यामुळें ते महिना दीड महिना शाळेंत मुळींच गेले नाहींत. तथापि निबंधमाला व केसरींतील मजकूर लिहिणें हीं तशींच चाललीं होतीं. वरून पाहणारांस विष्णुशास्त्री यांस कांहीं आजार आहे हें कळत नसे; त्यांस मात्र आंतून अस्वस्था वाटत होतें. यामुळें शाळेंतील कित्येक मंडळीस वाटे कीं, विष्णुशास्त्री हे उगीच कांहीं तरी आजाराचें सोंग काढून शाळेस टाळा देतात !

विष्णुशास्त्री यांचा काव्येतिहासाशीं जो संबंध होता तो याच सुमारस सुटला म्हणून मागील भागाच्या शेवटीं जें त्यांचें पत्र दाखल केलें आहे त्यांत उल्लेख केलाच आहे. हें मासिक पुस्तक सुरू होतांना त्यांत विष्णुशास्त्री यांचा पुष्कळ अंशीं मुख्य भाग होता हें मागें सांगितलेंच आहे; परंतु व्यवस्थापक मंडळीच्या स्वभाववैचित्र्यामुळें तींतून हळुहळू एक एक इसम गळत गेला ! प्रथम असामी बाहेर पडली ती रा. शाळिग्राम हे होत. त्यांच्या मागून वर्ष सहा महिन्यांतच रा. तात्या केळकर यांनीं तोच रस्ता सुधारला. विष्णुशास्त्री हे तीन वर्षें टिकले होते; परंतु त्यांच्या हातून अनेक व्यवसायामुळें काव्येतिहाससंग्रहाचा मजकूर वेळेवर मिळत नसल्यामुळें त्या पुस्तकाचे रा. केळकर यांच्या मागें झालेलें व्यवस्थापक रा. साने यांस तें आवडत नसे. रा. साने यांचा स्वभाव तापट असून विशेष हिशेबी असल्यामुळें विष्णुशास्त्री यांस तो पसंत नसे. यामुळें

हळुहळू परस्परांचें बनेनासें होऊन विष्णुशास्त्री यांनीं आपलें अंग काव्येतिहासांतून काढून घेतलें. या वेळीं त्यांची प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें थोड्या कारणानेंहि ते संतापून जात. विष्णुशास्त्री यांस काव्येतिहासंग्रह हें माझ्याच मदतीनें म्हणून बरेंच उदयास आलें म्हणून कांहीं अंशीं अयोग्य अभिमान वाटे, व रा. साने यांसहि तें पुस्तक माझ्याच मेहनतीनें पुष्कळ लोकप्रिय झालें आहे व त्यांतील जुन्या बखरींचा जो भाग आहे तो इतर दोन्हींपेक्षां पुष्कळ अधिक लोकमान्य आहे म्हणून तितकाच अयोग्य अभिमान वाटत असे. शेवटीं विष्णुशास्त्री व रा. साने यांचा या संबंधानें जो पत्रव्यवहार झाला तो दोघांच्याहि इष्टमित्रांस अगदीं अप्रशस्त वाटण्याजोगा आहे यांत संशय नाहीं. दोघांच्या समजांत कांहीं तरी चूक असून शिवाय विष्णुशास्त्री यांची प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें त्यांच्या हातून कित्येक वृथा दोषारोपण घडले आहेत. तथापि काव्येतिहासांतून एका मागून एक असे—शाळिग्राम, तात्या केळकर, विष्णुशास्त्री—घसरून जाऊन शेवटीं काव्येतिहाससंग्रहहि यानंतर लवकरच बुडालें. यावरून रा. साने यांजकडे त्यांच्या तापट व विशेष हिशेबी स्वभावाचा हा परिणाम कदाचित् असेल असा संशय येण्यास जागा आहे.

विष्णुशास्त्री यांची प्रकृति अस्वस्थ असतांच त्यांचें चित्त अधिक व्यग्र करण्यास याच वेळीं केसरी व मराठा या पत्रांवरील कोल्हापुरचे माजी कारभारी माधवराव बर्वे यांचा बेअब्रूबद्दलचा जंगी खटला मुंबई हायकोर्टांत फेब्रुआरी महिन्यापासून सुरू झाला होता. तो आठवड्यांतून तीन दिवस मुंबईस चालत असल्यानें व शिवाय बारिस्टर, सालिसिटर, साक्षीदार यांचा खटाटोप चालविण्याचा असल्यामुळें न्यू इंग्लिश स्कुलच्या मंडळीची मोठी तारांबळ होऊन गेली. तथापि या वेळीं त्यांच्या कॉलेजांतील रा. केळकर, फाटक वगैरे कित्येक ग्रॅज्युएट स्नेही होते त्यांनीं शाळेंतील काम बरेंच संभाळलें होतें. बर्वे यांच्या खटल्यांत विष्णुशास्त्री यांचा संबंध नव्हता. ज्या लेखांवरून बेअब्रूची फिर्याद झाली तसले लेख त्यांच्या लेखणींतून निघण्यासारखे नव्हते व याचें कारण

त्यांची तसल्या विषयांविषयीं अप्रीति व गैरमाहिती हीं होत हें मागें सांगितलेंच आहे. तथापि त्यांच्या इष्टमित्रांस वरील खटल्याचें स्वरूप भयंकर वाटून ते त्यांजबद्दल काळजी वाहूं लागले. त्यांनीं लक्ष्मणरावांस या संबंधानें एक पत्र लिहिलें आहे व तें त्यांनीं लक्ष्मणराव यांस लिहिल्यापैकीं शेवटलेंच होय. त्यांत आणखीं कांहीं दुसऱ्या गोष्टींचा समावेश आहे त्याबद्दल येथें कांहीं निराळें लिहिण्याची जरूर नाहीं. तें पत्र येणेंप्रमाणें:—

5th March 1882
Poona.

Dear brother,

Mother has not yet returned from pilgrimage. She may however arrive in a week or so.

The particulars of the case now pending are known to all; and the others shall come out in the course of the proceedings. I have personally however little to do in the matter. It is Messers Tilak and Agarkar chiefly who have investigated the case for themselves and launched into it. There is to be sure a good prospect for its success. However let us wait and see.

I am somewhat ill. But barring this, I may be said to continue in the enjoyment of that calm atmosphere I wrote to you of in my last. The Dnyan Prakash business keeps one camp in quiet and the pilgrimage the other. The other party (k) makes his stays now and then at Poona when his office is here. But when mother is off, he is of course quiet enough. He finds himself at present in a strange world, of an entirely new growth. In such a world as I am creating the old grandees shall of course be—and must be—simply nobodies.

Yours affectionately
V. K. CHIPLONKAR.

वरील पत्रांत विष्णुशास्त्री यांनीं आपल्या स्वतःच्या दुखण्याबद्दल अंमळ उल्लेख केला आहे; परंतु तें लवकरच कोणत्या भयंकर थरावर जाणार होतें याची त्यांस किंवा दुसऱ्या कोणासहि या वेळीं कल्पना नव्हती. ते महिना दीड महिना शाळेंत गेले नव्हते व मंडळीची आपणांविषयीं उगीच व्यर्थ टीका होऊं नये म्हणून त्यांस अंमळ बरें वाटूं लागतांच ते सुमारें मार्च ९ रोजीं सकाळीं शाळेंत गेले; परंतु थोडेंसें काम करून ते लवकर घरीं परत आले. त्यांस त्या दिवशीं असा कांहीं थकवा वाटला कीं, तसा यापूर्वी मला कधींच वाटला नव्हता असें ते म्हणाले. यानंतर एक दोन दिवसांनीं त्यांची मातुःश्रीहि यात्रेहून परत आली; परंतु तिलाहि त्यांच्या दुखण्याचें स्वरूप न समजून तिनें आपण परत सुखरूप आल्याबद्दल व घरांतील सर्व मंडळी खुशाल आहेत म्हणून लक्ष्मणरावांस लिहून कळविलें. विष्णुशास्त्री हे म्हणत कीं, ते रत्नागिरीस असतांना त्यांस असाच एकदां बारीक ताप येत होता व हातापायांचीहि आग होत असे; परंतु सौम्य उपचारांनींच ते त्या वेळीं बरे झाले. आतांहि तसाच प्रकार असून आपण पूर्वीप्रमाणेंच हळुहळू बरे होऊं अशी त्यांची समजूत होऊन त्यांनीं डॉक्तरांस वगैरे आपली प्रकृति दाखविली नाहीं. या वेळीं त्यांचा डॉक्तरांविषयीं कांहीं वाईट ग्रह झालेला होता. त्याविषयीं त्यांचा उद्गार निबंधमालेच्या ८२ व्या अंकांत खालीं दिल्याप्रमाणें बराच गैरवाजवी आहे:—

"डॉक्तर साहेबांस पाचारण करावयाचें म्हटलें म्हणजे प्रथम रथ सज्ज करा, निघण्यापूर्वीं 'किंचित् व्यावहारिक द्रव्य' म्हणून पाद्यपूजा करा, नंतर स्वारीची पायधूळ बिचाऱ्या रोग्याच्या घरीं बूटस्टाकिंगनिशीं झाल्यानंतर नलिकाप्रयोग वगैरे थोडेंसें सोंग झालें कीं, आणा कागद आणि पेन, कीं साहेबांनीं आपल्या पातीदार दवाखानेवाल्यावर दिली एक चिठ्ठी खरडून! हें आटपलें कीं लागलेंच निघालें घड्याळ खिशांतून, कीं चालली स्वारी पुनः फडकत—मग या त्यांच्या इंग्रजी थाटाखालीं मध्यें बिचाऱ्या रोग्याचें कांहीं कां होईना, त्याची कोणाला पर्वा आहे."

यावरून कित्येक जुन्या मतांच्या लोकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, विष्णुशास्त्री यांस डॉक्तरी औषधोपचार तो धर्माविरुद्ध असल्यामुळें पसंत नसेल; परंतु विष्णुशास्त्री यांचा कटाक्ष डॉक्टरांच्या औषधोपचारावर नसून तो त्यांच्या केवळ तऱ्हेवाईक वागणुकीवरच आहे व कांहीं डॉक्तरांची तऱ्हा पाहिली असतां विष्णुशास्त्री यांचा कटाक्ष निराधार असें म्हणतां येणार नाहीं. तथापि वस्तुस्थितीकडे नजर देऊन त्यांच्या गुणांचा उपयोग करून घेणें हेंच समंजसपणाचें लक्षण होय. परंतु विष्णुशास्त्री यांची या वेळीं कल्पनाशक्ति त्यांच्या विचारशक्तीपेक्षां प्रबळ झाली असल्यामुळें योग्य उपाय करावयाचे ते त्यांच्या हातून झाले नाहींत ! वास्तविक पाहिलें तर विष्णुशास्त्री यांच्या घरांत पहिल्यापासून डॉक्तरी औषधाचाच प्रचार असे, व ते सांगत असत कीं, त्यांच्या एका आताच्या शेवटल्या दुखण्यांत त्यांस पोर्टवाईन देत असत व ती दररोज नियमानें देण्याचें काम आपणाकडेसच असे. या दोन्ही गोष्टींवरून पाहतां त्यांनीं या वेळीं डॉक्तरी औषधोपचाराबद्दल जो दुराग्रह दर्शविला तो धर्मसंबंधानें नव्हे हें उघड आहे. असो. रा. बाळकृष्णपंत वगैरे मित्रमंडळींनीं विष्णुशास्त्री यांची नीटशी अवस्था नाहीं असें पाहून त्यांस सुचविलें कीं, तुम्हांस जर डॉक्तरी औषध नको असेल तर वैद्याचें तरी औषध घ्या. त्यावरून ता. १५ रोजीं विष्णशास्त्री यांनीं रा. गणेशबोवा साकुरडीकर वैद्य यांचें औषध घेण्यास सुरुवात केली. विष्णुशास्त्री यांस वाटलें कीं, आपणास मलावरोध जो झाला आहे तो प्रथम गेला पाहिजे; यावरून वैद्यबोवांनीं एक काढा करून घेण्यास सांगितला; परंतु तो त्या दिवशीं लागू पडला नाहीं; त्यामुळें त्यांच्या अंगाची आग अधिक वाढून रात्रीं त्यांस झोंप मुळींच आली नाहीं. पहाटे पहाटेस अंमळ डोळा लागला, परंतु प्रकृतीस स्वस्थता म्हणून वाटेना. इतक्यांत त्यांस कुबुद्धि झाली कीं, कांहीं विशेष शीतोपचार केला असतां बरें वाटेल. म्हणून कलिंगड किंवा द्राक्षें किंवा अंजीर असें कांहीं घेऊन येण्यास त्यांनीं सांगितलें. घरांत कोणी वयस्क अनुभवशीर मनुष्य असल्या गोष्टींचा निषेध करण्यास नसल्यामुळें कलिंगड आणवून त्याचा थोडासा तुकडा विष्णुशास्त्री यांनीं

खाल्ला. पुढें त्या दिवसभर त्यांस कांहीं विशेष विकृति वाटली नाहीं- उलटें दुपारच्या चार वाजण्याच्या सुमारास त्यांचे चुलतबंधु विनायकराव हे त्यांच्या समाचारास आले असतां आज जरा बरेंच वाटत आहे असें विष्णुशास्त्री म्हणाले. यानंतर विनायकराव व इतर मंडळी गोष्टी सांगत तशीच संध्याकाळपर्यंत त्यांच्या जवळ बसली; परंतु सुमारें सात वाजण्याच्या सुमारास विष्णुशास्त्री यांस ताप भरूं लागून तो हळुहळू चढूं लागल्यासारखा त्यांस वाटूं लागला. यापुढें तासाभरानें त्यांस जेवण्याकरितां भात वगैरे आणिला असतां विनायकराव हे विष्णुशास्त्री यांस कोंचावर बसल्याबसल्याच त्यांच्या तोंडांत घांस भरवूं लागले. इतक्यांत काशीताई (मातुःश्री) यांचा बोलतांना शब्द ऐकून त्या खोलींत येत आहेत असें समजून विष्णुशास्त्री तसेंच कोंचावरून धडपडून उठून खालीं पाट मांडला होता त्यावर चटकन जाऊन बसले! काशीताईनीं आपणास कोंचावर बसून जेवतांना पाहिलें असतां ती बोलेल असा धाक त्यांस या अत्यवस्थेंत सुद्धां वाटत असे! थोडासा भात खाऊन ते पुन्हां कोंचावर पडले; परंतु लवकरच ताप अनावर होऊन विष्णुशास्त्री यांस त्यांच्या अचुक बोलण्यावरून वायूची लहर झाली असावी असा मंडळीस संशय वाटला. त्यावरून त्यांनीं सीतारामपंतांकडे मनुष्य पाठविला. तों ते डॉ० विश्राम यांस दहा वाजण्याच्या सुमारास घेऊन आले. या वेळीं विष्णुशास्त्री वायूनें बरेच व्याप्त झाले असल्यामुळें व त्यांनीं डॉक्तरांच्या आगमनाचें जें वर दाखल केल्याप्रमाणें वर्णन केलें आहे तसा चुलत्यांच्या व डॉक्तरांच्या येण्यानें भास झाल्यामुळें ते अगदीं असंबद्ध असें मोठ्या आवेशानें वायूच्या लहरींत बोलूं लागले. सीतारामपंतास पाहतांच ते ओरडून मोठ्यानें म्हणाले, " Uncle, run to my arms! I am dying Give me a draught of water—a draught of water—

डॉ० विश्राम यांनीं उष्णतामापक यंत्र लावून पाहिलें तों ताप तर १०७ अंशापर्यंत धडकला आहे व वायूच्या विकाराचा जोर बराच झाला आहे. त्यांनीं सीतारामपंतांस कळविलें कीं, विष्णुशास्त्री यांची अवस्था भयंकर आहे; परंतु ते प्रिस्क्रिपशन वगैरे लिहिण्याच्या तयारीस लागतात

इतक्यांत विष्णुशास्त्री यांच्या वायूच्या लहरीनें उलट खाऊन तीस डॉ० विश्राम यांस निक्षून म्हणाले. " I w'ont take your medicine. I shall'nt be poisoned! Take care—you will have to answer—This is Kolhapur Maharaja's case—इत्यादि विष्णुशास्त्री यांचें विकाराचें भाषण ऐकून डॉ० विश्राम हे आग्रहास पडले नाहींत. सीतारामपंत म्हणाले कीं, " विष्णु हा सध्यां शुद्धीवर नाहीं; त्याच्या बोलण्याकडे लक्ष देतां कामा नये; तुम्ही सांगाल तर मी औषध बळेंच पाजवीन. " परंतु डॉ० विश्राम यांनीं सांगितलें कीं, ' तसें करून उपयोग होणार नाहीं. विष्णुशास्त्री हे जर वैद्याचेंच औषध घेत असतील तर उद्यां सकाळीं वैद्याच्या हातूनच आपण त्यांस औषध देववूं. ' इतकें झाल्यावर डॉ० विश्राम व सीतारामपंत हे निघून गेले; परंतु सीतारामपंत हे जातां जातां शेजारीं बसलेल्या मंडळीस विष्णुशास्त्री यांच्या अत्यवस्थे-बद्दल लक्ष्मणराव यांस तार करावयास सांगून निघून गेले.

यानंतर विष्णुशास्त्री यांचे कांहीं स्नेही साकुरडीकर वैद्यबुवांकडे जाऊन त्यांस घेऊन आले. वैद्यबोवांनीं काढा करवून तो विष्णुशास्त्री यांस पिऊं घालून घरीं निघून गेले. या वेळीं मध्यरात्र उलटून एक वाजला होता. तेव्हां स्नेही मंडळी थंकून भागून विष्णुशास्त्री यांचा इतक्या थोड्या वेळांतच अंत होईल याची कल्पना त्यांस न होऊन ते तेथेंच आसपास कांहीं जागत कांहीं निजत असें तेथेंच पडून राहिले. इतक्यांत सकाळच्या पांच वाजण्याच्या सुमारास विष्णुशास्त्री यांस शेवटचा घोर लागून त्यांचा अंतकाळ समीप आला हें पाहून सर्वजण घाबरून गेले. मग कोणी बापु मेंघळे यांजकडे धांवले, कोणी सिव्हिल सर्जनकडे गाडी धांवडीत घेऊन गेले व कोणी डॉ० गर्दे यांजकडे गेले; परंतु त्यांतून कोणीहि येण्यापूर्वींच विष्णुशास्त्री यांचा अंत होऊन गेला होता!! या वेळेस सुमारें साडेपांच वाजले असून तो दिवस गुरुवार तारीख १७ मार्च १८८२ हा होता.

चित्रशाळेंतील नोकर लोक काम करावयास सकाळीं आले तों त्यांचा जीवनहेतु ह्याचा अवतार संपला हें ऐकून त्यांस अत्यंत आश्चर्य वाटून

दुःख झालें. गांवांत विष्णुशास्त्री यांच्या एकाएकीं मरणाची बातमी तोंडोतोंडीं तेव्हांच पसरली. ते आजारी आहेत याबद्दल बातमी फारशी नसल्यामुळें पुष्कळ लोकांना त्यांच्या दुखण्याची व मृत्यूची खबर एकदमच कळली. न्यू इंग्लिश स्कूल, हायस्कूल वगैरे शाळांतून व ठिकठिकाणच्या सार्वजनिक बैठकींच्या जागेंतून ही दुःखकारक बातमी पोंहोंचतांच विद्यार्थ्यांच्या व गांवांतील संभावित व शिष्ट गृहस्थांच्या टोळयांच्या टोळया डोलकर आळीकडे येतांना दृष्टीस पडूं लागल्या. विष्णुशास्त्री यांचा अशा तऱ्हेनें एकाएकीं व अकालीन मृत्यु झाल्यामुळें सर्व मंडळींच्या चेहऱ्यांवर खेदाश्चर्य स्पष्ट दिसूं लागलें. इतक्यांत डॉ० गर्दे हे आले. त्यांनीं तपासणी करून सीतारामपंतांस विष्णुशास्त्री यांचा अंत झाला; आतां बाकी कांहीं राहिलें नाहीं असें कळविलें! याप्रमाणें डॉक्तरांचा शेवटला निकाल कळतांच सर्व मंडळी स्तब्ध झाली! इतक्यांत विष्णुशास्त्री यांचें सर्व घर मंडळीच्या गर्दीनें भरून जाऊन आंत येण्यास अगदीं रीघ नाहींशी झाली. घरभर चोंहोंकडे आक्रोश व दुःखाचें रडणें हीं ऐकूं येऊं लागलीं! सर्व रस्ता प्रेक्षक लोकांच्या जमावानें भरून गेला. जागोजाग थवेचे थवे उभे राहून 'कृष्णशास्त्री यांचें घर बुडालें!'—'मराठी भाषेचा पुरस्कर्ता गेला!'—'काय हो थोड्या वयांत केवढा खटाटोप मांडला होता—पण सर्व लयास गेला!'—बिचाऱ्या काशीताईची कांहीं कीं हो पुण्याई फळाला आली नाहीं!'—इत्यादि निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे दुःखाचे उद्गार बाहेर पडूं लागले. इतक्यांत एक कंडी निघाली कीं, कोल्हापूर प्रकरणाची धास्ती घेऊन विष्णुशास्त्री यांनीं विषप्रयोगानें आत्महत्या करून घेतली असावी! ही बातमी पोलिसांत जाऊन सिव्हिल सर्जन यानें प्रेत तपासल्याशिवाय पुढील संस्कार होत नाहीं असा कांहीं वेळ धाक पडला; परंतु प्रोफेसर केरोपंतनाना, बाबा गोखले वगैरे वजनदार मंडळी मध्यें पडून त्यांनीं डॉ० विश्राम यांचें वरील संशयनिवृत्तीचें सर्टिफिकीट दाखल करतांच पोलिसांनीं पुढें कटकट केली नाहीं. तरी या घोंटाळ्यामुळें विष्णुशास्त्री यांचें प्रेत घरांतून निघण्यास सुमारें अकरा वाजले. यानंतर तें नदीवर नेलें. तेथें

सर्व प्रकारची मंडळी इतकी जमली होती कीं, तेथील बहुतेक सर्व वाळवंट भरून गेला होता. या वेळीं लक्ष्मणराव हे तेथें नसल्यामुळें प्रेतदहनविधि विनायकराव यांचेच हातून झाला. सर्व चिता रचून त्यावर विष्णुशास्त्री यांचें प्रेत ठेवून अग्नि लावण्याच्या अगोदर, हल्लीं लोकमान्य अशा मोठ्या मनुष्यांच्या संबंधानें गुणवर्णनपर प्रेतविधिभाषण करण्याचा जो नवीन प्रघात पुण्यास पडला आहे त्याप्रमाणें, या वेळीं विष्णुशास्त्री यांच्या संबंधाचें भाषण त्यांचे शिष्य रा. रामभाऊ साने यांनीं थोडें परंतु चटकदार असें केलें. पुढें आणखी एक दोन भाषणें करण्याचा कांहींकांचा विचार होता; परंतु प्रोफेसर केरोपंतनानांनीं सांगितलें कीं, " तुम्ही उगाच अधिक भाषणांत वेळ घालवाल आणि मध्यंतरीं पोलिसांनीं पुन्हां कटकट उपस्थित केली म्हणजे पस्तवाल ! तेव्हां झालें तितकें भाषण पुरें आहे; एकदांचा दहनविधि उरकून घ्या. " वृद्ध प्रोफेसरांचें हें शहाणपणाचें भाषण ऐकून सर्व लोक सावध झाले आणि त्यांनीं पुढील विधि लवकर उरकून घेतला. येणेंप्रमाणें तारीख १७ मार्च १८८२ रोजीं विष्णुशास्त्री यांचा मृत्युलोकचा अवतार संपून ते ज्या लोकीं या भरतभूमींत यामागें होऊन गेलेले महान् महान् कवि, पंडित, तत्त्ववेत्ते त्याचप्रमाणें स्वधर्माभिमानी व स्वदेशाभिमानी पुरुष—ज्यांची शुभ्र कीर्ति पाश्चात्य पंडितांनीं दुराग्रहानें व प्राच्य पंडितांनीं अजाणपणानें मलिन केली असतां त्यांनीं आपल्या उत्कृष्ट निबंधलेखांनीं उज्ज्वलित केली—ते अक्षय स्थितींत सुखानें नांदत असतील, तेथें निघून गेले ! !

श्मशानांत विष्णुशास्त्री यांस पोंहोंचवून मंडळी परत येतांना त्यांच्या अनेक उद्योगांत अंगभूत असणाऱ्या अशा त्यांच्या स्नेह्यांस आज आपला ध्वजस्तंभच मोडून पडलासें वाटलें ! सर्व निरनिराळे कारखाने ज्याच्या सामर्थ्यानें एकवट होऊन सर्वांसच ह्याचा त्याला व त्याचा ह्याला आधार होत असे तो मेढ्या मनुष्य गेला ! न्यू इंग्लिश स्कूल कसें तरी चालेल; परंतु चित्रशाळा, आर्यभूषण, किताबखाना वगैरे अगदीं कोंवळ्या संस्था पुढें कशा चालतील याविषयीं ज्यांवर विष्णुशास्त्री यांच्या मागें त्यांचा बोजा होता त्यांस धाक पडला; व सर्वांहून कोल्हापूर प्रकरणांतून केसरी

व मराठा हीं पत्रें नीटपणें कशीं निभावून पार पडतात याविषयीं तर सर्वांसच काळजी उत्पन्न झाली ! !

विष्णुशास्त्री यांच्या मृत्यूची बातमी लवकरच वर्तमानपत्रद्वारें सर्व महाराष्ट्रभर पसरली. तेणेंकरून त्या सर्व आठवडाभर सर्व मराठी पत्रें काळ्या बॉर्डरीनें भरलेलीं दिसूं लागलीं. सर्वांनीं आपापल्या माहितीप्रमाणें विष्णुशास्त्री यांच्या गुणांचा उल्लेख करून त्यांची मराठी भाषेविषयींची भक्ति, त्यांचे ग्रंथ, त्यांचा देशाभिमान, त्यांनीं उत्पन्न केलेले नवीन उद्योग व त्यांच्या अकालिक मृत्यूनें पुष्कळ प्रकारांनीं झालेली देशहानि ह्यांचा थोडाबहुत निर्देश केला. या देशांत विष्णुशास्त्री यांचा जो मान झाला तसाच तो परकीय देशांतहि त्यांच्या कोणी विशेष भक्त मंडळींनीं करविला. त्यांचा बराच सुबक फोटो व जीवनवृत्तांत हीं लंडनमधील ग्राफिक पत्राच्या मे महिन्याच्या १६ तारखेच्या अंकांत आलीं. ग्राफिक सारख्या वजनदार इंग्लिश पत्रांत मजकूर व तोहि थोडक्यांत असून खुबीदार असल्यामुळें तो येथें खालीं देऊन हा छोटासा भाग पूर्ण करितों:—

" Vishnu Krishna Chiplunkur

This worthy Indian citizen, who died on the 17th March last, at the early age of thirty-two, displayed an enterprise and energy in the pursuit of benevolent aims which is nowhere too common, and is especially valuable in India where the people are rather wont to lean upon the Government for any improvement.

Mr. Chiplunkur received a good English education, and had scarcely taken his degree in 1872 when he began to edit a magazine in the Mahratta language, whose native title signifies " a string of essays. " He perceived that the ulture of English by all the natives of the higher classes owas gradually sapping the educational influence of the Vernacular tongues. This was all very well for the rich

but deplorable for the labouring masses, who are more likely than ever, if all education becomes Anglicised, to remain steeped in ignorance. Mr. Chiplunkur's successful efforts in combating this tendency by means of his magazine have been acknowledged in the leading English journals of Poonah. Mr. Chiplunkur, also in spite of great difficulties and disappointment, established a lithographic press for printing cheap coloured pictures; he opened an English school, where lads were taught on a different system from that pursued by the Government, and where excellent results were obtained; and he established a depot where books of all sorts in all the well-known languages are exposed for sale. He did not live to reap the fruits of his labours, but he nevertheless deserves a hearty recognition as one of those pioneers of progress who if they become numerous enough, will some day make India a self-governing community."

भाग ९ वा.

भाषासेवा व देशसेवा.

My hopes are with the Dead; anon
My place with them will be,
And I with them shall travel on
Through all eternity;
Yet leaving here a name, I trust.
That will not perish in the dust,

Robert Southey.

येथवर आठ भागांत विष्णुशास्त्री यांचा जीवनवृत्तांत संपविला. आतां या भागांत त्यांचा ग्रंथकार व समाजांतील एक उपयुक्त सभासद या नात्यानें विचार करावयाचा आहे—म्हणजे त्यांच्या ग्रंथांतील भाषापद्धति, विषययोजना, विचारसरणी इत्यादि गोष्टींचें विवेचन करून, त्यांच्या हातून मराठी भाषेची कोणती सेवा झाली आहे; तसेंच त्यांच्या लेखांवरून त्यांच्या वेळच्या व त्या नंतरच्या पुढच्या होणाऱ्या लोकांवर कोणकोणते परिणाम झाले व होतील याचें विवेचन करून त्या मानानें मराठी ग्रंथकारांत त्यांची पायरी कोणती लागण्यासारखी आहे याविषयीं लिहावयाचें आहे; व नंतर त्यांनीं नुसते ग्रंथ लिहूनच स्वस्थ न बसतां अनेक स्वतंत्र आणि उपयुक्त उद्योग सुरू करून आपल्या अंगचें बुद्धिवैभव, धैर्य, स्वावलंबनाचा निश्चय इत्यादि गुण प्रकट करून आपल्या तरुण विद्वान् लोकांस जें उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें या महत् गोष्टींचा विचार करून त्यावरून विष्णुशास्त्री यांची योग्यता नुसत्या लोकमान्य ग्रंथकारांपेक्षां कशी जास्त धरली जाऊन त्यांचा लोकनायक या अधिकोच्च पदवीला हक्क कसा पोंचतो याचें विवेचन करायाचें आहे.

विष्णुशास्त्री यांचा मोठा ग्रंथ म्हटला म्हणजे निबंधमाला हा होय. हा

ग्रंथ लिहिण्याची योग्यता येण्याला त्यांस पहिल्यापासून कोणकोणत्या गोष्टी अनुकूल होत गेल्या व विद्वान् लोकांत ज्ञान संपादन करण्याचा जो रूढ-मार्ग–युरोपियन व एतद्देशीय पंडितांचीं व्याख्यानें–याशिवाय अरूढ परंतु मराठी ग्रंथकारांस तितक्याच उपयोगाचे असे मार्ग–कथा, पुराणें, नाटकें, गोंधळ, तमाशेदेखील–यांचाहि त्यांनीं कसा उपयोग करून घेतला, त्याच-प्रमाणें आपल्या वडिलांचा डोळा चुकवून मराठी कवींचीं व विशेषतः मोरोपंताचीं पारायणें करून त्यांनीं अगोदरच केवढी तयारी करून ठेविली होती व पुढें इतक्या श्रमांचें फळ जी निबंधमाला तिचा किती लहानशा गोष्टीपासून सहज आरंभ होऊन ती चालविण्यास शेंकडों विघ्नें आलीं असतां व अखेर तर तिचे पायीं सर्व प्रकारानें सुखाची अशी मानलेली सरकारी नोकरी तीहि खर्ची घालावी लागली असतां त्यांनीं किती आस्थेनें, किती निर्लोभ बुद्धीनें व किती निग्रहानें तिचा उद्योग आमरणांत चालविला हें मागें जीवनवृत्तांतांत आख्यायिकारूपानें सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें निबंधमालेंतील मुख्य मुख्य विषय–इतिहास, वक्तृत्व, इंग्लिश भाषा, डॉक्तर जॉनसन, मोरोपंताची कविता, लोकहितवादी व आमच्या देशाची स्थिति–यांविषयीं प्रत्येक सालचे अखेर स्वतंत्र रीतीनें त्या त्या विषयांसंबंधानें विवेचन केलेंच आहे. आतां शेवटीं विष्णुशास्त्री यांच्या एकंदर ग्रंथांतील भाषापद्धति, विषययोजना, विचारसरणी वगैरे जो भाग राहिला आहे त्याविषयीं येथें प्रथम विचार करूं.

विष्णुशास्त्री यांच्या भाषापद्धतीचा विचार करणें झालें म्हणजे फक्त निबंधमालेंतील भाषेचा विचार करणें बस होणार नाहीं. मूळ निबंधमाला पुस्तकांत निबंधांशिवाय जीं दुसरीं उपांगें म्हणून येत असत–म्हणजे विनोदमहदाख्यायिका, चमत्कारिक माहिती, सुभाषित, भाषाज्ञान, साहित्य-शास्त्र, अर्थसादृश्य–त्यांच्या व विशेषेंकरून पहिल्या दोन उपांगांच्या भाषेचाहि विचार करणें अवश्य आहे. कारण या सर्वांचा विचार केल्याखेरीज विष्णुशास्त्री यांनीं जे निरनिराळे भाषाप्रकार महाराष्ट्र भाषेंत सुरू केले व जेणेंकरून ती केवळ अडाणी भाषा, तींत इंग्रजीप्रमाणें प्रौढ विचार व्यक्त करणें म्हणजे बहुतेक अशीं कठिणच, असा जो पुष्कळ नवीन

विद्वान् लोकांचा अत्यंत गैर व अहितकारक समाज होत चालला होता तो मोडून जाऊन तींत हळुहळू थोडीबहुत ग्रंथरचना होऊं लागून तिला बरेंच रमणीय रूप येत चाललें आहे, त्याची बरोबर कल्पना होणार नाहीं. तेव्हां विष्णुशास्त्री यांच्या भाषापद्धतीचें सामान्य स्वरूप सांगून नंतर तिच्या निरनिराळ्या प्रकारांचा क्रमाक्रमानें उल्लेख करून त्यांच्या उदाहरणार्थ त्यांच्या ग्रंथांतून उतारे देतों.

विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांतील भाषा ही केवळ घाटावरील महाराष्ट्र भाषा—म्हणजे पुणें, नाशिक, सातारा या प्रांतांतून ब्राह्मण ज्ञातींत जी बोलतात— ती आहे. तींत मुंबईतील मराठी भाषेची भेसळ व वकालीपणा किंवा कोंकणांतील भाषेचें अनुस्वरप्राचुर्य व कर्कशपणा किंवा नगर, सोलापूर वगैरे प्रांतांतील रडपणा हीं अगदीं नाहींत. तूर्त मराठी भाषा उत्तम म्हणून जी पुण्याची समजतात ती विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांची आहे. भाषा शुद्ध कोणती, व ती शुद्ध ठेवून तीस उत्तम तऱ्हेनें कमाऊन तिच्या द्वारें निरनिराळे रस व मनोविकार कसे उठवतां येतील याचा विष्णुशास्त्री यांनीं चांगला विचार केला होता, आणि त्यांनीं यासंबंधानें आपले विचार लेखनशुद्धि, भाषादूषण, भाषापद्धति, भाषांतर वगैरे उपयुक्त निबंधांतून प्रदर्शित केलेच आहेत. विष्णुशास्त्री यांच्या पूर्वींच्या ग्रंथांत तीन मासले दृष्टीस पडत. एक जुने शास्त्री यांनीं केलेले ग्रंथ-ज्यांत संस्कृत शब्दांचा भरणा अतिशय असल्यामुळें ते प्रायः मराठी वाचकांस साधारण दुर्बोधच होत; ज्याप्रमाणें बाळशास्त्री देव यांनीं केलेलें कादंबरीचें मराठी भाषांतर वगैरे. दुसरा मासला म्हणजे संस्कृत भाषेचा संस्कार फार थोडा असे नवीन विद्वानांचे ग्रंथ—ज्यांची भाषा इंग्रजी धर्तीवर इतकी गेलेली असावयाची कीं, तेणेंकरून ते वरील जुन्या शास्त्री लोकांच्या ग्रंथांसारखेच दुर्बोध होत. उदाहरणार्थ मंडलीक यांचा इतिहास. तिसरा मासला म्हटला म्हणजे सदाशिव काशिनाथ छत्रे वगैरे लोकांचे इसापनीति, बाळमित्र वगैरे ग्रंथ—ज्यांत संस्कृत किंवा इंग्रजी यांची भेसळ म्हणून न मिळतां शुद्ध व सोपी अशी मराठी भाषाच काय ती आढळायची. हा शेवटला मासला अर्थातच लोकांस विशेष प्रिय झाला. परंतु

ग्रंथाची मूळभाषा शुद्ध मराठी ठेवून तींत मधून मधून सोपे सोपे संस्कृत शब्द-कांहीं रूढींत आलेले व कांहीं सहज येण्याजोगे—असे घालून मराठी भाषेस दुर्बोध न करितां तिला विशेष रमणीयत्व आणण्याचा चांगलासा यत्न प्रथम विष्णुशास्त्री यांचे वडील कृष्णशास्त्री यांनीं केला. याबद्दल त्यांचे आरेबियन नाईटचें मराठी भाषांतर, अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह वगैरे ग्रंथ साक्ष देत आहेत. तथापि स्वतंत्र ग्रंथरचना करून निरनिराळे रस, निरनिराळे मनोविकार मराठी भाषेंत उठविण्याचा यत्न कृष्णशास्त्री यांनीं कधीं फारसा केला नाहीं. त्यांचे ग्रंथ बहुतेक इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरेंच आहेत. या नंतर त्यांचा कित्ता विष्णुशास्त्री यांनीं उचलून ते त्यांच्या पेक्षां एक पायरी वर चढले. त्यांनीं इंग्रजी ग्रंथकारांपासून व विशेषतः मेकॉले साहेब—ज्यांवर विष्णुशास्त्री यांचा त्यांचे हिंदुस्थानच्या संबंधानें जे कित्येक दुराग्रह होते त्यांवरून नेहमीं भडिमार चालत असे—त्या पासूनच आवेशयुक्त व चटकदार वर्णन करण्याची व प्रसंगोपात निर-निराळ्या मनोवृत्ति-हास्य, विनोद, पूज्यभाव, तिरस्कार, प्रेम व द्वेष इत्यादि—हुबेहूब उठवून देऊन वाचकांचीं अंतःकरणें उचंबळून देण्याची हतोटी उचलली होती व म्हणूनच विष्णुशास्त्री यांस कित्येक मार्मिक लोकांनीं ‘ सवाई शास्त्रीबोवा ’ हें जें नांव दिलें आहे तें यथार्थ आहे !

विष्णुशास्त्री यांचे ग्रंथ जे इतके लोकप्रिय झाले आहेत त्यांचें मुख्य कारण त्यांची शुद्ध, चटकदार व निरनिराळे रस उभे करणारी भाषा ही होय. ज्या कित्येक लोकांस विष्णुशास्त्री यांचीं धर्म, राज्यव्यवस्था वगैरे विषयांवरील मतें मान्य नाहींत त्यांस त्यांची निबंधमाला जी आवडते ती केवळ तींतील भाषाशुद्धता व स्वारस्य यांवरूनच. विष्णुशास्त्री यांनीं आपलें नांव बरेच दिवस मागें राहण्याचीं जीं अनेक साधनें—निबंधमाला न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा वगैरे—करून टेविलीं आहेत त्या सर्वांत त्यांचें नांव अधिक काळ चालण्याला त्यांनीं मराठी भाषेंत जे नवीन भाषाप्रकार सुरू केले व जेणेंकरून ती विद्वान् लोकांच्या सेवेस अधिक पात्र झाली आहे, ते अधिक कारणीभूत होतील असें आम्हांस वाटतें. जेव्हां निबंधमालेंतील भाषा जी हल्लीं येवढी शुद्ध व सुबोध मानिली जात

आहे ती कालांतरानें ज्ञानेश्वरींतलि भाषेप्रमाणें दुर्बोध अशी वाटेल, जेव्हां हल्लीं धर्म, राजकारण, समाजव्यवस्था इत्यादि विषयांवर त्यांचीं व त्यांच्या प्रतिपक्ष्यांचीं मतें हीं दोन्हीहि लोक विसरून जातील, जेव्हां निबंधमालेपेक्षां भाषासरणी, विचारसरणी, विषययोजना इत्यादि गोष्टींसंबंधानें अधिक सरस असे अनेक विषयांवर ग्रंथ होऊन महाराष्ट्र भाषा चांगल्या प्रगल्भदशेस येईल त्या वेळीं सुद्धां महाराष्ट्रभाषाभिज्ञ पंडित हे ज्या अल्पवयस्क विद्वानानें मराठी भाषेचा, तींतील कवितेचा, तिच्या इतर शाखांचा आस्थेनें अभ्यास करून आपल्या वयाच्या तिशी बत्तीशींतच तींत वर सांगितलेले नवीन भाषाप्रकार सुरू करून तिला येवढें निराळें रूप आणून दिलें त्याचें नांव प्रीतीनें घेतील यांत संशय नाहीं !

येणेंप्रमाणें येथवर विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांतील भाषापद्धतीचें सामान्य स्वरूप सांगून त्यांनीं निरनिराळे रस उठवून देण्याकरितां जे नवीन भाषाप्रकार सुरू केले म्हणून वर सांगितलें त्यांचा यथाक्रम निर्देश करून त्याबद्दलचीं उदाहरणें त्यांच्या ग्रंथांतून देतों.

१ प्रथम विष्णुशास्त्री यांच्या चटकदार वर्णन करण्याच्या हतोटीचा मासला:—

आमच्या या आर्यभूमीच्या संबंधानें जो कोणी विचार करूं लागेल त्यानें प्रथमतः ही एक मोठी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हा देश मोठा अवाढव्य आहे. हिंदुस्थानचा विस्तार रशिया देश काढून टाकला असतां बाकीच्या युरोपखंडायेवढा आहे हें सर्वांस माहीत असेलच. तर हिंदुस्थान म्हणजे युरोपांतील एकुणीस राष्ट्रें असें समजलें पाहिजे. या एकुणीस राष्ट्रांत जसे शेंकडों धर्मपंथ आहेत, शेंकडों तऱ्हेचे आचारविचार आहेत, शेंकडों भाषाभेद आहेत, तशीच स्थिति हिंदुस्थानांतील आहे. हिंदुस्थान हें जरी या देशाचें नांव आहे, तरी यांतच एकीकडे फिरंगाण म्हणजे फिरंग्याचा मुलूख आहे, एकीकडे हपसाण म्हणजे हपशाचा मुलूख आहे, एकीकडे रोहिलखंड म्हणजे रोहिल्यांचा मुलूख आहे, एकीकडे गोंडवन म्हणजे अगदीं रानटी स्थितींतले गोंड लोक यांचा टापू आहे; गुजराथेचा भाग मुसलमानांनीं हाकून दिलेल्या पारशांनीं व्यापला आहे, पंजाब शिखांनीं धरला आहे, याप्रमाणें स्थिति आहे.

आचारविचार व रीतिभाती यांच्या संबंधानेंहि या देशांत वरच्या सारखेंच वैचित्र्य आहे. साप जरी चावला तरी त्यास युक्तीनें चिमट्यांत धरून दूर रानांत नेऊन सोडणारे जैनधर्मी श्रावक लोक येथें आहेत, व लग्नेंचीं लग्नें वसविणारे फासेपारधी अथवा ठगहि आहेत; पन्नास पन्नास शंभर शंभर बायका करणारे असे कुलीन ब्राह्मण एकीकडे आहेत, दुसरीकडे पतिबहुल्यानें राहणाऱ्या कुर्ग लोकांच्या स्त्रिया आहेत; एकीकडे कन्याघाताची प्रवृत्ति आहे, दुसरीकडे स्त्रीराज्याची अलौकिक तऱ्हा आहे; ज्यांनीं बापजन्मीं कधीं शस्त्रस्पर्श केला नाहीं अशी एकीकडे गुजराथी व बंगाली मंडळी आहे, व तरवारीशीं सदोदित काम ठेवणारे व शस्त्रपूत मरणाविषयीं हौस बाळगणारे असे दुसरीकडे रजपूत व पुरभय्ये आहेत; एकीकडे मराठमोळ्याचा गोषा आहे, आणि दुसरीकडे स्कॉटलंडाच्या कांहीं भागांत आढळणाऱ्या प्रथम निवेदनाचा प्रकार चालू आहे! आतां वरील प्रकारावरून पाहतां या देशांतील लोकांचें सामान्यत: वर्णन करणें म्हणजे वस्तुत: दुरापास्त असावें. कारण जेथें येवढें वैचित्र्य आढळतें तेथें कोणता गुण जमेस धरावा आणि कोणता नये धरूं? सरडा जर घटकेंत तांबडा आहे, घटकेंत हिरवा आहे, घटकेंत पांढराहि आहे, तर त्याचा अमुकच रंग म्हणून कोणता सांगावा? अर्थात् कोणताच सांगणें बरोबर नाहीं. पण ही गोष्ट येवढी उघड असतांहि पुष्कळ इंग्रज ग्रंथकारांस दिसली नाहींशी वाटते. त्यामुळें त्यांच्या ग्रंथांत पुष्कळ विलक्षण विरोध आढळतात. एके ठिकाणीं वाचावें कीं, हिंदु लोकांसारखें दुर्बल व गरीब लोक कोठें नाहींत; दुसरीकडे उलटून पाहावें तों सत्तावन सालचा भयंकर वृत्तांत दृष्टीस पडतो. एकीकडे पाहावें तों असा उल्लेख आढळतो कीं, हिंदु लोकांस स्वातंत्र्याचें वारें कसें तें माहीतच नाहीं, इतर राष्ट्रांनीं मानेवर ठेवलेलें जोकड मोठ्या आनंदानें वागवावें हाच त्यांस जन्माभ्यास; दुसरीकडे पाहावें तों गॉल लोकांचा सेनानायक जसा शुक्र झालेल्या रोम शहरांत शिरला तसाच इकडे अल्लाउद्दीन चितूर शहरांत शिरत आहे, प्रतापगडावर नारसिंहावताराचा नमुना उतरला आहे, श्रीवर्धनकर कुळकर्ण्यांचा पणतू शहाजहानच्या तक्तावर बसला आहे, वसई मुक्कामीं फिरंग्यांची व वडगांव मुक्कामीं इंग्रजांची तारंबळ उडाली आहे, कोणी कऱ्हाडी बाई मर्दानी पोषाख करून शत्रूच्या तोफखान्या-

वर भरधांव घोडा टाकीत आहे, इत्यादि प्रकार आढळतात. कोणी इंग्रज बहादुर आम्हांस सांगतात कीं, हिंदु लोकांस राज्य कसें चालवावें हें मुळींच कळत नाहीं; दुसरीकडे पाहावें तों गोवळकोंड्याचा कारभार हांकणारा मादण्णा, अकबरबादशहाचे दिवाणजी बिरबल, हैदराच्या राज्याचीं सूत्रें चालविणारा पूर्णय्या! मेकॉले साहेब ' वारन् हेस्टिंगज् ' च्या निबंधांत लिहितात कीं, हिंदुस्थानसारखा भिकारडा देश साऱ्या पृथ्वींत कोणताहि नाहीं; तेंच ' लार्ड क्लाइव ' च्या निबंधाकडे उलटावें, कीं हिंदुस्थान म्हणजे कुबेरनगरी! तेव्हां एकंदरींत काय कीं, आमचा देश अफाट पडल्यामुळें साऱ्या युरोपाच्या संबंधानें एकादा सामान्य सिद्धांत बसविणें हें जसें असमंजस होईल तसेंच तें येथेंहि होणारें आहे.

२ स्वदेशाभिमानभरांत ब्राह्मण बादशाही वीरांचें व मुत्सद्यांचें पराक्रम-वर्णन:—

तेव्हां आतां प्रथमतः मुत्सद्दीपणाच्या संबंधानें ब्राह्मणांविषयीं विचार करावयाचा. गेल्या शतकांत पूर्वी कधींहि न आलेलें ऐश्वर्य ब्राह्मणांस एकाएकीं प्राप्त झालें होतें; राजे ब्राह्मण, सरदार ब्राह्मण, दिवाण ब्राह्मण, वकील ब्राह्मण,—अशी कांहीं विलक्षण गर्दी एकदम होऊन गेली होती! ज्या लोकांची प्राचीन वृत्ति म्हटली म्हणजे तपस्वीपणाची व आलीकडील वृत्ति पराकाष्ठा झाली तर कारकुनीपणाची, त्यांनीं गेल्या शतकांत प्राचीन आश्रमींचे दर्भ व अर्वाचीन आश्रमींची लेखणी हीं दोन्ही टाकून देऊन एकदम क्षात्रधर्माची नवीन दीक्षा धारण केली; व कोणी राजवेत्राचा अंगीकार केला, कोणी खड्गांचा आश्रय स्वीकारला, असें अपूर्व वृत्यंतर त्यांचे ठायीं एकदम दृष्टीस पडलें. परशुरामक्षेत्रांतल्या मंडळीनें आपल्या क्षेत्रपतीची दिग्विजयाची दीक्षा चोहोंकडे गाजविली. भारतीय युद्धापासून ब्राह्मणांचें नांव समरांगणांत जें लोपून गेलें होतें तें हजारों वर्षांनीं पुनः उदयास आलें; व ज्या महाक्षेत्रावर अर्जुनाचा वानरांकित ध्वज फडकला होता, त्यावरच युगांतरीं भाऊसाहेबांचा जरीपटका झळकला! सारांश, ज्याप्रमाणें स्पेनच्या राजानें पंधराव्या शतकाच्या अखेरीस साऱ्या देशावरचा यवनी अंमल उठवून फारा दिवसांनीं

सूरूच्या राज्यसत्तेची व धर्माची पुनः स्थापना केली, त्याप्रमाणेंच पुढें दोन तीन शतकांनीं इकडेहि महाराष्ट्र वीरांच्या हस्तें तोच प्रकार घडण्यांत आला.

वरच्या सारख्या हकीकती कोणी तिऱ्हाइतांनींहि ऐकल्या असतां त्याच्या मनांत आवेशाचें स्फुरण होण्यासारखें आहे; कां कीं, ज्याच्या अंगीं पौरुष आहे त्यास प्रत्यक्ष शत्रूचा आपणास बाधक होणारा पराक्रमहि अभिनंदनीय होत असतो, मग तिऱ्हाइताचा होईल यांत नवल काय? त्यांतून गेल्या दोन शतकांत आमच्या देशबंधूंनीं आपला प्रताप असा गाजविला कीं, येवढा अफाट हा हिंदुस्थान, पण एका शतकाच्या अवधींत तो सर्व त्यांच्या डिंडिमाच्या नादानें दुमदुमून गेला! शिवाय हीहि लक्षांत आणण्यासारखी दुसरी मोठी गोष्ट आहे कीं, मराठ्यांचा इतिहास हा इंग्लिश, फ्रेंच, किंवा स्पानियर्ड लोकांच्या इतिहासासारखा नाहीं,—म्हणजे इंग्लिशांनीं जशी येथें सत्ता बळकावली, नेपोलियन्नें जसा सारा युरोप विनाकारण तुडवून टाकला, किंवा स्पेनच्या ख्रिस्ती वीरांनीं अमेरिकेंत घुसून तेथें देशचे देश उध्वस्त करून टाकून जसा आपल्या देशास व साऱ्या मनुष्यजातीस अक्षय्य कलंक लावला, तसाहि वरील इतिहासाचा प्रकार नाहीं. दुसऱ्यास बुचाडण्याच्या बुद्धीनें जें युद्ध आरंभिलेलें असतें त्यांत वीरश्रीचा उत्कर्ष कितीहि दृष्टीस पडला तरी सुविचारी व न्यायी मनुष्यास तो तादृश प्रशस्त होत नाहीं; कां कीं, वरच्या-सारखें युद्ध म्हणजे दिवसाढवळ्या घातलेल्या दरवड्याचेंच भावंड होय. यास्तव सीजर, नेपोलियन्सारख्या सरदारांनीं कितीहि अद्भुत पराक्रम केलेले असले, किंवा हेस्टिंग्ज, डालहौसीसारख्यांनीं दुसऱ्याचें पागोटें घेण्यांत कितीहि शिताफी दाखविली असली, तरी प्रांजल इतिहासकारांस त्यांच्या हकीकती लिहिण्यास कदापि संतोष वाटणार नाहीं. इतिहासदेवतेचीं परमप्रिय स्थानें म्हटलीं म्हणजे थर्मापिलीचा पहाड, सिंहगड, साराटोगा, केनीचें रणांगण, ब्यानॉक्बर्न्चा माळ, प्लेवनाचा मोर्चा हींच होत!

३ आपल्यापेक्षां थोर अशा प्रतिपक्ष्याशीं सामना करण्यापूर्वी त्याजबद्दल पूज्यभाव दाखविण्याचा मासलाः—

असो; आतां शेवटला जो 'अनेकविद्यामूलतत्त्वां' तील उतारा त्याविषयीं विचार करावयाचा. हा हातीं घ्यावयाचें आम्हांस मोठें भय वाटतें. यापूर्वी

आम्ही आमच्या प्रस्तुत राज्यकर्त्यांविषयीं, इंग्रजी ग्रंथकारांविषयीं, विलायती धर्मांविषयीं वगैरे जें जें लिहिलें त्या सर्वांवरून राजद्रोहाचा व सद्धर्मद्रोहाचा जबरदस्त चार्ज आम्हांवर आला, व वरील महापातकांची निष्कृति आम्ही अद्याप करीतच आहों. तेव्हां यावरून पाहतां वरील पुस्तकांतील लेखाविरुद्ध अभिप्राय प्रकट केल्यानें तर केवढा भयंकर गुन्हा होणार आहे याची कल्पनाहि करवत नाहीं ! जर इंग्रज लोकांस न रुचण्यासारखें कांहींहि लिहिल्यानें राजनिष्ठेचा लगेच चुराडा होऊन जातो; आणि तो कां, तर ते आमच्या देशाचें राज्यसूत्र हातांत वागवून आमचें रक्षण करताहेत व त्यांच्या कृपेनें आम्हांस ज्ञानप्राप्ति झाली आहे म्हणून; तर मग मुळीं जन्मलाभच जेथपासून त्या ठिकाणीं विरोध प्रकट करणें हें तर केवढें धाष्टर्य व केवढा अधमपणा होय ! आपले राज्यकर्ते जें जें करतील त्यांस नेहमीं मान डोलवीत जायचें हीं जर राजनिष्ठा, इंग्रज ग्रंथकारांच्या पेनांतून जें जें निष्पन्न होईल तें तें शिरसावंद्य करायाचें ही जर सत्यनिष्ठा, पाद्रीसाहेब जें जें सांगतील त्यास 'आमेन्' (तथास्तु) या एक्या पदानेंच उत्तर करायाचें ही जर धर्मनिष्ठा, तर मग 'बाबावाक्यं प्रणाणम्' हेंच पितृभक्तीचें परमस्वरूप होय ! या कडकडीत मताची दीक्षा घेऊन तें आजन्म अबाधित पाळण्याचा ज्यांचा कृतसंकल्प असेल व त्यांत ज्यांस धन्यता वाटत असेल त्यांस ती सुखेनैव वाटो. आमच्या मनाची नैसर्गिक प्रवृत्ति तर अगदीं निराळ्या प्रकारची आहे; व आम्हीं आजपर्यंत जेवढें वाचलें व ऐकलें त्यावरून वरील प्रवृत्तीचें दोषरूपत्वहि अद्याप आमच्या लक्षांत आलें नाहीं. शिवाय हेंहि सांगणें या प्रसंगीं अप्रस्तुत होणार नाहीं, कीं ज्या महापंडिताचा पितृनामानें निर्देश करण्याचा अधिकार जगदीशाच्या कृपेनें आमच्याकडे आहे, ज्याचें पूर्व वय गदाधरादिकांच्या समागमें जाऊन उत्तर वय मिल्लप्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या संगतीनें गेलें, रविकरगतकमलन्यायानें ज्याच्या विकासप्रद सान्निध्याचा अमूल्य लाभ आजपर्यंत इतका काळ आम्हांस लाभला, आणि ज्याचें स्वभाषावृद्धीचें व्रत आज पांच वर्षें यथाशक्ति चालवून देशोन्नतीच्या धुराकर्माचा अंगीकारहि ज्याच्या पद्धतीस अनुसरून आम्हांस अवश्य करणें आहे,—त्या विख्यात पुरुषाचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय पडता याची आम्हांस पूर्ण खात्री आहे. तर आतां येवढी प्रस्तावना

करून व परमपूज्य श्रीमत्पितृपदीं प्रणाम करून पूर्वोक्त अवतरणाविषयीं आमचे विचार वाचकांस सादर करतों.

४ लब्धप्रतिष्ठित प्रतिपक्ष्याची टर उडविण्याची तऱ्हा:—

श्रीमत्परमहंसांनीं आपल्या चुटपुटक्या शास्त्रज्ञानानें पुण्याच्याचशा काय, पण एकंदर सगळ्या भारतवर्षीय पंडितांचाहि पराभव करून टाकला, व त्यांच्याशीं वादास उभें राहण्यास कोणाचीहि छाती होईना, येवढा प्रताप आमच्या मतें कोणत्याहि समंजस व सुज्ञ मनुष्यास पुरेसा झाला असता. पण रिपुषट्काचा स्वामींनीं जय केला असताहि त्यांतील पांचवा एकाएकीं उच्छृंखळ होऊन त्यानें शिष्यमंडळीस जें प्रेमाचें व भक्तीचें भरतें आलें त्यास सहाय्य केलें. स्वामींची एखाद्या नव्या नवऱ्या मुलाप्रमाणें मोठ्या थाटाची-वरात निघणार ही बातमी पुष्कळांस अगोदर खरीशीहि वाटेना; गटारयंत्रावरील भटांनीं उगीच द्वेषबुद्धीनें ती पिकविली असेल असें वाटलें; पण अंमळशानें पाहतात तों सर्वांची भ्रांति फिटली. महारापोरांनीं व कामाठ्यांनीं मशाली व दिवट्या धरल्या आहेत, परमहंस गजेंद्रावर आरूढ झाले आहेत, पुढें बाजांचे ताफे चालले आहेत, व लबाड आणि दुष्ट ब्राह्मणांच्या चिरकालिक दास्यांतून विमुक्त झालेले असे त्यांचे शिष्य मोठी कृतकृत्यता मानून आपल्या सद्गुरूंचा पार्श्वभाग सुशोभित करताहेत, अशा थाटानें पालखींत मिरविलेल्या शास्त्र्यांच्या सवाईनें स्वारी ब्राह्मणांचें नाक ठेंचीतच शहरांत प्रवेश करती झाली. शेवटीं बुधवारांत दाखल होऊन ज्या ठिकाणाहून दयेचें व आनंदाचें शुभवर्तमान चोहोंकडे फैलावलें त्या पवित्र जागीं सगळे वऱ्हाडी येऊन दाखल झाले. श्रीमत् सिंहासनावर चढले; मग सद्धर्माच्या प्रीत्यर्थ येवढा खटाटोप करून थकलेली भागलेली अशीं शिष्यमंडळी मोठी कृतकृत्य होत्सातीं जागजागीं बसली. नंतर एका दोघां सच्छिष्यांनीं सुरस भाषणें करून एका पंडिताकडून जगद्गुरूंचा स्तुतिपाठ करविला. याप्रमाणें महिना दीड महिना चाललेल्या खटपटीचा सर्व बऱ्या प्रकारें शेवट होऊन एका समाजस्थापनेखेरीज कोणतीहि कर्तव्यता उरली नाहींशी दिसली. पण देवाची लीला अगाध! त्याचें मूर्तत्व नाहींसें करून टाकून वास्तव स्वरूपाची प्रतीति लोकांच्या हृदयांत ठसविण्यास दयानंदजींनीं व त्यांच्या चेल्यांनीं येवढा विभु रचला असताहि

तो अकस्मात् ढासळून सर्वांवर दे माय धरणी ठाय असा प्रसंग एकाएकीं येऊन गुदरला. छबिन्याची मंडळी जी बाहेर उभी राहिली होती तिची व त्यांच्याहून आत्म्याची कळकळ ज्यांस विशेष अशी खाशी मंडळी जी वर माडी-वर बसली होती तिची एका अर्ध्या घटकेंत जी तारंबळ व जी त्रेधा उडून गेली ती सांगतां पुरवत नाहीं ! ज्या गजेंद्रानें स्वामींची वरात सुशोभित करून आपलें जीवित धन्य करून घेतलें त्याची कोणी शेपूट ओढून, कोणी सोंड ओढून व महातास तिसऱ्या ठिकाणीं फुकटाफाकट प्रायश्चित्त मिळून पुण्याच्या दुष्ट व दांडग्या ब्राह्मणांनीं गाढवासारखा माघारीं पार पळवून लावला; ज्या दीपिका या शहरांतील शंभर दीडशें वर्षें सांचलेल्या मूर्तिजन्य अंधकारासच जणों काय दूर करीत होत्या त्याहि एकदम मालवून दिवट्यांस पलायन करण्यांतच निभावणूक दिसली; बाजेवाल्यांनीं व ताशेवाल्यांनीं तोच मुक्तीचा मार्ग पसंत केला;—इतक्यांत पोलिसचे शिपाई धांवत आले. त्यांचाहि चार पांच हजार लोकांच्या गर्दीत मोठ्या मारामारीनें रिघाव होऊन मग त्यांनीं जो दांडक्यांचा व वाद्यांचा मार सुरू केला तो मोठा कठिण ! शेंकडों लोकांस स्वामींचें वक्तृत्व व त्यांच्या सच्छिष्यांची प्रेमळ भक्ति हीं फळास आलीं;—कोणाच्या वांट्यास दांडकीं, कोणाच्या चाबूक, कोणाच्या धोंडे, निदान चिखलाचे लपके तरी, असा प्रसाद सर्वांस पंक्तिभेद न होतां भरपूर वांटला गेला. माडीवरील मंडळी खिडक्या लावून बसली होती; कोणीं मधें मधें उगीच एखादी अनळ लिकलिकी करून खालची मौज पाहूं लागावें तों आलाच चिखलाचा लपका ! याप्रमाणें सप्तंबर महिन्याची पांचवी तारीख मोहरमच्या दहावीप्रमाणें या वर्षीं पुण्यास गाजली ! असो; या छोट्याशा नाटकाची परिसमाप्ति शेवटीं अशी झाली कीं, स्वामींच्या-जवळ निदानांच्या समयीं एकहि सच्छिष्य न राहून ज्यानें त्यानें आपापली वाट काढली. शेवटीं पंधरा वीस एके बाजूस व पंधरा वीस दुसरे बाजूस अशी पोलिसांची रांग दुतर्फा चालून मागून जयघोष होतसाती स्वामींची स्वारी निज-धामास चालती झाली !

५ प्रतिपक्ष्याविषयीं तिरस्कार दर्शवून त्याचा पाडाव करण्याचा मासला:—

" आपण ज्ञानप्रसार करणारी मंडळी असा मोठा किताब धारण केला आहे; पण वस्तुत: पाहतां तो घेण्यास आपणास बिलकुल अधिकार नाहीं. कारण आपली कृति पाहिली तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार आपण मुळींच करीत नसून खोटें नाहींसें होत चाललें आहे त्यास मात्र आडवें येत आहों. ज्या पुस्तकांतील मजकुराची किंमत त्यांतील कागदांच्या इतकीहि व्हावयाची नाहीं, असलीं अप्रयोजक इतिहास, अप्रयोजक पदार्थविज्ञान, अप्रयोजक अध्यात्मज्ञान, अप्रयोजक ईश्वरज्ञान, वगैरे विषयांवरील पुस्तकें आपण छापून प्रसिद्ध करीत आहों !" त्या वेळच्या पंडितांत अग्रगण्य म्हणून ज्यांकडे वाद तोडण्याचें सरकारानें सोंपवून दिलें त्यांचें निःपक्षपातपणाचें व समंजसतेचें मत सरतेशेवटीं वरच्यासारखें पडलें. एकूण वरील साहेबांच्या मतें आरबी, फारसी, संस्कृत वगैरे भाषांतील ग्रंथांची योग्यता वरच्याइतकी झाली, कीं त्यांच्या कागदाचीहि किंमत आंतील मजकुरास नाहीं. केवढी झोटिंगपाच्छाही ही ! वरील महाविद्वान् पंडितानें जर यत्किंचित् विचार केला असता तर आम्हांस खास वाटतें कीं, त्याची अशी खात्री होऊन जाती कीं, इकडील भाषांत शेंकडों असे ग्रंथ आहेत कीं, त्यांस पुठ्ठा घालण्यास त्यांच्या अत्यंत मोलवान् ग्रंथांच्या अत्यंत मोलवान् आवृत्तींचीं पानें फाडलीं तर तींहि योग्यता त्यांस पुरतेपणीं साजणार नाहीं; आणि ज्या वेळीं मेकॉले हें नांव केव्हांच लोपून गेलें असेल, हिंदुस्थानाचें अधिपतित्व अमेरिकेंतील लोकांकडे किंवा आफ्रिकेंतील एखाद्या राष्ट्राकडे कदाचित् गेलेलें असेल, आणि " कोणी न्यूझीलंडचा मुशाफर ' लंडन ब्रिज् ' च्या एखाद्या मोडक्या कमानीवर उभा राहून भोंवतालच्या ओसाड प्रदेशाकडे नजर देईल, आणि ' सेंटपाल्च्या ' मोडकळीस येऊन पडलेल्या देवळाचा नकाशा काढील, " त्या कालींहि त्यांची कीर्ति आकाशांतील सूर्यचंद्राप्रमाणेंच कालगतीनें अबाधित होत्साती आजच्यासारखीच उज्ज्वल राहील !

६ प्रतिपक्ष्यावर कडक रीतीनें टीका केल्यानंतर त्यास शांतपणें बुद्धिवाद करण्याची तऱ्हा:—

याप्रमाणें आमच्या शूद्रबंधूंच्या आक्षेपांविषयीं विचार झाला. आतां सरतेशेवटीं आमच्या समाजाधिपतींस व त्यांच्या शिष्यवृंदास कांहीं सूचना करून

त्यांचा शेवटचा निरोप घेतों. मि० फुले यांस सूचना अशी कीं, जर त्यांस आपल्या ज्ञातिबंधूंची सुधारणा कर्तव्य असेल तर ती ' गुलामगिरी ' सारखे ग्रंथ तयार केल्यानें व जे आपणांहून सर्व प्रकारें श्रेष्ठ त्यांस नुसत्या शिव्या दिल्यानें होणार आहे असें मुळींच नाहीं ब्राह्मण कितीहि लबाड असले व कितीहि दुष्ट असले, तरी एक गोष्ट निर्विवाद आहे—कीं ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कंबरेला आहेत. त्यांच्या साह्याशिवाय इतर ज्ञातीस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळींच मार्ग नाहीं. पाद्रीसाहेब हजारों रुपये खर्च करून बळीच्या राज्यांतून किंवा चंद्रलोकावरून इकडे येवोत, व शूद्रांस विद्या पढविण्याविषयीं पाहिजे तितकी खटपट करोत, पण भटांनीं कामांत पडल्यावांचून तें बिलकूल सिद्धीस जावयाचें नाहीं. तर अशी जेथें स्थिति आहे तेथें रिकामें डोकें फोडीत बसण्यांत काय हशील आहे ? आपलें कार्य जर साधून घ्यावयाचें असेल तर त्या कार्यसाधकाशीं सलोख्यानें वागावें यांत शहाणपणा आहे कीं, त्यांशीं नेहमीं हुमरीतुमरी करावी हा शहाणपणाचा मार्ग आहे ? आपलें काम फत्ते झाल्यावर मग पाहिजे तर त्याच्या बोकांडीं बसून कृतज्ञतापाशांतून आपणांस मोकळें करून घ्यावें; पण तोंपर्यंत त्यांचें मनोधारण करणें किंवा निदान त्यांवर पुष्पवृष्टि न करणें हेंच न्याय्य होय. दुसरी गोष्ट अशी कीं, आलीकडच्या इंग्रजी विद्येच्या प्रसारानें पूर्वींचे समज पुष्कळ पालटून गेल्यानें आधुनिक विद्वन् मंडळांत शूद्रांविषयीं पूर्वींप्रमाणें ग्रह राहिले नाहींत. हें तर काय, पण कांहीं दिवसांपूर्वीं शूद्रांचे आचार मिरविण्यांतहि पुष्कळांस प्रतिष्ठा वाटूं लागली होती. भोजनादि कांहीं व्यवहारांखेरीज ब्राह्मणशूद्रत्वाचा संबंध आलीकडील मंडळींत तादृश ओळखींत नाहींत, व दिवसेंदिवस असलाच प्रकार वृद्धिंगत होत जाईल असा देशस्थितीच्या मानावरून सुमार दिसतो. मग अशी स्थिति जेथें आयतीच येऊं लागली आहे, तेथें मनःकल्पित दुःखांबद्दल बळेंच आक्रोश करून व मत्स्य, कच्छ, इराणांतून आले वगैरे निव्वळ गप्पा खऱ्या मानून विनाकारण बखेडा माजविणें हा किती मूर्खपणा आहे ! तर आमच्या शूद्र देशहितेच्छूनें वरील गोष्टींकडे कांहीं लक्ष पुरवून आपल्या ज्ञातीच्या सुधारणेचा जर समंजसपणानें उद्योग केला तर त्यांत त्याचें, त्याच्या ज्ञातीचें व एकंदर देशाचेंहि कल्याण होणार आहे. याप्रमाणेंच जोतीबांच्या शिष्यवर्गासहि आमचें असें सांगणें आहे

कीं, 'गुलामगिरी' सारख्या ग्रंथावरून ब्राह्मणांविषयीं जे दुष्ट ग्रह कांहींकांच्या मनांत बिंबले असतील ते त्यांनीं सोडून द्यावे. त्यांनीं अंमळ डोळे उघडून वास्तविक स्थिति कशी आहे ती जर पाहिली, तर ब्राह्मणांच्या मनांत त्यांच्याविषयीं अत्यंत वैर जळत आहे व त्यांचें जेवढें वाईट होईल तेवढें करण्याविषयीं ते निरंतर तत्पर असतात वगैरे कल्पना किती कुत्सित आहेत, हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. आतां हें खरें आहे कीं, ब्राह्मण म्हणजे सर्वच अत्यंत सुजन आहेत व त्यांत दोष म्हणून सांपडावयाचाच नाहीं; किंवा शूद्रांचे दुःखाक्रोश सर्व व्यर्थ असून त्यांच्या स्थितींत सुधारणा करण्याची बिलकूल गरज नाहीं, असें आमचें मुळीं म्हणणें नाहीं. आमच्या ज्ञातीचे जे कांहीं वास्तविक दोष असतील ते सर्व आम्हांला कबूल आहेत; त्यांवर पांघरूण घालण्याची किंवा ते नाहींत असें म्हणण्याची आमची बिलकूल इच्छा नाहीं. त्याप्रमाणेंच आमच्या शूद्र देशबंधूंवर जातिभेदाच्या संबंधानें वगैरे जीं दुःखें खरोखर येत असतील, तीं हलकीं करणें किंवा होतील तितकीं नाहींशीं करणें हें प्रत्येक देशहितेच्छूचें कर्तव्य होय हेंहि आम्हांस मान्य आहे, व आमची पक्की खात्री आहे कीं, या कामांस आमच्या ज्ञातिबांधवांची विमुखता दृष्टीस पडणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर पुष्कळ मोठ्या उत्साहानें त्यांस साह्यहि करतील. तर असे कांहीं सुविचार मनांत आणून आमचे सत्यसमाजवाले देशबंधु त्याप्रमाणें जर चालतील, व या आर्यभूमीचा आजपर्यंत साऱ्या जातींनीं जसा अभिमान बाळगिला तसाच पुढेंहि बाळगून आपसाआपसांत वितुष्ट वाढूं न देण्याविषयीं जर तजवीज ठेवतील, तर अझूनहि आमची स्थिति सुधरेल व हल्लींच्या राज्यापासून होणारे जे विद्यादिक अमूल्य लाभ ते सर्वांस होऊन सर्वांचें कल्याण होईल यांत संशय नाहीं.

७. आपल्या देशाविषयीं कळकळ व विद्वान् पुढारी लोकांच्या दुबळेपणाबद्दल दुःखोद्गारः—

आतां असें समजा कीं, गेल्या दहा पंधरा वर्षांचा इतिहास एखाद्यानें लिहिण्यास आरंभ केला, तर वरील प्रकारांविषयीं निःपक्षपातपणानें त्यांस काय मजकूर लिहावा लागेल बरें ? त्यास असें लिहावयास नको काय, कीं 'नववैधव्याच्या असह्य वेदना' पासून बिचाऱ्या हतभाग्य बालविधवांस सोडविण्या-

करितां आमच्या देशांतील नव्या नव्या उमेदवार विद्वानांनी व पंडितांनीं पहिल्या-पहिल्यानें खूप कंबर बांधली; पण हळुहळू त्यांचा आवेश व उत्साह कमी कमी होत जाऊन लवकरच चोहोंकडे अगदीं सामसूम होऊन गेलें. लोककल्याणाची उष्णता जी कांहीं थोडा वेळ २१२ अंशांवर अगदीं टवटवीत येऊन पोंचलीशी दिसत होती ती लवकरच खालीं जावयाला लागून जातां जातां ३२ च्याहि कांहीं अंश खालीं गेली ! विधवांच्या मनोरथास नुकता अंकुर जो कुठें फुटूं लागतो न लागतो, तोंच चोहोंकडे गारठा पसरावयाला लागून तो जागच्या जागींच कोमेजून गेला. जोंपर्यंत सभेंत पांडित्य करणें, वादविषयक ग्रंथ लिहून विद्वत्ता प्रकट करणें, व परस्पर वऱ्हाडीपणा मिरविणें, हें होतें तोंवर होतें; पण परमेश्वरानें लवकरच गाऱ्हाणें ऐकून विधवांच्या मुक्त्यर्थ त्यांच्या कैवाऱ्यांस जेव्हां मोठे नवस करूनहि न यावी अशी सोन्यासारखी संधि आणली, तेव्हां स्वदेशाभिमान, आर्तजनांविषयीं दया, आणि दीर्घकाळ केलेल्या पांडित्याचें व नव्या विद्वत्तेचें चीज, हीं दाखविण्याचें धैर्य एकाचें तरी झालें काय ? लूथरा-विषयीं आणि वॉशिंग्टनाविषयीं नेहमीं गप्पा झोंकणारांनीं व वरील गप्पा झोंकल्यानेंच त्यांची वीरश्री आपल्या ठायीं आलीशी मानून, आम्ही असें करूं आम्ही तसें करूं अशा यथेच्छ कल्पना करणारांनीं, देशकार्याच्या धुरेला आपला खांदा जातीनें असा एकानें तरी लावला काय ? नाहीं तर कोना कोपऱ्यांतून शोधून काढून कोणाला तरी मारून मुटकून नवरा मुलगा समजवून उभा करावा, आणि ' शुभमंगल ' करून टाळ्या पिटण्याचें मात्र काम आपलें ! बरें हेंहि एकीकडे ठेवूं. धैर्य हा पुष्कळ अंशीं स्वभावजन्यच गुण होय; तो मोठी विद्वत्ता संपादन केल्यानें किंवा पुष्कळ पुस्तकें वाचल्यानें अंगीं येतो असें नाहीं. पण निदान येवढें तरी खरें कीं नाहीं, कीं समरांगणांत सरसावून पुढें जाण्याचें ज्यांचें धैर्य झालें नाहीं त्यांनीं निदान तळ तरी राखावा ! कां तेथूनहि तडक पळ काढून भराभर स्नानें करून मोकळें व्हावें ? व ज्यांस लाथा मारल्या त्यांच्या पुढेंच नाक घांसण्याला तयार व्हावें ? असो; एकंदरींत या उलाढालींत आमच्या नव्या लोकांची जी फटफजिती झाली ती कांहीं पुसूं नये. तिच्या योगानें त्यांसच काय, पण सगळ्या देशासहि निरंतर खालीं पाहण्याचा प्रसंग आला आहे ! असो; आतां दुसरी व्यापारोत्तेजनाची मौज पहा. हें काम तर

वरच्याहून पुष्कळ सोपें होतें ना ! यांत यश येण्यास इतक्याच गोष्टी हव्या होत्या की सर्वांनीं एकमतानें व सचोटीनें एकमेकांशीं वागून यथाशक्ति आरंभलेल्या कार्यास साह्य करावें. पण इतकें तरी आमच्या हातून व्हावें कसें ? स्थापन होतांना अगदीं ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणें शेअर्स (भाग) कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्स (भागीदारांची मंडळी), कोर्ट ऑफ डैरेक्टर्स (व्यवस्थापक मंडळी), खजिनदार, चिटणीस, शिपाई वगैरे सर्व यथासांग झालें; पण पुढें काम सुरळीत चालेल तेव्हां कीं नाहीं ! अनुकरणाच्या इच्छेनें शरीरास प्रतिशरीर कसें तरी बनवून दिलें; पण त्याचा चालक जो जीव तो कसा घालतां येईल ? हा जीव म्हटला म्हणजे साऱ्या सभासदांची स्वदेशकल्याणाविषयीं कळकळ होय. पण ही सर्वांच्या ठायीं किती नांदत होती हें पुढील प्रकारांवरून स्पष्ट दिसतेंच, कोणी डैरेक्टर आम्हांस बोलावणें पाठविलें नाहीं किंवा आपला इतमाम बरोबर राहिला नाहीं म्हणून रुसणार; कोणी इतर निमित्तांनीं आपआपसांत भांडणार; प्रेसिडेंट [अध्यक्ष] साहेबांस कोणाहि सभासदाचें दुरुत्तर किंवा नकार खपावयाचा नाहीं.-ते म्हणणार, " बस् बस, आम्ही सांगूं तें सर्वांनीं निमूटपणें ऐकिलें पाहिजे; आम्ही प्रेसिडेंट आहों. " मग अशी सामग्री असल्यावर आमच्या सभांपुढें म्यांचेस्टरनें आणि लिवरपूलनें कां कांपूं नये ! असो; तर एकंदरींत आमच्या लोकांची पहिल्यानें उडी मोठी, आणि पुढें हातून मात्र कांहीं होणें नाहीं, ही तऱ्हा दोन्ही उदाहरणांवरून स्पष्ट दिसतें.

८. विनोदात्मक गोष्टी लिहिण्याचा मासलाः—

टारगेपणास योग्य शासन.

विलायती हजामतीचा प्रकार आमच्या वाचकांच्या हा एक तर लक्षांत येईलच, कीं, तेथील हजामत म्हटली म्हणजे काय ती दाढीपुरती. दुसरा प्रकार सर्वांस माहीत असण्याचा संभव नाहीं, तो हा कीं, येथें हजामांचीं दुकानें असून तेथें लोक हजामतीला जात असतात. अशा दुकानीं एक टारगें पोर गेलें आणि हजामतीला बसलें. हजाम पहातो तों कोवळें पोर, पुरती मिशीसुद्धां फुटली नाहीं आणि थाटानें येऊन खुर्चीवर बसलें आहे. तेव्हां त्यानें विचार केला कीं, आयतें गिऱ्हाईक आलें आहे, तें परत कशाला लावावें ! तर याची अशीच कांहीं खुबीनें फजीती केली पाहिजे, मग त्यानें त्याच्या गळ्याभोंवता कपडा

घालून साबण तयार केला, आणि दोन हात हनवटीवरून व गालांवरून फिरविले. इतका पूर्वविधि आटपून हचाम मुकाट्यानें उठला आणि दारापुढें मोकळी जागा होती तेथें सहज इकडे तिकडे आपना फेऱ्या घालूं लागला. इकडे हें पोर हातांत वर्तमानपत्र घेतलें होतें त्यांतच चूर होऊन गेलें आहे! त्याला काय वाटलें कीं, हा हजाम वस्तरा वगैरे आणावयाला गेला असेल. पण अंमळशानें पहातो तों हजामाची स्वारी खुशाल हातांत हात घालून इकडून तिकडे व तिकडून इकडे फेऱ्या घालते आहे! तेव्हां पोर त्रासून तेथून ओरडलें, "कायरे! तिकडे काय करतो आहेस, आम्हास येथें असेंच थंडाबत ठेवून?" हजाम तेथूनच मुकाट्यानें उत्तर देतो, "रावसाहेब, आपली दाढी उगवण्याची वाट पहात आहें!"

वैद्याची पारख.

एका मनुष्याचा दांत हालूं लागून त्यास फार पीडा होऊं लागली. यास्तव तो आपल्या गांवाहून एका मोठ्या शहरीं आला आणि एका प्रसिद्ध दंतवैद्याकडून त्यानें आपला दांत उपटविला. सर्व क्रिया आटपल्यावर गांवठी मनुष्य डॉक्तरास म्हणतो, 'बरें, आतां आपल्या शस्त्रमर्माबद्दल आपणास काय द्यावयाचें? आपला या कामाकडे फारसा वेळ गेला नाहीं, यास्तव वेळेच्या मानानें काय सांगावयाचें तें सांगा.' डॉक्तरानें पांच शिलिंग दिले पाहिजेत म्हणून सांगितलें. तें ऐकून गांवंढळ मनुष्य चकित होत्साता म्हणतो, 'काय, पांच शिलिंग! किती फी सांगितलीत ही! अहो! दोन वर्षांपूर्वी आमच्या गांवीं एक शास्त्रवैद्य आला होता; त्यानें माझे दोन दांत उपटून काढले,. त्या कर्माला पुरे दोन तास लागले, आणि जो अटाट पडला तो तर कांहीं पुसूं नये! त्यानें मला साऱ्या खोलीभर नाचविलें, आणि पांच सहा वेळां त्याचा चिमटा सांडला पण इतकें सर्व होऊन त्यानें मजपासून सारा एक शिलिंग घेतला! मग एका मिनिटाच्या कामाबद्दल पांच शिलिंग मागतां हा चमत्कार नव्हे काय? मला तर वाटतें, तुम्ही माझी मस्करी करीत अहां!'

पक्की खूण.

टेम्स नदीवर दोन आगबोटींची टक्कर होऊन कांहीं मनुष्यें दगावलीं. ती बातमी समजतांच लंडन शहरांतलीं माणसें ती मौज पाहण्याकरितां हजारों

गोळा झालीं कोणी आपल्या इष्टमित्रांविषयींहि पुसतपास करूं लागले. त्यांत एकजण एका बोटीवरील कपतानास विचारतो, " या बोटींत माझा काका आला काय? कपतानानें उत्तर केलें, अरे तुझा काका म्हणजे? पुष्कळ काका आले असतील त्यांत तुझाहि असेल!" पृच्छक पुनः विचारतो, " माझा काका शरीरानें चांगला मजबूत, चांगला पोषाक केलेला, असा आहे; आज तीन दिवस त्याची येण्याची वाट होती; तर वरील खुणांवरून त्याचा शोध लागेल काय?" कपतान म्हणतो, ' अरे, पण त्याची एखादी पक्कीशी खूण सांगशील कीं नाहीं; तशी एखादी खूण असेल तर पलीकडे मुडदे ठेवलेले आहेत त्यांत जाऊन बघ, तो कदाचित त्यांत सांपडेल." पुतण्या उत्तर करितो, " एक मोठी खूण आहे; कोणती? तर माझा चुलता अगदीं बहिरा आहे; त्याच्या कानांशीं घांट बडविली तरी तीहि त्यास ऐकूं यावयाची नाहीं!"

९. स्वतःच्या महत्कृत्याबद्दल योग्य अभिमानाचा उद्गारः—

मालाग्रथनाच्या कार्यांत विराम करण्याचें तिसरें कारण असें आहे कीं, ही मासिकरचना पूर्वीपासूनहि श्रमदायक असून आलीकडे तर केवळ दुर्धर झाल्या-सारखी झाली आहे. एका महिन्याच्या अवधींत एकट्यानें वरील काम उरकणें म्हणजे किती पंचाइतीचें काम आहे. याविषयींची खात्री अनुभविक मनुष्य तर तेव्हांच देईल; पण यापूर्वी अनेक वेळां जें प्रस्तुत प्रकरणीं लिहिण्यांत आलें आहे, त्यावरून वरील गोष्टींविषयीं कोणाचीहि समजूत पडेल असें आम्हांस वाटतें. गेल्या आठ वर्षांत सदरील पुस्तकाचा जो आम्हीं अव्याहत उद्योग केला त्याला आमच्याच देशांत काय, पण पाश्चात्य देशांतहि तोड सांपडणार नाहीं असें म्हटलें असतां गर्वोक्ति केल्याचा दोष माथीं येईल असें आम्हांस वाटत नाहीं. मासिक किंवा त्रैमासिक पुस्तकांची कोठेंहि स्थिति पाहिली तरी येवढा डोलारा कोणी एकट्यानेंच शिरीं बाळगला आहे असें आम्हांस तर अद्याप कोठें आढळलें नाहीं. केवळ भाषांतररूप किंवा प्रकाशनरूप पुस्तक असलें तर वरील गोष्ट सुसंभाव्य आहे; पण स्वतंत्र निबंधरचनेचा विचार केला असतां ती पद्धति वरच्याहून किती भिन्न आहे हें कोणाच्याहि सहजगत्या लक्षांत येणारें आहे. असलें काम म्हटलें म्हणजे चारचौघांचे जेव्हां हात लागतील तेव्हां तें उठावयाचें. आज अमक्यानें लिहिलें, उद्यां तमक्यानें लिहिलें, हा विषय एकानें

घेतला, दुसरा विषय दुसऱ्यानें घेतला, याप्रमाणें ' दसकी लकडी एकका बोजा' या न्यायानें प्रस्तुत उद्योग उभारला जाऊन चालत असतो. तर हें बहुजनसाध्य कार्य आम्हीं स्वतःच अंगीकारलें असतां त्यांत इतक्या अडचणी आल्या व तें वरचेवर मागें पडत असे या गोष्टीचें वस्तुतः पाहतां कोणास आश्चर्य करण्यास कारण नसून इतक्या विषयांवर इतका काळ पावेतों आम्हीं लेखणी चालविली, आणि कोणापाशीं एक छदाम किंवा एक ओळहि न मागतां, अगर मेहरबान डायरेक्टरसाहेब किंवा ट्रान्सलेटरसाहेब यांच्या मेहेरबानीची बिलकूल फिकीर न करतां हें महासत्र संपवून आज अवभृथ स्नानाला मोकळे होणार हीच विशेष गोष्ट असें म्हणण्यास फारशी हरकत दिसत नाहीं. त्यांतून आजपर्यंत बड्या बड्या मंडळीनें कितीक प्रकारचे मानासिक संकल्प केलेले आहेत व कितीक प्रकारचे प्रचंड उद्योग हातीं घरून ' आरंभशूर ' त्वाच्या प्रसिद्ध सूत्रास मात्र दृढतरत्व आणलें आहे, ही गोष्ट मनांत आणली असतांहि आमच्या चतुरशीतिपुष्पमालेकडे पाहून आम्हांसच काय, पण प्रत्येक भाषाहितेच्छूला व देशहितेच्छूला आनंद झाल्याविना रहाणार नाहीं असें आम्हांस वाटतें. आम्ही विद्यार्थीदशेंत असून आंग्लभौमनिर्मित विद्यापर्वतमार्ग क्रमीत असतांहि दोहों बाजूंच्या वृक्षलतांच्या पुष्पपल्लवांनीं कित्येक वेळां आकर्षितांतःकरण होऊन मध्यें मध्यें रमत होतों, व विद्यलयांतील सोळा संस्कार लागून स्वतःसिद्ध होत्सातें बाहेर पडतांच वरील वृक्षवाटिकांतच आराम पावून धन्यता जोडावयाची हा आमचा कृतसंकल्प होता. पुढें जगदीशकृपेनें तसाच योग घडून येऊन आम्हं 'टेंपेस्ट' मधील एरियलाप्रमाणें बंधमुक्त होतांच त्याचाच क्रम स्वीकारला, आणि त्यातें फळ प्रस्तुत पुस्तक हें होय. आमच्या पूर्वीचें विद्वान्मंडळ हें फार झालें तर आपल्या ठिकाणींच आपण रममाण होऊन वरील पुष्पाचा मकरंद सेवीत असे; पण आम्हीं आपल्या देशबंधूंची आठवण करून त्यांस गीर्वाण व आंग्लभौम पुष्पाकरांतील मधुबिंदूंचा व सौरभाचा यथावकाश व यथाशक्ति लाभ करून द्यावा हें मनांत आणलें. विद्यापीठरूप महानीडांतून पंख फुटून भरारी मारल्यास आज आम्हांस दहा वर्षेंच काय तीं झालीं; पण या एका दशकांतच आमचा पूर्वोक्त संकल्प किती सिद्धीस गेला हें पाहून आम्हांस बरेंच समाधान वाटतें, व पुढील काळाकडे नजर दिली असतां खूप उमेद येते, आमच्या वडिलांनीं आम्हांस

विद्योपासनसमयींच लेखनप्रविष्ट करून ठेवलेंच होतें, व वरील नीड-
त्यागाच्या वेळेस तर माजी ' शालापत्रका' चें धुराकर्म त्यांनीं सर्वस्वींच आम्हांवर
लोटून दिलें. हें धुरीणत्व चार वर्षेपावेतों आमच्याकडेच होतें. पुढें विचित्र दैव-
योगानें वरील बिचाऱ्या ' पत्रका ' ची इतिश्री होण्यास आम्हीच कारण झालों.
मुंबईचें ' एज्यूकेशनल रेकर्ड ' म्हणजे रजा व नेमणुका समजण्याचा अखबार
जसें होऊन बसलें आहे त्याच्यापेक्षां ' मराठी शालापत्रका ' ची योग्यता कांहीं
जास्ती असावी असा आमच्या वडिलांचा संकेत होता; व पुढें आमचाहि होता.
त्याप्रमाणें ' मराठी व्याकरण ' व कविता ' हे दोन्हीं उपयुक्त व महत्त्वाचे
विषय सदरील पुस्तकाच्या द्वारें पुष्कळ दिवसपर्यंत प्रसिद्ध होण्यांत आले
याखेरीज मधून मधून पुस्तकांवर टीका वगैरे अनेक विषयहि येत असत. तेव्हां
एकंदरींत पाहतां सदरील पुस्तकाची व्यवस्था आमच्या वडिलांकडे आल्यापासून
तें मराठी मास्तरांस (कीं ज्यांच्याकरतां तें मुख्यतः उपस्थित केलें होतें) बरेंच
प्रिय होऊन राहिलें होतें. पण १८७४ सालापासून तें एका जबरदस्त दुष्टग्रहाच्या
फेऱ्यांत पडलें, व मनुष्य किंवा होडी भोंवऱ्यांत सांपडली असतां कालेंकरून
जशी त्यांची गति केंद्रवण होत होत त्यांत त्यांचा शेवटीं लय होतो, त्याप्रमाणेंच
पुढील सालापर्यंत वरील ग्रहग्रस्त पुस्तकाची मजल जेमतेम आटपून शेवटीं
बुडालें ! हा महान् अनर्थ होण्यास कारण काय झालें म्हणाल, तर पूर्वोक्त
कविताविषय. सदरील विषयाचे पूर्वभाग आटपुन महाराष्ट्र कवितेवर आम्ही येऊन
ठेपलों होतों, व आरंभीं थोडासा उपोद्घात केला होता. या उपोद्घातांत सदरील
कवितेचे शत्रु जे मिशनरी त्यांच्या संबंधानें कांहीं मजकूर आला होता. पण
येवढेंच कारण ट्रान्सलेटरसाहेबांसारख्या सुज्ञ व सद्धर्मी मनुष्याचा पित्तक्षोभ
होण्यास बस होऊन ताबडतोब डायरेक्टरसाहेबांचा खलिता सुटला कीं, असला
निबंध या मासिक पुस्तकांत पुनः आला तर खबरदार ! असो; तर या प्रकारें-
करून ' शालापत्रका ' च्या द्वारें आमचा प्रथमतः लेखनसरस्वतीच्या मुलखांत
प्रवेश झाला. हा होऊन दोन वर्षें झालीं तों आम्हांस स्वतंत्र पुस्तककर्तृत्वाची
हौस वाटून प्रस्तुत मालेचा प्रादुर्भाव झाला. याहि गोष्टीस आज आठ वर्षें लोटून
गेलीं. इतक्या काळांत प्रस्तुत पुस्तकाच्या संबंधानें किती उलाढाली झाल्या व
तितक्यांतून पार पडून आज स्वतंत्र शाळा, स्वतंत्र छापखाना, स्वतंत्र वर्तमान-

पत्रें इत्यादि नवीन सृष्टींत आम्ही कसे येऊन पडलों, हें यापूर्वी आमच्या प्रिय वाचकांस निवेदन केलेलेंच आहे!

येणेंप्रमाणें निरनिराळ्या मनोवृत्ति उत्कृष्ट रीतीनें उठवून देण्याविषयीं विष्णुशास्त्री यांच्या अंगीं विलक्षण सामर्थ्य ज्या त्यांच्या भाषापद्धतीपासून त्यांस आलें व जेणेंकरून त्यांची महाराष्ट्रांत एवढी ख्याति झाली आहे तिजविषयीं झालें. आतां उत्तम ग्रंथकारास अत्यावश्यक अशी दुसरी गोष्ट जी विषयनिवडणूक हिजकडे आपण वळूं. विष्णुशास्त्री हे आपल्या वडिलांविषयीं बोलत असतां म्हणत कीं, "त्यांची ग्रंथकार म्हणून जी येवढी ख्याति आहे ती पुष्कळ अंशीं त्यांच्या विषयनिवडणुकीमुळेंच आहे. आरेबियन नाईट्सप्रमाणें सर्वतोपरी मराठी भाषेंत भाषांतर करण्याला योग्य असा येवढा मोठा व उत्कृष्ट ग्रंथ इंग्रजींत दुसरा नाहीं. तेच जर आरेबियन नाईट्स सोडून रिकामे डौलानें शेक्सपीयर किंवा स्कॉट यांजकडे वळते तर यांचें आज मितीला फारसें नांवाहि न निघतें." हें जें विषयनिवडणुकीसंबंधानें विष्णुशास्त्री यांनीं आपल्या वडिलांविषयीं म्हटलें तेंच आपणांस त्यांजविषयीं म्हटलें पाहिजे. निबंधमालेंतील व इतर मासिक पुस्तकें जीं तिचे पूर्वीं निघत होतीं व हल्लीं तिचे मागून निघत आहेत त्यांतील नुसत्या विषयांचेंच जो कोणी अवलोकन करील त्याला कळून येईल कीं, निबंधमालेंतील विषयसंख्या थोडी; परंतु ते वाचकांस मुळींच अश्रुत असल्यामुळें समजण्यास कठिण किंवा अगदीं पूर्ण माहितीचे असल्यामुळें वाचण्यास पांचट असे नसून ते साधारण अशा तऱ्हेचे असावयाचे कीं, त्यांची थोडीबहुत माहिती पूर्वीं वाचकांस असून ती जास्त मिळविण्याची त्यांस इच्छा असावी, असे त्यांच्या ते आटोक्यांतीलच असावयाचे. विष्णुशास्त्री यांनीं तर्कशास्त्रावर किंवा अर्थशास्त्रावर किंवा रसायनशास्त्रावर भरारी मारून ते विद्वत्तारूप अस्मानांत वाचकाच्या दृष्टीपार निघून गेलेले असे कधीं आढळावयाचे नाहींत, किंवा एखादी रेंगाळवाणी कादंबरी लावून देऊन जमीनीवर खरडत राहिलेले असेहि दिसावयाचे नाहींत; परंतु त्यांचें उड्डाण नेहमीं वाचकांच्या दृष्टीच्या टप्यापर्यंतच असावयाचें. त्यांचे विषय म्हटले म्हणजे इतिहास, इंग्लिश-

भाषा, मोरोपंताची कविता, आमच्या देशाची स्थिति इत्यादि सामान्य मनुष्यांस समजण्यासारखेंच असत.

विष्णुशास्त्री यांनीं विषयनिवडणुकीसंबंधानें जो आपला समंजसपणा दाखविला आहे त्यापेक्षांहि निवडलेल्या विषयांच्या पुढील व्यवस्थेसंबंधानें जी त्यांची आस्था, मेहनत व कुशलता दृष्टीस पडते ती खरोखरच वर्णनीय होय. त्यांचा निबंध पहा, किंवा टीप पहा; सुभाषित श्लोक पहा, किंवा विनोदात्मक गोष्ट पहा; प्रत्येक भाग अगदीं चोख व निवडक असा असावयाचा, लेचापेचा म्हणून मिळावयाचा नाहीं! सर्व कांहीं मजकूर एकस्थानेंच लिहिलेला, एकस्थानेंच शुद्ध केलेला, असा एक हातीचा खात्रीचा कारभार आहे. त्यांत भेसळ म्हणून मिळावयाचीच नाहीं! तेथें निबंधमाला ही विष्णुशास्त्री यांच्या केवळ आवडीची कृति होय. तेथें पैशाचा किंवा मेहनतीचा किंवा दुसऱ्या कोणत्या गोष्टीचा विचारच नव्हता! यामुळेंच त्यांच्या पुस्तकांत व त्यांच्या मागल्या व त्यांच्या वेळच्या इतर मासिक पुस्तकांत इतकें महदंतर आहे. निबंधमालेपूर्वी बऱ्याच प्रकारें चांगलीं चाललेलीं अशीं तीन मासिक पुस्तकें— ज्ञानप्रसारक, विविधज्ञानविस्तार व ज्ञानसंग्रह—हीं सांगतां येतील. पहिलें पुस्तक मुंबईतील ज्ञानप्रसारक मंडळी काढीत असल्यामुळें त्यांत मंडलीकसारख्या विद्वान् लोकांचा हात असून तें पंधरा वीस वर्षें चाललें होतें. दुसरें पुस्तकहि आज पंचवीस वर्षें चाललें आहे. यासहि चांगल्या चांगल्या विद्वान् व बहुश्रुत लोकांची मदत आहे. आणि विद्वान लोकांशीं स्नेह ठेवून त्यांच्या सहाय्यानें आज पंचवीस वर्षें हें पुस्तक बऱ्याच योग्यतेनें चालविल्याबद्दल त्याचे उत्पादक व चालक मि. नाडकर्णी यांची तारीफ करणें योग्य आहे. तिसरें पुस्तक वऱ्हाडांतील प्रमुख प्रमुख विद्वान् मंडळी सुमारें पंधरा वर्षांपूर्वी काढीत असत. पुष्कळ निरनिराळ्या व्यक्ति एकत्र होऊन एखादें मोठें काम उठतें खरें; परंतु पुष्कळांचे हात आंत असल्याकारणानें व पुष्कळदां जोखिमीचा बोजा सर्वांवर सारखा वांटेला नसल्यामुळें मंडळीनें हातीं घेतलेलें काम तें जर लहान असेल तर तें एकाच परंतु बुद्धिमान व हिंमतवान मनुष्यानें हातीं घेतलेल्या कामापेक्षां

पुष्कळ निरस उठतें यांत संशय नाहीं. मासिक पुस्तकांत पुष्कळ व अनियमित लिहिणारे असले म्हणजे त्यांत थोडके, विसंगत व कधीं कधीं परस्परविरुद्ध अशा लेखांची भरती व्हावयाची आणि त्यांतून मासिक पुस्तक चालविणारांची कल्पना अशी असली--आणि दुर्दैवेंकरून ती बहुतेकांची आहे असें म्हणणें भाग आहे--कीं दर अंकांत चार पांच तरी विषयांचें थोडेंबहुत विवेचन झालें पाहिजे, म्हणजे विषयबाहुल्याची व विवेचनाच्या संकोचाची कमालच होऊन जाते. कोणत्याहि विषयास दर अंकांत दहा पंधरा पानें मिळालीं म्हणजे त्याचें नशीब; एरवीं पांच सहा पानें हा नेहमींचा खाका! असल्या मासिक पुस्तकांचा एक एक वेगवेगळाला अंक पाहिला तर त्यांत वर दर्शविलेले दोष इतके चांगले लक्षांत येण्याजोगे नाहींत; परंतु त्या पुस्तकांचे सबंध फाईल चाळून पाहिलें तर त्यांत शेंकडों विषयांचें केवळ दिग्दर्शन, पुष्कळांचें अर्धेमुर्धें झालेलें विवेचन, ठिकठिकाणीं उपयुक्त परंतु विसंगत माहिती, येथें पोवाडा तर तेथें ज्ञानेश्वरींतील वेंचे, कोठें मधून मधून आलेली व सरते शेवटीं अर्धवटच राहिलेली ' मोचनगडा ' सारखी कादंबरी, तर कोठें ' मोहना' सारखी दोन वेगवेगळ्या लिहिणारांनीं दोन वेगवेगळ्या लिहिलेल्या गोष्टींचा एका चतुरकारागिरानें डाग बसवून देऊन एकच दिसेल अशा गोष्टीचा भासला, कोठें केरोपंतनानांचें थोडकें व निर्जीव जीवनवृत्त पुस्तकांत आंत घातलेलें तर कोठें डॉ. भाऊ दाजी यांची पुस्तकाच्या मळपृष्ठावरच केलेली संभवना, एके ठिकाणीं कादंबरीसाराचा बराच सांठा तर दुसरीकडे अर्थशास्त्राचें एक मोठें जबर खोड, कोठें तर्कशास्त्र ' मेजर प्रेमिस' पर्यंत येऊन ठेपलेलें तर कोठें हवा पाणी हैद्रोजन ऑक्सीजनपर्यंत मजल पावलेलें,--असे शेंकडों विषयांचे निरानराळे अवयव, कांहीं लहान, कांहीं मोठे, कांहीं सुरेख व पाणीदार तर कांहीं लुळे व बेडौल असे या मासिक पुस्तकांच्या जुन्या अंकांच्या संग्रहांत एकत्र सांपडण्यासारखे आहेत. ज्याप्रमाणें ' पंच ' पत्रांमधील एखाद्या चित्रांत वर स्त्रीचें सुंदर मुख तर खालीं उंदराचे पाय, वर हरणासारखे पाणीदार डोळे तर मागें वानराची शेंपूट असा विचित्र प्रकार पाहून आपणांस त्याचें हांसें येऊन खेदहि

वाटेल त्याचप्रमाणें वरील मासिक पुस्तकांचे संग्रह चाळल्यानें कांहीं अंशीं वाचकांच्या मनाची स्थिति होण्यासारखी आहे.* परंतु निबंधमालेकडे वळून पहावें तर तिची अगदीं वेगळी स्थिति नजरेस पडेल. निबंधमाला ही एकाच चितान्यानें, मोठ्या आस्थेनें, आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून तयार केलेल्या सुंदर तजबिरीप्रमाणें आहे. तिचा एक एक अंक पहा किंवा सात वर्षांचे चवऱ्यांशी अंक एकत्र करून पहा. त्यांत विसंगति किंवा विरोध हीं कोठें सांपडावयाचीं नाहींत. तींत जे जे म्हणून विषय घेतले आहेत त्या सर्वांचें विवेचन परिपूर्ण असून कित्येकांचीं शंभर, कित्येकांचीं दीडशें व कित्येकांचीं दोनशेंहि पानें झालीं आहेत. निंबधमालेचे सात वर्षांत सात मोठमोठे विषय घेतले असून त्यांचें त्यांत यथास्थित विवेचन केलेलें आढळेल. शिवाय 'इंग्लिश भाषा' यासारख्या अतिव्यापक विषयाच्या मुख्य अंगाचें विवेचन करून बाकी त्याच्या अनेक उपांगांचा उल्लेख मात्र करून त्या प्रत्येकावर स्वतंत्र निबंध कसे लिहितां येतील हेंहि दाखविलें आहे. येणेंप्रमाणें भाषापद्धतिसंबंधानें जशी विष्णुशास्त्री यांची तारीफ करणें जरूर आहे त्याप्रमाणेंच विषयांची निवडणूक व त्यांची पुढील व्यवस्था ह्या संबंधानेंहि त्यांची तारीफ करणें अगदीं रास्त आहे.

* ह्या गोष्टीवरून हॉरेस कवीनं कुकवितेचें लक्षण देतांना जें पुढील खुबीदार वर्णन केलें आहे त्याची आठवण सहजच होण्यासारखी आहे:—

Humano capiti cervicem pictor equinam
Jungere si velit et varias inducere plumas
Undique collatis membris, ut turpiter atrum
Desinat in piscem mulier formsa superne,
Spectatum admissi risum teneatis amici ?
Credite Pisones, isti tabulℱ fore librum
Persimilem, cujus velut ægri somnia vanℳ
Fingentur species ; ut nee pes nee caput uni
Reddatur formN· '

Ars Poetica.

आतां शेवटला मुद्दा विचारसरणी याविषयीं लिहावयाचें राहिलें. यासंबंधानेंहि विष्णुशास्त्री इतर ग्रंथकारांस हार जातील असें आम्हांस वाटत नाहीं. त्यांची विचारसरणी त्यांच्या भाषासरणीसारखीच अगदीं सुगम व पद्धतवार अशी आहे. त्यांचे कोटीक्रमयुद्धाचे जे कित्येक प्रसंग झाले आहेत त्यांत त्यांनीं आपली युक्ति, बुद्धि, व विस्तृत वाचन हीं उत्कृष्ट तऱ्हेनें दाखविलीं आहेत. त्यांपैकीं मुख्य मुख्य मासले दंभहारकांतील पत्रास उत्तर, इंग्लिश भाषा, मोरोपंताची कविता व लोकहितवादी यासंबंधानें जें यामागें स्वतंत्र विवेचन केलें आहे त्यांत ते सांपडण्यासरखे आहेत त्याबद्दल येथें पुन्हां लिहिण्याची गरज नाहीं.

आतां निबंधमालेंतील कित्येक अंकांतील मजकूर व भाषा हीं फार कडक व कठोर आहे असा कित्येक लोकांचा विष्णुशास्त्री यांजवर आक्षेप आहे; परंतु आम्हांस हा विशेष दोष आहे असें वाटत नाहीं. कारण आपलीं मतें व विचार यांच्या मंडनार्थ कठोर भाषा, विनोदात्मक चर्चा वगैरे वाक्‌युद्धांतील निरानिराळ्या शस्त्रास्त्रांचा उपयोग करण्याचा प्रघात व्हॉलटेअर,* स्विफ्ट, ज्यूनियस, मेकॉले वगैरे प्रसिद्ध ग्रंथकारांनीं जो

---

* व्हॉल्टेअर याचें प्रतिपक्ष्याची टर उडविण्याचें हत्यार किती भयंकर असे याविषयीं मेकॉले साहेब लिहितात.

He (Voltaire) knew that he was a potentate as well as Frederick, that his European reputation and his incomparrble power of covering whatever he hated with ridicule, made him an object of dread even to the leaders of armies and the rulers of nations. In truth, of all the intellectual weapons which have ever been wielded by man, the most terrible was the mockery of Voltaire. Bigots and tyrants, who had never been moved by the wailing and cursing of millions, turned pale at his name. Principles unassailable by reason, principle which had withstood the fiercest attacks of power, the most valuable truths, the most

(पुढें चालू)

आज पुष्कळ दिवस पाडला आहे त्याचें अवलंबन केल्यानें विष्णुशास्त्री
यांजकडे वरील ग्रंथकारांची ज्यांस माहिती आहे त्यांच्या दृष्टीनें फारसा
दोष येण्यासारखा आहे असें आम्हांस वाटत नाहीं:-प्रतिपक्ष्यांची फजीती
गुलगुलीत शब्दांनीं उडविण्याची हातोटी एकट्या आडिसनचीच कायती !
परंतु त्याचें तरळ हत्यार सर्वांसच चालेल असें होणार नाहीं. ज्यांस तें
न चालून दुसरीं तितकींच प्रबळ हत्यारें चालवितां येतील त्या
सरस्वतीच्या लालांस तीं चालविण्यास तिची कुल परवानगी आहे !
आणि खरा रसज्ञ मनुष्य आहे तो ग्रंथकारानें कोणत्या साहित्याचा
उपयोग केला आहे हें पाहत नाहीं; तो फक्त त्याजकडून काम फत्ते झालें
कीं नाहीं येवढेंच पाहतो. निबंधमालेंतील तीव्र लेखांविषयीं आमचें मत
असें आहे कीं, मालेची प्रसिद्धि इतक्या थोड्या काळांत होण्यास जीं
कारणें झालीं त्यांतील वरील तीव्र लेख हें एक प्रधान होय. विष्णुशास्त्री
वरील गोष्टीची उपपत्ति करीत असतां म्हणत कीं, " आमच्या मालेची
इतक्या लवकर प्रसिद्धि होण्यास कारणें-अगोदर आमच्या वडिलांची
ग्रंथकार म्हणून जी कीर्ति होती ती आमच्या मालारूप इमारतीस भक्कम
पायाऐवजीं आयतीच झाली; यापुढें दुसरी गोष्ट आमची युनिव्हर्सिटीची
डिग्री; व त्यानंतर मालेंतील शुद्ध भाषा व सर्वांहून मोठी रक्कम म्हटली
म्हणजे मालेंतील प्रतिपक्ष्यांवरील तीव्र व बेमालूम कोटिक्रम-हीं होत..
हें शेंवटलें साधन प्रतिपक्ष्यांस जसें अगदीं झोंबून घायाळ करणारें असे,
तसें तें मालेची कीर्ति चोहोंकडे पसरविण्यास अत्यंत उपयोगीहि असे !
विष्णुशास्त्री म्हणत असत कीं, " आमच्या देशांतील समाजाची स्थिति
अति स्तिमित व बधिर अशी आहे. मेकॉले यानें तिजविषयीं उल्लेख

(मागील पृष्ठावरून पुढे चालू)

generous sentiments, the noblest and most graceful images, the purest reputations, the most august institutions, began to look mean and loathsome as soon as that withering smile was turned upon them.

Frederick the Great.

करतांना जें म्हटलें आहे कीं, इंग्लंडांत नुस्त्या डोकें फोडाफोडीनेंहि जो चोहोंकडे एकदम गवगवा होऊन जातो तोच हिंदुस्थानांत तीन कचकचीत लढाया झाल्यानेंहि होत नसेल ! " हें अगदीं अक्षरशः खरें आहे. आम्हांस खास वाटतें कीं, विष्णुशास्त्री यांनीं नुसतें जॉनसनचें चरित्र, भाषापद्धति, भाषांतर, विद्वत्व आणि कवित्व इत्यादि विवेचना-संबंधानें उत्कृष्ट परंतु आंतील मजकुरासंबंधानें अति सौम्य अशा निबंधां-वरच मालेची भिस्त ठेविली असती तर ती दोन तीन वर्षेंहि टिकली असती किंवा नाहीं याचा आम्हांस संशय आहे. शिवाय मालेविषयीं ही गोष्ट विशेष लक्षांत ठेविली पाहिजे कीं, मालेला सरकारचा किंवा कोण्या मंडळीचा आश्रय बिलकूल नव्हता; व हल्लीं पुष्कळ मासिक पुस्तकांप्रमाणें बळेंच आगांतुकी लावण्याचा ग्रंथकाराच्या योग्यतेला लाज आणणाऱ्या प्रचाराचा विष्णुशास्त्री यांच्या मानी स्वभावास अत्यंत तिरस्कार असल्यामुळें कोणी स्वतः होऊन पत्र पाठविल्याशिवाय ते मालेचे अंक कधीं पाठवीत नसत ! तेव्हां निबंधमालेचें जीवित्व सर्वथा ज्यांस कांहीं विद्येची गोडी लागून त्यांस मराठी पुस्तकें वाचण्याचा नाद लागला असेल अशा लोकांच्या आश्रयावरच अवलंबून असे हें उघड आहे. विष्णुशास्त्री यांच्या तीव्र लेखांची योजना ज्या व्यक्ति किंवा मंडळ्या किंवा समाज ज्यांचीं मतें किंवा कृति हीं पुष्कळ समंजस व संभावित लोकांस आवडत नसून ज्यांची फजीती उडविली असतां ग्रंथकारांस चटकदार व विनोदात्मक लेख लिहिण्याची संधी साधून लोकांस बोध व मनोरंजन हीं दोन्हीं प्राप्त होतील अशाकडे असे. ज्याप्रमाणें हरि-कीर्तनांत वेदांताविषयाची चर्चा करूं लागल्यानें श्रोतृसमुदायावर निद्रेचा अंमल होऊं लागलासें पाहून चतुर हरिदास कांहीं विनोदपर नकलांचा उपयोग करितात त्याप्रमाणेंच विष्णुशास्त्री हे विवक्षित विषयांचें विवेचन करीत असतांना वाचकांस अंमळ कंटाळा आलासा पाहून कधीं स्वामी दयानंद यांची गजेंद्रावरून काढलेली वरात, कधीं रसातळची मराठी भाषा व कधीं जोतीवांचा भटपांड्यांवरील भडिमार असे मधून मधून चुटके घालून देत. कित्येक नाजूक मंडळीस हा प्रकार पसंत न पडून ते

विष्णुशास्त्री यांस दोष देतात. * त्यांचे मित्र मि. महाजनी हे त्यांस

* नुकतेच डिसेंबर १८९१ सालीं मुंबईत तेथील म्युनिसिपल कमिशनर मि. ऑक्वर्थ साहेब यांनीं मराठी भाषेंतील ग्रंथ या विषयावर भाषण करीत असतांना निबंधमालेवर जो भडिमार करून दिला तो साहेबी थाटास अगदीं शोभण्यासारखा होता! त्यांचें एकंदर बोलण्यांतील तात्पर्य हें कीं, " विष्णुशास्त्री यांच्या निबंधमालेविषयीं पुष्कळ लोक तारीफ करितात खरी, परंतु त्यासारखें तींत मला कांहीं दिसत नाहीं. भाषा कांहींशी चटकदार आहे येवढेंच काय तें. आडिसनसारखें तींत काहीं नाहीं. मात्र जागजागीं मोठमोठ्या सन्मान्य व्यक्तींवर तोंड सोडून त्यांच्या कीर्तीस खालीं करण्याची व तेणेंकरून आपली प्रतिष्ठा वाढविण्याची कायती अश्लाघ्य इच्छा दिसून येते. परंतु असल्या लिहिणारांची योग्यता चांगले संभावित लोक कमीच समजतील. यापेक्षां या पुस्तकांत दुसरें म्हणण्यासारखें कांहीं नाहीं,—परंतु कदाचित् निबंधमालेचें हें वर्णन अतिशयोक्तीचें झालें असें मला वाटतें ! "

साहेबमजकुरांची वरील विचारसरणी खरोखरच मजेची आहे. त्यांचा विष्णुशास्त्रीपासून शेवटल्या ज्याशपर्यंतचा अस्खलित वक्तृत्वौघ आणि ज्याशा-पुढील ' परंतुपासून पुढील छोटेंसें वाक्य, हीं वाचून " इतकें ऐकून मी जागा झालों व हें सर्व स्वप्न आहे असें मला कळून आलें " या गोष्टीचा भास कोणास होणार नाहीं ? मि० ऑक्वर्थ यांनीं नुकतेंच पोवाड्यांचें पुस्तक प्रसिद्ध करून मराठीशाहीरांच्या कवनांचा जीर्णोद्धार केल्यानें त्यांनीं मराठी भाषेची एक मोठीच सेवा केली आहे ही गोष्ट मनांत आणून व शिवाय निबंधमालेंतील पुष्कळ राजकीय संबंधाचा मजकूर साहेबलोकांस सहजच आवडण्यासारखा नसल्यामुळें त्यांच्या बेमुद्देसूद भाषणाविषयीं कोणत्याहि तऱ्हेनें कडक रीतीनें लिहिण्यास आमचें मन घेत नाहीं; परंतु साहेबबहादुरांचें भाषण संपल्यावर त्यांनीं ' विष्णु ' विषयीं जो निंदात्मक पोवाडा गायला त्याला सभेचे अध्यक्ष आनेरबल मि० तेलंग यांनीं जी ' जी ' ओढली त्याबद्दल त्यांची तारीफ करावी तितकी थोडीच ! ! विष्णुशास्त्री यांनीं आठ वर्षें जें एकसारखें सत्र चालविलं

(पुढें चालू)

वारंवार लिहीत असत कीं, " असल्या कडक लेखांनीं तुम्ही आपल्या मालेची योग्यता मात्र कमी करून घेतां; दुसरा त्यापासून कांहीं उपयोग नाहीं. " एका प्रसंगीं ते विष्णुशास्त्री यांच्या भेटीस गेले असतां शेजारीं ज्यूनियसच्या पत्रांचे दोन भाग पडलेले पाहून मि. महाजनी म्हणाले, " काय हो, हीं बुकें तुम्ही कशाला वाचतां ? अगोदर तुमच्या लेखणींत काय कमी विष आहे ते तुम्ही तिला ज्यूनियस वाचून अधिक पूट देऊं पाहतां ? " मि. महाजनी यांचें म्हणणें प्रथमदर्शनीं सयुक्तिक आहे असें वाटतें; परंतु अंमळ विचार केला असतां कळून येईल कीं, तसें केल्यानें भाषापद्धतींतील एक मोठा प्रचंड भाग व प्रतिपक्ष्यांचें खंडन करण्याचें एक उत्कृष्ट साधन नाहींसें केल्याप्रमाणें होईल; आणि या गोष्टीला कोणता रसज्ञ मनुष्य कबूल होईल तो होवो ! ज्या मोठ्या हत्याराचा प्रभाव व्हॉलटेअर संबंधानें नुकताच टिपेंत सांगितला आहे कीं, ज्याच्या पुढें मोठमोठे फ्रेडरीक दि ग्रेट सारखे तरवार बहादरहि थरथरां कांपत असत व जें अनेक वेळां जुलमी राजे, धनमदानें अंध असे बडे लोक व अन्यायी न्यायाधीश यांजपासून ताप पावलेल्या असंख्य लोकांस आश्रयभूत होतें तेंच जर वरील साधु मंडळींनीं निस्तेज करविलें तर वरील जुलमी बड्या मंडळींचा कांटाच काढून टाकण्यासारखें होणार आहे ! परंतु जोंपर्यंत यूरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांतहि अझून येवढें सौजन्य व साधुवृत्ति पसरली नसून ज्यूनियस, स्विफ्ट, वॉलटेअर, मेकॉले यांच्या लेखांची अझूनपर्यंत जिकडे तिकडे चहाच चालू आहे तोंपर्यंत विष्णुशास्त्री यांच्या लेखांत तीव्रता फार म्हणून त्याची योग्यता कमी मानणें आम्हांस सयुक्तिक वाटत नाहीं. विष्णुशास्त्री यांनीं कोणाचा

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

होतें तें संपून जाऊन त्याचा होताहि पर्यायीस जाऊन आज दहा वर्षें झालीं; इतक्या दीर्घकाळपर्यंत निबंधमालेविषयींचें आनरेबलसाहेबांचें हें अमोलिक व स्वतंत्र अनुमत त्यांनीं आपल्या जागींच दाबून ठेविलें होतें त्याबद्दल त्यांच्या सहिष्णुतेची वाहवा करावी तितकी थोडीच ! !

व्यर्थ उपमर्द केला आहे असें जो कोणी त्यांचे ग्रंथ नीट लक्ष लावून वाचील व या चरित्रांत ज्या पुष्कळ आख्यायिका त्यांनीच सांगितलेल्या दाखल केल्या आहेत त्यांचा त्यांजवळ केवढा मोठा संग्रह असूनहि त्याचा त्यांनीं कधीं उपयोग केला नाहीं या गोष्टीचा विचार करील त्यास खास वाटणार नाहीं. शिवाय त्यांनीं कोणा सन्मान्य व्यक्तींवर किंवा मंडळ्यांवर किंवा समाजांवर व्यर्थ दोषारोपण करून त्यांची फजीती करण्याचा यत्न केला असतां व तेणेंकरून पुष्कळ चांगल्या लोकांचीं मनें दुखावलीं असतीं तर त्यांची माला जिला सरकार किंवा कोणी मंडळी ह्यांचा बिलकुल आधार नसून ती केवळ लोकाश्रयावरच सर्वथा अवलंबून होती ती केव्हांच मुकून गेली असती; आणि तिचा गुंफक समाप्त झाला असतांहि तिच्या एकामागून एक अशा तीन चार आवृत्ति निघत आहेत त्या निघण्याचा अगदीं संभव नसता असें आम्हांस वाटतें !

तथापि आपल्या देशाविषयीं युरोपियन लोकांचे दुराग्रह किंवा आपल्या धर्माविषयीं अलीकडील विद्वान् लोकांचे गैरसमज यासंबंधानेंविष्णुशास्त्री जेव्हां संतापून लिहितात त्यावेळीं मुख्य विषयाच्या विवेचनांत कधीं पुराव्यादाखल व कधीं पुष्टिकरणार्थ ते ज्या दुसऱ्या कित्येक गोष्टी मध्येंच कधीं कधीं घालून देतात तेणेंकरून महासागरांत भडकलेल्या तारवाप्रमाणें वाचकांस दिशाभूल होण्याचा संभव असतो व त्यांस अनुक्रम अंकरूपी होकायंत्राकडे नजर ठेवावी लागते ! ज्याप्रमाणें इंग्लंडांतील प्रसिद्ध वक्ता बर्क हा फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीविषयीं बोलूं लागला किंवा पिट हा हयानोवरच्या राजघराण्याविषयीं बोलूं लागला म्हणजे त्यांचें जणू काय देहभानच सुटून जाई व मग त्यांचा दाब त्यांच्या वक्तृत्व ओघावर न राहून त्यांची बुद्धि त्या प्रचंड लोंढ्याबरोबर वाहवली जाई तसा कांहींसा प्रकार विष्णुशास्त्री यांच्या लिहिण्यांत वरील प्रसंगीं आढळून येतो असें त्यांच्या उत्तम चाहत्या मंडळीसहि कबूल करणें भाग आहे. पाद्री मंडळी, नवीन धर्मसमाज, दयानंद, करवीरस्थ कवि, नवीन लब्धप्रतिष्ठित लोककल्याणेच्छु मंडळी इत्यादि विषयांच्या त्यांच्या पुनरुक्तीनें निबंधमालेंतील कांहीं चांगले चांगले पारिग्राफ सुद्धा कंटाळवाणे झाले आहेत ! तेव्हां जे नवीन ग्रंथकार

निबंधमालेची विचारसरणी उचलून तिच्यासारखी आपली भाषा चटकदर करण्याविषयीं यत्न करतील त्यांनीं हा पुनरुक्तीचा दोष अवश्य टाळावा !

येथवर विष्णुशास्त्री यांच्या विचारसरणीविषयीं झालें. आतां त्यांच्या निबंधांखेरीज निबंधमालेंत जे दुसरे कित्येक भाग–सुभाषित, विनोदमहदाख्यायिका, उपयुक्त माहिती, अर्थसादृश्य साहित्यशास्त्र, मराठी कवितेंतील उत्कृष्ट उतारे इत्यादि–येत असत त्यांविषयीं थोडक्यांत निर्देश करून विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांपासून त्यांच्या वेळीं व हल्लीं मराठी भाषेंतील ग्रंथकारांवर व इतर सामान्य सुशिक्षित लोकांच्या मनांवर जे परिणाम झाले व होत आहेत व पुढील प्रजेवर होण्याचा संभव आहे त्यांविषयीं लिहून विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथाचें विवेचन संपवितों. आतां सुभाषिताविषयीं इतकेंच सांगतों कीं, संस्कृत भाषेंत या अमूल्य रत्नांचा केवढा संग्रह आहे असा कीं तसा, मार्मिक व सहज तुटक असा संग्रह कोणत्याहि दुसऱ्या प्राचीन किंवा अर्वाचीन भाषांत खास नाहीं–हें मराठी वाचकांस चोख व चटकदार भाषांतर देऊन दाखवून देण्याचें श्रेय विष्णुशास्त्री यांस निःसंशय आहे. यांनीं साधारण मराठी वाचकसुद्धां चांगले बहुश्रुत व रसज्ञ होतील असें आम्हांस वाटतें. यानंतर दुसरा मोठा संग्रह म्हटला म्हणजे विनोदमहदाख्यायिका यांचा होय. हाहि फार उपयुक्त आहे. इंग्रजींत ' बुक ऑफ फन, ' ' दी वर्ल्ड ऑफ विट्‌ ॲंड ह्यूमर ' वगैरे जीं अति खुबीदार व गमतीचीं पुस्तकें आहेत ज्यांच्या मलपृष्ठांवरच— laugh, and grow fat हंशा पिकवून प्रकृतीस आराम करून घ्या—असें आंतील मजकुराचें दर्शक वचन घातलें असतें. त्यांतून विनोदात्मक व हास्यात्मक अशा शेलक्या शेलक्या गोष्टी मराठींत चटकदार अशा उतरून घेतल्या आहेत. यांपैकीं कांहींकांचा मासला भाषापद्धतीचें विवेचन करतांना दिलाच आहे. आतां या पुढील भाग जो अर्थसादृश्य, साहित्यशास्त्र, भाषापरिज्ञान इत्यादि यांविषयीं आम्ही येवढेंच म्हणतों कीं, या सदरांखालीं विष्णुशास्त्री यांनीं जी माहिती दिली आहे ती मोठे शोधकबुद्धीनें तयार करून चांगल्या व सुलभ अशा भाषेंत दिली आहे. ही अर्थातच थोडी थोडी आहे, परंतु भाषाभिज्ञांनीं याच विषयावर अधिक परिश्रम घेतले असतां त्यांचा

संग्रह कसा चांगला वाढवितां येईल हें दाखविण्याकरितांच सुभाषित व विनोदमहादाख्यायिका याप्रमाणेंच यांचाहि मराठी भाषेंत उपक्रम विष्णुशास्त्री यांनींच केला. आतां शेवटीं निबंधमालेंतील मजकुराचे संबंधानें कधीं कधीं सामोपचाराचीं व कधीं कधीं तीव्र अशीं जीं पत्रें त्यांजकडे येत असत तीं सर्व ते आपल्या पुस्तकांत छापीत. त्यांतील कांहीं आपणांविरुद्ध कडक रीतीनें लिहिलीं आहेत म्हणून तीं दाबून टाकण्याचा किंवा त्यांस उत्तर न देतां विन्मुख लावून देण्याचा यत्न त्यांनीं कधीं केला नाहीं. मूळ पत्रें सबंध छापून त्यांत कधीं उत्तरादाखल आपलीं कारणें अधिक सविस्तर सांगून पत्रें लिहिणारांचें समाधान करण्याचा ते यत्न करीत; परंतु कधीं प्रतिपक्ष्यांचें म्हणणें सयुक्तिक वाटल्यास ते आपली चूक पदरांतहि घेत ! मासिक पुस्तकांतील पत्रव्यवहारासंबंधानें विष्णुशास्त्री यांचा हा चोख व्यवहार कित्ता घेण्याजोगा आहे.

आतां विष्णुशास्त्री यांच्या लेखांपासून हल्लीं असलेल्या व पुढें होणाऱ्या लोकांच्या मनांवर काय परिणाम झाले व होतील याविषयीं लिहावयाचें राहिलें. विष्णुशास्त्री यांनीं प्रथम १८७४ सालीं निबंधमाला सुरू केली. त्यापूर्वी मराठी भाषेची स्थिति कशी होती याचें वर्णन त्यांनीं मालेच्या पहिल्या दोन अंकांत दिलें आहे. मराठी भाषा अपक्क दशेंत असून तींत गद्यग्रंथसंग्रह म्हणण्यासारखा नाहीं या मुद्यावरून तिला युनिव्हरसिटीच्या वरच्या परीक्षेंतून १८७० सालापासून अजिबात काढून टाकल्यामुळें तिची विशेष अनास्था व विटंबना होण्यास सुरुवात झाली. यापूर्वी तरी जे कोणी तरतरीत नवीन पदवीधर असत त्यांनाहि मराठीचा फारसा विटाळ सोसत नसे. त्यांची विशेष भक्ति कायती इंग्रजी ग्रंथांवर असून परीक्षा पास होण्यास दुसरा मार्गच नाहीं म्हणून थोडाबहुत वेळ त्यांस मोरोपंत किंवा वामन यांचें एखादें दुसरें प्रकरण व मराठी कविचरित्र किंवा ' मंडलीककृत हिंदुस्थानचा इतिहास ' अशा गहन पुस्तकांच्या अध्ययनाकडे घालवावा लागे. पुढें एकदां डिग्री मिळाली म्हणजे वरील मंडळींची आणि देशभाषेची अगदीं फारकत व्हवयाची ! कोठें व्याख्यान देणें झाल्यास किंवा वर्तमापत्रांत लिहिणें असल्यास त्यांना मराठी भाषा म्हणून चालायचीच

नाहीं; तें सर्व इंग्रजींत झालें पाहिजे. यापूर्वी इंग्रजी विद्येचा प्रसार अगदीं थोडा, विद्याखात्याची व्यवस्था ' बोर्ड ऑफ एज्युकेशन ' कडे, मेजर क्यांडीसारखे कांहीं अंशीं इंग्रजीग्रंथज्ञानांत कमी निपुण असे गुरु, अशी स्थिति असूनहि मराठी ग्रंथरचनेविषयीं नवीन विद्वान् मंडळींत जो हुरूप होता तोंच, स्वतंत्र युनिव्हरसिटी स्थापन झाली, बोर्ड ऑफ एज्युकेशनचे जागीं डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन सारख्या एका मोठ्या पगाराच्या स्वतंत्र कामगाराची नेमणूक झाली, व मेजर क्यांडी यांच्या जागीं प्रो. वर्डस्वर्थ, सर आलेक्झयांडर ग्रांट यांच्या सारखी विद्वान् मंडळी आली, त्याचप्रमाणें चोहोंकडे कॉलेजें, हायस्कुलें, सिटीस्कुलें स्थापन होऊन विद्याप्रसार मोठ्या झपाट्यानें चालू झाला इत्यादि गोष्टी झाल्या असतां ओसरून जावा हा मोठा चमत्कार होय ! गेल्या पिढींतील सदाशिव काशिनाथ छत्रे, बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यापेक्षां हल्लींच्या पिढींत कोणी सवाई पंडित होऊन त्यांचें काम पुढें अधिक चांगल्या प्रकारें चालवून आपल्या लोकांत विद्येचा प्रसार देशभाषाद्वारा करतील अशी जी मेकॉले, राममोहनराय वगैरे मंडळींनीं उमेद धरली होती ती सर्वथा निष्फळ होण्याचा प्रसंग आला. डिग्रीवाला कोणीहि मराठी लेखणी म्हणून हातीं धरीना ! त्यास देशभाषेंत शुद्ध बोलण्याची किंवा लिहिण्याची पंचाईत पडून ' नाचतां येईना, तर अंगणच वांकडें ' या म्हणीप्रमाणें तो मराठी भाषाच निर्जीव, तींत इंग्रजी विद्येनें विस्तृत झालेल्या मनाच्या विद्वान् मनुष्यास आपले पोक्त विचार प्रकट करण्याचीच योग्यता नाहीं इत्यादि नाहींत ते दोष आपल्या देशभाषेवर लादूं लागला. मे. क्यांडीसाहेबां-सारखी मराठी भाषेच्या उत्कर्षाविषयीं प्रो. वर्डस्वर्थ, मि. चाटफील्ड वगैरे साहेबांस कळकळ नसल्यामुळें त्यांचा लकडा वरील साहेबांप्रमाणें नवीन डिग्रीवाल्या मंडळीमागें न लागल्याकारणानें त्यांच्या ठिकाणीं मराठी ग्रंथ-रचनेविषयीं मागील पिढींतील लोकांप्रमाणें आस्था न राहून त्याबद्दल टाळाटाळ व बेपर्वा हीं अर्थातच उत्पन्न झालीं. चांगला मोठा पगार, तीन चार तास कशीं तरी पोरें हांकून शाळेचा रिझल्ट सरासरी बाईटच

न झाला म्हणजे आपण मोठी मिळविली अशी ज्यांची व इतर लोकांचीहि समजूत आणि असेंच रडतकढत काम सरकारांतहि पसंत पडायचें, मग वरील डिग्रीवाल्यांनीं गुडसरव्हीसची हिंमत बांधली तर त्यांत नवल तें काय ? परंतु जर डायरेक्टर साहेबबहादूर वरच्या वृद्ध मंडळीवर देशभाषेंत ग्रंथरचना करण्याविषयीं अंमळ शिस्त धरतील तर किती मंडळींस आजच सिव्हिल हास्पिटलची वाट धरावी लागेल ! !

याप्रमाणें लोकशिक्षणाचा मुख्य भाग जो देशभाषांचा उत्कर्ष होऊन त्यांच्या द्वारें सामान्य लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार व्हावा त्याची विद्या-खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं योग्य काळजी न घेतल्यामुळें आमच्या भाडोत्री डिग्रीवाल्या मंडळीस सरकारी बड्या नोकऱ्या म्हणजे आम्हीं पूर्व-वयांत जें अकटोविकट अध्ययन करून हाडांचीं काडें केलीं त्याबद्दल सरासरी बक्षिसीखातरच थोड्या मेहनतीच्या अशा सरकारांनीं आम्हांस दिल्या आहेत व एकदांचा डिप्लोमा हातीं पडला म्हणजे बाकी राहिलेला आयुष्याचा भाग चैनींत, आळसांत किंवा व्यसनांत लेखणीस किंवा पेनास कधींहि न शिवतां, परंतु वाटेल तर व्यर्थ बडबड करण्यांत घालविण्याचा आमचा नवीन पदवीधरांचा हक्कच आहे असें त्यांस वाटूं लागलें; व यामुळेंच युनिव्हरसिटी स्थापन झाल्यापासून तों निबंधमालेचा १८७४ सालीं उदय होई पावेतों १७ वर्षांत जी सुमारें हजार बाराशें ग्राज्युएट व अंडरग्राज्युएट मंडळी बाहेर पडली असेल त्यांपैकीं ज्यांनीं म्हणून मराठी पुस्तकांचीं मलपृष्ठें आपल्या नांवांनीं शोभिवंत केलीं असतील असे हरीचे लाल दहापांच तरी निघतील कीं नाहीं याचा आम्हांस संशयच आहे ! !

येणेंप्रमाणें मराठी भाषेची अत्यंत शोचनीय व आमच्या डिग्रीवाल्या मंडळीस लाज आणणारी स्थिति असतां विष्णु कृष्ण चिपळुणकर बी. ए. या पदवीसह नांवाखालीं निबंधमालेचा उदय झाला. ज्याप्रमाणें पवित्र शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ईश्वरानें प्रचंड आकाश उत्पन्न केल्यानंतर सृष्टि-निर्माणाच्या चौथ्या दिवशीं संध्याकाळीं लहान लहान अगण्य ताऱ्यांच्या समुदायांत प्रथमच द्वितीयेच्या अत्यंत लहान परंतु रमणीय चंद्रकलेला

एकाएकीं उत्पन्न केलें त्या वेळीं तो प्रसंग जसा अति रम्य व आनंदमय वाटला असेल त्याचप्रमाणें आपला देश, आपला धर्म, आपला इतिहास आपल्या जुन्या विद्या, आपलें कलाकौशल्य वगैरे गोष्टींविषयीं ज्या अनेक भ्रांतिमूलक व अहितकारक अशा कल्पना आपल्या लोकांत पसरल्या होत्या त्यांचें निरसन करण्याकरितां निबंधमालेचा नूतन उदय झालेला पाहून तो मराठी रसज्ञ वाचकांस अत्यंत रमणीय व आल्हादकारक वाटला असेल यांत नवल नाहीं ! कृष्णशास्त्री यांनीं आपली लेखणी सुमारें पंचवीस वर्षे चालवून ती आपल्या चिरंजिवांच्या हातीं या सुमारास दिलेली पाहून वरील मंडळीस आनंद झाल्यावांचून राहिला नसेल. शिवाय कृष्णशास्त्री यांच्या लेखांत जे स्वतंत्र व निर्भीड विचार कधीं आले नव्हते ते चिरंजिवांच्या उदात्त लेखांत येऊं लागल्यामुळें लोकांचें मन मालेकडे विशेषेंकरून लागलें. यापूर्वीं इंग्रजी राज्य, इंग्रजी विद्या, इंग्रजी कला, हरएक इंग्रजी गोष्ट यांच्या नवीन विद्वान् लोकांच्या ग्रंथांतून, वर्तमानपत्रांतून, वक्त्यांच्या भाषणांतून जयघोषाचा नाद चोहोंकडे दुमदुमून राहिला होता; आणि उलटपक्षीं पेशवाईतील शहाणे लोक, भटपांड्ये यांचे कावे, प्राचीन विद्या, प्राचीन कला, प्राचीन धर्म इत्यादि विषयांवरील शतपत्रें, घाशीराम कोतवाल, जोतीबांची गुलामगिरी, पुण्याचें वर्णन वगैरे पुस्तकांतून एकसारखी विटंबना व फजीती हीं चालू होतीं. सरतेशेवटीं इतकी मजल येऊन पोंचली कीं, प्रत्यक्ष जगद्गुरूंस साक्षीकरितां कोर्टांत ओढून नेऊन हिंदुधर्मांचा जुन्या समजुतीप्रमाणें अपमान केला असतांहि त्याबद्दल वर्तमानपत्रांतून जयजयकारच ! ! अशी नवीन पक्षाची त्यांत कोणी जज, कोणी प्रोफेसर, कोणी वकील व पुष्कळ डिग्रीवाले हे असल्यामुळें त्यांची सरशी, व जुन्या पक्षास कोणी वजनदार पाठबळ देणारा नसल्यामुळें त्याचा पाडावा होऊन तो हतवीर्य होऊन राहिला असतां मालाकाराची प्रथम हळू परंतु स्पष्ट ऐकूं येणारी व जुन्या पक्षास उमेद आणणारी गर्जना एकाएकीं कानांवर पडल्यानें व शेवटीं मालाकाराच्या तीव्र आघातांनीं नवीन पक्षांतील प्रमुख प्रमुख वीर घायाळ होऊन त्या पक्षाचा पाडाव झालेला पाहून बहुतेक मराठी

वाचकांस जो आश्चर्यानंद झाला असेल त्यावरून आमच्या मर्मज्ञ इंग्रजी वाचकांस स्कॉटच्या आयव्हयानो कादंबरींतील राजपुत्र जॉन यानें आशबी येथें भरविलेल्या टूर्नमेंटच्या प्रसंगाची–कीं जेथें नार्मन वीरांची प्रथम उत्तम रीतीनें सरशी होऊन स्याक्सन पक्ष फजीत होऊन बसला असतां दुरून एका स्याक्सन वीराच्या तुतारीची गंभीर गर्जना ऐकून व पुढें लवकरच त्यानें घमेंडीस चढलेल्या नार्मन वीरांस समरांगणांत चीत केलेलें पाहून जुन्या स्याक्सन पक्षास जें आनंदाश्चर्य वाटलें–त्याची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं !

येणेंप्रमाणें जुन्या पक्षास आपली आर्यभूमि, तिची प्राचीन विद्या, तिचा धर्म यांचा पुरस्कर्ता, उलट पक्षांतील एका प्रमुख पंडिताचा पुत्र व तोहि डिग्रीवाला असा मालाकाररूपानें मिळून तो अनेक नवीन वेडगळ मतांचें सत्र करण्यास उभा राहिलेला पाहून त्यांस आनंद झाला असेल यांत नवल नाहीं; व ही निबंधावली निघाल्यापासून इग्रजी विद्येचा प्रसार या देशांत होऊन हरएक इंग्रजी गोष्ट तेवढी चांगलीच असायची व आपल्याकडील तीच गोष्ट उलट प्रकारची असायची हा जो बहुतेक लोकांचा समज होत चालला होता त्यानें उलट खाल्ली ! इतिहासज्ञांस ठाऊकच आहे कीं, कोणती एखादी गोष्ट मग ती उत्कृष्ट जरी असली तरी तिचा नुसता चांगुलपणाहि लोकांस भासूं लागून तिचा कळस झाला म्हणजे लागलीच तीस उतरती कळा लागलीच पाहिजे. घड्याळाच्या लंबकाचा हेलकावा जितका एका बाजूस जातो तितकाच तो दुसरे बाजूस गेला पाहिजे; व अशा कृतीनेंच घड्याळ चालतें. याप्रमाणेंच समाजांतील कोणतीहि गोष्ट पुढें चालावयाची म्हणजे तो हेलकावा खाऊन चालावयाची ! इंग्लिश लोकांची अलौकिक राज्यपद्धति, त्यांच्या उत्तम दशेस आलेल्या विद्या व कलाकौशल्य यांच्या योगानें आमच्या देशांतील लोकमतांत जो हेलकावा सुमारें १८१८ पासून सुरू झाला तो वाढतां वाढतां सुमारें १८७३ सालापर्यंत शिखराला जाऊन पोंचला; परंतु त्यानंतर त्यानें जी उलट खाण्यास आरंभ केला ती अझून संपली नाहीं ! व आणखी पुढें किती दिवस हा हेलकावा तसाच चालेल

याचा आजला अदमास करितां येत नाहीं ! या उलट हेलकाव्यानें हल्लीं अशी तऱ्हा झाली आहे कीं, इंग्रजी म्हटलें म्हणजे त्यांत कांहीं तरी खोटेपणा, भपकी, व्यर्थ दुराग्रह, लोकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष, प्राचीन हिंदुविद्या चांगल्या, पेशवाईतील वीर म्हणजे युरोपांतील वीरांपेक्षां कांहीं कमी लढवय्ये नव्हत इत्यादि मतें रूढ होऊं लागलीं आहेत. हीं मतें निबंधमाला निघण्यापूर्वी लोकांत फारशीं पसंत नसत व त्यांचें प्रकाशन करण्याचें कोणी धैर्य करीत नसत ! त्यांचा वर्तमानपत्रांतून किंवा मासिक पुस्तकांतून अगदींच निर्देश होत नसेल असें आमचें म्हणणें नाहीं; परंतु तें क्वचित् व कमी जोराचें असें असे. या नवीन मतांचें उद्घाटन निबंधमालाकार हे ज्याप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी किंवा भीति यांविषयीं विचार न करितां अगदीं निर्भीडपणानें व कळकळीनें पुनः पुनः करितात व त्यांच्या पायीं त्यांनीं अखेरीस आपली सुखाची नोकरीहि घातली तशी तऱ्हा इतर पुस्तकांमध्यें सांपडणें कठिण !

येणेंप्रमाणें मागील पिढींतील विचार जे कांहीं अंशीं चांगले, परंतु पुष्कळ अंशीं देशाच्या खऱ्या हिताविरुद्ध असे होते त्यांची लाट मागें सारून नवीन पिढींतील विचार–जे कांहीं अंशीं भलत्याच थरास नेल्यानें अगदीं वेडगळ दिसतात, परंतु ज्यापासून देशाचें बरेंच हित होण्यासारखें आहे–त्यांची वर चढवून देऊन विष्णुशास्त्री यांनीं एका मोठ्याच विचार-क्रांतीस आरंभ केला असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यासरसा हळुहळू वर्तमानपत्रांचा, मासिक पुस्तकांचा वगैरे झोंक फिरला, आणि मेकॉले, मिल्ल वगैरे इंग्रजी ग्रंथकार, नवीन धर्मपंथ, दयानंद, जोतीबा वगैरेसारखीं बंडें, नवीन आळशी, पोषाखी, कमकुवतवार डिग्रीवाली मंडळी यांजवर लोकमतानें उलट खाऊन चोहोंकडे चळवळ सुरू झाली. तथापि मतांतर जें होतें तें क्रमाक्रमानेंच व्हावयाचें. विष्णुशास्त्री यांच्या पूर्वींचे लोक म्हणजे कृष्णशास्त्री यांच्या वेळची मंडळी. यांच्या मतांवर निबंधमालेंतील लेखांचा परिणाम फारच थोडा झाला असें म्हटलें असतां चालेल. यापुढें त्यांच्या समकालीन लोकांवर पहिल्यापेक्षां तो अधिक

झाला. परंतु जितका व्हावा तितका अर्थातच झाला नाहीं. * म्हणूनच

---

* विष्णुशास्त्री यांचे समकालीन सहाध्यायी व स्नेही मि० महाजनी यांस या चारित्रास जोडण्याकरितां विष्णुशास्त्री यांचे ग्रंथपरीक्षण लिहिण्याविषयीं चरित्रकारानें विनंति केली असतां त्यांनीं पुढील उत्तर पाठवून दिलें. त्यावरून विष्णुशास्त्री यांच्या वेळच्या मंडळींचीं त्यांच्या ग्रंथांविषयीं मतें कशी मध्यम स्थितींतील होतीं हें दिसून येईल:—

Jalgaon. 16/1/92.

My dear Nana

I received your letter. I thank you very much for your offer. But I am sorry to say I cannot undertake the task—not because I am unwilling but because I feel I am not sympathetic enough. I do not know whether you know that when Mr. Vishnupant was publishing the journal, I wrote to him several times protesting against his one sided criticism and his strong language. I did not approve of his attack on लोकहितवादी who did not, in the first place, deserve such castigation and in the second place, whose work had long been forgotten. While I appreciated his service to Marathi Literature proving by example that noble thoughts can be expressed in noble Marathi, I thought and often expressed to him that, instead of leading the public, he himself humoured their prejudices, in many respects. True, he was not a blind bigot and was a patriot and at times he attacked popular prejudices, but unfortunately these attacks have been forgotten and he is remembered more for his essays on लोकहितवादी and दयानंद than for his essays on इतिहास and on Dr. Johnson.

* * * *

You would thus see that I am not qualified to write

[पुढें चालू]

कोणा आनरेबलांस " विष्णूच्या लेखांत त्यांच्या वडिलांच्या लेखांप्रमाणें प्रौढपणा वगैरे कांहीं आढळत नाहीं; " दुसऱ्या रावसाहेबांस ' तुमच्या कडक लेखांनीं तुम्हांस किंवा ज्यांच्या हिताकरितां तुम्ही ते लिहितां त्यांस कांहीं फायदा होणार नाहीं असें वाटतें. ' अर्थातच इंग्रजींत जी म्हण आहे कीं, कोणी मोठा महंत म्हणून जो ठरतो तो आपल्या काळांत फारसा ठरत नाहीं; त्यास कांहीं काळ लोटावा लागतो. त्याप्रमाणेंच विष्णुशास्त्री यांची गोष्ट आहे. त्यांच्या काळापासून जितकें जितकें पुढें यावें तितकें तितकें त्यांच्या लेखांची अधिकाधिक चहा दृष्टीस पडते. निबंधमाला बंद झाल्यावर चार पांच वर्षें चोहोंकडे बरेंच सामसूम होतें. तोंपर्यंत पुष्कळांपाशीं निबंधमालेचे फाटके तुटके अंक कांहीं तरी होते; परंतु १८८६ च्या सुमारास प्रथम गवगवा ऐकूं येऊं लागला कीं, विष्णुशास्त्री यांची निबंधमाला त्यांचे बंधु किंवा इतर स्नेही तशीच कोमेजूं कां देतात? पुनरावृत्ति काढून तीस ताजेंतवानें कां करीत नाहींत? कांहींकांनीं तर सही देऊन वर्तमानपत्रांत त्याबद्दल लक्ष्मणरावांस पृच्छाहि केली. कोणी कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं त्यांस निरोप पाठविला कीं, तुम्ही निबंधमाला जर छापीत नसाल तर पुनरावृत्तीचा तुमचा हक्क जरी आहे तरी तो आम्ही गुंढाळून ठेवून आम्हींच ती कशी तरी छापून काढून घेऊं! परंतु येवढ्या हजार दीडहजार पानांच्या पुस्तकाची पुनरावृत्ति काढणें म्हणजे साधारण जोखमीचें काम होतें असें नाहीं. यामुळें विष्णुशास्त्री यांचे बंधु व इतर स्नेही हे अमळ विचारांतच होते. इतक्यांत लक्ष्मणराव यांचे स्नेही श्रीशिवाजीचे मालक रा. कृष्णराव बापु मांडे यांनीं वरील

[मागील पृष्ठावरून पुढें चालू]

sympathetically about Mr. Vishnupant's work and I do think the time has not yet come when a critical review of his work will be appreciated. For this reason I beg to be excused for declinng the work you wish me to do.

Yours Sincerely,
V. M. Mahajani.

जोखमीचें काम मी पतकरतों म्हणून कबूल करून त्यांनीं कामास सुरुवात केली. त्यांनीं हल्लीं निबंधमालेचे तीन चांगले मोठ्या टाईपांत सुवाच्य असे भाग काढले आहेत. कृष्णराव यांनीं या कामास सुरुवात करून महिना दोन महिने झाले नाहींत तोंच रा. रामकृष्णपंत कुळकर्णी यांचें पत्र लक्ष्मणराव यांस आलें कीं, " विष्णुशास्त्री यांनीं आपल्या मागें निबंधमालेचा प्रसार सहज व्हावा या हेतूनेंच तिच्या स्वामित्वाबद्दल हक्क नोंदला नाहीं. जेव्हां त्यांचा हेतु सिद्धीस नेण्याकरितां मालेची पुनरावृत्ति जितक्या थोड्या खर्चानें निघेल तितक्यानें ती काढून ती अतिस्वल्प दरानें विकण्याचा आम्ही संकल्प केला आहे तेव्हां तुम्ही या कृत्यास तुमच्या मालकीच्या हक्कासंबंधानें आड येणार नाहीं अशी आमची उमेद आहे. " याप्रमाणें चढाओढीनें रा. मांडे यांची एक व रा. कुळकर्णी यांची एक अशा निबंधमालेच्या दोन आवृत्ति बाहेर पडल्या आहेत. हल्लीं या वर्षांत मुंबईमध्यें निबंधमालेंतील निवडक निबंधांची फुटकळ पुस्तकें छापण्याचें काम दोन निरनिराळ्या गृहस्थांनीं चालविलें आहे. यांतील एक दोन प्रसिद्धहि झालीं आहेत. येणेंप्रमाणें आज चार पांच वर्षांत निबंधमालेच्या तीन चार निरनिराळ्या आवृत्ति निघणेंच म्हणजे विष्णुशास्त्री यांच्या लेखांची चहा दिवसेंदिवस नवीन होतकरू मंडळींत किती वाढत चालली आहे याचें उत्कृष्ट प्रमाण आहे. आणि त्यांत विशेष लक्षांत धरण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, निबंधमालेचें पुस्तक अगोदर तीन रुपये किंमताचें; त्यास नाहीं सरकारचा, नाहीं कोणा मंडळीचा आश्रय, त्याजवर कोणी मि. अकवर्थसारखे वजनदार साहेब तुटून पडणार, कोणी आनरेबल वरील साहेबांच्या मर्जीस्तव त्यांस 'जी' ओढणार—अशी स्थिति असतां फक्त लोकाश्रयावरच तिचा येवढा प्रचंड खप व्हावा ह्यापेक्षां तिच्या लोकप्रियतेची दुसरी साक्ष ती कोणती !

आतां विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांचा जो येवढा झपाट्यानें प्रसार होत चालला आहे त्यापासुन आमच्या होतकरू मंडळीस केवळ विद्येसंबंधानेंच होणारे फायदे—म्हणजे मराठी भाषा शुद्ध लिहितां येणें, व इंग्रजी, संस्कृत व मराठी यांतील ग्रंथांतून अनेक विषयासंबंधानें जी पुष्कळ उत्कृष्ट

माहिती दिली आहे ती दाखवून दिल्यानें बहुश्रुतपणा व ज्ञान प्राप्त होणें–यांचा अनुभव मराठी वाचकांस बराच येऊं लागला आहे यांत संशय नाहीं; परंतु यांहून अधिक योग्यतेचे फायदे—म्हणजे मनाचा उदात्तपणा, स्वालंबन, प्रीति, सतत उद्योग, दृढनिश्चय, स्वाभिमान, स्वदेशाभिमान वगैरे उन्नत वृत्तींचें दृढीकरण—यांचाहि हळूहळू प्रादुर्भाव आपल्या नवीन तरुण वाचकांच्या मनावर होत चालल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. आमच्या महाराष्ट्र देशांत हल्लीं जी पुष्कळ कारणांनीं हरएक बाबतींत चळवळ सुरू झाली आहे त्यास विष्णुशास्त्री यांचे ग्रंथ हे बरेच कारणीभूत आहेत असें मानण्यास हरकत नाहीं; व यापुढें एक दोन पिढ्यांनीं तर त्यांच्या ग्रंथांचें तेज हल्लींपेक्षां अधिक चांगलें पडून त्यांच्या द्वारें अनेक दिशांनीं आमच्या देशाचें हित होण्याचा संभव आहे !

विष्णुशास्त्री यांचे ग्रंथ येवढे लोकप्रिय होऊन त्यांचें इतकें तेज पडण्यास मुख्य कारण हें अझून सांगायाचेंच राहिलें आहे. तें अर्थातच **त्यांचें लेखांतील आणि वर्तनांतील पूर्ण ऐक्य हें होय.** त्यांचे लेख मोठे चटकदार, निर्भीड वगैरे आहेत खरे, आणि त्यांच्या वाचनानें सहृदय वाचकांच्या मनांत त्यांच्या सारख्याच उदात्त वृत्ति उत्पन्न होतात; परंतु त्या विशेष दृढतर होण्यास त्यांच्या उदात्त लेखांप्रमाणेंच त्यांचें उदात्त आचरण हें होय. त्यांचें खाजगी वर्तन शुद्ध, गरीबीचें व सालस असेंच असे–तें इतकें कीं, पुण्यासारख्या चवकस शहरांत त्यांचा बहुतेक जन्म गेला असतां त्यांच्या दुर्वर्तनाबद्दल कोठें कांहीं ऐकूं येत नाहीं–परंतु त्यांचें लौकिक वर्तन पूर्ण उन्नत, एकमार्गी, जसें बोलणें किंवा लिहिणें तसेंच चालणें, अशा तऱ्हेचें असल्यामुळें सामान्य लोकांत त्यांची मोठी चहा असे. विष्णुशास्त्री यांची खरी परीक्षेची वेळ म्हटली म्हणजे त्यांवरील डायरेक्टर साहेबांची मर्जी उडून जाऊन त्यांची रत्नागिरीस बदली झाली तेव्हांची होय ! या वेळीं जर त्यांनीं निबंधमालाद्वारा इंग्लिश सरकार, इंग्लिश ग्रंथकार वगैरेंविषयीं केलेल्या यथेच्छ पांडित्यांचें पर्यवसान कोणास मध्यस्थ घालून नम्रपणानें साहेबांची माफी मागून सर्व

कटकटीचें मूळ जी निबंधमाला तीच बंद करण्यावर झालें असतें तर आज त्यांच्या लेखांना जें येवढें वजन आहे तें कवडीमोल झालें असतें ! ! हल्लीं आमचे एक रावबहादूर हे त्यांची अलौकिक विद्वत्ता, मोठा अधिकार, अतोनात द्रव्यसंचय व एकंदरींत सालस वर्तन इत्यादि गुणांनीं विभूषित असतांहि त्यांस कोणी ' खाऱ्या पाण्याचा समुद्र ' वगैरे कांहीं अशीं यथार्थ विशेषणें देऊन टवाळी करितात त्यांतील वास्तविक कारण म्हटलें म्हणजे त्यांच्या व्याख्यानांतील व कृतींतील वरीच विसंगति हेंच होय. हा महत् दुर्गुण विष्णुशास्त्री यांच्या ठिकाणीं नव्हता म्हणूनच त्यांची येवढी चहा आहे व ती यथार्थ आहे यांत संशय नाहीं.

विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांविषयीं व त्यांच्या लौकिक कृत्यांविषयीं इतकें विवेचन झाल्यावर ग्रंथकार व लोकनायक या नात्यानें आमच्या विद्वान लोकांत त्यांची कोणती पायरी लागेल याविषयीं निराळें लिहिण्याची गरज राहिली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. ज्या लोकसमाजाकरितां त्यांनीं आपले ग्रंथ लिहिले त्याजकडून त्यांचा जो येवढा मान होत आहे तोच या गोष्टीचें निखालस उत्तम प्रमाण होय ! विष्णुशास्त्री यांच्या मागें व पुढेंहि त्यांच्यापेक्षां अधिक विद्वान् किंवा बुद्धिमान लोक झाले असतील; परंतु त्यांपैकीं कोणाच्या ग्रंथांच्या प्रकाशनाविषयीं लोक इतके उत्सुक होऊन ग्रंथकारांच्या मालकीच्या हक्कासहि धडका देऊं लागले असें आढळलें नाहीं ! ज्या ग्रंथकाराचे मुख्य मुख्य ग्रंथच काय, परंतु त्याचे सामान्य लेख, फुटकळ भाषांतरें, वर्तमानपत्रांतील सुद्धां लेख— सारांश, त्यांच्या लेखणींतून उतरलेली एकून एक ओळ—ही सुद्धां प्रसिद्ध करण्याविषयीं लोकांच्या उड्या पडत आहेत * त्याची मराठी भाषेंतील कोणी ग्रंथकार बरोबरी पावूं शकेल असें आम्हांस वाटत नाहीं. माजी बाळ गंगाधर शास्त्री किंवा कृष्णशास्त्री चिपळुणकर हे जरी घेतले तरी

* नुकतेंच असें कळतें कीं, मुंबईंत एक विद्वान् गृहस्थ विष्णुशास्त्री यांचे केसरींतील निबंध, शाळापत्रकांतील स्फुटनिबंध, भाषांतरें वगैरे सर्व किरकोळ लेख यांचा संग्रह एका निराळ्याच पुस्तकांत करून तो छापीत आहेत.

त्यांच्या ग्रंथांची चहा म्हणजे क्यूरेटर साहेबांच्या दुकानांतच; एरवीं मराठी वाचकांच्या बाजारांत त्यांच्या मालावर (ॲरेबियन नाईट शिवाय करून) गिऱ्हाइकांची उडी पडेल असें बहुधा होणें कठिण ! आज मितीला, बाळ गंगाधर शास्त्री यांचा ग्रंथ 'इंग्लिशांचा इतिहास' हा कित्येक दिवस अप्रसिद्ध होऊन गेला आहे; परंतु तो पुनः छापण्याची कोणा पुस्तकवाल्याची हिंमत होईल बरें ? परंतु त्याच विषयावर विष्णुशास्त्री यांनीं लिहिलेला ग्रंथ असून तो छापावयाचा आहे अशाबद्दल कोणीं जाहिरात दिली तर त्याजवर आज किती वर्गणीदारांच्या उड्या पडतील ? तर नुसत्या बाजारभावावरून ही विष्णुशास्त्री यांच्या ग्रंथांची पायरी आमच्या मराठी ग्रंथमालेंत सर्वांत पहिली लागेल हें निर्विवाद आहे. परंतु इतर देशांतील ग्रंथकारांमध्यें सुद्धां ती साधारण बरीच उंच लागेल हें जो मनुष्य त्यांचे ग्रंथ नीट वाचून पाहील व त्यांच्या संबंधानें दुसऱ्याहि गोष्टींचा विचार करील त्यास समजून येणारे आहे विष्णुशास्त्री यांनीं डाक्तर जॉनसन यानें इंग्रजी भाषेंत ग्रंथरचना करून तिला चांगल्या स्थितीस आणून सोडलें म्हणून त्याची, व पुढें तोच क्रम मेकॉले यानेंहि चालवून इंग्लिश भाषेची महत् सेवा केली म्हणून त्याची, अशी दोघांची मोठी तारीफ केली आहे; परंतु पहिल्या ग्रंथकारास तें काम करण्यास प्रवर्तक–नित्याची चिंता–ही होती व दुसऱ्यास ग्रंथरचनेपासून लाखों रुपयांची किफायत होण्याची अपेक्षा होती. परंतु विष्णुशास्त्री यांस या दोन्हीहि गोष्टी लागू नसून **त्यांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनें स्वतःचें कर्तव्य आहे असें समजून** महाराष्ट्र भाषेची सेवा येवढ्या कळकळीनें, इतक्या अल्प काळांत व येवढ्या योग्यतेची केली यावरून त्यांनीं आपल्या कृतीविषयीं योग्य अभिमानानें जें म्हटलें आहे की–" गेल्या आठ वर्षांत सदरील पुस्तकाचा जो आम्हीं अव्याहत उद्योग केला त्याला आमच्याच देशांत काय, पण पाश्चात्य देशांतहि तोड सांपडणार नाहीं असें म्हटलें असतां गर्वोक्ति केल्याचा दोष माथीं येईल असें आम्हांस वाटत नाहीं. मासिक किंवा त्रैमासिक पुस्तकांची कोठेंहि स्थिति पाहिली तरी येवढा डोलारा कोणी एकट्यानेंच शिरीं वाळगला आहे असें

आम्हांस तर अद्याप कोठें आढळलें नाहीं "—त्यास प्रत्येक निःपक्षपाती
मनुष्यास मान डोलवावी लागेल ! ! सारांश, इंग्लिश भाषा चांगल्या
स्थितीस येण्यास ज्याप्रमाणें आडिसन. जॉनसन वगैरे ग्रंथकार कारणीभूत
झाले त्याचप्रमाणें आमच्या महाराष्ट्र भाषेच्या संबंधानें विष्णुशास्त्री झाले
असें म्हणण्यास हरकत नाहीं. ते जर वरील ग्रंथकारांप्रमाणें दीर्घकाळ
वांचते तर त्यांस अधिक पोक्त विचार येऊन त्यांच्या पूर्ववयामुळें त्यांच्या
ग्रंथांत हल्लीं जे कांहीं प्रमाद घडले आहेत ते नाहींसे होऊन त्यांच्या
हातून अनेक उपयुक्त ग्रंथ व स्वतंत्र उद्योग निघून त्यांपासून आपल्या
देशाचें पुष्कळ हित झालें असतें असें कोणीहि मनुष्य कबूल करील !

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचा जीवनवृत्तांत, त्यांचे ग्रंथ, त्यांचे उद्योग,
व त्यांपासून हल्लींच्या व पुढें होणाऱ्या लोकांवर कशा तऱ्हेचे परिणाम
झाले आहेत व होण्याचा संभव आहे वगैरे भाग सर्व यथास्थितपणें
आटपले. आतां सरतेशेवटीं ज्याप्रमाणें सुज्ञ पितरांस इच्छा असते, कीं
आपलें स्वतःचें नांव देहावसानानंतर कालांतरानें बुडून जाऊन पुढें
आपल्या पुत्रपौत्रांचाच नांवलौकिक अखंड चालावा, त्याचप्रमाणें विष्णु-
शास्त्री यांचे ग्रंथ व त्यांचें चरित्र यांचें मनन करून त्यांच्यापेक्षां अधिक
योग्यतेचे ग्रंथकार, त्यांच्या मागें उत्पन्न होऊन त्यांच्या उज्ज्वल कीर्तीस
झांकून टाकोत अशी इच्छा धरून व त्याबद्दल जगन्नियंत्या परमेश्वराची
प्रार्थना करून **विष्णुशास्त्री चिपळुणकर** यांचें हें चरित्र आम्ही संपवितों.

उपसंहार—विष्णुशास्त्री यांच्या चरित्राची सामुग्री व तें लिहिण्याची
योग्यता हीं दोन्ही आमच्यापाशीं असल्यानें त्यासंबंधाचें एक प्रकारचें
ऋण आमच्याकडे बरेंच दिवस राहिलें होतें, तें आमच्या हातून कधीं
तरी फिटलें जाईल अशी आम्हांस अगदीं उमेद नसतां प्रस्तावनेंत
निर्दिष्ट केलेल्या चमत्कारिक तऱ्हेच्या प्रसंगानें तें आज बऱ्याच चांगल्या
रीतीनें फिटलें गेलें हें पाहून आम्हांस मोठा संतोष वाटतो. हें चरित्र
लिहिण्यास हातीं घेतल्यापासून तों तें अखेर छापून निघेंतोंपर्यंत सुमारें
दोन वर्षांत ज्या पंचवीस तीस व्यक्तींचा त्यांत निर्देश केला आहे त्यांतून
सुमारें निम्मे गृहस्थ येवढ्या थोडक्या अवकाशांत गत झाले असें पानां-

खालील टिपांवरून दिसून येईल. तेव्हां हें पुस्तक निर्विघ्नपणें आज पार पडलें याबद्दल आम्हांस जो संतोष वाटत आहे तो केवळ विनाकारण आहे असें नाहीं. आम्हांस या कृत्यापासून द्रव्यलाभ वगैरेची अर्थातच कांहीं प्राप्ति झाली नाहीं व त्याबद्दल आम्हीं पहिल्यापासून इच्छाहि धरिली नाहीं; परंतु हें काम बरेंच तडीस गेलें हें पाहून या पुस्तकाच्या विषयापेक्षांहि जास्त महत्वाचा विषय–**मराठे लोकांचा इतिहास**–ज्याबद्दलची जाहिरात या पुस्तकांत मागें घातली आहे तो हातीं घेण्यास उत्तेजन आलें हाच विशेष लाभ आम्ही समजतों. हें नवीन घेतलेलें काम ईश्वरकृपेनें जर आमच्या हातून पूर्णपणें शेवटांस जाईल तर पुष्कळ लाभांपेक्षांहि आम्हांस त्यापासून अधिक समाधान वाटेल.

ता. १ जून १८९४
मु. उमरावती.

लक्ष्मण कृष्ण चिपळुणकर.

THE NATIVE PRESS AND BRAHMIN INTRIGUERS.

——:o:——

To the Editor of the "Bombay Gazette."

SIR,

Some months ago a member of the Civil-Service revealed to us the openly hostile tone of the native Press of this Presidency, and with your permission I propose to continue the subject, confining myself on the present occasion to a magazine published in the loyal city of Poona, under the title of *Nibandhamala*.

This periodical appears monthly, but has fallen in arrears, the number for June being just issued from the Press. In this number, there is an article on Asiatic (*i.e.* Indian) History as written by Europeans, and the writer endeavours to show that they are in every way disqualified for the task, having neither a competent knowledge of the languages nor sufficient acquaintance with the ways of the people. Here is a translation of what he says regarding the former qualification :—" Although all over Europe and America there are no teachers of the oriental languages and though there are Asiatic Societies in different places, and in India Europeans are always to be found as University examiners and as members of the Dakshina Prize Committee, still every child even is aware what knowledge of oriental languages these wiseacres really have."

Having thus in a single sentence disposed of our linguistic attainments, this doughty critic attempts to show that we really know nothing whatever of the people and

their ways! He remarks as a matter of course, that this ignorance is owing to our holding aloof from the natives; but forgets to mention that it is the Brahmin who has held aloof from the European, not the latter from the former. This side of the question is, I have noticed, invariably ignored by those, who profess to lament the existing state of separation between two races. In their anxiety to fasten the blame upon the Englishman, they conveniently consign to oblivion the hateful caste-system which teaches that the lowest Brahmans would be defiled by eating with the highest Europeans! Unable, therefore, to establish his point by fair argument, the writer takes refuge in insolent invective of which the following is a sample:—" Last year a great ruler in India was tried like a common cutpurse, and hundreds of our Sirdars were sacrificed, in order to do honour to the Heir Apparent; today a guard seizes a Deputy Collector and drags him from a railway carriage, to-morrow some son of Christ, before going to see his heavenly father, kills his groom outright and this sort of thing is continually going on and demonstrating what idea they have of human rights."

Again:—" They like to pry into the religions of this and that country, and thoroughly enjoy ridiculing them, but if a stranger goes into one of their Churches, he has to sit quite still in a corner like a thief and to shut his eyes with the dear people of God; and well may he close them, for to any one reading the Holy Bible with his eyes open, its childishness, worthlessness, ignorance and vileness would be too apparent. Then, too, in every street, shameless and incorrigible outcastes are allowed to revile the religion of this country as much as they like, under the protection of the police; but if any one attempts to refute

what they say, he is punished by the Government for shaking the Christian faith."

"Our readers will remember what tyranny was practised on Mr. Melvill about two years ago, because he adopted the Mahomedan religion. This of itself will show how much reality there is in the liberty of conscience, which our rulers make such boast of! And although on the surface it looks as if no pressure were brought to bear on the people in the matter of religion, yet a thoughtful man cannot fail to see that this is very far from the truth."

"Then, too, our rulers are parading through the country the greatness of English leather, and our miserable shoes are not allowed to enter a Government office, and even Sirdars of the Legislative Council are strictly warned on this subjcct."

Allow me, sir, to present these four gems to his Excellency the Governor in Council, as a tribute of esteem and regard from a loyal Hindoo subjest.

Warming to his work, and summing up all the most contemptuous expressions he can command, the writer then proceeds to deliver himself of the following tremendous sentiments:—

"The people, who before they discovered Asia, with difficulty obtained the necessaries of life, who, on first seeing fields of sugarcane were intoxicated with delight and fell upon it like wild beasts, who, having no idea of an elephant, ran away terror-stricken from the first they saw, whose richest soil is no better than our sterile ground, in whose country there is perpetual rain and snow and where the sun never shines to perfection, they forsooth pretend to turn up their nose at the real splendour of this rich

and pleasant country ! Yes, people whose country is only a span square and in which all the works of nature are on such a pigmy scale that the highest mountains are no bigger than one of our hillocks, whose mighty rivers such as the Thames are of the dimensions of one of our streamlets, whose most costly mineral productions are tin and lead, whose sweetest fruits are like our jungle fruits, and amongst whom poverty so reigns that notwithstanding an incessant flow of wealth from this country for hundreds of years, there are still hundreds of thousands, who have nothing better than potatoes to toss into their mouth, these dare to compare their country with affluent India. "

The above would be extremely amusing but for the position of writer.

The last extract, I will give from this choice article, is intended at one ful stroke to demolish our ideas of physical or military superiority and even aims at placing us on a lower level, than that of our dusky brethren of the East. Here it is :—

" See, how quickly the Arabs reduced the invincible Romans and how for several centuries all Europe trembled before them. The countries, which it took the Romans 800 years to conquer, were over-run by our Eastern warriors in 80 years, and one campaign for each of the countries of Syria, Persia, Egypt, Spain, France, sufficed for its subjugation. These were followed by the Turks, who over-ran Asia Minor and in 1453 uprooting the Christian standard of the cross, planted instead their own crescent banner. Amidst all the tumults and changes of dynasties in Europe, these Turks have stood fast. In the 11th, 12th and 13th centuries, countless hosts of European warriors, bearing

the standard of the cross fell upon Turkey for the rescue of the birth place of the Lord Christ, but the followers of the false prophet accounted for them all singlehanded... Our Western rulers overcame one by one Tippoo, Bajirao, Daulatrao and Yeshwantrao and planted their standard throughout the length and breadth of India, but see, how in 1841 at the invasion of Afganistan their vaunted, strength and intelligence were scattered to the winds. English military tactics and English wisdom were as nought before that stern people and English credit was humbled in the dust......The sepoys, and they alone, have upheld the English rule in India, and how completely its stability depends upon them, than was shown very clearly about twenty years ago."

A noble tribute this to the superior prowess of the followers of Islam. No wonder that after reading it the Sarvajanik Sabha of Poona was moved to dispatch a deputation to Bombay to express its sympathy with the Turks, the manly violators and murderes of Bulgarian women and children—just as it last year came forward to plead for the "great ruler who was tried like a common cutpurse" simply because he had committed the petty crimes of murder, attempted murder and oppression and had a remarkable predilection for his subjects.

Let me now, however, bring out the talented editor of the *Nibandhamala* from the obscurity of Poona and introduce him to the general public. Who is he? It is unnecessary to say that he is a Brahmin and almost equally so, to say that he is one of the herd of demi-semi-educated Brahmins, annually let loose on the country from the Government schools and colleges. Is it as needless to say that he is a Government servant a master in an English

High School ? And who, pray, is the head master ? A Brahmin ! Has this Brahmin reported to the Director of Public Instruction his subordinate's special talent as a caterer to the intellectual and moral wants of the native public. especially as indicated by this June number and that for August 1874 ? Is there not in Poona Reporter on the native Press ? Who is the gentleman specially singled out to bring to the notice of Government the seditious matter served up by Brahmin—Editors for the instruction of their countrymen ? A Brahmin. Did he bring to the notice of Government the scurrilous and lying matter of No. 8 of the *Nibandhamala* ?

This then, Sir, is a specimen, though rather a mild one, of what our B. A.s and M. A.s are doing in the country. Yet these are the geutry whom it is proposed to put into the Civil Service and other Departments without competition ? When will the Government be awake to the fact that a Brahmin is a born intriguer, that men of that caste already hold nearly every subordinate post in this presidency, that they are knit together by bonds far closer and stronger than those which hold together any of the secret societies of Europe, and that they are at the bottom of all the discontent and disloyalty in the country.

As for any true independence on their part it is simply an impossibility. Some months ago when a prominent native official in Gujarath was invited to go to England on state business, he declined on the ground that his caste would be too much for him. The late Vishnu Shastri and a large number of his co-religionists advocated widow-re-marriage, but the illiterate Sankaracharya very soon routed all but their leader.

Now, supposing the caste dictated to a subordinate Judge a decision in a case, favourable to themselves but

opposed to justice, which side, do you suppose, sir, would have the best of it ?

29th, September, 1876. Yours &c.

ELIPHAS.

THE DEFENCE OF THE EDITOR OF THE NIBANDHAMALA.

——:*:——

Dnyan Prakash Monday, 9th October, 1876.

We give below a very prominent insertion to the following letter addressed to us by the Editor of the *Nibandhamala*:—

To the Editor of Dnyana Prakash,

Sir,—

I crave your permission to address to you the following; which will, I doubt not, find some favour with you, in as much as it so nearly concerns you and the public at large.

You and many of your readers cannot but have been aware that there has appeared in the *Bombay Gazette* of Tuesday last a letter signed "Elephas," which has fallen foul on the *Nibandhamala*, on 'loyal Poona' and on 'Brahmin intriguers' in general. As I have been the immediate cause of the 'tremendous sentiments' with which the writer in your European contemporary has tried to ease either his spleen, his wounded race-pride or his evangelical agony, and as my silence on an occasion like the present is liable to be construed into a tacit avowal of conscious guilt or dread to encounter my as-

sailant, you will, I hope, allow me to answer through your columns the contemptuous and angry comments made by the said Elephas in a spirit but too congenial, as everybody must know, with that of the organ where he has appeared.

To rebut one by one the many charges which Elephas—what in the magnanimity of his civilized wrath, what in the utter ignorance and strange distortion of facts—has poured forth against my magazine, against the Brahmin community and against this city generally, were but tedious without use. It is hardly to be expected that one who allows himself to be swayed so completely by anger or prejudice, as my opponent has done in the present instance, can have a clear undisturbed perception of the truth, or the fairness to communicate it in its entiriety; neither do I believe it possible that Elephas' own countrymen can all with one accord be crying 'Amen' to the declamations and sweeping denunciations such as those in which our Western brother has thought fit to indulge. Elephas has raised his colossal foot to crush under its huge weight the 'herd of semi-demi-educated youths' of this country, the 'loyal Poonaites,' the impertinent Sarvajanik Sabha and the illiterate Sankaracharya. Nor has he shown himself over-tender towards certain highly considered Native officials. He accuses the Head Master of the High School here and the Reporter on the Native Press of plain dereliction of their duty, in not having anticipated him in the task of finding sedition in the pages of the *Nibandhamala*, and is quite satisfied that the simple fact of both being Brahmins is of itself sufficient to account for their connivance towards a fellow intriguer. Now with respect to these matters I do not feel myself called upon to make any remarks, being full-

persuaded that they will meet with due justice at other hands. I will, therefore, confine myself to that which concerns me most.

The number of my *Mala* which has occasioned thie great, though by no means unexpected, noise in certain quarters is that for June last, which however, appeared only about a month ago, the magazine having fallen some months in arrears. This last is by far the only charge against the magazine which is thoroughly borne out by facts. Now this number is a continuation of an essay on the English Language, being the third of the series. In the previous numbers I gave to my readers some notion of the diversity and richness of English literature, and treated briefly of one department—the Essay. In the last number to the one under notice I gave them some information about the English Histories of Europe; and in the present one I went over to the next division, namely Asiatic History. As an introduction to this subject, interesting specially to an Asiatic reader, I stated certain misconceptions and strange prejudices with respect to Asiatic nations which hang on the European mind, and which unfortunately take not a little from the fidelity as well the worth of their learned and curious labours. I have then mentioned the causes which in my opinion lie at the root of those narrow notions. Here then is the main point of the essay and the ground of contest. Aware beforehand, how easily such a subject would give room to gross misconstruction and misrepresentation at the hands of unscrupulous and unfair opponents, I supported most of my remarks with ample quotations from English historians tuch as Ockley, Buckle, Kaye and Martiman, The advisability of this precaution has been clearly shown by the event. Elephas amidst all his angry cavillings at the

essay has kept aloof from joining issues with me on any of the main points touched on in the essay. He has, therefore, to make up something like a long critique on me, and has touched on matters which have not the slightest bearing on the subject matter. He has for instance, conncated my account of Arabian exploits with the deputation, which he alleges was sent by the Sarvajanik Sabha to the Mahomedens of Bombay to join in their memoralizing to England on behalf to Turkey. He accuses me likewise of having asserted that English prowess is decidedly inferior to that of Islam. If Elephas would pose over the number he has pretended to review with keener eyes, he shall, I may assure him, see no such thing there.

All this is quite enough, I should think, to show that Elephas' statements are neither just nor accurate. I could have said much more. The unbecoming tone which this censor of our B. A.s and M. A.s and this frantic denouncer of 'Brahmin intriguers' has used throughout his letter is of ttself sufficient to justify the severest reprehension. But I forbear I will, before I conclude, only lay bare before your readers what sort of stuff is that our most loyal Elephas has been pleased to term sedition.

I have spoken of the imperfect knowledge which the Westerns have in general of the languages of the East, Is this *sedition* ? If so, what shall we say of one, who standing as it were on the very top of Parnasus looks down upon our university men as upon "herds of semi-demi-educated youths," wilfully forgetting that he numbers among this herd men whose knowledge of the Western languages is immeasurably superior to that of many a Western Orientalist, and who have been the esteemed

pupils of such men as Sir Alexander Grant, William Wordsworth and the late Martin Haug ? I have spoken of the Arabs and the Turks and recounted to my readers their wonderful conquest. Is this *sedition* ? If so, the goor blades that put Roman cohorts to flight or the lying pages of those black traitors, Ockley and Gibbon are to blame, and not the editor of a marathi periodical. I have spoken of the magnificence of Asia and the comparative wretchedness of the West. Is this *sedition* ? If so, old Dame Nature is at fault, not I. I have spoken of the Bible and the Christians in no very reverend tone. Is this *esdition* ? If so, I can point to the pages of many a great European thinker for confirmation and can plead as an excuse the example of many a reverend missionary. Lastly, if I have incidentally tonched on the late Baroda affair and the reception of our Chiefs on the occasion of H. R. H. the Prince of Wale's visit, I can confidently say that the mention has been but slight, and has not the remotest political bearing.

I have done. My answer has drawn to a grteater length than I had intended, but if your readers will see clearly from this, what is the flimsy texture of the seemingly tremendous communication of Elephas, my purpose will be served.

NATIVES AND EUROPEANS.

Times of India of 17th October 1876.

To the Editor of the Times of India.

Sir,

Allow me to return an answer to "Elephas" whose letter on the "Native Press and the Brahmin intriguers" appeared in the "*Bombay Gazette*" summary of the 9th Instant.

The whole letter breathes nothing but spite against Brahmins, who are unquestionably the most intelligent of all the races found in India. Though I intend to correct the writer's false notions I hope I shall not adopt his spiteful tone.

The writer singles out a magazine published at Poona and after translating a few passages from the last number of that paper pours a shower of abuses on the devoted heads of the Editer, the "semi-demi-educated" natives, the head master of the High School, the reporter on the Native Press, and lastly, on the Brahmin intriguers. What connection these latters have with the magazine or the Editor I am unaware. Perhaps the writer may enlighten me on the point. Does "Elephas" think it is the duty of a Head Master to report to the Director on the views which his subordinate holds and which the latter is at liberty to publish? Does he forget that it forms no duty of the reporter on the Native Press to report on monthly magazines. Why then all this fuss; I suppose he brought them in for no other reason but that they were Brahmins.

The Editor of the *Nibandhamala* while passing remarks on the qualification of writers of Asiatic History, pronounces a judgment which however unpalatable to the Englishman of the type of "Elephas" is but too true. Can any body deny that Europeans here have very little knowledge of the vernacular languages and of the manners and customs of the people? Can we not give instances of gentlemen, who have spent the greater portion of their lives out in India, but who have yet very little knowledge of it and its people. It would suffice, if I give only one instance. I was recommended by a European friend of mine to read the Colonel Meadows Taylor's "Tara, a Mahratta tale" and I was curious to know what opinions an Englishman formed of us who had lived, I was told, more than forty years in India. What was my surprise however, when I found that while the talented author graphically described the scenery and the place of the Deccan, he failed to understand the manners and customs of the people and their affections and their prejudices. I will give only a few instances. The Colonel has placed "Moorless" (Priestesses) at Tooljapur, where there are none. The Priestesses here are called "Aradhins" while the "Moorlees" are those of Khandoba at Jejuri. No Brahmin girl can be a "Moorlee" and yet 'Tara' is one and wherever a girl is consigned to the deity as "Moorlee" she is never admitted to her household, and yet Tara was! How inaccurately the gallant Colonel gauged the feelings of Brahmins will appear from the fact, that he has made Vyas Shastri—mind you, an old orthodox Shastri of the time of Sivaji—and his wife to give their consent to the marriage of their daughter "Moorlee" Tara with a Mahomedan. Indeed the inaccuracies are

too many to be pointed out here. Suffice it to say it is a fact too well known that Europeans fail to fathom the feelings of the Natives, and well they might, for they keep aloof from them. 'Elephas' says it is we Brahmins who keep ourselves thus from Europeans, because we cannot eat with them on the same table. Does 'Elephas' mean that there is no intercourse but it should made by eating? Do not the Shudras—nay the Mahomedans—associate with us and have all our sympathy though we do not take meals with them. Was there not greater cordiatily between the Mahomedan rulers and their Hindoo subjects though they were barbarours. Do not the majority of English officers here repel all advances of natives with contempt? Has it not become a creed with them to call all of us "intriguers" and shun and hate us as the orthodox Brahmin does a pariah? And pray what does "Elephas" mean by calling us "intriguers?" If he means we sympathise with one another and stand by one another, is that a reproach to us which is considered an honourable distinction among Europeans? I have yet to learn what is morality to one nation is not so to another. If "however" he means we secretly plot against Government, we fling back the charge with contempt. You will concur with me when I say it is no treason to ask a gracious Government to confer certain privileges upon its subjects; and the B. A.s and the M. A.s are slanderd for doing no more than this.

I wish "Elehpas" had gainsaid the facts contained in the "four gems" which he has presented to His Excellency the Governor in Council. Must I remind him that facts must be refuted by facts, and that they cannot be discredited by pooh-poohing them away, as he has done? Are not

all the facts contained in the "four gems" true? Did not the impoverished Sardars suffer in money when they went to Bombay to do honour to His Royal Highness the Prince of Wales though they could thus show their loyalty? Loyalty is good but poverty is a stern fact. Was not Mr. Shankar Pandurang dragged from a Railway Carriage by a guard? Has "Elephas" forgotton the Fuller Case? Does he not know that a native who preached Hindoo religion on the Esplanade was silenced by Mr. Connon, because he committed a breach of the peace, while all the "outcaste preachers," who revile our religion, escape scot-free? Has not the Anglo-Indian press condemned the action of Government in Mr. Melvill's case? Are the facts in the history of Arabs to be blotted out, because they would not serve the purpose of "Elephas?" If the statement of facts were construed into treason, the Editor of the *Nibandhamala* must plead guilty.

As to the charge of the "Elephas" that natives are wanting in independence, let me say that it is, if true, to be attributed to their subordinate position, where their English superiors brook no such spirit. If natives are cowed they are cowed by the fear of their superiors. Let the English officers treat them kindly, trust them, and sympathise with them, and they will find them as grateful, as true, and as affectionate, as any nation in the world. From my own experience I should say that natives are more conscientious in their duty than many Europeans are. The truth is, that while the former are afraid of law, the latter are high handed, for no one generally questions their acts.

I should in conclusion remind "Elephas" that the

liberal policy of Government in throwing higher places open to natives cannot be changed by his weak pen. The English nation is aroused and justice will be done.

"Brahmanpuri"
11th October.

A BRAHMIN.